म. ग्रं. सं. ठाणे
इतिहास
३८४
१९२५
स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे

# ...ा सोपा इतिहास.

नों.नं. ५८६२
REFBK-0002802

गो. अ. मोडक.

পু. সং.
না.
সং.

दुय्यम शाळांतून चालविण्यास मुंबई आणि 'वऱ्हाड व मध्यप्रांत' विद्याखात्यांनीं मंजूर केलेलें क्रमिक पुस्तक.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
—गीता.

# इंग्लंडचा सोपा इतिहास.

इ. नं. १४२

लेखक
गोविंद अनंत मोडक, बी. ए.

२८०२
REFBK-0002802
REFBK-0002802

दुसरी आवृत्ति

१९२५

किंमत सव्वा रुपया.

मुद्रक—**गणेश काशिनाथ गोखले**, सेक्रेटरी,
**श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स**, ४९५-४९६ शनवार पेठ, **पुणें शहर.**
प्रकाशक—**गोविंद अनंत मोडक**, बी. ए.
४१० नारायण पेठ, पुणें.

# प्रस्तावना.

२ नं. ३४१ ता. २६

१. हा 'इंग्लंडचा सोपा इतिहास' तेरा चौदा वर्षांच्या विद्यार्थ्यांस इंग्लंडच्या इतिहासाचें कथानक सोप्या रीतीनें समजावून द्यावें म्हणून लिहिला. हिंदी विद्यार्थ्यांस १४८५पूर्वीचा इंग्लंडचा इतिहास माहीत करून घेण्याची तादृश जरूर नाहीं. यासाठीं तेथवरचा वृत्तांत अतिशय संक्षिप्तरीतीनें वर्णिला असून पुढील काळचें महायुद्धाच्या अंतापर्यंतचें कथानक जरूर तितक्या विस्तारानें या पुस्तकांत गोविलें आहे. तरुण विद्यार्थ्यांची आवड व मगदूर लक्षांत घेऊन कथानक होईल तितकें सुटसुटीत व कच्च्या माहितीच्या गुंतागुंतीपासून मोकळें ठेवण्याची खबरदारी घेतली आहे. इंग्लंडच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचा विकास, सामाजिक प्रगति व ब्रिटिश साम्राज्यविस्तार या मुख्य गोष्टींना विशेष महत्त्व दिलें आहे; आणि परराष्ट्रांसंबंधीं विस्तृत माहिती शक्य तितकी टाळली आहे. योजना अशी कीं, हें पुस्तक वाचून इंग्लंडच्या इतिहासाची सामान्य रूपरेषा ( General outline ) वाचकास अवगत व्हावी.

२. या पुस्तकाचीं एकंदर प्रकरणें चवेचाळीस झालीं असून त्यांची रचना प्रसिद्ध व्यक्ति व ऐतिहासिक प्रसंग यांना धरून केली आहे. एक एक प्रकरण सरासरी पांच पृष्ठांचें असून सामान्यतः दोन तासांत एक प्रकरण या हिशोबानें चौथी व पांचवी या दोन इयत्तांत मिळून पुस्तक सहज शिकवून होईल. शेवटीं संक्षिप्तचरित्रमाला, सनावली, वाचनीय पुस्तकें व उतारे, शब्दकोश, स्मरणीय वचनें आणि सूचि या सर्वांचा अन्तर्भाव केला आहे. त्यामुळें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडेल अशी आशा वाटते. तीन नकाशे घालून भूगोल व इतिहास यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीनें पुस्तक विद्यार्थ्यांस उपयुक्त व्हावें म्हणून शक्य ती व्यवस्था केली आहे.

३. हें पुस्तक लिहितांना मीं पूर्वीं लिहिलेला 'इंग्लंडचा इतिहास' या पुस्तकाचा मला फार उपयोग झाला. 'इंग्लंडचा इतिहास' त्यांतील

कच्च्या माहितीमुळें चौथ्या-पांचव्या इयत्तांतील विद्यार्थ्यांस जड वाटतो असें वेळोवेळीं कानांवर आल्यामुळें एक सोपें पुस्तक लिहिण्याचें मनांत आलें. त्याप्रमाणें गतवर्षीं ( १९२३ ) हें पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली व आतां तें प्रसिद्ध होत आहे. या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मीं प्रो. रा. प. सबनीस, प्रो. म. रा. परांजपे, रा. रा. रा. वि. ओतूरकर, व रा. रा. त्र्यं. मो. भट, या मंडळीस दाखविली. त्यांनीं अनेक उपयुक्त सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. अजूनही पुस्तकांत दोष राहिले असतील. ते कोणाच्या नजरेस आल्यास मला ते कळविण्याची कृपा करावी म्हणजे ते पुढें काढून टाकतां येतील.

भाद्रपद शु॥ ४, गणेशचतुर्थी
मंगळवार शके १८४६, पुणें.

**गो. अ. मोडक.**

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

'इंग्लंडचा सोपा इतिहास' या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढतांना राज्यव्यवस्थेच्या प्रकरणांत न्यायपद्धतीचें कलम व सेना दलाची माहिती अधिक घातली आहे, संक्षिप्तचरित्रमालेंत तीन चरित्रें अधिक दिलीं आहेत, व चार नवीन नकाशे घातले असून त्यांपैकीं एक रंगीत आहे. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, हा 'इंग्लंडचा सोपा इतिहास' मुंबई आणि 'मध्यप्रांत व वऱ्हाड' विद्याखात्यांनीं दुय्यम शाळांतून क्रमिक पुस्तक ( टेक्स्टबुक ) म्हणून चालविण्यास मंजूर केला आहे.

आषाढ शु॥ ७
रविवार शके १८४७, पुणें.

**गो. अ. मोडक.**

# १७०२पासून मुख्य प्रधानमंडळांची यादी.

१७०२—१७१०. मार्लबरोचें प्रधानमंडळ.
१७१०—१७१३. हार्ले व सेंट जॉन यांचें प्रधानमंडळ [टोरी].
१७२१—१७४२. वॉलपोलचें प्रधानमंडळ [व्हिग].
१७४४—१७५४. पेल्हॅमचें प्रधानमंडळ [व्हिग].
१७५७—१७६१. पिट-न्यूक्यासल प्रधानमंडळ [व्हिग].
१७६१—१७७०. अल्पकालीन संयुक्त प्रधानमंडळें.
१७७०—१७८२. लॉर्ड नॉर्थचें प्रधानमंडळ [टोरी].
१७८३. फॉक्स [व्हिग] व नॉर्थ [टोरी] यांचें संयुक्त प्रधानमंडळ.
१७८३—१८०१. धाकट्या पिटचें प्रधानमंडळ [टोरी].
१८०४—१८०६. पिटचें दुसरें प्रधानमंडळ [टोरी].
१८०६—१८०७. उभय पक्षांचें प्रधानमंडळ [व्हिग व टोरी].
१८०७—१८२७. टोरी प्रधानमंडळें.
१८२७ क्यानिंगचें प्रधानमंडळ [प्रगतिप्रिय टोरी].
१८२८—१८३०. वेलिंग्टनचें प्रधानमंडळ [टोरी].
१८३०—१८३४. ग्रेचें प्रधानमंडळ [व्हिग].
१८३४—१८४१. मेलबोर्नचें प्रधानमंडळ [व्हिग].
१८४१—१८४६. पीलचें प्रधानमंडळ [कॉन्सर्व्हेटिव्ह].
१८४६—१८५२. लॉर्ड जॉन रसेलचें प्रधानमंडळ [लिबरल].
१८५२. १लें डार्बी-डिझरेली प्रधानमंडळ[कॉन्सर्व्हेटिव्ह].
१८५२—१८५५. ॲबर्डीनचें संयुक्त प्रधानमंडळ [लिबरल व पीलाइट].

१८५५—१८५८. पामर्स्टनचें पहिलें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१८५८—१८५९. दुसरें डार्बी-डिझरेली प्रधानमंडळ [ कॉन्स. ].
१८५९—१८६५. पामर्स्टनचें दुसरें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१८६६—१८६८. तिसरें डार्बी-डिझरेली प्रधानमंडळ [ कॉन्स. ].
१८६८—१८७४. ग्लॅडस्टनचें पहिलें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१८७४—१८८०. डिझरेलीचें प्रधानमंडळ [ कॉन्सर्व्हेटिव्ह ].
१८८०—१८८५. ग्लॅडस्टनचें दुसरें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१८८६. ग्लॅडस्टनचें तिसरें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१८८६—१८९२. सॉल्झबरीचें पहिलें प्रधानमंडळ [यूनियनिस्ट].
१८९२—१८९५. ग्लॅडस्टन व रोजबरी यांचीं प्रधानमंडळें [ होमरूलर ].
१८९५—१९०२. सॉल्झबरीचें दुसरें प्रधानमंडळ [यूनियनिस्ट].
१९०२—१९०५. बाल्फोरचें प्रधानमंडळ [ यूनियनिस्ट ].
१९०५—१९०८. क्याम्प्बेल बॅनरमनचें प्रधानमंडळ [लिबरल].
१९०८—१९१५. आस्क्विथचें प्रधानमंडळ [ लिबरल ].
१९१५—१९१६. आस्क्विथचें प्रधानमंडळ [ राष्ट्रीय ].
१९१६—१९२२ ऑक्टो. लॉइड जॉर्जचें प्रधानमंडळ [ संयुक्त ].
१९२२—१९२३मे. बोनर लॉचें प्रधानमंडळ [ कॉन्सर्व्हेटिव्ह ].
१९२३—१९२४जाने. बाल्ड्विनचें प्रधानमंडळ [कॉन्सर्व्हेटिव्ह].
१९२४. रॅम्से मॅक्डोनल्डचें प्रधानमंडळ [ मजूर ].
१९२४ऑक्टो.–बाल्ड्विनचें प्रधानमंडळ [ कॉन्सर्व्हेटिव्ह ].

---

# इंग्लंडची राजमालिका.

## [ १४८५पासून आतांपर्यंत ].

### ट्यूडर घराणें ( १४८५-१६०३ ).


| | पृष्ठ. |
|---|---|
| सातवा हेन्री, १४८५—१५०९ | ३९-४५. |
| आठवा हेन्री, १५०९—१५४७ | ४५-५४. |
| सहावा एडवर्ड, १५४७—१५५३ | ५४-५६. |
| मेरी, १५५३—१५५८ | ५६-५९. |
| एलिझबेथ, १५५८—१६०३ | ५९-७१. |


### स्टुअर्ट घराणें ( १६०३-१७१४ ).


| | |
|---|---|
| पहिला जेम्स, १६०३—१६२५ | ७२-७८. |
| पहिला चार्लस, १६२५—१६४९ | ७८-९२. |
| लोकसत्ताक, १६४९—१६६० | ९३-९८. |
| दुसरा चार्लस, १६६०—१६८५ | ९८-१०९. |
| दुसरा जेम्स, १६८५—१६८८ | १०९-११२. |
| तिसरा वुइल्यम व दुसरी मेरी, १६८९—१६९४<br>तिसरा वुइल्यम, १६९४—१७०२ | ११४-११३ |
| अॅन, १७०२—१७१४ | १२४-१२९. |


### हॅनोव्हर घराणें. ( १७१४-१९०१ ).


| | |
|---|---|
| पहिला जॉर्ज, १८१४—१७२७ | १३०-१३४. |
| दुसरा जॉर्ज, १७२७—१७६० | १३४-१४२. |
| तिसरा जॉर्ज, १७६०—१८२० | १४३-१७१. |
| चौथा जॉर्ज, १८२०—१८३०<br>चौथा वुइल्यम, १८३०—१८३७ | १७१-१७८. |
| व्हिक्टोरिया, १८३७—१९०१ | १७८-२१६. |


### विंडसर घराणें ( १९०१- ).


| | |
|---|---|
| सातवा एडवर्ड, १९०१—१९१०- | २१६-२२०. |
| पांचवा जॉर्ज, १९१० | २२०-२३१. |

# अनुक्रमणिका.


**१. उपोद्घात.** १—४

इंग्लंडचा इतिहास कां शिकावा ? —इंग्लंडचें पुढारीपण—ब्रिटनांची वसाहत—रोमन अंमल—रोमनांची सुधारणा—रोमन अंमलाची समाप्ति.

**२. ब्रिटनचें इंग्लंड झालें.** ५—९

अँग्लो-सॅक्सनांचें आगमन—इंग्लंड नांव पडलें—ख्रिस्तीधर्मप्रसार—धर्मव्यवस्था—एकछत्री अंमलास सुरुवात—सामाजिक व्यवस्था—अँग्लो-सॅक्सन राज्यसंस्था—देशाचे भाग व न्यायव्यवस्था.

**३. डेन लोकांच्या स्वाऱ्या.** ९-१२

डेन लोक व त्यांच्या हालचाली—आल्फ्रेडचें डेनांशीं युद्ध व तह—आल्फ्रेडची लष्करी व्यवस्था—आल्फ्रेडच्या इतर सुधारणा—डेन राजांचा अंमल.

**४. नॉर्मन वुइल्यम विजयी झाला.** १२-१७

एडवर्डची कारकीर्द—वुइल्यमचा विजय—हिअरवर्ड दी सॅक्सन—सरंजामपद्धतीचा आरंभ—वुइल्यमची सावधगिरी—डूम्सडे बुक व साल्झ्बरीची सभा—वुइल्यमचा मृत्यु—नॉर्मन अंमलापासून फायदे.

**५. दुसऱ्या हेन्रीची चोख व्यवस्था.** १८-२३

नवीन कालविभाग—दुसरा हेन्री—सरदारांच्या सत्तेवर निर्बंध—न्यायव्यवस्था—थॉमस बेकेटचा उदय—धर्मकोर्टांचा प्रश्न—बेकेटचा खून—दुसऱ्या हेन्रीचा मृत्यु.

**६. मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ).** २३-२७

जॉनचा स्वभाव—फ्रान्सच्या राजाशीं तंटा—पोपशीं भांडण—लोकांनीं सनद मिळविली—सनदेंतील कलमें—सनदेचें महत्त्व—जॉनचा लपंडाव.

७. पार्लमेंटचा उदय. २७-३२
पार्लमेंट सभा—तिसऱ्या हेन्रीची अव्यवस्था—पार्लमेंटच्या मागण्या —सायमन डी मॉंटफर्ट—मॉंटफर्टची पार्लमेंट—मॉंटफर्ड पडला —नमुनेदार पार्लमेंट—दोन सभा—पार्लमेंटचा राजास उपयोग —लोकसत्तेची वाढ.

८. युगांतर. ३२-३९
मध्ययुगाचें सिंहावलोकन—जमिनीचें महत्त्व—शिलेदारी बाणा— शहरांची स्थिति—नवीन विद्या—छापण्याची कला—शास्त्रीय शोध —नवीन भूमीचा शोध—राष्ट्रकल्पना.

९. सरदार शमले आणि राजाला नमले. ३९-४५
सोळाव्या शतकाचा ओघ—सातव्या हेन्रीचें राज्यारोहण—तोतयांचीं बंडें—सरदारांचा पाडाव—द्रव्यसंचय—परराष्ट्रांशीं सख्य—आयर्लंड, पॉयनिंग्जचे कायदे—सातव्या हेन्रीचा मृत्यु.

१०. वुल्झीची कर्तबगारी. ४५-४९
आठवा हेन्री—वुल्झीचा उत्कर्ष—फ्रान्सशीं युद्ध—सत्तेचा समतोलपणा—वुल्झीचा अंत.

११. राजा धर्माचा मुख्य झाला. ४९-५४
धर्मसुधारणेचीं कारणें—धर्मसुधारणेस सुरुवात—विवाह-रद्दी व पोपपासून फूट—मठांचा विध्वंस—हेन्रीचीं लग्नें—आयर्लंडचा राजा —आठव्या हेन्रीचा मृत्यु.

१२. धर्माची उलथापालथ. ५४-५९
पिंकीची लढाई—प्रॉटेस्टंट धर्माची स्थापना—बंडें—लेडी जेन ग्रे— मेरीचें राज्यारोहण—क्याथॉलिक धर्म, विवाह व पोप—धर्मच्छळ —मेरीचा मृत्यु.

१३. प्रॉटेस्टंट पंथ पक्का रुजला. ५९-६५
एलिझबेथचा स्वभाव—राष्ट्रीय धर्माची स्थापना—प्यूरिटन पंथ— क्याथॉलिकांचा विरोध—स्कॉटलंडची राणी मेरी—मेरीची कैद व फांशी.

**१४. समुद्रावर इंग्लंडचा जयजयकार !!** ६५-७१

बलाढ्य स्पेन—धाडसी इंग्रज नाविक—सर जॉन हॉकिन्स व सर फ्रॅन्सिस ड्रेक—फिलिपचा निश्चय—अजिंक्य आरमार—इंग्रजांची तयारी—युद्धप्रसंग—जयाचे परिणाम—आयर्लंडांतील बंड व अल्स्टरची वसाहत—इंग्लंडचें वैभव.

**१५. राजा हा ईश्वरी अंश आहे.** ७२-७८

जेम्सचें राज्यारोहण व स्वभाव—तीन धर्म-पंथ—हॅम्पटन कोर्टमधील सभा—दारूगोळ्याचा कट—राजा व पार्लमेंट यांजमधील झगडा—पार्लमेंटशीं तंटा—स्वच्छंदी कारभार—मक्तेपद्धति व बेकन यांजवर हल्ला—परराष्ट्रीय राजकारण.

**१६. सुलतानी अंमल.** ७८-८४

चार्लसचा स्वभाव—पहिल्या तीन पार्लमेंट, हक्कसंरक्षणाचा अर्ज—कॉमन्ससभेंत दंगल—अनियंत्रित कारभार, वेंटवर्थ—धार्मिक जुलूम—देशत्याग—नौकाकर—स्कॉटिश लोकांशीं तंटा, लाँग पार्लमेंट.

**१७. लाँग पार्लमेंट.** ८५-८८

लाँग पार्लमेंटचीं कामें—स्ट्रॅफर्ड व लॉड यांना शिक्षा—राजसत्तेवर निर्बंध—धार्मिक निर्बंध—आयर्लंडांत कत्तल व तक्रारींची यादी—पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न—युद्ध पुकारलें.

**१८. आपसांतील युद्ध.** ८९-९२

दोन्ही पक्षांचें बलाबल—क्रॉम्वेलचा उदय व स्कॉटिश लोकांशीं सख्य—मार्स्टनमूरची लढाई—नवीन नमुनेदार सैन्य—नेस्बीची लढाई—पार्लमेंट पक्षांत फूट, स्कॉटिश स्वारी—चार्लसला शिक्षा—युद्धाचा उपसंहार.

**१९. अनभिषिक्त राजा.** ९३-९८

प्रजासत्ताकाची स्थापना—आयर्लंड व स्कॉटलंड येथील बंडांचा मोड—हॉलंडशीं युद्ध—रम्पची हकालपट्टी—बेअरबोन्स पार्लमेंट—क्रॉम्वेलचा राज्यकारभार—क्रॉम्वेलचें धार्मिक व परराष्ट्रीय धोरण

—क्रॉम्वेलची कर्तबगारी—दुसऱ्या चार्ल्सचा लंडनांत प्रवेश.

२०. **पुनरागमन.** ९८–१०३

आरंभींची व्यवस्था—दुसऱ्या चार्ल्सचा स्वभाव व धोरण—राजाचा खर्च—धार्मिक व्यवस्था—डच युद्ध—प्लेग व अग्निप्रलय—क्लॅरेन्डनची अधिकारच्युति.

२१. **राजाला लांच, पण देशाला जांच.** १०३–१०९

कबॅल—गुप्त तह—सवलतीचा जाहीरनामा व डच युद्ध—कसोटीचा कायदा—डॅन्बीचा कारभार—क्याथॉलिकांविरुद्ध लोकमत—शरीरसंरक्षणाचा कायदा—वारसारद्दीचें बिल—व्हिग व टोरी—दुसऱ्या चार्ल्सचा मृत्यु.

२२. **दुसऱ्या जेम्सची दडपशाही.** १०९–११३

दुसऱ्या जेम्सचा स्वभाव—मन्मथचें बंड—क्याथॉलिकांस राजाश्रय—सात बिशपवरील खटला—दुसऱ्या जेम्सची पदच्युति.

२३. **सनदशीर युगास सुरुवात.** ११४–११९

अधिकारक्रान्ति—बिल ऑफ राइट्स—तिजोरीवरील सत्ता—बंडाचा कायदा—धार्मिक सवलत—पार्लमेंटचा काल—मुद्रणस्वातंत्र्य—अॅक्ट ऑफ् सेट्लमेंट—एका पक्षाचें प्रधानमंडळ—क्रान्तीचे परिणाम.

२४. **जेम्सच्या साथीदारांचा मोड.** ११९–१२३

किलिक्रँकीची लढाई—लंडनडेरीचा वेढा—लिमरिकचा तह—फ्रान्सशीं युद्ध—राष्ट्रीय कर्ज—जॅकोबाइट लोक.

२५. **स्पॅनिश वारशाचें युद्ध.** १२४–१२९

साम्राज्याकरितां झगडा—स्पॅनिश वारसा—मार्लबरो—ब्लेन्हीमची लढाई—आरमारी युद्ध—युद्ध लांबलें—बारा नवे लॉर्ड—युट्रेक्टचा तह—स्कॉटलंडशीं ऐक्य—अॅनचा मृत्यु.

२६. **व्हिग श्रीमंतांची सत्ता.** १३०–१३७

व्हिग श्रीमंतांची सत्ता—सप्तवार्षिक कायदा—साउथ सी कंपनी—सर रॉबर्ट वॉल्पोल—प्रधानमंडळ—वॉल्पोलची कामगिरी—विरोधी

पक्ष—स्पेनशीं युद्ध व वॉल्पोलचा राजीनामा—ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध व जॅकोबाइट बंड.

२७. **साम्राज्य इंग्लंडला मिळालें.** १३७-१४३

इंग्लंड व फ्रान्स यांजमधील चुरस—अमेरिकेंतील फ्रेंचांची महत्त्वाकांक्षा—युरोपमधील युद्धास प्रारंभ—संयुक्त प्रधानमंडळ—वुइल्यम पिटचें धोरण—युरोपांत इंग्रजांची सरशी—अमेरिका व हिंदुस्थान यांतील विजय—कौटुंबिक संघाचा समाचार—पॅरिसचा तह.

२८. **नृपानुयायांचा सुळसुळाट.** १४३-१४७

तिसऱ्या जॉर्जचा निश्चय—प्रधानमंडळें—विल्कसवर खटला—मतदारांच्या हक्कावर घाला—पार्लमेंटमधील वादविवादाची प्रसिद्धि—राजाचें वजन.

२९. **अमेरिका कशी स्वतंत्र झाली?** १४८-१५३

स्टॅम्प ॲक्ट—चहाप्रकरण—आरंभींच्या चकमकी—स्वातंत्र्याचा जाहिरनामा व सॅरॅटोगाची लढाई—फ्रान्स व स्पेन युद्धांत पडले कॉर्नवालीस शरण गेला—इंग्रजांवरील संकटें—व्हर्सेल्सचा तह.

३०. **तरुण पिट प्रधानगिरीवर आला.** १५३-१५८

पिटचें कर्तृत्व—औद्योगिक क्रान्ति—शोध, कारखाने व वाहतूक—मोठ्या प्रमाणावर शेती—सांपत्तिक सुधारणा—इतर सुधारणा.

३१. **फ्रान्सशीं युद्ध.** १५८-१६५

फ्रेंच राज्यक्रांति—इंग्लंड युद्धांत पडलें—आरंभींच्या झटापटी—नेपोलियनचा उदय—नाइलची लढाई—दुसरा मित्रसंघ—नेल्सनचा पराक्रम, अमीन्सचा तह—आयर्लंडची स्वतंत्र पार्लमेंट मोडली.

३२. **नेपोलियनशीं युद्ध.** १६५-१७१

इंग्लंडवरील स्वारीची तयारी—ट्राफल्गार—टिल्सिटचा तह—पिटचा मृत्यु द्वीपकल्पांतील युद्ध—परस्परावर बहिष्कार—नेपोलियनचा पराभव—वॉटर्लूची लढाई—चौथा जॉर्ज.

३३. **मध्यमवर्गास मताधिकार मिळाला.** १७१-१७८

एकोणिसाव्या शतकाचा ओघ—क्याथॉलिकांचें दुःखनिवारण—

पार्लमेंट-सुधारणेची जरूरी—पार्लमेंट-सुधारणेची खटपट—रिफॉर्म बिल—पक्षांचीं नवीं नांवें—म्युनिसिपल रिफॉर्म ॲक्ट—गुलामांची मुक्तता—शिक्षण—गरिबांचा कायदा.

३४. **औद्योगिक प्रगति.** १७८-१८४

व्हिक्टोरिया—बाष्पवाहनांचे शोध—कारखान्यांसंबंधीं कायदे—चार्टिस्टांची चळवळ—धान्याचा कायदा—पीलचें प्रधानमंडळ—धान्याचा कायदा रद्द झाला—नव्या सोई.

३५. **साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचें दान.** १८५-१९०

स्वायत्त वसाहती—क्यानडास स्वराज्य—क्यानडा एक राष्ट्र बनला—क्यानडाची प्रगति—ऑस्ट्रेलियाचा उदय—ऑस्ट्रेलियांतील मुलुखाचा शोध—ऑस्ट्रेलियास स्वराज्यदान—न्यू झीलंड.

३६. **क्रिमियन युद्ध** ( १८५४-१८५६ ). १९०-१९४

राशियाची महत्त्वाकांक्षा—क्रिमियन युद्धाचीं कारणें—युद्धास सुरुवात—तीन लढाया—सैन्यावरील संकटें—पॅरिसचा तह.

३७. **लोकशाहीचा लाभ.** १९४-२००

पामर्स्टनचें प्रधानमंडळ—डिझरेली व ग्लॅडस्टन—पार्लमेंट-सुधारणेचा दुसरा कायदा—पार्लमेंट सुधारणेचा तिसरा कायदा—शिक्षण—स्थानिक स्वराज्य.

३८. **आयर्लंडच्या दुःखांचें निवारण.** २००-२०५

आयरिश लोकांच्या तक्रारी—टाइथ कर—शेतकऱ्यांच्या अडचणी—शेतकऱ्यांच्या तक्रारींचा निरास—राजकीय असंतोष—होमरूलची चळवळ—होमरूल बिल.

३९. **ईजिप्त व सुदान साम्राज्यांत कशीं आलीं.** २०५-२१०

ईजिप्तांत इंग्रजांचा शिरकाव—ईजिप्त इंग्रजांच्या अंकित झालें—सुदान प्रांतांत बंड—खार्टूमचा लॉर्ड किचनेर—फ्रेंचांशीं सुदानसंबंधीं तंटा—इंग्रजांच्या ताब्यांतील आफ्रिकेंतील इतर प्रदेश.

४०. **दक्षिण आफ्रिकेंतील वसाहती.** २११-२१६

बोअरांचें स्थलांतर—ट्रान्सवाल पुनः स्वतंत्र झालें—नूतनागत—

जेम्सनचा हल्ला—युद्धाची तयारी—युद्धाची हकीकत व तह—स्वराज्य दान व दक्षिण आफ्रिकेचा संघ.

४१. **लोकशाहीची प्रगति.** २१६-२२२

कॉन्सर्व्हेटिव्हांत फूट—लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला—सामाजिक सुधारणा—१९०९चें बजेट—पार्लमेंट ॲक्ट ( १९११ )—तिसरें आयरिश होमरूल बिल—चौथा पार्लमेंट-सुधारणेचा कायदा.

४२. **महायुद्ध ( १९१४-१९१८ ).** २२२-२३१

विसाव्या शतकाच्या आरंभीं परराष्ट्रीय संबंध—महायुद्धाचें तात्कालिक कारण—महायुद्धास सुरुवात—रशियाचा मोड—तुर्कस्थानशीं युद्ध-प्रसंग—समुद्रावरील कटकटी, अमेरिका युद्धांत पडली—लॉइड जॉर्जची कामगिरी, दोस्तांचा जय—महायुद्धाची समाप्ति.

४३. **सामाजिक प्रगति.** २३१-२३८

काळाचा ओघ—धर्मस्थिति—शिक्षण—वाङ्मय—व्यापार व उद्योगधंदे—लोकसंख्या—दळणवळणाचीं साधनें—करमणुकीचीं साधनें व सुखसोयी.

४४. **इंग्लंडची राज्यव्यवस्था.** २३८-२४९

सरकारचीं तीन कामें—लॉर्डांची सभा—कॉमन्ससभा—पार्लमेंटची निवडणूक—प्रधानमंडळ—प्रधानमंडळाची रचना व कार्य—राजपद—स्थानिक स्वराज्य—न्यायपद्धति—वसाहती—हिंदुस्थान—आरमार—सैन्यव्यवस्था—साम्राज्यपरिषद.

---

**परिशिष्टें.** १-४७

**परिशिष्ट १:—संक्षिप्त चरित्रमाला.** १-२६

वुल्झी—ड्रेक—रॅले—पिम—हॅम्पडन—मार्लबरो—वॉल्पोल—चॅथॅम—बर्क—वॉशिंग्टन—नेल्सन—पिट—विल्बरफोर्स—स्टिफेन्सन—पील—पामर्स्टन—डिझरेली—पार्नेल—ग्लॅडस्टन—लॉइड जॉर्ज.

**परिशिष्ट २:—सनावली.** २७-३०

परिशिष्ट ३ः—वाचनीय पुस्तकें व उतारे ३१-३६
परिशिष्ट ४ः—पारिभाषिक शब्दांचा कोश. ३७-४२
परिशिष्ट ५ः...स्मरणीय वचनें. ४३-४७

---

सूचि ४८-६६

## वंशावळी

नॉर्मन घराणें... ...१३
ॲंजेव्हिन घराणें......१९
लॅंक्यास्ट्रियन घराणें...३३
यॉर्किस्ट घराणें......३३
ट्यूडर घराणें... ...४०
स्टुअर्ट घराणें... ...७२
हॅनोव्हर घराणें... ...१३०
विंडसर घराणें... ...२१६

---

## नकाशे

युनायटेड स्टेट्स १५२
ईजिप्त व सुदान २०७
दक्षिण आफ्रिका २१२


---

**विशेष सूचना**--शुध्दिपत्रावरून पहिल्यानें शुध्द करून पुस्तक वाचावें. छापतांना कानामात्रा उडून कांहीं ठिकाणीं चुका झाल्या आहेत व कांहीं ठिकाणीं शुध्दलेखनाच्या किरकोळ चुका झाल्या आहेत, त्या सहज समजण्यासारख्या असल्यामुळें शुध्दिपत्रांत दिल्या नाहींत.


---

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|
| २ | २ | हिंदूच्या | हिंदूंच्या |
| २४ | १६ | जानॅचें | जॉनचें |
| २५ | ६ | घेण्याच | घेण्याचें |
| २७ | १४ | पातला | पावला |
| ३० | ४ | इव्हझॅम | ईव्हझॅम |
| ३८ | ४ | पोचला | पोंचला |
| ४३ | १६ | मॉनर्टचा | मॉर्टन्चा |
| ५५ | १७ | करूल | करून |
| ५७ | १९ | बेह | बेत |
| ६१ | २ | मेरीन्या | मेरीच्या |
| ७२ | ७ | एन्डिबरो | एडिन्बरो |
| ७७ | १६ | त्यास | त्यांस |
| ८३ | १७ | due | dues |
| ८९ | १० | मध्ये | मध्य |
| ९३ | ७ | खळ्या | खड्या |
| ९५ | २४ | अधिकाऱ्यांच | अधिकाऱ्यांचें |
| ९६ | ९ | स्कीट | स्कॉट |
| ११६ | १४ | राजास. | राजास |
| १३३ | ४ | होता येवढ्या | होता. येवढ्या |
| १४९ | २२ | स्वातंत्र्यप्रेय | स्वातंत्र्यप्रेम |
| १५८ | १२ | वैभावाच्या | वैभवाच्या |
| १६५ | ६ | दशाचें | देशाचें |
| १७२ | १ | लोकसतेची | लोकसत्तेची |
| १९० | १७ | १८५५ | १८५४ |
| १९९ | ९ | आल्डमैंन | आल्डर्मेन |
| २१० | १६ | लिंपो नदी | लिंपोपो नदी |



युरोप.
अटलांटिक महासागर
डब्लिन
एडिन्बरो
लंडन
डेन्मार्क
कोपनहेगन
कील
हॅनोव्हर
लीपझिक
जेना
एलाशापेल
बुलोन
अमीन्स
पॅरिस
व्हर्सेल्झ
ब्रेस्ट
क्विबेरॉन
फ्रान्स
होहेनलिंडन
ऑस्टर्लीटझ
ब्लेनहिम
व्हिएन्ना
आल्प्स पर्वत
मिलन
व्हेनिस
मेरेंगो
जिनोआ
एल्बा
कॉर्सिका
रोम
नेपल्स
सार्डिनिया
सिसिली
माल्टा
दुलझ
टुलोन
पिरिनीज़ प.
व्हिक्टोरिया
मॅड्रिड
मिनोर्का
स्पेन
लिस्बन
केपसेंट व्हिंसेंट
केडिझ
ट्राफल्गार
जिब्राल्टर
टॅन्जीर
भूमध्य समुद्र
पोलंड
हंगेरी
टिल्सिट
बोरोडिनो
मास्को
रशिया
नीपर नदी
क्रिमिया
सिवॅस्टॉपल
बालाक्लाव्हा
काळा समुद्र
सिनोप
डॅन्यूब न.
बाल्कन पर्वत
बल्गेरिया
व्हार्ना
सर्व्हिया
कॉन्स्टॅंटिनोपल
बास्फरस
मार्मोराचा समुद्र
डार्डनेल्स
ग्रीस
सायप्रस




महायुद्धा-नंतरचें
ब्रिटिश साम्राज्य.

वा. क्र. 2202

# इंग्लंडचा सोपा इतिहास.

## १. उपोद्घात.

१. **इंग्लंडचा इतिहास कां शिकावा?** आज सर्व जगांत जीं सुधारलेलीं राष्ट्रें म्हणून गाजत आहेत, त्यांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत इंग्लंडची गणना आहे. अशा उच्च पदावर आरूढ झालेल्या अर्वाचीन राष्ट्राचा इतिहास कोणासही मनोरंजक व बोधप्रदच होणार; तरी पण हिंदुस्थानच्या लोकांस तो इतिहास माहीत असावा असें म्हणण्यास वरील कारणापेक्षां बलवत्तर कारणें आहेत. एक तर दैव-वशात् हिंदुस्थान जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वींपासून इंग्लंडच्या ताब्यांत आहे. तेव्हां अर्थातच राज्यकर्त्या इंग्रजांची पूर्वस्थिति काय होती, त्यांच्या देशांत कोणत्या निरनिराळ्या चळवळी झाल्या, त्यांच्या स्वभावांत विशेष गुण कोणते व ते कसे उत्पन्न झाले, इत्यादि वृत्तांत माहीत असणें हिंदुस्थानांतील नागरिकांस अत्यंत अवश्य झालें आहे. दुसरें कारण असें कीं, हिंदुस्थानवर इंग्रजांचा केवळ राजकीय अंमलच बसला आहे असें नसून सांपत्तिक व विद्याविषयक बाबतींतही त्यांचे आम्ही अंकित झालों आहों. इतकेंच काय, पण सामाजिक बाबतींतही इंग्लंडचें अनुकरण करण्याकडे बऱ्याच लोकांचा ओढा दिसून येतो. अठराव्या शतकांत मराठी साम्राज्याचा सर्व हिंदुस्थानवर विस्तार झाला, तत्पूर्वीं हा देश परकीय मुसलमानांच्या अंमलाखालीं गेला होता. परंतु क्षात्रवृत्तीनें त्यावेळचे मुसलमान हिंदूंपेक्षां कडवे

असले तरी त्यांची एकंदर सुधारणा मागसलेली असल्यामुळें मुसलमानांच्या राज्यांत व्यापार, उद्योगधंदे, व विद्याकला हिंदूंच्याच कायम राहिल्या. आज तशी स्थिति नाहीं. विद्याकला, व्यापार व उद्योगधंदे या सर्व बाबतींत इंग्लंडचें हिंदुस्थानवर वर्चस्व आहे. तेव्हां या स्थितीचा उलगडा होण्यासाठीं इंग्लंडचा इतिहास माहीत असणें अगत्याचें आहे. तथापि इंग्लंडचा इतिहास शिकण्याचें सर्वांत महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे तेराव्या शतकापासून आपल्या राजांशीं झगडून इंग्लिश लोकांनीं लोकसत्ताक राज्यपद्धतीची आपल्या देशांत स्थापना केली हें होय.

२. **इंग्लंडचें पुढारीपण.** इंग्लंड, वेल्स, व स्कॉटलंड म्हणजे ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हीं मिळून ब्रिटिश बेटें होतात. हा देश युरोपच्या पश्चिमेस जवळ असला तरी चोहोंबाजूंनीं समुद्रानें वेढलेला असून मुख्य खंडापासून भूरचनेच्या दृष्टीनें स्वतंत्र आहे. इंग्लंडच्या नैर्ऋत्य टोंकापेक्षां आग्नेय टोंकच युरोपला अधिक जवळ आहे. त्यामुळें पहिल्यानें युरोपांतून वस्ती करण्याकरितां इंग्लंडांत जे लोक आले ते या आग्नेय टोंकावरच आल्याचें आढळून येतें. त्याचप्रमाणें आंत प्रवेश करण्यास उत्तम साधन अशी जी टेम्स नदी ती याच टोंकाजवळ उत्तर समुद्रास मिळते. तेव्हां टेम्स नदीच्या मुखाजवळ वसलेल्या लंडन शहरास व्यापाराच्या व दळणवळणाच्या दृष्टीनें स्वाभाविकपणें सर्व इंग्लंडांत प्रमुखत्व आलें. युरोपमधील लोकांची इंग्लंडवर स्वारी व्हावयाची म्हटली अथवा युरोपियन सुधारणेचा इंग्लंडांत प्रसार व्हावयाचा म्हटला तरी दक्षिण पूर्व भागांतून तो व्हावयाचा असल्यामुळें, शत्रूला टक्कर देण्याचें जोखमीचें काम अथवा परकीय सुधारणा देशांत प्रसृत करण्याचा उद्योग दक्षिण-पूर्व भागांतील लोकांच्या वांटयास आला, व इंग्लंडचें पुढारीपण त्यांस प्राप्त झालें,

३. **ब्रिटनांची वसाहत.** इंग्लंड देशाचें प्राचीन नांव ब्रिटन

हें होय. पहिल्यानें ब्रिटनमध्यें केल्टिक वंशाच्या दोन जातींचे लोक आले. पहिले गेल असून दुसरे ब्रिटन होते. त्यांच्यामागून टयुटॉनिक वंशाच्या लोकांनीं फ्रान्समधून हाकून लाविलेल्या बेल्जिक केल्ट लोकांच्या झुंडीच्या झुंडी ब्रिटनच्या किनाऱ्यावर येऊन उतरल्या. या तिन्ही जातींचे लोक मिळून ब्रिटनची प्राचीन लोकवस्ती बनली होती. ब्रिटन अगदीं रानटी असून युद्धाचे वेळीं शरीर उग्र दिसण्यासाठीं वनस्पतीपासून निघालेल्या रंगांनीं तें रंगविण्याची त्यांच्यांत चाल पडली होती. कांहीं लोक कातड्याचे कपडे वापरीत. त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या असून प्रत्येक टोळीवर अंमल चालविणारा नायक त्यांच्यांत असे. टोळ्यांमध्यें नेहमीं तंटे चालत असून नायकांना युद्धाशिवाय दुसरें फारसें काम नसे. या लोकांत धर्मकल्पनांचा उदय झाला होता. त्यांचे ड्रुइड नांवाचे धर्मगुरु असून नद्या, वृक्ष व चंद्रसूर्यादि आकाशांतील ज्योती यांची पूजा करण्यास त्यांनीं लोकांस शिकविलें होतें. त्यांच्यांत यज्ञ करण्याची चाल असून नरमेधसुद्धां चालू होता.

४. **रोमन अंमल.** प्राचीन काळीं इटलीमध्यें रोम हें प्रसिद्ध शहर असून तेथील लोकांचें बहुतेक सर्व युरोप, आशिया खंडाचा पश्चिम भाग व आफ्रिकेचा उत्तर भाग या विस्तीर्ण प्रदेशावर साम्राज्य पसरलेलें होतें. ब्रिटन अर्धवट रानटी स्थितींत असतां प्रसिद्ध रोमन सेनापति सीझर यानें ब्रिटनवर स्वारी केली ( खि. पू. ५५ ). पण तो लवकरच परत गेला. सीझरच्या स्वारीनंतर शंभर वर्षेंपर्यंत ब्रिटनवर रोमनांची धाड मुळींच आली नाहीं. पुढें रोमन सेनापतींनीं ब्रिटन जिंकण्यास सुरुवात केली. शेवटीं इ. स. १२१त बादशहा हेड्रियन स्वतः ब्रिटनला आला. त्यानें सॉल्वे व टाइन नदी यांस जोडणारी पट्टी हीच आपल्या राज्याची उत्तर हद्द ठरविली व तिजवर पूर्वेपासून पश्चिमेस समुद्रापर्यंत एक जंगी तट उभारला. स्कॉटलंडांत त्या वेळीं केल्टिक वंशांतले पिक्ट लोक रहात असत. त्यांचा मुलूख

जिंकण्याचा प्रयत्न रोमनांनीं केला. परंतु त्यांस यश न येऊन रोमन साम्राज्य हेड्रियननें बांधिलेल्या तटाच्या अलीकडील मुलुखांतच राहिलें.

**५. रोमनांची सुधारणा.** रोमन लोक हे त्या काळच्या सुधारणेचे अग्रणी असल्यामुळें त्यांचें राज्य ब्रिटनमध्यें सुरू होतांच त्यांनीं तेथें आपल्या सर्व सुधारणा हळूहळू अंमलांत आणिल्या. त्यांनीं सुंदर व बळकट शहरें वसविलीं. लवकरच सुंदर वाडे, छानदार स्नानगृहें, विस्तृत सार्वजनिक इमारती बांधण्यांत आल्या व त्यामुळें शहरांची शोभा फारच वाढली. हीं जीं रोमनांनीं शहरें बांधिलीं तीं पहिल्यानें लष्करी ठाणीं म्हणून उपयोगांत आणिलीं असल्यामुळें त्या सभोंवतीं बळकट तटबंदी केलेली असे. ठाण्यांस क्यास्ट्रा हें नांव असून आज जीं शहरांचीं मँचेस्टर, लीस्टर, डॉर्चेस्टर हीं नांवें आहेत तीं या क्यास्ट्रा शब्दावरूनच बनलीं. शहरांबरोबर सर्व देशभर रोमनांनीं भक्कम रस्ते बांधिले. खालीं चुना व मोठाले दगड आणि वर खडी व लहान लहान गोटे घालून हे रस्ते तयार केलेले असत. ब्रिटनमध्यें मातीचीं भांडीं करण्याचे धंदे ऊर्जित दशेस आले; त्या भांड्यांचे शेष अजून सांपडतात. ब्रिटन लोक शेती लहान प्रमाणावर करीत, ती मोठ्या प्रमाणावर करण्यास रोमनांनीं त्यांना शिकविलें. याच काळीं रोमन साम्राज्यांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला, तेव्हां पुष्कळ ब्रिटन ख्रिस्ती झाले, व उदार कॉन्स्टन्टाइन बादशहाच्या अमदानींत ब्रिटनमध्यें ख्रिस्ती देवळें बांधलीं गेलीं.

**६. रोमन अंमलाची समाप्ति.** रोमन लोकांचें ब्रिटनवरील राज्य इ. स. ४१०पर्यंत टिकलें. त्या सुमारास रानटी टोळ्यांनीं मध्य युरोपांतून खुद्द रोमवर चाल केल्यामुळें या धाडीपासून रोमचें रक्षण करण्याकरितां ब्रिटनमधील सर्व रोमन सैन्य परत गेलें. तेव्हां ब्रिटनमधील रोमन अंमलाची समाप्ति झाली.

---

# २. ब्रिटनचें इंग्लंड झालें.

१. **अँग्लो–सॅक्सनांचें आगमन.** रोमन सैन्य निघून गेल्यावर ब्रिटन लोकांची स्थिति अत्यंत शोचनीय झाली. स्कॉटलंड व आयर्लंडमधून पिक्ट व स्कॉट हे त्यांजवर सारख्या स्वाऱ्या करूं लागले. पण ब्रिटन लोकांच्या अंगांत आपला बचाव करण्याची कुवत नसल्यामुळें लांडग्यापुढें कोंकराची जी अवस्था होते तशी त्यांची झाली. त्यांनीं आपल्या साहाय्यास इंग्लंडच्या समोर डेन्मार्कच्या दक्षिणेस व जर्मनीच्या उत्तरेस किनाऱ्यालगत वसलेल्या व दर्यावर सुखानें संचार करणाऱ्या साहसी लोकांस बोलाविलें. हे लोक ज्यूट व सॅक्सन या जातीचे होते. ते जात्या शूर असून लढाई करावी, लूट मारावी हा तर त्यांचा आवडीचा विषय होता. दिलेलें आमंत्रण स्वीकारून ते ब्रिटनच्या किनाऱ्यावर उतरले (सुमारें ४४९). थोड्याच अवकाशांत त्यांनीं पिक्ट व स्कॉट या लोकांना हाकून दिलें व ब्रिटनांना निर्भय केलें.

२. **इंग्लंड नांव पडलें.** पुढें ब्रिटनांना नवेंच भय उत्पन्न झालें. ज्यूट व सॅक्सन परत न जातां ब्रिटनच्या किनाऱ्यावरच वस्ती करून राहिले. आतां ज्या वसाहती झाल्या त्या बिनबोभाट झाल्या असें मात्र नाहीं. कारण, ब्रिटनांनीं आपला मुलूख त्यांच्या हातीं जाऊं न देण्यासाठीं शर्थ केली, पण त्यांचें कांहीं न चालून त्यांस पश्चिमेस वेल्समध्यें हटावें लागलें व ब्रिटनचा बहुतेक सर्व भाग परकीयांच्या हातीं पडला. असें सांगतात कीं, आर्थर या ब्रिटनांच्या राजानें आपल्या "एक्सक्यालिबर" या तेजस्वी तलवारीनें शत्रूंशीं समरांगणांत जोराची लढाई दिली, शत्रूंचा हल्ला मागें परतविला व त्यांच्या वसाहती कांहीं काळ वाढूं दिल्या नाहींत. ब्रिटनच्या समोरील युरो-

पच्या किनाऱ्यावरून तीन जातींचे लोक ब्रिटनवर आले. ज्यूट, सॅक्सन व अँगल हीं त्यांचीं नांवें होतीं. त्यांपैकीं अँगल हे सर्वांच्या मागून आले. परंतु देशाचा पुष्कळ भाग त्यांनीं व्यापिला. त्यावरून ब्रिटन देशास इंग्लंड (अँगल-लँड) हें नांव पडलें.या लोकांनीं वसाहत केल्यापासून(४४९) शंभर वर्षांत इंग्लंडांत सात संस्थानें+उदयास आलीं, व अँग्लो–सॅक्सन अंमल ब्रिटनवर झाला.

३. **ख्रिस्तीधर्मप्रसार.** अँग्लो–सॅक्सन लोकांनीं ब्रिटनमध्यें येतांच ख्रिस्ती धर्मगुरूंची कत्तल केली व धर्ममंदिरांचा विध्वंस केला. त्यामुळें लवकरच इंग्लंडांतून ख्रिस्ती धर्म नाहींसा झाला. पुढें ५९७त रोमचा पोप पहिला ग्रेगरी× यानें सेंट ऑगस्टाइन या धर्मगुरूस इंग्लिश लोकांस ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यासाठीं पाठविलें. ऑगस्टाइन व त्याचे अनुयायी यांनीं क्रॉस उंच हातीं धरून बायबलांतील लॅटिन प्रार्थना म्हणत मोठ्या थाटानें क्यान्टर्बरींत प्रवेश केला. लवकरच केंटचा राजा एथेल्बर्ट हा ख्रिस्ती बनला व मग राजाश्रय मिळाल्यावर ख्रिस्ती धर्म इंग्लिश लोकांत जारीनें पसरला.

४. **धर्मव्यवस्था.** पुढें पोपनें इंग्लंडांत व्यवस्थित धर्मखातें सुरू केलें. त्यानें लहान खेडीं ( Parish पॅरिश ) ठरवून देऊन त्यांजवर क्लर्जी नेमिले. कांहीं पॅरिश मिळून त्यांजवर एका मोठ्या शहरांत बिशप नेमावयाचा व त्याची हुकमत क्लर्जींवर चालावयाची असें ठरलें. बिशपच्या हाताखालील प्रांतास डायोसीज (Diocese)

---

+ १ उत्तरेकडचें नॉर्दंब्रिया; २ त्याच्या दक्षिणेस ईस्ट अँग्लिया; ३ पूर्वेकडे केंट; ४—६ दक्षिणेस इसेक्स, ससेक्स व वेसेक्स हीं तीन; व ७ मध्यावर मर्शिया.

× ख्रिस्ती धर्मांत धार्मिक अधिकाऱ्यांपैकीं सर्वांत श्रेष्ठ अधिकारी रोमचा पोप हा होय.

म्हणत. ज्या देवळांत बिशप प्रार्थना चालवी त्यास क्याथीड्रल चर्च हें नांव पडलें. सर्व डायोसीज मिळून इंग्लंडचे दोन भाग झाले. उत्तरेकडील भागावर यॉर्कच्या आर्चबिशपची हुकमत चाले व दक्षिणेकडील भागावर क्यान्टर्बरीचा आर्चबिशप आपली सत्ता गाजवी. या दोघांत क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपला जास्त मान असून त्यास इंग्लंडचा मुखत्यार ( प्रायमेट ) करण्यांत आलें. याप्रमाणें इंग्लंडचें धार्मिकदृष्ट्या ऐक्य होऊन राजकीय ऐक्याचा ओनामा घातला गेला. याच सुमारास इंग्लंडांत निरनिराळ्या ठिकाणीं मठ स्थापण्यांत आले, व ख्रिश्चन धर्मतत्त्वांचा उपदेश करून गरीब व दु:खग्रस्त लोकांस मदत करण्यासाठीं अनेक मठवासी (Monks) झटूं लागले. मठवासी मठास मिळालेल्या जमिनी नांगरून त्यांत पिकें करीत, धार्मिक विधि आचरीत, व दिवसाचा कांहीं भाग ग्रंथ-रचना करण्यांत व शिकविण्यांत घालवीत. मनुष्यानें दयाशील बनलें पाहिजे हें तत्त्व त्यांच्या प्रत्यक्ष आचरणांत येत असे.

५. **एकछत्री अंमलास सुरुवात**. इंग्लंडमध्यें अँग्लो-सॅक्सनांचीं जीं सात संस्थानें होतीं, त्यांपैकीं तीन प्रमुख होतीं. नॉर्दम्ब्रिया, मर्शिया व वेसेक्स हीं तीं होत. या तिन्ही संस्थानांत अधिराज्या-बद्दल एकसारखे तंटे चाललेले असत. इ. स. ८०२मध्यें एग्बर्ट नांवाचा राजा वेसेक्सच्या गादीवर आला. तो जबर महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् होता. त्यानें मर्शिया व नॉर्दम्ब्रिया या दोन्ही संस्था-नांवर चाल करून त्यांचा पराभव केला व त्यांस वेसेक्सचें अधिराज्य मान्य करावयास लाविलें ( ८२७ ). अशा रीतीनें इ. स. ८२७ सालीं सर्व इंग्लिश लोकांनीं वेसेक्सचें अधिराज्य कबूल केलें व तेव्हां-पासून एक राष्ट्र या नात्यानें इंग्लंडचा इतिहास सुरू झाला.

६. **सामाजिक व्यवस्था**. या एग्बर्टच्या वेळीं अँग्लो-सॅक्सन लोकांचे सामाजिक दर्जे ठरून गेले होते. जामिनीच्या मालकी-

वरच सामाजिक दर्जा ठरला होता. राजाच्या ताब्यांत सर्वांत जास्त जमीन असून त्याच्या नातेवाईकांस एथेलिंग म्हणत. राजाच्या खालोखाल आल्डरमेन किंवा अर्ल (सरदार) असत. त्यांच्याखालीं सर्ल (छोटे जमीनदार) असत. सर्वांच्या खालीं गुलामवर्ग असून त्याची भरती जित ब्रिटन लोकांमधून झाली होती. या गुलामांना जमीन व तींतील गुरें यांजबरोबर विकीत असत.

७. **अँग्लो-सॅक्सन राज्यसंस्था.** अँग्लो-सॅक्सन लोकांमध्यें केवळ दंडुकेशाहीची राज्यपद्धति नसून लोकसत्ताकपद्धति बीजस्वरूपानें चालू होती. विटन (Witan) नांवाची राजाची मदतगार सभा असे. तिच्यांत सरदार, धर्मगुरु, प्रमुख जमीनदार हे सर्व येत. हे लोक तींत निवडून येत नसून ते सर्व तींत हक्कानें बसत. राज्यकारभार चालवितांना राजा विटनचा सल्ला घेई. एक राजा वारल्यावर दुसरा राजा नेमण्याचें काम विटन सभेकडेच होतें. सामान्यतः मृत राजाच्या घराण्यांतील जवळच्या वारस पुरुषाची निवड होई. राजाचें उत्पन्न, खालील सदरांतून येईः १ त्याच्या खाजगी जमिनींचें उत्पन्न, २ जमिनदारांकडून मिळणारा खंड, ३ न्यायसभांतून गुन्हेगारांना होणारा दंड. बाहेरच्या शत्रूपासून संरक्षण करणें व देशांत शांतता राखणें हीं दोन कामें करण्यांतच सरकार नेहमीं गुंतलेलें असे.

८. **देशाचे भाग व न्यायव्यवस्था.** देशाचा सर्वांत लहान घटक म्हटला म्हणजे गांव (Township). प्रत्येक गांवांत ग्रामसभा (Town-moot) असून ती गांवचा कारभार पाही व न्यायनिवाडा करी. कित्येक गांवें मिळून महाल (Hundred) होई, त्याचा कारभार हण्ड्रेडमूट पहात असे. हिचा आल्डरमन अध्यक्ष असे. कित्येक महाल मिळून परगणा होई. शायर-मूट किंवा काउन्टी-मूट ही परगण्यांतील मुख्य सभा असून तींत शायरमधील सर्व प्रतिष्ठित लोक न्याय देण्यास बसत. गुन्ह्याचा ज्याच्यावर आरोप

आला असेल त्यानें आपण गुन्हा केला नाहीं अशी शपथ घ्यावी व आपला शब्द विश्वसनीय असे शपथेवर सांगणारे बारा साक्षीदार मिळवावे म्हणजे गुन्ह्यापासून त्याची मुक्तता होई. जर असे साक्षीदार आणतां आले नाहींत तर आरोपीला 'दिव्य' करून दाखवावें लागे. त्याला देवळांत नेल्यावर निखाऱ्यावरून अगर उकळत्या पाण्यांतून दगड बाहेर काढून आपला निरपराधीपणा सिद्ध करावा लागे. गुन्हा शाबीत झाल्यास गुन्हेगारानें नुकसानभरपाई करून द्यावी असा सामान्यतः नियम होता.

---

# ३. डेन लोकांच्या स्वाऱ्या.

## आल्फ्रेड दी ग्रेट.

१. **डेन लोक व त्यांच्या हालचाली.** वेसेक्सचा राजा एग्बर्ट यानें इंग्लंडांत आपलें अधिराज्य स्थापिलें (८२७), त्या कालापूर्वीं दहावीस वर्षांपासून डेन्मार्कमध्यें राहणाऱ्या लोकांच्या इंग्लंडवर स्वाऱ्या सुरू झाल्या होत्या. त्यांना नॉर्थमेन ( उत्तरेकडील लोक ) हें नांव असे. ते साहसी व शूर असत. त्यांच्या देशांतील बहुतेक जमीन नापीक होती; त्यामुळें समुद्रावर चांचेगिरी करावी किंवा इतर देशांत उतरून तेथील शांतताप्रिय लोकांशीं भांडून लूट मारावी हाच त्यांच्यांतील तरुण लोकांचा धंदा बनून गेला होता. सॅक्सन लोक ज्या टयुटॉनिक वंशाचे होते त्यापैकींच हे असून रूपानें, संवयीनें व स्वभावानें त्या दोघांत पूर्ण साम्य होतें. वोडेन ( इंद्र ) व थॉर या देवांचे ते मोठे भक्त असून सॅक्सनांनीं खिस्ती धर्म स्वीकारला हें पाहून त्यांचें पित्त फारच खवळलें. प्रथम इंग्लंडांत लूट मारावयाचा क्रम त्यांनीं आरंभिला; नंतर वसाहती करून कायमचें ठाणें देण्याचा

मार्ग त्यांनीं स्वीकारिला. इंग्लंडमधील पूर्व ॲंग्लिया प्रांतांत त्यांची पहिल्यानें वसाहत झाली. पुढें डेन व ॲंग्लो-सॅक्सन यांजमध्यें विवाह होऊन मिश्र इंग्लिश समाज निर्माण झाला.

२. **आल्फ्रेडचें डेनांशीं युद्ध व तह.** प्रथम डॅनिश लोकांनीं पूर्व ॲंग्लियांतून वेसेक्सच्या राज्यावर हल्ले करण्यास सुरवात केली. वेसेक्सचें अधिराज्य इंग्लंडवर होतें. तेव्हां वेसेक्स जिंकलें कीं, सर्व इंग्लंड आपल्या हातीं येण्यास उशीर लागणार नाहीं ही कल्पनाच या स्वाऱ्यांच्या बुडाशीं होती. ८७१त एग्बर्टचा नातू आल्फ्रेड वेसेक्सच्या गादीवर आला. त्याला डेन लोकांचे हल्ले परतवून लावण्यासाठीं अत्यंत कष्ट करावे लागले. एकदां तर त्याला गुराख्याच्या घरांत अज्ञातवासांत रहावें लागून तव्यावर टाकिलेल्या भाकऱ्या राखण्याचें काम करीत बसावें लागलें व राज्यरक्षणाच्या एका विचारांत डोकें गर्क झाल्यामुळें तें काम त्याच्या हातून नीट पार न पडून त्यास गुराख्याच्या बायकोचीं बोलणीं खावीं लागलीं. तथापि आल्फ्रेडनें मोठ्या चिकाटीनें डेन लोकांशीं युद्ध चालविलें. शेवटीं आल्फ्रेडला कळून चुकलें कीं डेन लोकांना इंग्लंडांतून हाकून देणें अशक्य आहे. तेव्हां त्यानें शहाणपणानें डेनांचा राजा गथ्रम याशीं तह केला (८७८). त्यांत इंग्लंडचे पूर्व इंग्लंड व पश्चिम इंग्लंड असे दोन भाग करून त्यांपैकीं पश्चिमेकडचा भाग आपल्याकडे घेऊन पूर्वभाग डेन लोकांना त्यानें देऊन टाकिला. डेनांनीं आल्फ्रेडच्या राज्यावर स्वाऱ्या न करण्याचें कबूल केलें, व गथ्रम ख्रिस्ती झाला.

३. **आल्फ्रेडची लष्करी व्यवस्था.** आल्फ्रेडला इंग्लंडचें परचक्रापासून रक्षण करितां आलें, त्याचें कारण त्यानें लष्करी दृष्टीनें इंग्लंडचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं एकसारखी खटपट केली हेंच होय. त्यानें शत्रूच्या स्वाऱ्या होऊं लागल्या कीं, तात्पुरती फौज उभारण्याची पद्धति मोडून आपल्या देशांतील सर्व लोकांस आळीपाळीनें लष्करी

शिक्षण देण्याची व्यवस्था केली. या पद्धतीनें एक तृतीयांश लोक लष्करी शिक्षण घेत असतां बाकीचे दोन तृतीयांश लोक घरकामांत गुंतलेले असत, व पाळीपाळीनें सर्व लोकांस लष्करी शिक्षण मिळून युद्धकलेंत देशांतील सर्व सशक्त पुरुष तरबेज रहात. तसेंच आपल्या राज्यांतील महत्त्वाच्या ठाण्यांस तटबंदी करून तेथें त्यानें कायमची शिबंदी ठेवून दिली. त्यानें आरमार तयार करून आपल्या खलाशांना शिक्षण देण्यासाठीं डॅनिश व वेल्श खलाशी नोकरीस ठेविले.

४. **आल्फ्रेडच्या इतर सुधारणा.** आल्फ्रेडनें केवळ लष्करी सुधारणा केल्या असें नाहीं. धर्मगुरूंशीं तो स्नेहानें वागत असे. त्यानें एक कायद्याचें कोड तयार केलें. पूर्वीच्या ॲंग्लो सॅक्सनांचा इतिहास रचण्यास विद्वान् लोकांस उत्तेजन दिलें व आपल्या काळची हकीकत लिहून ठेवण्याची व्यवस्था केली. युरोपांतून शिक्षण आणवून इंग्लिश सरदारांच्या मुलांस शिक्षण देण्यास शाळा काढिल्या. त्याला स्वतःला निबंध लिहिण्याची व परभाषेंतील पुस्तकांचें भाषांतर करण्याची आवड होती. देशांतील उद्योगधंद्यांस व व्यापारास त्यानें मोठें उत्तेजन दिलें. आल्फ्रेड ९०१त वारला. शौर्य, धैर्य, चिकाटी व प्रजावात्सल्य हे सर्व गुण त्याच्या ठायीं एकवटले होते. तो आपल्या कारकीर्दभर इंलंडचें रक्षण व उन्नति करण्यासाठीं एकसारखा झटला. त्यामुळें 'थोर आल्फ्रेड' (Alfred the Great) या नांवानें तो इतिहासांत प्रसिद्ध आहे.

५. **डेन राजांचा अंमल (१०१३-१०४२).** आल्फ्रेडच्या मागून वेसेक्सच्या गादीवर जे राजे आले ते कर्तबगार असून त्यांनीं सर्व इंग्लंडचें अधिराज्य तसेंच कायम राखिलें. पुढें ९७५सालीं कर्तबगार राजांची परंपरा संपली व दुबळ राजे त्यांच्या जागीं आले. या राजांनीं डेन लोकांच्या तडाक्यांतून आपला बचाव करण्याच्या उपायास डेनगेल्ड नांवाचा कर लोकांवर बसविला व तो कर खंडणी म्हणून डेन

लोकांच्या हवालीं ते करूं लागले. या खंडणीनें शत्रूचा लोभ अधिकच वाढला व एथल्रेडच्या कारकीर्दींत त्याचा अनुभव आला. एथल्रेडनें पुनः पुनः खंडणी भरली; पण डेनांची तृप्ति झाली नाहीं. शेवटीं १०१३मध्यें एथल्रेडला फ्रान्सांत पळून जावें लागलें, व डेन्मार्कचा राजा स्वेन हाच इंग्लंडचा राजा झाला. हा डेनांचा अंमल १०४०पर्यंत टिकला. त्या सालीं डॅनिश राजा दुर्बळ आहे असें पाहून विटन सभेनें एग्बर्टचा इंग्लिश वंश पुनः गादीवर आणिला. एथल्रेडचा मुलगा एडवर्ड यास गादीवर बसविण्यांत आलें व इंग्लंडवर पुनः वेसेक्सचा अंमल चालू झाला.

---

## ४. नॉर्मन वुइल्यम विजयी झाला.

१. **एडवर्डची कारकीर्द** (१०४२–१०६६). १०४२त इंग्लंडच्या गादीवर आलेला एडवर्ड शांत स्वभावाचा असून साधुवृत्तीनें राही. परंतु त्याच्या अंगीं तडफ मुळींच नव्हती. त्यानें इंग्लंडची तीन सरदारांत वाटणी केली. त्यांपैकीं एक सरदार हॅरोल्ड नेहमीं राजाजवळ असे व राज्यकारभार पाही; त्यामुळें त्याचें वजन खूप वाढलें. एडवर्डच्या राज्यांत फ्रान्सच्या उत्तरेकडील नॉर्मंडी प्रांतांतील नॉर्मन लोकांचें फार प्रस्थ माजलें. एडवर्डची आई नॉर्मन वंशाची असून त्याचें लहानपण नॉर्मंडींतच गेलें होतें. हे नॉर्मन लोक मूळचे डेन्मार्ककडील असून फ्रान्सांत वस्ती करून राहिले होते. ते मोठे शूर व बाणेदार असत. एडवर्डनें सर्व अधिकाराच्या जागा नॉर्मनांस दिल्या. या सुमारास एडवर्डचा नॉर्मन नातलग वुइल्यम हा नॉर्मंडीचा ड्यूक (जहागीरदार) होता. वुइल्यमची एडवर्डच्या मनावर इतकी कांहीं छाप बसली होती कीं, एकदां १०५१त तो इंग्लंडांत आला असतां

एडवर्डनें त्याला आपल्यामागें इंग्लंडची गादी देण्याचें वचन दिलें. पुढें १०६५च्या नाताळांत एडवर्ड वारला. इंग्लिश राजवंशांतील वारस लहान असल्यामुळें व नॉर्मंडीचा ड्यूक वुइल्यम इंग्लंडची गादी मिळविण्यासाठीं टपलेला आहे असें माहीत असल्यामुळें, त्या वेळीं कर्तबगार मनुष्यच गादीवर बसाविला पाहिजे असा विचार करून हॅरोल्ड हा इंग्लिश वंशांतील आहे व राज्यास या नॉर्मनांच्या धाडीपासून वांचविण्यास समर्थ आहे असें पाहून विटन सभेनें एडवर्डचा ज्या दिवशीं वेस्टमिन्स्टर मठांत दफनविधि केला त्याच दिवशीं हॅरोल्डच्या नांवानें इंग्लंडचा राजा म्हणून द्वाही फिरविली.

२. **वुइल्यमचा विजय.** इकडे वुइल्यमनें इंग्लंडची गादी मिळविण्याचा पक्का निश्चय केला होता. इ. स. १०६६त फ्रान्सांत जेथें जेथें नॉर्मनांची वस्ती होती तेथून त्यानें इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं सैन्य जमा केलें व तो इंग्लंडवर चालून आला. नॉर्मन सैन्याची व इंग्लिश सैन्याची दक्षिण किनाऱ्याजवळच हेस्टिंग्ज येथें गांठ पडली. युद्ध झालें, त्यांत हॅरोल्ड ठार झाला व वुइल्यम विजयी झाला. नंतर वुइल्यमला राज्याभिषेक झाला व परकीय× नॉर्मन राजांचा अंमल इंलंडवर चालू झाला (१०६६).

---

**× नॉर्मन घराणें, १०६६—११५४.**

**पहिला वुइल्यम**, १०६६-१०८७.

- रॉबर्ट.
- **दुसरा वुइल्यम**, १०८७-११००.
- **पहिला हेन्री**, ११००-११३५.
  - मॅटिल्डा.
    - (अॅन्जेव्हिन घराण्याचा पहिला राजा) **दुसरा हेन्री**, ११५४-११८९.
- अॅडेला (मुलगी).
  - **स्टीफन**, ११३५-११५४.

३. **हीअरवर्ड दी सॅक्सन.** हें परकीय नॉर्मन राज्य इंग्रजांनीं एकदम मान्य केलें नाहीं. पश्चिम इंग्लंडांत व उत्तर इंग्लंडांत सॅक्सन लोकांनीं पुनः पुनः बंडें केलीं; परंतु वुइल्यमनें जबरदस्तीनें त्यांचा वेळींच मोड केला. शेवटीं उत्तरेकडे तर त्यानें मुलूख जाळून पोळून उध्वस्त केला, तेव्हां बंडें पुरीं मोडलीं ( १०७१ ). त्यानें बंडखोरांच्या जमिनी जप्त केल्या व आपल्या नॉर्मन सरदारांत वांटून दिल्या. परकीय वुइल्यमशीं झगडणाऱ्या या कर्तबगार पुरुषांत प्रमुख म्हटला म्हणजे देशभक्त हीअरवर्ड दी सॅक्सन हा होय. त्यानें दलदलीच्या इलाय बेटांत एक लांकडी किल्ला बांधिला व नॉर्मनांशीं स्वदेशरक्षणार्थ झगडणाऱ्या लोकांचें इलाय हें आश्रयस्थान बनून गेलें. वुइल्यमनें हीअरवर्डला पकडण्यासाठीं अनेक प्रयत्न केले. पण ते सर्व व्यर्थ जाऊन इलाय बेट हातीं येणें अशक्य असें त्यास वाटूं लागलें. परंतु शेवटीं इलाय येथील कांहीं मठवाशांस हीअरवर्डचा घात करण्याची बुद्धि झाली व त्यांनीं त्याच्या किल्ल्याची वाट विश्वासघातानें वुइल्यमला दाखवून दिली; तेव्हां हीअरवर्ड वुइल्यमच्या हातीं आला ( १०७१ ). यानंतर नॉर्मनांस विरोध करणारा कोणीही वीर पुरुष राहिला नाहीं व नॉर्मन राजसत्ता निर्वेध झाली.

४. **सरंजामपद्धतीचा आरंभ.** इंग्लंडमध्यें वुइल्यमनें सरंजामपद्धति (Feudalism, फ्युडॅलिझम) युरोपांतल्याप्रमाणें व्यवस्थितपणें सुरू केली. तिची माहिती आपण आतां करून घेऊं. पहिल्यानें सर्व जमीन राजाची असें त्यानें जाहीर केलें. तिच्यापैकीं कांहीं भाग ' राजाची जमीन ' म्हणून स्वतःकडे राखिला. ज्या इंग्रजांनीं त्याची सत्ता मान्य केली त्यांच्या जमिनी त्यांजकडेच सोंपविल्या. बंडखोरांची जमीन मात्र जप्त करून नॉर्मन अनुयायांस वांटून दिली. ही जमीन घेतांना सरदारास कांहीं अटी कबूल कराव्या लागत. पहिली गोष्ट ही कीं, गुडघे टेकून राज्याबद्दल राजनिष्ठा त्याला प्रदर्शित करावी

लागे. दुसरें असें कीं, लढाईच्या प्रसंगीं नेमून दिलेली फौज घेऊन आपण राजाच्या वतीनें लढण्यास तयार राहूं अशी त्यास शपथ घ्यावी लागे. सरदार लोक आपल्याला मिळालेल्या जमिनीपैकीं कांहीं स्वतःकडे ठेवून बाकीची जमीन गरीब जमीनदारांस अशाच त्यांच्याकडून शपथा घेऊन वांटून देत. त्यांच्याकडून त्याहूनही खालच्या दर्जाच्या लोकांस त्या मिळत. अशा रीतीनें वरपासून खालपर्यंत कुळास लष्करी*चाकरीबद्दल बांधून घेऊन जमीन देण्याची वहिवाट पडली.

**५. वुइल्यमची सावधगिरी.** सरदारांच्या सत्तेवर निर्बंध न घालतां सरंजामपद्धति अंमलांत आणिली तर कसे अनर्थ उद्भवतात हें वुइल्यमनें फ्रान्सांत पाहिलें होतें. तो स्वतः नॉर्मंडीचा ड्यूक असल्यामुळें फ्रेंच राजाचा मांडलिक सरदार होता, तथापि आपल्या मुलुखांत स्वतंत्रतेनें वावरण्याची त्याला संवय लागून गेली होती. असे सरदार वागले तर राजाची सत्ता नामधारी बनते असा त्याचा अनुभव होता. याकरितां इंग्लंडांत एकाच सरदारास मोठमोठे प्रांत तोडून द्यावयाचे नाहींत व एखाद्या सरदाराची वांटणी मोठी झाली असें वाटल्यास तिच्यांतील कांहीं भाग एका ठिकाणीं तर राहिलेला दुसऱ्याच ठिकाणीं असें करावयाचें, या बाबतींत वुइल्यमनें दक्षता ठेविली. अशा रीतीनें सरदारांच्या सत्तेवर योग्य आळा ठेविल्यामुळें इंग्लंडचें एक राष्ट्र बनण्यास फारच उपयोग झाला व इंग्लिश राजसत्ता फ्रान्सांतल्याप्रमाणें दुर्बल झाली नाहीं.

---

* अगदीं खालच्या टोंकास जमिनीवर राबणारीं कुळें असत. त्यांनीं आपली जमीन करावी व आठवड्यांतून कांहीं दिवस सरदारानें स्वतःकडे राखलेल्या जमिनीवर काम करावें अशी व्यवस्था असे. हीं कुळें लष्करी चाकरीबद्दल बांधिलेलीं नसत. यांची स्थिति कष्टाची असून त्यांना गुलामवर्ग (Villeinage, व्हिलनेज ) म्हणत, व जित इंग्रजांतून त्यांची भरती झाली होती.

६. **डूम्सडे बुक व सॅलिस्बरीची सभा.** सर्व राष्ट्रभर राजाची छाप पडून सरदारांच्या प्राबल्यानें देशाचे तुकडे पडूं नयेत म्हणून वुइल्यमनें आणखीही युक्तया योजिल्या. त्यानें १०८६ सालीं सर्व राज्यांतील जमिनीची मोजणी करविली; त्या वेळीं जमिनीची किंमत, तिचा मालक, त्याचीं गुरें, घरें वगैरें बाबींची नोंद करण्यांत आली. ती 'डूम्सडे बुक' (Domesday Book) या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें सॅलिस्बरी येथें सरदार व त्यांचीं मुख्य मुख्य कुळें या सर्वांची सभा भरविली. तींत सुमारें साठ हजार लोक जमले होते. तेथें वुइल्यमनें सरदारांकडून व त्यांच्या कुळांकडून राजनिष्ठेच्या शपथा घेवविल्या. त्यामुळें इंग्लंड हें एक राष्ट्र असून सरदारांहून राजाचा आपणावर अधिक हक्क आहे याची प्रत्येक जमीनदार कुळास जाणीव उत्पन्न झाली व प्रसंग पडल्यास सरदाराविरुद्ध कां होईना पण राजाच्याच बाजूनें आपणास लढलें पाहिजे हें त्यास कळून आलें. वुइल्यमनें आपल्या राज्यास बळकटी आणण्यासाठीं बरेच किल्ले बांधले. त्यांत लंडनचा टॉवर प्रमुख होय. त्यानें ज्यू व फ्लेमिंग (फ्लँडर्स मधील लोक) यांस इंलडांत रहाण्यास परवानगी दिली व अशा रीतीनें इंग्लिश व्यापारास व उद्योगधंद्यास उत्तेजन दिलें.

७. **वुइल्यमचा मृत्यु.** येणेंप्रमाणें वुइल्यमनें इंग्लंडवर स्वारी करून बळकट राज्याची स्थापना केली. पुढें पुढें नॉर्मन सरदारांनीं बंडें केलीं व वुइल्यमच्या मुलांनीं तंटे माजविले. परंतु वुइल्यम शूर व खबरदार असल्यामुळें कोणाचें कांहीं चाललें नाहीं. तो १०८७त वारला. वुइल्यमला नेहमीं विजय येत गेला. त्यावरून विजयी वुइल्यम (William the Conqueror) या नांवानें तो प्रसिद्ध आहे. त्याच्यामागून त्याचे मुलगे 'दुसरा वुइल्यम' व 'पहिला हेन्री' हे एकामागून एक गादीवर आले. पहिल्या हेन्रीनंतर पहिल्या वुइल्य-

मच्या मुलीचा मुलगा स्टीफन इंग्लंडचा राजा झाला. तो अगदीं दुर्बळ होता; त्यामुळें त्याच्या कारकीर्दींत सरदार फार प्रबळ झाले व देशांत बजबजपुरी माजली. स्टीफनच्यामागून पहिल्या हेन्रीच्या मुलीचा मुलगा दुसरा हेन्री हा गादीवर आला. पहिल्या हेन्रीनें इंग्लिश वंशाच्या स्त्रीशीं लग्न केलें होतें; त्यामुळें दुसरा हेन्री नॉर्मन व इंग्लिश अशा मिश्र वंशाचा होता.

**८. नॉर्मन अंमलापासून फायदे.** इंग्लंडांत वुइल्यमच्या पूर्वीं इतकी बजबजपुरी माजली होती कीं, वुइल्यमसारखा कडक, कर्तृत्ववान् व धोरणी राजा त्या देशावर आला ही एका दृष्टीनें बरी गोष्ट झाली असेंच म्हटलें पाहिजे. दुसरें असें कीं, नॉर्मन हे अँग्लो-सॅक्सनांप्रमाणें टयुटॉनिक वंशाचेच होते, व कांहीं काळ नॉर्मन राजे जरी इंग्रजांशीं परकेपणानें वागले तरी हळूहळू कुलैक्याचा जोर होऊन नॉर्मन इंग्रजांत मिसळून गेले. यापुढें कोणाही नव्या जातीची इंग्लंडांत वसाहत झाली नाहीं. तेव्हां ब्रिटन, अँग्लो-सॅक्सन, डेन व नॉर्मन या जातींच्या मिश्रणानें पुढील इंग्लिश राष्ट्र उत्पन्न झालें. तसेंच नॉर्मन लोक फ्रान्सांत रहात असल्यामुळें इंग्लंडचें युरोपशीं दळणवळण खूप वाढलें. त्याचा परिणाम इंग्रजी भाषेवरही होऊन त्या भाषेंत पुष्कळ फ्रेंच शब्द प्रत्यक्ष व परंपरेनें शिरले व तिला विशेष प्रौढता आली. इंग्लंड हें एकाकी बेट पडलें होतें ती स्थिति पालटून रोमन साम्राज्यांत शिरल्यामुळें पूर्वीं जसा युरोपियन सुधारणेशीं इंग्लंडचा संसर्ग घडला तशीच या वेळींही स्थिति झाली.

---

## ५. दुसऱ्या हेन्रीची चोख व्यवस्था.

**१. नवीन कालविभाग** (१०६६–१४८५). १०६६ पासून इंग्लंडच्या इतिहासाच्या नवीन भागास सुरुवात होते. नॉर्मन वुइल्यम इंग्लंडवर स्वारी करून आला, त्यानें तेथें कायमची वस्ती केली व इंग्लंडांत जोरदार एकछत्री सत्ता स्थापिली. तथापि त्याला या कामीं सरदारांची मदत घेणें जरूर पडलें. शिवाय त्या वेळची समाजरचना, युद्धरीति व देशांतील इतर रिवाज यांजमुळें सरदारवर्ग बलिष्ठ असे. ही स्थिति १४८५पर्यंत टिकली. तेव्हां (१०६६–१४८५) या कालविभागांत सरदारवर्गच प्रमुखत्वानें देशांत वावरत होता. या भागाच्या शेवटीं यादवी माजवून सरदारांनीं आपला नाश करून घेतला (१४८५), व सरदारवर्गाच्या सत्तेचा अंत झाला.

**२. दुसरा हेन्री.** दुसरा हेन्री हा फ्रान्समधील ॲन्जू प्रांताच्या सरदाराचा मुलगा होता. त्यावरून ११५४पासून जें घराणें इंग्लंडवर राज्य करूं लागलें त्यास ॲन्जेव्हिन म्हणतात. + या घराण्याचा अंमल ११५४पासून १३९९पर्यंत म्हणजे सुमारें अडीचशें वर्षें होता. हेन्री कर्तबगार असून त्यानें स्टीफनच्या वेळची बजबजपुरी मोडून राज्यकारभारांत अनेक सुधारणा केल्या. त्या काळीं सरदार व धर्मगुरु प्रबळ असत. हेन्रीनें सरदारांची सत्ता पुष्कळ कमी केली; व धर्मगुरूवर जरब बसविण्याचाही प्रयत्न केला, पण तो फसला.

**३. सरदारांच्या सत्तेवर निर्बंध.** नॉर्मन घराण्यांतील शेवटचा राजा स्टीफन याच्या कारकीर्दींत सरदारांची (Nobles) सत्ता फारच वाढली होती. हेन्रीनें या सरदारांस कह्यांत आणण्यासाठीं बरीच खटपट केली. सरदारांनीं बांधिलेले किल्ले त्यानें पाडून टाकिले.

---

+( टीप पुढील पानावर पहा ).

सरंजामी पद्धतीप्रमाणें सरदारांना जमिनीचा मोबदला म्हणून लढाईच्या वेळीं आपण सैनिक हजर करूं असा ठराव करून द्यावा लागत असे. पण या व्यवस्थेनें राजास सरदारांच्या इमानावर भिस्त ठेवावी लागे. तेव्हां हेन्रीनें या पद्धतीला रजा देऊन जमिनीबद्दल पैसेच घ्यावयाचे असा प्रघात सुरू केला. या नव्या व्यवस्थेनें सरदार इतरांप्रमाणें कर देऊन शांततेचे उद्योग करूं लागले व राजसत्ता दृढ झाली. त्याचप्रमाणें हेन्रीनें देशांत स्वयंसैनिकांची ( Militia, मिलिशिया ) परंपरा चांगली जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला, व

---

+ **अँजेव्हिन घराणें, ११५४–१३९९.**

**दुसरा हेन्री, ११५४–११८९.**

- **पहिला रिचर्ड, ११८९–११९९.**
- **जॉन, ११९९–१२१६.**
  - **तिसरा हेन्री, १२१६–१२७२.**
    - **पहिला एडवर्ड, १२७२–१३०७.**
      - **दुसरा एडवर्ड, १३०७–१३२७.**
        - **तिसरा एडवर्ड, १३२७–१३७७.**
          - एडवर्ड ( ब्लॅक प्रिन्स ).
            - **दुसरा रिचर्ड, १३७७–१३९९.**
          - जॉन ऑफ गाँट.
            - **चौथा हेन्री** (पहिला लँक्यास्टर राजा).

प्रत्येक स्वतंत्र नागरिकानें उत्तम सुधारलेलीं हत्यारें आपल्यापाशीं बाळगिलीं पाहिजेत असा नियम केला.

४. **न्यायव्यवस्था.** हेन्रीनें न्याय देण्याच्या कामांतील सरदारांची सत्ताही पुष्कळ कमी केली. आजपर्यंत शायरमूटमध्यें न्यायाचें काम चालत असून परगण्यांतील सरदारांच्या नेतृत्वाखालीं त्या भरत. त्यामुळें न्यायाचें बहुतेक काम सरदारांच्या हातीं राही. पहिल्या हेन्रीनें देशाचे कांहीं भाग पाडून फिरते न्यायाधीश नेमिले होते. ही व्यवस्था पूर्णत्वास नेऊन दुसऱ्या हेन्रीनें देशाचे सहा भाग पाडिले व त्यांजवर कायमचे फिरते न्यायाधीश नेमिले. त्यांनीं आपआपल्या भागांत फिरून लोकांस कायद्याप्रमाणें न्याय द्यावा अशी व्यवस्था झाली. त्याचप्रमाणें हेन्रीनें लंडन येथें एक वरिष्ठ कोर्ट स्थापिलें. या व्यवस्थेनें न्यायाच्या बाबतींत राजाचें वजन प्रस्थापित झालें; व दुसरा फायदा असा झाला कीं, न्यायाधीश हा निराळाच वर्ग झाल्यामुळें कायद्याचा विशेष विचार होऊन अधिक शुद्ध न्याय मिळूं लागला.

५. **थॉमस बेकेटचा उदय.** दुसऱ्या हेन्रीनें आपल्या मदतीस कर्तबगार माणसें घेतलीं होतीं. थॉमस बेकेट हा त्या सर्वांत प्रसिद्ध होय. हा एका श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा असून मोठा हुशार होता. त्याची हुशारी व विद्वत्ता पाहून क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपनें त्याला चर्चमध्यें नोकरींत घेतलें. तेथें त्याच्या बुद्धिमत्तेचें तेज पडून तो लवकरच वैभवास चढला. त्या वेळीं जर शहाणा मंत्री नेमावयाचा झाला तर धर्मखात्यांतील हुशार मनुष्यच निवडणें भाग पडे. त्यास अनुसरून हेन्रीनें बेकेटला चॅन्सेलरची (दिवाण) जागा दिली व त्याची बेकेटवर पूर्ण मर्जी बसून बेकेट त्याचा उजवा हात झाला. वैभवास चढल्यावर बेकेटची रहाणी डामडौलाची होऊन त्याचें वर्तन रंगेल व चैनी झालें.

६. **धर्मकोर्टांचा प्रश्न.** त्या काळीं धर्मगुरूंची चौकशी राजाच्या कोर्टांत न होतां धर्मकोर्टें निराळीं असत त्यांजपुढें धर्मगुरूंची चौकशी व्हावयाची असा प्रकार होता. त्यामुळें त्यांस योग्य शिक्षा न मिळतां अगदीं थोड्या शिक्षेवर त्यांची सुटका होई. हा अन्याय व धर्मगुरूंचा डोईजडपणा हेन्रीस सहन न होऊन निदान महत्त्वाच्या गुन्ह्याचा आरोप धर्मगुरूंवर आला असतां त्यांची चौकशी स्वतंत्र धर्मकोर्टापुढें न होतां राजाच्या सामान्य कोर्टांत व्हावी अशी व्यवस्था करण्याबद्दल त्यानें खटपट चालविली. याच सुमारास क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपची जागा रिकामी झाली; तेव्हां त्या ठिकाणीं बेकेटची नेमणूक केल्यास धर्मगुरूंच्या कोर्टांचा अधिकार कमी करून टाकण्याच्या कामीं आपल्याला पुष्कळ मदत होईल असें हेन्रीस वाटलें व त्यानें बेकेटला क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपची जागा मिळवून दिली (११६२). परंतु ती जागा मिळतांच बेकेटच्या वर्तनांत एकदम फरक पडला; चैनीची रहाणी सोडून तो एखाद्या जोग्याप्रमाणें राहूं लागला; व राजाज्ञेपेक्षां धर्माज्ञा पाळण्यांत अधिक पुण्य आहे अशी त्याची भावना झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. अर्थातच हेन्रीनें जेव्हां धर्मकोर्टांची सत्ता कमी करण्याचें काम त्यास सांगितलें तेव्हां राजास विरोध करण्यास त्यानें सुरुवात केली.

७. **बेकेटचा खून.** हेन्रीनें ११६४त देशांतील बड्या लोकांचें एक कौन्सिल क्लॅरेन्डन येथें बोलाविलें व धर्मगुरूंच्या महत्त्वाच्या गुन्ह्यांचा निवाडा राजाच्या कोर्टांत व्हावा असा ठराव पास करून घेतला. बेकेटनें या ठरावाला पहिल्यानें संमति दिली. पण त्याप्रमाणें आचरण करण्यास मात्र तो अळंटळं करूं लागला. तेव्हां बेकेट व हेन्री यांजमध्यें मोठा तंटा सुरू झाला व बेकेटला युरोपांत पळून जाऊन आपला बचाव करून घेणें भाग पडलें. सहा वर्षें बेकेट परदेशीं राहिला. पुढें ११७० सालीं हेन्री व बेकेट यांचा

पोपच्या मध्यस्थीनें समेट होऊन बेकेट इंग्लंडांत परत आला. पण बेकेटच्या मानी स्वभावामुळें लवकरच त्यानें पुन: भांडणाचे नवे मुद्दे काढिले. या वेळीं हेन्री फ्रान्सांत होता. तो अत्यंत तापट असल्यामुळें ही बातमी समजतांच रागानें लाल होऊन बोलला "काय? मजपाशीं इतके नोकर असतां मीं गरिबीपासून वर चढविलेल्या या पोरानें माझा छळ आरंभिला असतां कोणीच मला याच्या त्रासापासून मुक्त करूं शकत नाहीं?" हेन्रीचे हे शब्द ज्या सेवकांच्या कानीं पडले त्यांत बेकेटचे चार शत्रु होते. त्यांनीं आपल्या दुष्मानाचा पुरा सूड उगविण्यास ही संधी बरी आहे असें पाहिलें. ते ताबडतोब इंग्लंडला गेले व क्यान्टर्बरी येथील धर्ममंदिरामध्यें (क्याथीड्रल) त्यांनीं बेकेटचा खून केला (११७० डिसेंबर). या भयंकर कृत्यामुळें सर्व लोक बेकेटचे दोष विसरले व चोहोंकडून त्याजबद्दल सहानुभूतिपर उद्गार निघूं लागले. परंतु हेन्रीच्या अंगीं मुत्सद्दीगिरी विशेष असल्यामुळें देशाच्या शांततेंत बिघाड झाला नाहीं. त्यानें पोपकडे आपल्याला पश्चात्ताप होत आहे असें कळवून आपल्याला पापमुक्त करावें अशी विनंति केली. लोकांचें समाधान व्हावें म्हणून तो क्यान्टर्बरीच्या देवळांत पायीं गेला व तेथें त्यानें आपल्या पाठीवर फटके मारून घेतले. अशा घोर रीतीनें या प्रकरणाचा शेवट झाला व हेन्रीचा धर्मकोर्टांची सत्ता कमी करण्याचा उद्देश लांबणीवर पडला.

८. **दुसऱ्या हेन्रीचा मृत्यु.** दुसऱ्या हेन्रीनें स्कॉटलंडच्या राजास व वेल्स प्रांताच्या मुख्य सरदारास आपलें स्वामित्व कबूल करावयास लाविलें, व ११६९च्या सुमारास आयर्लंड देश जिंकिला. हेन्रीचीं शेवटचीं वर्षें दु:खांत गेलीं. त्याच्या मुलांनीं दंगे करण्यास सुरुवात केली. आपला सर्वांत धाकटा मुलगा जॉन याचें नांव बंडखोरांच्या अग्रभागीं पाहून हेन्रीस भयंकर धक्का बसला व त्यांतच त्याचा अंत

झाला ( ११८९. हेन्रीच्या ताब्यांत इंग्लंडबरोबर फ्रान्सचा मोठा भाग होता, तथापि त्याला इंग्लंडबद्दल स्वत्व वाटत असून त्यानें इंग्लंडमधील अव्यवस्था पार नाहींशी केली व राजसत्ता दृढ केली.

---

## ६. मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ) इ. स. १२१५.

१. **जॉनचा स्वभाव.** दुसऱ्या हेन्रीच्या मागून त्याचा वडील मुलगा रिचर्ड गादीवर वसला. त्यानें दहा वर्षें राज्य केलें. तो मोठा शूर असून त्याला सिंहहृदय ( Lion-Heart ) असें टोपणनांव पडलें होतें. रिचर्ड वारल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ जॉन हा गादीवर आला ( ११९९ ). तो अविचारी असून प्रजेचा छळ करावा व आपली तुंबडी भरावी हें तत्त्व उराशीं बाळगून त्याचें आचरण चाललें होतें. हट्टीपणा, वचनभंग करण्याची संवय व स्वार्थसाधुपणा हे दोष त्याच्या अंगीं खिळून गेले होते. त्याची कारकीर्द ११९९ पासून १२१६पर्यंत टिकली; एवढया वेळांत एक फ्रान्सच्या राजाशीं, दुसरा पोपशीं व तिसरा इंग्लंडांतील लोकांशीं असे तीन मोठे तंटे त्यानें केले. त्यांपैकीं प्रत्येकांत त्याची फजिती व विरुद्ध पक्षाचा जय झाला. जॉनशीं भांडून इंग्लिश लोकांनीं जय मिळविला; तेव्हां त्यांनीं राजापासून ‘ मोठी सनद ’ मिळविली व आपल्या हक्कांची राजापासून कबुली करून घेतली.

२. **फ्रान्सच्या राजाशीं तंटा.** दुसरा हेन्री गादीवर आला तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाच्या ताब्यांत फ्रान्समधील बरेच प्रांत होते. या प्रांतांतील सरदारांनीं जॉनच्या एका वडील भावाचा मुलगा आर्थर हाच या प्रांतांचा खरा धनी असा पुकारा केला. त्यावरून युद्ध सुरू झालें; त्यांत आर्थर जॉनच्या हातीं सांपडला. तेव्हां त्यास

जॉननें कैदेंत ठेविलें. पुढें तो लवकरच वारला. जॉननें स्वार्थासाठीं आर्थरचा खून केला असें फ्रान्समधील लोक म्हणूं लागले. या संधीचा उपयोग करून फ्रेंच राजा फिलिप यानें नॉर्मंडीवर स्वारी केली व नॉर्मंडीसुद्धां इंग्लिश राजाच्या मालकीचा फ्रान्समधील बहुतेक सर्व मुलूख काबीज केला ( १२०४ ). पुढें जॉननें हे गेलेले प्रांत परत मिळविण्यासाठीं खूप खटपट केली; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जॉननें फ्रेंच मुलूख घालविला याचा इंग्लिश राष्ट्रास फायदाच झाला. आतांपर्यंत नॉर्मन सरदार इंग्लंड ही आपली 'भोगभूमि' असून फ्रान्स ही आपली 'जन्मभूमि' मानीत. पण आतां फ्रान्सशीं असलेला संबंध कायमचा तुटल्यामुळें इंग्लंड हाच आपला स्वदेश असून त्याच्या कल्याणार्थ झटणें हेंच आपलें कर्तव्य होय अशी जाणीव नॉर्मन सरदारांत उत्पन्न झाली. नॉर्मन सरदार फ्रेंच भाषा बोलत व फ्रेंच रीतिरिवाज पाळीत; तथापि हळूहळू नॉर्मन व अँग्लो–सॅक्सन वंशांचे परस्पर विवाहसंबंध होऊं लागले व या दोन जातींच्या मिश्रणापासून जोमदार इंग्लिश राष्ट्राची निपज झाली.

३. **पोपशीं भांडण**. जानॅचें दुसरें भांडण पोपशीं झालें. १२०५त क्यान्टर्बरीचा आर्चबिशप वारला. जॉननें आर्चबिशपची निवडणूक करणाऱ्या धर्मगुरूंच्या मंडळास आपल्या प्रांतांतील एका बिशपची त्या जागीं नेमणूक करण्यास सांगितलें. हें म्हणणें मंडळाला पटलें नाहीं. तेव्हां हें प्रकरण पोपकडे गेलें. त्यानें दोघांसही धाब्यावर बसवून स्टीफन लँग्टन या कर्तबगार गृहस्थाची त्या जागीं नेमणूक केली. तेव्हां जॉन व पोप यांजमध्यें तंटा सुरू झाला. शेवटीं पोपनें इंग्लंडवर धार्मिक बहिष्कार घातला ( १२०८ ). तेव्हां धर्माला धरून इंग्लंडांत प्रार्थना, लग्नविधि व प्रेतसंस्कार करणें अशक्य झालें. एक वर्ष लोटलें. तथापि जॉननें दाद दिली नाहीं; तेव्हां पोपनें जॉनला धर्मभ्रष्ट ठरविलें. पण जॉननें बहि-

ष्कारपत्राकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. शेवटीं जॉन वठणीस येत नाहीं असें पाहून पोपनें पुढील हुकूम काढिला. "जॉन हा नास्तिक असल्यामुळें इंग्लंडच्या गादीवरून पदच्युत झाला आहे; तरी फ्रान्सचा राजा फिलिप यानें इंग्लंडांत उतरून त्यास हद्दपार करावें." या हुकुमानें मात्र जॉन नरम आला व त्यानें पोपला शरण जाऊन या संकटांतून आपली सुटका करून घेण्याच ठरविलें. त्यानें स्टीफन लँग्टनला क्यान्टर्बरीचा आर्चबिशप म्हणून मान्य केलें, इतकेंच नव्हे तर पोपचें स्वामित्व कबूल करून आपल्या राज्याबद्दल दरसाल पोपला खंडणी भरण्यास मान्यता दिली (१२१३).

४. **लोकांनीं सनद मिळविली.** फ्रेंच राजा व पोप यांजशीं भांडण चालू असतां फाजील कर बसवून व ते न दिल्यास तुरुंगांत टाकून इंग्लिश लोकांवर जॉननें जुलूम चालविला होता. तो कायमचा थांबावा या उद्देशानें राजाकडून लेखी करारनामा करून घेण्याचा बेत लोकांनीं केला. या खटपटींत स्टीफन लँग्टन यानें लोकांचा पुढाकार घेतला होता. सर्व सरदार, धर्माधिकारी व मध्यमवर्गांतील लोक यांनीं एक सभा भरवून शपथ घेतली कीं, 'जर राजानें आपल्या मागण्या मान्य केल्या नाहींत तर त्याच्याशीं युद्ध चालू करावयाचें व आपणांस लेखी करारनामा करून देण्यास राजा तयार होईपर्यंत तें चालवावयास चुकावयाचें नाहीं.' जॉननें लोकपक्षांत फूट पाडण्याचे सर्व उपाय करून पाहिले व पोपपाशींही साहाय्य मागितलें. पण व्यर्थ. शेवटीं देशांतील बहुतेक सर्व लोक आपल्या विरुद्ध आहेत व आतां अळंटळं करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून जॉननें रनीमीड+या ठिकाणीं लोकांनीं तयार केलेल्या करारनाम्यावर सही केली (१५ जून १२१५).

---

\+ हें ठिकाण लंडनच्या नैर्ऋत्येस वीस मैलांवर टेम्स नदीच्या कांठीं आहे.

**५. सनदेंतील कलमें.** हा करारनामा अत्यंत महत्त्वाचा असून लोकसत्तेचीं बीजें इंग्लंडांत कायमचीं पेरलीं जाण्यास तो कारणीभूत झाला असल्यामुळें 'मोठी सनद' (मॅग्ना चार्टा) या नांवानें तो इतिहासांत प्रसिद्ध आहे. या सनदेंत जॉननें तिजवर सही केली त्या वेळीं एकुणपन्नास कलमें होतीं. हींत राजाच्या अधिकारावर स्पष्ट निर्बंध घातले होते व तिचीं कलमें मोडल्याखेरीज स्वच्छंदानें कारभार करणें पुढील राजांस अशक्य झालें. धर्मखातें, सरदारवर्ग व सामान्य जनता या सर्व वर्गांच्या तक्रारींचें या सनदेंत निवारण केलेलें होतें व ती इतक्या महत्त्वाची होती कीं, जॉनच्या पुढील राजांकडूनही ती मान्य असल्याबद्दल कबुली घेण्यांत आली. या सनदेंतील तीन कलमें अत्यंत महत्त्वाचीं आहेत; तीं येणेंप्रमाणें:—(१) बरोबरीच्या लोकांकडून व चालत असलेल्या कायद्यास अनुसरून चौकशी झाल्याखेरीज कोणाही नागरिकास कैदेंत घातलें जाणार नाहीं. (२) न्याय देण्याच्या कामीं लांच घेतली जाणार नाहीं, नकार दिला जाणार नाहीं, अगर विलंब लावण्यांत येणार नाहीं. (३) राजानें आपल्याला मदत म्हणून युद्धाचे वेळीं किंवा इतर कारणाकरितां लोकांपासून पैशाची जी मागणी करावयाची ती लोकसभेच्या (Great Council) संमतीखेरीज कदापि करावयाची नाहीं.

**६. सनदेचें महत्त्व.** शेवटचें कलम लोकसत्तेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. जॉन राजाची व पुढील राजांची त्याला शाब्दिक संमति मिळाली खरी; परंतु त्याचा प्रत्यक्ष अंमल घडवून आणण्यास इंग्लिश लोकांस अतिशय यातायात पडली. या सनदेंत कबूल केलेल्या मागण्या राजानें नवीनच कबूल केल्या असें नाहीं, तथापि आमच्या तक्रारी अमुक आहेत असें लोकांनीं राजास सांगावें व राजानें प्रत्यक्षरीतीनें त्यांचें म्हणणें कबूल करावें हा प्रकार याच वेळीं पहिल्यानें झाला. शिवाय मागील राजांनीं दिलेलीं वचनें

पाळलीं तर पाळलीं, नाहींतर कांहींच तोड नव्हती. पण या वेळीं राजानें जर सनदेंतील कलमें पाळलीं नाहींत तर त्याला तीं पाळण्यास भाग पाडावें यासाठीं एक पंचवीस सरदारांची कमिटी नेमण्यांत आली. सरदार व धर्मगुरु यांच्या बरोबरच शहरांतील व्यापारी व गरीब शेतकरी यांचेही हक्क हींत ग्रथित केले होते, हीही हिच्यांतील विशेष गोष्ट होय.

७. **जॉनचा लपंडाव.** एकदां वचन दिल्यावर तें पाळणें हा सरळ मार्ग होता. परंतु वचनें देणें जितकें सोपें असतें तितकेंच किंबहुना त्याहूनही तीं पाळणें अवघड असल्यामुळें राजे पुष्कळ वेळां वचनें देतात; पण ते त्यांजप्रमाणें वागत नाहींत. त्याप्रमाणें सनदेंतील कलमें एकामागून एक मोडण्यास जॉननें सुरुवात केली. तेव्हां राजाशीं दोन हात करून आपले हक्क कायम राखण्याची सरदारांनीं तयारी केली. त्यांनीं फ्रान्सचा युवराज लुई याची मदत मागितली. इतक्यांत आकस्मिक रीतीनें जॉन मृत्यु पावला (१२१६). सरदारांनीं राजास ताळ्यावर आणण्यासाठींच लुईचा पक्ष घेतला असल्यानें जॉन मृत्यु पावला तेव्हां त्यांनीं लुईचा पक्ष सोडून दिला. तेव्हां लुईला फ्रान्सांत जाणें भाग पडलें व जॉनच्या मागून त्याचा नऊ वर्षांचा मुलगा 'तिसरा हेन्री' ही पदवी धारण करून गादीवर आला.

## ७. पार्लमेंटचा उदय.

१. **पार्लमेंटची सभा.** जॉनचा मुलगा तिसरा हेन्री नालायक निघाला. तेव्हां सरदारांचा पुढारी सायमन डी मॉंटफर्ट यानें राजास पदच्युत केलें व लोकप्रतिनिधिसभा (पार्लमेंट) बोलावून तिच्या

तंत्रानें राज्यकारभार चालविला. पुढें तिसऱ्या हेन्रीचा मुलगा पहिला एडवर्ड यानें पार्लमेंटच्या संमतीनें राज्य चालविण्याची पद्धतिच चालविली. अशा रीतीनें इंग्लंडांत पार्लमेंट सभेचा उदय झाला. तो कसा तें या प्रकरणांत पाहूं.

२. **तिसऱ्या हेन्रीची अव्यवस्था.** तिसरा हेन्री गादीवर आला तेव्हां तो अज्ञान असल्यामुळें १२२७पर्यंत कारभाऱ्यांच्या हातीं राज्यसूत्रें होतीं. ते कर्तव्यदक्ष असल्यामुळें राज्यकारभार नीट चालला होता. १२२७त हेन्री वयांत आला; तेव्हांपासून पुढील वीस वर्षें-पर्यंत त्यानें स्वतः राज्य चालविलें. हेन्रीनें आपला विवाह प्राव्हेन्स-मधील (फ्रान्सांतील एक प्रांत) एलेनॉर हिजशीं करून परकीय लोकांची मैत्री जोडली, बहुतेक सर्व जागांवर फ्रेंच माणसांच्या नेमणुका केल्या व आपल्या फ्रेंच नातलगांवर पदव्या व सरंजाम यांची खैरात केली. पोपनेंही धर्मखात्यांत परकीय नोकर नेमण्याचा सपाटा चालविला, अर्थातच राज्याचा खर्च फार वाढला.

३. **पार्लमेंटच्या मागण्या.** नॉर्मन वुइल्यमच्या वेळेपासून राजे सल्ला विचारण्यासाठीं व पैशाची मागणी करण्यासाठीं 'ग्रेट कौन्सिल' बोलावीत. त्यांत बडे सरदार व बिशप बसत. तिसरा हेन्री आपला वाढता खर्च भागविण्यासाठीं ग्रेट कौन्सिल बोलावी. त्यांत बडे सरदार व बिशप यांजबरोबर छोटया जमीनदारांच्या प्रतिनिधींसही आमंत्रण असे. या सभेस आतां पार्लमेंट असें नांव पडलें होतें. १२५८ सालीं एक पार्लमेंट राज्याच्या स्थितीचा विचार करण्यासाठीं ऑक्सफर्ड येथें भरली होती. तिजपुढें तिसऱ्या हेन्रीनें आपल्याला फार कर्ज झालें आहे असें सांगून खूप पैशाची मागणी केली. ती मागणी पार्लमेंटनें मान्य केली नाहीं, व हेन्री राज्य करण्यास नालायक आहे असें ठरवून राज्यकारभार चालविण्यासाठीं पंधरा सरदारांची कमिटी नेमिली. यापुढें राजाच्या सर्व परकीय बगल-

बच्चांची हकालपट्टी झाली; पोपला देणग्या बंद पडल्या व हेन्रीच्या उधळेपणास काट मिळाला.

४. **सायमन डी मॉँटफर्ट.** हेन्रीनें पुनः आपल्या हातीं सत्ता येण्यासाठीं खटपट चालविली; तेव्हां सरदारांस त्याच्याशीं झगडा करावा लागला. त्यांत सरदारांच्या बाजूस राजाचा मेहुणा सायमन डी मॉँटफर्ट हा कर्तबगार पुरुष पुढारी होता. त्याला लंडन व इतर शहरांतील नागरिक, धर्मखात्यांतील बरेचसे लोक व बहुजनसमूह यांचा पाठिंबा होता. राजास वठणीवर आणण्यास दुसरा मार्ग नाहीं असें पाहून सायमननें युद्ध करण्याचा निश्चय केला. इकडे हेन्री व त्याचा मुलगा एडवर्ड यांनींही सैन्य जमविलें. लुएज किल्लयाजवळ लढाई होऊन तींत मॉँटफर्टचा पूर्ण जय झाला आणि हेन्री व एडवर्ड हे दोघेही त्याच्या हातीं आले ( १२६४ ).

५. **मॉँटफर्टची पार्लमेंट.** मॉँटफर्टनें हेन्री व एडवर्ड या दोघांस कैदेंत ठेविलें व राज्यकारभार आपल्या अंगावर घेतला. कित्येक सरदारांस हें रुचलें नाहीं व ते मॉँटफर्टविरुद्ध खटपटी करूं लागले. तेव्हां सामान्य जनतेचें मत आपल्याला अनुकूल करून घेण्याच्या बुद्धीनें मॉँटफर्टनें या नवीन राज्याचा मुख्य व्यवस्थापक या नात्यानें एक पार्लमेंट बोलाविली ( १२६५ ). या पार्लमेंटची विशेष गोष्ट अशी होती कीं, या सभेस बडे सरदार, धर्मगुरु व छोटे जमीनदार ( Knights ) येवढेच बोलाविले नसून बरो ( तट असलेलें शहर ) व सिटी (शहर ) यांतूनही प्रतिनिधींस आमंत्रण केलें होतें. सामान्य जनांच्या प्रतिनिधींस मॉँटफर्टनें देशाच्या मुख्य सभेंत बसण्याचा हक्क पहिल्यानें दिला. यावरून त्याला 'हाऊस ऑफ कॉमन्स' चा जनक ( Father of the House of Commons ) म्हणतात. केवळ सरदार व इतर बडे लोक यांच्या संमतीनें राज्यकारभार चालविणें शक्य नाहीं तर सामान्य जनतेचाही राज्यकर्त्यास पाठिंबा पाहिजे या

तत्त्वाची मॉंटफर्टला पूर्ण जाणीव होती.

६. **मॉंटफर्ट पडला.** मॉंटफर्टचें राज्य फार दिवस टिकलें नाहीं. बंदींत असतां राजपुत्र एडवर्ड लवकरच निसटला. जे सरदार मॉंटफर्टच्या विरुद्ध होते ते त्यास मिळाले. नंतर इव्हशॅम (Evesham) येथें लढाई होऊन (१२६५) तींत मॉंटफर्ट पडला. तेव्हां तिसरा हेन्री पुनः राज्यावर आला. पुढें १२७२ त हेन्री वारला व त्याच्यामागून एडवर्ड गादीवर बसला.

७. **नमुनेदार पार्लमेंट.** पहिला एडवर्ड मोठा कर्तबगार व महत्त्वाकांक्षी होता. त्यानें १२७२पासून १३०७पर्यंत राज्य केलें. त्यानें वेल्स प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडून टाकिला (१२८२). पुढें स्कॉटलंड जिंकण्याचा त्यानें जोराचा प्रयत्न चालविला तेव्हां एडवर्डचें फ्रान्सशीं वैर आलें व त्याच्यावर चोहोंकडून शत्रु उठले. एडवर्डनें मॉंटफर्टपासून लष्करी गुण घेतले त्याचप्रमाणें त्याचें दूरदर्शित्व व मुत्सद्दीगिरीही उचलली होती. तेव्हां त्यानें संकटकाळीं पार्लमेंट बोलावून सामान्य जनांचा आपल्या धोरणास पाठिंबा मिळविला (१२९५). या पार्लमेंटांत बडे सरदार, आर्चबिशप व बिशप यांस व्यक्तिशः निमंत्रणपत्रिका (Special Writs, स्पेशल रिट्स) पाठवून बोलावणें केलें; प्रत्येक शायरचे प्रतिनिधि दोन छोटे जमीनदार, व प्रत्येक मुख्य शहराचे व बरोचे दोन प्रतिनिधि यांस सामान्य निमंत्रणपत्रिका परगण्याच्या शेरिफकडे पाठवून बोलावणीं केलीं. अशा तऱ्हेनें पार्लमेंटमध्यें दोन ठळक भेद झाले व यापुढें हीच व्यवस्था कायमची झाली. त्यावरून १२९५च्या पार्लमेंटास मॉडेल पार्लमेंट (नमुनेदार पार्लमेंट) असें नांव पडलें.

८. **दोन सभा.** अशा रीतीनें बडे लोक व सामान्य जनांचे प्रतिनिधि या दोन्ही वर्गांचा अंतर्भाव पार्लमेंटांत झाला. पहिल्यानें हे दोन्ही वर्ग एकाच ठिकाणीं बसत; परंतु तिसऱ्या एडवर्डच्या वेळे-

पासून ( १३२७–१३७७ ) दोन सभा निराळ्या झाल्या (१३३३). बड्या लोकांच्या सभेला उमरावांची सभा ( House of Lords, हाउस ऑफ लॉर्ड्स ) व सामान्य लोकांच्या प्रतिनिधींच्या सभेस लोकसभा ( House of Commons, हाउस ऑफ कॉमन्स ) अशीं नांवें पडलीं. लोकसभेंत छोटया जमीनदारांचे प्रतिनिधि व नागरिक प्रतिनिधि बसत. १९२५च्या सभेंत बिशपकडे निमंत्रणपत्रिका पाठवून बिशपच्या हाताखालच्या धर्मगुरूंचेही प्रतिनिधि बोलावण्यांत आले होते. पुढें कॉमन्ससभेंत त्यांचा अंतर्भाव होई. परंतु ते नियमितपणें हजर रहात नसत व चौदाव्या शतकानंतर मुळींच येतनासे झाले.

**९. पार्लमेंटचा राजास उपयोग.** पार्लमेंटची बैठक राजे बोलावीत ती मुख्यतः आपली पैशाची गरज भागावी म्हणून बोलावीत. पहिला वुइल्यम हा आपल्या स्वतःच्या उत्पन्नावर राज्यकारभार चालवीत असे. परंतु पुढें राज्याच्या मर्यादा वाढल्या व खर्चाच्या बाबीही वाढून पुढील राजांस आपलें उत्पन्न पुरेनासें झालें. तेव्हां ग्रेट कौन्सिल भरवून त्यांत सरदारांपासून ते पैशाच्या मागण्या करीत. काउन्टीमूट म्हणून परगण्यांच्या सभा असत; त्यांच्यापासून + शेरीफतर्फे पैशाचें मागणें करण्यांत येई व शहरांत राजे आपला गुमास्ता ( एजंट ) पाठवून त्याच्यातर्फे पैशाचें मागणें करीत. परंतु या यातायातीपेक्षां एका बैठकींत पार्लमेंट बोलावल्यानें पैशाचें मागणें करणें राजास सोईचें झालें. पार्लमेंटनें द्यावयाचा पैसा जरी सार्वजनिक कामास लागावयाचा असला तरी देणगीच्या रूपानें दिला जाई. अर्थातच देणग्या देतांना राजापासून लोकांचे हक्क निर्बाध चालतील अशी आश्वासनें घेण्याची संधी पार्लमेंटास मिळाली व तिनें त्या संधीचा पूर्ण उपयोग करून राजसत्तेवर अनेक हितकर निबंध घातले.

---

+ शेरिफ (Sheriff) परगण्यावरील राजाचा अधिकारी.

१०. **लोकमत्तेची वाढ.** १२९५त एडवर्डनें जी नमुनेदार पार्लमेंट बोलाविली ती आपला सरकारी उत्पन्न मिळविण्याचा प्रश्न सहज रीतीनें सुटावा याकरितांच होय. शिवाय सल्लागारसभेंत सामान्य जनांचे प्रतिनिधि बोलावण्यांत प्रबळ उमरावांस प्रतिस्पर्धी निर्माण होऊन त्यापासून आपल्या राज्यास अधिक स्थैर्य यावें असाही त्याचा हेतु होता. तथापि देशांत ही संस्था सतत चालू राहिल्यानें पुढें तिची वाढ झाली, आणि कर बसाविणें, कायदे करणें व अधिकाऱ्यांवर हुकमत चालविणें या तिन्ही बाबतींत तिचा अधिकार चालू झाला. अशा रीतीनें मॉंटफर्ट व एडवर्ड यांनीं पेरलेल्या बीजाचा प्रचंड वृक्ष बनला व त्याला लोकसत्तेचीं गोड फळें आलीं.


---

## ८. युगांतर

### (मध्ययुगाचा अस्त आणि नवयुगाचा उदय).

१. **मध्ययुगाचें सिंहावलोकन.** पांचव्या शतकांत रोमन साम्राज्याचा लय झाला तेव्हांपासून पंधराव्या शतकापर्यंतच्या काळास युरोपच्या इतिहासांत मध्ययुग (Middle Ages) असें नांव आहे. या काळांतील पूर्वभागांत इंग्लंड हें एक राष्ट्र बनत होतें. अँग्लो—सॅक्सन, डेन, नॉर्मन या लोकांनीं अनुक्रमानें इंग्लंडवर स्वाऱ्या केल्या व त्या देशांत वसाहत केली. शेवटीं १०६६नंतर एका राजाचा अंमल इंग्लंडवर बिनहरकत चालू झाला व निरनिराळ्या जातींचें मिश्रण होऊन इंग्लिश राष्ट्र बनलें. पुढें दुसऱ्या हेन्रीनें आयर्लंड जिंकिलें (११७०), व पहिल्या एडवर्डनें वेल्स प्रांत जिंकला (१२८२). नंतर इंग्लिश राजांनीं स्कॉटलंड व फ्रान्स हे देश जिंकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें १२९५पासून १३१४पर्यंत

# ब्रिटिश बेटें



ब्रिटिश बेटें
स्केल
अटलांटिक महासागर
उत्तर समुद्र
आयरिश समुद्र
इंग्लिश खाडी
सेंट जार्जची खाडी
उत्तर खाडी
ऑर्कनी बेटें
स्कॉटलंड
इंग्लंड
वेल्स
अल्स्टर
कनॉट
लीन्स्टर
मन्स्टर
इन्व्हरनेस
कॅलेडोनियन
अॅबर्डीन
डंडी
पर्थ
स्टर्लिंग
एडिंबरो
ग्लासगो
लंडनडेरी
बेलफास्ट
आइल ऑफ मॅन
डब्लिन
लिमरिक
कॉर्क
किन्सेल
वेक्सफर्ड
न्यूकॅसल
लीड्स
यॉर्क
हल
प्रेस्टन
लिव्हरपूल
मँचेस्टर
चेस्टर
शेफील्ड
लिंकन
नॉटिंगहॅम
डर्बी
लेस्टर
नॉरिच
बर्मिंगहॅम
केंब्रिज
इप्स्विच
कोल्चेस्टर
ऑक्सफर्ड
ब्रिस्टल
कार्डिफ
लंडन
डोव्हर
आइल ऑफ वाइट
प्लिमथ
लँडस एण्ड
चॅनल बेटें
फ्रान्स
BHARAT P.W. POONA.

स्कॉटलंडशीं युद्ध झालें व १३४० ते १४५३पर्यंत फ्रान्सशीं इंग्लंडास शतसांवत्सरिक युद्ध ( Hundred Years' War ) चालवावें लागलें. त्यांजमध्यें इंग्लंडच्या कर्तबगार राजांस व शूर सरदारांस आपल्या पराक्रमाचें प्रदर्शन करण्याची चांगली सवड सांपडली. परंतु या युद्धांत रयतेचा पैसा व उत्साह व्यर्थ खर्चीं पडला आणि इंग्लंडच्या कल्याणाकडे व प्रगतीकडे राजांचें दुर्लक्ष झालें. पुढें शतसांवत्सरिक युद्ध संपल्यावर सरदारांनीं परस्पर भांडणें काढिलीं. तेव्हां लँक्यास्टर× व यॉर्क अशा दोन राजवंशांत तंटा लागून इंग्लंडांत यादवी (Civil War ) माजली. ती तीस वर्षें टिकली. या यादवींत दोन्ही पक्षांकडे गुलाबाचीं फुलें चिन्हें म्हणून होतीं. त्यावरून

---

**लँक्यास्ट्रियन घराणें १३९९–१४६१.**

**चौथा हेन्री**, १३९९–१४२३.
|
**पांचवा हेन्री**, १४१३–१४२२.
|
**सहावा हेन्री**, १४२२–१४६१.

**यॉर्किस्ट घराणें १४६१ ते १४८५.**

रिचर्ड ड्यूक ऑफ यॉर्क ( तिंसऱ्या एडवर्डच्या दुसऱ्या मुलाचा वंशज ).

- **चौथा एडवर्ड**, १४६१–१४८३
  - वा एडवर्ड, १४८३.
  - रिचर्ड
- ड्यूक ऑफ क्लॅरेन्स.
  - एडवर्ड, अर्ल ऑफ वॉरिक.
- **तिसरा रिचर्ड**, १८४३--१४८५.

ती "गुलाबी झेंड्यांचें झुंज" ( Wars of the Roses ) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. शेवटीं १४८५त बॉस्वर्थफील्ड येथें लढाई होऊन लँक्यास्ट्रियन पक्षाचा वारस हेन्री ट्यूडर हा विजयी झाला व मग यादवी संपली. या तीस वर्षांच्या यादवींत पुष्कळ सरदारघराण्यांचा निर्वंश झाला व त्यामुळें सरदारवर्गाचें वर्चस्व लयास गेलें. याच सुमारास मध्ययुग संपलें व नवयुगास आरंभ झाला.

२. **जमिनीचें महत्त्व.** मध्ययुगांत व्यापार व उद्योगधंदे अगदीं बाल्यावस्थेंत होते आणि जमीन अथवा शेती हिजपासून सर्व संपत्तीची उत्पत्ति होई. तेव्हां कमी अधिक जमिनीच्या मालकीवरून सामाजिक दर्जा ठरे. राजा व बडे सरदार यांच्या मालकीची फार मोठी जमीन असे; व थोड्या जमिनीचे मालक छोटे जमीनदार असून त्यांना नाइट ( Knight ) ही पदवी असे. दर सरदाराची मोठी शेतवाडी ( Manor ) असे. शेतवाडीपैकीं कांहीं जमीन स्वतःकडे ठेवून बाकीची जमीन सरदार कुळांकडे लावून देई. जमिनीवर स्वतः राबणारीं कुळें दास्यांत असून आपल्या जमिनीबरोबर विकलीं जात. सरदार आपल्या शेतवाडीचा पूर्ण मालक असून तो तेथें स्वतंत्र कोर्ट भरवी. त्यांत कुळांना न्याय देण्याचें काम चाले. कुळाला आपल्या जमिनीचा मोबदला म्हणून सरदाराच्या खास जमिनीवर आठवड्यांतून कांहीं दिवस राबावें लागे. परंतु सरदारांच्या युद्धप्रियतेमुळें त्यांना पैशाची जरूरी लागे; अशा वेळीं अनेक उद्योगी कुळांनीं त्यांची गरज भागविली, रोख पैसे खंडाबद्दल देण्याचे ठराव करून घेतले, व दास्यांतून ( Villeinage, व्हिलनेज ) आपली सुटका करून घेतली.

३. **शिलेदारी बाणा.** मध्ययुगांत वरिष्ठ वर्गांत युद्धाची आवड विशेष होती. त्यामुळें युद्धामध्यें निपुण, घोड्यावर बसण्यांत पटाईत,

व हत्यारबंद असे अनेक हौशी जवान असत. त्यांनीं आपलें शौर्य गाजवून नाइट ( Knight ) ही लष्करी दृष्टया बहुमानाची पदवी धारण केलेली असे. राजे व बडे सरदार हे देखील अनुभवी नाइट-कडून आपल्याला विधिपूर्वक नाइट पदवी मिळविण्यांत धन्यता मानीत. रणांत अद्भुत पराक्रम करावयाचा व अनाथांचें रक्षण करावयाचें याबद्दल 'नाइट' मध्यें मोठी ईर्षा असे. हें व्रत "शिलेदारी बाणा "( Chivalry, शिव्हल्री ) या नांवानें प्रसिद्ध असून त्याची छाप समाजांतील वरिष्ठ वर्गांत त्या काळीं विशेष होती. नाइटांची कीर्तीची चाड, धाडसी वृत्ति, सत्यव्रत, धर्मनिष्ठा, व स्त्रीदाक्षिण्य, हीं नांवाजण्यासारखीं असत. प्रत्येक नाइटचें स्वतःचें अथवा कौटुंबिक विशिष्ट चिन्ह असे; व पुढें या निरनिराळ्या कुटुंबांच्या चिन्हांची माहिती देणारें एक शास्त्रच निर्माण झालें. त्यास वंशशास्त्र ( Heraldry, हेराल्ड्री ) म्हणत. नाइटांचीं घोड्यावर बसून लुटुपुटीचीं झुंजें ( Tournaments ) होत; त्यावेळीं होतकरू जवान व अनुभवी नाइट अद्भुत पराक्रम गाजवीत व प्रसंगीं आपला जीव धोक्यांत घालून कां होईना आपलें नांव राखण्यासाठीं अत्यंत झटत.

४. **शहरांची स्थिति.** त्या काळीं जो कांहीं थोडा व्यापार व उद्योगधंदा होता तो शहरांतून असे. शहरें कोणा तरी सरदाराच्या अथवा राजाच्या सरंजामापैकीं समजण्यांत येत असून त्यांजवर अनेक बाबतींत बोजा पडे. परंतु शहरांतील व्यापारी संघांनीं ( Trade-guilds ) सरदारांच्या गरजेचा फायदा घेऊन त्यांस एकदम मोठ्या रकमा भरल्या व शहरांस स्वातंत्र्याच्या सनदा मिळविल्या. त्यामुळें नियमित कर घेऊन त्यांच्या कोणत्याही अन्तर्गत व्यवहारांत ढवळाढवळ न करण्याचें सरदारांनीं कबूल केलें. अशा रीतीनें हक्कांची सनद मिळविणाऱ्या शहरांत लंडन प्रमुख होय. नॉर्मन विजयापासून तें राजधानीचें ठिकाण झालें. पुढें त्याला आपला स्वतःचा मेयर

(नगराध्यक्ष) निवडण्याचा हक्क मिळाला व लंडनचे नागरिक आपल्या राजकीय हक्कांस काळजीपूर्वक जपूं लागले.

५. नवीन विद्या. युरोपच्या पूर्वभागांत राज्य मिळविण्यासाठीं तुर्क एकसारखी खटपट करीत होते. त्यांनीं १४५३ सालीं कॉन्स्टँन्टिनोपल शहर घेतलें; तेव्हांपासून यूरोपमध्यें मध्ययुग संपून नवयुगास आरंभ झाला. समाजाच्या कल्पना बदलल्या, आकांक्षा पालटल्या व चोहों बाजूंस नवीन विचार, उच्चार व आचार सुरू झाले. मध्ययुगांत धर्मगुरु तेवढे विद्वान् असत. केवळ धर्मज्ञानच नव्हे तर इतर सर्व प्रकारचें ज्ञान धर्मगुरूंचे ठायींच होतें. कॉन्स्टॅन्टिनोपल तुर्कांनीं घेतलें, तेव्हां या स्थितींत पालट झाला. कॉन्स्टॅन्टिनोपल येथें असलेले जुने ग्रंथ घेऊन तेथील विद्वान् लोक युरोपांत पसरले; त्याबरोबर पूर्वीं ग्रीस व रोम वैभवाच्या शिखरावर होतीं त्या वेळीं झालेल्या तेजस्वी ग्रंथांचें अध्ययन करण्याची लाट उसळली. इंग्लंडांतही लवकरच या नवीन विचारांचा प्रभाव दिसूं लागला. जॉन कॉलेट (१४६६–१५१९) हा आपल्याला मुळांत खिस्ताची शिकवण समजून घेतां यावी म्हणून ग्रीक भाषा शिकला. नंतर आपलें ज्ञान समाजांत प्रसृत करण्यासाठीं त्यानें व्याख्यानें दिलीं व लंडन येथें 'सेंट पॉल्स' नांवाची शाळा काढिली. थॉमस मूर (१४८०–१५३५) या विद्वानानें 'युटोपिया' हा ग्रंथ लिहिला; त्यांत 'उत्तम राज्य' वर्णिलें असून उत्कृष्ट राज्याचीं अंगें त्यावरून आपल्याला कळतात. मध्ययुगांत हें जग पापानें भरलेलें असून त्यापासून निवृत्त होण्याकडे शहाण्यांची प्रवृत्ति असे; ती मोडून आतां जग हें सुंदर व पवित्र असून निरनिराळ्या पदार्थांचा शक्य तितका अधिक उपभोग घ्यावा व जगाच्या सौंदर्यांत भर टाकावी अशा विचारांचा लोकमतावर पगडा बसला. ही क्रान्ति विद्येचें पुनरुज्जीवन (Revival of letters) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. पुस्तकी विद्ये-

बरोबरच चित्रकला, मूर्तिकला, व शिल्पकला या कलांचें पुनरुज्जीवन झालें.

६. **छापण्याची कला.** याच सुमारास नवीन ज्ञानाचा प्रसार करण्यास उत्कृष्ट साधन लाभलें. छापण्याच्या कलेचा शोध जॉन गटेनबर्ग या जर्मनानें १४४०त लावला. पुढें ही छापण्याची कला वुइल्यम क्याक्स्टन या इंग्रजानें इंग्लंडांत आणिली ( १४७६ ). क्याक्स्टनच्या उदाहरणावरून इतरांनीं छापखाने काढिले व लवकरच पुष्कळ पुस्तकें छापलीं जाऊन तीं स्वस्त झालीं. हजारों लोकांना वाचण्याची आवड उत्पन्न झाली, नवीन विद्येचा प्रसार बहुजनसमूहांत फार झपाट्यानें झाला. व सामान्य जनता अज्ञानपंकांत रुतून पडली होती, तिचा उद्धार झाला.

७. **शास्त्रीय शोध.** ज्ञानाच्या प्रसारामुळें शोधक निपजूं लागले व त्यांनीं अनेक विषयांत नवे शोध लाविले. होकायंत्रांत सुधारणा, ताऱ्यांची उंची मोजण्याचें यंत्र, दुर्बीणीचा शोध, इत्यादि नवीन गोष्टी नौकानयन-शास्त्रांत झाल्या. बंदुकीच्या दारूचा शोध लागला व मध्ययुगांत युद्धांत वापरण्यांत येणारीं तलवारी, भाले वगैरे हत्यारें मागें पडलीं. या दारूच्या शोधापासून तोफखाना हें सैन्याचें महत्त्वाचें अंग बनलें; आणि राजांनीं दारूगोळा व तोफा आपल्या हातीं ठेविल्यामुळें सरदारांचे किल्ले निरुपयोगी झाले व तिरंदाज आणि भालेकरी घोडेस्वार रणांगणावर कुचकामाचे ठरूं लागले.

८. **नवीन भूमींचा शोध.** मध्ययुगांत हिंदुस्थानशीं खुष्कीनें व्यापार चाले व तलम कापड, मसाल्याचें सामान, मोती, जवाहीर इत्यादि मोलवान पदार्थांची हिंदुस्थानांतून युरोपांत रवानगी होई. परंतु १४५३त मुसलमानांनीं कॉन्स्टॅन्टिनोपल घेतल्यापासून या व्यापारास अडथळा होऊं लागला व युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांस हिंदुस्थानशीं आपला व्यापार चालू रहाण्यासाठीं एखादा समुद्रावरून रस्ता

निघाला पाहिजे असें वाटूं लागलें. तेव्हां जलपर्यटन करण्याची मोठी लाट युरोपांत उसळली. इटलीमधील जिनोआ शहरीं जन्मलेल्या कोलंबसानें स्पेनच्या राणीच्या मदतीनें एक मोठी सफर काढिली व अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्याजवळील बहामा बेटांवर तो जाऊन पोचला (१४९२). त्याला वाटलें कीं आपण हिंदुस्थानच्या पूर्वेच्या बेटांवरच आलों आहों; म्हणून त्यानें त्या बेटांस इंडीज असें नांव दिलें. परंतु तीं हिंदुस्थानपासून दूर असल्यामुळें पुढें त्यांना 'वेस्ट इंडीज' नांव पडलें. सन १४९७त व्हास्को ड गामा हा पोर्तुगीज खलाशी आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाजवळील 'केप ऑफ गुड होप'ला वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरीं उतरला व त्यानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून पोर्तुगीजांना पूर्वेकडील व्यापार खुला करून दिला. जॉन क्याबट व त्याचा मुलगा सेबॅशियन क्याबट हे व्हेनिसमधील व्यापारी ब्रिस्टल बंदरीं रहात; त्यांनीं इंग्लंडचा राजा सातवा हेन्री याच्या मदतीनें अमेरिकेंतील लॅब्रॅडोर व न्यूफाउण्डलंड हे देश शोधून काढिले (१४९७). अशा रीतीनें अमेरिका व हिंदुस्थानचा जलमार्ग यांचा शोध लागून युरोपियन लोकांच्या धाडसी वृत्तीस उत्तेजन मिळालें व वैभवशाली युरोपचें बीजारोपण झालें.

९. **राष्ट्रकल्पना.** मध्ययुगांत युरोपखंडांतील बहुतेक सर्व देश धर्मदृष्ट्या व राजकीय दृष्ट्या एकाच पोपचे व एकाच बादशहाचे अंकित असून आपण सर्व ख्रिस्ती लोक एक आहों ही भावना त्यांच्या ठायीं जोरांत होती. अकराव्या शतकांत तुर्कांनीं ख्रिस्ती लोकांचें क्षेत्रस्थान जरुसलेम घेतलें; तेव्हां ख्रिस्ती यात्रेकरूंस त्रास होऊं लागला. तेव्हां ख्रिस्ती व मुसलमान यांजमध्यें १०९६पासून १२७२पर्यंत धर्मयुद्धें चालू झालीं. त्यामुळें तर सर्व युरोपचें ऐक्य दृढ झालें. परंतु पंधराव्या शतकाच्या शेवटीं या स्थितींत प्रचंड फरक पडला. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन इत्यादि देशांस आपण निरनिराळीं राष्ट्रें

आहों अशी जाणीव उत्पन्न झाली. नवीन भूमीचा शोध लागल्यावर आपल्या जातभाईंच्या ताब्यांत ती आली पाहिजे म्हणून युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल वगैरे सरकारें झटूं लागलीं व त्यामुळें स्वतंत्र राष्ट्र या भावनेस जोर आला. त्याचप्रमाणें धर्मसुधारणेची चळवळ सुरू होऊन सर्व देशांनीं पोपची आज्ञा प्रमाण मानण्याचें कारण नाहीं, ज्या त्या देशानें धर्माचा प्रश्न आपल्या सोईस पडेल तसा सोडवावा हा विचार बळावत गेला व त्यामुळें धर्मदृष्टीनें युरोपखंड एक होतें, ती स्थिति जाऊन त्याचे निरनिराळे तुकडे पडले. शिवाय याच सुमारास इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांतील सरदार मागें पडून राजसत्ता प्रबळ झाली. अर्थातच प्रत्येक राजानें आपआपल्या राष्ट्राचें वैभव वाढविण्याची जारीनें खटपट चालविली; त्यामुळें निरानिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्रपणाच्या भावनेस विशेष जोर आला. एकंदरीनें छापखान्यामुळें झालेल्या नवीन ज्ञानाच्या प्रसारामुळें युरोपियन राष्ट्रांत जागृति झाली व नवीन भूमीच्या शोधामुळें त्यांच्या धाडसी वृत्तीस उत्तेजन मिळालें. अर्थात् मध्ययुगाचें अज्ञानतिमिर जाऊन उगवत्या नवयुगाचा प्रकाश युरोपखंडांत हळूहळू पसरूं लागला व युरोपियन राष्ट्रांचा जोमदार उद्योग सुरू झाला.

## ९. सरदार शमले आणि राजाला नमले.

**१. सोळाव्या शतकाचा ओघ.** गुलाबी झुंजांच्या दंगलीनें इंग्लिश लोक अगदीं त्रासून गेले होते. अशा वेळीं धाकदपटशा दाखवून कां होईना देशभर शांतता व स्वास्थ्य यांची स्थापना करील असा राजा इंग्लंडास पाहिजे होता. सुदैवानें १४८५त गादीवर आलेला हेन्री ट्यूडर व त्याचे वंशज या कामास योग्य

असेच निघाले. आणखी या काळांत—सोळाव्या शतकांत—धर्मसंबंधीं कलह माजून युरोपांत दोन पक्ष झाले. स्पेन हें राष्ट्र त्या काळीं फारच बलाढ्य असून धर्मकलहांत इंग्लंडच्या विरुद्ध बाजूस होतें. त्याच्याशीं शेवटची ट्यूडर राणी एलिझबेथ हिला झगडावें लागलें. या झगडयांत इंग्लंडची फत्ते झाली. त्याचा महत्त्वाचा परिणाम ह्मणजे इंग्लंडच्या समुद्रावरील वर्चस्वास सुरुवात झाली, व ‘ नवीन जगांत ’ आपल्याला वांटा मिळावा म्हणून इंग्रजांनीं जोरानें खटपट चालू केली.

२. **सातव्या हेन्रीचें राज्यारोहण.** १४८५त बॉस्वर्थफील्डच्या रणांगणावर लँक्यास्ट्रियन पक्षाचा सरदार हेन्री ट्यूडर*यास विजयश्रीनें माळ घातली. नंतर त्यानें थाटानें लंडन शहरीं प्रवेश केला व पार्लमेंटनें त्याला राजा म्हणून मान्य केलें. यॉर्क व लँक्यास्टर या दोन पक्षांतील दुही नाहींशी व्हावी या हेतूनें हेन्रीनें यॉर्क पक्षाचा चौथा एडवर्ड याची मुलगी एलिझबेथ हिशीं विवाह केला. या विवाहानें हेन्रीच्या गादीवरील हक्कास बळकटी आली व त्याच्या संततीचा हक्क तर अधिक दृढ व दोन्ही पक्षांस मान्य झाला.

३. **तोतयांचीं बंडें.** हेन्री अगदीं जवळचा हक्कदार वारस नसल्यामुळें राज्यांत बंडें होणें अगदीं साहजिकच होतें. एडवर्ड

---

*अनियंत्रित राज्यसत्ता ( Absolute Monarchy ).

**ट्यूडर घराणें, १४८५–१६०३.**

सातवा हेन्री, १४८५–१५०९.

|

आठवा हेन्री, १५०९–१५४७.

| मेरी, १५५३–१५५८. | एलिझबेथ १५५८–१६०३. | सहावा एडवर्ड, १५४७–१५५३. |
| --- | --- | --- |

अर्ल ऑफ वॉरिक हा हेन्रीपेक्षां राज्याचा जवळचा वारस होता. त्यानें गडबड करूं नये म्हणून त्यास पकडून हेन्रीनें लंडनच्या किल्ल्यांत ठेवून दिलें ( १४८५ ). पुढें लॅम्बर्ट सिम्नेल ह्या एका व्यापाऱ्याच्या तरुण मुलानें ' मी एडवर्ड ( वॉरिकचा अर्ल ) आहें ' असें जाहीर करून बंड उभारिलें. आयर्लंडांत यॉर्किस्ट पक्ष लोकप्रिय असल्यानें तेथील लोकांनीं सिम्नेलची बाजू धरिली तेव्हां हेन्रीनें कैदेंत असलेल्या एडवर्डला किल्ल्यांतून बाहेर काढून लोकांस दाखवून सिम्नेल तोतया असल्याबद्दल इंग्लिश लोकांची खात्री पटविली. तथापि सिम्नेल इंग्लंडवर स्वारी करून आला. पण स्टोक येथें पराभव होऊन तो कैद झाला ( १४८७ ). हेन्रीनें सिम्नेलला अपराधाची क्षमा करून आपल्या पदरीं पेलेबशा विसळण्यास ठेविलें. यानंतर पर्किन वॉर्बेक हा तोतया आयर्लंडांत पुढें आला (१४९२). तिसऱ्या रिचर्डनें १४८३त आपल्या दोघां पुतण्यांना कैदेंत ठेविलें होतें; त्या राजपुत्रांची अखेर गत काय झाली हें अद्यापि एक गूढ होतें. 'त्या राजपुत्रांपैकीं धाकटा भाऊ रिचर्ड मी आहे ' असें सांगून वॉर्बेकनें चौथा रिचर्ड ही पदवी धारण केली. फ्रान्सचा राजा व स्कॉटलंडचा राजा यांजसारख्या बड्या लोकांचें साहाय्य मिळाल्यामुळें वॉर्बेकचें बंड पांच वर्षें टिकलें. शेवटीं तो इंग्लंडवर चाल करून आला. परंतु त्याचा पराभव होऊन तो कैद झाला ( १४९७ ). पुढें लंडनच्या किल्ल्यांत असतां वॉरिकचा अर्ल, एडवर्ड याशीं त्याची मैत्री जडली व दोघांनीं कैदेंतून निसटून जाण्याचा कट केला.तो उघडकीस येऊन त्यांस फांशीं देण्यांत आलें(१४९९).

४. **सरदारांचा पाडाव.** सातवा हेन्री मोठा धूर्त व धोरणी होता. पूर्वी यॉर्क व लँक्यास्टर या पक्षांत यादवी होऊन जी अंदाधुंदी माजली तिचें कारण राजसत्तेचें दौर्बल्य होय हें त्यानें तेव्हांच ओळखिलें व आपल्या सर्व कारकीर्दीत राजसत्ता समृद्ध व समर्थ

करण्याचें धोरण ठेविलें. यासाठीं १ सरदारांचा पाडाव करावयाचा, २ पार्लमेंटची जरूरी राहूं नये म्हणून द्रव्यसंचय करावयाचा, व ३ परराष्ट्रांशीं मैत्री राखावयाची, अशा तीन गोष्टी त्यानें केल्या. त्यांचा आतां विचार करूं. मध्ययुगांत सरदार प्रबळ होते; परंतु सातवा हेन्री गादीवर आला तेव्हां यादवीमुळें सरदारांची स्थिति हलाखीची झाली होती. तेव्हां त्यांस आपल्या अंकित करून टाकण्यास हेन्रीनें या संधीचा चांगलाच उपयोग करून घेण्याचें ठरविलें. सशस्त्र पुंड आपल्या पदरीं ठेवण्याची सरदारांची वहिवाट होती. सरदारांचें सामर्थ्य कमी करण्याकरितां पार्लमेंटनें असा कायदा केला कीं, सरदारांनीं पुंड बाळगूं नयेत. सरदारांस शासन करण्यास सामान्य कोर्टें उपयोगी पडणार नाहींत हें जाणून हेन्रीनें ' स्टार चेम्बर ' नांवाचें स्वतंत्र कोर्ट स्थापिलें व त्यांत आपले मंत्री न्यायाधीश नेमिले. हें कोर्ट अपराधी सरदारांस जबर दंड ठोठावी, त्यामुळें सरदार आयतेच दुर्बल झाले व राजाचा खजिना समृद्ध झाला. सरदारांस वचक बसवून देशांत शांतता प्रस्थापित करण्यास हेन्रीस हें कोर्ट चांगलें उपयोगीं पडलें. पुंडांविरुद्ध केलेला कायदा हेन्रीनें कडक रीतीनें अमलांत आणिला. एकदां हेन्रीचा सन्मान करण्यासाठीं हेन्रीच्या मर्जींतील सरदार ऑक्सफर्डचा अर्ल यानें आपले पुंड दुतर्फा उभे केले. त्या प्रसंगीं हेन्री बोलला, " तुम्हीं केलेल्या सन्मानाबद्दल मी तुमचा आभारी आहें; परंतु माझे कायदे माझ्यासमोर मोडले जातात हें पाहून मला खेद होतो. " ऑक्सफर्डच्या अर्लला या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल दहा हजार पौंड दंड भरावा लागला. यापूर्वीं कोणाही सरदाराला आपली मालमत्ता विकतां येत नसे. हेन्रीनें ती विकण्यास परवानगी दिली. त्यामुळें पुष्कळ सरदारांच्या जमिनी श्रीमंत व्यापाऱ्यांनीं घेतल्या. त्यामुळें जुन्या सरदारांची जूट फुटली. त्याचप्रमाणें राजानें सामान्यजनतेमधील व धर्मखात्यांतील चलाख माणसांस आपले

सल्लागार अधिकारी नेमिले. त्यामुळें सरदारांच्या राजकीय वर्चस्वास जबर धक्का बसला.

५. **द्रव्यसंचय**. यादवींत बरींच सरदारघराणीं नष्ट झालीं होतीं, व पुष्कळ सरदार नव्यानेंच आपल्या मालमत्तेचा उपभोग घेऊं लागले होते. ज्या सरदारांजवळ निश्चित वारशाचीं हक्कपत्रें (Title deeds) नव्हतीं, त्यांच्या जमिनी हेन्रीनें जप्त केल्या व अशा रीतीनें राजाचें खाजगी उत्पन्न खूप वाढविलें. हेन्रीनें प्रजाजनांपासून नजराणे (Benevolences, बेनिव्होलन्सेस) घेण्याची वहिवाट चालू केली. लोकांपासून द्रव्य मिळविण्याच्या कामीं आर्चबिशप मॉर्टन, एम्मसन व डड्ले या तिघांचा त्याला फार उपयोग झाला. लोकांपासून पैसा मिळविण्यास मॉर्टन एक खाशी युक्ति अंमलांत आणीत असे. एखाद्याची रहाणी चैनीची असली तर आपली चैन कमी करून राजास देणगी देण्यास तुम्हांस कांहींच हरकत नाहीं असें त्यास कळविण्यांत येई. बरें, रहाणी गरिबीची असली तर तो म्हणे, "तुम्ही गरिबीनें रहातां, तेव्हां तुम्ही शिल्लक टाकीत असलांच पाहिजे, तींतून देणगी द्या म्हणजे झालें." हीच कारवाई 'मॉनर्टचा कांटा,' (Morton's Fork) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. अशा रीतीनें पैसा जमविल्यामुळें व कांटकसरीमुळें राजाचा खजिना नेहमीं भरलेला असे व त्याला पार्लमेंट बोलाविण्याची मुळींच जरूर राहिली नाहीं.

६. **परराष्ट्रांशीं सख्य**. परराष्ट्रांशीं सख्य जोडण्याचें धोरणही हेन्रीनें मोठ्या चतुराईनें अंमलांत आणिलें. फ्लँडर्स (हल्लींचे बेलजियम) शीं इंग्लंडचा लोंकरीचा व्यापार चाले. तो देश जर्मन बादशहाच्या ताब्यांत होता. हेन्रीनें बादशहाशीं तह करून व्यापार निर्वेध चालेल अशी व्यवस्था केली (१४९६). हा तह फार लोकप्रिय झाला. हेन्रीनें लग्नसंबंध जोडून प्रमुख राष्ट्रांशीं सख्य केलें. त्यानें आपली मुलगी मार्गरेट हिचा स्कॉटलंडचा राजा चौथा जेम्स याशीं विवाह लावून दिला

( १५०२ ). पुढें शंभर वर्षांनीं याच मार्गरेटचा पणतू पहिला जेम्स या पदवीनें इंग्लंड व स्कॉटलंड या संयुक्त देशाचा राजा झाला. तसेंच स्पेनचा राजा फर्डिनंड याची मुलगी क्याथराइन हिचा आपला वडील मुलगा ऑर्थर याशीं विवाह लावून हेन्रीनें तीस आपली सून करून घेतलें (१५०१ ). पण ऑर्थर लवकरच वारला ( १५०२ ). तेव्हां स्पेनशीं सख्य कायम ठेवण्याच्या हेतूनें आपला धाकटा मुलगा हेन्री-हाच पुढें आठवा हेन्री झाला—याशीं त्याच्या विधवा भावजयीचें लग्न ठरविलें. त्यास धर्माची हरकत होती. परंतु पोपकडून खास परवानगी आणून सातव्या हेन्रीनें हें लग्न निश्चित केलें.

७. **आयर्लंड, पॉयनिंग्जचे कायदे.** दुसऱ्या हेन्रीनें आयर्लंड जिंकिलें ( ११७१ ). परंतु पुढें त्या बेटाच्या बऱ्याच भागाचें स्वातंत्र्य तसेंच कायम राहिलें. बऱ्याच नॉर्मनांनीं आयर्लंडांत वसाहती केल्या होत्या; परंतु भाषा, धर्म, रीतिरिवाज या सर्व बाबतींत त्यांनीं आयरिश लोकांचें अनुकरण केलें, व इंग्लंडविषयीं त्यांच्या ठिकाणीं कांहींच ममत्व राहिलें नाहीं. मात्र पूर्व किनाऱ्यावरील थोड्या प्रदेशांत इंग्रजी अंमल चालत होता. इतिहासांत या प्रदेशास दी पेल ( The Pale ) हें नांव पडलें आहे. डब्लिन शहरीं लंडनप्रमाणेंच एक पार्लमेंट भरत असून तींत प्रतिनिधि येत. सिम्नेल व वॉर्बेक या तोतयांच्या बंडांस आयरिश लोकांनीं मदत केली, यास्तव आपला अंमल दृढ करण्यासाठीं हेन्रीनें सर एडवर्ड पॉयनिंग्ज याची आयर्लंडच्या लॉर्ड डेप्युटीच्या जागीं नेमणूक केली. त्यानें आयरिश पार्लमेंटमध्यें दोन कायदे पास करून घेतले (१४९४). १ इंग्लंडांत चालू असलेले सर्व कायदे आयर्लंडला लागू आहेत. २ इंग्लंडच्या राजाची मंजुरी मिळविल्याशिवाय आयरिश पार्लमेंटनें कोणताही कायदा पास करूं नये. या कायद्यांनीं आयरिश पार्लमेंट हें इंग्लंडच्या राजाच्या हातांतील बाहुलें बनलें.

८. **सातव्या हेन्रीचा मृत्यु.** कांहीं कांहीं माल परदेशी जहाजांतून यावयाचा तो स्वदेशी जहाजांतूनच आणिला पाहिजे, असा कायदा करून इंग्लिश नौकानयनास व व्यापारास हेन्रीनें उत्तेजन दिलें. त्याचप्रमाणें हेन्रीनें क्याबट (व्हेनिशियन) या पितापुत्रास मदत देऊन सफरीवर पाठविलें, व त्यांनीं उत्तर अमेरिकेचा शोध लाविला. पुढें उत्तर अमेरिकेंत वसाहती करण्याचा अधिकार इंग्रजांस मिळाला, त्याचें मूळ ही मदत होय. हेन्री १५०९मध्यें मरण पावला. तो धूर्त, कर्तृत्ववान्, व धोरणी होता. त्यानें जोरदार, संपत्तिमान् व अनियंत्रित राजसत्तेची इंग्लंडांत स्थापना केली. लवकरच देशांत शांतता नांदूं लागली व परदेशांशीं व्यापार निर्वेधपणें चालू झाला; त्यामुळें इंग्लंडांत मध्यमवर्गाचा उदय होण्यास उत्कृष्ट परिस्थिति निर्माण झाली.

---

## १०. वुल्झीची कर्तबगारी.

१. **आठवा हेन्री.** सातव्या हेन्रीच्या मागून त्याचा मुलगा आठवा हेन्री हा गादीवर बसला (१५०९). त्या वेळीं तो अवघा अठरा वर्षांचा असून स्वरूपानें देखणा, मनाचा मोकळा व हौशी असल्यामुळें तात्काळ लोकप्रिय झाला. त्याच्या कंजूष बापानें जमविलेली सर्व पुंजी त्यानें दोन वर्षांतच नाच, रंग, लष्करी खेळ इत्यादींत उडवून टाकली. गादीवर येतांच त्यानें क्याथराइनशीं आपलें लग्न उरकून घेतलें.

२. **वुल्झीचा उत्कर्ष.** आठवा हेन्री गादीवर आल्यावर लवकरच थॉमस वुल्झी नांवाचा एक कर्तबगार पुरुष त्याचा मुख्य सल्लागार झाला. वुल्झी हा एका व्यापाऱ्याचा मुलगा असून त्याचा जन्म

१४७१त झाला. त्याची बुद्धि तीव्र व स्वभाव अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. तो वयाच्या चौदाव्या वर्षीं ऑक्सफर्ड विद्यालयाचा पदवीधर झाला. पुढें त्याची बुद्धिमत्ता आठव्या हेन्रीच्या नजरेस आल्यावरून त्यानें त्याला आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें. १५१४त तो मुख्य मंत्री झाला. पोपनें त्याला +कार्डिनल पदवी दिली; आणि नंतर लवकरच त्याला आपला इंग्लंडांतील प्रतिनिधि ( Papal legate, पेपल लेगेट ) नेमिलें. अशा रीतीनें राजकीय व धार्मिक मुख्याधिकार वुल्झीच्या हातीं आला. यापुढें राजाची सत्ता दृढ करावयाची, परदरबारीं इंग्लंडचें वजन वाढवावयाचें, धर्मगुरूंच्या शिक्षणाची सोय करून धर्मखात्यांत सुधारणा घडवून आणावयाची, व जमल्यास स्वतः पोप बनावयाचें असें त्याचें चतुरंग धोरण होतें. इतक्या झपाटयानें वुल्झी योग्यतेस चढला, त्यामुळें त्याचा स्वभाव अरेरावी बनला. तो हलक्या कुळांत जन्मला असल्यामुळें सरदारांचा त्याच्यावर दांत होता. वुल्झी विद्येचा मोठा भोक्ता असून होतकरू विद्यार्थ्यांस त्याच्यापासून कधींच विन्मुख जावें लागलें नाहीं.

३. **फ्रान्सशीं युद्ध**. त्या काळीं फ्रान्सचे राजे महत्त्वाकांक्षी होते, व इटलींत मुलूख जिंकण्याची त्यांची एकसारखी खटपट चालू असे. तेव्हां हेन्रीचा सासरा स्पेनचा राजा फर्डिनंड, पोप व जर्मन बादशहा यांनीं फ्रान्सविरुद्ध 'पवित्र संघ' स्थापिला ( १५११ ). आपल्या सासऱ्यास मदत करण्याकरितां हेन्रीनें १५१२–१३ त फ्रान्सवर मोठ्या खर्चाच्या पण निष्फळ स्वाऱ्या केल्या. इकडे फ्रान्सशीं गिनिगेट येथें लढाई करण्यांत हेन्री गुंतला आहे असें पाहून नेहमींप्रमाणें स्कॉटिश राजानें इंग्लंडवर चाल केली. पण फ्लॉडन-

---

+ ही धर्मखात्यांत मोठ्या मानाची पदवी असून कार्डिनलांच्या संघास पोपची निवडणूक करण्याचा अधिकार असतो.

फील्ड येथें लढाई होऊन तींत स्कॉटलंडचा राजा हेन्रीचा मेहुणा चौथा जेम्स हा मारला गेला. गिनिगेटच्या लढाईच्या वेळीं आपला सासरा आपली कांहींच फिकीर करीत नाहीं हें हेन्रीस प्रत्यक्ष दिसून आलें, व त्यानें फ्रान्सशीं तह करण्याचें ठरविलें ( १५१४ ).

**४. सत्तेचा समतोलपणा.** या सुमारास फ्रान्स, इंग्लंड व स्पेन हीं राष्ट्रें युरोपांत प्रसिद्ध होतीं. कोणतेंही एक राष्ट्र डोईजड होऊं नये, सत्तेचा समतोलपणा ( Balance of Power ) कायम रहावा या तत्त्वाचा एव्हांपासून युरोपियन राजकारणांत उपक्रम झाला; स्पेन व फ्रान्स या दोघांपैकीं कोणीही एक डोईजड होऊं नये म्हणून जो युद्ध करील त्याच्या विरुद्ध पक्षास आपण मिळूं अशी वुल्झीनें त्या दोघांस भीति घातली. त्यामुळें इंग्लंड प्रतिपक्षास मिळूं नये म्हणून तीं दोन्ही राष्ट्रें स्वस्थ राहिलीं व कित्येक वर्षेंपर्यंत त्या दोघांमध्यें लढाई झाली नाहीं. अशा रीतीनें परराष्ट्रीय राजकारणांत इंग्लंडास महत्त्व प्राप्त झालें. शेवटीं जेव्हां स्पेनचा राजा चार्लस जर्मन बादशहा झाला ( १५१९ ), तेव्हां फ्रान्स व स्पेन यांजमधील चुरस अधिकच वाढली व हेन्रीस आपल्या बाजूस मिळवून घेण्यासाठीं दोघांनींही जोराची खटपट चालविली. फ्रान्सचा राजा फ्रान्सिस यानें हेन्रीस फ्रान्समध्यें पाचारण करून नेलें व त्याची मोठ्या समारंभानें भेट घेतली ( १५२० ). या प्रसंगीं अतिशय थाट करण्यांत आला होता; त्यावरून भेटीची जागा सुवर्णवस्त्रभूमि ( Field of the Cloth of Gold ) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. पुढें थोड्याच दिवसांनीं हेन्री इंग्लंडांत परत जाण्यापूर्वीं चार्लसनें फ्रान्समध्येंच त्याची गांठ घेतली. हेन्रीची बायको क्याथराइन ही चार्लसची मावशी होती; शिवाय फ्लँडर्स या प्रांताशीं इंग्लंडचा लोंकरीचा व्यापार चालत असे, तो प्रांतही चार्लसच्या ताब्यांत होता. तेव्हां या दोन कारणांचा जोर होऊन हेन्रीनें चार्लसची

बाजू धरिली. चार्लसच्या मदतीकरितां हेन्रीनें १५२२त फ्रान्सवर स्वारी केली. स्वारीच्या खर्चाकरितां वुल्झीनें पार्लमेंटकडून पैशाची मंजूरी मिळविली, व धनिकांकडून सक्तीच्या खुषीनें देणग्या मिळविल्या. पुढें १५२५त चार्लसनें फ्रान्सिसवर इटलीमध्यें पाव्हिया येथें मोठा जय संपादन केला. त्यामुळें चार्लसचें पारडें इतकें जड झालें कीं, हेन्रीनें त्याची बाजू सोडून त्यास डोईजड न होऊं देण्याकरितां फ्रान्सिसला मदत केली व त्याला चार्लसच्यां कैदेंतून सोडविलें. युद्धांत पैसा खर्च होऊन लाभ मात्र कांहींच झाला नाहीं. जबर कर बसल्याकारणानें सर्वांस वुल्झी अगदीं नकोसा झाला. यापुढें तर हेन्रीचा आपमतलबीपणा वुल्झीस चांगलाच भोंवला.

५. **वुल्झीचा अंत.** हेन्रीस क्याथराइनपासून बरींच मुलें झालीं, पण मेरी नांवाच्या मुलीखेरीज सर्व मुलें लहानपणींच वारलीं. आपल्याला मुलगा नाहीं हें पाहून हेन्रीचें मन उदास झालें. तशांत क्याथराइन त्याच्या मनांतून कायमची उतरण्यास एक कारण घडून आलें. ॲन बुलीन नांवाच्या एका देखण्या स्त्रीवर हेन्रीचें प्रेम बसलें. तेव्हां क्याथराइनबरोबर झालेलें आपलें लग्न धर्मविरुद्ध असल्यानें रद्द आहे असें मान्य करण्याविषयीं हेन्रीनें पोपला विनंति केली. पोप सातवा क्लेमंट याजकडून लग्न बेकायदेशीर असल्याचा ठराव करून घेण्याबद्दल वुल्झी खूप झटूं लागला. परंतु जर्मन बादशहा पांचवा चार्लस याची क्याथराइन मावशी होती; नुक्तेंच पांचव्या चार्लसनें पोपवर मोठा जय मिळवून त्याला कैदेंत घातलें होतें, व इटलीवर आपलें प्रभुत्व स्थापिलें होतें. तेव्हां 'स्पेनचा राजा व जर्मनीचा बादशहा' चार्लस याला नाखूष करणें पोपला शक्य नव्हतें; म्हणून तो विवाह रद्द ठरविण्यास अळंटळं करूं लागला. इकडे ॲन बुलीनशीं व्हावयाचें लग्न लांबणीवर पडल्यामुळें हेन्री वुल्झीवर फार रागावला. राजाच्या संमतीखेरीज पोपचे हुकूम इंग्लंडांत आणणें बेकायदेशीर

आहे असें ठरविणारा ‘ प्रेम्युनायरचा कायदा ’ म्हणून एक जुना कायदा होता. पेपल लेगेट बनून वुल्झीनें हा कायदा मोडला असा आरोप त्याच्यावर लादून हेन्रीनें चॅन्सेलरची जागा ( मुख्य मंत्री ) त्याच्याकडून काढिली व यॉर्कच्या आर्चबिशपच्या मूळच्या जागीं त्यास परत पाठविलें ( १५२९ ). पुढें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप लादण्यांत आला व लोक त्याला लंडनला पकडून आणीत असतां वाटेंत लीस्टर येथें मुक्काम होता, तेथेंच त्याचा अंत झाला. त्याचे शेवटचे उद्गार खालीलप्रमाणें होते. “ मी या राजाची जितक्या निष्ठेनें सेवा केली तितक्या निष्ठेनें मीं जर ईश्वराची सेवा केली असती तर त्यानें माझ्या वृद्धापकाळीं मला अशा रीतीनें अंतर दिलें नसतें ! ” (१५३०). वुल्झीच्या परराष्ट्रीय धोरणामुळें परदरबारीं इंग्लंडचें वजन खूप वाढलें व आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीचा प्रथमार्ध उज्वल झाला.

---

## ११. राजा धर्माचा मुख्य झाला.

**१. धर्मसुधारणेचीं कारणें.** आठवा हेन्री गादीवर आला, त्यानंतर थोड्याच वर्षांनीं जर्मनींत धर्मसुधारणेची एक नवीनच चळवळ सुरू झाली. सोळाव्या शतकाच्या आरंभीं झालेले धर्मगुरूंचे मुख्य असे जे रोममधील पोप त्यांच्या ठिकाणीं धर्मनिष्ठेचा अभाव झाला होता. त्यांचें आचरण धर्मभ्रष्ट व नीतिबाह्य असे. अशा वेळीं विद्येच्या पुनरुज्जीवनामुळें लोक जुन्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ वाचूं लागले. लोकांमध्यें स्वतंत्र विचार करण्याची बुद्धि उत्पन्न झाली, व छापण्याची कला निघाल्यामुळें मूळ बायबलचें सर्वत्र अध्ययन होऊं लागलें. त्यामुळें धर्मगुरूंवर विश्वास ठेवून त्यांच्या उपदेशा-

प्रमाणें चालण्यापेक्षां स्वतः बायबल वाचून व स्वतंत्र विचार करून धर्मज्ञान मिळवावें व आपलें आचरण शुद्ध करावें असें पुष्कळ समंजस लोक म्हणूं लागले. इंग्लंडमध्यें इरॅस्मस, थॉमस मूर, व कॉलेट या पंडितांनीं प्रचलित धर्ममतांतील व धर्मगुरूंच्या आचरणांतील दोष दाखविले व मूळ ग्रीक भाषेंतील बायबलचा आधार घेऊन धार्मिक बाबतींत सुधारणा करण्याची जरूरी लोकांच्या प्रत्ययास आणिली. अशा रीतीनें धर्मसुधारणेची भूमिका तयार झाली. याच सुमारास मार्टिन ल्यूथर हा तेजस्वी धर्मवीर जर्मनींत पुढें आला. ल्यूथर हा जर्मनींतील सॅक्सनी प्रांतांत विटेनबर्गच्या विश्वविद्यालयांत तत्त्वज्ञानाचा पंडित असून ऑगस्टिन पंथाचा अनुयायी होता. बायबल हाच ख्रिस्ती धर्माचा प्रमाणभूत ग्रंथ असून येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याच्या उपदेशाप्रमाणें वागण्यानेंच पापाचें निरसन होतें, इतर कशानें होत नाहीं, असें त्याचें ठाम मत होतें.

२. **धर्मसुधारणेस सुरुवात**. अकराव्या शतकांत ख्रिस्त्यांची पवित्र भूमि जरुसलेम तुर्कांच्या तावडींतून सोडविण्याकरितां धर्मयुद्धें सुरू झालीं होतीं. त्या वेळीं पोपनें पापमुक्ततेचे पास (Indulgences) विकण्याची पद्धति पहिल्यानें सुरू केली होती. आतां ल्यूथरच्या वेळीं रोम येथें सेंट पीटरचें देऊळ बांधण्याचें काम चालू होतें. त्या कामासाठीं पैसा जमविण्याकरितां पोप दहावा लिओ यानें असेच पापमुक्ततेचे पास विकण्यास काढिले. केवळ पास विकत घेतल्यानें पापापासून मुक्त होणें शक्य नाहीं, पापाचें निरसन होण्यास व्यक्तीस खराखुरा पश्चात्ताप झाला पाहिजे असें ल्यूथरचें मत होतें. म्हणून त्यानें त्या पासांचा जाहीररीतीनें निषेध केला (१५१७). तेव्हां युरोपांत जिकडे तिकडे खळबळ उडाली. पोपची आज्ञा मोडल्याबद्दल ल्यूथरला जाब विचारण्यांत आला; तेव्हां त्यानें "बायबलची आज्ञा मला मान्य आहे, इतर कोणाची आज्ञा मला मान्य

नाहीं," असा खडखडीत जबाब दिला. त्यावर पोपनें त्याच्यावर बहिष्कार घातल्याचें जाहीर केलें. पण ल्यूथर कांहीं तेवढयानें डगमगला नाहीं. त्यानें पोपच्या बहिष्कार-पत्राची एक प्रत उघडरीतीनें भर चव्हाटयावर जाळून टाकिली ( २० डिसेंबर १५२० ). पुढें पोपच्या अनुयायांनीं एक धर्मसभा भरवून धार्मिक बाबतींत पोप मुख्य असून पूर्वींचे आचार सर्वांनीं पाळावे असें जाहीर केलें ( १५२९ ). धर्मसभेच्या या ठरावाचा ल्यूथरच्या अनुयायांनीं निषेध केला म्हणून त्या वेळेपासून त्यांना प्रॉटेस्टंट (निषेध करणारे) असें नांव पडलें. अशा रीतीनें ल्यूथर व त्याचे अनुयायी यांनीं पोपची सत्ता झुगारून दिली, तेव्हां युरोपांत धर्मसुधारणेची चळवळ ( The Reformation, दी रेफर्मेशन ) चोहोंकडे जोरानें सुरू झाली.

३. **विवाह-रद्दी व पोपपासून फूट.** आठवा हेन्री विद्वान् होता. ल्यूथरनें पोपचें बहिष्कारपत्र जाळल्याचें जेव्हां त्याला कळलें तेव्हां त्यानें पोपच्या सत्तेच्या मंडनार्थ लॅटिन भाषेंत एक चोपडें लिहिलें ( १५२१ ). या कामगिरीबद्दल पोपनें त्याला धर्मसंरक्षक ( Defender of the Faith ) ही पदवी दिली. ती इंग्लंडच्या राजांच्या बिरुदावळींत व नाण्यावर अद्याप दिसून येते. अशा रीतीनें हेन्रीनें पोपची तळी उचलून धरिली खरी; परंतु पुढें लवकरच मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें क्याथराइनशीं झालेलें लग्न त्याला रद्द ठरवावयाचें होतें, त्यास पोप परवानगी देईना. म्हणून तो पोपवर अत्यंत रागावला. पोपची खोड कशी मोडावी हें हेन्रीस एकदम सुचलें नाहीं व त्याच्यावरील राग त्यानें आपला एकनिष्ठ सेवक वुल्झी याजवर काढिला. पुढें इंग्लंडांतील धर्मखातें व पार्लमेंट यांच्या मदतीनें पोपच्या सत्तेचें इंग्लंडांतून उच्चाटन करण्याचा हेन्रीनें व्यूह रचिला. प्रथम त्यानें धर्मगुरूंकडून राजाच धर्मखात्याचा मुख्य आहे अशी कबुली घेतली ( १५३१ ). पुढें क्यान्टर्बरीचा आर्चबिशप

2802

क्रॅन्मर यानें विवाह रद्द करण्याचा प्रश्न आपल्या धार्मिक कोर्टापुढें घेऊन क्याथराइनशीं झालेला विवाह रद्द आहे असा निकाल दिला ( १५३३ मे ). पुढील वर्षीं पार्लमेंटानें सर्व धार्मिक बाबतींत राजाच मुख्य आहे असा ठराव केला व पोपची सत्ता अजीबात झुगारून दिली ( १५३४ ). नंतर धार्मिक बाबतींतील राजाचें मुख्यत्व आपल्याला मान्य असल्याची शपथ प्रत्येक प्रजाजनानें घ्यावी असा हेन्रीनें हुकूम काढिला. 'यूटोपिया' ग्रंथाचा कर्ता थॉमस मूर या विद्वान् व सच्छील गृहस्थाची वुल्झीनंतर चॅन्सेलरच्या जागीं नेमणूक झाली होती; परंतु लवकरच कंटाळून त्यानें त्या जागेचा राजीनामा दिला होता. त्याला पोपची सत्ता झुगारून देणें मान्य नव्हतें. म्हणून त्यानें शपथ घेण्याचें नाकारिलें. तेव्हां त्याला राजद्रोहाच्या आरोपावरून फांशीं देण्यांत आलें. आणखी कांहीं लोकांना अशाच भयंकर शिक्षा झाल्या. आतां पोपची सत्ता इंग्लंडांतून नाहींशी झाली. हेन्रीनें आपल्या कारकीर्दीचीं पुढील वर्षें इंग्लंडांतून पोपच्या सत्तेचें पुरतें निर्मूलन करण्यांत खर्च केलीं. या क्रान्तीचा एक महत्त्वाचा परिणाम ताबडतोब झाला. आर्चबिशप क्रॅन्मर यानें बायबलचें एक सुंदर इंग्रजी भाषांतर केलें व त्याच्या प्रती प्रत्येक गांवच्या प्रार्थनामंदिरांतून ठेवण्यांत आल्या. अशा रीतीनें राजाची खाजगी गरज भागविण्याकरितां इंग्लंडांतून पोपच्या सत्तेचें उच्चाटन झालें व देशांत धर्मसुधारणेचा प्रारंभ होण्यास सवड मिळाली.

४. **मठांचा विध्वंस.** इंग्लंडांतील मठ श्रीमंत असून त्यांतील जोगी व जोगिणी यांची पोपबद्दल फार आदरबुद्धि होती. तेव्हां मठांचा नाश करण्याचें हेन्रीनें ठरविलें. प्रथम मठ हीं अनीतीचीं माहेरघरें बनलीं आहेत असें त्यानें जाहीर केलें. नंतर पार्लमेंटनें मठजप्तीचे कायदे पास केले. सन १५३६त लहान मठांच्या व १५३९त मोठ्या मठांच्या जिंदगीची जप्ती झाली. हेन्रीनें त्यांच्या जप्त केलेल्या

जमिनीच्या उत्पन्नांतून कांहीं ठिकाणीं शाळा, दवाखाने व धर्मसभा स्थापन केल्या. कांहीं द्रव्य नवीन लढाऊ जहाजें बांधण्यांत, तोफा ओतण्यांत व समुद्र किनाऱ्यावर तटबंदी करून परचक्रापासून देश सुरक्षित करण्यांत खर्च झालें. बाकीच्या उत्पन्नांतून नवीन सरदारवर्ग निर्माण करण्यांत आला. मठविध्वंसामुळें ज्यांच्या पोटावर पाय आला ते लोक असंतुष्ट होऊन बंडास प्रवृत्त झाले. उत्तरेकडे यॉर्क परगण्यांत एक मोठें बंड उद्भवलें. मठ पुनः स्थापावे अशी मागणी करून मठवाले लंडनवर चाल करून येऊं लागले. अग्रभागीं क्रॉस घेऊन धर्मगुरु चालले होते म्हणून या बंडाला धार्मिक यात्रा ( Pilgrimage of Grace ) म्हणतात. या बंडाचा मोड तेव्हांच झाला ( १५३७ ).

५. **हेन्रीचीं लग्नें.** हेन्री अतिशय लहरी असे व आपल्या मनाविरुद्ध जाईल त्याचा नाश करण्यास त्यास मुळींच दिक्कत वाटत नसे. ॲन बुलीनपासून हेन्रीस एलिझबेथ ही मुलगी झाली; पण ॲन बुलीनवर राजाचें प्रेम फार काळ टिकलें नाहीं. त्यानें पातिव्रत्यभंगाच्या आरोपावरून ॲनला फांशीं दिलें. हेन्रीनें दुसरेच दिवशीं जेन सीमूर या स्त्रीशीं लग्न लाविलें ( २० मे १५३६ ). लवकरच सीमूरला एडवर्ड हा मुलगा झाला व पुढें ती वारली ( १५३७ ). यापुढें हेन्रीनें आणखीं तीन लग्नें केलीं. वुल्झीनंतर थॉमस क्रॉम्वेल हा हेन्रीचा मुख्य कारभारी होता. मठजप्तीच्या कामीं हेन्रीस क्रॉम्वेलचा चांगला उपयोग झाला होता. परंतु चौथ्या लग्नाचे वेळीं क्रॉम्वेलनें ठरविलेली ॲन ऑफ क्लीव्ह्ज ही जर्मन स्त्री हेन्रीस पसंत पडली नाहीं. लागलीच राजद्रोहाच्या आरोपावरून क्रॉम्वेलला फांशीं देण्यांत आलें ( १५४० ). अशा रीतीनें आठव्या हेन्रीचे मंत्री व स्त्रिया यांस त्याचा 'राक्षसी स्वार्थ' चांगलाच भोंवला. पार्लमेंटनें राजाच्या वटहुकुमास पार्लमेंटच्या कायद्याप्रमाणें मान द्यावा असा कायदा केला ( १५३९ ); त्याचप्रमाणें राज्याचा वारसा ठरविण्याचा

हक्क राजास देऊन टाकिला. अशा रीतीनें नमून वागल्यामुळें पार्लमेंटचें अस्तित्व कायम राहिलें.

६. **आयर्लंडचा राजा.** इंग्लंडखेरीज ब्रिटिश बेटांच्या इतर भागांतही आपली सत्ता दृढमूल करण्याचा आठव्या हेन्रीनें प्रयत्न केला व त्यांत त्यास बरेंच यश आलें. त्यानें वेल्स व आयर्लंड यांना आपल्या चांगलेंच कब्जांत आणिलें. वेल्स प्रांतांतील जुनी पद्धति मोडून हेन्रीनें त्याचे परगणे पाडिले, इंग्लंडचे कायदे त्यांना लागू केले, व इंग्लंडांमधील पार्लमेंटास सभासद पाठविण्याचा त्यांना अधिकार दिला ( १५३६ ). आयर्लंडमध्यें प्रत्यक्ष इंग्रजांच्या अंमलाखालच्या मुलुखांत [ पेलमध्यें ] हेन्रीनें आपली पूर्ण सत्ता स्थापिली. आतांपर्यंत इंग्लंडच्या राजास ‘ आयर्लंडचा लॉर्ड ’ हा किताब असे; तो बदलून ‘ आयर्लंडचा राजा ’ ही पदवी हेन्रीनें घेतली.

७. **आठव्या हेन्रीचा मृत्यु.** स्कॉटलंडशींही सख्य करण्याची हेन्रीनें एक युक्ति काढिली. जेन सीमूरपासून झालेला मुलगा एडवर्ड याचें स्कॉटलंडचा मृत राजा पांचवा जेम्स याची तान्ही मुलगी स्कॉटलंडची मेरी स्टुअर्ट हिशीं लग्न करण्याचें त्यानें ठरविलें. पण स्कॉटिश लोकांच्या विरोधामुळें तें साधलें नाहीं. आठवा हेन्री १५४७त मरण पावला. त्याच्या कारकीर्दींत इंग्लिश राष्ट्राचें वजन परदरबारीं चांगलें बसलें व देशांतही राजाच धर्मखात्याचा मुख्य होऊन राजसत्ता अनियंत्रित झाली.

## १२ धर्माची उलथापालथ.

**सहावा एडवर्ड १५४७—१५५३. मेरी १५५३—१५५८.**

१ **पिंकींची लढाई.** आठव्या हेन्रीनंतर त्याचा मुलगा एडवर्ड हा सहावा एडवर्ड ही पदवी घेऊन इंग्लंडच्या गादीवर आला.

त्या वेळीं त्याचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. एडवर्ड लहान असल्यामुळें राज्याचा अधिकार हेन्रीनें केलेल्या मृत्युपत्राप्रमाणें कारभारी-मंडळाच्या हातीं देण्यांत आला. या मंडळाचा मुख्य एडवर्डचा मामा ड्यूक ऑफ सॉमर्सेट हा होता. स्काटलंडची चिमुकली राणी मेरी हिचा विवाह एडवर्डशीं व्हावा असें सॉमर्सेटास वाटत होतें. परंतु स्कॉटिश लोकांस ही गोष्ट मान्य नव्हती. तेव्हां सॉमर्सेटनें स्कॉटलंडवर स्वारी केली, व पिंकी येथें स्कॉटिश लोकांचा पराभव केला ( १५४७सप्तेंबर ). परंतु राणी मेरीला स्कॉटिश लोकांनीं फ्रान्सांत पळवून नेलें व पुढें तिचा विवाह फ्रान्सच्या राजपुत्राशीं झाला.

२. **प्रॉटेस्टंट धर्माची स्थापना.** सॉमर्सेट प्रॉटेस्टंट धर्माचा पुरस्कर्ता होता. त्यानें क्यान्टर्बरीचा आर्चबिशप क्रॅन्मर याच्या सल्ल्यानें इंग्लंडांत प्रॉटेस्टंट मत प्रस्थापित करण्याचा उद्योग आरंभिला. एक इंग्रजी प्रार्थनापुस्तक तयार करण्यांत आलें व त्याचा उपयोग धर्ममंदिरांत धर्माधिकाऱ्यांनीं केलाच पाहिजे असा कायदा पास झाला. लोकांतील भोळेपणा घालविण्यासाठीं मूर्तींचा नाश करावा व देवळाच्या खिडक्यांतील काचांवर रंगविलेलीं संतांच्या अद्भुत चरित्रांचीं चित्रेंही पार नाहींतशीं करून टाकावीं असा सरकारनें हुकूम सोडिला. धर्मगुरूंनीं ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे हा नियम काढून टाकून त्यांस गृहस्थाश्रम स्वीकारण्याची परवानगी मिळाली. क्रॉम्वेलनें धर्माचीं मुख्य तत्त्वें बेचाळीस कलमांत ग्रथित केलीं व १५५३त तीं राजाकडून 'धर्माचा पाया' म्हणून प्रसिद्ध झालीं. पुढें एलिझबेथच्या कारकीर्दींत यांपैकीं तीन कलमें गाळण्यांत आलीं व तेव्हांपासून बाकीचीं एकुणचाळीस कलमेंच धर्माचा पाया म्हणून मानण्यांत येत आहेत.

३. **बंडें.** सामान्यतः इंग्लिश जनता पुराणप्रिय होती व तिला नवीन मतें एकदम पसंत पडलीं नाहींत. चर्चमधील संपत्तीच्या

नाशामुळें तर लोक फार अस्वस्थ झाले. शिवाय लोकांत असंतोष वाढण्यास आणखीही कारणें होतीं. शेतांतील लोंकरीला धान्यापेक्षां दर चांगला येतो असें पाहून जमीनदारानीं शेतांचीं मेंढ्या चरण्याकरितां कुरणें बनविलीं. त्यामुळें शेतांतील मजुरांची संख्या कमी होऊन बेकार लोक वाढले. तेव्हां शेतांभोंवतालचीं कुंपणें मोडावयाचीं व नवीन धर्ममत मोडून काढावयाचें असा बेत करून लोक दंगे करूं लागले. नॉर्फोक परगण्यामध्यें सोळा हजार शेतकरी व मजूर यांनीं बंड उभारलें. सरकारनें बंडवाल्यांवर मोठें सैन्य पाठविलें; तेव्हां मोठ्या प्रयासानें त्यांचा मोड झाला ( १५४९). या बंडाळीचें खापर सॉमर्सेटच्या माथीं फोडण्यांत येऊन त्याला कामावरून काढून टाकण्यांत आलें. यापुढें सर्व सत्ता सॉमर्सेटचा प्रतिपक्षी ड्यूक ऑफ नॉर्दंबर्लंड ( *जॉन डड्ले ) याच्या हातीं गेली. लवकरच सॉमर्सेटवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत येऊन त्यास फांशीं देण्यांत आलें ( १५५१ ).

४. **लेडी जेन ग्रे.** नॉर्दंबर्लंड मोठा स्वार्थसाधु होता. सहावा एडवर्ड जात्या अशक्त असे. तो फार दिवस वांचणार नाहीं व त्याच्या मागून त्याची बहीण मेरी रोमन क्याथॉलिक होती ती गादीवर येईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं; तेव्हां नॉर्दंबर्लंडास अत्यंत चिंता पडली. इतक्यांत एडवर्डच्या पश्चात् आपल्या हातीं सत्ता ठेवण्याचा एक खासा उपाय त्याला सुचला. त्यानें आठव्या हेन्रीची धाकटी बहिण मेरी हिची नात ( मुलीची मुलगी ) लेडी जेन ग्रे हिचा आपल्या मुलाशीं विवाह केला व तीच एडवर्ड मागून गादीची वारस आहे असें मृत्युपत्र सहाव्या एडवर्डकडून तयार करविलें. यापुढें एडवर्डचा अंतकाल लवकरच ओढवला ( जुलै १५५३ ). त्याच्या-

* सातव्या हेन्रीचा कारभारी एडमंड डड्ले याचा मुलगा.

मागून लेडी जेन ग्रे हीस राणी करून राज्यसूत्रें आपल्याच हातीं ठेवण्यासाठीं नॉर्दबर्लंड सज्ज होता.

**५. मेरीचें राज्यारोहण.** एडवर्डच्या मृत्यूनंतर नॉर्दबर्लंडनें आपली सून लेडी जेन ग्रे हिच्या नांवानें द्वाही फिरविली व मेरीस पकडण्यासाठीं सैन्य पाठविलें. इकडे मेरीस कांहीं सरदार मिळाले व तिनें मोठ्या थाटानें राणी म्हणून लंडनांत प्रवेश केला. नॉर्दबर्लंडास एकदम फांशीं देण्यांत आलें, व लेडी जेन ग्रे नवऱ्यासह कैदेंत पडली.

**६. क्याथॉलिक धर्म, विवाह व पोप.** मेरीचा ओढा आपल्या आईप्रमाणें क्याथॉलिक मताकडे होता. तेव्हां राज्यावर येतांच प्रॉटेस्टंट पंथ हाणून पाडून क्याथॉलिक मतास तिनें पुनः पाठिंबा दिला. प्रॉटेस्टंट धर्मगुरु क्रॅन्मर, लॅटिमर, रिड्ले यांस कैदेंत टाकून गार्डिनर, बॉनर, इत्यादि क्याथॉलिक धर्मगुरूंस तिनें कामावर नेमिलें. एडवर्डच्या कारकीर्दींतील प्रार्थनापुस्तक वाचण्याची मनाई होऊन पुनः लॅटिन भाषेंत प्रार्थना होऊं लागल्या. स्पेनचा राजा व जर्मन बादशहा पांचवा चार्लस हा मेरीचा मावसभाऊ होता. तो बलाढ्य असून क्याथॉलिक पंथाचा कट्टा अभिमानी होता. त्याचा मुलगा फिलिप हा मेरीपेक्षां अकरा वर्षांनीं लहान होता. तथापि फिलिपशीं विवाह करण्याचें मेरीनें ठरविलें. हें लग्न झाल्यास इंग्लंड म्हणजे एक स्पेनचा सुभा होईल अशी भीति होती. यास्तव लग्नाचा बेह रहित करण्याबद्दल मेरीस सर्व लोकांनीं अर्जद्वारें विनंति केली. परंतु मेरीनें विवाहाचा निश्चय कायम केला. तेव्हां लोकांनीं निराशेनें खवळून बंड केलें. पण त्याचा लवकरच मोड झाला. या बंडाचें प्रायश्चित्त लेडी जेन ग्रेस भोगावें लागलें व तिचा शिरच्छेद झाला. पार्लमेंटानें विवाहास अनुमति दिली, इतकेंच नव्हे तर राजपुत्र फिलिप यास 'राजा' हा किताब सादर केला. विवाह झाल्यावर लवकरच सर्व

इंग्लंड देश पोपनें आपल्या धर्मसत्तेखालीं घेतला ( १० नोव्हेंबर १५५४ ). पुढें एक महिन्यानें १५२८पासून पोपविरुद्ध झालेले सर्व कायदे रद्द आहेत असें पार्लमेंटनें ठरविलें.

७. **धर्मच्छळ.** क्याथॉलिक पुढाऱ्यांस आपल्या धर्माची छाप इंग्लंडवर बसविण्याची आतां उत्तम संधी होती. परंतु त्यांनीं तिचा दुरुपयोग केला, व अमानुष छळ करून प्रॉटेस्टंट पंथाचें इंग्लंडांतून उच्चाटन करण्याचा त्यांनीं घाट घातला. १५५५पासून धर्मनिष्ठ प्रॉटेस्टंट लोकांस जिवंत जाळण्याचा क्याथॉलिक सरकारनें सपाटा चालविला. तो मेरीच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत सुरू होता. बिशप रिड्ले व लॅटिमर या दोघांची ऑक्सफर्ड येथें एकदम आहुती पडली. त्यांनीं धर्माकरितां मोठ्या धैर्यानें प्राणत्याग केला. प्रत्यक्ष ज्वाला निघूं लागल्यावर वृद्ध लॅटिमर रिड्लेस म्हणाला, " मित्रा, आज आपण अशी ज्योत पेटवूं कीं ती केव्हांही विझविली जाणार नाहीं. " नंतर ते दोघे ज्वालांत अदृश्य झाले. आर्चबिशप क्रॅन्मर यास ' तुम्ही आपलें मत बदला, म्हणजे तुम्हांस जीवदान देऊं ' अशी क्याथॉलिक पुढाऱ्यांनीं आशा लाविली. क्रॅन्मर आतां वयोवृद्ध झाला असून तुरुंगांतील यातनाही त्याला असह्य झाल्या होत्या. त्यामुळें त्याचें मन क्षणमात्र कचरलें व माफीपत्रावर त्यानें सही केली. परंतु इतक्यांत क्याथॉलिक अधिकाऱ्यांनीं आपलें मत बदलून त्यास जाळण्याचा हुकूम केला. निराशेनें क्रॅन्मरचें धैर्य दुणावलें. चिता पेटतांच ज्या हातानें माफीपत्रावर सही केली होती, तो हात त्यानें प्रथम ज्वालेंत धरला आणि हूं कां चूं न करितां तो अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडला ( मार्च १५५६ ). तीन वर्षांच्या अवधींत सुमारें तीनशें धर्मवीर जाळले गेले. इंग्लंडची जनता धार्मिक बाबतींत उदासीन होती व राज्यकर्त्यांच्या लहरीप्रमाणें धर्मपंथांत बदल होत असत. परंतु मेरीनें केलेल्या धर्मच्छलाच्या वेळीं प्रॉटेस्टंट

धर्मवीरांनीं दाखविलेल्या निर्भयतेमुळें इंग्लिश जनतेच्या मनांत प्रॉटेस्टंट पंथाबद्दल आदर उत्पन्न झाला, व क्याथॉलिक मताबद्दल पूर्ण तिटकारा बाणला.

८. **मेरीचा मृत्यु.** स्पेनचें फ्रान्सशीं युद्ध सुरू होतें. तेव्हां मेरीनें आपल्या नवऱ्याच्या मदतीकरितां फ्रान्सशीं युद्ध पुकारलें. युद्ध चालू असतां फ्रेंच सैन्यानें क्याले बंदरास वेढा घातला व तें ठिकाण सर केलें (१५५८). १३४७पासून क्याले इंग्रजांच्या ताब्यांत असून फ्रान्सांत सैन्य व माल उतरविण्यास चांगली सोय होती. तेव्हां 'क्याले पडलें' हें ऐकून मेरीस जबर धक्का बसला, व त्याच दुःखांत ती मरण पावली (नोव्हेंबर १५५८). "माझ्या हृदयावर क्याले हीं अक्षरें कोरलेलीं आढळतील" हेच तिचे शेवटचे उद्गार होते. आईच्या विवाहरद्दीमुळें लहानपणापासून मेरीचे दिवस कष्टांत गेले होते, व तिचा स्वभाव अत्यंत तुसडा बनला होता. नवऱ्याची तिच्यावर प्रीति नव्हती व धर्मच्छळामुळें इंग्लिश जनतेचाही तिजबद्दल प्रतिकूल ग्रह होता. तिच्यामागून प्रॉटेस्टंट मताच्या छायेखालीं वाढलेली एलिझबेथ राणी होणार असल्यामुळें क्याथॉलिक मताची इतिश्री होऊन प्रॉटेस्टंट मताचा प्रचार इंग्लंडांत होणार हें बहुतेक ठरल्यासारखें होतें.

---

# १३. प्रॉटेस्टंट पंथ पक्का रुजला.

## (राष्ट्रीय धर्मास सुरुवात).

१. **एलिझबेथचा स्वभाव.** मेरीच्या मागून आठव्या हेन्रीस ॲन बुलीनपासून झालेली मुलगी एलिझबेथ गादीवर आली (१५५८). मेरीहून ती अगदीं निराळ्या स्वभावाची होती. ती आनंदी असून

अत्यंत आशावादी असे. आपल्या बापाप्रमाणेंच ती कर्तृत्ववान् असून धडाडीनें राज्य चालविण्यास लागणारे गुण तिच्याठायीं होते. राज्यकारभाराचें सूक्ष्म धोरण तिच्या ठिकाणीं असून इंग्लंडच्या भावी वैभवाची कल्पना तिला होती. ती मोठी व्यवहारकुशल असून आपला कार्यभाग साधण्यासाठीं लटपटी करण्यास मागेपुढें पहात नसे. तिला आपल्या रूपाचा गर्व होता, व आपल्या वैभवाचें प्रदर्शन करण्याची आवड होती. एकंदरीनें ती अत्यंत कर्तबगार असून तिच्या कारकीर्दींत इंग्लंड वैभवाच्या शिखरावर चढलें; त्यावरून तिला वैभवशालिनी (Gloriana) हें योग्य नांव केव्हां केव्हां दिलेलें आढळतें. वुइल्यम सेसिल व त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रॉबर्ट सेसिल हे हुशार व शांत डोक्याचे पुरुष एलिझबेथचे मुख्य मंत्री होते. इंग्लंडांतील राजसत्ता जोरदार व स्थिर करावयाची आणि परराष्ट्रांचें इंग्लंडवर मुळींच वर्चस्व चालूं द्यावयाचें नाहीं या दोन गोष्टींसाठीं ते झटत होते, या दोन्ही गोष्टी लवकरच साध्य झाल्या व एलिझबेथच्या कारकीर्दीच्या शेवटीं इंग्लिश राजसत्ता अत्यंत स्थिर झाली, व इंग्लंडचें नांव सर्व युरोपभर दुमदुमूं लागलें.

२. **राष्ट्रीय धर्माची स्थापना.** एलिझबेथ गादीवर येण्यापूर्वी इंग्लंडांत दंगल माजली होती, व राजसत्ता अगदीं खिळखिळी झाली होती. सहावा एडवर्ड व मेरी यांच्या कारकीर्दींतील धार्मिक उलथापालथीनें अनेक लोकांचें नुकसान झालें; पुष्कळांची संपत्ति गेली; कांहींना कैदेचें दुःख सहन करावें लागलें; व कित्येक निधड्या छातीच्या पुरुषांचे प्राण खर्ची पडले. या दंगलीचा इंग्रजांस कंटाळा आला होता व ते शांततेकरितां भुकेले होते. सहाव्या एडवर्डच्या वेळीं प्रॉटेस्टंट मताचा फाजील जोर होऊन देवळांच्या संपत्तीची सरकारनें लूट केली तर मेरीच्या वेळीं क्याथॉलिक मताचा अतिरेक होऊन धर्मनिष्ठ प्रॉटेस्टंटांस जाळण्यांत आलें. तेव्हां कोणत्याही

टोंकाकडे न जातां मध्यम मार्ग अनुसरणारें सरकार जनतेस हवें होतें. मेरीच्या कारकीर्दींतल्याप्रमाणें पोपचें परकीय वर्चस्व इंग्लंडच्या राजसत्तेवर चालू होणें इंग्लिश लोकांस पसंत नव्हतें. तसेंच आजपर्यंत चालत आलेले विधि व आचार सोडून देणेंही त्यांस पसंत नव्हतें. एलिझबेथनें ही जनतेची वृत्ति ओळखिली व प्रॉटेस्टंट किंवा क्याथॉलिक यापैकीं कोणत्याच मताचा अतिरेक न करितां मध्यम मार्ग काढिला. ॲन बुलीनचा विवाह पोपच्या मतें धर्मबाह्य होता, तेव्हां एलिझबेथनें क्याथॉलिक पंथ स्वीकारणें म्हणजे गादीस बेवारस ठरून मला राज्यच नको असें म्हणण्यासारखें होतें. तेव्हां तिनें प्रॉटेस्टंट धर्म हाच 'राष्ट्रीय धर्म' ( National Religion ) म्हणून चालू केला; राजा हाच धर्मखात्याचा मुख्य होय हा ठराव आठवा हेन्री व सहावा एडवर्ड यांच्या वेळेप्रमाणें पार्लमेंटकडून मान्य करून घेतला; इंग्रज क्याथॉलिक लोकांस जांचक असे कित्येक शब्द बदलून सहाव्या एडवर्डच्या वेळचें इंग्रजी प्रार्थनापुस्तक पुनः प्रचारांत आणिलें; सरकारनें घालून दिलेल्या पद्धतीनें देवळांतील प्रार्थना चालाव्यात अशासाठीं प्रार्थनेचा कायदा पास करून घेतला ( १५५९ ); आणि धार्मिक विधि व आचार यांजमध्यें फरक केले नाहींत. त्यामुळें प्रॉटेस्टंट व क्याथॉलिक हे दोघेही इंग्लिश धर्मखात्याच्या देवळांतून एकत्र प्रार्थना करूं लागले. एकंदरीनें जास्तींत जास्ती लोकांस मान्य होईल व कमींत कमी लोकांस अमान्य होईल अशी धर्मव्यवस्था एलिझबेथनें अंमलांत आणिली. इंग्रजी प्रार्थनापुस्तक व बिशपांची धर्मसत्ता हें एलिझबेथनें स्थापिलेल्या पंथाचे विशेष असून तो इंग्लिश जनतेस पटला. पुढें तोच इंग्लंडचा ' राष्ट्रीय धर्म ' बनला व अद्यापपावेतों तोच इंग्लंडांत चालू आहे. इंग्लंडच्या राष्ट्रीय धर्मांत बिशपांची व्यवस्था कायम ठेविली असल्यामुळें एपिस्कोपसी

(Episcopacy, बिशपवादी धर्मपंथ) या नांवानेंही तो प्रसिद्ध आहे.

३. **प्यूरिटन पंथ.** एलिझबेथच्या कारकीर्दींत ज्या धर्मगुरूंना जागा देण्यांत आल्या त्यांपैकीं कांहींजण मेरीच्या धर्मच्छळाच्या कारकीर्दींत हॉलंड व स्वित्झर्लंड या देशांत पळून गेले होते. तेथें जॉन क्याल्व्हिन × याच्या उपदेशानें ते प्यूरिटन (शुद्ध) अथवा जहाल प्रॉटेस्टंट बनले. त्यांना धर्मविधि अगदीं साधे असावेत व आचारनियम अगदीं थोडे असावेत असें वाटे. उदाहरणार्थ प्रार्थना चालवितांना धर्मगुरूनें पांढराच झगा घालावा या नियमाचा ते निषेध करीत. इंग्लिश धर्मखात्यानें पूर्वींचे विधि व आचार कायम ठेविले होते. अर्थातच प्यूरिटनांना हें पसंत पडलें नाहीं, व ते त्यांविरुद्ध आचरण करूं लागले. मग सरकारनें 'प्रार्थनेचा कायदा' सक्त-रीतीनें अमलांत आणिला. तेव्हां कांहीं थोडे कट्टे प्यूरिटन आपल्या गुप्त धर्मसभा भरवूं लागले, त्यांनीं राष्ट्रीय धर्माशीं आपला संबंध तोडला, व प्रचलित धर्मापासून निराळे असे जे अनेक पंथ (Dissent-ers, डिसेंटर्स) पुढें निघाले त्यांतील पहिल्या पंथाची त्यांनीं उभा-रणी केली. तथापि बहुतेक प्यूरिटन राष्ट्रीय धर्माला चिकटून राहिले.

४. **क्याथॉलिकांचा विरोध.** १५७०मध्यें पोपनें एलिझबेथला धर्मभ्रष्ट ठरविलें व राज्यभ्रष्ट करण्याचा घाट घातला. रोमन क्याथॉ-लिक धर्माचें रक्षण करण्यासाठीं स्पेनमध्यें एक जेझुइट नांवाचा

---

× क्याल्व्हिन (१५०९—१५६४) हा फ्रेंच गृहस्थ मोठा धर्म-वेत्ता असून ल्यूथरचें सुधारणेचें कार्य यानें पुढें चालविलें. धर्मविधि साधे असावेत व धर्मव्यवस्था बिशपच्या हातीं न ठेवतां लोकायत्त असावी असें याचें म्हणणें होतें. याच्या अनुयायांना क्याल्व्हिनिस्ट असें नांव असून हल्लीं प्रेस्बिटीरियन, इंडिपेंडंट व बहुतेक सर्व फ्रेंच प्रॉटेस्टंट यांचा त्यांत समावेश होतो.

पंथ निघाला होता. यापुढें युरोपियन क्याथॉलिकांनीं जेझुइट धर्मगुरूंच्या मदतीनें इंग्लंडांत क्याथॉलिक धर्माचा प्रसार करण्याची खटपट चालविली. तेव्हां राणीची सत्ता कबूल न करणाऱ्या रोमन क्याथॉलिकांची संख्या वाढूं लागली. त्यामुळें प्रस्थापित प्रॉटेस्टंट पंथाच्या संरक्षणार्थ क्याथॉलिकांवर कडक निर्बंध घालणें जरूर झालें. धर्मखात्याच्या देवळांतील प्रार्थनांस हजर न राहणारास जबर दंड ठोठावण्यांत येईल, असा कायदा झाला ( १५८१ ). शेवटीं १५८३त ' हाय कमिशन कोर्ट ' उघडण्यांत आलें. त्याच्याकडे धार्मिक कायद्यांची सक्त अंमलबजावणी करणें, धर्मगुरूंनीं प्रचलित धर्माहून इतर धर्माचा उपदेश केल्यास त्यांस शिक्षा करणें, हीं कामें होतीं. या सर्व निर्बंधांचा सुपरिणाम होऊन राष्ट्रीय धर्माची छाप नाहींशीं करण्यासाठीं क्याथॉलिकांनीं केलेले प्रयत्न विफल झाले.

५. **स्कॉटलंडची राणी मेरी.** प्रॉटेस्टंट मत स्थापून देशांत स्थिरस्थावर करीत असतां एलिझबेथला ज्या लोकांकडून अत्यंत त्रास झाला, त्यांपैकीं ' स्कॉटलंडची राणी मेरी ' ही प्रमुख होय. हिचा सहाव्या एडवर्डशीं विवाह घडवून आणण्यासाठीं खूप खटपट झाली होती. पण ती विफल होऊन एलिझबेथ गादीवर आली, त्याच सालीं मेरीचें फ्रेंच राजपुत्राशीं लग्न झालें. पुढील वर्षी मेरीचा नवरा फ्रान्सचा राजा झाला. मेरीनें एलिझबेथचा इंग्लंडच्या गादीवर कांहीं हक्क नाहीं असें सांगून स्वतः इंग्लंडच्या राजपदाचीं चिन्हें धारण केलीं व अशा रीतीनें मेरी आपणास स्कॉटलंड, फ्रान्स व इंग्लंड या तीन देशांची राणी म्हणवूं लागली. तिचा नवरा लवकरच वारला(१५६०), तेव्हां मेरी स्कॉटलंडांत गेली. तेथें×जॉन नॉक्स (१५०५–१५७२)

---

× जॉन नॉक्स हा क्याल्व्हिनचा शिष्य होता. अर्थात् तो जहाल प्रॉटेस्टंट होता. त्यानें स्थापिलेल्या प्रेस्बिटेरियन पंथांत धर्मव्यवस्था प्रेस्बि-

याच्या उपदेशावरून क्याथॉलिक मताची पिछेहाट होऊन प्रेस्बिटेरियन धर्ममत पसरलें होतें. मेरी राणी क्याथॉलिक होती. त्यामुळें स्कॉटलंडांत प्रेस्बिटीरियन व क्यथॉलिक या दोन पक्षांत एकसारखी भांडणें चालू झालीं. मेरी रागीट व अविचारी असे. तिनें स्कॉटिश लोकांच्या इच्छेविरुद्ध डार्न्ले नांवाच्या सुंदर पण मूर्ख सरदाराशीं लग्न लाविलें ( १५६५ ). डार्न्लेपासून मेरीस जेम्स हा मुलगा झाला. हाच जेम्स एलिझबेथच्या मृत्यूनंतर इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही देशांचा राजा झाला. लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं डार्न्लेनें मेरीचा सेक्रेटरी रिझिओ यास तिच्यासमक्ष ठार केलें. यापुढें मेरीचें डार्न्लेशीं मुळींच न पटून ती बॉथ्वेल नांवाच्या एका श्रीमंत सरदाराच्या सल्ल्यानें कारभार पाहूं लागली. पुढें डार्न्ले मारला गेला ( १५६७ फेब्रुवारी ). या दुष्ट कृत्यांत बॉथ्वेल सामील होता. तथापि लवकरच मेरीनें बॉथ्वेलशीं लग्न लाविलें.तेव्हां मेरीविरुद्ध स्कॉटलंडांतील लोकमत अत्यंत खवळलें. लागलीच तिला पदच्युत करण्यांत येऊन तिचा तान्हा मुलगा जेम्स यास 'सहावा जेम्स' हीं पदवी देऊन स्कॉटलंडच्या गादीवर बसविण्यांत आलें. मेरी बंदींत पडली. परंतु थोड्याच दिवसांत तिनें आपली सुटका करून घेतली व ती सैन्यासह एडिन्बरो राजधानीवर चालून गेली. परंतु लँग्साइड येथें तिचा पराभव होऊन तिला जीव बचावण्याकरितां इंग्लंडांत पळून जावें लागलें ( १५६८ ).

६. **मेरीची कैद व फांशी.** एलिझबेथनें मेरीस कैदेंत ठेविलें; मेरीचीं पुढील अठरा वर्षें इंग्लंडांत बंदींत गेलीं. ती क्याथॉलिक असून सातव्या हेन्रीची पणत ( मुलीची नात ) होती. तेव्हां प्रॉटे-

---

टरांच्या मंडळाच्या हातीं असते. प्रेस्बिटर म्हणजे 'धर्मगुरु व इतर शहाणे लोक.'

स्टंट एलिझबेथला गादीवरून पदच्युत करावयाचें किंबहुना ठार मारावयाचें व मेरीस इंग्लंडच्या गादीवर बसवावयाचें यासाठीं क्याथॉलिकांनीं अनेक भयंकर कट केले. पोप एलिझबेथला पदच्युत करून मेरीस राणी करण्यासाठीं क्याथॉलिकांस एकसारखी भर देत होता. परंतु सुदैवानें क्याथॉलिकांनीं केलेला कोणताच कट यशस्वी झाला नाहीं. शेवटचा कट १५८६त झाला. त्यांत सामील असल्याबद्दल मेरीवर आरोप करण्यांत आला, व तिला फांशीं देण्यांत आलें (फेब्रुवारी १५८७). मेरी हें क्याथॉलिक राष्ट्रांच्या हातांतील प्रॉटेस्टंट इंग्लंडास त्रास देण्याचें एक हत्यार होऊन बसलें होतें; त्यामुळें तिचा अंत झाला तेव्हां एलिझबेथ व इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट पंथ हीं एका मोठया संकटांतून निभावलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## १४. समुद्रावर इंग्लंडचा जयजयकार !!

**१. बलाढ्य स्पेन.** सोळाव्या शतकांत स्पेन हें बलाढ्य राष्ट्र होतें. स्पेनच्या ताब्यांत नेदर्लँड्स व इटलींतील बराच मुलूख होता. त्याचप्रमाणें वेस्ट इंडीज बेटें व अमेरिका हीं स्पेनच्या ताब्यांत असून तेथील सोन्यारुप्याच्या खाणींमुळें स्पेनमध्यें संपत्तीचा धूर निघत होता. स्पेनचें सैन्य व आरमार जय्यत असून राजा फिलिप हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता; व युरोपमध्यें अत्यंत बलाढ्य राष्ट्र म्हणून स्पेनची गणना होती. फिलिप क्याथॉलिक असून आपल्याला क्याथॉलिक पंथाचा वाली म्हणवीत असे. तेव्हां प्रॉटेस्टंट इंग्लंडचा चक्काचूर करण्यास त्यानें टपावें यांत नवल नाहीं. तथापि स्पेन व इंग्लंड यांच्या वैरास आणखीही कारणें होतीं; तीं आतां सांगावयाचीं.

**२. धाडसी इंग्रज नाविक.** कोलंबसानें अमेरिकेचा शोध लाविला व व्हास्को ड गामा यानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढिला, तेव्हांपासून स्पेन व पोर्तुगाल या दोन्ही राष्ट्रांस संपत्तीची व वैभवाची खाणच सांपडल्यासारखें झालें. त्या दोघांमध्यें मालकीचे तंटे होऊं नयेत म्हणून पोप सहावा अलेक्झँडर यानें एक उत्तरदक्षिण रेषा काढून तिच्या पूर्वेकडील प्रदेश पोर्तुगालचा व पश्चिमेकडील स्पेनचा अशी वांटणी करून दिली. पुढें अमेरिकेंत सोन्यारुप्याच्या खाणींचा शोध लागून अमेरिकेंतून सोन्यारुप्यानें लादलेलीं गलबतें स्पेनला येऊं लागलीं. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींतच इंग्लंडांत आरमार-खात्याची स्थापना झाली होती, व इंग्रजांचें लक्ष समुद्रावरील व्यापाराकडे लागलें होतें. आतां एलिझबेथच्या कारकीर्दींत स्पेनचें वैभव पाहून धाडसी इंग्रज खलाशांचा मत्सराग्नी भडकला. 'नवीन भूमी'वर व दर्यावरील व्यापारांत आपल्याला हिस्सा मिळावा अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली व त्यांनीं अमेरिकेंतील बंदरें लुटण्याचा व स्पॅनिश गलबतांतील सोनेंरुपें उपटण्याचा सपाटा चालविला. शिवाय क्याथॉलिक स्पेनला त्रास देण्यांत आपण धर्मकृत्य साधीत आहों अशी प्रॉटेस्टंट इंग्रजांची दृढ समजूत होती, त्यामुळें समुद्रावरील लुटीचें काम त्यांच्या हातून दुप्पट जोरानें होऊं लागलें.

**३. सर जॉन हॉकिन्स व सर फ्रॅन्सिस ड्रेक.** या वेळीं सर जॉन हॉकिन्स व सर फ्रॅन्सिस ड्रेक हे दोघे धाडसी नाविक प्रसिद्धीस आले. अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतवाल्यांस शेतें व खाणी यांत काम करण्याकरितां मजुरांची जरूर असे. हॉकिन्सनें आफ्रिकेंत निग्रो जमा करावयाचे व अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतवाल्यांस विकावयाचे हा धंदा सुरू केला ( १५६२ ), व त्यावर तो खूप गब्बर झाला. अशा रीतीनें आफ्रिका व अमेरिका यांजमधील गुलामांचा व्यापार सुरू झाला व अमेरिकेंतील निग्रो गुलाम अस्तित्वांत आले. ड्रेक अत्यंत

धाडसी व समुद्रावरील लुटींच्या कामांत पटाईत होता. इ. स. १५७७ मध्यें तो दक्षिण अमेरिकेच्या खालील टोंकावरून पश्चिमेकडे गेला व पॅसिफिक किनाऱ्यावर स्पॅनिश गलबतांतून व बंदरांतून त्यानें खूप माल लुटला. पुढें सर्व पॅसिफिक महासागराचें आक्रमण करून व केप ऑफ गुड होपला वळसा घालून त्यानें पृथ्वीप्रदक्षिणा केली व निघाल्यापासून तीन वर्षांनीं प्लिमथ बंदरांत तो दाखल झाला. त्याच्या जहाजाचें नांव सुवर्णमृग (Golden Hind) हें होतें. खुद्द एलिझबेथ त्याच्या जहाजावर गेली व तिनें ड्रेकला नाइट ही पदवी दिली.

४. **फिलिपचा निश्चय.** इंग्रजांनीं स्पॅनिश वसाहतींस व व्यापारास दिलेल्या त्रासामुळें फिलिप इंग्रजांविरुद्ध जळफळूं लागला. तशांत या द्वेषांत भर पडण्यास आणखी एक कारण झालें. फिलिपच्या ताब्यांत नेदर्लंड्स हा प्रांत होता. त्या प्रांताच्या उत्तर भागांत प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार झाला. पुढें त्यांतील सात संस्थानांनीं फिलिपच्या जुलुमास कंटाळून आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें (१५७९); तेव्हां हॉलंड हें स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वांत आलें. वुइल्यम दी सायलेंट हा थोर पुरुष त्याचा पुढारी होता. यानंतर हॉलंडला पुनः स्पेनच्या अंमलाखालीं आणण्यासाठीं खटपट सुरू झाली. पुढें वुइल्यम दी सायलेंट मारला गेला (१५८४) व हॉलंड अगदीं पेंचांत आलें. अशा वेळीं एलिझबेथनें हॉलंडला सैन्य पाठविलें व स्पेनविरुद्ध उघड मदत केली. तेव्हां फिलिपच्या तळव्याची आग मस्तकास गेली. यापुढें स्कॉटलंडची राणी मेरी हिचा वध झाला. तिनें मृत्यूपूर्वीं इंग्लंडच्या गादीवरील आपला वारशाचा हक्क फिलिपला दिला होता. तेव्हां इंग्लंडची गादी हस्तगत करावयाची, तेथील प्रॉटेस्टंट धर्माचा नायनाट करावयाचा व स्पॅनिश वसाहतींच्या त्रासाचें मूळ उपटून टाकावयाचें यासाठीं इंग्लंडवर स्वारी करण्याचा फिलिपनें निश्चय

केला व एक जंगी आरमार तयार केलें (१५८७). इतक्यांत ड्रेक स्पॅनिश किनाऱ्यावरील केडिझ बंदरांत अचानक उतरला, व तेथें स्पेनचीं पुष्कळ गलबतें जाळून व बुडवून तो इंग्लंडला परत आला. या ड्रेकच्या हल्लयामुळें फिलिपची इंग्लंडवरील स्वारी एक वर्षानें लांबली.

५. **अजिंक्य आरमार.** पुढील वर्षी सर्व जुळवाजुळव झाल्यावर स्पेनचें आरमार इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां केडिझ बंदरांतून निघालें. ही आपली स्वारी हटकून यशस्वी होणार अशी फिलिपला खात्री असल्यामुळें त्यानें त्या आरमारास 'अजिंक्य आरमार' असें नांव दिलें. या आरमारावर मेडिना सायडोनिया हा श्रीमंत सरदार मुख्य होता. त्यास फिलिपचा असा हुकूम होता कीं, पहिल्यानें नेदर्लंड्सच्या किनाऱ्यावर लागावें व तेथील जंगी सैन्य आपल्यांत घेऊन मग त्या एकंदर फौजेनिशीं इंग्लंडांत जाऊन उतरावें.

६. **इंग्रजांची तयारी.** इंग्लिश आरमाराचें आधिपत्य लॉर्ड हॉवर्ड याच्याकडे असून तो क्याथॉलिक होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इंग्लिश क्याथॉलिक आपल्या बाजूस मिळतील अशी फिलिपची कल्पना होती. परंतु ही फिलिपची स्वारी म्हणजे आपल्या राष्ट्रस्वातंत्र्यावर घाला आहे व हें धार्मिक युद्ध नसून राष्ट्रीय युद्ध आहे, हें इंग्रजांनीं पक्कें ओळखिलें होतें; त्यामुळें कोणीही इंग्रज क्याथॉलिक फिलिपला मिळाला नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रॉटेस्टंट बंधूच्या खांद्याला खांदा लावून आपल्या देशरक्षणासाठीं जिवापाड लढला. हॉकिन्स व ड्रेक हे साहसी नाविक हॉवर्डच्या हाताखालीं काम करीत होते.

७. **युद्धप्रसंग.** १९ जुलै रोजीं अजिंक्य आरमार इंग्लिश खाडींत दिसूं लागलें. त्याची रचना चंद्रकोरीप्रमाणें होती. इंग्लिश जहाजें संख्येनें कमी व वजनानें किरकोळ असल्यामुळें 'अजिंक्य

आरमाराशीं ' एकदम प्रत्यक्ष लढाई करणें अशक्य होतें. तथापि कांहीं गोष्टी इंग्रजांस अनुकूल होत्या. इंग्लिश जहाजें लहान होतीं; पण तीं सुटसुटीत असल्यामुळें स्पेनच्या राक्षसी जहाजांभोंवतीं घिरट्या घालून त्यांच्यावर हल्ला करण्यास व त्यांना बेजार करण्यास सोयीचें होतें. शिवाय स्पॅनिश धुडांना लवकर वळतां येत नसल्यानें व त्यांनीं सोडिलेले तोफांचे गोळे इंग्रजांच्या डोक्यावरून पलीकडे जात असल्यामुळें इंग्रजांस पुष्कळ फायदा झाला. पहिल्यानें स्पॅनिश आरमारावर मागून हल्ले करून त्यांतील चुकलेलीं जहाजें पकडावयाचीं एवढ्यावरच इंग्रजांस संतोष मानावा लागला. शेवटीं क्याले बंदरांत तें आरमार थांबलें. मग एके रात्रीं ड्रेकनें मोठ्या धाडसानें आपलीं आग लावणारीं आठ जहाजें त्या आरमारांत पाठवून स्पॅनिश गलबतें जाळण्यास आरंभ केला. त्यामुळें स्पॅनिश कप्तानांना आगींतून बचावण्याकरितां नांगर ओढून दोरखंडें तोडून टाकणें भाग पडलें. त्यांच्यांत गोंधळ माजला, व याच वेळीं तुफानी वारा सुटल्यामुळें स्पॅनिश जहाजें एकमेकांवर आपटून त्यांचें बरेंच नुकसान झालें. दुसऱ्या दिवशीं इंग्रज व स्पॅनिश यांजमध्यें समुद्रावर जोराचा सामना झाला, त्यांत स्पेनचीं पुष्कळ जहाजें नष्ट झालीं व कित्येक खिळखिळीं झालीं. तेव्हां स्पॅनिश अधिपतीनें वाऱ्याच्या प्रतिकूलतेमुळें स्कॉटलंडला वळसा घालून स्पेनला परत जाण्याचें ठरविलें. वादळानें शेवटपर्यंत त्या आरमाराचा पिच्छा पुरविला. ठिकठिकाणच्या किनाऱ्यावर आपटून त्या आरमारांतील पुष्कळ जहाजांचा निःपात झाला. सुमारें पन्नास गलबतें व त्यांजवरील आठदहा हजार जखमी व अंथरुणास खिळलेले लोक एवढ्यांनींच काय तो स्पेनचा किनारा परत पाहिला.

**८. जयाचे परिणाम.** या युद्धांत इंग्रज प्रॉटेस्टंट व क्याथॉलिक यांनीं एक होऊन शत्रूशीं टक्कर दिली त्यामुळें इंग्लंडचा जय झाला.

हा युद्धप्रसंग इंग्लंडच्या इतिहासांत अत्यंत संस्मरणीय होय. कारण या वेळेपासून ब्रिटिश साम्राज्याचा आधारस्तंभ अशी जी इंग्लंडची नाविक सत्ता तिचा उदय झाला. अर्थातच या विजयानें इंग्लंडचे अनेक फायदे झाले. देशांतील प्रस्थापित प्रॉटेस्टंट धर्माचा बचाव झाला. इंग्लंडच्या समुद्रावरील व्यापारास जोरानें सुरुवात झाली. लवकरच हिंदुस्थानशीं व्यापार करण्याकरितां लंडनमध्यें ईस्ट इंडिया कंपनी स्थापिली गेली व एलिझबेथकडून तिला व्यापाराची सनद मिळाली ( ३१ डिसेंबर १६०० ). सर वॉल्टर रॅले, गिल्बर्ट ही धाडसी मंडळी अमेरिकेंत वसाहती स्थापण्याच्या उद्योगास लागली व पुढें व्हर्जिनियामध्यें जेम्सटाऊन येथें पहिली कायमची वसाहत स्थापिली गेली ( १६०७ ). प्रॉटेस्टंट हॉलंडचें स्वातंत्र्यही या विजयामुळें कायम झालें.

९. **आयर्लंडांतील बंडें व अल्स्टरची वसाहत.** आयरिश जनता केल्टिक वंशाची होती. ती क्याथॉलिक धर्मासच चिकटून राहिली व तिच्या मनांत प्रॉटेस्टंट इंग्रजांविषयीं पुरा द्वेष बाणला. तेव्हां एलिझबेथच्या कारकीर्दींत आयर्लंड हें स्पेनचा राजा व पोप यांच्या हातीं इंग्लंडास त्रास देण्याचें उत्तम साधन होऊन राहिलें. त्या देशांत अनेक बंडें झालीं; पण इंग्रज सरकारनें जबरदस्तीनें तीं सर्व मोडून टाकिलीं. एलिझबेथच्या कारकीर्दीच्या शेवटीं ह्यू ओनील या आयरिश पुढाऱ्यानें अल्स्टर प्रांतांत फार मोठें बंड उभारिलें. लवकरच तें सर्व आयर्लंडभर पसरलें. तें मोडण्यास इंग्रजांस फार प्रयास पडले. शेवटीं इंग्रज सरदार माउंटजॉय यानें क्रूरपणानें आयर्लंडास वठणीवर आणिलें. अल्स्टरमधील जमीन सरकारनें जप्त केली व पुढील कारकीर्दींत तेथें इंग्लिश व स्कॉटिश लोकांच्या वसाहती झाल्या ( १६११ ). अजूनही अल्स्टर म्हणजे प्रॉटेस्टंटांचें वसतिस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

१०. **इंग्लंडचें वैभव.** एलिझबेथच्या कारकीर्दीच्या उत्तरभागांत अनेक लोकोपयुक्त गोष्टी घडल्या व इंग्लंडचें वैभव खूप वाढलें. क्याथॉलिक स्पेनच्या जुलुमास कंटाळून फ्लँडर्समधील शेंकडों विणकरी इंग्लंडांत येऊन राहिले. त्यामुळें लोंकरीचें कापड करण्याचा व रंगविण्याचा धंदा देशांत सुरू झाला व अनेक इंग्रजांनीं तो आपलासा केला. त्याचप्रमाणें इंग्लंडच्या समुद्रावरील वर्चस्वामुळें समुद्रावरील वाहतुकीचा व्यापारही जोरानें सुरू झाला. शहरांतील वस्तीच्या वाढीमुळें पुनः धान्याची लागवड करणें फायदेशीर होऊं लागलें; व त्यामुळें लोकांना धंदा नाहीं अशी स्थिति राहिली नाहीं. पार्लमेंटनें एक 'गरिबांचा कायदा' ( Poor Law ) पास केला (१६०१) व त्यानें पंगु व वृद्ध भिकाऱ्यांच्या पोषणाची व धट्टयाकट्टया भिकाऱ्यांस कामास लावण्याची व्यवस्था गांवच्या पुढाऱ्यांनीं करावी व त्यासाठीं दानधर्मकर ( Poor-Rate ) वसूल करावा असें ठरलें. लोकांच्या स्वतंत्र बाण्याची चुणूक एकदां चांगली दिसून आली. एलिझबेथ आपल्या प्रीतींतील माणसांस निरनिराळ्या जिनसांचा व्यापार करण्याचे मक्ते देत असे; त्यामुळें जिन्नस महाग होत व लोकांची गैरसोय होई. कॉमन्ससभेनें मक्ते-पद्धतीवर टीका केली ( १६०१ ). तेव्हां एलिझबेथनें शहाणपणानें जांचक मक्ते काढून टाकिले. एलिझबेथच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धांत तेजस्वी ग्रंथकारांची मालिकाच निघाली. एडमंड स्पेन्सर हा कवि, शेक्सपिअर हा नाटककार, व फ्रॅन्सिस बेकन हा तत्त्वज्ञ, या प्रतिभासंपन्न ग्रंथकारांनीं आपले ग्रंथ याच काळांत लिहिले. इंग्लंडच्या वैभवाची चढती कमान असतां एलिझबेथ मृत्यु पावली ( १६०३ ). ती मोठी कर्तबगार व दैवशाली होती. तिच्या कारकीर्दींत बलाढ्य स्पेनचा पराभव झाला, इंग्लंड हें राष्ट्र युरोपमध्यें श्रेष्ठत्वास चढलें, व ब्रिटिश नाविक सत्तेचा उदय झाला.

———

# १५. राजा हा ईश्वरी अंश आहे.

१. **जेम्सचें राज्यारोहण व स्वभाव.** एलिझबेथच्या मागून स्कॉटलंडची राणी मेरी हिचा मुलगा स्कॉटलंडचा* स्टुअर्ट घराण्यांतील राजा सहावा जेम्स हा पहिला जेम्स ह्या पदवीनें इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तिन्ही देशांचा राजा झाला. स्कॉटलंड व इंग्लंड एकाच राजाच्या ताब्यांत आल्यानें त्या दोन्ही देशांतील आजपर्यंतचा वैरभाव नाहींसा होऊन शांतता स्थापन झाली. तथापि स्कॉटलंडची पार्लमेंट यापुढें शंभर वर्षेंपर्यंत स्वतंत्रपणें एन्डिबरो येथें भरत असे. जेम्स जात्या हुशार असून त्यानें बरेंच पांडित्य संपादन केलें होतें. तथापि रुबाबदारपणा व व्यावहारिक शहाणपणा त्याच्या ठायीं मुळींच नव्हता. तसेंच बुद्धीचें चांचल्य व स्वभावाचा मृदुपणा या कारणांनीं कोणतेंही धोरण निश्चयपूर्वक अंमलांत आणणें त्याच्या हातून घडलें नाहीं. अर्थातच 'ख्रिस्ती देशांतील पढतमूर्खांमधील शिरोमणि' (the Wisest fool in Christendom) हें वर्णन त्याला बरोबर लागू पडतें.

---

*सातवा हेन्री.
|
मार्गरेट.
|
पांचवा जेम्स.
|
मेरी.
|
सहावा जेम्स.

**स्टुअर्ट घराणें १६०३-१७१४.**

**पहिला जेम्स,** १६०३-१६०५.
|
**पहिला चार्लस,** १६२५-१६४९.

**दुसरा चार्लस,** १६६०-१६८५. **दुसरा जेम्स,** १६८५-१६८८. **मेरी.**

**जेम्स,** (तोतया). **ॲन,** १७०२-१४. **मेरी,** १६८८-९४. =**तिसरा वुइल्यम,** १६८८-१७०२.

२. **तीन धर्म-पंथ.** या वेळीं इंग्लंडांत प्यूरिटन, एपिस्कोपेलियन व क्याथॉलिक असे तीन धर्मपंथ होते. एलिझबेथची प्रतिस्पर्धी मेरी ही क्याथॉलिक असल्यामुळें तिचा मुलगा जेम्स आपल्या बाजूचा होईल असें क्याथॉलिकांस वाटलें. स्कॉटलंडांत प्रेस्बिटेरियन पंथ प्रचारांत असल्यामुळें जेम्सचा आपल्या पंथावर अनुग्रह होईल अशी प्यूरिटनांनीं अटकळ बांधिली. परंतु बिशपच्या व्यवस्थेनें राजाचा अधिकार दृढ रहातो या समजुतीनें जेम्सनें एपिस्कोपेलियन पंथ मान्य केला.

३. **हॅम्पटन कोर्टमधील सभा.** राज्यारोहणानंतर थोड्याच दिवसांनीं प्यूरिटनांच्या विनंतीवरून धार्मिक धोरण काय ठेवावें याची चर्चा करण्यासाठीं राजानें हॅम्पटन कोर्ट येथील राजवाड्यांत बिशप व प्यूरिटनांचे प्रतिनिधि यांची सभा भरविली (जानेवारी १६०४). या सभेंत "आज तुम्ही बिशप नको म्हणतां, उद्यां तुम्ही राजा नको म्हणाल," (No bishop, No king) असा मुद्दा काढण्यांत येऊन प्यूरिटनांचीं तोंडें बंद करण्यांत आलीं. शेवटीं जेम्स प्यूरिटनांस म्हणाला, " तुम्ही आमच्या म्हणण्याप्रमाणें वागा नाहींतर तुम्हांस आम्ही देशाबाहेर हुसकून देऊं." या सभेपासून कांहीं फायदा झाला नाही हें सांगणें नकोच. मात्र तिचें फल म्हणजे, 'जेम्सची आवृत्ति' नांवाची एक बायबलच्या इंग्लिश भाषांतराची सुंदर नवीन आवृत्ति निघाली (१६११).

४. **दारूगोळ्याचा कट.** जेम्सनें एपिस्कोपेलियन पंथास राजाश्रय दिला हें पाहून क्याथॉलिक लोकांचीही अत्यंत निराशा झाली. त्यांनीं संतापून राजासह सर्व सभासद बसले असतां पार्लमेंटगृहच उडवून देण्याचा कट केला (१६०५). दारूगोळा सांठविण्यासाठीं पार्लमेंटच्या सभागृहाखालील तळघरच त्यांच्या हातीं आलें. दारूला बत्ती लावण्याचें काम गाय फॉक्स नांवाच्या धैर्यवान् सोजिराकडे

सोंपविलें होतें. ५ नोव्हेंबर १६०५ हा पार्लमेंटच्या बैठकीचा दिवस मुक्रर झाला होता. त्यापूर्वी कटवाल्यांपैकीं एकानें आपल्या नातलगास 'पार्लमेंटवर अनिष्ट प्रसंग येणार असल्यामुळें बैठकीस तुम्हीं हजर राहूं नये' अशा अर्थाच्या पाठविलेल्या पत्रावरून तो कट उघडकीस आला. लागलीच कटवाल्यांस कडक शिक्षा झाल्या. क्याथॉलिकांविरुद्ध कडक कायदे झाले व त्यांची सक्त रीतीनें अंमलबजावणी होऊं लागली. जेम्स गादीवर आला त्याच सालीं (१६०३) त्याच्याविरुद्ध एक कट झाला होता. त्यांत प्रसिद्ध सर वॉल्टर रॅले हा सामील असल्याचा संशय आल्यावरून त्याला कैदेंत टाकण्यांत आलें. पुढें तेरा वर्षें तो तुरुंगांत होता. तितक्या वेळांत त्यानें जगाचा इतिहास लिहिला. रॅलेनें अमेरिकेंत इंग्लिश वसाहत स्थापण्याचा उद्योग केला असल्यामुळें त्याच्यावर स्पेनच्या राजाचा दांत होता. १६१८ सालीं जेम्सनें स्पॅनिश राजास खूष करण्यासाठीं रॅलेचा वध केला.

**५. राजा व पार्लमेंट यांजमधील झगडा.** यादवीमुळें देशांत अस्वस्थता माजली होती, अशा वेळीं टयूडर राजे इंग्लंडच्या गादीवर आले व त्यांनीं देशांत शांतता व स्वास्थ्य यांचा अंमल बसविला. शिवाय बलाढ्य स्पेन इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां टपला असतां टयूडर राणी एलिझबेथ हिनें जय मिळविला. अर्थातच टयूडर राजांशीं झगडण्याची पार्लमेंटला केव्हांच बुद्धि झाली नाहीं. आतां स्टुअर्ट घराण्याच्या काळीं (१६०३–१६८८) इंग्लंडला कोणताही प्रबल शत्रु नव्हता. तसेंच टयूडर अंमलाखालीं अनुभविलेल्या शांततेमुळें व नवीन कल्पनांच्या प्रसारामुळें लोकांना राजाचें मिंधें राहणें मुळींच पसंत नव्हतें. आपण ईश्वरी नियमानुसार वारशाच्या हक्कानें (Divine Hereditary Right) गादीवर आलों अशी जेम्सची समजूत होती. अर्थात् त्यानें 'आपण राजे अतएव देवदूतच' या

तत्त्वास उराशीं बाळगून राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. राजाचे अधिकार अमर्यादित असून त्यानें पार्लमेंटला कृपा म्हणून कांहीं हक्क दिले आहेत, कायदा राजानें स्वेच्छेनें पाळावयाचा, तो पाळावाच असें बंधन राजावर नाहीं असें जेम्स म्हणत असे. परंतु या वेळीं लोकांमध्यें आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न झाली असल्यामुळें पार्लमेंटला ही विचारसरणी पटणें अशक्य होतें. शिवाय पार्लमेंटांत प्यूरिटनांचा खूप भरणा होता, व ते स्वतंत्र बाण्याचे असल्यामुळें राजाशीं पार्लमेंटचे एकसारखे झगडे सुरू झाले. जेम्सचा मुलगा पहिला चार्लस याच्या वेळीं तंटा निकरावर आला व चार्लसला आपल्या प्राणास मुकावें लागलें. पुढें जेम्सचा नातू दुसरा जेम्स याची गादीवरून उचलबांगडी करणें प्रजेस भाग पडलें (१६८८). त्या वेळीं पार्लमेंट राजापेक्षां श्रेष्ठ असून तिच्या संमतीनें राज्यकारभार चालला पाहिजे असें ठरलें व मग हा झगडा समाप्त झाला.

**६. पार्लमेंटशीं तंटा.** पार्लमेंटच्या संमतीनें राजानें कायदे करावे व कर बसवावे अशी पद्धति होती. परंतु या दोन्ही बाबतींत राजानें पार्लमेंटला धाब्यावर बसविलें. अनेक जाहीरनामे (Proclamations) काढून राजानें त्यांचा कायद्यांसारखा अंमल चालविला. पार्लमेंटनें राजास × 'टनेज व पौंडेज' हा एक कर यावज्जीव वसूल करण्यास परवानगी दिली होती. या कराचे नक्की दर कायम ठरले असून एका पुस्तकांत नमूद होते. तथापि राजानें पार्लमेंटच्या संमतीशिवाय कांहीं पदार्थांवर जादा जकात (Impositions) बसविली. कॉमन्ससभेनें या जादा करांचा जोरानें निषेध केला;

---

× टनेज व पौंडेज हा कर आयात व निर्गत मालावर घ्यावयाचा असे. टनेज हा कर आयात होणाऱ्या एक टन दारूवर एक शिलिंगापासून तीन शिलिंगांपर्यंत पडे. व पौंडेज एक पौंड सुक्या मालावर सहा पेन्सांपासून एक शिलिंगापर्यंत घ्यावयाचा असे.

तेव्हां राजानें पार्लमेंट बरखास्त केली ( १६११ ). पुनः तीन वर्षांनीं जेम्सनें दुसरी पार्लमेंट बोलाविली, पण 'तक्रार दूर केली म्हणजे देणग्या मिळतील' असें कॉमन्सनीं ठांसून सांगितल्यामुळें एकही बिल पास होण्यापूर्वींच राजानें ती बरखास्त केली.

७. **स्वच्छंदी कारभार.** यापुढें सात वर्षेंपर्यंत ( १६१४ ते १६२१ ) जेम्सनें दुसरी पार्लमेंट बोलाविली नाहीं. या काळांत ड्यूक ऑफ बकिंगहॅम हा जेम्सचा मुख्य मंत्री होता. तो देखणा व तरतरीत असून राजाला पैसा मिळवून देण्यांत मोठा तरबेज होता. जेम्सचा मुलगा चार्लस याशीं तो समवयस्क असून त्या दोघांची मोटी मैत्री जमली. जमीनदारांस बॅरोनेट ( वंशपरंपरा नाइट ) ही पदवी देऊन तिजबद्दल एक हजार पौंड घ्यावयाचे अशी त्यानें वहिवाट पाडली. थोड्याच काळांत महत्पदास चढल्यामुळें बकिंगहॅम गर्विष्ठ झाला व त्याला सर्व लोक तुच्छ वाटूं लागले.

८. **मक्तेपद्धति व बेकन यांजवर हल्ला.** १६२१ सालीं जेम्सला पार्लमेंट बोलावणें भाग पडलें. जर्मनींतील प्रॉटेस्टंट व क्याथॉलिक संस्थानांमध्यें त्रिशद्वार्षिक युद्ध चालू होतें (१६१८-१६४८). जेम्सची मुलगी एलिझबेथ ही जर्मनींतील पॅलॅटिनेट प्रांताचा संस्थानिक फ्रेडरिक यास दिली होती. फ्रेडरिक या युद्धांत प्रॉटेस्टंट बाजूनें लढत होता. त्याला मदत करण्यासाठीं पैसा मिळावा म्हणून जेम्सनें तिसरी पार्लमेंट बोलाविली ( १६२१ ). फ्रेडरिकला मदत करण्याकरितां कॉमन्सनीं कांहीं पैसा मंजूर केला. नंतर मक्तेपद्धतीवर त्यांनीं इतक्या जोरानें व बिनचूक हल्ला केला कीं, राजानें सर्व मक्ते रद्द केले. याच वेळीं राजाच्या बडया अधिकाऱ्यांवर वचक बसविण्याचा आपला अधिकार पार्लमेंटनें गाजविला. सर फ्रॅन्सिस बेकन हा जेम्सचा सरन्यायाधीश ( Lord Chancellor ) होता. तो मोठा ग्रंथकार व तत्त्वज्ञानी म्हणून प्रसिद्ध होता. त्याजवर कॉमन्सनीं पक्ष-

कारांपासून लांच उकळण्याचा आरोप ठेविला व त्याची×चौकशी आरंभिली. लॉर्डांनीं त्याला जबर दंड ठोठाविला, व तुरुंगवासाची शिक्षा फर्माविली. राजानें मध्यें पडून त्याचा दंड माफ केला, व थोड्या तुरुंगवासानंतर त्याची सुटका झाली.

९. **परराष्ट्रीय राजकारण**. यापुढें आपल्या जांवयास संकटांतून सोडविण्याची जेम्सनें एक अजब युक्ति काढिली. जेम्स शांतताप्रिय असे, त्यामुळें त्यानें आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच स्पेनशीं तह केला होता ( १६०४ ); व स्पॅनिश राजकन्येशीं आपला मुलगा चार्लस याचा विवाह घडवून आणण्यासाठीं तो बरींच वर्षें खटपट करीत होता. आतां हें लग्न जुळविण्याचें बोलणें त्यानें जोरानें सुरू केलें ( १६२२ ). हा विवाह झाला कीं, स्पेन युद्धांतून अंग काढून घेईल व शांततेच्या मार्गानें आपला जांवई मोकळा होईल अशी जेम्सची कल्पना होती ! परंतु स्पेन क्याथॉलिक असल्यामुळें त्या देशाशीं युद्ध करावें असें इंग्लंडांतील लोकमत होतें. पार्लमेंटचे कित्येक सभासद पार्लमेंटांत विवाहाच्या प्रश्नाची चर्चा करूं लागले. राजानें त्यास 'हा माझा घरगुती प्रश्न आहे. यावर तुम्हांस चर्चा करण्याचा अधिकार नाहीं ' असें फर्माविलें. त्यावर कॉमन्सनीं दबून न जातां 'राष्ट्र, राष्ट्राचें संरक्षण, धर्म, कायदे, व सार्वजनिक दुःखें, हे आमचे चर्चा करण्याचे योग्य विषय आहेत ' असा ठराव केला.

---

× या चौकशीस इंग्रजींत इम्पीचमेंट (Impeachment) म्हणतात. कोणाही बड्या सरकारी अधिकाऱ्यानें प्रजेवर जुलूम केला असें पार्लमेंटच्या नजरेस आल्यावर त्यावर खटला होई. त्या खटल्यांत कॉमन्स फिर्यादी असून लॉर्ड्स न्यायाधीश असत. बेकन, स्ट्रॅफर्ड, वॉरन हेस्टिंग्ज या तीन बड्या अधिकाऱ्यांवरील खटले प्रसिद्ध आहेत. हल्लींची जबाबदार राज्यपद्धति सुरू होण्यापूर्वींच्या काळीं राजसत्तेवर दाब ठेवण्याचें पार्लमेंटच्या हातचें हें एक उत्तम साधन होतें.

हें पाहून राजा चिडून गेला, व त्यानें स्वतः कॉमन्सच्या सभागृहांत जाऊन हा ठराव ज्यांवर लिहिला होता ते कागद फाडून टाकिले ( १६२२ ). पुढें जेम्सची स्पॅनिश दरबारशीं विवाहाबद्दल बोलणीं होऊं लागलीं. पण अटी जमत ना. शेवटीं स्पॅनिश राजकन्येचें मन मोहून टाकण्यासाठीं चार्लसनें बकिंगहॅम याजबरोबर स्पेनला जावें असें ठरलें. चार्लस स्पेनला गेला, तेव्हां प्रेमसंपादनाच्या कामीं त्याला दुर्दैवानें अपयश आलें. पुढें स्पेनचा प्रतिस्पर्धी फ्रान्सचा राजा तेरावा लुई याची बहीण हेन्रिएटा मराया हिजशीं चार्लसचा विवाह ठरला, व स्पेनविरुद्ध जेम्सनें युद्ध पुकारिलें. यानंतर लवकरच जेम्स मृत्यु पावला ( १६२५ ).

---

# १६ सुलतानी अंमल.

**१. चार्लसचा स्वभाव.** जेम्स वारल्यावर त्याचा मुलगा चार्लस हा गादीवर आला. चार्लस हा जेम्सप्रमाणें पोरकट नसून चांगला रुबाबदार होता. पण तो हट्टी, वचनाची चाड न बाळगणारा व दुटप्पी असून ‘ राजा म्हणजे देवदूतच ’ या तत्त्वावर बापाप्रमाणेंच त्याची निष्ठा होती. गादीवर आल्याबरोबर चार्लसच्या हातून दोन चुका झाल्या. पहिली, त्यानें फ्रेंच राजकन्या हेन्रिएटा मराया हिशीं केलेला विवाह; व दुसरी, बकिंगहॅमची प्रधानगिरीवर नेमणूक. राणी मराया क्याथॉलिक, चैनी व उधळी होती. आणि बकिंगहॅम कर्तृत्व-शून्य, घमेंडखोर व अपेशी होता. या दुकलीनें चार्लसला एक-सारखें पेंचांत आणिलें. खर्चाच्या नडीमुळें त्याला पुनः पुनः पार्लमेंट बोलवावी लागली. परंतु पार्लमेंटशीं दरवेळीं त्याचें भांडण झालें.

शेवटीं दोन्ही पक्षांत युद्ध होऊन पार्लमेंट विजयी झाली व चार्लसचा शिरच्छेद झाला.

२. **पहिल्या तीन पार्लमेंट, हक्कसंरक्षणाचा अर्ज.** चार्लसच्या कारकीर्दीच्या आरंभींच स्पेनशीं युद्ध चालू होतें (१६२५); त्याच्या खर्चासाठीं राजानें दोनदां पार्लमेंट बोलाविली. परंतु बकिंगहॅम अतिशय अप्रिय असल्यामुळें कॉमन्सनीं पैसा मुळींच मंजूर न करितां बकिंगहॅमविरुद्ध खूप गिल्ला केला. तेव्हां चार्लसनें पार्लमेंट बरखास्त केली व युद्धाचा खर्च सक्तीचीं कर्जें लादून करण्यांत आला. बकिंगहॅमच्या नाकर्तेपणामुळें व पैशाचा नीट पुरवठा न झाल्यानें स्पेनशीं चाललेल्या युद्धांत इंग्लंडचा जय झाला नाहीं. इतक्यांत फ्रान्सशींही इंग्लंडचें युद्ध जुंपलें. फ्रान्सचा राजा क्याथॉलिक होता तरी फ्रेंच प्रॉटेस्टंटांस आपल्या मतास अनुसरून प्रार्थना करण्याचा व कांहीं स्थळांस तटबंदी करून तेथें शिबंदी ठेवण्याचाही अधिकार असे; तो फ्रेंच राजानें आतां काढून घेतला. तेव्हां फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावरील रोशेल येथील प्रॉटस्टंट चिडले व त्यांनीं दंगा आरंभिला; फ्रेंच राजानें सैन्य पाठवून रोशेलला वेढा घातला. बकिंगहॅमनें लोकप्रियता संपादन करण्यासाठीं रोशेलमध्यें अडकलेल्या फ्रेंच प्रॉटेस्टंटांस मदत करण्याचें ठरविलें. खर्चाकरितां लोकांवर सक्तीचीं कर्जें लादलीं. लोक कर्ज देतना. तेव्हां राजानें कित्येकांस कैद केलें व कित्येकांवर लष्करी शिपायी लादून त्यांचा खर्च वसूल केला. परंतु युद्धाचा खर्च भागेना. तेव्हां चार्लसनें तिसरी पार्लमेंट बोलाविली (१६२८). या पार्लमेंटमध्यें प्यूरिटन पुढाऱ्यांचा जोर होता. त्यांनीं लढाईच्या खर्चाची मंजुरी देण्यापूर्वीं आपल्या मागण्या राजापुढें मांडल्या: १ पार्लमेंटच्या संमतीखेरीज कोणत्याही प्रकारचे कर बसवावयाचे नाहींत; २ शांततेच्या वेळीं लष्करी कायदा अंमलांत आणावयाचा नाहीं; ३ आरोप न सांगतां कोणासही कैदेंत टाका-

वयाचें नाहीं; किंवा खटला चालू न करितां आरोपीस तुरुंगांत खितपत पडूं द्यावयाचें नाहीं. राजा यावेळीं इतक्या अडचणींत होता कीं त्यानें या मागण्या तात्काळ कबूल केल्या. हीं कलमें इतक्या महत्त्वाचीं आहेत कीं, इंग्लिश सनदशीर राज्यपद्धतीच्या इतिहासांत मॅग्ना चार्टच्या खालोखालच्या हक्कसंरक्षणाच्या अर्जास (Pitition of Right. ) स्थान मिळालें आहे. आपलें मागणें राजानें मान्य केलें हें पाहून कॉमन्सनीं युद्धाच्या खर्चाची मोठी रक्कम मंजूर केली.

३. **कॉमन्ससभेंत दंगल.** यानंतर बकिंगहॅम स्वतः रोशेलच्या मोहिमेवर जाण्यास निघाला. परंतु पोर्टस्मथ येथें गलबतावर चढण्याच्या अगदीं तयारींत असतां फेल्टन नांवाच्या एका सैन्यांतील अधिकाऱ्यानें त्याचा खून केला ( ऑगस्ट १६२८ ). लवकरच रोशेल पडलें व चार्लसचें परराष्ट्रीय धोरण सपशेल फसलें. पुढें चार्लसनें तहकूब केलेली पार्लमेंट फिरून बोलाविली ( १६२९ जानेवारी ). मध्यंतरी पार्लमेंटच्या संमतीशिवाय ' टनेज व पौंडेज ' हा कर राजानें वसूल केला होता, व प्यूरिटनांविरुद्ध असलेल्या-लोकांस बिशपच्या जागा दिल्या होत्या. त्यामुळें कॉमन्सचे सभासद चिडून गेले. पिम, हॅम्पडन व एलियट यांनीं राजाच्या सत्तेवर स्पष्ट निर्बंध घालण्यासाठीं एक जोरदार ठराव तयार केला परंतु *स्पीकर तो ठराव सभेपुढें वाचूं देईना. तेव्हां दोघां सभासदांनीं तसेंच त्याला खुर्चीवर बसविलें व सभागृहाचे दरवाजे लाविले; त्यामुळें राजपुरुषांना तहकुबीची नोटीस घेऊन आंत येतां आलें नाहीं. मग 'जो कोणी धर्मांत अनिष्ट फरक करील किंवा जो कोणी टनेज व पौंडेज हा कर खुषीनें देईल तो मनुष्य देशद्रोही असून इंग्लंडच्या स्वातंत्र्याचा शत्रु आहे ' असा ठराव कॉमन्ससभेनें पास केला. पुढें

---

* कॉमन्ससभेचा अध्यक्ष.

आठ दिवस झाले नाहींत तोंच राजानें पार्लमेंट बरखास्त केली(१० मार्च १६२९ ), व एलियट आदिकरून नऊ पुढाऱ्यांस दंगा केल्याच्या आरोपावरून कैदेंत टाकलें. इतरांनीं सरकारची माफी मागून आपली सुटका करून घेतली. एलियट मात्र मोठ्या धैर्यानें तुरुंगवास सहन करीत राहिला. पुढें त्याचा तुरुंगांतच अंत झाला (१६३२).

४. **अनियंत्रित कारभार, वेंटवर्थ.** पार्लमेंट आपल्या राज्यकारभारावर टीका करते असें पाहून यापुढें पार्लमेंट न बोलावितां राज्य चालविण्याचा चार्लसनें विचार केला, व पुढील अकरा वर्षें ( १६२९ ते १६४० ) पार्लमेंटास धुडकावून आपल्या मुखत्यारीवर त्यानें राज्य केलें. या काळांत सर थॉमस वेंटवर्थ व वुइल्यम लॉड हे राजाचे मुख्य सल्लागार होते. वेंटवर्थ पूर्वी लोकपक्षाकडे होता व 'हक्कसंरक्षणाचा अर्ज' पास झाला तेव्हां त्यानें लोकपक्षातर्फे पुढाकार घेतला होता. परंतु बकिंगहॅमच्या मृत्यूनंतर तो राजास मिळाला. चार्लसनें त्याला आयर्लंडचा 'लॉर्ड डेप्युटी' (सुभेदार) नेमिलें. तेथें त्यानें शांतता व व्यवस्था प्रस्थापित केली. राज्यकारभार चोख असावा मग लोकमताकडे पाहण्याचें कारण नाहीं, अशी वेंटवर्थची उत्तम राज्यव्यवस्थेसंबंधीं कल्पना होती. तो आपल्या धोरणास पूर्णतेचें धोरण ( Thorough, थरो ) हें नांव देई. त्यानें आयर्लंडचें हित साधलें पण आयरिश लोकमताची मुळींच पर्वा केली नाहीं. वेंटवर्थच्या व्यवस्थेनें चार्लस खूष झाला व त्यानें त्याला १६४०त अर्ल ऑफ स्ट्रॅफर्ड बनविलें. लॉर्ड स्ट्रॅफर्ड या नांवानेंच तो इतिहासांत प्रसिद्ध आहे.

५. **धार्मिक जुलूम.** धार्मिक बाबतींत राजाचा सल्लागार लॉड हा होता. धर्मसंबंधीं त्याचीं मतें राजसत्तेस पोषक असल्यामुळें चार्लसनें त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याची क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपच्या जागीं नेमणूक

केली(१६३३). जुन्या चाली सोडून देण्यांत इंग्लंडांतील सुधारकांनीं अतिरेक केला याकरितां आतां कांहीं जुने धार्मिक विधि पुनः सुरू करण्याचें लॉडनें ठरविलें. तेव्हां लॉड प्रछन्न क्याथॉलिक असून प्रॉटेस्टंट पंथाचा उच्छेद करण्याचा त्याचा बेत आहे असें प्यूरिटनांस वाटलें व त्यांचें पित्त खवळलें. लॉडनें प्यूरिटनांचा बींमोड करण्याचा जोराचा प्रयत्न सुरू केला. स्टार चेंबर कोर्ट हें कर न देणाऱ्या अथवा सरकारवर टीका करणाऱ्या लोकांस शिक्षा करण्यास सज्ज होतें व एलिझबेथच्या वेळीं स्थापिलेलें 'हाय कमिशन कोर्ट' प्रचलित प्रार्थनापद्धत न अनुसरणाऱ्या प्यूरिटनांचा समाचार घेण्यास तत्पर होतें. आर्चबिशप लॉड यानें प्यूरिटनांस शिक्षा करून व जबर दंड ठोठावून गप्प बसविण्यास या होन्ही कोर्टांचा मनमुराद उपयोग केला.

६. **देशत्याग.** प्रापंचिक बाबतींत व धार्मिक बाबतींत प्यूरिटनांचा छळ होऊं लागला; तेव्हां पुष्कळ स्वातंत्र्यप्रिय प्यूरिटन देशांतर करूं लागले. पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींतच प्यूरिटनांविरुद्ध बरेच कायदे झाले होते. गांजलेल्या लोकांनीं त्या वेळेपासून अमेरिकेंत वसाहती करून या जांचापासून आपली सुटका करून घेण्याचा प्रचार पाडला होता. १६०७मध्यें शंभर लोकांनीं व्हर्जिनियामधील जेम्सटाऊनची स्थापना केली. पुढें १६२०त प्यूरिटन पंथाचे एकशेंवीस लोक 'मे फ्लॉवर' नामक जहाजांतून अमेरिकेंत वसाहत करावयास गेले व त्यांनीं न्यू प्लिमथची वसाहत स्थापिली. हे वसाहतवाले पिल्ग्रिम फादर्स (Pilgrim Fathers) म्हणून इतिहसांत प्रसिद्ध आहेत. ज्या सालीं सुलतानी अंमल सुरू झाला त्या १६२९ सालीं एक हजार प्यूरिटनांनीं देशत्याग केला व अमेरिकेंतील मॅसॅच्युसेट्समध्यें वसाहत स्थापिली. दंडेलीच्या अकरा वर्षांत हजारों प्यूरिटन आपलें ऐहिक व पारमार्थिक स्वातंत्र्य राखण्यासाठीं अमेरिकेंत

निघून गेले व तेथें लहान लहान प्रजासत्ताक संस्थानें उदयास आलीं.

७. **नौकाकर.** आपल्याला पार्लमेंट न बोलावितां राज्य करावयाचें तेव्हां युद्धाचा खर्च आपल्याला झेपणार नाहीं हें लक्षांत घेऊन चार्लसनें स्पेन व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांशीं तह केले ( १६३० ); व 'त्रिशद्वार्षिक युद्धांतून' आपलें अंग काढून घेतलें. तथापि राज्याचा खर्च व खाजगी खर्च केवळ सरंजामी उत्पन्नांतून ( Feudal due, फ्यूडल डयूज) भागणें शक्य नव्हतें. तेव्हां राजास उत्पन्नाच्या जुन्या बाबी शोधून काढून त्या वसूल करणें भाग पडलें. त्यांपैकीं सर्वांत प्रसिद्ध कर म्हणजे नौकाकर ( Ship-money ) हा होय. राजे किनाऱ्यालगतच्या परगण्यांपासून आरमारासाठीं जहाजें मागत अथवा जहाजें बांधण्यासाठीं नौका-कर वसूल करीत. इंग्लंडच्या किनाऱ्याचें शत्रूपासून संरक्षण होण्यासाठीं आरमार अधिक बळकट करण्याचें चार्लसनें ठरविलें. परंतु त्याच्या खर्चाची तर्तूद करण्यासाठीं पार्लमेंट न बोलावितां सर्व परगण्यांवर त्यानें पुराणा नौकाकर लादला. हा कर लोकांस अत्यंत जाचक वाटला. तथापि एक दोन वर्षें लोकांनीं तो बिनतक्रार दिला. पुढें १६३७त बकिंगहॅम परगण्यांतील हॅम्पडन या प्रसिद्ध श्रीमंत सरदारानें 'हा कर अन्यायाचा आहे, सबब मी तो देत नाहीं' असें साफ सांगितलें. तेव्हां हॅम्पडनवर खटला झाला, व न्यायाधीश राजाचे मिंधे असल्यामुळें त्यांनीं हॅम्पडननें कर दिला पाहिजे असा निकाल दिला. या निकालानें चार्लस अगदीं अप्रिय झाला, प्रजेचीं मनें अत्यंत क्षुब्ध झालीं, व राजाच्या जुलुमाचा आपण निर्भयपणें प्रतिकार केला पाहिजे हें मत सर्व देशभर पसरलें. एव्हांपासून हॅम्पडन हा 'राष्ट्रीय वीर' (National Hero) म्हणून गाजूं लागला व त्याचें नांव अद्यापपर्यंत इंग्रज लोकांस अत्यंत प्रिय होऊन राहिलें आहे.

८. **स्कॉटिश लोकांशीं तंटा, लाँग पार्लमेंट.** याप्रमाणें इंग्लंड

व आयर्लंड हे दोन देश चार्लसच्या जुलुमाखालीं भरडून निघत होते; अशा वेळीं स्कॉटलंडला वठणीस आणिलें कीं आपण कृतकृत्य झालों असें आर्चबिशप लॉडला वाटलें. पहिल्या जेम्सनें स्कॉटलंडांत बिशप नेमिले होते; स्कॉटिश लोकांनीं आपल्या धर्मसभांतून धर्मगुरु निवडण्याची पद्धति अनुभविली असल्यामुळें 'बिशपांची नेमणूक' त्यांस मुळींच रुचली नाहीं. आतां लॉडनें इंग्लिशपद्धतीबरहुकूम एक प्रार्थनापुस्तक तयार केलें; आणि स्कॉटलंडांतील प्रत्येक धर्ममंदिरांत त्याचा उपयोग करावा असा हुकूम सोडिला (१६३७). त्यामुळें स्कॉटिश लोक अगदीं खवळून गेले, व ठिकठिकाणीं प्रार्थनापुस्तकाचा निषेध करण्यांत आला. नंतर धर्मगुरु, सरदार, छोटे जमीनदार, व नगरवासी या सर्व वर्गांनीं एके ठिकाणीं जमून एक संघ स्थापन केला, व प्रत्येकानें शस्त्रधारण करूनही आपल्या धर्मस्वातंत्र्याचें रक्षण करण्याची शपथ घेतली (फेब्रुवारी १६३८). ही गोष्ट राष्ट्रीय करारनामा (National Covenant, नॅशनल कव्हेनंट) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. आतां स्कॉटिश लोकांशीं युद्ध करून त्यांस ताळ्यावर आणण्याखेरीज दुसरा मार्ग राहिला नाहीं. या वेळीं एलियट, हॅम्पडन व पिम या देशभक्तांच्या निःस्वार्थी उद्योगानें इंग्लंडांत जागृति झाली होती; त्यामुळें पार्लमेंटच्या संमतीशिवाय चार्लसला स्कॉटिश लोकांशीं युद्ध करण्यास सैन्य व पैसा मिळणें अशक्य झालें व युद्धाचा खर्च भागविण्याकरितां पार्लमेंट बोलवावी लागली. ही पार्लमेंट १६४०त भरली, ती रीतसरप्रमाणें १६६०त बरखास्त झाली. अर्थात् तिची बैठक वीस वर्षें टिकली. यावरून तिला लॉंग पार्लमेंट (दीर्घकाल टिकलेली पार्लमेंट) हें नांव पडलें.

# १७. लॉंग पार्लमेंट.

१. **लॉंग पार्लमेंटचीं कामें.** लॉंग पार्लमेंटमध्यें प्यूरिटन सभासदांचा विशेष भरणा होता. तिनें मुख्यतः तीन कामें करण्याचें ठरविलें. एक, राजाचे बदसल्लागार स्ट्रॅफर्ड व लॉड यांचा नाश करावयाचा; दुसरें, राजाच्या सत्तेस आळा घालावयाचा; व तिसरें धर्मव्यवस्थेंत सुधारणा करावयाची.

२. **स्ट्रॅफर्ड व लॉड यांना शिक्षा.** स्ट्रॅफर्ड हा पूर्वीं प्रजापक्षाचा असून नंतर राजपक्षास मिळाला म्हणून त्याच्यावर प्रजापक्षाचा दांत होताच. तेव्हां त्याचा ताबडतोब समाचार घेण्याचें कॉमन्ससभेंतील प्यूरिटन पुढाऱ्यांनीं ठरविलें. त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून लॉर्ड्सपुढें कॉमन्सनीं त्याची चौकशी (Impeachment) चालविली. 'मीं राजाविरुद्ध अपराध केला नाहीं,' या मुद्यावर स्ट्रॅफर्ड आपला बचाव करूं लागला. यावर लोकपक्षाचा पुढारी पिम यानें उत्तर केलें कीं, 'राजा हा राष्ट्राचा प्रतिनिधि असल्यामुळें राष्ट्रावर दडपशाही करणें म्हणजे राजद्रोहच करणें होय.' परंतु या विचारपद्धतीस देशाच्या प्रस्थापित कायद्यांत कोठें आधार नव्हता; म्हणून तिच्या आधारावर स्ट्रॅफर्डवर गुन्ह्याची शाबिती करण्यास लॉर्ड्स तयार होणार नाहींत हें उघड होतें. तेव्हां त्याला देहान्त प्रायश्चित्त देण्यासाठीं कॉमन्सनीं निराळाच मार्ग स्वीकारला. स्ट्रॅफर्ड देशद्रोही आहे म्हणून त्याला मरणाची शिक्षा व्हावी असें बिल (Bill of Attainder) कॉमन्सनीं पास केलें. नंतर लॉर्डांनीं त्या बिलास संमति दिली. आतां फक्त राजाची संमति मिळावयाची राहिली. मी तुमच्या केंसासही धक्का लागूं देणार नाहीं असें चार्लसनें स्ट्रॅफर्डला वचन दिलें होतें. पण शेवटीं पार्लमेंटशीं झगडा नको या बुद्धीनें चार्लसनें वचन-

भंग करून बिलावर सही केली; व मग स्ट्रॅफर्डचा वध झाला. स्ट्रॅफर्डनें मोठ्या धैर्यानें मृत्यु स्वीकारला. वधापूर्वी तो बोलला, "राजावर विश्वास ठेवूं नका." आर्चबिशप लॉड याचा खटला रेंगाळला; पुढें चार वर्षांनीं त्याचाही शिरच्छेद झाला (१६४५).

३. **राजसत्तेवर निर्बंध.** पार्लमेंटनें राजसत्तेवर आळा घालण्याचें कामही जोरानें सुरू केलें. पार्लमेंटची बैठक तीन वर्षांत निदान एकदां झालीच पाहिजे, असा कायदा पास करण्यांत आला (फेब्रुवारी १६४१). राजाचीं जुलुमाचीं साधनें जीं स्टार चेंबर कोर्ट व हाय कमिशन कोर्ट त्यांस मूठमाती देण्यांत आली. नौकाकर आणि टनेज व पौंडेज हा कर बसविणें बेकायदेशीर आहे असें ठरविण्यांत आलें. आपल्याविरुद्ध पार्लमेंट जाऊं लागली कीं, ती बरखास्त करून राजा मोकळा होई; तेव्हां आपल्यावर असाच प्रयोग होऊं नये म्हणून लाँग पार्लमेंटनें असा ठराव पास केला कीं, चालू पार्लमेंट स्वतःच ती बरखास्तीचा ठराव करीपर्यंत बरखास्त होऊं नये. अशा रीतीनें राजसत्तेवर आळा घालण्याचें काम आटपलें.

४. **धार्मिक निर्बंध.** पार्लमेंटनें एकमतानें वागून राजसत्तेवर आळा बसविला. परंतु धार्मिक बाबतींत हें ऐक्य टिकलें नाहीं. प्यूरिटनांना बिशपची व्यवस्था व प्रार्थनापुस्तक या दोन्ही गोष्टी आवडत नसत. तेव्हां त्यांनीं बिशप व प्रार्थनापुस्तक नाहींतशीं करण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रस्थापित धर्माच्या मुळावर हा घाला असल्यामुळें प्रस्थापित धर्माचे अभिमानी चवताळून गेले व पार्लमेंटांत दुफळी होण्याचा रंग दिसूं लागला. परंतु कॉमन्समध्यें फूट होऊं नये म्हणून प्यूरिटनांनीं लवकरच आपला हेका सोडिला.

५. **आयर्लंडांत कत्तल व तक्रारींची यादी.** आयर्लंडांत स्ट्रॅफर्डनें कडक अंमल गाजवून तेथील क्याथॉलिक लोकांस अगदीं दडपून टाकिलें होतें. त्याच्या दडपशाहींतून सुटल्याबरोबर आयरिश

क्याथॉलिकांनीं बंडाचें निशाण उभारिलें व दडपशाहीचा सूड उगविण्याचें ठरवून सुमारें पांच हजार इंग्लिश प्रॉटेस्टंट वसाहतवाल्यांची कत्तल केली ( १६४१ ऑक्टोबर ). तेव्हां आयर्लंडांत सैन्य पाठवून शांतता प्रस्थापित करणे जरूर झालें. परंतु सैन्य तयार करून तें राजाच्या हातीं देण्याची पार्लमेंटची छाती होईना. इंग्लिश जनतेस संतुष्ट राखण्यासाठीं पार्लमेंटनें पुढीलप्रमाणें व्यवस्था केली. हॅम्पडन, पिम इत्यादि पुढाऱ्यांनीं एक तक्रारीची यादी ( Grand Remonstrance, ग्रँड रिमॉन्स्ट्रन्स ) तयार केली. तींत राज्यारोहणापासून चार्लसनें केलेल्या बेकायदेशीर कृत्यांची जंत्री असून आयर्लंडांत ज्या कत्तली झाल्या त्यांना त्याची फूस आहे असा आरोप चार्लसवर केला होता. या यादीवर कॉमन्ससभेंत कडाक्याचा वाद होऊन ती अल्प बहुमतानें पास झाली ( नोव्हेंबर १६४१ ). एव्हांपासून पार्लमेंटमध्यें उघड फूट पडली आणि हाइड व फॉकलंड यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडांतील प्रस्थापित धर्म व राजा यांचा वाली असा पक्ष निर्माण झाला.

६. **पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न**. यापुढें चार्लसनें एक मोठी चूक केली; त्यामुळें त्याच्याविरुद्ध भयंकर लोकक्षोभ झाला. त्यानें लॉर्डांच्या सभेपैकीं किंबोल्टन नांवाचा सभासद व कॉमन्ससभेंतील पिम, हॅम्पडन इत्यादि पांच सभासद अशा सहा सभासदांस पकडण्याचा हुकूम काढिला. स्कॉटिश लोक जेव्हां राजाविरुद्ध उठले होते तेव्हां त्यास प्रोत्साहन दिलें व राजाविरुद्ध लढाई करण्याचा प्रयत्न केला असा आरोप त्यांजवर ठेविला होता. नंतर चार्लस स्वतः हत्यारबंद शिपाई बरोबर घेऊन कॉमन्सच्या सभागृहाकडे गेला. बरोबरचे लोक बाहेर ठेवून तो एकटाच आंत गेला. स्पीकरजवळ जाऊन पांच सभासदांस पकडण्यास मी आलों आहें असें तो म्हणाला. तेव्हां पार्लमेंटचे हक्क प्रस्थापित करण्या-

साठीं आपला जीव धोक्यांत घालून स्पीकर लेन्थॉल म्हणाला, “ महाराज, ही सभा जो हुकूम करील त्याशिवाय इतर गोष्टी पाहण्यास माझे डोळे समर्थ नाहींत, अथवा त्या ऐकण्याची माझ्या कानांत शक्ति नाहीं. ” हें उत्तर ऐकून सर्व सभागृह टाळ्यांच्या गजरानें भरून गेलें. राजा येत आहे असें अगोदरच कळलें असल्यामुळें पांच सभासद सभागृहांतून एका आडवाटेनें पसार झाले होते. तेव्हां चार्लसला हात हालवीत तसेंच परत जाणें भाग पडलें. तो जेव्हां जाऊं लागला, तेव्हां ‘आमचे हक्क’ ‘आमचे हक्क’ अशा चोहोंकडून आरोळ्या उठल्या (४ जानेवारी १६४२).

७. **युद्ध पुकारलें.** नंतर लंडन येथें राहणें धोक्याचें वाटून चार्लसनें तें शहर सोडिलें. लवकरच हाइड, फॉकलंड इत्यादि राजनिष्ठ मंडळी जाऊन त्यास मिळाली. या सर्वांचें मत राजानें लढाई करण्याच्या फंदांत पडूं नये असें होतें, व दोन्ही पक्षांत समेट घडून येईल अशी त्यांस आशा होती. इतक्यांत पार्लमेंटनें एक बिल तयार करून तें राजाकडे मंजुरीसाठीं पाठविलें. त्यांत अशी मागणी होती कीं सर्व सैन्यावर पार्लमेंटची हुकमत चालावी. अशा तऱ्हेनें राष्ट्रीय सैन्यावरील सत्ता सोडणें म्हणजे नामधारी राजे बनण्यासारखें होतें. तेव्हां चार्लसनें या बिलास संमति दिली नाहीं हें सांगणें नकोच. इकडे पार्लमेंटनें उघड उघड सैन्य जमविण्याचा व कर वसूल करण्याचा सपाटा चालविला. शेवटीं दोन्ही पक्षांत तडजोड होणें अशक्य झालें व चार्लसनें नॉटिंगहॅम येथें २२ आगष्ट १६४२ रोजीं लढाईचें निशाण उभारिलें.

---

# १८. आपसांतील युद्ध.

( Civil War ).

१. **दोन्ही पक्षांचें बलाबल.** स्वातंत्र्यप्रिय प्यूरिटनांनीं आपल्या हक्कांच्या रक्षणार्थ राजाविरुद्ध युद्ध सुरू केलें व प्रस्थापित धर्मवाल्यांनीं राजाची तळी उचलून धरिली. तेव्हां पार्लमेंट व राजा या दोन्ही बाजू जवळ जवळ तुल्यबल झाल्या व त्यामुळें युद्ध पुष्कळ काळ टिकलें. दोन्ही पक्षांची वांटणी पुढीलप्रमाणें होती. ब्रिस्टलपासून इंग्लंडच्या ईशान्य टोंकापर्यंत एक रेषा काढिली तर तिच्या दक्षिण–पूर्वेचा भाग पार्लमेंटास अनुकूळ होता व उत्तर–पश्चिमेचा भाग राजाच्या बाजूस होता. धंदेवारीनें पाहिलें तर बहुतेक जमीनदार व खानदानीचे लोक राजाकडे असून व्यापारी व धंदेवाले लोक पार्लमेंटकडे होते. राजाचा बोज मध्ये इंग्लंडांत असून समुद्रकिनारा व परदेशचा व्यापार हीं पार्लमेंटास मोकळीं होतीं. राजाकडील लोक उमदे घोडेस्वार असल्यामुळें त्यांस क्याव्हेलियर (Cavalier) हें नांव पडलें. पार्लमेंटाकडील लोक केंसांचे झुबके न राखितां केंस कापीत; त्यावरून त्यांस राउण्डहेड (Roundhead) हें नांव पडलें.

२. **क्रॉम्वेलचा उदय व स्कॉटिश लोकांशीं सख्य.** युद्धांत पहिल्यानें राजाची सरशी झाली. पहिल्याच वर्षीं शालग्रूव्ह येथें झालेल्या चकमकींत लोकपक्षाकडील हॅम्पडन हा पुढारी कामास आला व त्यामुळें लोकपक्षाचें मोठें नुकसान झालें. इतक्यांत दोन गोष्टी अशा घडून आल्या कीं, त्यामुळें पार्लमेंटची पडती बाजू चांगलीच सावरली. पहिली गोष्ट म्हणजे ऑलिव्हर क्रॉम्वेल या सेनापतीचा उदय झाला. प्यूरिटन लोकांमध्यें स्वातंत्र्यवादी ( इन्डिपेन्डन्ट ) नांवाचा धर्मशील, तेजस्वी व बलवान् पंथ निघाला

होता. या इन्डिपेन्डन्ट लोकांना बिशपच्या सत्तेबद्दल अत्यंत तिटकारा होता व प्रार्थनेसाठीं एकत्र जमणाऱ्या ज्या त्या मंडळीला आपलीं धर्ममतें व आचार कायम करण्याची पूर्ण मोकळीक असावी अशी त्यांची दृढ समजूत होती. ऑलिव्हर क्रॉम्वेल या पंथाचा पक्का अनुयायी होता. युद्ध सुरू झाल्यावर त्याला स्वारांच्या पथकावरील अधिकाऱ्याची जागा मिळाली. लवकरच त्यानें आपल्या पूर्वपरगण्यांतील स्वारांच्या पलटणीस उत्तम लष्करी शिक्षण देऊन इतकें तरबेज केलें कीं युद्धांत त्याच्या पलटणीस कोठेंही हार खावी लागली नाहीं, व तिला पोलादी पलटण ( Ironsides ) हें नांव पडलें. पार्लमेंटला अनुकूल अशी दुसरी गोष्ट म्हणजे इंग्लिश पार्लमेंटनें स्कॉटिश पार्लमेंटशीं असा करारनामा केला कीं, प्रस्तुत युद्धांत परस्परांनीं परस्परास मदत करावी. स्कॉटिश लोकांच्या साहाय्याबद्दल मोबदला म्हणून इंग्लंडमध्यें प्रेस्बिटीरियन धर्मपद्धति सुरू करण्याचें इंग्लिश पार्लमेंटनें वचन दिलें (१६४३ सप्टेंबर). हा तह 'धार्मिक जूट व करारनामा' ( Solemn League and Covenant सॉलेम लीग अँड कव्हेनंट ) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

३. **मार्स्टनमूरची लढाई.** १६४३ च्या डिसेंबरांत लोकपक्षाचा पुढारी पिम वारला; तथापि वर सांगितलेल्या कारणांनीं यापुढें लोकपक्षास जयच येत गेला. तहास अनुसरून १६४४त स्कॉटिश सैन्य इंग्लंडांत उतरलें. लवकरच राजाचें सैन्य व पार्लमेंटचें सैन्य यांजमध्यें मार्स्टनमूर येथें मोठी लढाई झाली ( २ जुलै १६४४ ) तींत क्रॉम्वेलच्या पथकानें मोठा पराक्रम गाजविला. त्यामुळें पार्लमेंटच्या बाजूस यश आलें.

४. **नवीन नमुनेदार सैन्य.** पुढें क्रॉम्वेलनें पार्लमेंटच्या सर्व सैन्याची सुधारणा केली. त्यानें सैन्यांतील नादान व पोटभरू लोक काढून टाकून बाणेदार व पापभीरु लोकांची भरती केली; आणि

सर्व सैन्यास कवाईत शिकवून शिस्त लाविली. अशा रीतीनें पार्लमेंटच्या बाजूस निवडक वीस हजार लोकांचें 'नवीन नमुनेदार सैन्य' ( New Model Army ) तयार झालें. हें सैन्यच हल्लींच्या ब्रिटिश खड्या फौजेचें मूळ होय.

५. **नेस्बीची लढाई.** नंतर आपल्या सुधारलेल्या सैन्यानिशीं क्रॉम्वेलनें चार्लसचा नेस्बी येथें पूर्ण पराभव केला ( १६४५ जून ). या नेस्बीच्या लढाईनें राजपक्षाचा चुराडाच झाला. स्कॉटलंडांत मॉन्ट्रझनें चार्लसच्या वतीनें बंड उभारिलें होतें, त्याचा या वेळींच मोड झाला. यापुढें चार्लस स्कॉटिश सेनापतीच्या स्वाधीन झाला ( १६४६ मे ). स्कॉटिश धर्मपद्धति ( प्रेस्बिटीरियन पद्धति ) आपणास मान्य असून तिचा अंमल आपण इंग्लंडांत करूं असें वचन स्कॉटिश सैन्यानें चार्लसपाशीं मागितलें. परंतु तसें करण्याचें चार्लसनें नाकारल्यावरून स्कॉटिश लोकांस त्वेष आला, व चार्लसला इंग्लिश पार्लमेंटच्या हवालीं करून ते स्कॉटलंडांत परत निघून गेले.

६. **पार्लमेंट पक्षांत फूट, स्कॉटिश स्वारी.** इंग्लिश पार्लमेंटांत प्रेस्बिटीरियन व सैन्याचा पक्षपाती इन्डिपेन्डन्ट असे दोन पक्ष असून प्रेस्बिटीरियनांचें बहुमत होतें. आपण लढाई जिंकली असल्यामुळें सैन्याची आतां कांहीं जरूर नाहीं असें प्रेस्बिटीरियन म्हणूं लागले, व राजाशीं समेटाचीं बोलणीं बोलूं लागले. अर्थातच सैन्य व प्रेस्बिटीरियन यांजमध्यें तेढ आली. लागलीच सैन्यानें चार्लसला पार्लमेंटच्या ताब्यांतून आपल्या ताब्यांत घेतलें. पुढें चार्लसनें स्कॉटिश लोकांशीं गुप्तपणें सूत्रें लाविलीं. त्यानें स्कॉटिश लोकांस असें वचन दिलें कीं, "मी इंग्लंडमध्यें प्रेस्बिटीरियन मत तीन वर्षेंपर्यंत अंमलांत आणीन" तेव्हां स्कॉटिश लोकांनीं राजातर्फे इंग्लंडवर स्वारी करण्याचें ठरविलें. १६४८च्या एप्रिलांत एक मोठें स्कॉटिश सैन्य इंग्लंडवर चालून आलें व पुनः युद्ध सुरू झालें. पण क्रॉम्वेलनें

प्रेस्टन येथें स्कॉटिश सैन्याशीं गांठ घातली व त्याचा पुरा मोड केला. नंतर क्रॉम्वेलचें विजयी सैन्य लंडनला परत आलें.

७. **चार्लसला शिक्षा.** इकडे प्रेस्बिटीरियनांनीं राजाशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं होतीं. पण सैन्याच्या पुढाऱ्यांस विश्वासघातकी राजाशीं तह करणें मुळींच पसंत नव्हतें. लागलीच क्रॉम्वेलच्या आज्ञेवरून कर्नल प्राइड यानें कॉमन्ससभेंतील प्रेस्बिटेरियन सभासदांस सभेंतून हाकून दिलें. यासच इतिहासांत प्राइडनें केलेली हकालपट्टी ( Pride's Purge ) असें नांव पडलें आहे. यापुढें सैन्याच्या मताचें पक्षपाती असे सभासदच काय ते पार्लमेंटचे घटक म्हणून राहिले. लॉर्डसची सभा तर बंद झाली. त्यावरून या पार्लमेंटास लांडी पार्लमेंट ( Rump, रम्प ) असें नांव पडलें. नंतर रम्पनें राजाची चौकशी करण्याकरितां एक जादा कोर्ट नेमिलें. ब्रॅडशॉ नांवाचा वकील त्याचा अध्यक्ष होता. चार्लसनें या कोर्टापुढें कोणताही जबाब देण्याचें नाकारिलें. एक आठवडाभर खटला चालवून कोर्टानें पार्लमेंटशीं बेजबाबदारपणें युद्ध चालवून हजारों निरपराधी लोकांचा रक्तपात केल्याच्या आरोपावरून चार्लसला दोषी ठरविलें व फांशीची शिक्षा फर्माविली. पुढें तीन दिवसांनीं ती शिक्षा अंमलांत आली ( ३० जानेवारी १६४९ ).

८. **युद्धाचा उपसंहार.** येणेंप्रमाणें चार्लस व पार्लमेंट यांजमधील तंटा विकोपास गेला, तेव्हां लोकपक्षांत फूट पडली. प्रेस्बिटीरियन व प्रस्थापित पंथ असे दोन पक्ष होऊन प्रस्थापित पंथवाल्यांनीं राजाची बाजू धरिली. त्यामुळें युद्ध करण्यास राजास संधी मिळाली. पुढें युद्धाच्या वेळीं पार्लमेंटच्या बाजूस सैन्य प्रबल होऊन त्यानें राजपक्षावर जय मिळविला. याचा परिणाम असा झाला कीं राजाबरोबर पार्लमेंटही हतप्रभ झाली व सर्व खरीखुरी सत्ता सैन्याच्या हातीं गेली.

# १९. अनभिषिक्त राजा.

१. **प्रजासत्ताकाची स्थापना.** चार्लसची शिक्षा अंमलांत आल्यावर रम्पनें राजा ही पदवी रद्द ठरवून लॉर्डांची सभा मोडून टाकिली, आणि सर्व सत्ता कॉमन्ससभेच्या हातीं ठेवून अंमलबजावणी करण्याकरितां एक कार्यकारी मंडळ ( Council of State ) नेमिलें. ब्रॅडशॉ हा या मंडळाचा अध्यक्ष होता. प्रसिद्ध कवि मिल्टन यास परराष्ट्रीय प्रधानाची जागा मिळाली. देशांतील खरीखुरी सत्ता खड्या फौजेच्या हातीं असून ऑलिव्हर क्रॉम्वेल हा सैनिकांच्या गळ्यांतील ताईत होता. तेव्हां स्वाभाविकपणेंच सर्व राज्याधिकार क्रॉम्वेलच्या हातीं आला.

२. **आयर्लंड व स्कॉटलंड येथील बंडांचा मोड.** आयर्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश प्रजासत्ताक सरकारचा अधिकार मानीत ना. तेव्हां तेथें आपला अंमल बसविणें हीच पहिली गोष्ट प्रजासत्ताकास करावी लागली. १६४१ सालीं आयरिश क्याथॉलिकांनीं हजारों इंग्रज प्रॉटेस्टंटांची कत्तल केली होती. त्यानंतर इंग्लंडांत युद्ध चालू झाल्यामुळें इंग्रजांचें तिकडे दुर्लक्ष झालें. आतां प्रजासत्ताकानें आयर्लंडांत आपली सत्ता प्रस्थापित करण्याकरितां क्रॉम्वेलला आयर्लंडांत पाठविलें. १६४९च्या ऑक्टोबर महिन्यांत क्रॉम्वेलनें आयर्लंडांत पाय ठेविला, आणि सहा महिन्यांच्या आंत राजपक्षीयांचीं हाडें खिळखिळीं करून सर्व देश चीत करून सोडिला. ड्रॉघेडा हें ठाणें त्यानें तेव्हांच सर केलें व तेथील शिबंदीची कत्तल केली. ज्यांनीं ज्यांनीं शस्त्र उचललें त्यांना असेंच कडक शासन मिळालें. मग आपला जांवई आयर्टन यास आयर्लंडचा बंदोबस्त करण्यास ठेवून क्रॉम्वेल परत इंग्लंडांत आला. पुढें पुष्कळ क्याथॉ-

लिकांस व राजपक्षीयांस आयर्लंडांतून हुसकून त्यांच्या जमिनी इंग्लिश लष्करी शिपायांस देण्यांत आल्या. आयर्लंडांतून परत आल्यावर स्कॉटलंडांत क्रॉम्वेलची रवानगी झाली. चार्लसचा शिरच्छेद झाल्यावर स्कॉटिश लोकांनीं चार्लसचा वडील मुलगा चार्लस यास स्कॉटलंडांत पाचारण केलें, व त्याला 'दुसरा चार्लस' ह्मणून राज्याभिषेक केला. क्रॉम्वेल स्कॉटलंडांत गेल्यावर लवकरच डन्बार येथें त्याची व स्कॉटिश लोकांची गांठ पडली; जंगी युद्ध होऊन स्कॉटिश लोकांचा पूर्ण पराभव झाला ( ३ सप्टेंबर १६५० ). नंतर एडिन्बरो आदिकरून शहरें काबीज करून स्कॉटलंडवर क्रॉम्वेलनें आपली सत्ता बसविली. इतक्यांत इंग्लिश राजपक्षीय आपल्यास मिळतील या आशेवर राजपुत्र चार्लस इंग्लंडांत घुसला. पण अपेक्षेप्रमाणें राजपक्षीय त्याला येऊन मिळाले नाहींत. क्रॉम्वेलनें त्याचा पाठलाग केला व वूर्स्टर येथें त्याला गांठून त्याचा पुरा मोड केला ( ३ सप्टेंबर १६५१ ). या वेळीं चार्लस शत्रूच्या तडाक्यांतून मोठया शर्तीनें वांचला. नाना प्रकारचे वेष धारण करून भटकत असतां अखेर दक्षिण किनाऱ्यास पोंचून तेथून तो फ्रान्सला जाऊन पोंचला. स्कॉटलंडांत क्रॉम्वेलनें जनरल मंक यास ठेविलें होतें. त्यानें लवकरच तो सर्व देश काबीज केला व इंग्लंडचा अंमल तेथें कायम केला.

३. **हॉलंडशीं युद्ध.** या सुमारास हॉलंडशीं इंग्लंडचा तंटा सुरू झाला. पहिल्या चार्लसचा जांवई वुइल्यम हा हॉलंडच्या प्रजासत्ताक राज्याचा मुख्याधिकारी होता. अर्थात् चार्लसच्या वधानंतर इंग्लंडांतून पळून गेलेल्या राजपक्षीयांचें हॉलंड हें आश्रयस्थान झालें. शिवाय या दोन देशांमधील वैरास व्यापारविषयक चुरस हें एक कारण होतें. इतर देशांचा माल समुद्रावरून नेण्याचें काम डच जहाजें करीत, त्यामुळें वाहतुकीचा व्यापार ( Carrying trade )

डचांच्या हातीं असे. तेव्हां इंग्लिश पार्लमेंटनें असा कायदा केला कीं, "इंग्लंडला येणारा माल एक तर इंग्लिश गलबतांतून यावा किंवा ज्या देशांत तो माल तयार झाला त्या देशाच्या गलबतांतून यावा" ( ऑक्टोबर १६५१ ). इंग्लंडचा दर्यावरील व्यापार वाढण्यास हाच नौकानिर्बंधाचा कायदा ( Navigation Act ) कारणीभूत झाला. या कायद्यामुळें डच लोकांचें नुकसान होऊं लागलें. तेव्हां इंग्रज-डचांमध्यें मोठें युद्ध सुरू झालें ( १६५२ ). तें दोन वर्षेंपर्यंत चाललें. ब्लेक या नाविकाच्या पराक्रमामुळें शेवटीं इंग्रजांची सरशी झाली. १६५४मध्यें दोन्ही राष्ट्रांत तह होऊन डचांनीं नौकानिर्बंधाच्या कायद्यास संमति दिली व राजपक्षीय लोकांना हॉलंडांत मदत न मिळूं देण्याचें कबूल केलें.

४. **रम्पची हकालपट्टी.** प्रजासत्ताकाची नामधारी चालक रम्प ही लाँग पार्लमेंटचा अवशिष्ट भाग होती. तिला स्वतःच्या बरखास्तीचा ठराव पास करण्यास क्रॉम्वेलनें सांगितलें ( १६५३ ). तसें करण्यापूर्वीं नवीन पार्लमेंटांत आपल्याच हातीं अधिकार रहावा या उद्देशानें नवीन पार्लमेंटांत रम्पचे सर्व सभासद कायम रहावेत असा ठराव रम्प पास करूं लागली. तेव्हां क्रॉम्वेलनें पार्लमेंटगृहास सैन्याचा गराडा दिला व सर्व सभासदांस हांकून दिलें. मग सभागृहास कुलूप ठोकून क्रॉम्वेल चालता झाला ( २० एप्रिल १६५३ ). दुसऱ्या दिवशीं एका राजपक्षीयानें 'हें घर भाड्यानें देणें आहे' अशी जाहिरात त्या सभागृहाच्या दरवाजावर डकविली.

५. **बेअरबोन्स पार्लमेंट.** रम्पची हकालपट्टी झाली त्याच दिवशीं कार्यकारी मंडळास रजा देण्यांत आली. मग सैन्यावरील आठ अधिकारी व चार मुलकी अधिकारी अशा बारा अधिकाऱ्यांचें मंडळ स्थापून क्रॉम्वेल त्याचा मुख्य झाला व सर्व सत्ता या मंडळाच्या हातीं आली. या मंडळानें एकशेंछपन्न लोकांची एक पार्लमेंट

बोलाविली. बेअरबोन्स ( Barebones ) नांवाचा एक चांभार सभासद या पार्लमेंटचा म्होरक्या होता, त्यावरून हीस 'बेअरबोन्स पार्लमेंट' असें नांव आहे. हींतील सभासद धार्मिक व सुस्वभावी होते. पण व्यवहारज्ञान व राजकारण यांचा त्यांस गंधही नव्हता. तेव्हां त्यांनीं दोन चार महिन्यांत क्रॉम्वेलच्या हातीं अधिकार देऊन आपल्या जागेचे राजीनामे दिले.

६. **क्रॉम्वेलचा राज्यकारभार.** यानंतर सैन्यांतील कामगारांनीं कारभारास आधारभूत असें एक घटनापत्रक ( Instrument of Government ) तयार केलें. त्यावरून इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तिन्ही देशांतून निवडून आलेल्या सभासदांची एक पार्लमेंट भरवावयाची व तिनें कायदे करावयाचे असें ठरलें; तसेंच क्रॉम्वेल यास संरक्षक ( Protector ) नेमण्यांत येऊन सर्व राज्याधिकार त्याच्या हातीं देण्यांत आला. या घटनापत्राबरहुकूम पहिली पार्लमेंट १६५४च्या सप्टेंबरांत भरली; परंतु तिच्याशीं क्रॉम्वेलचें पटलें नाहीं व पांच महिन्यांत त्यानें ती बरखास्त करून टाकिली. नंतर क्रॉम्वेलनें उघड लष्करी अंमल सुरू केला. देशाचे बारा भाग करून प्रत्येक भागावर त्यानें एक एक लष्करी अधिकारी सुभेदार नेमिला. हा लष्करी अंमल इंग्लिश जनतेस अत्यंत अप्रिय झाला. तेव्हां क्रॉम्वेलनें संरक्षक या नात्यानें दुसरी पार्लमेंट बोलाविली ( १६५६ ). तिनें त्याला राजा ही पदवी घेण्याची विनंति केली व आपला वारस नेमण्याचा अधिकार दिला. सैन्याला राजपदाबद्दल अत्यंत चीड होती म्हणून क्रॉम्वेलनें राजा ही पदवी घेण्याचें नाकारिलें. मात्र त्यानें आपल्यामागें आपला मुलगा रिचर्ड यास संरक्षकाच्या जागेकरितां वारस नेमिलें.

७. **क्रॉम्वेलचें धार्मिक व परराष्ट्रीय धोरण.** क्रॉम्वेलनें दोन बाबतींत मोठी कामगिरी केली. त्यानें सवलतीचें धार्मिक धोरण

स्वीकारिलें, व निरनिराळ्या पंथांच्या लोकांस आपल्या मताप्रमाणें प्रार्थना करण्याची मोकळीक दिली. तथापि प्रस्थापित धर्मवाल्यांचा चार्लस स्टुअर्टला परत आणण्याचा हेतु असल्यामुळें एलिझबेथच्या वेळचें प्रार्थनापुस्तक वापरण्याची बंदी होती व क्याथॉलिकांना सार्वजनिक रीतीनें प्रभुभोजन करितां येत नसे. तसेंच जोरदार परराष्ट्रीय धोरण स्वीकारून इंग्लंडच्या नांवाचा दरारा क्रॉम्वेलनें एलिझबेथच्या वेळेप्रमाणें युरोपवर बसविला. 'वेस्ट इंडीज' मधील जमेका हें स्पेनच्या ताब्यांतील महत्त्वाचें बेट इंग्लंडनें घेतलें ( १६५५ ). प्रॉटेस्टंटांस उदारपणानें वागविण्याविषयीं वचन घेऊन क्रॉम्वेलनें फ्रान्सशीं सख्य केलें. मग इंग्रज-फ्रेंचांच्या फौजा स्पॅनिश नेदर्लंड्सवर चालून गेल्या. स्पेनच्या ताब्यांतील डन्कर्क हें ठाणें काबीज करण्यांत येऊन तें इंग्रजांस मिळालें ( १६५८ ).

८. **क्रॉम्वेलची कर्तबगारी.** क्रॉम्वेलचे शेवटचे दिवस मोठ्या कष्टांत गेले. राजपक्षीय त्याचा द्वेष करीत होतेच, तशांत प्रेस्बिटीरियन लोक त्याच्याविरुद्ध चिडून गेले. त्याचा जीव घेण्यासाठीं अनेक कट झाले. तो काळजीनें अगदीं खंगला; शेवटीं ज्या तारखेस त्यानें डन्बार व वूर्स्टर येथील जय मिळविले होते त्याच तारखेस तो मृत्यु पावला ( ३ सप्टेंबर १६५८ ). पूर्व वयांत क्रॉम्वेल अगदीं अप्रसिद्ध असून त्यानें आपली कर्तबगारी चाळिशी उलटल्यावर आपल्या उतार वयांत दाखविली. तो मनाचा कठोर असून पहिल्या चार्लसपेक्षां त्याच्या हातून अधिक दडपशाहीचीं कृत्यें घडलीं. तथापि लोकहितासाठीं तीं कृत्यें करणें जरूर या बुद्धीनें त्यानें तीं केलीं. सेनापति व राज्यकर्ता या दोन्ही दृष्टींनीं तो अत्यंत कार्यक्षम असून आठ वर्षेंपर्यंत त्यानें इंग्लंडांत बेबंदशाही माजूं दिली नाहीं व इंग्लंडचा दरारा परदरबारीं चांगला बसविला, यावरून त्याची कर्तबगारी

दिसून येते. त्याची ईश्वरावर पूर्ण श्रद्धा असून सर्व गोष्टींत आपण देवकार्य करीत आहों अशी त्याची दृढ भावना होती.

९. **दुसऱ्या चार्लसचा लंडनांत प्रवेश.** ऑलिव्हर क्रॉम्वेलच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रिचर्ड हा संरक्षक बनला. परंतु त्याचे ठायीं बापाचें कर्तृत्व मुळींच नव्हतें त्यामुळें सगळीकडे अव्यवस्था माजली. तेव्हां रिचर्डनें आपल्या कामाचा राजीनामा दिला. या वेळीं लष्करी अंमलामुळें इंग्लिश जनता अगदीं त्रासून गेली होती. त्याचप्रमाणें सत्ता प्यूरिटन लोकांच्या हातांत असल्यामुळें त्यांनीं सर्व करमणुकीचीं साधनें बंद करून लोकांना रूक्ष राहाणी स्वीकारण्यास भाग पाडिलें होतें. लोकांस या कडक वृत्तीचा अगदीं कंटाळा आला होता. इतक्यांत क्रॉम्वेलनें स्कॉटलंडांत ठेविलेला जनरल मंक आपल्या सैन्यासह लंडनमध्यें आला. त्यानें लॉंग पार्लमेंटची बैठक बोलाविली व सर्व सभासदांस बोलावणें केलें ( १६६० ). तिनें पार्लमेंटची नवीन निवडणूक करावी असें ठरवून आपल्या बरखास्तीचा ठराव केला ( १६ मार्च १६६० ). अशा रीतीनें लॉंग पार्लमेंट रीतसरपणें बरखास्त झाली. पुढें जी कन्व्हेन्शन पार्लमेंट ( राजाच्या निमंत्रणावरून न बोलाविली गेलेली ) भरली तिनें पहिल्या चार्लसचा मुलगा चार्लस यास राजा म्हणून परत बोलवावें असा ठराव केला. नंतर राजा 'दुसरा चार्लस' यानें आपल्या वाढदिवशीं लंडनमध्यें मोठ्या थाटानें प्रवेश केला व राजसत्ता पुनः प्रस्थापित झाली ( २९ मे १६६० ).

## २०. पुनरागमन १६६०.

१. **आरंभींची व्यवस्था.** पार्लमेंटनें दुसऱ्या चार्लसला परत बोलाविलें होतें; तेव्हां यापुढें पार्लमेंट व राजा असे दोघे मिळून राज्य-

व्यवस्था करणार हें उघड होतें व पार्लमेंटला रजा देऊन राजा केवळ स्वच्छंदानें राज्यकारभार चालविणार असा फारसा संभव नव्हता. स्कॉटलंड, आयर्लंड व इंग्लंड या सर्वांची प्रजासत्ताकाच्या काळीं एकच पार्लमेंट होती व तिन्ही देशांचें एक राष्ट्र म्हणून राज्य चाललें होतें. आतां ही व्यवस्था रद्द होऊन स्कॉटलंड व आयर्लंड या दोन्ही देशांत पुनः निराळ्या पार्लमेंट सभा भरूं लागल्या. सैन्याचा पगार देऊन त्याला रजा देण्यांत आली. मात्र राजाच्या शरीररक्षणासाठीं म्हणून ५००० खडी फौज कायम ठेवण्यांत आली. पहिल्या चार्लसविरुद्ध युद्धांत सामील झालेल्या लोकांस माफी मिळाली. मात्र चार्लसला ज्या कोर्टानें फांशीची शिक्षा फर्माविली त्यांतील न्यायाधीश या माफीच्या नियमास अपवाद होत असें पार्लमेंटनें ठरविलें. त्यांपैकीं कित्येकांचा वध झाला. या शिक्षेंतून मृतांचीसुद्धां सुटका झाली नाहीं. क्रॉम्वेल, आयर्टन, ब्रॅडशॉ, यांच्या हाडांचे सांपळे थडग्यांतून उकरून काढण्यांत येऊन त्यांना एक दिवसभर फांसावर लोंबकळत ठेवण्यांत आलें.

२. **दुसऱ्या चार्लसचा स्वभाव व धोरण.** दुसरा चार्लस मोठा धूर्त व हुशार होता. बरींच वर्षें त्याला मोठ्या कष्टांत घालवावीं लागलीं. आतां सुदैवानें त्याला इंग्लंडची गादी लाभली. तेव्हां पार्लमेंटशीं तंटा न करितां साधेल तितका पैसा मिळवून आपलें आयुष्य चैनींत घालविण्याचा त्यानें विचार केला. या वर्तनक्रमामुळें 'रंगेल राजा' (Merry Monarch) म्हणून तो प्रसिद्ध आहे. प्यूरिटनांच्या अंमलातील रूक्ष राहाणीचा जनतेस कंटाळा आल्यामुळें पुनरागमनानंतर चैनीस व रंगेलपणास इंग्लंडांत ऊत येऊन लोकसमाज अत्यंत सुखलोलुप बनला.

३. **राजाचा खर्च.** मध्ययुगांतील सरंजामी पद्धति त्या युगाबरोबरच प्रचारांतून गेली होती; तेव्हां पार्लमेंटनें राजाचें सरंजामी

उत्पन्न बंद केलें व प्रजेवर जमिनीवरील कराशिवाय इतर बोजा पडणार नाहीं अशी व्यवस्था केली. कमी पडणारें उत्पन्न भरून काढण्याकरितां लॉंग पार्लमेंटनें देशांतील दारूवर जो अन्तर्गत कर बसविला होता (Excise Duty) तो पार्लमेंटनें कायम केला. शिवाय टनेज व पौंडेज हा कर वसूल करण्याची परवानगी दिली. तेव्हां खाजगी जमिनीचें उत्पन्न, अन्तर्गत कर आणि टनेज व पौंडेज अशी बारा लक्ष पौंडांची वार्षिक नक्त नेमणूक हयातीपर्यंत राजास देण्याचें ठरलें.

४. **धार्मिक व्यवस्था.** १६६१त चार्लसनें पहिली पार्लमेंट बोलाविली. हिच्यांत बहुतेक सभासद क्याव्हेलिअर होते व त्यांच्या राजनिष्ठेला भर आला होता. प्रजासत्ताकाच्या काळांत प्यूरिटन पंथाच्या हातांत धर्मसूत्रें होतीं. आतां क्याव्हेलिअर लोक प्रस्थापित धर्माचे (Episcopacy) मोठे अभिमानी होते व त्यांनीं 'बिशप व प्रार्थनापुस्तक' यांची पुनः स्थापना केली. एडवर्ड हाइड यानें दुसऱ्या चार्लसबरोबर हद्दपारी भोगली होती. दुसऱ्या चार्लसबरोबर तो इंग्लंडांत परत आला. चार्लसनें त्याला अर्ल ऑफ क्लॅरेन्डन ही पदवी दिली व आपला मुख्य मंत्री नेमिलें. हाइडनें आपली मुलगी ॲन हिचा विवाह दुसऱ्या चार्लसचा भाऊ जेम्स, ड्यूक ऑफ यॉर्क याजबरोबर केला व त्यामुळें त्याचें राजघराण्याशीं अधिक संघट्टण झालें. क्लॅरेन्डन प्रस्थापित धर्माचा कट्टा अनुयायी असल्यामुळें इंग्लंडमध्यें जे नाना धर्मपंथ उत्पन्न झाले होते ते नाहींतसे करून एपिस्कोपसीची छाप इंग्लंडवर बसवावी अशी त्याची मनापासून इच्छा होती. यासाठीं पार्लमेंटकडून त्यानें चार कायदे *पास करून घेतले. या सर्व

*म्युनिसिपालिटीच्या सभासदांनीं प्रस्थापित धर्माचा स्वीकार केल्याची शपथ घ्यावी असें ठराविणारा कॉर्पोरेशन ॲक्ट; २ सर्व धर्मगुरूंनीं चालू प्रार्थनापुस्तक वापरावें असें फर्माविणारा ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी; ३ एपिस्कोपसी मान्य न करणाऱ्या पांचांहून अधिक व्यक्तींनीं

कायद्यांना मिळून क्लॅरेन्डन-कोड हें नांव आहे. हे कायदे मोडल्याबद्दल शेंकडों *नॉन्कन्फॉर्मिस्टांस तुरुंगवासाची शिक्षा झाली. या लोकांत जॉन बनियन हा धर्मप्रचारक असून त्यानें बारा वर्षेंपर्यंत बेडफर्डच्या कैदखान्यांत तुरुंगवास भोगिला. तेथें असतां त्यानें 'यात्रेकरूचा प्रवास' (Pilgrim's Progress) हें इंग्लिश वाङ्मयांतील प्रसिद्ध पुस्तक लिहिलें.

५. **डच युद्ध.** समुद्रावरील व्यापारासंबंधीं इंग्रज व डच यांच्यामध्यें मोठी चुरस होती. त्यामुळें प्रजासत्ताकाच्या अमदानींत या दोन देशांमध्यें एक युद्ध झालें. दुसरा चार्लसही इंग्लंडचे व्यापारविषयक हक्क राखण्यासाठीं जपत असे. तेव्हां फ्रान्सशीं मैत्री राखावयाची व हॉलंडवर वचक ठेवावयाचा असें इंग्लंडचें धोरण बनून गेलें. अर्थात् इंग्लंड व हॉलंड यांच्यामध्यें १६६५त नाविक युद्ध सुरू झालें. त्यांत दोन्ही बाजू मोठया चुरशीनें लढल्या. एकदां डच आरमारानें मेड्वे नदीच्या मुखांत प्रवेश करून चॅथम येथील गोदामांतील जहाजें जाळलीं. तथापि युद्धांत एकंदरीनें इंग्लंडचीच

---

एके ठिकाणीं जमावयाचें नाहीं असा हुकूम करणारा 'कॉन्व्हेन्टिकल ॲक्ट'; ४ इतर पंथांच्या धर्मोपदेशकांना म्युनिसिपल गांवाच्या आसपास पांच मैल येऊं न देणारा 'फाइव्ह माइल ॲक्ट'.

*१६६२नंतर पुष्कळ प्यूरिटन लोकांनीं आपला प्रस्थापित धर्माशीं असलेला संबंध तोडिला व निराळे धर्मसंघ स्थापिले. तेव्हां त्यांना नॉन्कन्फॉर्मिस्ट (Nonconformist; प्रस्थापित पंथ न अनुसरणारा) असें नांव पडलें. क्लॅरन्डन कोडची उत्पत्ति प्रस्थापित पंथ न अनुसरणाऱ्या प्रॉटेस्टंटांस नाहींतसे करण्यासाठीं होती. परंतु तो हेतु साध्य झाला नाहीं व पुढें एकोणिसाव्या शतकांत क्लॅरेन्डन कोडांतील कायद्यांची इतिश्री झाली (१८२८). नॉन्कन्फॉर्मिस्टांना डिसेंटर (Dissenter, अमान्यता दर्शविणारा) हें नांव दिलेलें आढळतें.

2002

सरशी झाली. शेवटीं ब्रेडा येथें तह ठरला ( १६६७ ). त्यांत अमेरिकेंतील व्हर्जिनिया व न्यू इंग्लंड यांच्यामध्यें असलेली डच वसाहत इंग्रजांस मिळाली. चार्लसचा भाऊ जेम्स, डयूक ऑफ यार्क हा ॲड्मिरल ( आरमारावरील मुख्य ) होता; त्याच्या नांवावरून त्या वसाहतीचें नांव न्यू यॉर्क असें ठेवण्यांत आलें. अमेरिकेंत या सुमारास इंग्रजांच्या आणखीही वसाहती झाल्या. दक्षिणेस एक वसाहत झाली. तीस चार्लस शब्दाचें लॅटिन रूप जें कार्लस त्यावरून क्यारोलिना हें नांव पडलें.

६. **प्लेग व अग्निप्रलय.** डच युद्ध चालू असतांच इंग्लंडवर दोन मोठया आपत्ति कोसळल्या. १६६५ च्या उन्हाळयांत लंडन शहरांत प्लेगची भयंकर सांथ सुरू झाली व तिनें हजारों लोकांचे बळी घेतले. पुढील वर्षीं मोठा अग्निप्रलय उडाला. शहराच्या निरनिराळ्या भागांतील शेंकडों घरें जळालीं; त्यांत अनेक सुंदर इमारती नष्ट झाल्या. या कहरापासून एक मात्र फायदा झाला. तो असा कीं, बळकट नव्या इमारती बांधल्या गेल्या व रस्तेही रुंद झाले. त्यामुळें शहरचें आरोग्य सुधारलें व तेथें रहाणें मोठें हितकर वाटूं लागलें. ख्रिस्टोफर रेन हा प्रसिद्ध शिल्पी (Architect) या वेळीं उदयास आला. त्यानें अनेक सुंदर इमारती बांधिल्या. ' सेंट पॉल्स क्याथीड्रल ' ही लंडनमधील भव्य इमारत त्याच्याच हातची होय.

७. **क्लॅरेन्डनची अधिकारच्युति.** पार्लमेंटामधील क्याव्हेलिअर सभासद प्रस्थापित पंथाचे अभिमानी असल्यामुळें त्यांना क्लॅरेन्डनकोड फार आवडलें. राजा व पार्लमेंट या दोघांनीं मिळून राजकीय सत्ता उपभोगावी असें क्लॅरेन्डनचें मत होतें. त्यामुळें त्यानें दोघांसही खूष ठेवून राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु ही गोष्ट फार वर्षें साधली नाहीं. क्लॅरेन्डन करारी व गंभीर स्वभावाचा असल्यानें राजा व क्याव्हेलिअर सभासद यांना त्याचा कंटाळा

आला. क्रॉम्वेलनें घेतलेल्या डन्कर्क बंदराचा इंग्लंडला तादृश फायदा नाहीं असें पाहून क्लॅरेन्डननें तें ठिकाण फ्रान्सला विकून टाकिलें. ही गोष्ट पार्लमेंटास आवडली नाहीं. पुढें डच युद्धांत डच अॅड्मिरल मेड्वेवर आला याबद्दलचा दोष राजानें त्याच्या माथीं मारला व त्याला मंत्रिपदावरून (Chancellorship) दूर केलें (१६६७). कॉमन्सनीं त्याची चौकशी आरंभिली, तेव्हां जीव बचावण्यासाठीं तो युरोपांत निघून गेला. पार्लमेंटनें त्याला यावज्जन्म हद्दपारीची शिक्षा सांगितली. हद्दपारींत त्यानें आपला प्रसिद्ध 'बंडाचा इतिहास' (History of the Rebellion) लिहिला. त्यांत पहिला चार्लस व पार्लमेंट यांजमधील युद्धाचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे.

---

## २१. राजाला लांच, पण देशाला जांच.

१. **कबॅल** (Cabal). क्लॅरेन्डनला रजा दिल्यावर राजानें आपल्या मर्जीतील पांच गृहस्थांचें एक मंत्रिमंडळ नेमिलें. त्यांत क्लिफर्ड, आर्लिंग्टन, बकिंगहॅम, अॅश्ले व लॉडरडेल हे पांचजण होते. त्यांचीं इंग्रजींत नांवें लिहून पहिलीं अक्षरें घेतलीं तर कबॅल (Cabal) हा शब्द तयार होतो. या शब्दाचा अर्थ गुप्त मंडळ असा आहे. तेव्हां या मंत्रिमंडळास कबॅल असें नांव पडलें. यांतील पांचांचा परस्परांशीं मुळींच मेळ नव्हता. ते एकमेकाविरुद्ध कारस्थानें करीत व राजा त्यांचेविरुद्ध गुप्त कारस्थानें करी. यावरून कबॅल म्हणजे 'पाजी लोकांचें कूट' असा अर्थ होऊन बसला आहे.

२. **गुप्त तह.** दुसरा चार्लस अत्यंत चैनी व विलासी असे. तेव्हां त्याला खाजगी व सरकारी खर्चास मिळून पार्लमेंटनें तोडून दिलेलें सालीना बारा लाख पौंडांचें उत्पन्न मुळींच पुरत नसे. म्हणून पैसा

मिळविण्याची त्यानें एक खाशी युक्ति काढिली. या वेळीं फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्या कारस्थानांस सुरवात झाली होती. लुईची महत्त्वाकांक्षा जबर असून स्पॅनिश नेदर्लंड्स ( बेल्जियम ) व हॉलंड हे देश जिंकावयाचे व फ्रान्सची ईशान्य सरहद्द ऱ्हाइन नदीला नेऊन भिडवावयाची असा त्याचा संकल्प होता. शिवाय लुई स्वतः क्याथॉलिक असल्यामुळें पश्चिम युरोपांतील प्रॉटेस्टंट मत समूळ खणून काढण्याचाही त्यानें बेत केला होता. १६७० सालीं चार्लसनें लुईशीं एक गुप्त तह केला. त्यांत चार्लसनें हॉलंडवर समुद्रावरून स्वारी करावी व इंग्लंडांत रोमन क्याथॉलिक धर्माचा प्रसार करावा असा करार होता. हीं कृत्यें करण्यास लागणारें द्रव्यबळ व मनुष्यबळ पुरविण्याचें लुईनें मोठ्या आनंदानें कबूल केलें.

३. **सवलतीचा जाहीरनामा व डच युद्ध.** पहिल्यानें क्याथॉलिक धर्मप्रसाराचा पहिला हप्ता म्हणून सवलतीचा जाहीरनामा (Declaration of Indulgence) चार्लसनें काढिला (१६७२). त्यायोगानें ‘ प्रस्थापित पंथाहून इतर पंथांच्या अनुयायांविरुद्ध— नॉन्कन्फॉर्मिस्ट व क्याथॉलिक यांच्याविरुद्ध--जे कडक कायदे केले आहेत त्यांचा अंमल करण्यांत येऊं नये ’ असें फर्मावण्यांत आलें. त्याचप्रमाणें चार्लसनें हॉलंडविरुद्ध युद्ध पुकारलें ( १६७२ ). तें युद्ध इंग्लिश जनतेस अगदीं अप्रिय होतें. लुईची महत्त्वाकांक्षा आतां लोकांच्या पक्की लक्षांत आली होती व फ्रान्सविरुद्ध हॉलंडासच आपण मदत केली पाहिजे असें इंग्रज म्हणूं लागले होते.

४. **कसोटीचा कायदा.** पुढील सालीं (१६७३) डच युद्धास पैसा मागण्यासाठीं चार्लसनें पार्लमेंटची तहकूब केलेली बैठक भरविली. ‘ सवलतीचा जाहीरनामा ’ चार्लसनें काढणें ह्मणजे पार्लमेंटचा कायदे करण्याचा हक्क बुडविण्यासारखेंच होतें. तेव्हां पार्लमेंटला

राजाचा फार राग आला, व तिनें जाहीरनाम्यावर जोराचा हल्ला केला. तेव्हां चार्लसला जाहीरनामा परत घेणें भाग पडलें. या वेळीं प्रस्थापित धर्मास बळकटी आणण्यासाठीं पार्लमेंटनें धर्म-कसोटीचा कायदा (Test Act) पास केला. त्याअन्वयें सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं आपण प्रॉटेस्टंट धर्माप्रमाणें प्रभुभोजन करूं अशी शपथ घ्यावी असें ठरलें. क्लिफर्ड हा क्याथॉलिक असल्यानें त्याला हा कायदा मान्य करितां येईना व त्यानें आपली प्रधानमंडळांतील जागा सोडिली. चार्लसचा भाऊ जेम्स, ड्यूक ऑफ यार्क यानेंही क्याथॉलिक पंथ स्वीकारला होता; त्यामुळें त्यालाही अॅडमिरलच्या जागेचा राजीनामा देणें भाग पडलें. अॅश्ले, अर्ल ऑफ शॅफ्ट्स्बरी हा यापुढें लोकपक्षाचा पुढारी बनला. अशा रीतीनें कबॅल धुळीस मिळालें, तसेंच हॉलंडशीं लवकरच तह करण्यास पार्लमेंटनें राजास भाग पाडिलें. (१६७४). अशा रीतीनें ' गुप्त तहां ' तील दोन्ही कलमांना हरताळ फांसला गेला.

५. **डॅन्बीचा कारभार**. कबॅल मोडल्यावर लॉर्ड डॅन्बी हा मुख्य प्रधान झाला (१६७३). त्यानें राजाची सत्ता दृढ करावयाची व प्रस्थापित धर्म पक्का करावयाचा हें क्लॅरेन्डनचें धोरण स्वीकारिलें. त्यानें पार्लमेंट आपल्या अंकित ठेवण्यास सभासदांस लांच भरण्याची एक नवीन युक्ति अंमलांत आणिली. डॅन्बीचें परराष्ट्रीय धोरण मात्र क्लॅरेन्डनच्या उलट होतें. इंग्लंडनें फ्रान्सचें केव्हांही मिंधें राहूं नये अशी त्याची खटपट होती. तेव्हां प्रॉटेस्टंट हॉलंडशीं सख्य दृढ करण्यासाठीं डॅन्बीनें जेम्स, ड्यूक ऑफ यॉर्क याची वडील मुलगी मेरी हिचा विवाह हॉलंडचा धुरीण ' वुइल्यम ऑफ ऑरेंज ' याशीं केला (१६७७ नोव्हेंबर). हा वुइल्यम चार्लसच्या वडील बहिणीचा मुलगा असून चौदाव्या लुईचा कट्टा शत्रु होता.

६. **क्याथॉलिकांविरुद्ध लोकमत**. चार्लसनें ' सवलतीचा

जाहीरनामा ’ काढिला होता, तेव्हांपासून रोमन क्याथॉलिक लोकांस फाजील स्वातंत्र्य मिळणार अशी इंग्रज लोकांची तक्रार होती. पुढें टायटस ओट्स नांवाच्या बदमाषानें अशी हूल उठविली कीं, ‘रोमन क्याथॉलिक लोकांनीं चार्लसचा खून करून जेम्स, ड्यूक ऑफ यॉर्क याची राज्यावर स्थापना करावयाची व प्रॉटेस्टंट धर्माचा नायनाट करावयाचा या हेतूनें एक कट केला आहे ’ (१६७८). तेव्हां क्याथॉलिक लोकांविरुद्ध लोकमत अतिशय क्षुब्ध झालें; व कित्येक क्याथॉलिक गृहस्थांस कटांत सामील असल्याच्या आरोपावरून फांशीं देण्यांत आलें. याच सुमारास चार्लस व डॅन्बी यांचीं फ्रेंच राजास मदत केल्याबद्दल पैशाची मागणी करणारीं पत्रें सांपडलीं. लागलीच पार्लमेंटनें डॅन्बीची चौकशी करण्याचा घाट घातला. तेव्हां राजानें त्यास वांचविण्याकरितां अठरा वर्षें बसलेली पार्लमेंट बरखास्त केली ( १६७९ जानेवारी ).

७. **शरीरसंरक्षणाचा कायदा.** पुनः जी पार्लमेंट भरली, तींत लोकपक्षाचें बहुमत होतें. या पार्लमेंटनें ‘ हेबिअस कॉर्पस अॅक्ट ’ हा महत्त्वाचा कायदा पास केला. या कायद्यानें अधिकाऱ्यांना कोणत्याही इसमास चौकशी केल्यावांचून अनियमित काळ अटकेंत ठेवण्याची बंदी झाली. १२१५तील मॅग्नाचार्टा, व १६२८तील पिटिशन ऑफ राइट यांच्या बरोबरीनें इंग्लंडच्या सनदशीर राज्यपद्धतीच्या इतिहासांत ‘ हेबिअस कॉर्पस अॅक्टा’ची गणना करणें योग्य होय. प्रत्येक मनुष्याचें नैसर्गिक स्वातंत्र्य कबूल करण्यांत येऊन न्यायाच्या नांवाखालीं व्यक्तिस्वातंत्र्यावर पडत असलेला घाला या कायद्यानें काढून टाकण्यांत आला. स्कॉटलंडची राणी मेरी, रॅले व लॉड हे चौकशीशिवाय किती वर्षें तरी तुरुंगांत कुजत पडले होते. पण यापुढें असा प्रकार झाल्याचें आढळून येत नाहीं.

८. **वारसारद्दीचें बिल.** पुढें इंग्लंडचें रोमन क्याथॉलिक धर्मा-

पासून कायमचें रक्षण करण्यासाठीं लोकपक्षाचा पुढारी शॅफ्ट्स्बरी यानें पार्लमेंटपुढें असें बिल आणिलें कीं,' जेम्स क्याथॉलिक असल्यामुळें त्याचा इंग्लंडच्या गादीवरील वारशाचा हक्क काढून टाकावा.' हें बिल पास होऊं नये म्हणून राजानें खूप खटपट केली व पार्लमेंट अनेक वेळां बरखास्त केली. परंतु शॅफ्ट्स्बरीनें हें वारसा-रद्दीचें बिल (Exclusion Bill, एक्सक्लूजन बिल) पास करून घेण्याचा अतिशय हट्ट धरिला. इतक्यांत क्याथॉलिकांचा कट खरा नसून त्यांत बराच भाग गप्पांचा आहे असें उघडकीस आलें. तेव्हां शॅफ्ट्स्बरीच्या पक्षाचा जोर कमी होऊं लागला. इकडे चार्लसलाही लुईनें दरसाल लांच देण्याचें वचन दिलें व त्यानें यापुढें पार्लमेंट न भरवितांच राज्य चालविण्याचा विचार केला ( १६८१ ). तसेंच शॅफ्ट्स्बरीवर राजद्रोहाबद्दल खटला चालू करण्याचें चार्लसनें ठरविलें. हें पाहून शॅफ्ट्स्बरी घाबरला व हॉलंडांत पळून गेला. तेथें तो एक वर्षानें मृत्यु पावला ( १६८३ ).

९ **व्हिग व टोरी.** वारसा–रद्दीच्या बिलावरील वादांतून इंग्लंडांतील दोन प्रमुख पक्षांस पडलेलीं नांवें निघालीं. बिल पास होऊं नये म्हणून चार्लस पार्लमेंट बोलावीत नसे. तेव्हां शॅफ्ट्स्बरीनें पार्लमेंट सभा बोलवा असें अर्ज इंग्लंडांतील सर्व भागांतून राजास करविले. त्यावरून शॅफ्ट्स्बरीच्या पक्षास अर्ज करणारे( Petitioners) असें पहिल्यानें म्हणूं लागले. पुढें स्कॉटिश करारनामा करणाऱ्या लोकांस देण्यांत आलेलें **व्हिग** हें नांव ' त्यांच्यासारखे तुम्ही राजद्वेष्टे आहांत ' याचें सूचक म्हणून प्रतिपक्षातर्फे त्यांना लावण्यांत येऊं लागलें. राजपक्षीय लोक व्हिग लोकांनीं केलेल्या अर्जांचा निषेध करीत. त्यावरून निषेध करणारे ( Abhorrers ) असें त्यांस नांव पडलें. ते रोमन क्याथॉलिकांचे कैवारी आहेत याचें सूचक असें आयरिश रोमन क्याथॉलिकांस लावण्यांत येणारें **टोरी** हें नांव

प्रतिपक्षी त्यांस लावूं लागले. पुढें व्हिग व टोरी हीं नांवें त्या त्या पक्षास कायम झालीं. व्हिग व टोरी हे पक्ष पूर्वीच्या राउण्डहेड व क्याव्हेलिअर या पक्षांचे अनुवादक असून हल्लींच्या लिबरल व कॉन्सर्व्हेटिव्ह या पक्षांचें जनकच म्हटले तरी चालतील. राजावर टीका करून धर्मस्वातंत्र्याचा कैवार घेण्याचें काम व्हिग पक्ष करी व त्याच्या उलट देशांतील जुन्या संस्था व प्रस्थापित धर्म यांचा कैवार घ्यावयाचा व राजावर टीका करावयाची नाहीं हें काम टोरी पक्ष करी.

१०. **दुसऱ्या चार्लसचा मृत्यु.** शॅफ्ट्स्बरी पळून गेल्यावर जोराची प्रतिक्रिया झाली व क्याथॉलिक कटांच्या गप्पांवर कोणाचाही विश्वास बसेना. शॅफ्ट्स्बरीच्या कित्येक कट्टया अनुयायांनीं चार्लसला ' राय हाऊस ' मध्यें गांठून ठार करण्याचा कट केला (१६८३). परंतु तो यशस्वी झाला नाहीं. या कटामुळें जनतेची सहानुभूति राजाकडे झुकली व चार्लस अतिशय लोकप्रिय झाला. व्हिग पक्षाच्या पुष्कळ पुढाऱ्यांस या कटांत सामील असल्याबद्दल देहान्त शिक्षा झाल्या. नंतर राजाचा भाऊ जेम्स, डयूक ऑफ यॉर्क हा क्याथॉलिक असूनही ॲड्मिरल पदारूढ झाला. पुढें जेम्स क्याथॉलिकांस उत्तेजन देऊं लागला, तेव्हां धूर्त चार्लस त्याला म्हणाला, " भाऊ, म्हातारपणीं वनवासांत जाण्याची मला इच्छा नाहीं. " यानंतर लवकरच चार्लस मरण पावला ( १६८५ ). पार्लमेंटशीं तंटा विकोपास जाऊं न देण्यांत त्याची स्वाभाविक हुशारी अनेक प्रसंगीं दिसून आली. मात्र तो अत्यंत स्वार्थसाधु व सुखलोलुप असल्यामुळें त्यानें आपल्या चैनीसाठीं इंग्लंडला फ्रान्सचा दास बनविलें. त्याचें लग्न पोर्तुगालची राजकन्या क्याथराइन हिजशीं झालें होतें (१६६२). तेव्हां सासऱ्याकडून चार्लसला मुंबई बेट अंदण मिळालें होतें. तें त्यानें १६६८त ईस्ट इंडिया कंपनीस दिलें. पूर्वी फ्रान्सिस बेकन यानें ' नोव्हम ऑर्ग्यानम ' ( Novum Organum ) हा ग्रंथ

लिहून 'अवलोकन व प्रयोग' या मार्गांचा अवलंब करून भौतिकशास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे असें ठांसून सांगितलें होतें. दुसऱ्या चार्लसनें 'रॉयल सोसायटी' स्थापन केली ( १६६२ ). तींत शोधक लोक जमत. प्रसिद्ध गणिती सर ऐझॅक न्यूटन हा या सोसायटीचा पहिल्यानें सभासद व पुढें चोवीस वर्षेंपर्यंत अध्यक्ष होता. अशा रीतीनें इंग्लंडांत शास्त्रीय ज्ञानाचा पाया घातला गेला.

---

## २२. दुसऱ्या जेम्सची दडपशाही.

१. **दुसऱ्या जेम्सचा स्वभाव.** दुसऱ्या चार्लसनंतर त्याचा भाऊ जेम्स हा 'दुसरा जेम्स' ही पदवी घेऊन गादीवर बसला (१६८५). त्याचें मन संकुचित असून स्वभाव हट्टी होता. तो रोमन क्याथॉलिक होता व इंग्लंडांतील जनता प्रॉटेस्टंट होती; शिवाय जेम्सच्या ठिकाणीं दूरदर्शित्व व उदारपणा यांचा अभाव असल्यामुळें त्याचा प्रजेशीं तंटा होणें साहजिक होतें. तथापि आपल्याला व्यक्तिशः क्याथॉलिक धर्म पाळूं दिल्यास आपण राष्ट्राच्या प्रस्थापित धर्मांत ढवळाढवळ करणार नाहीं असें जेम्सनें वचन दिलें; व राजा ईश्वरी नियमानुसार वारशाच्या हक्कानें गादीवर येतो या तत्त्वावर प्रस्थापित धर्माच्या कट्टया अनुयायांचा दृढ विश्वास असल्यामुळें त्यांनीं मोठ्या खुषीनें जेम्सला राजा म्हणून मान्य केलें. जेम्सनें आपल्या भावाच्या वेळचे टोरी प्रधानच कायम केले. पार्लमेंट भरली, तींत टोरी पक्षाचें बहुमत असल्यामुळें तिनें एकोणीस लक्ष पौंडांचें उत्पन्न राजास तहाहयात तोडून दिलें.

२. **मन्मथचें बंड.** आपलें पार्लमेंटांत कांहीं चालत नाहीं असें पाहून व्हिग पक्षानें बंडाचा मार्ग धरिला. दुसऱ्या चार्लसचा दासी-

पुत्र मन्मथ यानें पूर्वीं वारसा-रद्दीच्या बिलाच्या वेळीं शॅफ्ट्स्बरीशीं संगनमत करून जेम्स बेवारस ठरल्यावर आपल्याला गादी मिळावी अशी खटपट केली होती. मन्मथ देखणा व रंगेल असून लोकप्रिय होता. त्यानें लष्करी सामर्थ्याच्या जोरावर गादी मिळविण्याचा विचार केला. डॉर्सेटशायरमध्यें तो उतरला आणि त्यानें आपण देशाचे कायदे, प्रजेचे हक्क व प्रॉटेस्टंट धर्म यांच्या संरक्षणार्थ आलों आहों असा जाहीरनामा काढिला. पुष्कळ गरीब शेतकरी व खाणींतील मजूर त्याला मिळाले. लवकरच सेजमूर येथें राजाच्या सैन्याशीं त्याची गांठ पडली. लढाई झाली, तींत मन्मथचा पूर्ण पराभव होऊन तो पकडला गेला व पुढें लवकरच त्याचा शिरच्छेद झाला. ही लढाई ६ जुलै १६८५ रोजीं झाली. इंग्लंडच्या भूमीवर झालेली हीच शेवटची लढाई होय. मन्मथच्या अनुयायांस कडक शिक्षा झाल्या. जेफ्रिझ नांवाच्या रुधिरप्रिय न्यायाधिशानें शेंकडों लोकांस फांशीची शिक्षा ठोठावली; त्यावरून रक्तमय दौरे ( Bloody assizes ) या नांवानें जेफ्रिझच्या कोर्टाच्या बैठकींची प्रसिद्धि आहे. या कामगिरीबद्दल जेफ्रिझचा राजानें बहुमान केला व लॉर्ड चॅन्सेलर ( मुख्य न्यायाधीश ) नेमून त्याचा मोठा गौरव केला.

३. **क्याथॉलिकांस राजाश्रय**. याप्रमाणें बंडाचा मोड होऊन आपलें राजपद स्थिर झालेलें पाहतांच जेम्सनें आपल्या धार्मिक धोरणांत बदल केला. आपण क्याथॉलिक असतां राज्यांतील एकाही जागेवर क्याथॉलिक अधिकारी नसावा याचें जेम्सला फार वैषम्य वाटलें. लागलीच त्यानें पार्लमेंटकडून टेस्ट-अॅक्ट ( धर्मकसोटीचा कायदा ) रद्द करून घेण्याची खटपट चालविली. पण टोरी लोक प्रस्थापित धर्माचे कट्टे अनुयायी असल्यामुळें पार्लमेंटनें टेस्ट-अॅक्ट रद्द करण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां जेम्सनें पार्लमेंट बरखास्त केली व टोरी प्रधानांना रजा दिली. कोणाही व्यक्तीस एखाद्या कायद्याच्या

बंधनापासून सूट देण्याचा अधिकार ( Dispensing power ) व कोणताही कायदा कांहीं काळ तहकूब करण्याचा अधिकार ( Suspending power ), हे दोन्ही अधिकार राजाला आहेत असें जेम्स म्हणूं लागला. न्यायाधीश राजाचे नोकर असल्यामुळें त्यांनींही या गोष्टीस संमति दिली. मग काय विचारतां ? जेम्सनें टेस्ट-अॅक्ट धाब्यावर बसवून सैन्यांतील, कोर्टांतील व धर्मखात्यांतील जागांवर आपल्या मर्जींतील क्याथॉलिक लोकांची नेमणूक केली. ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विश्वविद्यालयांतील जागांवरही क्याथॉलिकांचा प्रवेश घडवून आणिला. आयर्लंडच्या प्रॉटेस्टंट गव्हर्नरास परत बोलावून त्या जागीं अर्ल ऑफ टिर्कॉनेल या क्याथॉलिकाची नेमणूक केली. लाँग पार्लमेंटनें हाय कमिशन कोर्ट बेकायदेशीर ठरविलें होतें; तथापि त्याची पुनः स्थापना करून जेम्सनें धर्मसंबंधीं अपराधांची चौकशी करण्याचें काम त्याजकडे सोंपविलें. आपल्याला सैन्याचा पक्का आधार पाहिजे हें ओळखून जेम्सनें लंडनजवळ 'हाउन्स्लो हीथ' वर जंगी खडी फौज ठेवून दिली. प्रस्थापित पंथाचे धर्मगुरु अत्यंत राजनिष्ठ असल्यामुळें आपण कांहीं केलें तरी आपल्याला विरोध करणार नाहींत अशी जेम्सची कल्पना होती; पण आपण ही कल्पना करण्यांत घोडचूक केली असें त्याला लवकरच आढळून आलें.

४. **सात बिशपवरील खटला.** इंग्लंडांत क्याथॉलिक लोक फारसे नाहींत तेव्हां धार्मिक स्वातंत्र्य देण्याचें कबूल करून आपण नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांस आपल्या बाजूस मिळवून घ्यावें अशी कल्पना जेम्सला सुचली. नंतर त्यानें प्रस्थापित पंथाहून इतर सर्व धर्मपंथांच्या लोकांवर निर्बंध घालणाऱ्या सर्व कायद्यांचा अंमल तहकूब करणारा जाहीरनामा (Declaration of Indulgence) काढिला ( १६८८ ). तो सर्व लोकांस कळावा म्हणून धर्मगुरूंनीं प्रार्थना-

मंदिरांत प्रार्थनेच्या वेळीं लागोपाठ दोन रविवारीं लोकांस वाचून दाखवावा असाही जेम्सनें हुकूम फर्माविला. परंतु फारच थोड्या धर्मगुरूनीं तो हुकूम पाळिला. नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांनीं आपणांस दिलेल्या दिखाऊ धर्मस्वातंत्र्यानें भुलून न जातां जाहीरनाम्याचा निषेध केला आणि ' अनियंत्रित राजसत्ता ' आणि ' क्याथॉलिक पंथ ' या दोन्ही अनिष्ट गोष्टींपासून इंग्लंडचें रक्षण करण्याच्या कामीं हातभार लाविला. क्यान्टर्बरीचा आर्चबिशप सॅन्क्रॉफ्ट व इतर सहा बिशप यानीं या जाहीरनाम्याविरुद्ध एक तक्रार–अर्ज लिहून तो राजास सादर केला. तेव्हां जेम्सनें खवळून जाऊन 'सात बिशप' वर खटला भरला. परंतु पंचांनीं एकमतानें निर्दोषी असा निकाल दिल्यामुळें सात बिशप सुटले ( ३० जून १६८८ ). हा निकाल कानीं पडतांच राजाच्या खड्या फौजेनेंही आनंदाचा गजर केला; तेव्हां जेम्स चपापला. व्हिग लोक जेम्सविरुद्ध होतेच. जाहीरनामा काढून त्यानें प्रस्थापित पंथाच्या कट्टया अनुयायी टोरी पक्षासही दुखविलें. तेव्हां सर्व इंग्रज जनता त्याची शत्रु बनली व त्याला अनुयायी पक्षच राहिला नाहीं.

५. **दुसऱ्या जेम्सची पदच्युति.** जेम्स आतां म्हातारा झाला होता; व तो वारल्यावर त्याची प्रॉटेस्टंट मुलगी मेरी हीच गादीवर येणार हें निश्चित होतें. त्यामुळें इंग्लिश जनता जेम्सचा जुलूम सहन करीत राहिली. परंतु सात बिशपांवरील खटल्यांचा निकाल होण्यापूर्वींच जेम्सला त्याच्या नव्या क्याथॉलिक बायकोपासून मुलगा झाला ( १० जून १६८८); तो मुलगा क्याथॉलिक पंथाचा होणार हें निश्चित असल्यामुळें ही क्याथॉलिक राजमालिका कोठवर लांबणार याचा नेम राहिला नाहीं. तेव्हां मात्र इंग्लंडांतील सर्व पक्षांचे पुढारी एकत्र जमले व त्यांनीं जेम्सचा जांवई व मेरीचा नवरा हॉलंडचा नायक ' वुइल्यम ऑफ ऑरेंज ' यास इंग्लंड-

मधील लोकांचे राजकीय हक्क व प्रॉटेस्टंट धर्म यांचें संरक्षण करण्यासाठीं इंग्लंडांत येण्याचें आमंत्रण केलें. हॉलंडच्या संरक्षणार्थ महत्त्वाकांक्षी चौदाव्या लुईशीं झगडण्याचा वुइल्यमनें निश्चय केला होता. त्या कामीं इंग्लंडची मदत मिळाल्यास वुइल्यमला पाहिजेच होती. म्हणून त्यानें आमंत्रण मोठ्या खुषीनें स्वीकारिलें. ५ नोव्हेंबर १६८८ रोजीं डच सैन्यासह वुइल्यम डेव्हनशायरमधील टोर्बे येथें उतरला. तो लंडनकडे येऊं लागला तसतसे इंग्रज त्याला मिळूं लागले. तेव्हां जेम्सचा निरुपाय होऊन त्याला फ्रान्सांत पळून जावें लागलें. नंतर १६६०तल्याप्रमाणें कन्व्हेन्शन पार्लमेंट भरली. तिनें जेम्स निघून गेल्यामुळें इंग्लिश सिंहासन रिकामें झालें आहे असें ठरविलें. मग वुइल्यम व मेरी यांस 'तिसरा वुइल्यम व दुसरी मेरी' अशा पदव्या व संयुक्त राजपद देण्याचा ठराव झाला. सर्व राज्यकारभार मात्र वुइल्यमनें चालवावा असें ठरलें. नंतर वुइल्यम व मेरी यांनीं राजपदाचा स्वीकार केला (१३फेब्रुवारी १६८९). मेरी व वुइल्यम हे राज्यास अगदीं जवळचे वारस नव्हते; तथापि पार्लमेंटच्या ठरावानें त्यांना राजपद लाभलें. या प्रसंगीं पार्लमेंटनें एक शतकभर स्टुअर्ट राजांशीं झगडा चालविला होता, त्याचा निकाल लागला. यापूर्वीं पार्लमेंटनें अनेक विजय मिळविले होतेच. या वेळीं राजा पार्लमेंटपेक्षां कमी प्रतीचा ठरून इंग्लिश राजकीय व्यवहारांत पार्लमेंटच सर्वश्रेष्ठ होय ही गोष्ट पक्की ठरून गेली. तसेंच सर्व इंग्लिश जनता राजाविरुद्ध झाल्यामुळें ही अधिकाराची मोठी क्रान्ति रक्ताचा एक थेंबही न सांडतां झाली; त्यावरून हा प्रसंग रक्तशून्य राज्यक्रान्ति (Bloodless Revolution) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

---

## २३. सनदशीर युगास सुरुवात.

**१. अधिकारक्रान्ति.** तिसरा वुइल्यम व दुसरी मेरी गादीवर आली तेव्हांपासून इंग्लंडच्या इतिहासांतील सनदशीर युगास प्रारंभ झाला. वारशाचें तत्त्व बाजूस सारून पार्लमेंटनें वुइल्यम व मेरी यांस गादी दिली; त्यामुळें राजा जो गादीवर येतो तो पार्लमेंटच्या ठरावामुळें येतो, केवळ वारशाच्या हक्कामुळे येत नाहीं हें तत्त्व प्रस्थापित झालें. तसेंच राजसत्ता पार्लमेंटवर चालावी कीं पार्लमेंटची सत्ता राजावर चालावी हा प्रश्न कायमचा सुटून राजानें पार्लमेंटच्या आज्ञेंत वागलें पाहिजे असें निश्चित ठरलें. या वेळीं इंग्लंडांत खरीखुरी नियंत्रित राजसत्ता ( Limited Monarchy ) स्थापिली गेली व आजपर्यंत इंग्लंडच्या राज्यपद्धतीचें हें स्वरूप कायम आहे. या क्रान्तीच्या प्रसंगीं पार्लमेंटनें अनेक कायदे पास केले व राजसत्तेवरील आपलें नियंत्रण दृढ केलें.

**२. बिल ऑफ राइट्स.** या कायद्यांमध्यें 'हक्कांचें बिल' ( Bill of Rights ) हा कायदा सर्वांत प्रमुख होय ( १६८९ ). तिसरा वुइल्यम व दुसरी मेरी यांना राजपद देतांना पार्लमेंटनें हक्कांचा जाहीरनामा ( Declaration of Right ) त्यांस सादर केला होता. त्या जाहीरनाम्यावरच पार्लमेंटनें बिल ऑफ राइट्सची उभारणी केली. त्यांतील मुख्य कलमें पुढीलप्रमाणें होतीं.

( १ ) कायदा तहकूब करण्याचा अधिकार ( Suspending Power ) अथवा दुसऱ्या जेम्सप्रमाणें व्यक्तीस माफी देण्याचा अधिकार ( Dispensing Power ) राजानें उपयोगांत आणणें बेकायदेशीर आहे. ( २ ) पार्लमेंटच्या संमतीशिवाय शांततेच्या वेळीं राजानें खडी फौज ठेवूं नये. ( ३ ) पार्लमेंटच्या संमतीशिवाय

कोणताही कर राजानें प्रजेवर बसवूं नये. ( ४ ) आपल्या तक्रारी दूर करण्यासाठीं राजास अर्ज करण्याचा प्रत्येक प्रजाजनास हक्क आहे. ( ५ ) कोणाही रोमन क्याथॉलिकास अथवा रोमन क्याथॉलिकाशीं विवाह करणाऱ्या व्यक्तीस इंग्लंडची गादी मिळूं नये. या कलमांवरून हा कायदा किती महत्त्वाचा आहे हें तेव्हांच लक्षांत येतें. इंग्लंडमधील राज्यसंस्थेचें नियम एके ठिकाणीं लिहिलेले असे नाहींत; पण मॅग्ना चार्टा ( १२१५ ), पिटिशन ऑफ राइट ( १६२८ ), आणि बिल ऑफ राइट्स ( १६८९ ) या तीन आधारांवर सनदशीर इंग्लिश राज्यसंस्था उभी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रसिद्ध लॉर्ड चॅथॅम ( मोठा पिट ) हा म्हणे कीं, " हे तीन कायदे म्हणजे इंग्लंडच्या इतिहासाचें बायबल होय. "

३. **तिजोरीवरील सत्ता.** दुसरा चार्लस व दुसरा जेम्स यांना राज्यकारभाराचा खर्च भागविण्यास लागणारें उत्पन्न पार्लमेंटनें तहाहयात तोडून दिलें होतें. त्यामुळें 'नित्य व्यवहार करितांना राजाला पार्लमेंटची मुळींच फिकीर वाटत नसे. युद्धासारखें खर्चाचें नैमित्तिक सदर निघावें तेव्हांच पार्लमेंटची राजास आठवण होई.' या स्थितींत पालट पाडण्यासाठीं पार्लमेंटनें राजाच्या खर्चाचे खाजगी खर्च व सरकारी खर्च असे दोन भाग पाडले. त्यांपैकीं खाजगी खर्चाकरितां राजास तहाहयात [1] नेमणूक करून देण्यांत आली. सरकारी खर्चाची रक्कम मात्र एक वर्षपर्यंतच मंजूर करण्याची पार्लमेंटनें वहिवाट पाडली. ती आजपर्यंत चालत आहे. वर्षांत काय खर्च लागेल

---

१ या नेमणुकीस इंग्रजींत ' सिव्हिल लिस्ट' (Civil List) म्हणतात. नवा राजा गादीवर आला कीं त्याच्या हयातीपर्यंत 'वार्षिक नेमणूक' पार्लमेंट मंजूर करिते. बादशहा पंचम जॉर्ज यांच्या खासगी खर्चास ४ लक्ष ७० हजार पौंड वार्षिक नेमणूक मंजूर झाली आहे (१९११).

त्याचें अंदाजपत्रक (बजेट) वर्षारंभीं पार्लमेंटपुढें मांडण्यांत येतें व तें पास झाल्यावर त्याबरहुकूम वर्षभर खर्च चालतो. या पद्धतीनें पार्लमेंट 'नित्याची गोष्ट' होऊन तिजशिवाय वर्षानुवर्ष राज्य चालविणें अशक्य झालें. तिजोरीवरील सत्ता (Power of the Purse) असें या अधिकाराचें नांव असून पार्लमेंटनें राजसत्तेवर जे इतर निर्बंध घातले आहेत त्यांस हा अधिकार मूलाधार असल्यामुळें तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

४. **बंडाचा कायदा**. दुसऱ्या चार्लसनें खडी फौज (Standing Army) ठेविली होती; पण ती थोडी होती. जेम्सनें मात्र मोठ्या प्रमाणावर खडी फौज ठेवून पार्लमेंटला झुगारून देण्याचा प्रयत्न केला. तेव्हां पार्लमेंटनें 'बंडाचा कायदा' (Mutiny Act) करून सैन्यावर पार्लमेंटचीच हुकमत राहील अशी व्यवस्था केली. या कायद्यानें खडी फौज ठेवण्याचा व तींत लष्करी कायद्याबरहुकूम शिस्त राखण्याचा अधिकार राजास मिळाला. मात्र या कायद्याची मुदत अल्प ठरविल्यामुळें हा कायदा पुनः पुनः पास करून घेण्यासाठीं दरसाल पार्लमेंटची बैठक भरविणें राजास भाग झालें. अशा रीतीनें पैसा व सैन्य या दोहोंसंबंधीं कायदे अल्प मुदतीचे करून आपल्या बैठकी दरसाल निश्चयानें भरतील अशी पार्लमेंटनें व्यवस्था केली.

५. **धार्मिक सवलत**. पार्लमेंटनें प्रस्थापित धर्मपंथाचें स्तोमही खूप कमी केलें. नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांना आपल्या मंदिरांतून आपल्या मताप्रमाणें प्रार्थना करण्यास सवलत देणारा सवलतीचा कायदा (Toleration Act) पास झाला. या कायद्यांतून क्याथॉलिकांस वगळलें होतें. तथापि सवलतीच्या तत्त्वाचा यापुढें हळूहळू विजय झाला. धर्मसुधारणेपासून आपला धर्मपंथ देशांतील सर्व लोकांवर लादण्याचें अनुदार धोरण विजयी पक्ष स्वीकारीत असे. त्या अनुदार

धोरणास आतां रजा मिळाली. तथापि एक शतकानंतर एकोणिसाव्या शतकांत जेव्हां क्लॅरेन्डन-कोड, टेस्ट ॲक्ट व क्याथॉलिकांवर निर्बंध घालणारे इतर अनेक कायदे रद्द झाले (१८२८, १८२९) तेव्हांच धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें अंमलांत आलें.

६. **पार्लमेंटचा काल.** दुसऱ्या चार्लसच्या वेळीं क्याव्हेलिअर पार्लमेंट अठरा वर्षें कायम होती. प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीमध्यें लोकसमाज हा सर्व अधिकाराचें उगमस्थान होय; अर्थात् पार्लमेंट लोकमतनिदर्शक पाहिजे हें उघड होय. तेव्हां पार्लमेंटच्या प्रातिनिधिक स्वरूपास या दृष्टीनें एकदां निवडलेली पार्लमेंट इतकीं वर्षें कायम ठेवणें अन्याय्य होतें. आतां पार्लमेंटनें असा कायदा केला कीं, निदान तीन वर्षांनीं पार्लमेंटची नवी निवडणूक व्हावयास पाहिजे (१६९४). 'बंडाचा कायदा' व 'तिजोरीवरील सत्ता' या निर्बंधांनीं एक वर्षापेक्षां अधिक काळ पार्लमेंटशिवाय राज्यकारभार चालविणें अशक्य झालें होतेंच. आतां त्रैवार्षिक कायद्यानें ( Triennial Act ) पार्लमेंटचें प्रानिनिधिक स्वरूप शुद्ध राखण्याची व्यवस्था झाली. या कायद्यांत पुढें १७१६सालीं बदल होऊन एकाच पार्लमेंटची कमाल मर्यादा सात वर्षें ठरविण्यांत आली.

७. **मुद्रणस्वातंत्र्य.** दुसऱ्या चार्लसचे पुनरागमनानंतर छापखानेवाल्यांवर सक्त निर्बंध ठेवण्यासाठीं सरकारकडून परवाना ( License ) मिळविल्याशिवाय छापखानेवाल्यानें कोणतेंही पुस्तक छापावयाचें नाहीं असा पार्लमेंटनें कायदा केला होता. या कायद्याची मुदत १६९५त संपली. यापुढें पार्लमेंटनें त्या कायद्याचें पुनरुज्जीवन करण्याचें नाकारिलें, व अशा अप्रत्यक्षरीतीनें मुद्रणस्वातंत्र्य प्रस्थापित केलें. तरी अद्यापि पार्लमेंटांत चाललेले वादविवाद छापणें मात्र बेकायदेशीर मानण्यांत येई, व पार्लमेंटचे वादविवाद गुप्त ठेवणें हा त्या सभेचा एक विशेष हक्क मानला जाई.

८. **ॲक्ट ऑफ सेटलमेंट.** इ. स. १७००त मेरीची धाकटी बहीण ॲन हिच्यामागून गादीला वारस असा तिचा मुलगा मृत्यु पावला. वुइल्यमला मूल नव्हतेंच. तेव्हां ॲनमागून राज्यास वारस कोण असा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हां पार्लमेंटनें वारशाचा कायदा ( Act of Settlement ) केला ( १७०१ ); या कायद्यानें ॲन-मागून पहिल्या जेम्सची नात सोफाया ( इलेक्ट्रेस ऑफ हॅनोव्हर ) व तिची प्रॉटेस्टंट संतति गादीस वारस ठरली. या कायद्यांत पार्लमेंटनें राजसत्तेवर निर्बंध घालणारीं आणखी कलमें घातलीं. न्यायाधीश एकदां नेमिले म्हणजे पार्लमेंटनें त्यांजविरुद्ध हरकत आणिली नाहीं तर हयातीपर्यंत त्यांनीं आपल्या जागेवर राहावें हें त्यांजपैकीं एक कलम होतें. न्यायाधिशांची बहाली-बडतर्फी राजाच्या हातीं असल्यास ते खरा न्याय देण्यास कसे कचरतात याचा अनुभव पूर्वीं फार वेळां आला होता. तेव्हां पार्लमेंटनें आतां न्यायदेवतेस राजसत्तेपासून मोकळें केलें, व सरकारशीं विरोध असतांही शुद्ध न्याय मिळणें शक्य झालें. या वेळीं कॉमन्ससभेंत टोरी पक्षाचें बहुमत होतें. टोरींनीं या वेळीं क्याथॉलिक जेम्सला बाजूस सारून ॲनमागून प्रॉटेस्टंट सोफायास वारस ठरविलें व अशा रीतीनें १६८८सालीं व्हिग पक्षानें घडवून आणिलेल्या क्रान्तीस पुष्टि दिली.

९. **एका पक्षाचें प्रधानमंडळ.** पहिल्यानें वुइल्यमनें व्हिग व टोरी या दोन्ही पक्षांतून प्रधान नेमिले. परंतु प्रधानांमध्यें भांडणें सुरू झालीं व टोरी पक्ष फ्रान्सशीं चालविलेल्या युद्धास विरोध करूं लागला. १६९४त मेरी वारली; त्यानंतर टोरी पक्ष अधिकच विरोध करूं लागला. तेव्हां राज्यकारभार चालविणें फारच कठिण झालें. त्या वेळीं कॉमन्ससभेंत व्हिग पक्षाचें बहुमत होतें. तेव्हां वुइल्यमनें टोरी प्रधान काढून त्यांच्या जागीं व्हिग नेमिले. अशा रीतीनें एक व्हिग प्रधानमंडळ तयार झालें ( १६९६ ). या पद्ध-

तीनें प्रधानमंडळाच्या कृत्यांस एकसूत्रीपणा आला व कॉमन्समध्येंही त्यांना विरोध होण्याचें थांबलें. कॉमन्समध्यें सरकारास अनुकूल सभासद व प्रतिकूल सभासद असे दोन पक्ष पडून त्या सभेंतील वादविवादास मोठा रंग येऊं लागला. हे नवे प्रधान कॉमन्समध्यें आपलें बहुमत कसें राहील याची काळजी घेऊं लागले; त्यामुळें प्रधान ' राजाचे नोकर ' असे नांवाचेच राहून कॉमन्ससभेचे ते नोकर अशी स्थिति झाली. हा बदल पूर्णपणें होण्यास बराच काळ लागला. परंतु पुढें तो पूर्ण होऊन हल्लीं कॉमन्समधील बहुमत-वाल्या पक्षाचे पुढारीच प्रधान नेमले जावयाचे हा नियम कायम ठरून गेला आहे.

१०. **क्रांतीचे परिणाम.** येणेंप्रमाणें १६८८च्या क्रान्तीमुळें राजकीय व्यवहारांत पार्लमेंट सर्वश्रेष्ठ ठरली; इंग्लिश लोकांचें धर्म-स्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य व न्यायस्वातंत्र्य हीं तिन्ही भक्कम पायावर स्थापित झालीं; आणि प्रधानमंडळाच्या पद्धतीचा उदय झाला. दुसरा चार्लस व दुसरा जेम्स यांनीं फ्रान्सचा राजा चौदावा लुई याचे मिंधे होऊन इंग्लंडचें परदरबारचें वजन अगदीं नाहींसें केलें होतें; आतां वुइल्यमनें लुईच्या महत्त्वाकांक्षेला आळा घालण्याचें जोरदार धोरण स्वीकारिलें, व त्यामुळें परदरबारीं इंग्लंडची इभ्रत पुनः वाढली.

---

## २४. जेम्सच्या साथीदारांचा मोड.

१. **किलिक्रँकीची लढाई.** इंग्लंडांत रक्ताचा एक थेंबही न सांडतां राज्यक्रांति झाली तरी स्कॉटलंड–आयर्लंडांत जेम्सच्या पक्षपाती लोकांनीं बंडाचीं निशाणें उभारलीं. स्कॉटलंडच्या उत्तर

भागांतील डोंगरी लोकांनीं ( हायलंडर ) व्हायकाउंट डंडी याच्या नेतृत्वाखालीं जेम्सकरितां शस्त्र उचललें. परंतु किलिक्रँकी येथें लढाई होऊन तींत डंडी मारला गेला (१६८९). तेव्हां हायलंडर लोक सरकारास शरण गेले व नव्या राजाराणींची सत्ता मान्य असल्याची शपथ घेण्यास तयार झाले.

२. **लंडनडेरीचा वेढा.** स्कॉटलंडपेक्षां आयर्लंडांतील बंड जास्त मोठ्या प्रमाणावर होतें. आयरिश बहुजनसमाज क्याथॉलिक असल्यामुळें तो आपल्याला खात्रीनें मिळणार असें वाटून खुद्द दुसरा जेम्स फ्रेंच राजा चौदावा लुई याजकडून पैसा व फौज घेऊन आयर्लंडांत येऊन दाखल झाला ( १६८९ मार्च ). नंतर अल्स्टरमधील इंग्रज प्रॉटेस्टंटांचा पाडाव करून इंग्रजी सत्तेचें आयर्लंडांतून उच्चाटन करण्यासाठीं जेम्स उत्तरेकडे गेला. लंडनडेरी हें इंग्रज प्रॉटेस्टंटांचें मुख्य ठाणें होतें; त्याला जेम्सनें वेढा घातला. चार महिने वेढ्याचें काम चालल्यावर आंतील लोकांची अगदीं उपासमार होण्याची वेळ आली, तथापि ते शरण गेले नाहींत. शेवटीं तीन इंग्लिश गलबतें वेढा तोडून नदीच्या मुखांतून बंदरांत शिरलीं व त्यांनीं संकटसमयीं त्या शहरास जीवनसाधनांचा पुरवठा केला. तेव्हां जेम्सनें वेढा उठविला.

३. **लिमरिकचा तह** (१६९१). यापुढें वुइल्यम मोठ्या फौजेनिशीं बेलफास्ट बंदरांत उतरला व डब्लिनवर चालून जाऊं लागला. जेम्सच्या सैन्याची व त्याची बॉइन नदीवर गांठ पडली. ड्रॉघेडाजवळ बॉइन नदीच्या दक्षिणेस मोठें युद्ध झालें. यांत जेम्सचा पराजय झाला. तेव्हां तो फ्रान्सांत पळून गेला. यापुढें त्यानें लुईचें पेन्शन खात आपलें राहिलेलें आयुष्य घालविलें. बॉइनच्या लढाईनंतर आयरिशांचीं ठाणीं एकामागून एक सर करण्याचा वुइल्यमनें क्रम सुरू केला. अशा ठाण्यांपैकीं लिमरिक हें शेवटचें ठाणें होतें. लिमरिकमध्यें प्रसिद्ध आय-

रिश देशभक्त सार्सफील्ड हा होता, त्यानें सहा आठवडेपर्यंत तें ठाणें लढविलें. अखेर क्याथॉलिक लोकांना धर्मस्वातंत्र्य मिळेल व ज्या कोणास परदेशीं जावेंसें वाटेल त्यास परदेशीं जाण्यास परवानगी दिली जाईल या अटींवर सार्सफील्डनें लिमरिक वुइल्यमच्या स्वाधीन केलें, आणि तो आपल्या बारा हजार अनुयायांसह फ्रान्सला निघून गेला. परंतु यापुढें लिमरिकच्या तहांतील अटी पाळल्या गेल्या नाहींत. क्याथॉलिक लोकांची लाखों एकर जमीन जप्त करण्यांत येऊन त्यांच्यापैकीं कोणींही अध्यापन, वकिली हे धंदे करूं नयेत असा सक्त निर्बंध घालण्यांत आला. क्याथॉलिक व प्रॉटेस्टंट यांच्यामधील विवाह बेकायदेशीर ठरविण्यांत येऊन प्रॉटेस्टंटांच्या जमिनीवर क्याथॉलिकांचा वारसा चालूं नये व क्याथॉलिकांनीं शस्त्रें बाळगूं नयेत असाही कायदा पास झाला. या कडक कायद्यांनीं आयरिश जनतेच्या मनांत प्रॉटेस्टंट इंग्रजांविषयीं कायमची द्वेषबुद्धि बाणली.

४. **फ्रान्सशीं युध्द** (१६८९–१६९७). स्टुअर्ट राजे प्रजेशीं एकसारखे भांडत; त्यामुळें जोरदार परराष्ट्रीय धोरण स्वीकारण्याची त्यांना केव्हांच बुद्धि झाली नाहीं. दुसरा चार्लस तर फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्या हातांतील बाहुलें बनला होता. परंतु तिसरा वुइल्यम गादीवर आल्यावर या धोरणांत एकदम फरक झाला. हॉलंडमध्यें वुइल्यमनें चौदाव्या लुईस चांगलीच टक्कर दिली होती, व महत्त्वाकांक्षी लुईस विरोध करण्यास इंग्लंडच्या राजपदाचा आपल्याला चांगला उपयोग होईल या दृष्टीनेंच त्यानें इंग्लंडची गादी स्वीकारिली होती. लुईनें दुसऱ्या जेम्सला आपण इंग्लंडच्या गादीवर पुनः बसविणार असें जाहीर केलें होतें. त्यामुळें इंग्रजांनीं लुईशीं लढाई करण्याच्या कामीं वुइल्यम यास साहाय्य करण्याचें ठरविलें. लवकरच इंग्लंड, हॉलंड, जर्मनी इत्यादि राष्ट्रांचा लुईविरुद्ध वुइल्यमनें संघ बनविला. हा झगडा १६८९ ते १६९७ पर्यंत नऊ वर्षें चालला

होता. नेदर्लंड्समध्यें पुष्कळ झटापटी झाल्या. बऱ्याच वेळां फ्रेंचांची सरशी झाली; पण वुइल्यम मोठा चिवट होता व रणांगणावर पराभव झाला तरी आपल्या सैन्याची व्यवस्थित पिच्छेहाट करण्यांत त्याचा हातखंडा होता. त्यामुळें कोणत्याही जयापासून फ्रेंचांचा विशेष फायदा झाला नाहीं. आरमारी युद्धांत मात्र इंग्रजांची सरशी झाली. 'ला होग' नजीक इंग्लंड व हॉलंड यांच्या संयुक्त आरमाराची फ्रेंच आरमाराशीं खूप निकराची लढाई होऊन तींत फ्रेंचांचा पुरा मोड झाला (१६९२ मे). या लढाईंत इंग्रजांचा मुख्य रसेल अत्यंत शौर्यानें लढला. या जयामुळें दुसऱ्या जेम्सला इंग्लंडच्या गादीवर बसविण्याची लुईची कल्पना निष्फळ झाली व वुइल्यमच्या सत्तेस स्थैर्य आलें; परंतु त्याचा महत्त्वाचा परिणाम म्हटला ह्मणजे फ्रेंचांच्या 'नाविक सत्तेस' जबर धक्का बसला, चौदाव्या लुईच्या यशास उतरती कळा लागली व त्याच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालून स्वसंरक्षण साधूं पाहणाऱ्या दोस्तांस धीर आला. शेवटीं रिस्विक येथें तह ठरला (१६९७). या तहानें लुईनें वुइल्यमला इंग्लंडचा राजा म्हणून मान्य केलें व दुसऱ्या जेम्सला इंग्लंडची गादी मिळवून देण्यासाठीं कसलेंही साहाय्य न करण्याचें कबूल केलें.

५. **राष्ट्रीय कर्ज**. तिसरा वुइल्यम गादीवर आल्यापासून एकसारखीं युद्धें चाललीं होतीं. त्यांसाठीं पैसा पाण्यासारखा खर्च होऊं लागला. इतका पैसा कर बसवून उत्पन्न करणें शक्य नव्हतें. तेव्हां सरकारास जंगी कर्ज काढणें भाग पडलें. पूर्वीं सरकारास पैसे पाहिजे असले ह्मणजे सावकारांकडून अल्पमुदतीच्या करारानें ते उसने काढीत. पण आतां कायम कर्ज काढण्याचें सरकारनें ठरविलें. त्या कर्जावरील व्याज मात्र ठराविक दरानें सावकारांस द्यावयाचें असें ठरलें. नंतर कांहीं श्रीमंत भांडवलवाल्यांचें भांडवल एक करण्यांत येऊन 'बँक ऑफ इंग्लंड' ही पेढी स्थापण्यांत आली (१६९४).

सरकारास दहा लाख पौंड कर्ज देण्याचें या पेढीनें कबूल केलें. त्याचप्रमाणें सरकारनें काढिलेल्या सर्व कर्जास "राष्ट्रीय कर्ज" असें नांव देण्यांत येऊन त्याच्या व्याजाचा दर कायम झाला. हाच इंग्लंडच्या "राष्ट्रीय कर्जा"चा (National Debt) आरंभ होय. या व्यवस्थेनें वुइल्यमच्या राज्यास स्थैर्य आलें. जेम्स परत आल्यास तो हें कर्ज कसचें परत देणार, असें लोकांस वाटत असल्यामुळें स्वार्थाच्या दृष्टीनें वुइल्यमशीं राजनिष्ठ राहणें लोकांस जरूर झालें.

६. **जॅकोबाइट लोक.** जेम्स जाऊन वुइल्यम गादीवर आल्यावर पहिल्यानें इंग्लंडांतील सर्व लोकांनीं वुइल्यमची तळी उचलून धरली होती. तथापि तो परकीय असल्यामुळें आणि त्याचा स्वभाव थंड व गंभीर असल्यामुळें तो इंग्लंडांत फारसा लोकप्रिय झाला नाहीं. १६९४त मेरी राणी मृत्यु पावली. तेव्हां तर इंग्लिशांना वुइल्यमबद्दल आपलेपणा वाटण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं. यापुढें जेम्सचे पक्षपाती लोक त्याला परत आणण्याची खटपट करूं लागले. जेम्स शब्दाचें लॅटिन भाषेंतील रूप जॅकोबस असें आहे. त्यावरून अशा लोकांस जॅकोबाइट असें नांव पडलें. पुष्कळ टोरी लोकांस वुइल्यमचें युद्धाचें धोरण पसंत नव्हतें; ते प्रस्थापित धर्माचे कट्टे अनुयायी असत व राजा हा ईश्वरी अंश आहे या तत्त्वावर त्यांची निष्ठा होती. त्यामुळें धर्मस्वातंत्र्य देणारा व युद्धें करणारा वुइल्यम त्यांना प्रिय नव्हता. तेव्हां त्यांनीं जॅकोबाइटांची बाजू घेतली व वुइल्यमला गादीवरून काढून टाकण्यासाठीं अनेक कट केले. पण सुदैवानें ते यशस्वी झाले नाहींत. पुढें हॅनोव्हर घराणें गादीवर आल्यावर देखील जॅकोबाइटांनीं दोन मोठीं बंडें केलीं (१७१५व१७४५); परंतु तीं दोन्ही फसलीं व हॅनोव्हर घराणेंच इंग्लंडच्या गादीवर कायम राहिलें.

——

# २५. स्पॅनिश वारशाचें युद्ध.

१. **साम्राज्याकरितां झगडा.** १६८८ मध्यें तिसरा वुइल्यम गादीवर आला, तेव्हांपासून इंग्लंडच्या इतिहासांत एका नवीन काल-विभागास सुरुवात झाली. हा भाग १६८८पासून १८१५पर्यंत म्हणजे सुमारें सवाशें वर्षांचा आहे. यांत खुद्द इंग्लंडांत घडलेल्या गोष्टींस फारसें महत्त्व नसून इंग्लंडचें परराष्ट्रीय धोरण अत्यंत महत्त्वाचें आहे. अमेरिकेंत इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणें इंग्लंडच्याही वसाहती होत्या. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत व्यापाराकरितां इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांचीं ठाणीं होतीं. इतर युरोपियन राष्ट्रें आतां मागें पडलीं असून परदेशांतील व्यापाराकरितां व वसाहतींकरितां फ्रान्स व इंग्लंड यांजमध्यें विशेष चुरस होती. तेव्हां १६८८पासून १८१५पर्यंतचा इंग्लंडचा इतिहास म्हणजे या चुरशीचाच सविस्तर वृत्तांत होय. या काळांत इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें सात मोठीं युद्धें झालीं. त्यांचीं तात्कालिक कारणें निरनिराळीं असत. तथापि या युद्धांचें मुख्य कारण ही साम्राज्यतृष्णा होय. तेव्हां हीं युद्धें म्हणजे एका शतसांवत्सरिक महायुद्धाचे केवळ भाग होत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

२. **स्पॅनिश वारसा.** १७०० सालीं स्पेनचा राजा दुसरा चार्लस निपुत्रिक वारला. तेव्हां चौदाव्या लुईनें आपला नातू फिलिप ( डॉफिनचा दुसरा मुलगा ) यास स्पेनच्या गादीवर बसविलें. त्यामुळें स्पेन व फ्रान्स येथलि गाद्या एक होऊन त्यामुळें युरोपांतील सत्तेच्या समतोलास धक्का पोंचणार अशी भीति वाटूं लागली. तेव्हां वुइल्यमनें फ्रान्स व स्पेन यांजविरुद्ध युद्ध करण्याचें ठरविलें. परंतु या वेळीं इंग्लिश पार्लमेंटांत टोरी पक्षाचें बहुमत असून तो पक्ष युद्धास तयार होईना.

इतक्यांत लुईनें एक मोठी चूक केली. याच सुमारास दुसरा जेम्स फ्रान्सांत मृत्यु पावला (१७०१).तेव्हां लुईनें त्याचा मुलगा जेम्स यास तिसरा जेम्स अशी पदवी देऊन इंग्लंडचा राजा म्हणून मान्य केलें. तेव्हां मात्र इंग्रज अगदीं खवळून गेले. लागलीच पार्लमेंटची निवडणूक होऊन नवीन हाउस ऑफ कॉमन्समध्यें व्हिग पक्षाचें बहुमत झालें व पार्लमेंटनें वुइल्यमच्या युद्धाच्या धोरणास दुजोरा दिला. नंतर स्पेन व फ्रान्स यांजविरुद्ध इंग्लंड, हॉलंड व जर्मनी यांचा एक जंगी संघ निर्माण झाला. या संघानें जर्मन बादशहाचा दुसरा मुलगा आर्चड्यूक चार्लस यास स्पेनची गादी मिळावी असें धोरण अंगीकारिलें. इतक्यांत दुर्दैवानें वुइल्यम एकाएकीं घोड्यावरून पडून मृत्यु पावला ( १७०२ ). त्याचें धैर्य, चिकाटी व उद्योग अखंड असून चौदाव्या लुईशीं त्यानें यावज्जन्म टक्कर दिली.

३. **मार्लबरो**. तिसरा वुइल्यम मृत्यु पावल्यावर दुसऱ्या जेम्सची धाकटी मुलगी ॲन ही गादीवर आली. ती प्रॉटेस्टंट पंथाची पक्की अनुयायी होती. वुइल्यमच्या मृत्यूनंतर राष्ट्रांची जूट कायम राखून फ्रान्सशीं युद्ध चालविण्याचें काम ड्यूक ऑफ मार्लबरो या रणधुरंधराकडे गेलें. हें स्पॅनिश वारशाचें युद्ध १७०२पासून१७१३पर्यंत टिकलें. मार्लबरोविषयीं फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेअर यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, " मार्लबरोनें लढाई केली आणि जय मिळाला नाहीं, किंवा किल्ल्याला वेढा घातला आणि तो पडला नाहीं असें कधींच झालें नाहीं. "त्याच्या अंगचा सेनापतीला अवश्य असा एक मोठा गुण म्हटला म्हणजे कसल्याही कठिण प्रसंगीं त्याच्या चित्ताची स्थिरता कायम राही. मार्लबरोला केवळ लढाया जिंकण्याचें काम करावयाचें नसून इंग्लंडांतील प्रधानमंडळ युद्धास अनुकूल राखण्यासाठीं अनेक कारस्थानें करावीं लागत. त्या कामीं त्याची पत्नी डचेस ऑफ मार्लबरो हिचें ॲन

राणीशीं मोठें सख्य होतें, या गोष्टीचा त्याला मोठा उपयोग होई. त्याचप्रमाणें इंग्रज, डच व जर्मन या तिरंगी सैन्याची एकजूट राखण्याचें अवघड काम त्याजवर पडलें.

४. **ब्लेन्हीमची लढाई**. १७०४ सालीं लुईनें बव्हेरियाच्या राजास आपला दोस्त करून घेतलें; व त्याच्या साहाय्यानें ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना हिजवर फ्रेंच चालून जाऊं लागले. परंतु या वेळीं हॉलंडमधून ऱ्हाइन नदीच्या तीरानें पुढें येत येत मार्लबरो बव्हेरियामध्यें अचानक येऊन दाखल झाला. मग ब्लेन्हीम या खेड्यानजीक मार्लबरो व जर्मन सेनापति यूजीन हे एका बाजूला व फ्रेंच दुसऱ्या बाजूला असें होऊन मोठें रणकंदन झालें. त्यांत फ्रेंचांचा पूर्ण पराजय झाला. त्या काळीं फ्रेंच सैन्याचा सर्व युरोपभर धाक बसून गेला होता. तो या पराजयानें पार नाहींसा झाला. ही मार्लबरोची कामगिरी इंग्रजांस इतकी पसंत पडली कीं, पार्लमेंटनें वुडस्टॉक येथें एक मोठी शेतवाडी त्याला देऊन तेथें 'ब्लेन्हीम' नांवाचा एक टोलेजंग वाडा त्याला बांधून दिला.

५. **आरमारी युद्ध**. इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणांत आपल्या वसाहतींशीं चाललेला व्यापार आपल्याच ताब्यांत कसा राहील या प्रश्नास अग्रस्थान मिळालें होतें त्यामुळें या स्पॅनिश वारशाच्या युद्धांत जिब्राॅल्टर (१७०४), मिनोर्का (१७०८), व नोव्हास्कोशिआ (१७११) हीं महत्त्वाचीं ठिकाणें इंग्रजांनीं घेतलीं. स्पेनमधील जिब्राॅल्टरचा जंजिरा अत्यंत महत्त्वाचा असून १७०४पासून आजपर्यंत इंग्रजांच्या ताब्यांत आहे. अ‍ॅटलॅन्टिक महासागरांतून भूमध्यसमुद्रांत शिरण्याची जागा या किल्ल्याच्या माऱ्यांत आहे. म्हणून जिब्राॅल्टरला 'भूमध्यसमुद्राची किल्ली' म्हणतात.

६. **युध्द लांबलें**. १७०४नंतर मार्लबरोनें नेदर्लंड्समध्यें अनेक जय मिळविले. त्यामुळें फ्रेंच व स्पॅनिश यांना नेदर्लंड्समधून पाय

काढावा लागला. पुढें आणखी लढाया जिंकून मार्लबरोनें नेदर्लंड्सवर आपला पूर्ण ताबा बसविला. लुई तह करण्यासाठीं एकसारखीं बोलणीं करीत होता, पण मार्लबरोनें तीं मुळींच ऐकिलीं नाहींत. इकडे इंग्लंडांत टोरी लोक ह्मणूं लागले कीं, मार्लबरो आपल्या स्वार्थाकरितां युद्ध पुढें चालवीत आहे. व्हिग पक्षांत व्यापाऱ्यांचा भरणा विशेष असल्यानें 'युद्ध चाललें तर राष्ट्रीय कर्ज फुगणार व आपल्याला भरपूर व्याज मिळणार' या दृष्टीनें ते युद्धास अनकूल असत. तेव्हां मार्लबरो जरी स्वतः टोरी होता तरी त्यानें प्रधानमंडळांत हळूहळू व्हिग लोक घेतले व १७०८त प्रधानमंडळ पूर्णपणें व्हिग बनलें. परंतु यापुढें युद्ध लांबलें व खर्च फार होऊं लागला, त्यावरून इंग्लिश लोकमत एकंदरीनें युद्धाविरुद्ध होऊं लागलें.

७. **बारा नवे लॉर्ड.** याच सुमारास अॅन राणीचें डचेस ऑफ मार्लबरोशीं बिनसलें व आतां ती 'मॅशॅम' बाईच्या कलाप्रमाणें वागूं लागली. ही मॅशॅमबाई पक्की टोरी असून तिनें टोरी पक्षास अधिकारावर आणणें इष्ट आहे असें राणीच्या मनांत भरविलें. इतक्यांत पार्लमेंटची नवी निवडणूक होऊन तींत टोरी पक्षाची सरशी झाली (१७१०). लागलीच राणीनें टोरी प्रधानमंडळ नेमिलें. त्यांत हार्ले व सेंट जॉन (लॉर्ड बोलिंगब्रोक) हे मुख्य होते. या नवीन प्रधानमंडळास युद्ध केव्हां एकदां थांबतें असें झालें होतें. कॉमन्ससभेचें बहुमत त्यांना अनुकूल होतें. परंतु लॉर्डांच्या सभेंत पुरेशीं अनुकूल मतें नव्हतीं. तेव्हां बारा नवे लॉर्ड बनवावे म्हणजे कॉमन्स सभेंतल्याप्रमाणें आपल्या सूचना लॉर्डांच्या सभेंतही पास होऊन आपल्याला लढाई बंद करितां येईल अशी युक्ति हार्लेनें काढिली. ती राणीस पसंत पडून तिनें लागलीच बारा नवे टोरी लॉर्ड बनविले (१७१२). एखादें बिल कॉमन्सना मान्य असलें व लॉर्डससभेंत तें पास होणें अशक्य होईल तर नवे लॉर्ड बनवून लॉर्डांच्या सभेंत तें बिल

पास होण्याची व्यवस्था राजास करितां येते, त्यावरून इंग्लंडच्या राज्यपद्धतींत कॉमन्ससभाच सर्वश्रेष्ठ होय हें कायमचें ठरून गेलें.

८. **युट्रेक्टचा तह.** पुढें टोरी प्रधानांनीं लुईशीं बोलणीं सुरू करून युट्रेक्टचा तह घडवून आणिला ( १७१३ ). या तहानें फिलिप हाच स्पेनच्या गादीवर कायम झाला; पण फ्रान्स व स्पेन या दोन्ही देशांच्या गाद्या एक होणार नाहींत अशी लुईनें हमी दिली. तसेंच नेदर्लंड्स व इटलीमधील स्पेनचा मुलूख हीं जर्मन बादशहास मिळालीं. इंग्लंडला फ्रेंचांपासून अमेरिकेंत न्यू फौंडलंड व नोव्हास्कोशिया मिळालीं. स्पेनपासून युरोपांत जिब्रॉल्टर व मिनोर्का मिळालीं, व त्यामुळें इंग्रजांचा भूमध्यसमुद्रावरील संचार भक्कम पायावर प्रस्थापित झाला. याशिवाय स्पॅनिश अमेरिकन वसाहतींस निग्रो गुलामांचा पुरवठा करण्याचा मक्ता इंग्रजांस मिळाला व दरसाल एक जहाज पाठवून स्पॅनिश अमेरिकेशीं व्यापार करण्याची परवानगी मिळाली.

९. **स्कॉटलंडशीं ऐक्य.** इंग्लंड व स्कॉटलंड या देशांचे राजे पहिल्या जेम्सपासून एक झाले, तरीपण त्यांच्या पार्लमेंट सभा निरनिराळ्याच होत्या. तिसऱ्या वुइल्यमच्या कारकीर्दींत आपणही एक कंपनी स्थापून व्यापार करावा व अमेरिकेंत वसाहत करावी अशी कल्पना कांहीं स्कॉटिश लोकांच्या मनांत आली व उत्तर व दक्षिण अमेरिकेस जोडणाऱ्या संयोगीभूमिवर वसाहत स्थापण्याचा प्रयत्न करण्यांत आला; पण तो फसला. तेव्हां इंग्रज आपल्या व्यापाराला सवलती देत नाहींत येवढयावरून रागावून स्कॉटिश पार्लमेंटनें असा ठराव केला कीं, ॲन राणीच्या पश्चात् होणाऱ्या इंग्लंडच्या राजाचा हक्क स्कॉटलंडनें मानूं नये (१७०३ ). इतक्या थराला गोष्ट गेली तेव्हां इंग्रज मुत्सद्यांनीं दोन्ही पार्लमेंट एक करून दोन्ही देशांचा एकजीव करण्याची खटपट चालविली. मग एकीकरणाचा ठराव

दोन्ही पार्लमेंटांत पास झाला ( १७०७ ). इंग्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश मिळून एक देश बनून त्यास ग्रेट ब्रिटन असें नांव मिळालें. स्कॉटलंडचा प्रेस्बिटीरियन धर्म व चालत आलेले कायदेकानू कायम झाले. लंडनमध्यें भरणाऱ्या पार्लमेंटला लॉर्ड्‌ससभेंत सोळा व कॉमन्स-सभेंत पंचेचाळीस सभासद स्कॉटलंडांतून निवडून यावे असें ठरलें. आपल्या राष्ट्रीयत्वावर घाला येतो या कल्पनेनें स्कॉटिश लोक कांहीं काळ या संयोगाविरुद्ध होते, व हायलंड्‌समध्यें असंतोषाचें वारें बरींच वर्षें जागृत राहिलें. परंतु यापुढें वसाहतींशीं व्यापार करण्याचा इंग्र-जांच्या बरोबरीनें स्कॉटिश लोकांस अधिकार मिळाल्यामुळें लवकरच ग्लासगोसारखीं उद्योगधंद्यानें भरभराटलेलीं शहरें स्कॉटलंडांत चमकूं लागलीं; आणि स्वातंत्र्य व संपन्नता असल्यावर 'निराळी पार्लमेंट' नसली तरी आपलें राष्ट्रीयत्व बुडणार नाहीं असा स्कॉटिश लोकांना भरंवसा वाटूं लागला.

१०. **अॅनचा मृत्यु.** युट्रेक्टच्या तहानंतर बोलिंग्ब्रोक अॅनच्या मागून जेम्सच्या मुलास गादीवर आणण्याची खटपट करूं लागला. परंतु जेम्सचा मुलगा जेम्स क्याथॉलिक असल्यामुळें त्याला इंग्लंडांत भरपूर पाठिंबा मिळणें अशक्य होतें. बोलिंग्ब्रोकचा बेत त्याचा मित्र हार्ले यासच न पटून त्या दोघांमध्यें मोठा तंटा माजला; शेवटीं हार्लेस आपल्या प्रधानमंडळांतील जागेचा राजीनामा द्यावा लागला. पुढें जेम्सला आणविण्यासाठीं बोलिंग्ब्रोकनें जोरानें खटपटी चाल-विल्या; परंतु त्याची तयारी पुरी होण्यापूर्वींच अॅन राणी मृत्यु पावली ( १७१४ ). तिच्या मागून 'अॅक्ट ऑफ सेटल्मेंट' या कायद्यास अनुसरून सोफायाचा प्रॉटेस्टंट मुलगा जॉर्ज ( इलेक्टर ऑफ हॅनोव्हर ) हा इंग्लंडचा राजा झाला.

---

## २६. व्हिग श्रीमंतांची सत्ता.

### ( सर रॉबर्ट वॉल्पोल ).

१. **व्हिग श्रीमंतांची सत्ता.** हॅनोव्हर* घराण्यांतील पहिला राजा 'पहिला जॉर्ज' हा गादीवर आला तेव्हां चौपन्न वर्षांचा म्हातारा असून दिसावयास ओंगळ व बुद्धीनें मंद होता. त्याची चालचलणूक जर्मन असून जें काय थोडें बहुत शिक्षण झालें होतें तें जर्मन तऱ्हेवरच होतें. इंग्लिश भाषा त्याला मुळींच येत नव्हती. इंग्लंडच्या राज्यामुळें प्राप्त झालेल्या वैभवाचा उपभोग घ्यावा व हॅनोव्हरचें कल्याण चिंतावें अशा रीतीनें त्यानें आपला सर्व जन्म घालविला. असा हा परकीय राजा इंग्लंडांत केव्हांच लोकप्रिय झाला नाहीं. हॅनोव्हर घराणें जें गादीवर आलें तें व्हिग पुढाऱ्यांच्या खटपटीनें आलें. शिवाय पहिला जॉर्ज व त्याचा मुलगा दुसरा जॉर्ज हे राज्यकारभारासंबंधीं उदासीन असत. त्यामुळें पुढील सुमारें पन्नास

---

* **हॅनोव्हर घराणें, १७१४–१९०१**

**पहिला जॉर्ज**, १७१४–१७२७.
|
**दुसरा जॉर्ज**, १७२७–१७६०.
|
- फ्रेडरिक.
  |
  **तिसरा जॉर्ज**, १७६०–१८२०.
  |
  - **चौथा जॉर्ज**, १८२०–१८३०.
  - **चौथा वुइल्यम**, १८३०–१८३७.
  - एडवर्ड (ड्यूक ऑफ केंट).
    |
    **व्हिक्टोरिया**, १८३७–१९०१.
- वुइल्यम ( ड्यूक ऑफ कंबर्लंड ).

वर्षें ( १७१४–१७६१ ) सर्व राज्यकारभार व्हिग प्रधान चालवीत. या काळांत एकही टोरी अधिकारारूढ झाला नाहीं. राजांनीं औदासीन्य स्वीकारल्यामुळें पार्लमेंटचें महत्त्व विशेष वाढलें. याच वेळीं पार्लमेंट आपल्या पक्षाला अनुकूल राखण्याचा व्हिग पक्षानें प्रयत्न केला व त्यांत त्याला यश आलें. लॉर्डांच्या सभेंत व्हिगांचें मताधिक्य होतेंच. आणखी अधिकारारूढ व्हिग पुढारी श्रीमंत, हुशार व कार्यदक्ष निघाल्यामुळें कॉमन्समध्येंही त्यांचें मताधिक्य अबाधित राहिलें. अधिकारारूढ असतां शांततेचें व व्यापारविषयक सवलतीचें धोरण स्वीकारून व्हिग पक्षानें इंग्लंडची सांपत्तिक भरभराट घडवून आणिली.

२. **सप्तवार्षिक कायदा**. पहिला जॉर्ज गादीवर आल्यावर पुढील वर्षींच (१७१५) जॅकोबाइटांनीं उत्तर इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही ठिकाणीं दुसऱ्या जेम्सचा मुलगा ‘ तिसरा जेम्स ’ यास ग्रेट ब्रिटनच्या गादीवर आणण्यासाठीं मोठीं बंडें उभारिलीं. परंतु सरकारनें दक्षता राखल्यामुळें दोन्ही ठिकाणच्या बंडांचा तेव्हांच मोड झाला. स्कॉटलंडांत खुद्द ‘ तिसरा जेम्स ’ आला होता; परंतु तो कच्चया दिलाचा असल्यामुळें अनुयायांच्या मनावर त्याची छाप बसली नाहीं व त्याला फ्रान्सांत तसेंच निघून जावें लागलें. या बंडाचा मुख्य परिणाम म्हणजे पार्लमेंटचा सप्तवार्षिक कायदा होय ( १७१६ ). पूर्वीं १६९४ सालीं पार्लमेंटची कमाल मुदत तीन वर्षांची ठरली होती. देशांत अजून स्थिरस्थावर नसल्यामुळें याच वेळीं पार्लमेंटच्या निवडणुकीची दंगल उसळल्यास देशाच्या शांततेस धोका येईल असें वाटून व्हिग प्रधानमंडळानें असा कायदा पार्लमेंटमध्यें पास करून घेतला कीं, एकदां निवडलेल्या पार्लमेंटची कमाल मुदत सात वर्षांची असावी. पुढें १९११ सालीं या कायद्यांत बदल झाला व एका पार्लमेंटची कमाल मुदत पांच वर्षें ठरविण्यांत आली.

३. **साउथ सी कंपनी**. युट्रेक्टच्या तहानंतर इंग्लिशांचा दक्षिण

अमेरिकेशीं व्यापार वाढून पुष्कळ व्यापारी कंपन्या निघाल्या. त्यांजमध्यें साउथ सी कंपनी खूप भरभराटीस आली. तिनें १७१९ त सरकारास असें सुचविलें कीं, राष्ट्रीय कर्जाची व्यवस्था आपल्याकडे दिल्यास शेंकडा ५ या हलक्या दरानें आपण सरकारपासून व्याज घेऊं व या सवलतीबद्दल सरकारास सत्तर लक्ष पौंड रोख देऊं. ही सूचना प्रधानमंडळानें मान्य केली व कंपनीस सरकारी आश्रय दिल्याचा कायदा पार्लमेंटनें पास केला ( १७२०एप्रिल). लागलीच कंपनीच्या शंभर पौंडांच्या शेअरची किंमत एक हजारावर आली. या वेळीं कंपन्यांचे शेअर घेण्यासाठीं लोकांची फार धडपड असे.त्यामुळें लोकांच्या भोळेपणापासून आपला फायदा करून घेण्यास टपलेले लबाड भराभर पुढें आले व त्यांनीं लोकांची कल्पनाशक्ति हालवून सोडणारीं ध्येयें पुढें ठेवून कंपन्या काढिल्या. अर्थात् कंपन्यांचीं लवकरच दिवाळीं निघालीं. साउथ सी कंपनीची तीच गत झाली. शेंकडों लोकांचें भयंकर नुकसान झालें व त्यांजवर कफल्लक बनण्याची पाळी आली.

४. **सर रॉबर्ट वॉल्पोल**. या दिवाळ्यांच्या वादळांतून इंग्लंडास सर रॉबर्ट वॉल्पोल यानें बचावलें. त्यानें राष्ट्रीय कर्जाची व्यवस्था 'साउथ सी कंपनी'कडून काढून पुन: 'बँक ऑफ इंग्लंड'कडे दिली व सरकारांतून साउथ सी कंपनीस पैसे परत करून भागीदारांचें कांहीं नुकसान भरून काढिलें. तेव्हांपासून बाजारांत स्थिरस्थावर झालें. एव्हांपासून इंग्रज लोकांचा वॉल्पोलवर पक्का विश्वास बसला व इंग्लंडचीं राज्यसूत्रें एकवीस वर्षें (१७२१–१७४२) त्याच्या हातीं राहिलीं.वॉल्पोलच्या अंगीं विद्वत्ता मुळींच नव्हती व पुस्तकांचा त्याला कंटाळा असे. व्यवहारज्ञानांत व आर्थिक बाबतींत मात्र तो चांगला तरबेज असून इंग्लंडचें कल्याण करण्याची बुद्धि त्याच्या अंत:करणांत सारखी जागृत होती. नैतिक उदात्त व शुद्ध हेतूंबद्दल बोलणें

निघाल्यास शाळांतील पोरांच्या गोष्टी म्हणून तो त्यांची हेटाळणी करीत असे.

५. **प्रधानमंडळ.** जॉर्ज राजा मंद असून हॅनोव्हरकडे त्याचा ओढा होता; तथापि जॉर्ज प्रॉटेस्टंट होता येवढया त्याच्या गुणास भुलून व्हिग लोकांनीं त्याच्याकडे व त्याच्या वंशाकडे गादी चालविण्याचा संकल्प केला होता. जॉर्जनेंही सर्व कारभार व्हिग पुढाऱ्यांवर टाकिला. कॉमन्स व लॉर्ड्स या दोघांनीं पास केलेला कायदा नामंजूर करण्याचा अधिकार राजास होता; परंतु जॉर्जनें तो केव्हांही उपयोगांत आणिला नाहीं. तसेंच प्रधानमंडळाच्या बैठकीस तो केव्हांही हजर रहात नसे. या दोन्ही कृत्यांनीं राजसत्तेवर नियंत्रण पडून हे दोन्ही अधिकार राजानें केव्हांही गाजवावयाचे नाहींत अशी इंग्लिश राज्यपद्धतीची वहिवाट पडली. प्रधान एकाच पक्षाचे असावयाचे ही पद्धति वुइल्यमच्या कारकीर्दीपासून हळूहळू सुरू झाली होती. या प्रधानांच्या कृतींत एकसूत्रीपणा राखण्याचें काम ॲनच्या कारकीर्दीपर्यंत राजाच करीत असे. आतां मात्र जॉर्ज राजानें तेंही काम करण्याचें नाकारिलें. तेव्हां प्रधानमंडळाच्या बैठकींत स्वतः अध्यक्ष व्हावयाचें व इतर प्रधानांच्या नेमणुकीही आपणच करावयाच्या अशी चाल वॉल्पोलनें पाडली. त्यामुळें त्याला इंग्लंडांतील पहिला मुख्य प्रधान म्हणतात. इंग्लंडांत [१]प्रधानमंडळ हें राजकीय सत्ताधिकारी असून मुख्य प्रधान प्रधानमंडळचा सूत्रचालक असतो. मुख्य प्रधानास प्रीमिअर ( Premier ) किंवा प्राइम मिनिस्टर ( Prime Minister ) म्हणतात. कॉमन्ससभेंत ज्या पक्षाचें मताधिक्य असेल त्याच्या पुढाऱ्यास राजानें मुख्य प्रधान नेमावयाचे

---

१ ही मंडळी राजाच्या क्याबिनेटमध्यें (खोली) त्याची सल्ला घेण्याकरितां पूर्वी जमत म्हणून प्रधानमंडळास क्याबिनेट ( Cabinet ) म्हणतात.

व त्यानें आपलें प्रधानमंडळ बनवावयाचें अशी पद्धति हळूहळू प्रचारांत येऊं लागली व हल्लीं ती पूर्णपणें अंमलांत आहे.

६. **वॉल्पोलची कामगिरी.** १७२७ सालीं पहिला जॉर्ज मृत्यु पावला व त्याचा मुलगा 'दुसरा जॉर्ज' ही पदवी धारण करून इंग्लंडचा राजा बनला. कांहीं वर्षें इंग्लंडांत घालविल्यामुळें त्याला थोडें इंग्रजी बोलतां येत असे व इंग्लिश चालीरीतींची कांहीं माहिती झाली होती. त्याला वॉल्पोल आवडत नव्हता; परंतु त्याची राणी जास्त विचारी व हुशार होती व तिच्याच सल्ल्यानें जॉर्ज चालत असल्यामुळें वॉल्पोलचा अधिकार तसाच कायम राहिला. १७२१पासून १७४२-पर्यंत एकवीस वर्षें वॉल्पोल इंग्लंडचा मुख्य प्रधान होता. या दीर्घ काळांत वॉल्पोलचें असें धोरण होतें कीं, देशांत शांतता राखावयाची व व्यापार आणि उद्योगधंदे यांस उत्तेजन द्यावयाचें. त्यामुळें इंग्लंड देश लवकरच श्रीमंत व समृद्ध झाला. तेव्हां वॉल्पोलनें शेंकडा ४ दराच्या व्याजानें नवीन कर्ज काढून जुन्या ८ दराच्या कर्जाची परत फेड केली. त्यामुळें सरकारास भराव्या लागणाऱ्या व्याजाचा भार कमी झाला. पुढें वॉल्पोलचा शिष्य हेन्री पेल्हॅम यानें हेंच धोरण पुढें चालविलें व 'राष्ट्रीय कर्जा'वरील व्याजाचा दर शेंकडा ३ कायम केला(१७४९). स्पेनचें सरकार युट्रेक्टच्या तहानें गेलेले आपले प्रांत परत मिळविण्यासाठीं कारस्थानें करितें असें पाहून वॉल्पोलनें फ्रान्स, प्रशिया व हॉलंड या देशांशीं सख्य जोडलें ( १७२५ ), व स्पेनलाही तह करणें भाग पाडिलें ( १७२९ ). कॉमन्समध्यें कांहीं सभासद **बरों**-मधून (शहरें) व कांहीं **काउन्टीं**मधून ( परगणे ) निवडून येत. पुष्कळशीं बरो वॉल्पोलच्या व्हिग साहाय्यकाऱ्यांचीं वतनेंच बनून गेलीं होतीं. या वतनदारीमुळें व पार्लमेंटच्या सभासदांस लांच भरून वॉल्पोलनें पार्लमेंटवर आपलें वजन कायम राखिलें.

७. **विरोधी पक्ष.** व्यवहारज्ञतेबरोबर सत्तेचा लोभ वॉल्पोलच्या

ठिकाणीं होता. त्यामुळें त्याला प्रतिस्पर्धी खपत नसे. त्यानें कर्तृत्व-वान् व्हिग लोकांस प्रधानमंडळांतून व दुसऱ्यांच्या जागांवरून काढून टाकिलें तेव्हां त्यांनीं ‘पेट्रियट’ नांवाचा ‘विरोधी पक्ष’ स्थापिला. प्रसिद्ध वुइल्यम पिट हा एक पेट्रियट असून वॉल्पोलच्या लांचलुचपतीवर कडक टीका करीत असे.

८. **स्पेनशीं युद्ध व वॉल्पोलचा राजीनामा.** युट्रेक्टच्या तहानें अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींस वर्षांतून एक गलबतभर माल पुरविण्याची इंग्लिशांस सवलत मिळाली होती. परंतु हा व्यापार इतका फायदेशीर होता कीं, इंग्लिश व्यापारी लबाडी करून जास्त गलबतें माल वसाहतींत उतरवीत. परंतु स्पॅनिश सरकारनें बरींच वर्षें तिकडे दुर्लक्ष केलें. पुढें स्पेन व फ्रान्स येथील राजे बुर्बोन घराण्याचे असल्यानें त्या दोन्ही देशांत एक ‘कौटुंबिक संघ’ (Family Compact) झाला (१७३३). तेव्हांपासून मात्र इंग्लिश व्यापाऱ्यांविरुद्ध स्पेनमध्यें मोठी ओरड होऊन स्पेननें इंग्लिश गलबतांची झडती घेण्याचा क्रम सुरू केला, तेव्हां इंग्लिश व्यापारी खूप खवळले. वॉल्पोलनें शांतता राखण्यासाठीं अतिशय प्रयत्न केले; पण लोकक्षोभामुळें त्याला शेवटीं युद्धास संमति देणें भाग पडलें. स्पेनशीं झालेल्या युद्धांत प्रथम इंग्लिशांस अपयशच आलें. त्याचें खापर वॉल्पोलच्या माथीं फोडण्यांत आलें. त्यामुळें नव्या निवडणुकींत कॉमन्ससभेंतील त्याचें बहुमत नाहींसें झालें व त्याला राजीनामा द्यावा लागला (१७४२). वॉल्पोलनें वीस वर्षेंपर्यंत इतर राष्ट्रांशीं शांतता राखिली. या काळांत इंग्लंडच्या गादीवर हॅनोव्हर घराणें स्थिर झालें, इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे वृद्धि पावले, व देशांत संपत्ति खेळूं लागली. त्यामुळें पुढें इंग्लंडला फ्रान्सशीं जो मोठा झगडा करावा लागला त्यांत जय आला. तसेंच पार्लमेंटला जबाबदार

व त्यानें आपलें प्रधानमंडळ बनवावयाचें अशी पद्धति हळूहळू प्रचारांत येऊं लागली व हल्लीं ती पूर्णपणें अंमलांत आहे.

६. **वॉल्पोलची कामगिरी.** १७२७ सालीं पहिला जॉर्ज मृत्यु पावला व त्याचा मुलगा 'दुसरा जॉर्ज' ही पदवी धारण करून इंग्लंडचा राजा बनला. कांहीं वर्षें इंग्लंडांत घालविल्यामुळें त्याला थोडें इंग्रजी बोलतां येत असे व इंग्लिश चालीरीतींची कांहीं माहिती झाली होती. त्याला वॉल्पोल आवडत नव्हता; परंतु त्याची राणी जास्त विचारी व हुशार होती व तिच्याच सल्ल्यानें जॉर्ज चालत असल्यामुळें वॉल्पोलचा अधिकार तसाच कायम राहिला. १७२१पासून १७४२-पर्यंत एकवीस वर्षें वॉल्पोल इंग्लंडचा मुख्य प्रधान होता. या दीर्घ काळांत वॉल्पोलचें असें धोरण होतें कीं, देशांत शांतता राखावयाची व व्यापार आणि उद्योगधंदे यांस उत्तेजन द्यावयाचें. त्यामुळें इंग्लंड देश लवकरच श्रीमंत व समृद्ध झाला. तेव्हां वॉल्पोलनें शेंकडा ४दराच्या व्याजानें नवीन कर्ज काढून जुन्या ८ दराच्या कर्जाची परत फेड केली. त्यामुळें सरकारास भराव्या लागणाऱ्या व्याजाचा भार कमी झाला. पुढें वॉल्पोलचा शिष्य हेन्री पेल्हॅम यानें हेंच धोरण पुढें चालविलें व 'राष्ट्रीय कर्जा'वरील व्याजाचा दर शेंकडा ३ कायम केला(१७४९). स्पेनचें सरकार युट्रेक्टच्या तहानें गेलेले आपले प्रांत परत मिळविण्यासाठीं कारस्थानें करितें असें पाहून वॉल्पोलनें फ्रान्स, प्रशिया व हॉलंड या देशांशीं सख्य जोडलें ( १७२५ ), व स्पेनलाही तह करणें भाग पाडिलें ( १७२९ ). कॉमन्समध्यें कांहीं सभासद **बरों**-मधून (शहरें) व कांहीं **काउन्टीं**मधून ( परगणे ) निवडून येत. पुष्कळशीं बरो वॉल्पोलच्या व्हिग साहाय्यकाऱ्यांचीं वतनेंच बनून गेलीं होतीं. या वतनदारीमुळें व पार्लमेंटच्या सभासदांस लांच भरून वॉल्पोलनें पार्लमेंटवर आपलें वजन कायम राखिलें.

७. **विरोधी पक्ष.** व्यवहारज्ञतेबरोबर सत्तेचा लोभ वॉल्पोलच्या

ठिकाणीं होता. त्यामुळें त्याला प्रतिस्पर्धी खपत नसे. त्यानें कर्तृत्ववान् व्हिग लोकांस प्रधानमंडळांतून व हुद्यांच्या जागांवरून काढून टाकिलें तेव्हां त्यांनीं 'पेट्रियट' नांवाचा 'विरोधी पक्ष' स्थापिला. प्रसिद्ध वुइल्यम पिट हा एक पेट्रियट असून वॉल्पोलच्या लांचलुचपतीवर कडक टीका करीत असे.

८. **स्पेनशीं युद्ध व वॉल्पोलचा राजीनामा.** युट्रेक्टच्या तहानें अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींस वर्षांतून एक गलबतभर माल पुरविण्याची इंग्लिशांस सवलत मिळाली होती. परंतु हा व्यापार इतका फायदेशीर होता कीं, इंग्लिश व्यापारी लबाडी करून जास्त गलबतें माल वसाहतींत उतरवीत. परंतु स्पॅनिश सरकारनें बरींच वर्षें तिकडे दुर्लक्ष केलें. पुढें स्पेन व फ्रान्स येथील राजे बुर्बोन घराण्याचे असल्यानें त्या दोन्ही देशांत एक 'कौटुंबिक संघ' (Family Compact) झाला (१७३३). तेव्हांपासून मात्र इंग्लिश व्यापाऱ्यांविरुद्ध स्पेनमध्यें मोठी ओरड होऊन स्पेननें इंग्लिश गलबतांची झडती घेण्याचा क्रम सुरू केला, तेव्हां इंग्लिश व्यापारी खूप खवळले. वॉल्पोलनें शांतता राखण्यासाठीं अतिशय प्रयत्न केले; पण लोकक्षोभामुळें त्याला शेवटीं युद्धास संमति देणें भाग पडलें. स्पेनशीं झालेल्या युद्धांत प्रथम इंग्लिशांस अपयशच आलें. त्याचें खापर वॉल्पोलच्या माथीं फोडण्यांत आलें. त्यामुळें नव्या निवडणुकींत कॉमन्ससभेंतील त्याचें बहुमत नाहींसें झालें व त्याला राजीनामा द्यावा लागला (१७४२). वॉल्पोलनें वीस वर्षेंपर्यंत इतर राष्ट्रांशीं शांतता राखिली. या काळांत इंग्लंडच्या गादीवर हॅनोव्हर घराणें स्थिर झालें, इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे वृद्धि पावले, व देशांत संपत्ति खेळूं लागली. त्यामुळें पुढें इंग्लंडला फ्रान्सशीं जो मोठा झगडा करावा लागला त्यांत जय आला. तसेंच पार्लमेंटला जबाबदार

राहून प्रधानांनीं राज्यकारभार चालवावयाचा ही पद्धति वॉल्पोलनें अंमलांत आणिली; ती अद्यापि चालू आहे.

९. **ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध व जॅकोबाइट बंड.** इंग्लंडचें स्पेनशीं युद्ध चालू असतांच युरोपांत एक मोठें युद्ध सुरू झालें. १७४०त ऑस्ट्रियाचा बादशहा सहावा चार्लस मृत्यु पावला. त्याला मुलगा नसल्यामुळें त्यानें आपली आवडती मुलगी मराया थेरिसा हिला आपल्या पश्चात् ऑस्ट्रियाची गादी मिळावी म्हणून वारस–पत्र करून ठेविलें होतें व त्या वारस–पत्राला मोठ्या खटपटीनें युरोपांतील सर्व मुख्य राष्ट्रांची संमति मिळविली होती. तथापि चार्लस मरतो तोंच प्रशिया, फ्रान्स व स्पेन 'मराया थेरिसा'विरुद्ध उठले व त्यांनीं ऑस्ट्रियाच्या राज्यांतील निरनिराळे प्रांत बळकावण्याचा घाट घातला. प्रशियाचा महत्त्वाकांक्षी राजा फ्रेडरिक यानें सिलीशियावर अचानक धाड घालून तो प्रांत जिंकिला. फ्रान्सचा नेदर्लंड्सवर डोळा होता व स्पेनला इटलींत मुलूख मिळविण्याची इच्छा होती. इंग्लंड व हॉलंड हीं दोन राष्ट्रं मात्र मराया थेरिसाच्या बाजूला झालीं, व ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध सुरू झालें. १७४३त बव्हेरियामधील डेटिंगेन येथें इंग्रज व ऑस्ट्रियन फौजांनीं फ्रेंचांवर मोठा जय मिळविला. या लढाईंत दुसरा जॉर्ज स्वतः हजर होता. इंग्लंडचा राजा स्वतः लढाईवर गेल्याचा हाच शेवटचा प्रसंग होय. पुढें १७४५त जॉर्जचा दुसरा मुलगा डयूक ऑफ कंबर्लंड ऑस्ट्रियन नेदर्लंड्सचें रक्षण करीत असतां त्याचा फ्रेंचांनीं फॉन्टेनॉय येथें पराभव केला व नंतर बहुतेक नेदर्लंड्स त्यांनीं जिंकून घेतलीं. अमेरिकेंत व हिंदुस्थानांतही लढाई सुरू झाली होती. शेवटीं १७४८त एलाशापेल येथें तह ठरला. त्यांत इंग्रज व फ्रेंच यांनीं एकमेकांचे काबीज केलेले प्रांत परत करण्याचें कबूल केलें. प्रशियानें ऑस्ट्रियाचा बळकाविलेला सिलीशिया मात्र ऑस्ट्रियास परत दिला नाहीं.

ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध चालू असतां फ्रेंचांच्या फुशीमुळें जॅकोबाइटांचें दुसरें मोठें बंड स्कॉटलंडांत झालें ( १७४५ ). दुसऱ्या जेम्सचा नातू ' चार्लस एडवर्ड ' हा धीट व उमदा पुरुष आपल्या बापाचा ग्रेट ब्रिटनच्या गादीवरील हक्क शाबीत करण्याकरितां स्कॉटलंडांत उतरला. तेथें हायलंडर लोकांच्या मदतीनें सरकारी सैन्यावर जय मिळवून तो इंग्लंडांत डार्बीपर्यंत चालून आला. इंग्लंडांत अपेक्षित मदत त्याला मिळाली नाहीं. तेव्हां तो परत स्कॉटलंडांत गेला. पुढें ड्यूक ऑफ कंबर्लंड यानें त्याच्या फौजेचा कलोडनमूर येथें पुरा मोड केला ( १७४६ ). तेव्हां चार्लसला फ्रान्सांत पळून जावें लागलें. जॅकोबाइटांनीं स्टुअर्ट घराण्याच्या वतीनें केलेलें हेंच शेवटचें बंड होय. व्हिग पुढाऱ्यांच्या राज्यव्यवस्थेनें इंग्लंड देशांत शांतता नांदून त्याची एकसारखी भरभराट होत राहिली. त्यामुळें व्हिग अंमल लोकप्रिय झाला, जॅकोबाइटांचे प्रयत्न फसले, व हॅनोव्हर घराणें इंग्लंडच्या गादीवर कायम राहिलें.

---

## २७. साम्राज्य इंग्लंडला मिळालें.

:o:

१. **इंग्लंड व फ्रान्स यांजमधील चुरस.** इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांच्या अमेरिकेंत वसाहती असून हिंदुस्थानांतही दोन्ही राष्ट्रांचीं ठाणीं होतीं. त्यामुळें व्यापाराचा फायदा दोन्ही राष्ट्रांस मोठाच होत होता, व त्या दोघांत सारखी चुरस असे. पुढें मागें सबंध अमेरिकेचें राज्य व हिंदुस्थानची मालकी आपल्यापैकीं कोणाकडे तरी येणार हें त्या दोन्ही राष्ट्रांस कळून चुकलें होतें. तेव्हां आपल्या प्रतिस्पर्ध्याची त्या देशांतून हकालपट्टी करण्यासाठीं तीं जिवापाड मेहनत करूं लागलीं. १७५६सालीं या दोन्ही राष्ट्रांत एक महायुद्ध सुरू झालें. तें

१७६३पर्यंत टिकलें; म्हणून तें सप्तवार्षिक युद्ध (Seven Years' War) या नांवानें प्रसिद्ध आहे. युद्धाचीं रणक्षेत्रें अमेरिका, हिंदुस्थान व युरोप या तिन्ही ठिकाणीं होतीं.

२. **अमेरिकेंतील फ्रेंचांची महत्त्वाकांक्षा** अमेरिकेंत ॲलेगेनी पर्वताच्या पूर्वेस, उत्तरेस मेनपासून दक्षिणेस जॉर्जियापर्यंत इंग्रजांच्या तेरा वसाहती झाल्या होत्या. इंग्रजांच्या वसाहतींच्या उत्तरेस क्यानडा प्रांत आहे. तेथें फ्रेंचांच्या वसाहती होत्या. ॲलेगेनी पर्वताच्या पश्चिमेस बऱ्याच अंतरावर मिसिसिपी नदी आहे. तिच्या मुखाशीं फ्रेंचांची लुइझिआना ही वसाहत होती. तेव्हां लुइझिआनापासून उत्तरेकडे ॲलेगेनी पर्वत व मिसिसिपी नदी यांजमधील क्यानडाच्या दक्षिणहद्दीपावेतों सर्व प्रदेश आमचा आहे असें फ्रेंच ह्मणूं लागले. हा आपला हक्क शाबूत राखण्यासाठीं फ्रेंचांनीं ॲलेगेनी पर्वताच्या पश्चिमेस लुइझिआनापर्यंत एक लांब किल्ल्यांची रांग बांधून काढिली, व इंग्लिश वसाहतवाल्यांस ॲलेगेनी पर्वताच्या पूर्वेकडील अरुंद पट्टीवर कोंडून टाकण्याची व्यवस्था केली. इंग्रज वसाहतवाल्यांस याचा राग आला व ते प्रसिद्ध जॉर्ज वॉशिंग्टन या व्हर्जिनियांतील आपल्या पुढाऱ्याच्या हाताखालीं डयूकेन नांवाच्या फ्रेंच किल्ल्यावर चालून गेले. पण इंग्रजांस तसेंच माघारें यावें लागलें; पुढें वसाहतवाल्यांची अब्रू राखण्यासाठीं इंग्लंडांतून ब्रॅडॉकच्या हाताखालीं फौज पाठविण्यांत आली. ब्रॅडॉकनें डयूकेन किल्ल्यावर हल्ला केला. परंतु फ्रेंच व रेड इंडियन लोकांनीं त्याला अडचणीच्या जागेंत गांठून त्याच्यावर असा मारा केला कीं, ब्रॅडॉक पडला व इंग्रजांचा सपशेल पराभव झाला (१७५५). हिंदुस्थानांतही बंगालचा नबाब सुराजुद्दौला यानें कलकत्ता काबीज केला; तेव्हां इंग्रजांची बंगालमधून उचलबांगडी झाली (१७५६).

३. **युरोपमधील युध्दास प्रारंभ**. आतां युरोपांत युद्ध कसें सुरू झालें तें पाहूं. एलाशापेलच्या तहांत (१७४८) प्रशियाचा राजा

फ्रेडरिक यानें सिलीशिया प्रांत ऑस्ट्रियास परत दिला नाहीं; व यापुढें फ्रेडरिक अधिक प्रबल होत होता. तेव्हां युरोपियन राष्ट्रांस त्याच्याविषयीं मत्सर वाटूं लागला. नंतर फ्रान्स, ऑस्ट्रिया, रशिया इत्यादि राष्ट्रांनीं प्रशियाविरुद्ध एक संघ निर्माण केला; तेव्हां युरोपांत युद्धास सुरुवात झाली ( १७५६ ). इंग्लंडच्या राजाचा हॅनोव्हर प्रांत लाटण्याचा फ्रान्सचा बेत होता. शिवाय अमेरिका व हिंदुस्थान यांजमध्यें या दोन्ही राष्ट्रांत झगडे होतच होते. तेव्हां इंग्लंडनें प्रशियाची बाजू उचलली. युरोपांतील युद्धांत आपलीं समुद्रावरील ठाणीं सुरक्षित ठेवणें व हॅनोव्हर फ्रेंचांना घेऊं न देणें हीं दोन कामें इंग्रजांस करावयाचीं होतीं. प्रथम फ्रेंचांनीं इंग्रजांचें मिनोर्का बेट घेतलें; तेव्हां इंग्रजांनीं तें बेट परत मिळविण्याकरितां ॲड्मिरल बिंग याच्या हाताखालीं आरमार पाठविलें ( १७५६ मे ). परंतु तें बेट न घेतां बिंग तसाच परत आला. लागलीच बिंगवर भ्याडपणाच्या आरोपावरून खटला करण्यांत येऊन त्याला पोर्टस्मथ बंदरांत फांशीं देण्यांत आलें. इकडे युरोपांत हॅनोव्हरचें रक्षण करण्यासाठीं कंबर्लंड याची योजना झाली होती. त्याचाही पराभव होऊन त्याला हॅनोव्हर सोडावें लागलें व क्लॉस्टर–सेव्हनच्या करारनाम्यावर सही करून आपल्या सर्व सैन्यास रजा देण्याच्या अटीस कबुली द्यावी लागली ( १७५७जुलै ). अशा रीतीनें अमेरिका, हिंदुस्थान व युरोप या तिन्ही ठिकाणीं इंग्लंडची नाचक्की झाली.

४. **संयुक्त प्रधानमंडळ.** वॉल्पोलनंतर व्हिग प्रधानमंडळच कायम राहिलें. १७४४पासून हेन्री पेल्हॅम याच्या हातीं राज्यसूत्रें होतीं. १७५४त तो वारला व राज्यसूत्रें त्याचा वडील भाऊ ड्यूक ऑफ न्यूक्यासल याच्या हातीं गेलीं. पण त्याच्या ठिकाणीं वजनदारपणानें राज्यकारभार चालविण्याची कुवत नसल्यामुळें व महायुद्धांत चोहोंकडे इंग्रजांचा पराभव झाल्यामुळें न्यूक्यासलचें प्रधानमंडळ

ढांसळलें ( १७५६). यापुढें न्यूक्यासल व वुइल्यम पिट यांचें संयुक्त प्रधानमंडळ ( Coalition, कोॲलिशन ) अधिकारारूढ झालें ( १७५७ ). या संयुक्त प्रधानमंडळाइतकें कार्यकारी व यशस्वी प्रधानमंडळ क्वचितच झालें असेल. पार्लमेंटमध्यें सरकारचें बहुमत राखण्याचें काम न्यूक्यासलनें आपल्याकडे घेतलें व धडाडीनें युद्ध चालविण्याचें काम पिटनें आपल्या अंगावर घेतलें. या वेळीं इंग्लिश लोक निराश झाले होते. अशा स्थितींत अधिकारावर येतांच पिटनें पुढील उद्गार काढिले, "आपल्या देशाचा प्रस्तुत संकटांतून मीच बचाव करूं शकेन अशी मला खात्री आहे; हें काम दुसऱ्या कोणासही करितां येणार नाहीं." उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीमुळें इंग्लंडांत वजनदार मध्यमवर्ग निर्माण झाला होता. या मध्यमवर्गांतील लोकांवर पिटच्या निःस्वार्थीपणामुळें व वक्तृत्वामुळें त्याचें चांगलें वजन बसून गेलें होतें. त्यावरून पिटला 'दी ग्रेट कॉमनर' ही यथार्थ पदवी मिळाली आहे.

५. **वुइल्यम पिटचें धोरण**.सप्तवार्षिक युद्धांत पिटची कर्तबगारी, मुत्सद्देगिरी व धडाडी पुरतेपणीं दिसून आली.पूर्वींच्या प्रधानांनीं फ्रान्सच्या स्वारीपासून इंग्लंडचें रक्षण करण्यासाठीं हॅनोव्हरमधून जर्मन सैन्य आणिलें होतें. अधिकारारूढ होतांच पिटनें तें परकीय सैन्य परत पाठविलें व हें बचावाचें काम करण्यास स्वदेशांत सैन्य उभारिलें. या वेळीं हायलंडर लोकांच्या पलटणी उभारून त्यांच्या शौर्याचा देशास फायदा होईल अशी पिटनें व्यवस्था केली. सैन्यांतील व आरमारांतील कमकुवत कामगार काढून टाकून त्यांच्या जागीं गुणी माणसांची पिटनें योजना केली. हॅनोव्हरमधील सैन्याचें आधिपत्य अपेशी कंबर्लंडकडून काढून घेऊन त्याच्या ठिकाणीं ब्रन्स्विकचा फर्डिनंड या कर्तबगार पुरुषाची नेमणूक केली. फ्रेंचांच्या आरमारावर हल्ले करून त्याचा नाश करावयाचा व त्यांस वसाहतींस मदत पाठविणें अशक्य

करून टाकावयाचें, यासाठीं त्यानें ब्रिटिश आरमार सज्ज ठेविलें. तसेंच प्रशियाच्या फ्रेडरिकला सढळ हातानें पैशाची मदत करून फ्रेंचांस युरोपांत पायबंद देण्याची त्यानें व्यवस्था केली. या शेवटच्या बाबतीसंबंधीं पिट असें म्हणे कीं, "आपण जर्मनींत लढणार पण अमेरिका जिंकणार."

६. **युरोपांत इंग्रजांची सरशी.** पिटनें आंखलेल्या जोरदार धोरणाचा लवकरच परिणाम दिसूं लागला. फ्रेंच फौज इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरविण्याचा फ्रेंचांनीं व्यूह रचिला होता. तेव्हां ॲड्मिरल हॉक यानें मोठ्या धाडसानें फ्रेंच आरमारास क्विबेरॉन खाडींत गांठिलें व खडक आणि उथळ पाणी यामुळें तें ठिकाण धोक्याचें असतांही फ्रेंच आरमारावर हल्ला चढविला व त्याचा पूर्ण पराभव केला (१७५९). या पाडावामुळें फ्रेंच आरमार अगदीं लुळें झालें आणि अमेरिका व हिंदुस्थान येथील फ्रेंचांस कोणतीही मदत मिळणें अशक्य झालें. जर्मनीमध्येंही फर्डिनंड यानें फ्रेंचांपासून हॅनोव्हर सोडवून मिंडेन येथें त्यांचा पूर्ण पराजय केला.

७. **अमेरिका व हिंदुस्थान यांतील विजय.** पिटनें वूल्फ या शूर तरुण सेनापतीच्या हाताखालीं अमेरिकेंत सैन्य पाठविलें. प्रथम वूल्फनें लुइझबर्ग किल्ला घेतला (१७५८). ओहिओच्या खोऱ्यांतील डयूकेन किल्लाही इंग्रजांच्या हातीं आला; तेव्हां त्याला पिटच्या सन्मानार्थ पिट्स्बर्ग हें नांव देण्यांत आलें. फ्रेंचांचा अमेरिकेंतील सेनापति मॉन्टकाम हा असून त्यानें सेंट लॉरेन्स नदीच्या कांठच्या क्वीबेक शहरीं छावणी दिली होती. क्वीबेक शहराजवळ नदीकांठ खडकाळ व उंच असल्यामुळें हें ठिकाण शत्रूस दुःसाध्य होतें. १७५९-च्या सप्टेंबरमध्यें एके रात्रीं सेंट लॉरेन्सच्या अवघड कांठावर वूल्फ व त्याचे सैनिक कसे तरी चढले व ॲब्राहामच्या उंचवट्यावर युद्धास सज्ज होऊन बसले. दुसरे दिवशीं तेथें जोराची लढाई झाली,

तींत इंग्रजांस जय आला; मात्र वूल्फ व मॉन्टकाम हे दोघेही सेनापति लढाईंत पडले. यानंतर एका वर्षानें मॉन्ट्रिआल शहरही इंग्रजांच्या हस्तगत झालें व सर्व क्यानडा इंग्रजांच्या ताब्यांत आला (१७६०). हिंदुस्थानांत प्लासीची लढाई क्लाइव्हनें जिंकली; त्यामुळें बंगाल प्रांत इंग्रजांस मिळाला. पुढें वाँदिवॉश येथें फ्रेंचांचा पूर्ण मोड झाला (१७६०), व त्यांचें पाँडेचरी हें ठाणें इंग्रजांनीं घेतलें; तेव्हां फ्रेंच सत्तेचें हिंदुस्थानांतून उच्चाटन झालें.

८. **कौटुंबिक संघाचा समाचार**. अशा रीतीनें युद्धासंबंधीं धोरण यशस्वी झालें, चोहोंकडे इंग्रजांची सरशी झाली व फ्रेंचांचा नक्षा उतरला. १७६० सालीं दुसरा जॉर्ज वारला व त्याचा नातू 'तिसरा जॉर्ज' ही पदवी धारण करून इंग्लंडच्या गादीवर आला. याच सुमारास फ्रान्स व स्पेन येथील बुर्बोन राजांनीं दुसरा 'कौटुंबिक संघ' केला. लवकरच स्पेन फ्रान्सच्या मदतीसाठीं युद्धांत पडणार अशी बातमी पिटला लागली. त्यानें लागलीच युद्धाची तयारी जोरानें चालविली. ही गोष्ट तिसरा जॉर्ज व त्याचा क्षुद्र सल्लागार लॉर्ड ब्यूट या शांतताप्रिय मंडळीस पसंत न पडून पिटला राजीनामा देणें भाग पडलें (१७६१). इतक्यांत स्पेननें युद्ध पुकारिलें. पिटनें मोहिमांची तयारी करून ठेविली असल्यामुळें जिकडे तिकडे इंग्रजांची फत्ते झाली. स्पेनच्या ताब्यांतील क्यूबा बेटाची राजधानी हॅवाना व फिलिपाइन बेटांची राजधानी मॅनिला हीं दोन्ही ठिकाणें इंग्रजांनीं काबीज केलीं.

९. **पॅरिसचा तह** (१७६३). शेवटीं १७६३त पॅरिस येथें तह झाला. त्यांत क्यानडा प्रांत इंग्लंडला मिळाला व त्यायोगें उत्तर अमेरिकेंत इंग्रजांचें वर्चस्व कायम झालें. सप्तवार्षिक युद्धांत पिटसारखा कर्ता मुत्सद्दी आणि क्लाइव्ह, वूल्फ यांजसारखे शूर सेनापति इंग्लंडला लाभले व इंग्लंडची अखेर फत्ते झाली. अठराव्या शतकाच्या आरंभा-

पासून इंग्रज व फ्रेंच यांजमध्यें एक झगडा सुरू झाला होता. त्यांत जगाचा व्यापार, समुद्रावरील सत्ता व साम्राज्याची मालकी कोणाकडे असावयाची हें ठरावयाचें होतें. सप्तवार्षिक युद्धांत फ्रेंचांचा सपशेल पराभव झाला व या तिन्ही गोष्टी त्यांना दुर्लभ झाल्या. इंग्रजांची दर्यावरील सत्ता दृढ झाली, व हिंदुस्थान आणि अमेरिका येथें त्यांचे पाय रुजून ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाली.

---

## २८. नृपानुयायांचा सुळसुळाट.

(लोकस्वातंत्र्यावर घाला).

**१. तिसऱ्या जॉर्जचा निश्चय.** तिसऱ्या जॉर्जची कारकीर्द दीर्घ झाली; ती १७६०पासून १८२०पर्यंत साठ वर्षें टिकली. तिसरा जॉर्ज इंग्लंडांत जन्मला होता व त्याचें शिक्षण इंग्लंडांत झालें होतें. त्याला इंग्रजी भाषा चांगली येत होती व इंग्लंडबद्दल त्याला आपलेपणा वाटत असे. म्हणून तो इंग्लंडांत लोकप्रिय झाला व जॅकोबिटिझम इंग्लंडांतून निर्मूल झाला. जॉर्ज हट्टी व कोत्या मनाचा होता; त्यामुळें कोणत्याही गोष्टीचा दूरवर विचार करण्याची त्याला धमक नव्हती. त्यानें बोलिंग्ब्रोकच्या ' पेट्रियट किंग ' ( देशभक्त राजा ) या पुस्तकाचा चांगला अभ्यास केला होता. या पुस्तकांत व्हिग लोकांनीं सुरू केलेल्या एकपक्षीय प्रधानमंडळाच्या पद्धतीवर हल्ला केला असून राजानें निरनिराळे मंत्री आपल्या मर्जीप्रमाणें नेमावेत व अधिकारसूत्रें आपल्या हातीं घ्यावीं अशी सूचना केली होती. तेव्हां जॉर्जनें त्या सूचनेप्रमाणें स्वतः खरेखुरे राजे व्हावयाचें अशी महत्त्वाकांक्षा धरिली. व्हिग पुढारी जसे लांच भरून पार्लमेंट आपल्याला अनुकूल करून घेत, त्याचप्रमाणें जॉर्जनें मतदारांस लांच

भरून व सरकारी जागांचें आमिष दाखवून पार्लमेंटमध्यें नृपानुयायी सभासदांची (King's Friends, होयबा) भरती केली. गादीवर आल्याबरोबर लॉर्ड ब्यूट या आपल्या प्रिय स्कॉटिश शिक्षकास जॉर्जनें मुख्य प्रधान नेमिलें ( १७६१ ). तेव्हां व्हिग श्रीमंतांच्या सत्तेंत खळ पडला.

२. **प्रधानमंडळें.** (१७६३–१७८२). लॉर्ड ब्यूटला राजकारणाचा गंधही नव्हता; तेव्हां तो लोकांत लवकरच अप्रिय झाला व पॅरिसचा तह झाल्याबरोबर त्याला राजीनामा घ्यावा लागला. १७६१त व्हिग पक्षांत फूट पडून बरेच उपपक्ष निर्माण झाले होते, व त्यांच्यांत परस्पराबद्दल मत्सर उत्पन्न झाला होता. तिसऱ्या जॉर्जनें आपण स्वतः मंत्री नेमावयाची पद्धति सुरू केली होती. प्रथम नृपानुयायांचा नीट जम बसेपर्यंत जॉर्जनें एक एका व्हिग उपपक्षाच्या पुढाऱ्यास मुख्य प्रधान नेमून राज्यकारभार चालविला. परंतु या पुढाऱ्यांचा लवकरच राजाशीं खटका उडे व त्यामुळें १७६३–१७७० या सात वर्षांत चार निरनिराळीं अल्पकालीन प्रधानमंडळें झालीं. एकदां पिटला अर्ल ऑफ चॅथम बनवून जॉर्जनें मुख्य प्रधान नेमिलें; पण म्हातारपणामुळें त्याच्यानें काम रेटेना व दोन वर्षांच्या आंत त्यानें राजीनामा दिला ( १७६८ ). शेवटीं १७७०त जॉर्जला आपल्या मनाजोगा टोरी मुख्य प्रधान मिळाला. हाच लॉर्ड नॉर्थ. ॲनच्या कारकीर्दीनंतर झालेला हाच पहिला टोरी मुख्य प्रधान. नॉर्थच्या अंगीं फारशी कर्तबगारी नव्हती व तो जॉर्जच्या तंत्रानें वागे. १७६०पासून दहा वर्षें एकसारखी खटपट केल्यामुळें नृपानुयायांची पार्लमेंटांत सरशी झाली, व नॉर्थचें प्रधानमंडळ बारा वर्षें टिकलें (१७७०–१७८२).

३ **विल्कसवर खटला.** पॅरिसच्या तहानंतर पार्लमेंटास उद्देशून जें राजाचें भाषण झालें त्यांत पॅरिसचा तह देशास हितकर झाला असें विधान होतें. ' नॉर्थ ब्रिटन ' पत्राचा संपादक व पार्लमेंटचा

सभासद जॉन विल्क्स यानें आपल्या वर्तमानपत्राच्या पंचेचाळिसाव्या अंकांत राजाच्या त्या भाषणावर कडक टीका केली (१७६३). तेव्हां प्रधानमंडळानें राजाच्या हुकुमावरून 'नॉर्थ ब्रिटनचे संपादक व मुद्रक' यांजवर एक निनांवी वॉरंट (General Warrant) काढून विल्क्सला पकडिलें; पण न्यायाधिशानें विल्क्स पार्लमेंटचा सभासद असल्यानें त्याची तुरुंगांतून सुटका केली. पुढें कोर्टानें निनांवी वॉरंटें बेकायदेशीर ठरविलीं. यानंतर विल्क्सनें सेक्रेटरी ऑफ स्टेटवर बेकायदेशीररीतीनें आपल्याला पकडल्याबद्दल फिर्याद लाविली; तेव्हां नुकसानीबद्दल मोठी रक्कम विल्क्सला मिळाली. इतक्यांत दुसरा एक राजद्रोही लेख लिहिल्याबद्दल विल्क्सवर सरकारनें खटला सुरू केला, व कोर्टानें त्याला दोषी ठरविलें. मध्यंतरीं विल्क्स फ्रान्सांत पळून गेला; तेव्हां कोर्टानें त्याला न्यायबाह्य (Outlaw) ठरविलें व कॉमन्सनीं आपल्या सभेंतून त्याची हकालपट्टी केली (१७६४).

४. **मतदारांच्या हक्कावर घाला.** चार वर्षांनीं विल्क्स फ्रान्समधून परत आला व १७६८त पार्लमेंटच्या झालेल्या निवडणुकींत मिड्लसेक्स परगण्यातर्फे त्याला कॉमन्ससभेचा सभासद निवडण्यांत आलें. आतां कोर्टानें त्याच्यावरील न्यायबाह्यतेचा छाप काढून घेतला; पण मागील गुन्ह्याबद्दल बावीस महिने तुरुंगवासाची शिक्षा त्याला ठोठावली. कॉमन्ससभा पडली राजाची मिंधी! तिनें विल्क्सचें नांव सभासदांच्या पटांतून कमी केलें. परंतु लंडन व ज्या परगण्यांत लंडन आहे तो मिड्लसेक्स परगणा यांनीं विल्क्सचा पक्ष धरिला. मग पोटनिवडणुकींत मिड्लसेक्स परगण्यातर्फे तीन वेळां विल्क्सच निवडून आला. तथापि शेवटीं कॉमन्सनीं विल्क्सपेक्षां कमी मतें मिळालेला सरकारी उमेदवार लट्रेल हाच कायदेशीर रीत्या निवडून आलेला उमेदवार समजावयाचा असें ठरवून विल्क्सला मान्य कर-

ण्याचें नाकारिलें (१७६९ एप्रिल ). अशा रीतीनें मतदारांच्या हक्का-वर कॉमन्सनीं गदा आणिली; तेव्हां देशांत फार असंतोष माजला. विल्क्स हा लोकस्वातंत्र्याचा वाली असें मानण्यांत येऊन त्याचे फोटो चोहोंकडे विकण्यांत येऊं लागले. लंडनच्या रस्त्यावर सामान्य लोक जमत तेव्हां "विल्क्स व स्वातंत्र्य" अशा आरोळ्या उठत. एका लेख-कानें जूनियस या सहीनें लोकांच्या निवडणुकीच्या हक्कावर गदा आणिल्याबद्दल प्रधानमंडळावर जलाल टीकेचा भडिमार चालविला. प्रसिद्ध एडमंड बर्क या व्हिग मुत्सद्यानें याच वेळीं "आधुनिक असंतोषाची मीमांसा" हा उत्कृष्ट निबंध लिहिला; त्यांत त्यानें नृपा-नुयायांवर कडक टीका केली, आणि जॉर्ज व चॅथॅम यांच्या विरुद्ध एक पक्षीय प्रधानमंडळाच्या गेल्या अर्ध शतकांतील पद्धतीचें ( Party Government ) समर्थन केलें. शेवटीं १७७४साली पार्लमेंटची नवी निवडणूक झाली, तींत विल्क्स पुनः निवडून आला; तेव्हां मात्र कॉमन्सनीं त्याला आपल्या जागीं येऊं दिलें, व मतदारांच्या निवडणुकीच्या हक्कास मान दिला.

**५. पार्लमेंटमधील वादविवादाची प्रसिद्धि.** १७७१त विल्क्सच्या सूचनेवरून कॉमन्ससभेंतील वादविवादाचे रिपोर्ट कित्येक वर्तमानपत्रकारांनीं छापले. तेव्हां आपल्यावरील टीका चुकविण्याक-रितां कॉमन्सनीं त्यांना आपल्यासमोर हजर राहण्याची ताकीद दिली. एकजण हुकुमाप्रमाणें हजर झाला नाहीं. तेव्हां आपला हस्तक पाठ-वून कॉमन्सनीं त्याला कैद केलें. कॉमन्सचें कृत्य लंडनच्या मेयरला (नगराध्यक्ष) न पटून त्यानें आपल्या मॅजिस्ट्रेट या नात्याच्या अधिकारांत एका निरपराधी मनुष्यास पकडल्याच्या आरोपावरून कॉमन्सच्या हस्तकास तुरुंगांत पाठविलें. तेव्हां कॉमन्सनीं रागावून मेयरला तुरुंगांत धाडिलें. या वेळीं लोकांनीं लॉर्ड मेयरबद्दल इतकी सहानु-भूति दाखविली कीं, त्याच्या सुटकेनंतर पार्लमेंटचे वादविवाद प्रसिद्ध

केल्याबद्दल सरकारनें यापुढें कोणावरही फिर्याद केली नाहीं. पार्लमेंटचें कामकाज प्रसिद्ध झाल्यामुळें आपण निवडून दिलेले प्रतिनिधि काय काम करितात हें कळण्याचें मतदारसंघास साधन झालें. एव्हांपासून वर्तमानपत्रांचा बोज वाढला व मॉर्निंग क्रॉनिकल, मॉर्निंग पोस्ट, टाइम्स इत्यादि वजनदार पत्रें सुरू झालीं. तथापि १८३६पर्यंत वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस पार्लमेंटच्या सभागृहांत जाऊन टिपणें करून घेण्याची परवानगी नव्हती. त्या वर्षापासून सभागृहांतून प्रेस–ग्यालरीची सोय झाली व पार्लमेंटमधील वादविवादाचे रिपोर्ट सरकारीरीतीनेंही प्रसिद्ध होऊं लागले.

६. **राजाचें वजन.** १७७०सालीं लॉर्ड नॉर्थ हा नृपानुयायांचा पुढारीच मुख्य प्रधान बनला व तेव्हांपासून जॉर्जचें स्वतःच्या तंत्रानें राज्यकारभार चालविण्याचें धोरण पूर्णपणें अंमलांत आलें. पार्लमेंट हा नृपानुयायांचा मेळा बनून तींत लोकमताचा प्रकाश मुळींच पडेना. १७७०पासून सुरू झालेल्या दशकांत अमेरिकेशीं युद्ध हीच महत्त्वाची बाब होती व त्यांत तर सरकारची फजिती उडाली. शेवटीं खुद्द पार्लमेंटांतही सरकारविरुद्ध गवगवा होऊं लागला. १७८०सालीं पार्लमेंटांत सुधारणा केली पाहिजे असें म्हणणाऱ्या पक्षाचा इतका जोर झाला कीं, "राजाचें वजन वाढलें आहे, वाढत आहे व तें कमी केलें पाहिजे" असा ठराव कॉमन्ससभेंत पास झाला. व्हिग पक्षांत १७६१त जी फूट पडली, ती पुढें दृढच होत गेली. त्यामुळें तो पक्ष अगदीं हतबल झाला व जॉर्ज राजाचें चांगलें फावलें. १७७०पासून १८३०पर्यंतच्या साठ वर्षांच्या काळामधील एक दोन वर्षें वगळून बाकीच्या काळांत राजाच्या छंदाप्रमाणें चालणाऱ्या टोरी पक्षाच्या हातींच अधिकारसूत्रें राहिलीं.

———

## २९. अमेरिका कशी स्वतंत्र झाली?

१. **स्टॅम्प ॲक्ट.** पॅरिसच्या तहानें इंग्लंडला क्यानडा मिळाला, व ब्रिटिश सम्राज्याची स्थापना झाली; पण पुढें लागलीच ॲले-गेनी पर्वताच्या पूर्वेकडील तेरा इंग्लिश वसाहतींशीं इंग्लंडचें भांडण झालें; तेव्हां युद्ध करून वसाहतींनीं स्वातंत्र्य मिळविलें व ब्रिटिश साम्राज्यास मोठा धक्का बसला. सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडला फार मोठा खर्च आला होता; वसाहतींनीं त्याचा कांहीं भाग सोसावा हें न्याय्य होतें व इंग्रज सरकारनें वसाहतींपाशीं तशी मागणी केली असती तर त्यांनीं ती पुरविलीही असती; परंतु हा सरळ मार्ग सोडून युद्धखर्चाच्या भरपाईसाठीं व आतां वसाहतींच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या सैन्याचें वेतन पुरविण्यासाठीं मुख्य प्रधान ग्रेन्व्हिल यानें वसाहतींतील मुत्युपत्रें, खरेदीविक्रीचे गहाणाचे वगैरे कागद, पावत्या इत्यादि व्यवहारपत्रांवर सरकारचीं तिकिटें लावण्यास भाग पाडणारा स्टॅम्प ॲक्ट ब्रिटिश पार्लमेंटांत पास करून घेतला. या कराविरुद्ध अमेरिकेंत मोठा गवगवा झाला व ब्रिटिश मालावर बहिष्कार घाल-ण्याचा ठराव ठिकठिकाणीं पास झाला. स्टॅम्प जेव्हां सरकारनें विका-वयाला काढले तेव्हां ते कोणी घेईना. ज्या पार्लमेंटांत आमचे प्रति-निधि नाहींत त्या पार्लमेंटनें आमच्यावर कर बसवूं पाहणें अन्या-याचें आहे अशी अमेरिकनांनीं जोराची तक्रार केली. तेव्हां ग्रेन्-व्हिलच्या मागून रॉकिंगहॅमचें प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें होतें (१७६५), त्यानें स्टॅम्प ॲक्ट रद्द केला व त्यामुळें वसाहतींत तात्पुरती स्वस्थता झाली.

२. **चहाप्रकरण.** पुढें वुइल्यम पिट (पिट हा आतां अर्ल ऑफ चॅथॅम झाला) व ग्रॅफ्टन यांचें प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें

( १७६६ जुलै ); त्यांतील फडनवीस टाउनशेंड यानें वसाहतींत आयात होणाऱ्या काच, कागद, रंग व चहा या पदार्थांवर जकात बसविली ( १७६७). वसाहतवाल्यांनीं याही करांचा जोरानें निषेध केला. १७७०त लॉर्ड नॉर्थ मुख्य प्रधान झाला, त्यानें इतर पदार्थांवरील जकाती काढून टाकल्या; चहावरील जकात मात्र जॉर्जच्या आग्रहावरून कायम ठेविली. तेव्हां वसाहतवाले चिडून गेले व त्यांनीं चहा सोडूं पण कर देणार नाहीं असा निश्चय केला. १७७३त मॅसॅच्युसेट्स संस्थानांतील बॉस्टन बंदरांत चहानें लादलेलीं तीन गलबतें होतीं त्यांजवर रेड इंडियनांचा वेष घेऊन वीस धाडसी गृहस्थ चढले व त्यांनीं त्यांतील चहा समुद्रास्तृप्यन्तु केला. ही बातमी इंग्रज सरकारास समजली तेव्हां त्यानें रागावून बॉस्टन बंदर व्यापाराला बंद केलें व या चळवळींत मॅसॅच्युसेट्स संस्थान प्रमुख आहे, असें पाहून त्याची सनद रद्द केली व तेथें सुलतानी एकतंत्री अंमल सुरू केला. इंग्लिश पार्लमेंटांत बहुमत जरी दडपशाही करणाऱ्या सरकारास अनुकूल होतें तरी एडमंड बर्क व चॅथम यांच्यासारखे स्वातंत्र्याचे कैवारी अमेरिकेशीं समेट करावा असें जोरानें प्रतिपादीत होते. परंतु जॉर्जनें त्या वेळीं पार्लमेंट नृपानुयायी होयबांनीं भरून टाकिली असल्यामुळें त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले व तंटा विकोपास गेला.

३. **आरंभींच्या चकमकी.** इंग्लंडांत आपलें स्वातंत्र्य कायम रहात नाहीं म्हणून अमेरिकेंत गेलेल्या धैर्यशील व स्वातंत्र्यप्रिय लोकांचे वसाहतवाले वंशज होते. तेव्हां त्यांच्या ठायीं स्वातंत्र्यप्रेय दिसून आलें यांत काय नवल? विशेषतः न्यू [1] इंग्लंड संस्था-

---

१. एकंदर वसाहती तेरा होत्या. त्यांचे तीन गट होते; १ न्यू इंग्लंड, २ मध्य वसाहती, व ३ दक्षिण वसाहती. न्यू इंग्लंडमध्यें मॅसॅच्युसेट्स आदिकरून चार वसाहती असून त्यांत तेजस्वी प्यूरिटनांची वस्ती होती.

नांतील लोक आपले हक्क शाबूत राखण्याच्या कामीं अत्यंत जागरूक असत. युद्धांतील पहिली चकमक लेक्झिंग्टन येथें झाली पण तींत निश्चित जय कोणाचाच झाला नाहीं. नंतर अमेरिकनांनीं जॉर्ज वॉशिंग्टन या प्रसिद्ध योद्धयास आपला सेनापति नेमिलें. वॉशिंग्टनची चिकाटी व देशभक्ति विलक्षण होती. जयानें चढून न जातां व पराभवानें खचून न जातां त्यानें यापुढें एकसारखी आपल्या देशाची उत्कृष्ट कामगिरी बजाविली. बॉस्टनमधील इंग्रज सैन्य व अमेरिकन लोक यांजमध्यें बॉस्टनजवळ 'बंकर हिलवर' लढाई झाली(१७७५). तींत अमेरिकन मोठ्या शौर्यानें लढले व त्यांच्या शौर्याचा इंग्रजांच्या मनावर चांगला वचक बसला.

४. **स्वातंत्र्याचा जाहीरनामा व सॅरॅटोगाची लढाई.** आतां वसाहतवाल्यांस आपल्या कर्तृत्वाचा विश्वास पटला; तेव्हां तेरा वसाहतींच्या प्रतिनिधींची कांग्रेस फिलॅडेल्फिया येथें भरली व तिनें " स्वातंत्र्याचा जाहीरनामा " काढून अमेरिका ( तेरा वसाहती ) इंग्लंडपासून स्वतंत्र असल्याचें जगजाहीर केलें (४ जुलै १७७६). यानंतर अमेरिकन व इंग्रज यांजमध्यें अनेक लढाया झाल्या. एकदां सॅरॅटोगा येथें इंग्रज सेनापति बर्गाइन यास शरण यावयास लावून अमेरिकनांनीं मोठा जय मिळविला ( १७७७ ऑक्टोबर ). या सॅरॅटोगाच्या जयानें अमेरिकनांस दुप्पट हिंमत चढली व इंग्रजांच्या अमेरिकेंतील वर्चस्वास जबर धक्का बसला.

५. **फ्रान्स व स्पेन युद्धांत पडले.** सॅरॅटोगा येथील अमेरिकनांच्या जयामुळें युद्धांत मोठा फरक पडला. अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतवाले पराक्रमी आहेत, आपण साहाय्य केल्यास तो देश स्वतंत्र होईल व आपण 'क्यानडा'बद्दल इंग्लंडचा सूड घेतल्यासारखें होईल असे विचार फेंच सरकारच्या मनांत येऊन त्यानें अमेरिकेशीं तह केला ( १७७८ ). पुढें स्पेन, हॉलंड, डेन्मार्क वगैरे युरोपियन

राष्ट्रेंही इंग्लंडविरुद्ध सामील झालीं. या वेळीं अर्ल ऑफ चॅथॅम हा अगदीं म्हातारा झाला होता व त्याचें शरीर संधिवातानें अगदीं जर्जर झालें होतें. तथापि इंग्लंडचा शत्रु फ्रान्स अमेरिकेची बाजू घेणार असें कळतांच त्याच्या देशाभिमानानें उसळी मारली. लॉर्ड्स-सभेपुढें अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य करावें अशी सूचना आली होती. तिला विरोध करण्यासाठीं चॅथॅम हजर राहिला व "वसाहतवाल्यांशीं उदारपणानें समेट करा, पण फ्रान्सला भिऊन त्यांचें स्वातंत्र्य मान्य करणें इंग्लंडला लज्जास्पद आहे" असें तो म्हणाला. भाषण करीत असतां त्याला मूर्च्छा आली ( १७७८ एप्रिल ). पुढें लवकरच या महान् इंग्रज मुत्सद्याचा अंत झाला ( ११ मे १७७८ ).

६. **कॉर्नवॉलिस शरण गेला.** अशा रीतीनें इंग्लंडविरुद्ध बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रें उठल्यावर अमेरिकेंतील इंग्रज सेनापतीस इंग्लंडहून मदत पोंचविणें अशक्य झालें. इंग्रज सेनापति कॉर्नवॉलिस दक्षिण वसाहतींत यॉर्क टाऊन येथें होता व न्यू यॉर्कमधील सैन्याशीं त्याचें समुद्रावरून दळणवळण होतें. पण फ्रेंच आरमारानें तें लवकरच तोडलें. मग फ्रेंच ॲड्मिरलनें समुद्रावरून व वॉशिंग्टननें जमिनीवरून कॉर्नवॉलिसच्या सैन्याचा असा कोंडमारा केला कीं, निरुपाय होऊन यॉर्क टाऊन येथें कॉर्नवॉलिस अमेरिकनांस शरण गेला ( १७८१ ऑक्टोबर ). कॉर्नवॉलिसवर इंग्लंडची सर्व भिस्त होती. तेव्हां तो शरण गेल्यावर या युद्धांत अमेरिकेचा जय होऊन अमेरिकेंतील युद्ध संपलें.

७. **इंग्रजांवरील संकटें.** इकडे युरोपियन राष्ट्रांशीं इंग्लंडचें युद्ध जोरानें सुरू होतें. स्पॅनिश आरमारानें जिब्राल्टरला वेढा घातला होता व जनरल एलियट हा मोठ्या शौर्यानें त्या ठाण्याचा बचाव करीत होता. शेवटीं स्पॅनिश आरमारानें वेढा उठविला व जिब्राल्टर इंग्रजांकडे कायम राहिलें. वेस्ट इंडीजमध्यें ॲड्मिरल रॉडनी यानें

पराक्रम गाजवून फ्रेंच आरमारावर मोठा जय मिळविला (१७८२). या जयानें इंग्रजांचें समुद्रावरील वर्चस्व पुनः स्थापित झालें व इंग्लंडचें अमेरिकेशीं दळणवळण तुटलें होतें तें पुनः कायम झालें. या वेळीं आयर्लंड व हिंदुस्थान येथेंही इंग्रज मोठ्या पेंचांत आले. हेन्री ग्रॅटन या प्रसिद्ध आयरिश देशभक्ताच्या मागणीवरून पॉयनिंग्जचे कायदे रद्द करून आयरिश पार्लमेंटला पूर्ण स्वातंत्र्य देणें इंग्रजांस भाग पडलें (१७८२). यापुढें १८००पर्यंत राजा तिसरा जॉर्ज येवढाच ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांना जोडणारा साखळीचा दुवा राहिला. हिंदुस्थानांतही मराठे व हैदरअली यांनीं एक होऊन इंग्रजांवर चाल केली व फ्रेंच आरमार कांहीं सैन्य घेऊन हिंदुस्थानकडे जाण्यास निघालें. पण हिंदुस्थानचा इंग्रज गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज यानें पहिल्या दोघांची व्यवस्था लाविली व ॲड्मिरल ह्यूज यानें फ्रेंच आरमाराचा पराभव करून त्यास परतावयास लाविलें.

८. **व्हर्सेल्झचा तह** (१७८३). अशा रीतीनें इंग्रजांस चोहोंबाजूंनीं ताण बसला व लॉर्ड नॉर्थ यानें जयाविषयीं निराश होऊन राजीनामा दिला(१७८२ मार्च).नंतर रॉकिंगहॅमचें व्हिग प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें. त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें व मग लवकरच व्हर्सेल्झ येथें तह ठरला ( १७८३ ). त्याअन्वयें अमेरिकेचें स्वातंत्र्य इंग्रजांनीं कबूल केलें. यापुढें क्यानडा व त्याच्या जवळच्या वसाहती मात्र इंग्रजांकडे राहिल्या. अमेरिका ( United States, संयुक्त संस्थानें) स्वतंत्र झालीं तेव्हां तेरा संस्थानें होतीं तीं आतां अठ्ठेचाळीस झालीं आहेत. ॲटलँटिक व पॅसिफिक महासागर या अमेरिकेच्या हल्लीं पूर्वपश्चिम मर्यादा असून विद्येंत व कर्तृत्वांत पहिल्या प्रतीचें राष्ट्र म्हणून तिची गणना आहे. परंतु अमेरिकन संयुक्त संस्थानांचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यास अद्यापि अमेरिकन लोक ‘ राष्ट्रीय

विभूति' मानितात व 'युद्धांत पहिला, शांततेंत पहिला व आपल्या देशबंधूंच्या अंतःकरणांत पहिला,' अशी त्याची अजून ख्याति आहे.

---

## ३०. तरुण पिट प्रधानगिरीवर आला.

(औद्योगिक क्रान्ति).

**१. पिटचें कर्तृत्व.** अमेरिकन युद्ध संपल्यावर कांहीं महिन्यांनीं जॉर्जनें चॅथॅमचा मुलगा वुइल्यम पिट यास मुख्य प्रधान नेमिलें. पिटचा जन्म सप्तवार्षिक युद्धांतील १७५९ या विजयसंवत्सरांत झाला असून तो या वेळीं अवघा चोवीस वर्षांचा होता. त्याचे प्रतिस्पर्धी म्हणूं लागले 'काय ! हीं पोरें प्रधानगिरीचा खेळ खेळूं लागलीं काय? यांचे कान उपटून यांस परत शाळेंत शिकावयास पाठविलें पाहिजे.' पण लोकमत आपल्याला अनुकूल आहे असा पिटला पक्का विश्वास होता. पार्लमेंटांत टोरी पक्षाची सरशी होती. पिट त्या पक्षाचा पुढारी बनला व त्या पक्षाच्या बळावर त्यानें दीर्घकाल इंग्लंडची राज्यनौका हाकारली ( १७८३-१८०१ ). कर्तृत्वशक्ति, औदार्य व पार्लमेंटपेक्षां राष्ट्रावर वजन पाडून लोकप्रियता मिळविण्याची हौस हे गुण त्याच्या ठायीं बापाप्रमाणें उत्कटत्वानें वास करीत होते. शांतताप्रेम, दीर्घोद्योग, कामाचा आटोप, वादकुशलता व आंकडेशास्त्रांतील प्रावीण्य हे गुण त्याच्या ठिकाणीं असून यांत वॉलपोलशीं त्याचें साम्य आढळून येतें. वॉलपोलचे दोष मात्र त्याच्या ठिकाणीं बिलकूल दिसून आले नाहींत. तो स्वार्थ–निरपेक्ष असून लांचेचा उपयोग राज्यकारभारांत त्यानें केला नाहीं. आपले अनुयायी आपल्या वरचढ होतील ही भीति त्याला कधींही वाटली नाहीं. वॉलपोलचा विरोध करणाऱ्या 'बॉय पेट्रियट्स-मधून ' चॅथॅमसारखे हिरे निघाले तर पिटनें हातीं धरलेल्या लोकां-

तून, क्यानिंग, वेल्स्ली यांजसारखे प्रसिद्ध पुरुष निघाले. पिट टोरी पक्षाचा पुढारी असला तरी नॉर्थप्रमाणें राजाच्या हातचें बाहुलें तो केव्हांही बनला नाहीं. त्यानें राजाशीं स्वाभिमानपूर्वक वागून आपल्या मताप्रमाणें राष्ट्रकल्याण करण्याचें उज्वल धोरण स्वीकारिलें.

२. **औद्योगिक क्रान्ति.** पिट जेव्हां अधिकारारूढ झाला तेव्हां इंग्लंडांत अनेक कारखाने उभारिले गेले असून नानाप्रकारचे उद्योगधंदे सुरू झाले होते. अठराव्या शतकाचा उत्तरार्ध म्हणजे इंग्लंडच्या हल्लींच्या उद्योगधंद्यांच्या बीजारोपणाचा काळ होय. युट्रेक्टच्या तहामुळें (१७१३) दक्षिण अमेरिकेशीं इंग्लंडचा व्यापार सुरू झाला होता. तशांत सप्तवार्षिक युद्धांत फ्रान्सवर विजय मिळवून इंग्लंडनें आपली समुद्रावरील सत्ता दृढ केली आणि क्यानडा व हिंदुस्थानांतील बंगाल यांची प्राप्ति करून घेतली. त्यामुळें इंग्लंडच्या मालाला खूप गिऱ्हाईक लाभून अतिशय मागणी उत्पन्न झाली. अर्थात् इंग्लंडच्या उद्योगधंद्यांना व व्यापाराला कल्पनेबाहेर उत्तेजन मिळालें, व संपत्तीचा प्रचंड ओघ इंग्लंडकडे वाहूं लागला. याच सुमारास अनेक यांत्रिक शोध झाले; त्यामुळें उत्तर इंग्लंड व मध्य इंग्लंड या भागांत जोरदार उद्योगधंद्यांची लाट उसळली व देशस्थितींत अत्यंत पालट झाला. पुष्कळ खेडेगांवांचीं शहरें बनलीं, नवीन जंगी शहरें अस्तित्वांत आलीं व शेतकी–प्रधान इंग्लंडदेश लवकरच औद्योगिक कारखान्यांनीं भरून गेला. या औद्योगिक क्रान्तीमुळें इंग्लंडची सांपत्तिक भरभराट झाली व पुढें नेपोलियनशीं झालेल्या भयंकर युद्धांतील अवाढव्य खर्च करण्याची ताकद त्याला आली.

३. **शोध, कारखाने व वाहतूक.** इंग्लंडांत पूर्व काळापासून लोंकर होत असे व पुष्कळ लोंकर फ्लँडर्समध्यें रवाना होई. पुढें एलिझबेथ व दुसरा जेम्स यांच्या काळीं अनेक फ्लेमिंग्ज (फ्लँडर्सचे रहिवाशी) धर्मच्छळामुळें इंग्लंडांत वस्ती करून राहिले व

तेव्हांपासून पूर्व इंग्लंडांत लोंकरीचें कापड तयार करण्याचा धंदा सुरू झाला. तथापि सर्व काम हातांनींच चालत असल्यामुळें धंदा घरगुती स्वरूपाचा असे. त्या उद्योगाचे कारखाने नव्हते. तशीच कापसाच्या कापडाची स्थिति होती. पण १७६०नंतर कापसाचें सूत व कापड बनविण्याच्या धंद्यांत नवीन शोध लागले. त्यामुळें त्या धंद्यांचें घरगुती स्वरूप जाऊन त्यांना कारखान्यांचें स्वरूप आलें. १७६१सालीं धांवते धोटे ( Fly Shuttles ) निघाले.पुढें जेम्स हार्ग्रीव्ह्ज व आर्कराइट यांनीं सूत कांतण्याचीं नवीन यंत्रें तयार केलीं. त्यामुळें सूत फार भराभर निघूं लागलें. नंतर क्रॉम्प्टन यानें या दोन्ही यंत्रांचा मिलाफ करून एक नवीन सूत काढण्याचें यंत्र ( Mule) बनविलें. आणखी कांहीं वर्षांनीं कार्टराईट यानें बाष्पशक्तीनें चालणारा माग काढला व भराभर निघणारें सूत झटपट विणून त्याचें कापड बनविण्याची सोय करून दिली. मध्यं-तरीं जेम्स वॅट यानें बाष्पयंत्रांत सुधारणा करून तें उपयुक्त केलें होतें व खाणींतून काढलेल्या लोखंडाचा रस बनविण्यास दगडी कोळसा उपयोगीं पडतो हा शोध लागला होता. त्यामुळें लोखं-डाचीं यंत्रें बनविण्याच्या उद्योगाची झपाट्यानें वाढ झाली. थोड्याच काळांत लँक्याशायरमध्यें कापडाचे कारखाने, यॉर्कशायरमध्यें लोंक-रीचे कारखाने व मध्य इंग्लंडांत लोखंडी कामाचे कारखाने वाढूं लागले. दगडी कोळसा खाणींतून काढण्याचा धंदाही मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. कारखान्यांना लागणारा दगडी कोळसा व मोठीं यंत्रें आणि कारखान्यांतून तयार झालेला माल वाहून नेण्यास साधे रस्ते उप-योगीं पडतनासे होते. तेव्हां सर्व उद्योगधंद्यांच्या भागांत लवकरच कालव्यांचें जाळें पसरण्यांत आलें व या जलमार्गानें नेआण मोठ्या प्रमाणावर व स्वस्त होऊं लागली.

४. **मोठ्या प्रमाणावर शेती.** १७६०पर्यंत शेतीही

लहान प्रमाणावरच करण्यांत येई. तथापि लोकसंख्या थोडी असल्यामुळें देशास धान्य पुरून तें परदेशांत रवाना होई. औद्योगिक क्रान्तीबरोबर शेतीही मोठया प्रमाणांत करण्यांत येऊं लागली. मोठमोठया जमीनदारांनीं लहान जमिनी व गांवरानें ( Commons ) विकत घेऊन आपलीं मोठीं शेतें बनविलीं. त्यामुळें धान्याची निपज पुष्कळच वाढली. तथापि वाढत्या लोकसंख्येच्या मानानें ही वाढ पुरी पडली नाहीं. लहान लहान स्वतंत्र शेतकरी आतां नाहींतसे झाले. यापूर्वी त्यांनीं आपल्या शेतावर काम करावें, घरीं बायकोनें सूत कांतावें व दोघांच्या श्रमांनीं कुटुंबपोषण करावें अशी स्थिति होती. परंतु औद्योगिक क्रान्तीमुळें कारखान्यांतून सूत इतक्या मोठ्या प्रमाणावर निघूं लागलें व तें इतकें स्वस्त झालें कीं, स्वतंत्र शेतकऱ्याच्या घरचा धंदा बसला. त्यामुळें शेतावर त्याला निर्वाह न करितां आल्यामुळें तें विकून तो मजूर बनला.

**५. सांपत्तिक सुधारणा.** १७७६सालीं अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ याचा राष्ट्रांची संपत्ति ( Wealth of Nations ) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. शेतांत पिकणारें धान्य व कारखान्यांत होणारा माल म्हणजे राष्ट्राची संपत्ति असून केवळ सोनें, रुपें ही संपत्ति नव्हे, तीं देण्याघेण्याचीं फक्त साधनें होत. देश श्रीमंत करावयाचा म्हणजे त्यांत अधिक मालाची उत्पत्ति झाली पाहिजे व देशाला जो माल नको असेल तो देऊन त्याच्या बदली जरूर तो माल परदेशांतून आला पाहिजे. ज्याप्रमाणें व्यक्तीला कोणताही माल कोठेंही घेण्याची मोकळीक असते त्याप्रमाणें एका देशाला दुसऱ्या देशाशीं व्यापाराची पूर्ण मोकळीक असावी. देशांत आयात होणाऱ्या व देशांतून निर्गत होणाऱ्या मालावर सरकारनें उत्पन्नाकरितां थोडीशी जकात ठेवावी; पण त्यामुळें व्यापारावर निर्बंध ठेवण्याची इच्छा धरूं नये. वरील विचारसरणी ॲडम स्मिथच्या ग्रंथांत होती. पिटनें ‘ राष्ट्रांची संपत्ति ’

या ग्रंथाचा चांगला अभ्यास केला होता व त्याला हीं मतें मान्य झालीं होतीं. त्या काळीं जकाती जबर असत व त्या वसूल करितांना अनेक लबाड्या होत. पिटनें बहुजनसमूहास लागणाऱ्या चहा व दारू यांजसारख्या पदार्थांवरील आयात जकाती पुष्कळ कमी केल्या. त्यामुळें पदार्थांच्या किंमती उतरल्या व जकाती चुकविण्याचे प्रकार बंद झाले. मागणी इतकी वाढली कीं, जकाती कमी केल्या तरी सरकारचें उत्पन्न कमी न होता उलट वाढलें. सरकारी खर्चांतही पिटनें शक्य तितकी काटकसर केली. त्यामुळें सरकारी उत्पन्नांत तूट येत होती, ती स्थिति पालटून दरसाल शिल्लक पडूं लागली. अमेरिकन युद्धामुळें राष्ट्रीय कर्ज वीस कोटि पौंडांपर्यंत वाढलें होतें. पिटनें राष्ट्रीय कर्जाच्या फेडीसाठीं एक गंगाजळी (Sinking Fund) करण्याचें ठरवून त्याकरितां दहा लक्ष पौंड दरसाल शिल्लक टाकून चक्रवाढीनें व्याजी लावावयाचे व त्या निधींतून शेवटीं राष्ट्रीय कर्जाची फेड करावयाची अशी व्यवस्था केली.

६. **इतर सुधारणा.** इंग्लिश पार्लमेंट लोकमताची खरीखुरी निदर्शक करण्यासाठीं सुधारणा करणें जरूर आहे असें इंग्लिश मुत्सद्यांस वाटूं लागलें होतें. पुष्कळ बरो केवळ नामधारी असून त्यांतून जे सभासद निवडून येत ते कोणातरी श्रीमंताचे हस्तक असत. कौंटींतून सभासद निवडून येत ते मात्र बरेच लोकमत-निदर्शक असत. तेव्हां नामधारी बरोंचा सभासद पाठविण्याचा हक्क काढून घेऊन तो कौंटींना द्यावा यासाठीं पिटनें एक सुधारणेचें बिल पार्लमेंटपुढें आणिलें. परंतु श्रीमंत व्हिग पुढाऱ्यांच्या मालकीचीं बरींच बरो असत; त्यांनीं बिलाला जोरानें विरोध केला व त्यामुळें पिटचें बिल नापास झालें. निग्रो गुलाम अमेरिकेंत नेले जात; हा क्रूरपणाचा व्यापार बंद करण्यासाठीं विल्बरफोर्स हा उदार पुरुष झटत होता. तो पिटचा मित्र असल्यामुळें त्याच्या आग्रहावरून पिटनें गुलामांच्या

व्यापार-बंदीचें बिल पार्लमेंटपुढें आणिलें. परंतु तें पास झालें नाहीं. अशा रीतीनें इंग्लंडची सांपत्तिक भरभराट होत होती व सुधारणा करण्यासाठीं पिट झटत होता. एकोणिसाव्या शतकांत ज्या सुधारणा प्रत्यक्ष घडून आल्या त्यांची दिशा पिटनें मोठ्या दूरदृष्टीनें ओळखिली व त्या घडवून आणण्याची खूप खटपट केली. पार्लमेंटची सुधारणा, गुलामांची मुक्तता, खुला व्यापार, धर्मस्वातंत्र्य या सर्व बाबतींत त्याचे प्रयत्न चालू होते. अमेरिकन युद्धाच्या वेळीं इंग्लंड एकाकी होऊन त्याचें परदरबारीं वजन नाहींसें झालें होतें. पिटनें हॉलंड व प्रशिया या राष्ट्रांशीं स्नेहाचे तह केले, फ्रान्सशींही एक व्यापारी तह करून इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें माफक जकाती ठेवून खुला व्यापार चालू केला, व अशा रीतीनें इंग्लंडचें अन्तर्राष्ट्रीय महत्त्व पुनः प्रस्थापित केलें. चोहों बाजूस शांतता असून इंग्लंड सुखाच्या व वैभावाच्या शिखरावर चढणार असा रंग होता. इतक्यांत फ्रान्समध्यें भयंकर राज्यक्रांति झाली व तिचा धक्का सर्व युरोपखंडास बसून सर्व देश हादरले. तेव्हां पिटचे सुधारणेचे उद्योग बाजूस राहून इंग्लंडला भयंकर युद्धासाठीं कंबर कसावी लागली.

---

## ३१. फ्रान्सशीं युद्ध.

**१. फ्रेंच राज्यक्रान्ति.** अर्वाचीन युगाला आरंभ होऊन आणि छापखाने, धर्मस्वातंत्र्य, शास्त्रीय शोध, व राष्ट्रीयत्वाची बुद्धि इत्यादिकांची विशेष शक्ति युरोपांत अवतीर्ण होऊन जरी कांहीं शतकें लोटलीं होतीं, तरी फ्रान्सची व इतर युरोपियन देशांची समाजरचना मध्ययुगाच्या धर्तीवर बसविली होती. धर्मगुरु व सरदार यांचें सर्व समाजावर पूर्ण वर्चस्व चालणें हा या रचनेचा विशेष असून त्याचा

फ्रान्समध्यें जारीनें अंमल होता. सरदार व बडे धर्मगुरु यांना पुष्कळ विशेष हक्क व सवलती असत. त्यांच्यावरील कर अगदीं हलके असून सामान्य जनतेवर करांचें ओझें भयंकर असे. सर्व वरिष्ठ सरकारी नोकऱ्या ‘ बडे बापके बेटयां’करितां राखून ठेविलेल्या असत. त्यामुळें सामान्य जनांना आपली कर्तबगारी दाखविण्यास सवड राहिली नाहीं. बरें त्यांनीं एखादा धंदा करावा म्हटलें तर गांवोगांव धंदेवाल्यांचे संघ असत. त्यांत शिरकाव होणें मुष्किलीचें झालें होतें. अशा वेळीं व्हॉल्टेअर ( १६९४–१७७८ ) या ग्रंथकारानें तेजस्वी लेख लिहून धर्मखात्यांतील दोष उघडकीस आणिले व लोकांची स्वतंत्र विचारशक्ति प्रदीप्त केली. त्याचप्रमाणें रूसो (१७१२–७८) या प्रसिद्ध ग्रंथकारानें निसर्गाच्या रम्य स्वरूपाचें वर्णन करून समाजांतील कृत्रिम भेदांवर खरमरीत टीका केली. शिवाय या काळांत अनियंत्रित राज्यपद्धतीचा फ्रान्समध्यें अंमल असून लोकमताची किंमत कवडीमोल होती. फ्रान्समधील लोकप्रतिनिधिसभेची ( States General) बैठक सन १६१४पासून–म्हणजे पावणे दोनशें वर्षांत कधींच बोलावण्यांत आली नव्हती. त्यामुळें लोकांतील असंतोष व्यक्त होण्यास कांहींच साधन न राहून तो धुमसत राहिला. सर्व अठराव्या शतकभर फ्रान्सनें परदेशांशीं लढाया केल्या, त्यांत खर्च फार झाला. तशांत अमेरिकेंतील वसाहती व हिंदुस्थान हातचीं गेल्यामुळें व्यापार नाहींसा झाला; शेवटीं सरकारचें दिवाळें निघण्याची वेळ आली. तेव्हां लोकप्रतिनिधींपुढें आपली स्थिति मांडावी म्हणून राजा सोळावा लुई यानें लोकसभेची बैठक भरविली ( १७८९ ). त्या सभेनें आपल्याला ‘ राष्ट्रीय सभा ’ असें नांव धारण केलें, सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली, सरदार व धर्मगुरु यांचे सर्व विशिष्ट हक्क रद्द केले, व राजसत्तेवर निर्बंध घातले. लवकरच पॅरिसमधील सामान्य लोकांनीं बॅस्टिल हा बडा तुरुंग फोडून कैद्यांना बंधमुक्त केलें.

इकडे राजानें राष्ट्रीय सभेविरुद्ध कारस्थानें चालविलीं. तेव्हां तिजमध्यें जलाल क्रांतिकारकांचा जोर झाला. त्यांनीं राजा सोळावा लुई व त्याची सुंदर राणी मेरी ॲन्टॉय्नेट यांना पहिल्यानें कैदेंत टाकिलें व नंतर फांसावर चढविलें. लागलीच फ्रान्समध्यें निर्भेळ लोकसत्ताक (Republic)स्थापन झालें आणि स्वतंत्रता, समता व बंधुता या त्रयीचा घोष चालू झाला. या खळबळींत क्रांतिकारक सत्ताधीश झाले व त्यांनीं विरुद्ध पक्षास चीत करण्यासाठीं अनन्वित प्रकार केले. हजारों लोकांच्या कत्तली केल्या. त्यावरून हा क्रांतिकारकांच्या सत्तेचा काळ सैतानी अंमल ( Reign of Terror ) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे ( १७९३ एप्रिल–१७९४ जुलै ).

२. **इंग्लंड युद्धांत पडलें.** फ्रान्समधील चळवळीसंबंधीं पहिल्यानें इंग्लंडांत द्विधा मत होतें. फ्रेंच लोकांनीं बॅस्टिल तुरुंग फोडला तेव्हां व्हिग पुढारी फॉक्स मोठ्या आनंदानें म्हणाला, " इतिहासांत ही सर्वांमध्यें मोठी व उत्तम गोष्ट घडली. " प्रसिद्ध मुत्सद्दी एडमंड बर्क यानें 'फ्रेंच राज्यक्रांतीवरील विचार' हें पुस्तक लिहिलें ( १७९० ); त्यांत फ्रेंचांच्या कृतीवर खरमरीत टीका असून फ्रान्सांत शेवटीं कोणातरी सेनापतीचा सुलतानी अंमल सुरू होणार असें भाविष्य वर्तविलें होतें. तथापि फ्रेंच राज्यव्यवस्था हा फ्रेंच लोकांचा घरगुती प्रश्न आहे त्यांत इतरांस पडण्याचें कारण नाहीं या दृष्टीनें मुख्य प्रधान पिट यानें त्र्ययस्थाप्रमाणें वागण्याचें ठरविलें. पण ही स्थिति फार काळ टिकली नाहीं. लवकरच फ्रेंच लोकसत्ताकानें जाहीर केलें कीं, " ज्या कोणांस स्वातंत्र्य मिळवावयाचें असेल, त्यास मदत करण्यास आम्ही तयार आहों. " नंतर त्यांनीं ऑस्ट्रियन नेदर्लंड्स ( हल्लींचें बेल्जियम ) येथील राज्य उलथून तेथें प्रजासत्ताक स्थापिलें व पुढें हॉलंडचीही तीच गत करण्याची धमकी घातली. तेव्हां इंग्लंडनें फ्रान्सच्या वर्तनाचा निषेध केला.

ऑस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांनीं अगोदरच फ्रान्सशीं युद्ध सुरू केलें होतें. आतां फ्रान्सनें आपल्या राजास फांसावर चढवून इंग्लंड व हॉलंड या दोन्ही देशांविरुद्ध युद्ध पुकारलें ( १७९३ फेब्रुवारी).

३. **आरंभींच्या झटापटी.** हें महायुद्ध १७९३पासून १८१५-पर्यंत टिकलें. त्याचे दोन खंड पडतात. पहिला १७९३ते१८०२; त्या सालीं अमीन्सचा तह होऊन युद्ध तात्पुरतें बंद झालें. दुसरा खंड १८०३ ते १८१५. १८१५त वॉटर्लूची लढाई होऊन या महा-युद्धाची समाप्ति झाली. प्रथम पिटनें स्पेन, हॉलंड, ऑस्ट्रिया व प्रशिया या राष्ट्रांचा इंग्लंडशीं **पहिला मित्रसंघ** बनविला. युरोपांतील देशांस पैसे चारून युद्धास उभें करावयाचें व इंग्लंडच्या आरमाराचा फ्रेंच जहाजें, वसाहती वगैरे काबीज करून फ्रान्सचा कोंडमारा करण्याचे कामीं उपयोग करावयाचा असें दुहेरी धोरण पिटनें अंगीकारिलें. प्रथम जमिनीवरील युद्धांत दोस्तांना जय आले नाहींत व जिकडे तिकडे फ्रान्सचीच सरशी झाली. शेवटीं १७९५त फ्रान्सनें स्पेन व हॉलंड यांना पहिल्या मित्रसंघांतून फोडिलें; मग त्या तिन्ही राष्ट्रांनीं मिळून इंग्लंडवर स्वारी करण्याचें ठरविलें. परंतु ब्रिटिश आरमारामुळें इंग्लंडचा बचाव झाला. ॲड्मिरल जर्व्हिस व नेलसन यांनीं फ्रेंच व स्पॅनिश संयुक्त आरमाराचा पोर्तुगालच्या पश्चिमेस केप सेंट व्हिन्सेंटजवळ पराभव केला व पुढें लवकरच ॲड्-मिरल डंकन यानें डच आरमाराचा क्याम्पर्डाऊन येथें पराभव केला. या जयांनीं इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व कायम झालें व फ्रान्सचा इंग्लंडवरील स्वारींचा बेत फिसकटला.

४. **नेपोलियनचा उदय.** फ्रेंचांचा प्रसिद्ध योद्धा नेपोलियन बोनापार्ट हा याच सुमारास उदयास आला. हा कॉर्सिका बेटांत १७६९सालीं जन्मला व त्याचें शिक्षण फ्रान्समधील लष्करी

शाळांतून झालें. १७९३ सालीं फ्रेंच लोकसत्ताकाविरुद्ध फ्रान्समध्यें बंडें होऊं लागलीं होतीं. या बंडखोरांत फ्रान्सच्या दक्षिणेकडील टूलन बंदरांतील लोक प्रमुख असून त्यांना इंग्रजांची मदत होती. त्या शहरावर प्रजासत्ताकानें सैन्य पाठविलें; त्यांतील तोफखान्यावर नेपोलियनची नेमणूक केली. तेथें नेपोलियननें इतकी उत्कृष्ट कामगिरी बजाविली कीं मदतगार इंग्रज तेव्हांच निघून गेले व टूलन प्रजासत्ताकाच्या हातीं आलें. पुढें इटली जिंकण्यासाठीं नेपोलियनच्या हाताखालीं जंगीं सैन्याची रवानगी झाली. लवकरच ऑस्ट्रियाचा इटलींतील मुलूख जिंकून नेपोलियन खास ऑस्ट्रियाच्या हद्दींत शिरला. तेव्हां ऑस्ट्रियाचा बादशहा घाबरून गेला व त्यानें नेपोलियनशीं तह केला ( १७९७ ). या तहानें **पहिला मित्रसंघ** धुळीस मिळविला, नेपोलियनचें नांव सर्व जगभर दुमदुमूं लागलें व फ्रान्सचा वचक पुरा बसला.

५. **नाइलची लढाई** (१७९८). पुढें नेपोलियननें ईजिप्त जिंकण्याचें ठरविलें. मग जंगी फौज बरोबर घेऊन तो ईजिप्तला गेला व त्यानें केरोजवळ **मनोऱ्यांची लढाई** (Battle of the Pyramids) जिंकून तुर्कांवर मोठा जय मिळविला. इतक्यांत नाइल नदीच्या मुखाशीं अबुकीर खाडींत नेपोलियननें ठेविलेल्या फ्रेंच आरमारी काफिल्यावर अॅड्मिरल नेल्सन यानें हल्ला केला व त्याचा फन्ना उडविला ( १७९८ ). त्यामुळें नेपोलियनचें फ्रान्सशीं दळणवळण तुटलें, आणि धान्य, दारूगोळा व माणसें यांचा पुरवठा बंद पडून नवे प्रांत जिंकणें व जिंकलेले प्रांत स्वसत्तेखालीं राखणें त्याला जवळ जवळ अशक्य झालें. तथापि त्यानें न डगमगतां पॅलेस्टाइनमध्यें जाऊन जाफा शहर सर केलें व एकर शहरास वेढा घातला. परंतु सिड्नी स्मिथ यानें शहरवासीयांस केलेल्या मदतीमुळें एकर घेणें अशक्य होऊन नेपोलियन ईजिप्तमध्यें हटला. तेथें अबुकीर

खाडीजवळ तुर्की सैन्यावर त्यानें पुनः मोठा जय मिळविला (१७९९).

६. **दुसरा मित्रसंघ.** नेपोलियन फ्रान्समध्यें नाहीं असें पाहून १७९९च्या आरंभीं रशिया, ऑस्ट्रिया व इंग्लंड यांनीं **दुसरा मित्रसंघ** बनविला. लवकरच इटलींत व फ्रान्सच्या पूर्व सरहद्दीवर दोस्तांनीं जोराचे हल्ले केले व फ्रेंच सेनापतींचा पराभव केला. नेपोलियनला दोस्तांच्या या जयाच्या बातम्या ईजिप्तमध्यें समजल्या, तेव्हां इजिप्तच्या बंदरांवर पहारा करणाऱ्या इंग्लिश जहाजांना गुंगारा देऊन तो मोठ्या चलाखीनें फ्रान्सांत परत आला. पॅरिसमध्यें जाऊन राज्यव्यवस्थेंत बदल करून सर्व सत्ता त्यानें आपल्या हातीं घेतली. नंतर आल्प्स पर्वत उतरून मॅरेंगो येथें मोठा जय मिळवून त्यानें इटली पादाक्रांत केली; याच वेळीं मोरो या दुसऱ्या फ्रेंच सेनापतीनें बव्हेरियामध्यें होहेनलिंडेन येथें ऑस्ट्रियाचा पराभव केला. तेव्हां ऑस्ट्रियानें फ्रान्सशीं पुनः तह केला (१८०१). याच सुमारास जहाजांची झडती घेण्याच्या इंग्रजांच्या नियमास कंटाळून रशिया, प्रशिया, स्वीडन, व डेन्मार्क यांनीं तटस्थ राष्ट्रांचा संघ (Armed Neutrality) निर्माण केला. अशा तऱ्हेनें **दुसरा मित्रसंघ** धुळीस मिळून इंग्लंडला कोणीच साहाय्यकर्ता राहिला नाहीं.

७. **नेलसनचा पराक्रम, अमीन्सचा तह** (१८०२). इंग्लंड अगदीं एकाकी झालें असतां त्याला ब्रिटिश आरमाराचा मोठा उपयोग झाला. 'सशस्त्र तटस्थ संघा'पैकीं डेन्मार्कच्या कोपेनहेगेन या राजधानीच्या शहराजवळील आरमारावर हल्ला करून इंग्लिश आरमारानें डच आरमाराचा धुव्वा उडविला. या युद्धांत नेल्सन हा इंग्लिश आरमारावरील मुख्य अधिकारी नव्हता, तथापि त्याच्या पराक्रमामुळें इंग्रजांस जय आला. लढाई चालू असतां मुख्य ॲडमिरलनें शत्रूवरील गोळ्यांचा भडिमार बंद करण्याविषयीं खूण केली आहे असें एक अधिकारी नेल्सनला सांगूं लागला. आणखी कांहीं वेळ भडि-

मार चालू ठेविल्यास आपण लढाई खास जिंकूं अशी नेल्सनला खात्री होती. मग दुर्बीण आपल्या गेलेल्या डोळ्यास लावून तो बोलला "मला तर खूण कोठें दिसत नाहीं." अर्थातच त्यानें लढाई तशीच चालू ठेविली व जय संपादन केला. या युद्धानें डेन्मार्क संघांतून फुटलें (१८०१). आतां इंग्लंड व फ्रान्स हीं दोघेंही युद्धास कंटाळलीं होतीं. तेव्हां उभयपक्षीं अमीन्स ( Amiens ) येथें तह ठरला ( १८०२ ). फ्रान्सनें आणखी देश पादाक्रान्त न करण्याचें कबूल केलें, व इंग्रजांनीं आपल्या राजाच्या बिरुदावळींतून 'फ्रान्स-चा राजा' ही पदवी काढून टाकण्याचें मान्य केलें.

८. **आयर्लंडची स्वतंत्र पार्लमेंट मोडली.** हें फ्रान्सशीं युद्ध चालू असतां आयर्लंडमध्यें अस्वस्थता असून आयरिश लोक फ्रान्सशीं एकसारखीं गुप्त खलबतें करीत होते. तेव्हां ही आपत्ति टाळण्यासाठीं पिटला आयर्लंडची नवीन व्यवस्था करणें जरूर झालें. १७८२त आयरिश पार्लमेंट इंग्लिश पार्लमेंटपासून स्वतंत्र झाली; परंतु तिच्या निवडणुकींतही क्याथॉलिकांस हक्क नव्हता. मग त्यांस पार्लमेंटचे सभासद होण्याचा अधिकार नव्हता हें सांगणें नको. अर्थातच क्याथॉलिक आयरिश जनता अगदीं असंतुष्ट होती. शिवाय इंग्लंडनें केलेल्या जांचक व्यापारविषयक निर्बंधांनीं व प्रॉटेस्टंट जमीन-दारांच्या वाढत्या भाड्यांनीं ती पिळून निघाली होती; फ्रेंच राज्य-क्रान्तीपासून आयर्लंडचा असंतोष खूप वाढला. शेवटीं त्यांच्यांतील जलाल लोकांनीं 'युनायटेड आयरिशमेन' नांवाची एक मंडळी स्थापिली. १७९८त युनायटेड आयरिशमेननीं वुल्फटोन या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडची आयर्लंडवरील सत्ता हाणून पाड-ण्यासाठीं बंड केलें. परंतु त्याचा तात्काळ मोड झाला. पुढें आय-र्लंड व इंग्लंड यांचा संबंध दृढ व्हावा आणि तेथील क्याथॉलिक व प्रॉटेस्टंट यांचा तंटा निर्मूल व्हावा यासाठीं पिटनें स्वतंत्र आयरिश

पार्लमेंट मोडून टाकून इंग्लिश पार्लमेंटांत आयर्लंडचे सभासद घेऊन दोन्ही पार्लमेंट एक करण्याचा बेत केला. मग एकीचा कायदा ( Act of Union ) पास होऊन दोन्ही पार्लमेंट एक झाल्या (१८००). आयरिश लॉर्डांस अठ्ठावीस सभासद लॉर्ड्ससभेंत पाठविण्याचा हक्क मिळाला, व कॉमन्ससभेंत आयर्लंडमधून शंभर सभासद निवडून यावेत असें ठरलें. देशाचें नांव बदलून 'युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन ॲन्ड आयर्लंड' असें नांव देण्यांत आलें. दोन्ही पार्लमेंट एक करितांना रोमन क्याथॉलिक लोकांस आपण पार्लमेंटचे सभासद होण्याचा हक्क देऊं व सरकारी नोकऱ्या खुल्या करूं असें पिटनें कबूल केलें होतें. पण ही गोष्ट आपल्या राज्यारोहणाच्या वेळच्या शपथेला विरुद्ध आहे, सबब ती आपण फेटाळून लावूं असें तिसरा जॉर्ज म्हणूं लागला. तेव्हां पिटला राजीनामा देणें भाग पडलें ( १८०१ ). त्याच्या जागीं ॲडिंग्टन हा मुख्य प्रधान झाला. अशा रीतीनें या एकीच्या कायद्यानें आयर्लंडची स्वतंत्र पार्लमेंट मात्र गेली व क्याथॉलिकांस कोणतीही सवलत मिळाली नाहीं असें आयर्लंडचें दुहेरी नुकसान झालें.

---

# ३२. नेपोलियनशीं युद्ध.

१. **इंग्लंडवरील स्वारीची तयारी.** अमीन्सच्या तहानें कायमची शांतता झाली नाहीं. त्या तहानंतर एक वर्षभर इंग्लंड व फ्रान्स यांनीं पुनः घोर युद्ध करण्यासाठीं थोडी विश्रांति घेतली. पुनः १८०३मध्यें युद्ध सुरू झालें. हें दुसरें युद्ध १८०३पासून १८१५-पर्यंत चाललें. १८०४मध्यें नेपोलियननें 'फ्रान्सचा बादशहा' ही पदवी घेतली. प्रथम त्यानें इंग्लंडवर फौज उतरवून तो देश

जिंकण्याचें ठरविलें. ही कामगिरी बजावण्यासाठीं त्यानें बुलोन बंदरांत एक जंगी सैन्य तयार केलें (१८०४). या सैन्यास इंग्लंडच्या किनाऱ्यावर पोंचविण्यासाठीं ब्रेस्ट, केडिझ व टूलन या बंदरांत आरमार तयार होऊं लागलें. नेपोलियननें चालविलेल्या तयारीमुळें इंग्लंडमधील लोकांस मोठी चिंता पडली. तेव्हां ॲडिंग्टन याची प्रधानगिरीवरून उचलबांगडी होऊन पिट पुन: मुख्य प्रधान झाला (१८०४). इंग्लंडच्या किनाऱ्यावर पहारा होऊं लागला. आणि पिटनें रशिया व आस्ट्रिया यांस जमिनीवरून नपोलियनवर चालून जाण्यासाठीं खूप खंडणी देण्याचें कबूल करून **तिसरा मित्रसंघ** बनविला (१८०५).

२. **ट्राफल्गार.** १८०५त नेपोलियनचें आरमार तयार झालें. टूलन बंदरांतून ॲड्मिरल व्हील्नव्ह यानें आपला काफिला काढिला व केडिझमधील स्पॅनिश काफिल्यासह त्यानें वेस्ट इंडीजकडे जाण्याचें सोंग करून इंग्लिश ॲड्मिरल नेल्सन यास बरेंच दूरवर नेलें. मग एकदम झुकांडी देऊन फ्रेंच परत फिरले. परंतु लवकरच नेल्सनला ही गोष्ट कळली व तो पाठलाग करीत आला. दोघांची गांठ ट्राफल्गारजवळ पडली. या लढाईंतील जयापजयावर इंग्लंडचें एकंदर युद्धांतील यशापयश अवलंबून आहे हें नेल्सनला पक्कें कळून चुकलें होतें व तो मोठ्या आवेशानें लढत होता. ' प्रत्येक इंग्रज नागरिकानें आपलें कर्तव्य करावें अशी इंग्लंडची अपेक्षा आहे ' असें वाक्य लिहिलेली पताका सर्वांस दिसेल अशा उंच ठिकाणीं आपल्या जहाजावर त्यानें लाविली होती. या युद्धांत फ्रेंच आरमाराचा पुरा मोड झाला. पण हा जय इंग्लंडला सहज मिळाला नाहीं. युद्ध चालू असतां नेल्सनला जिव्हारी जखम झाली. जयाची बातमी कळतांच तो ह्मणाला " मीं आपलें कर्तव्य केलें याबद्दल मला समाधान वाटतें. " नंतर त्याचें प्राणोत्क्रमण झालें. ट्राफल्गारच्या लढाईनें फ्रेंच आरमार नाहींसें होऊन नेपोलियनला इंग्लंडवर स्वारी करणें अशक्य झालें व इंग्लं-

डचा कायमचा बचाव झाला. त्यावरून नेल्सन हा 'इंग्लंडचा सर्वांत थोर नाविक वीर' (The Greatest Naval Hero of England) म्हणून प्रसिद्ध आहे.

३. **टिल्सिटचा तह.** इंग्लंडवर सैन्य पाठवितां येत नाहीं असें पाहून नेपोलियननें बुलोन येथील जंगी सैन्य बरोबर घेतलें, आणि ऑस्ट्रिया व रशिया यांच्या संयुक्त सैन्यांचा ऑस्टर्लिट्झ येथें फारच मोठा पराभव केला (१८०५ डिसेंबर). रशियन तह न करतां तसेच परत गेले. आस्ट्रिया मात्र नेपोलियनला शरण गेला. अशा रीतीनें **तिसऱ्या मित्रसंघाचा** चुराडा झाला. पुढें नेपोलियननें रशियाचा पुनः पराभव केला व मग नेपोलियन बादशहा व रशियाचा झार यांजमध्यें टिल्सिट येथें स्नेहाचा तह ठरला (१८०७). पूर्वेकडे झारनें स्वेच्छेनें कारभार करावा व पश्चिमेस नेपोलियन बादशहानें आपल्या मनास येईल तशी व्यवस्था करावी असा ठराव झाला. सहा वर्षेंपर्यंत हा स्नेह टिकला व तेथवर नेपोलियनची सत्ता अखंड राहिली.

४. **पिटचा मृत्यु.** ऑस्टर्लिट्झच्या पराभवाची बातमी समजली तेव्हां पिटला जबर धक्का बसला व तो मृत्यु पावला (१८०६ जानेवारी). त्याचे शेवटचे उद्गार पुढीलप्रमाणें होते; "आतां हा युरोपचा नकाशा गुंडाळा, दहा वर्षेंपर्यंत त्याची मुळींच जरूर पडणार नाहीं." पिटच्या मृत्यूनंतर व्हिग व टोरी या दोन्ही पक्षांचें संयुक्त प्रधानमंडळ (Coalition Ministry, कोॲलिशन मिनिस्ट्री) अधिकारारूढ झालें. त्यांत फॉक्स हा व्हिग पुढारी व ग्रेन्व्हिल हा टोरी पुढारी यांचें संगनमत होतें. पुढें फॉक्स वारल्यावर (१८०६ सप्टेंबर) सैन्य व आरमार या खात्यांत क्याथॉलिकांसही नोकऱ्या द्याव्या असें बिल प्रधानमंडळानें पार्लमेंटपुढें आणिल्यामुळें तिसरा जॉर्ज रागावला व प्रधानमंडळास राजीनामा देणें भाग झालें (१८०७).

नंतर टोरी पक्ष पुनः अधिकारारूढ झाला, व १८३०पर्यंत त्याच्या हातीं सत्ता राहिली. टोरी मंत्री सुधारणेस प्रतिकूल असत; पण त्यांनीं फ्रान्सशीं जोरानें युद्ध चालविलें व धिमेपणानें वागून इंग्लंडचा बचाव केला.

५. **द्वीपकल्पांतील युद्ध.** नेपोलियननें १८०८त आपला भाऊ जोसेफ यास स्पेनच्या गादीवर बसविलें. परंतु स्पॅनिश लोकांस ही नेपोलियनची कृति आवडली नाहीं व त्यांनीं जोरानें प्रतिकार सुरू केला. त्यामुळें नेपोलियनला जमिनीवरून विरोध करण्यास इंग्लंडला उत्तम संधि मिळाली. लवकरच हिंदुस्थानांतील युद्धांत प्रसिद्धीस आलेला सर आर्थर वेल्स्ली याच्या हाताखालीं एक ब्रिटिश फौज स्पेनकडे रवाना झाली (१८०८). १८०८ पासून १८१४ पर्यंत वेल्स्ली स्पेन व पोर्तुगाल या दोन्ही देशांत नेपोलियनच्या सैन्याशीं एकसारखा चिकाटीनें झगडत राहिला. हें युद्ध "द्वीपकल्पांतील युद्ध" (Peninsular War, पेनिनशुलर वॉर) म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. वेल्स्लीनें प्रथम टॅलॅव्हेरा येथें मोठा जय मिळविला, तेव्हां त्याला व्हायकाउन्ट वेलिंग्टन बनविण्यांत आलें. पुढें त्यानें अनेक जय मिळविले; त्यावरून शेवटीं त्याला डयूक ऑफ वेलिंग्टन ही पदवी मिळाली. या द्वीपकल्पांतील युद्धाचें शुक्लकाष्ठ नेपोलियनमागें लावून वेल्स्लीनें चांगली कामगिरी बजाविली. या युद्धांत ब्रिटिश क्षात्रतेजाची चमक युरोपियन राष्ट्रांस पहावयास सांपडली व इंग्रजांचा लष्करी लौकिक वाढला. मार्लबरोनंतर वेलिंग्टन हाच इंग्रजांमध्यें अत्यंत नामांकित सेनापति होऊन गेला.

६. **परस्परावर बहिष्कार.** नेपोलियन बादशहाचें युरोपांत वर्चस्व बसल्यावर त्यानें इंग्लंडला जेरीस आणण्याचा नवीन उपाय योजला. युरोपांत युद्धामुळें कारखाने बंद होते; तेव्हां इंग्लंडांतील कारखाने दुप्पट जोरानें चालू होते व त्यामुळें इंग्लंडला खूप द्रव्यप्राप्ति

होत होती. इंग्लंडला वठणीवर आणावयास त्याचा व्यापार तोडून उद्योगधंदे मारणें जरूर होतें. तेव्हां कोणाही युरोपियन राष्ट्रानें इंग्लंडशीं व्यापार करावयाचा नाहीं असा नेपोलियननें जाहीरनामा काढिला. त्यावर इंग्लंडनेंही ' जशास तसें ' या न्यायानें फ्रान्स व त्याचे मित्र यांच्या देशांचीं बंदरें व्यापारास बंद करून टाकिलीं. युद्धानें युरोपांतील उद्योगधंदे बुडाले होतेच; आतां युरोपियन राष्ट्रांस समुद्रावरून व्यापार चालविण्याची बंदी झाली. नेपोलियननें काढलेल्या इंग्लंडवरील व्यापारी बहिष्काराच्या व्यवस्थेस " महाद्वीपस्थ संघ " ( Continental system ) असें म्हणतात. इंग्लंड व फ्रान्स यांच्या या परस्परावरील बहिष्कारामुळें युरोपियन राष्ट्रांचा मोठा कोंडमारा झाला व तीं अगदीं त्रासून गेलीं.

७. **नेपोलियनचा पराभव.** शेवटीं १८१२सालीं रशियाचा नेपोलियनशीं मोठा तंटा झाला. तेव्हां रशियाचा पराभव करण्यासाठीं जंगी सैन्यासह नेपोलियन मॉस्कोवर चालून गेला. रशियनांनीं तें शहर जाळून टाकल्यामुळें व जवळचा मुलूख उध्वस्त केल्यामुळें फ्रेंच सैन्याची फजिती उडाली. कडक थंडींत नेपोलियन परत फिरला. आतां नेपोलियनविरुद्ध रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया, हीं सर्व राष्ट्रें उठलीं व त्यांनीं लीप्झिक येथें त्याचा पराभव केला (१८१३). याच सुमारास स्पेनमध्यें वेलिंग्टननें व्हिटोरिया येथें मोठा जय संपादन केला. तेव्हां जोसेफ बोनापोर्टास स्पेनमधून निघून जावें लागलें. इतक्यांत रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया, यांचीं विजयी सैन्यें पॅरिसवर चालून आलीं ( १८१४ ).मग नेपोलियनला इटलीजवळच्या एल्बा बेटांत हद्दपार करण्यांत आलें; व मारला गेलेल्या सोळाव्या लुईच्या भावास ' अठरावा लुई म्हणून फ्रान्सची गादी मिळाली.

८. **वॉटर्लूची लढाई.** यानंतर इंग्लंड, प्रशिया, ऑस्ट्रिया व रशिया हीं राष्ट्रें युरोपची नवीन व्यवस्था लावण्याच्या तयारीस लागलीं.

इतक्यांत नेपोलियन एल्बांतून सुटून पुनः फ्रान्सांत प्रकट झाला. लागलीच त्याचे जुने सैनिक त्याच्याभोंवतीं जमले व नेपोलियननें 'फ्रान्सचा बादशहा' ही पदवी पुनः धारण केली. आतां सर्व युरोपियन राष्ट्रें नेपोलियनचे शत्रु बनलीं होतीं व फ्रेंच सरहद्दीवर त्यांचीं सैन्यें गोळा होत होतीं. या सैन्यांचा समाचार घेतल्याशिवाय फ्रान्सची गादी पचणें त्याला शक्य नव्हतें. प्रशिया व इंग्लंड यांची सैन्यें नेदर्लंड्समध्यें असून वेलिंग्टन व ब्लूचर हे नामांकित योद्धे त्यांचे सेनापति होते. प्रथम या सैन्यांशीं लढाई देण्याचें नेपोलियननें ठरविलें. अगोदर प्रशियन सैन्याचा पराभव करून वॉटर्लू येथें नेपोलियन इंग्लिश सैन्यावर चालून गेला. तेथें १८ जून १८१५ रविवारीं इंग्रज सैन्य व फ्रेंच सैन्य यांची गांठ पडली. मोठें भयंकर रणकंदन झालें. सायंकाळीं इंग्रजांच्या मदतीस प्रशियन सेनापति ब्लूचर येऊन दाखल झाला. त्यामुळें नेपोलियनचा या लढाईंत पुरा मोड झाला. नंतर त्याला दक्षिण ॲटलॅन्टिक महासागरामधील सेंट हेलेना या दूरच्या बेटांत हद्दपार करण्यांत आलें. तेथें तो सहा वर्षांच्या बंदिवासानंतर सन १८२१त मृत्यु पावला. पुढें १८४०त त्याच्या अस्थि फ्रान्सांत आणण्यांत येऊन त्यांचें मोठया समारंभानें पॅरिस येथें दफन झालें. अशा रीतीनें इंग्लंड व फ्रान्स यांचा जो एक शतकभर झगडा चालला होता त्यांत इंग्लंड विजयी झालें. युद्धाच्या शेवटीं इंग्लंडला केप ऑफ गुड होप, सीलोन इत्यादि प्रदेशांची प्राप्ति झाली. नेपोलियनशीं युद्ध चालू असतां पैसा व माणसें या दोन्ही बाबतींत इंग्लंडला मनस्वी ताण पडला. नेपोलियन अद्वितीय सेनापति, हुशार मुत्सद्दी व कर्तबगार राज्यकर्ता म्हणून गाजला होता. इतका कीं, त्याच्या तोडीचा पुरुष सांपडणें कठिण. परंतु नाविक सत्तेच्या अभावीं नेपोलियनचे सर्व बेत फसले, व त्याचे शत्रु युद्धांत यशस्वी झाले. या नेपोलियनाविरुद्ध झालेल्या

युद्धांत मुत्सद्दी पिट, नाविक नेल्सन व रणशूर वेलिंग्टन या तीन महापुरुषांच्या कामगिरीचा इंग्लंडला मोठा उपयोग झाला.

९. **चौथा जॉर्ज.** १७८८पासून तिसऱ्या जॉर्जला वेडाच्या लहरी येत. शेवटीं १८१०त तो कायमचा वेडा झाला. तेव्हां त्याचा मुलगा जॉर्ज प्रिन्स ऑफ वेल्स यास पार्लमेंटनें पालक ( रिजेंट ) नेमिलें. युद्ध संपल्यावर पांच वर्षांनीं तिसरा जॉर्ज मृत्यु पावला व प्रिन्स ऑफ वेल्स हा चौथा जॉर्ज म्हणून गादीवर आला.

---

# ३३. मध्यमवर्गास मताधिकार मिळाला.

१ . **एकोणिसाव्या शतकाचा ओघ.** १८१५ सालीं वॉटर्लूच्या लढाईंत ब्रिटिश साम्राज्याचा बडा शत्रु नेपोलियन याचा पराभव झाला व ब्रिटिश साम्राज्य निर्बाध झालें. यापुढें राष्ट्रीयत्व व लोकसत्ता या दोन शक्ति युरोपखंडांत जोरानें वावरूं लागल्या. त्यामुळें स्वतंत्र इटली व संयुक्त जर्मनी यांची स्थापना होऊन ( १८७१ ), तुर्कस्थानच्या अवनतीमुळें सर्व्हिया, बल्गेरिया, रुमानिया इत्यादि बाल्कन राष्ट्रांचा उदय झाला. राष्ट्र या नात्यानें इंग्लंडचें अस्तित्व पूर्वकालापासूनच कायम झालें असल्यामुळें राष्ट्रीयत्वाचा उदय करण्याचें कार्य इंग्रजांस करण्याची जरूरी नव्हती. १६८८च्या क्रांतीनें लोकसत्तेचें तत्त्वही इंग्लंडांत प्रस्थापित झालें होतें. परंतु अजून लोकसत्तेची अभिवृद्धि करून तिचें उन्नत स्वरूप इंग्लंडांत रूढ करावयाचें होतें. पार्लमेंटचा दाब राजसत्तेवर पडला होता, परंतु पार्लमेंट म्हणजे लोक किंवा लोकप्रतिनिधि हें समीकरण अजून यथार्थ व्हावयाचें होतें. १८१५पासून इंग्लंडच्या इतिहासांतील नव्या कालविभागास सुरुवात झाली; व त्यांत

खऱ्याखुऱ्या लोकसत्तेची अभिवृद्धि करण्याचें कार्य इंग्रजांनीं साधिलें.

२. **क्याथॉलिकांचें दुःखनिवारण.** पार्लमेंटांत क्याथॉलिकांस सभासद म्हणून बसण्यास कायद्याची आडकाठी होती. आयर्लंडांतील बहुजनसमाज क्याथॉलिक होता. तेव्हां क्याथॉलिकांना सभासद होतां येत नसलें तरी निदान जे सभासद निवडून यावयाचे ते आपल्याला संमत असेच असावेत या हेतूनें डॅनिअल ओकॉनेल या प्रसिद्ध आयरिश देशभक्तानें १८२३त एक क्याथॉलिक समिति (Catholic Association) स्थापिली व आयर्लंडांतील सर्व निवडणुकींवर तिची हुकमत चालू लागली. इकडे इंग्लंडांतील व्हिग पक्षीयांनीं टेस्ट ॲक्ट व कॉर्पोरेशन ॲक्ट रद्द करण्याविषयीं खटपट चालविली. परंतु हें करण्यास पक्का टोरी मुख्य प्रधान ड्यूक ऑफ वेलिंग्टन (१८२८–१८३०) आढेवेढे घेऊं लागला. तथापि शेवटीं व्हिग पक्षाचा जोर होऊन ते कायदे रद्द झाले(१८२८). त्यायोगें डिसेंटर लोकांना सरकारी नोकरीवर येण्यास कायमची मोकळीक झाली. १८२८तच ओकॉनेल हा क्याथॉलिक असतां आयरिश मतदारांनीं त्याला पार्लमेंटचा सभासद निवडलें. हें बेकायदेशीर होतें; पण ओकॉनेलला पार्लमेंटांत न बसूं दिलें तर दंगा होऊन यादवी माजणार हें निश्चित होतें. तेव्हां पक्का टोरी वेलिंग्टन यानें या वेळीं शांतता राखण्यासाठीं क्याथॉलिकांवरील निर्बंध काढून घेण्याचें ठरविलें. 'क्याथॉलिक रिलीफ बिल' पास होऊन क्याथॉलिकांस पार्लमेंटचे सभासद होण्याची परवानगी मिळाली व सरकारी नोकऱ्याही मोकळ्या झाल्या (१८२९). अशा रीतीनें ग्रेट ब्रिटनमध्यें धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें प्रस्थापित झालें. अगोदरच टोरी पक्षांत प्रगतिप्रिय टोरी व पक्के टोरी असे दोन उपपक्ष होते. प्रगतिप्रिय टोरी क्याथॉलिकांस सवलती देण्यास अनुकूल होते. वेलिंग्टनचें वर्तन त्याच्या पुष्कळ पक्क्या टोरी अनुयायांस पसंत पडलें नाहीं,

तेव्हां त्यांच्यामध्यें द्विधा मत होऊन टोरी पक्ष अधिकच दुर्बल झाला.

३. **पार्लमेंट-सुधारणेची जरूरी.** पार्लमेंटला सभासद पाठविण्याचा हक्क पूर्वकाळीं अनेक ठिकाणांस देण्यांत आला होता. त्या काळीं इंग्लंड कृषिप्रधान देश होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत औद्योगिक क्रान्ति होऊन इंग्लंडांतील स्थलांचें महत्त्व पार बदलून गेलें. ज्या खेड्यांस सभासद पाठविण्याचा हक्क होता त्यांपैकीं कित्येक अगदीं नामशेष झालीं होतीं. अर्थात् अशीं खेडीं कोणातरी श्रीमंताच्या मालकीचीं बनून त्यानें आपल्या हस्तकांस त्यांच्यातर्फे कॉमन्सचे सभासद नेमावें असा क्रम सुरू होता. उलटपक्षीं मँचेस्टर, लीड्स, बर्मिंगहॅम हीं शहरें उद्योगधंद्यांनीं भरभराटलीं होतीं, तथापि त्यांस सभासद निवडण्याचा हक्क मुळींच नव्हता. औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीं दक्षिण इंग्लंड श्रीमंत व लोकसंख्येनें गजबजलेलें असे; उत्तर इंग्लंड मात्र गरीब व मागसलेलें होतें. क्रांतीनंतर लोखंड व दगडी कोळसा या खनिज संपत्तीमुळें उत्तर इंग्लंड उद्योगधंद्यानें गजबजून गेलें व दक्षिण इंग्लंड पूर्वींप्रमाणें कृषिप्रधान राहिलें. तथापि पार्लमेंटला सभासद पाठविण्याची जुनी पद्धति कायम होती. अर्थातच पार्लमेंट लोकमतनिदर्शक राहिली नाहीं.

४ **पार्लमेंट-सुधारणेची खटपट.** चॅथॅम व पिट यांनीं नामधारी बरोंचा सभासद पाठविण्याचा हक्क काढून घेण्यासाठीं खटपट केली होती. परंतु लवकरच फ्रेंच राज्यक्रांतीनंतर युद्धांत इंग्लंड सांपडल्यामुळें हा प्रश्न मागें पडला. या युद्धांत ब्रिटिश साम्राज्याच्या प्राणावरील संकट दूर झालें व इंग्लंडचें अंतर्राष्ट्रीय वर्चस्व कायम झालें. मग पार्लमेंटच्या निवडणुकीच्या पद्धतींत सुधारणा करण्याचा प्रश्न जोरानें पुढें आला उत्तरेकडील कारखानदार व व्यापारी यांनीं प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळविण्यासाठीं ओरड सुरू केली. युद्धानंतर मजूरवर्गाची स्थिति फार असमाधानकारक झाली होती.

पार्लमेंटमध्यें आपले प्रतिनिधि गेल्यास आपली स्थिति सुधारेल या समजुतीनें त्यांनींही निवडणुकीचा हक्क मिळावा म्हणून चळवळ सुरू केली. एकदां मँचेस्टर येथें मजुरांची एक जंगी सभा भरली व कडक भाषणें होऊं लागलीं. सरकारनें ती सभा मोडण्याचा प्रयत्न केला, तेव्हां दंगा होऊन कित्येक माणसें जखमी झालीं व थोडीं मृत्युमुखीं पडलीं (१८१९). हा प्रसंग 'पीटर्लूची कत्तल' या नांवानें प्रसिद्ध आहे. पण अशा दडपशाहीनें चळवळ बंद पडणें शक्य नव्हतें. व्हिग पक्षानें पार्लमेंटमध्यें सुधारणेसाठीं एकसारखी खटपट चालविली; पण टोरी पक्ष पार्लमेंट–सुधारणेस एकजात विरुद्ध असल्यामुळें सुधारणा होण्यास बराच काळ लागला.

५. **रिफॉर्म बिल** (१८३२). १८३०मध्यें सुधारणेला अनुकूल परिस्थिति निर्माण झाली. त्या सालीं टोरी मुख्य प्रधान वेलिंग्टन याला राजीनामा द्यावा लागला, व त्याबरोबर पन्नास वर्षें अधिकारारूढ असलेला टोरी पक्ष अधिकारच्युत झाला. नंतर व्हिग प्रधानमंडळ अधिकारारूढ होऊन लॉर्ड ग्रे हा मुख्य प्रधान झाला. अधिकारावर येतांच या प्रधानमंडळानें एक 'रिफॉर्म बिल' (पार्लमेंटच्या सुधारणेचें बिल) कॉमन्ससभेपुढें मांडिलें; पण तें नापास झालें. राष्ट्रमत आपणास अनुकूल आहे अशी प्रधानमंडळाची खात्री असल्यामुळें त्यानें पार्लमेंट बरखास्त करून नवीन निवडणूक केली. निवडणूक चालू असतां प्रधानमंडळानें आपली बाजू लोकांपुढें जोरानें मांडिली. त्याचा सुपरिणाम होऊन नव्या कॉमन्ससभेंत रिफॉर्म बिल जंगी बहुमतानें पास झालें. नंतर लॉर्ड्सनीं तें बिल नामंजूर केलें. तेव्हां देशांत मोठा क्षोभ झाला व दंगे होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. "बिल, संपूर्ण बिल व बिलाशिवाय दुसरें कांहीं नको" हें सुधारणा पक्षाचें या वेळीं ब्रीदवाक्य बनून गेलें होतें. प्रधानमंडळानें पुनः नवें बिल तयार केलें व कॉमन्ससभेंमध्यें तें पास झालें.

पण अजूनही लॉर्ड ऐकेनात. तेव्हां ग्रेनें राजास नवे लॉर्ड बनवून हें बिल लॉर्ड्समध्यें पास करून घेण्याची सूचना केली. १८३०त चौथा जॉर्ज वारून त्याचा भाऊ "चौथा वुइल्यम" गादीवर आला होता. तो मृदु स्वभावाचा असल्यामुळें हा कडक उपाय करण्याचें त्याला धैर्य झालें नाहीं. तथापि ड्यूक ऑफ वेलिंग्टन व त्याचे कित्येक अनुयायी यांनीं आपल्या पक्षाचें दौर्बल्य ओळखून बिलास विरोध केला नाहीं, व बिल लॉर्डांच्या सभेंतही मंजूर होऊन त्याला कायद्याचें स्वरूप आलें (१८३२). या बिलाअन्वयें नामधारी बरोंचा सभासद पाठविण्याचा हक्क काढून घेण्यांत आला, व बड्या कौंटींना अधिक सभासद निवडून देण्याचा हक्क देण्यांत आला. तसेंच मँचेस्टर, लीड्स, बर्मिंगहॅम इत्यादि शहरांस प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मिळाला. मतदारांच्या संख्येंतही खूप वाढ झाली. शहरांत व खेडेगावांत दुकानदार व शेतकरी अशा मध्यमवर्गास पार्लमेंटला सभासद निवडून देण्याचा अधिकार मिळाला. आजपर्यंत पार्लमेंटमध्यें श्रीमंत जमीनदार वर्गाचें वर्चस्व होतें, त्यांत पालट होऊन यापुढें मध्यमवर्गाच्या हातीं सत्ता आली. अजून मजूरवर्गाला मतदारीचा हक्क मिळावयाचा होता. त्या दृष्टीनें १८६७ व १८८४ या सालीं कायदे होऊन सुधारणेचें पाऊल पुढें पडलें.

६. **पक्षांचीं नवीं नांवें.** रिफॉर्म बिलची चळवळ चालू असतां इंग्लंडांतील पक्षांस नवीन नांवें पडलीं. जुनी स्थिति आहे तशीच ठेवावी असें टोरी पक्ष म्हणत असे. त्यावरून त्यास कॉन्सर्व्हेटिव्ह (Conservative, स्थितिप्रिय) पक्ष असें नांव पडलें. त्याच्या उलट सुधारणा करून लोकस्वातंत्र्य वाढेल या दृष्टीनें राज्यरचनेंत बदल केला पाहिजे असें व्हिग पक्ष प्रतिपादीत असे. त्यावरून त्यास लिबरल (Liberal, उदार) पक्ष असें अभिधान प्राप्त झालें. कित्येकजण राज्ययंत्राच्या मुळाशींच सुधारणा करणें जरूर आहे असें म्हणत;

त्यांस रॅडिकल ( Radical, मूलस्पर्शी ) असें नांव मिळालें.

७. **म्युनिसिपल रिफॉर्म ॲक्ट** (१८३५). रिफॉर्म बिलप्रमाणें निवडणुकी झाल्या, त्यांत कॉमन्ससभेंत व्हिग पक्षाचें बहुमत झालें. यापुढें १८७४पर्यंत आठ वर्षें सोडून व्हिग पक्षच अधिकारारूढ होता. १७८४पासून १८३०पर्यंत टोरी प्रधानांच्या हातीं राज्यकारभार होता. रिफॉर्म बिल पास करून व्हिग पक्षानें मध्यमवर्गाला राजकीय हक्क दिले व यापुढें त्या पक्षाला दीर्घ काल अधिकार प्राप्त झाला. अधिकारावर येतांच व्हिग पक्षानें अनेक सुधारणा केल्या. हा काळपर्यंत बरोंमधील म्युनिसिपालिट्यांचे सभासद हयातीपर्यंत आपल्या जागीं रहात, व आपल्यामागून येणाऱ्या लोकांचीही सामान्यतः तेच निवडणूक करीत. १८३५सालीं ‘ म्युनिसिपल रिफॉर्म ॲक्ट ’ पास झाला. त्यांत म्युनिसिपालिटीचे कौन्सिलर निवडून देण्याचा हक्क कर भरणाऱ्या सर्व नागरिकांस देण्यांत आला व दर तीन वर्षांनीं नव्या कौन्सिलरांची निवडणूक व्हावी असें ठरलें. यामुळें या कायद्यानें म्युनिसिपालिटयांत सामान्य जनांचे प्रतिनिधि येणें सुलभ होऊन लोकांस व्यावहारिक राजकीय शिक्षण मिळण्याची सोय झाली.

८. **गुलामांची मुक्तता** (१८३३). भूतदयाप्रेरित होऊन गुलामांच्या मुक्ततेचा प्रश्न आतां पार्लमेंटनें हातीं घेतला. आफ्रिकेंतील निग्रो गुलाम अमेरिकेंत विकण्याचा धंदा कित्येक इंग्रज करीत. हा गुलामांचा व्यापार १८०७ सालीं गुलामांच्या व्यापार–बंदीच्या कायद्यानें बंद झाला. तथापि अजून ब्रिटिश वसाहतींत बड्या शेतीवर गुलामांचा उपयोग मळेवाले नित्य करीत. १८३३ सालीं सर्व ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरी नाहींशी करण्याचें बिल पार्लमेंटनें पास केलें व गुलामांच्या मालकांस या कायद्यानें त्यांच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल मोबदला म्हणून दोन कोटि पौंड देण्याचें ठरविलें.

९. **शिक्षण.** १८३३पर्यंत इंग्लंडांतील प्राथमिक शिक्षण केवळ खासगी शाळा, धर्मखात्यानें चालविलेल्या शाळा व उदार गृहस्थांच्या देणग्यांनीं चाललेल्या शाळा यांतून होई. खासगी प्राथमिक शाळांस मदत देण्यासाठीं १८३३त पार्लमेंटनें वीस हजार पौंडांची वार्षिक देणगी मंजूर केली.पुढें १८३९त प्रिव्ही कौन्सिलची शिक्षण-कमिटी नेमण्यांत येऊन तिच्या हातीं बरीच मोठी रक्कम सरकारनें दिली. या कमिटीनें शिक्षण नीट रीतीनें व्हावें म्हणून मदत घेणाऱ्या शाळांवर देखरेख ठेवण्यास तपासनीस नेमिले. त्याचप्रमाणें या वेळीं शिक्षक तयार करण्यास एक नमुनेदार ट्रेनिंग स्कूल स्थापन झालें.

१०. **गरिबांचा कायदा** ( Poor Law, १८३४ ).एलिझबेथच्या कारकीर्दीत १६०१मध्यें एक गरिबांचा कायदा झाला होता. पुढें त्यांत बदल होऊन अशी वहिवाट पडली कीं गांवच्या अधिकाऱ्यांनीं गरीब कुटुंबास मदत म्हणून थोडी रक्कम द्यावयाची. कुटुंबाच्या स्वकष्टार्जित मिळकतींत ही भर पडे. परंतु या पद्धतीनें शेतकरी लोक मजुरीचा दर अगदीं कमी करीत, व मजुरांस ‘ सार्वजनिक दानधर्मांतून ’ आपल्या रोजमुऱ्यांत भर घालावी लागे. त्यामुळें सार्वजनिक दानधर्मांतून अतिशय खर्च होऊं लागला, व आळसास उत्तेजन येऊन पुष्कळ धट्टेकट्टे लोक स्वाभिमानशून्य होऊन ‘ गरीब ’ म्हणून दानधर्मांतून मदत घेऊं लागले; तेव्हां १८३४त पार्लमेंटनें गरिबांचा नवीन कायदा ( New Poor Law ) केला. त्या कायद्यानें कोणाही धष्टपुष्ट भिकाऱ्यास ‘भिकारखान्या ’ बाहेर (workhouse) मदत द्यावयाची नाहीं असें ठरलें. भिकारखाने कार्यक्षम व यशस्वी करण्याची व त्यांतून धट्टयाकट्टया भिकाऱ्यांकडून काम चोपून घेण्याची व्यवस्था झाली. याचा सुपरिणाम होऊन मजुरीचे दर वाढले, धष्टपुष्ट लोकांत स्वकष्टानें उदरपोषण करण्याची प्रवृत्ति चालू

झाली, व खर्च कमी झाल्यामुळें दानधर्म-कराचा ( Poor rate ) जनतेवरील बोजा बराच हलका झाला.

---

## ३४. औद्योगिक प्रगति.

( खुला व्यापार ).

१. **व्हिक्टोरिया.** रिफॉर्म बिल पास होऊन सत्ताधारी व्हिग पक्षानें नवे गुलामगिरीसारखे अनिष्ट प्रकार बंद केले. हें चाललें होतें इतक्यांत १८३७त चौथा वुइल्यम मृत्यु पावला व त्याच्या गादीवर त्याची तरुण पुतणी व्हिक्टोरिया ही आली. हॅनोव्हरचा संस्थानिक पहिला जॉर्ज हा इंग्लंडचे गादीवर बसला तेव्हांपासून इंग्लंडचा राजा व हॅनोव्हरचा संस्थानिक हीं दोन्ही पदें एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं असत. पण हॅनोव्हरची गादी स्त्रीस मिळावयाची नाहीं असा तेथील कायद्याचा निर्बंध असल्यामुळें व्हिक्टोरिया एकट्या इंग्लंडच्या राज्याची मालक झाली, व तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाचा हॅनोव्हरशीं असलेला संबंध तुटला. व्हिक्टोरियाची कारकीर्द दीर्घकाल टिकली. १८३७पासून १९०१पर्यंत तिनें राज्य केलें. हॅनोव्हर घराण्यांतील राजे स्वच्छंदी व इंग्लंडच्या हिताबद्दल बेफिकीर असे निघाले. परंतु व्हिक्टोरिया सुस्वभावी असून इंग्लंडबद्दल तिच्या ठिकाणीं कळकळ होती. त्यामुळें ती इंग्लंडांत लोकप्रिय झाली व राजपदाबद्दल इंग्लंडांत जी उदासीनता दिसून येई ती आतां नाहींशी झाली, आणि आपल्या राणीबद्दल लोकांना आदर व प्रेम वाटूं लागलें.

२. **बाष्पवाहनांचे शोध.** अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मालाची नेआण करण्यासाठीं कालवे करण्यांत आले होते. एको-

णिसाव्या शतकाच्या आरंभीं टेलफर्ड व मॅक्याडम यांनीं खडी घालून रस्ते तयार केले; त्यामुळें गाड्या जलद जाऊं येऊं लागल्या. परंतु लवकरच वाहतुकीच्या कामीं बाष्पयंत्राचा उपयोग करण्याचा शोध लागला व त्यामुळें दळणवळण फारच सुलभ व जलद होऊं लागलें. न्यूक्यासल ऑन टाइन या गांवाजवळ बाष्पयंत्राच्या आगवाल्याचा जॉर्ज स्टिफेन्सन ( १७८१–१८४८ ) नांवाचा मुलगा होता. पाणी उपसण्यास व कोळसा वर काढण्यास जसा वाफेचा उपयोग होतो तसा तो कोळशाच्या गाड्या लोखंडी रुळावरून चालविण्यास करितां येईल काय हा प्रश्न त्याच्या डोक्यांत लहानपणापासून घोळत असे. त्यानें अनेक वर्षें परिश्रम करून आगगाडीचें एंजिन तयार केलें. १८३०सालीं लिव्हरपूल व मँचेस्टर या ठिकाणांमध्यें लोखंडी रस्ता बांधण्यांत येऊन आगगाडी चालू झाली व उतारूंना जलद व सुखानें प्रवास करितां येऊं लागला; तशीच मालाची नेआणही स्वस्त व जलद होऊं लागली. पुढील दहावीस वर्षांत सर्व इंग्लंड देशभर आगगाडीचें जाळें पसरलें व दळणवळण अत्यंत सुलभ व जलद होऊं लागलें. अॅटलॅन्टिक महासागरावरून सुखानें प्रवास घडविणारी पहिली आगबोट १८३७त निघाली. पुढें थोड्याच वर्षांनीं इंग्लंड व अमेरिका यांजमध्यें भाड्यानें प्रवास घडविणाऱ्या आगबोटी चालू झाल्या. याच सुमारास बातमी कळविण्याच्या कामीं विजेचा उपयोग करण्याचा शोध लागला. १८४६सालीं 'इले-क्ट्रिक टेलिग्राफिक कंपनी' स्थापन झाली. अशा रीतीनें केवळ इंग्लंडांतीलच नव्हे तर जगांतील निरनिराळ्या भागांशीं दळणवळण अत्यंत सुलभ होऊन उद्योगधंद्यांत विलक्षण क्रान्ति घडून आली व इंग्लंडच्या व्यापारांत प्रचंड वाढ झाली.

३. **कारखान्यांसंबंधीं कायदे.** औद्योगिक क्रान्तीनंतर कार-खाने सुरू झाले व आगगाड्या आणि आगबोटी यांच्या शोधांनीं

कारखान्यांना प्रचंड स्वरूप आलें. प्रथम कारखानदार मजुरांना गुराप्रमाणें वागवीत. बायका व लहान मुलें यांचा भरणा कामकऱ्यांत विशेष असे. मजुरांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र कधींही मिळत नसे. बरेचसे मजूर भिकाऱ्यांमधून गोळा करून आणलेले असल्यामुळें कारखानदारांच्याच जागेंत रहात. त्यांची रहाण्याची जागा गलिच्छ असे. एकंदरीनें कारखान्यांतील व खाणींतील मजूर म्हणजे दारिद्र्य, रोग, गलिच्छपणा व व्यसनें यांचीं आगरें असत. परंतु या गोष्टींकडे लवकरच कित्येक उदारात्म्यांचें लक्ष जाऊन मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं पार्लमेंटचे कायदे झाले. १८३३ सालीं बायका व अठरा वर्षांखालील पुरुष यांना बारा तासांपेक्षां जास्त कामास लावावयाचें नाहीं असा कायदा झाला. पुढें ही मर्यादा दहा तास झाली. मजुरांच्या हितार्थ पार्लमेंटमध्यें जे कायदे झाले ते टोरी जमीनदारांच्या श्रमाचें फळ होत. या खटपट करणाऱ्या उदार गृहस्थांत लॉर्ड शॅफ्टस्बरी याचें नांव प्रमुखत्वानें प्रसिद्ध आहे. अगदीं अलीकडे १९०८त खाणींतील मजुरांस आठ तासांवर कामास लावावयाचें नाहीं असा कायदा पास झाला. त्याचप्रमाणें आपला रोजमुरा वाढविण्यासाठीं, कामाचे तास कमी करण्यासाठीं व काम करीत असतां पोंचत असलेले इतर उपसर्ग दूर करण्यासाठीं मजूर–संघ ( Trades Union ) स्थापून आपली दादलावून घेण्याचे मजुरांनीं प्रयत्न सुरू केले. १८००त मजुरानें संघांत सामील होणें हा गुन्हा होय असा कायदा पास झाला होता. परंतु १८२४त तो रद्द झाला. तेव्हां मजूरसंघ भराभर स्थापन होऊं लागले. तथापि यापुढेंही कारखानदार स्वार्थासाठीं मजूरसंघांच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करीत. ही स्थिति १८७१त बंद झाली व तेव्हांपासून मजूरसंघांना कायदेशीर मान्यता व संरक्षण हीं दोन्ही मिळालीं. यापुढें निरनिराळ्या मजूरसंघांनीं कधीं तडजोडीनें

तर कधीं संप करून मजूरवर्गाची स्थिति सुधारून घेतली.

४. **चार्टिस्टांची चळवळ.** रिफॉर्म बिल पास झालें व त्यायोगें मतदारांची संख्या पुष्कळ वाढली. परंतु त्या बिलानें मजूरवर्गास मतदारीचा हक्क मिळाला नाहीं; त्यामुळें मजूरवर्ग असंतुष्ट झाला. १८३८त सामान्य जनसमूहास राजकीय हक्कांची सनद ( Charter ) मिळविण्यासाठीं जंगी चळवळ सुरू झाली. ही चळवळ करणारांस चार्टिस्ट म्हणत. त्यांच्या सहा मागण्या होत्या. ( १ ) पार्लमेंटच्या निवडणुकीकरितां लोकसंख्येनुरूप देशाचे सम विभाग करावेत; ( २ ) पार्लमेंटच्या सभासदांस उत्पन्नाची अट नसावी; ( ३ ) मतदारीचा हक्क वयांत आलेल्या सर्व पुरुषांस असावा (Manhood Suffrage ); ( ४ ) कॉमन्ससभेच्या सभासदास वेतन असावें; ( ५ ) गुप्त पद्धतीनें निवडणूक व्हावी; ( ६ ) निवडणूक दरसाल व्हावी. हल्लीं यांपैकीं पहिल्या पांच मागण्या मान्य झाल्या असून अंमलांत आल्या आहेत. सहावी मात्र अव्यवहार्य दिसते. १८४०त ही चळवळ व्याख्यानें, हस्तपत्रकें व अर्ज या रूपानें जोरांत चालू होती. पुढें १८४८त युरोपमधील सर्व देशांत क्रान्तिकारक चळवळीची लाट उसळली. तेव्हां पुनः इंग्लंडांत चार्टिस्टांनीं क्षोभ उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. परंतु मध्यंतरीं मजूरवर्गाच्या हितार्थ अनेक कायदे झाले होते व त्याची स्थिति बरीच सुधारली होती. त्यामुळें क्रान्तिकारक पुढाऱ्यांना क्षोभ उत्पन्न करण्यांत यश आलें नाहीं.

५. **धान्याचा कायदा.** १८१५त फ्रान्सशीं चाललेलें युद्ध संपलें तेव्हां इंग्लंडांत " माणसांची गर्दी व कामाची वाण " या दुकलीचा प्रभाव सुरू झाला. युद्ध थांबतांच परदेशांतून धान्य येऊं लागल्यामुळें धान्याचा भाव एकदम उतरला. त्या वेळीं पार्लमेंटांत जमीनदारांचें वर्चस्व असल्यामुळें त्यांनीं परकीय धान्यावर जबर

जकात बसविणारा 'धान्याचा कायदा' (Corn Law) पास केला. या कायद्यानें गव्हाची किंमत एका कॉर्टरला ८० शिलिंग इतकी वाढेपर्यंत परदेशी गहूं देशांत आयात होऊं द्यावयाचा नाहीं असें ठरलें. त्यामुळें धान्याची कडक किंमत कायम राहिली, आणि मजूरवर्ग व कारखानदार यांना फार त्रास होऊं लागला. १८३७ सालीं कारखानदारांच्या पुढाऱ्यांनीं धान्याच्या कायद्याचा निषेध करणारी मंडळी (Anti-Corn-Law League) स्थापिली व धान्याच्या कायद्याविरुद्ध जोराची चळवळ सुरू केली. कॉब्डेन व ब्राइट हे दोघे कारखानदार या मंडळीचे नेते होते. ते दोघेही मोठे वक्ते असून त्यांनीं जोरदार भाषणें करून व हस्तपत्रकें वांटून आपली चळवळ लवकरच नांवारूपास आणिली.

५. **पीलचें प्रधानमंडळ** (१८४१-१८४६). १८४१च्या निवडणुकींत कॉन्सर्व्हेटिव्हांचें मताधिक्य होऊन कॉन्सर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें व सर रॉबर्ट पील हा मुख्य प्रधान झाला. पील हा मोठा कर्तबगार असून त्याचें राज्यकारभारांतील कौशल्य व आर्थिक व्यवस्थेंतील नैपुण्य हीं प्रख्यात होतीं. लवकरच पार्लमेंटमध्यें त्याची अशी छाप बसली कीं, धाकट्या पिटप्रमाणें त्याचें प्रधानमंडळ दीर्घकाळ टिकणार अशी पुष्कळांनीं अटकळ केली. पण तसा योग आला नाहीं. १८४१–१८४६ म्हणजे अवघीं पांच वर्षें पील अधिकारावर राहिला. खुला व्यापार (Free Trade) व संरक्षण (Protection) या दोन्ही तत्त्वांचा अंगीकार अंशतः करण्याचें पीलचें धोरण होतें. परकीय मालावर जबर जकाती बसवून देशांतील मालास उत्तेजन द्यावयाचें हें संरक्षक तत्त्व होय; व व्यापारापासून सरकारास थोडासा वसूल व्हावा या उद्देशानें परदेशी मालावर हलकी जकात ठेवून त्याचा देशांत खुशाल वावर होऊं द्यावयाचा हें खुल्या व्यापाराचें तत्त्व होय. इंग्लंडच्या कारखान्यांकरितां हरतऱ्हेचा कच्चा माल

बिनजकातीनें अथवा हलकी जकात घेऊन देशांत येऊं दिला पाहिजे, हें पीलनें तेव्हांच ओळखिलें व बहुतेक सर्व पदार्थांवरील आयात-जकाती त्यानें कमी केल्या. त्यामुळें उत्पन्नांत येणारी तूट भरून काढण्यासाठीं त्यानें प्राप्तीवर कर (Income-Tax) बसविला. कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षास जमीनदारवर्गाचा पाठिंबा होता व त्या वर्गाच्या मदतीनेंच कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाचें बहुमत झालें होतें; अर्थात् धान्यावरील जकात पीलनें तशीच ठेविली व धान्याची महागाई कायम राहिली.

७. **धान्याचा कायदा रद्द झाला** (१८४६). इतक्यांत प्रसंग असा घडून आला कीं पीलला धान्याच्या बाबतींतही खुला व्यापार सुरू करणें भाग पडलें. १८४५त अतिवृष्टीमुळें इंग्लंडमधील गव्हाच्या पिकाचें नुकसान झालें. आयर्लंडांत तर धान्य बुडालेंच; पण गरिबांच्या जीविताचें साधन जे बटाटे त्यांचेंही पीक पार बुडालें. देशांत भयंकर दुष्काळ पडला व उपासमार होऊं लागली. तेव्हां परकीय धान्यावरील जकात काढून टाकून त्याचा देशांत स्वस्ताईनें वावर होऊं देणें जरूर झालें. लिबरल पुढारी लॉर्ड जॉन रसेल यानें आपलें मत धान्याच्या बाबतींत खुला व्यापार सुरू करावा असें झालें असल्याचें जाहीर केलें. पीलनेंही तसेंच केलें आणि निवडणुकीच्या वेळीं धान्याच्या बाबतींत संरक्षक तत्त्व पाळण्यास तो बांधिला गेला असल्यामुळें त्यानें प्रधानगिरीचा राजीनामा दिला (१८४५ डिसेंबर). परंतु रसेलला प्रधानमंडळ बनवितां येईना; तेव्हां पुनः पीलच अधिकारारूढ झाला, व त्यानें धान्याचा कायदा रद्द केला (१८४६ मे). तेव्हां देशांत धान्य खूप आयात होऊं लागलें व धान्य स्वस्त मिळूं लागल्यामुळें मजूरवर्गांत स्वस्थता झाली. एव्हांपासून इंग्लिश सरकारनें खुल्या व्यापाराचें धोरण अंगीकारिलें व नुकत्या झालेल्या महायुद्धापर्यंत " खुला व्यापार " हेंच

इंग्लंडचें आर्थिक धोरण बनून राहिलें होतें. पीलनें धान्याचा कायदा रद्द केला ही गोष्ट जमीनदारवर्गास रुचणें शक्य न्हवतें, व कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांत ह्या वर्गाची सरशी असल्यामुळें पीलविरुद्ध त्या पक्षांत एकच गिल्ला झाला. डिझरेली व बेंटिंक या कॉन्सर्व्हेटिव्ह पुढाऱ्यांनीं पीलनें स्वपक्षाशीं विश्वासघात केला असा पुकारा केला. तेव्हां कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांत फूट होऊन पीलला राजीनामा देणें भाग पडलें व लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें.

८. **नव्या सोई.** येथेंच औद्योगिक दृष्ट्या प्रगतिपर दोन तीन गोष्टी सांगणें सोईचें होईल. १८३९त रोलंड हिल यानें पोस्टांत सुधारणा करून एक पेनीच्या तिकिटांवर स्कॉटलंड व इंग्लंड या दोन्ही देशांत कोणत्याही स्थळीं पत्र पोंचविण्याची व्यवस्था केली. तोंपर्यंत एका पत्रास एका शिलिंगाइतका जबर स्टॅम्प भरावा लागे व त्यामुळें गरिबांना पत्रें पाठविणें अशक्य होतें. यानंतर तारायंत्रांतून अल्प किंमतीनें विद्युत्संदेश पाठविण्याची व्यवस्था झाली. ॲन राणीच्या वेळेपासून वर्तमानपत्रांवर एक स्टॅम्प टॅक्स म्हणून कर असे. १८५५त तो काढून टाकण्यांत आला. त्यामुळें वर्तमानपत्रें अधिक निघूं लागलीं व तीं स्वस्त झालीं. तेव्हां तीं मजूरवर्गासही विकत घेतां येऊन जगांत आपल्याभोंवतीं काय चाललें आहे याची माहिती करून घेतां येऊं लागली. १८५१त सर्व जगांतील कलाकौशल्याचें पहिलें प्रदर्शन लंडनमधील 'क्रिस्टल पॅलेस'मध्यें भरलें. आपल्या देशांत कोणता माल होतो व कोणता व्हावयास पाहिजे याची लोकांस माहिती करून देण्याच्या कामीं त्याचा मोठा उपयोग झाला. या प्रदर्शनावरून कित्येक फाजील आशावाद्यांनीं असा तर्क काढिला कीं, आतां राष्ट्रांमध्यें पुरी शांतता नांदणार, युद्धें पार मागें पडणार व उद्योगधंद्यांत चढाओढ करून राष्ट्रें वर नंबर पटकाविण्याची हाव बाळगणार.

---

# ३५. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचें दान.

[ क्यानडा, आस्ट्रेलिया, न्यू झीलंड यांच्या हकीकती ].

१. **स्वायत्त वसाहती.** ब्रिटिश साम्राज्यांत क्यानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड या महत्त्वाच्या स्वायत्त वसाहती ( Dominions ) होत. वसाहतींना जबाबदार राज्यपद्धति देण्याचें तत्त्व ब्रिटिश मुत्सद्यांनीं पहिल्यानें १८४७त अंमलांत आणिलें, व क्यानडाचा उदय झाला. पुढें त्याच तत्त्वाचा इतर ठिकाणीं उपयोग करण्यांत येऊन स्वायत्त वसाहत-सरकारें निर्माण झालीं. या महत्त्वाच्या विषयाची माहिती आपण या प्रकरणांत करून घेऊं.

२. **क्यानडास स्वराज्य.** क्यानडा हा देश अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या उत्तरेस आहे. १७६३त सप्तवार्षिक युद्ध संपून इंग्रज-फ्रेंचांमध्यें जो तह झाला त्यानें क्यानडा इंग्रजांस मिळाला. पुढें अमेरिकेंतील इंग्रज वसाहतींनीं बंड केलें व 'संयुक्त संस्थानें' स्वतंत्र झालीं. क्यानडांत क्वीबेकच्या आसपास फ्रेंचांची वस्ती होती. इंग्रज वसाहतींनीं जेव्हां बंड केलें तेव्हां त्यांतील कित्येक लोकांस इंग्लंडशीं भांडणें गैरशिस्त वाटलें व त्यांनीं आपलें बिऱ्हाड उचलून क्वीबेकच्या पश्चिमेस 'ऑन्टेरिओ'मध्यें वस्ती केली. पुढें क्वीबेकमधील फ्रेंच वसाहतवाले व ऑन्टेरिओमधील इंग्रज वसाहतवाले यांजमध्यें भांडणें होऊं लागलीं. शेवटीं ऑन्टेरिओ व क्वीबेक हीं निरनिराळीं संस्थानें करण्यांत येऊन प्रत्येकांत एक गव्हर्नर नेमण्यांत आला व त्याला सल्ला देण्यास प्रतिनिधिसभा स्थापन झाली (१७९१). अशा रीतीनें क्यानडांत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति ( Representative Government ) स्थापन झाली. तथापि फ्रेंच वसाहत व इंग्रज वसाहत यांचीं भांडणें कांहीं पुरतीं मिटलीं नाहींत. १८३७त

क्वीबेकमधील फ्रेंच वसाहतवाल्यांनीं बंड उभारलें. त्याचा लवकरच मोड झाला. मात्र क्यानडाकडे दुर्लक्ष केल्यास आपल्या हातून जशीं संयुक्त संस्थानें गेलीं तसाच क्यानडाही जाईल अशी इंग्रजांस भीति पडली. तेव्हां प्रधानमंडळानें लॉर्ड डरहॅम यास क्यानडियन परिस्थितीची बारीक चौकशी करण्यासाठीं क्यानडांत पाठविलें. त्यानें निरीक्षण करून अशी शिफारस केली कीं, क्यानडांत जबाबदार राज्यपद्धति ( Responsible Government ) सुरू करावी. त्यावरून ऑन्टेरिओ व क्वीबेक एक करण्यांत येऊन त्यांचें एक पार्लमेंट बनविण्यांत आलें. ब्रिटिश सरकारनें एका गव्हर्नरची नेमणूक केली व त्या गव्हर्नरानें पार्लमेंटांतील प्रतिनिधींच्या विश्वासांतील गृहस्थांची मंत्र्यांच्या जागीं नेमणूक करावी असें ठरलें. परराष्ट्रांशीं व्यवहार इंग्लंडच्या हातीं ठेवून सर्व अन्तर्गत सत्ता पार्लमेंटला मिळाली. अशा रीतीनें पहिली लोकसत्तेचा सुखमय उपभोग घेणारी वसाहत निर्माण झाली (१८४७). पुढें क्यानडांतील इतर भागांस अशीच पार्लमेंट मिळाली व त्यांतूनही कार्यमंत्री लोकप्रतिनिधींस जबाबदार रहातील अशी व्यवस्था झाली.

३. **क्यानडा एक राष्ट्र बनला** (१८६७). क्यानडांतील निरनिराळ्या संस्थानांस स्वराज्य मिळून राज्यकारभाराची जबाबदारी जसजशी त्यांजवर पडूं लागली तसतशी आपल्या सर्व प्रांतांची एकजूट करून सगळ्या क्यानडाचें एक संयुक्त राष्ट्र करावें ही इच्छा त्यांच्या ठिकाणीं प्रबळ होऊं लागली. शेवटीं १८६७त त्यांच्या मागणीवरून ब्रिटिश पार्लमेंटनें " नॉर्थ अमेरिका ॲक्ट " पास केला. ऑन्टेरिओ व क्वीबेक हीं संस्थानें पुनः निराळीं झालीं. ऑन्टेरिओ, क्वीबेक, नोव्हास्कोशिया व न्यू ब्रन्स्विक हीं चार संस्थानें मिळून क्यानडाचें वरिष्ठ मध्यवर्ती सरकार बनविण्यांत आलें. पुढें मॅनिटोबा, सॅस्कचिव्हान, ऑल्बर्टा व ब्रिटिश कोलंबिया हीं नवीं

संस्थानें या नव्या राष्ट्रांत सामील झालीं. अशा तऱ्हेनें १८७२त ॲटलॅन्टिक महासागरापासून पॅसिफिक महासागरापर्यंत पूर्व-पश्चिम पसरलेला व बड्या सरोवरांपासून उत्तरध्रुवापर्यंत उत्तर-दक्षिण पसरलेला विस्तृत क्यानडा देश एक राष्ट्र (Dominion of Canada) बनून ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत स्वराज्यसुख अनुभवूं लागला. क्यानडाच्या मध्यवर्ती सरकारची राजधानी ऑटावा ही असून राजानें नेमिलेला गव्हर्नर जनरल क्यानडांतील सर्व संस्थानांतून निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या मतानें राज्यकारभार चालवितो.

४. **क्यानडाची प्रगति**. १८८५त पॅसिफिक किनाऱ्यापासून ॲटलॅन्टिक किनाऱ्यापर्यंत आगगाडीचा रस्ता बांधण्यांत येऊन दळणवळण सुरू झालें. पहिल्यानें क्यानडांत फारसे लोक वसाहत करण्यास जात नसत. परंतु लवकरच क्यानडांतिल मध्यभागांत गहूं चांगला पिकतो असें आढळून आलें व पश्चिम बाजूस सोन्याच्या खाणी सांपडल्या. तेव्हांपासून क्यानडाची लोकसंख्या झपाझप वाढूं लागली व क्यानडाचें दौर्बल्य जाऊन तें चांगलें सबळ राष्ट्र बनलें.

५. **ऑस्ट्रेलियाचा उदय**. सतराव्या शतकांत कित्येक धाडसी युरोपियन खलाशी ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्यावर गेले होते.परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत त्या देशाकडे युरोपियनांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. १७६८च्या सुमारास क्याप्टन कुक हा धाडसी जलपर्यटन करणारा इंग्रज गृहस्थ दक्षिण समुद्रांत सफरीस गेला. त्यानें न्यू झीलंड बेटाचे दक्षिण न्यू झीलंड व उत्तर न्यू झीलंड असे दोन स्वतंत्र भाग असल्याचा शोध लाविला व ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यावर जाऊन तेथें इंग्रजी राज्याचें निशाण उभारिलें. इतक्यांत इंग्लंडच्या हातून अमेरिका गेली व इंग्रज सरकारास एक नवीन अडचण उत्पन्न झाली. आतांपर्यंत गुन्हेगार लोकांस अमेरिकेंत हद्दपार करण्यांत येई. तो मार्ग आतां बंद झाला. पण याच वेळीं

ऑस्ट्रेलिया सांपडल्यामुळें इंग्रज सरकारनें गुन्हेगारांची रवानगी ऑस्ट्रेलियांत करण्याचें ठरविलें. १७८७ सालीं गुन्हेगारांची पहिली टोळी ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यावर हल्लींच्या सिड्नी शहराजवळ जाऊन उतरली व अशा रीतीनें न्यू साउथ वेल्स या ऑस्ट्रेलियांतील पहिल्या वसाहतीचा श्रीगणेशायनमः झाला. पुढें ब्रिटनमधून अनेक उद्योगी व नीतिमान् गृहस्थ ऑस्ट्रेलियांत वसाहत करण्यास गेले, व त्यांनीं तेथील सुपीक कुरणांतून मेंढ्या चारून लोंकरीचा धंदा सुरू केला. १८३५त न्यू साउथ वेल्समधील लोकांनीं ऑस्ट्रेलियांत गुन्हेगार न पाठविण्याविषयीं ब्रिटिश सरकारास विनंती केली. त्यावरून न्यू साउथ वेल्सला गुन्हेगार पाठविणें थांबलें; पुढें १८५१ सालीं ऑस्ट्रेलियांत सोन्याच्या खाणी सांपडल्या. त्यामुळें बुभुक्षित गोऱ्या लोकांच्या टोळ्याच्या टोळ्या त्या देशांत गेल्या व पुढील वीस वर्षांत लोकसंख्या पांचपट वाढली.

६. **ऑस्ट्रेलियांतील मुलुखाचा शोध.** पहिल्या ऑस्ट्रेलियांतील वसाहती पूर्व व दक्षिण भागांत झाल्या. परंतु या खालच्या जागा भरून गेल्यावर वसाहतवाले उत्तरेकडे जाऊं लागले व शेवटीं उत्तरेकडचा भाग वसला जाऊन क्वीन्सलँड ही उत्तरेकडची वसाहत स्थापण्यांत आली [१८५४]. त्याचप्रमाणें मध्य देशाचा शोध करण्यासाठीं धाडसी प्रवासी झटूं लागले. रॉबर्ट बर्क व वुइल्यम विल्स यांच्या नेतृत्वाखालीं प्रवाशांची पहिली टोळी मध्य देश शोधण्यास गेली. यानंतर अनेक प्रवासी खटपट करूं लागले. शेवटीं सन १८६०त सर्व आस्ट्रेलियाचा शोध पुरा झाला.

७. **ऑस्ट्रेलियास स्वराज्यदान.** १८५६सालीं न्यू साउथ वेल्स, व्हिक्टोरिया, साउथ ऑस्ट्रेलिया व टास्मेनिआ या सर्वांना जबाबदार राज्यपद्धतीचा हक्क मिळाला. पुढें क्वीन्सलँड व वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या संस्थानांसही स्वराज्य मिळालें. १८९०च्या सुमारास

फ्रान्स व जर्मनी यांनीं ऑस्ट्रेलियाच्या नजीक कांहीं बेटें काबीज केलीं. तेव्हां तेथून हे लोक आपल्या देशावर स्वारी करतील अशी ऑस्ट्रेलियांतील इंग्लिश वसाहतींस भीति पडली व एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेस जोर येऊन ऑस्ट्रेलियांतील सर्व वसाहतींचें मिळून एक वरिष्ठ सरकार बनविण्याची योजना तयार झाली. ऑस्ट्रेलियन लोकांचें म्हणणें इंग्लिश सरकारास पटून सर्व ऑस्ट्रेलियन वसाहतींचा एक संघ ( Commonwealth of Australia ) बनविण्यांत आला व सर्व ऑस्ट्रेलियन संस्थानांची मिळून वरिष्ठ पार्लमेंट उघडण्यांत आली ( १९०१ ). चीन व जपान ही आशियाटिक राष्ट्रें उदयास येत आहेत व संनिध असल्यामुळें त्यांना ऑस्ट्रेलियांत वसाहती करण्याचा मोह होईल व अशा रीतीनें गोऱ्या लोकांहून इतर वर्णांचें बीज ऑस्ट्रेलियांत पेरलें जाईल या भावी संकटाची अगोदरच तजवीज करण्यासाठीं आशियाटिक मनुष्यास ऑस्ट्रेलियांत वसाहत न करूं देण्याचा निर्बंध करणारा कायदा ऑस्ट्रेलियनांनीं केला व ऑस्ट्रेलियांत गोऱ्यांचा सवता सुभा निर्माण केला.

८. न्यू झीलंड. न्यू झीलंड हें बेट ऑस्ट्रेलियाच्या आग्नेयीस असून सुमारें ग्रेटब्रिटनयेवढें आहे. व तेथील हवापाणी ग्रेट ब्रिटनप्रमाणेंच आहे. त्यावरून त्याला दक्षिणेकडील ब्रिटन असेंही केव्हां केव्हां म्हणतात. १८३९पर्यंत न्यू झीलंडमध्यें इंग्रजांची कायमची वस्ती अशी झाली नाहीं. न्यू झीलंडला १८५३सालीं पार्लमेंट मिळालें. तेथील मूळ रहिवाशी माओरी नांवाचे रानटी लोक होते. ते शूर असल्यामुळें इंग्रज वसाहतवाल्यांस त्यांच्याशीं बरेंच झगडावें लागलें. १९११ सालीं माओरी लोकांना न्यू झीलंडच्या पार्लमेंटांत पांच सहा सभासद निवडून देण्याचा हक्क मिळाला. तथापि गोऱ्या लोकांशीं चढाओढ करण्याचा प्रसंग असल्यामुळें माओरींची लोक-

संख्या एकसारखी कमी होत आहे व या जीवनकलहांत माओरी लवकरच नामशेष होतील असा रंग दिसतो.

---

## ३६. क्रिमियन युद्ध (१८५४-१८५६).

**१. रशियाची महत्त्वाकांक्षा.** नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया हीं राष्ट्रें एकोप्यानें वागूं लागलीं, व लवकरच तीं बलाढ्य झालीं. त्यांतल्या त्यांत रशियानें मध्य आशियांत मुलूख मिळवून आपल्या राज्याच्या मर्यादा वाढविल्या. तसेंच त्यानें पूर्वेस अफगाणिस्थानास व पश्चिमेस तुर्कस्थानास आपल्या कच्छपीं लावून घेण्याचे जोराचे प्रयत्न चालविले. तेव्हां रशियाच्या हालचालींनीं आपल्या हिंदुस्थानमधील सत्तेस धोका येणार अशी इंग्रजांस भीति पडली व त्यांनीं रशियाच्या महत्त्वाकांक्षेस आळा बसविण्याचा उद्योग सुरू केला. अफगाणिस्थानशीं लढाई करून इंग्रजांनीं तेथील अमिराला आपला दोस्त करून घेतलें. तसेंच तुर्कस्थानची स्वतंत्रता मान्य असल्याबद्दल ग्वाही देण्याचें सर्व प्रमुख राष्ट्रांपासून इंग्लिश परराष्ट्रीय प्रधान पामर्स्टन यानें वचन घेतलें (१८४१). तेव्हां-पासून रशिया व इंग्लंड यांजमधील चुरस वाढूं लागली व रशियानें आपलें सैन्य व आरमार समर्थ करण्याचा धडाका सुरू केला. पुढें इंग्लंड व रशिया यांजमध्यें क्रिमियन युद्ध झालें (१८५५–१८५६) व ब्रिटिश सत्तेविरुद्ध हिंदुस्थानांत शिपायांचें बंड झालें (१८५७). दोन्ही प्रसंगीं इंग्रजांनीं मोठ्या चिकाटीनें लढून अखेर यश मिळविलें. या प्रकरणांत आपण क्रिमियन युद्धाची माहिती करून घेऊं.

**२. क्रिमियन युद्धाचीं कारणें.** ख्रिस्ती लोकांत लॅटिन चर्च व ग्रीक चर्च असे दोन पंथ आहेत. इंग्लंड व पश्चिम युरोपांतील राष्ट्रें

लॅटिन चर्चचीं असून रशिया व पूर्व युरोपांतील इतर राष्ट्रें ग्रीक चर्चचीं आहेत. जरूसलेममधील ख्रिस्ताच्या कबरीच्या किल्ल्या कोणाच्या ताब्यांत असाव्या यासंबंधीं या दोन पंथांमध्यें तंटा माजला. जरूसलेम तुर्कस्थानच्या हद्दींत असल्यामुळें त्याचा निकाल करण्याचें काम तुर्कस्थानच्या सुलतानाकडे होतें. त्यानें कॉन्स्टॅन्टिनोपल येथील फ्रेंच वकिलाच्या सल्ल्यावरून ग्रीक चर्चच्या विरुद्ध निकाल दिला. यानंतर रशियाच्या झारनें असें जाहीर केलें कीं तुर्क साम्राज्यांतील ग्रीक ख्रिस्त्यांचें रक्षण करण्याचा हक्क आपणास आहे. हें म्हणणें केवळ वरकरणी होतें. रशियाच्या अंतर्यामीं कांहीं निराळेच दुष्ट हेतु जागृत होते. ब्रिटिश वकिलापाशीं आपलें मन खुलें करून " तुर्कस्थान हें राष्ट्र मृत्युपंथास लागलेलें आहे, तेव्हां त्याचें बरें वाईट झाल्यास ' लूट ' वांटून कशी ध्यावी हें ठरविण्याचाच माझा मुख्य हेतु आहे " असें झारनें बोलून दाखविलें. पण ही लूट मिळविणें इंग्रजांच्या पथ्यावर नसल्यामुळें इंग्रज कबूल झाले नाहींत व रशियानें एकटयानेंच तुर्कस्थानचा समाचार घेण्याचें ठरविलें १८५३मध्यें युद्ध सुरू होऊन रशियानें तुर्कस्थानवर स्वारी केली व रशियन आरमारानें सिनोपी बंदरांत तुर्की आरमाराचा नाश केला.

३. **युद्धास सुरुवात.** हें रशियानें सुरू केलेलें युद्ध पाहून इंग्लंडांतील लोकमत फार क्षुब्ध झालें. रशिया तुर्कस्थानची राजधानी कॉन्स्टॅन्टिनोपल घेणार व रशियन आरमार भूमध्यसमुद्रांतही नाचूं लागणार; मग हिंदुस्थानशीं आपला व्यापार तरी कसा चालणार किंबहुना त्या देशाचीं राज्यसूत्रें आपण कशीं चालविणार, इत्यादि जिव्हाळ्याचे प्रश्न इंग्रजांच्या कल्पनेपुढें आले. रशियन आरमार भूमध्यसमुद्रांत संचार करणार व सर्व राष्ट्रांनीं मिळून त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला तर डार्डानेल्झ व बास्पोरस या दोन अरुंद तोंडांना कुलुपें ठोकून काळ्यासमुद्रांत कसें सुरक्षित

जाऊन बसणार याचीं कल्पनाचित्रें इंग्लंडांत निघूं लागलीं. या वेळीं लॉर्ड ॲबरडीन हा मुख्य प्रधान होता. तो पीलच्या अनुयायांपैकीं असून १८४६त टोरी पक्षांतून फुटून त्यानें व्हिग पक्षाशीं सख्य केलें होतें. तो शांततावादी असून जोरदार परराष्ट्रीय धोरण स्वीकारण्याची त्याची इच्छा नव्हती. परंतु पामर्स्टन हा जोरदार गृहमंत्री युद्धास उत्सुक होता. तेव्हां त्याच्या व इंग्रज व्यापाऱ्यांच्या आग्रहावरून ॲबरडीन रशियाविरुद्ध युद्धास तयार झाला. या वेळीं नेपोलियन बोनापार्टचा पुतण्या लुई नेपोलियन हा फ्रान्सचा बादशहा बनला होता. युद्धामध्यें शौर्य गाजवून आपलें बादशाहीपद स्थिर करण्यास तोही आतुर होता. १८५४ मार्च १८ला इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांनीं तुर्कस्थानच्या वतीनें रशियाविरुद्ध युद्ध पुकारिलें.

३. **तीन लढाया.** डॅन्यूब नदीच्या तीरीं तुर्कांनीं रशियन सैन्यास अडवून धरल्यामुळें कॉन्स्टॅन्टिनोपलचें रक्षण करण्याची जरूर नाहीं असें पाहून क्रिमिया या द्वीपकल्पांत उतरून सिबॅस्टॉपल बंदरांत रशियानें दारूगोळा जमविला होता तें ठाणें सर करण्याकरितां इंग्रज व फ्रेंच सैन्यें क्रिमियांत जाऊन उतरलीं (१८५४ सप्टेंबर). पुढें तीं सैन्यें सिबॅस्टॉपलकडे जात असतां वाटेंत आल्मा नदीवर लढाई झाली. तींत रशियनांचा मोड झाला. पुढें संयुक्तांनीं सिबॅस्टॉपलला वेढा घातला. इंग्रजांनीं दक्षिणेस बॅलॅक्लाव्हा येथें मुख्य तळ दिला होता. १८५४ च्या ऑक्टोबरांत रशियनांनीं त्या ठाण्यावर हल्ला केला. तो तेव्हांच परतविण्यांत आला. मात्र या वेळीं जी लढाई झाली ती चिरस्मरणीय राहील. लढाई चालू असतां इंग्रजांच्या सहाशें स्वारांच्या पथकास शत्रूच्या तोफखान्यावर हल्ला चढविण्याचा चुकीनें हुकूम झाला. तसा हल्ला करणें म्हणजे मृत्युमुखांत उडी घेण्यासारखें होतें. तथापि त्या पराक्रमी वीरांनीं आज्ञा प्रमाण मानून हल्ला चढविला व बहुतेक सर्व लोक मृत्युमुखीं

पडले. या सहाशें स्वारांच्या हल्ल्याच्या संस्मरणार्थ टेनिसननें 'चार्ज ऑफ दी लाइट ब्रिगेड' ही कविता लिहिली, ती प्रसिद्ध आहे. नोव्हेंबर महिन्यांत धुकें पडत होतें, त्याचा फायदा घेऊन रशियनांनीं इन्करमन या ठाण्यावर हल्ला केला; पण इंग्रज व फ्रेंच शिपायांनीं मोठ्या शौर्यानें लढून रशियनांचा पराभव केला.

५. **सैन्यावरील संकटें**. १८५४च्या शेवटीं थंडी फार पडूं लागली तेव्हां इंग्रज सैन्याचे फार हाल होऊं लागले. बरेच दिवस शांततेंत गेल्यामुळें सैन्यव्यवस्था चांगली नव्हती. सैन्यांतील कामगार दुर्बळ असून सैनिक जरी शूर होते तरी त्यांची शिस्त बिघडली होती व सैन्याला सामानाचा पुरवठा करणाऱ्या खात्याची व्यवस्था नीट नसून हॉस्पिटलांची स्थिति ठीक नव्हती. या सर्व गोंधळामुळें हजारों शिपायी थंडी व कॉलरा यांस बळी पडले. या सर्व कहराचें खापर ॲबरडीन या मुख्य प्रधानाच्या माथीं फोडण्यांत येऊन त्याला राजीनामा द्यावा लागला. नंतर त्याच्या जागीं कर्तृत्ववान् पामर्स्टन हा अधिकारारूढ झाला ( १८५५ जानेवारी ). लवकरच सैन्यव्यवस्था सुधारली; त्याचप्रमाणें मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल ही उदारधी इंग्रज स्त्री पुष्कळ 'सेविका' ( Nurses ) बरोबर घेऊन सैनिकांची शुश्रूषा करण्यासाठीं रणमैदानावर गेली. पुढें वेढा घातल्यानंतर अकरा महिन्यांनीं सिबॅस्टॉपल पडलें व लढाई थांबली.

६. **पॅरिसचा तह** ( १८५६ ). पुढें १८५६त पॅरिस येथें तह ठरला. ग्रीक ख्रिस्त्यांचे हितसंबंध नीट राखण्याचें तुर्कस्थानच्या सुलतानानें कबूल केल्यावरून त्यांना आपल्या संरक्षणाखालीं घेण्याचा हट्ट रशियानें सोडिला. त्यानें सिबॅस्टॉपलची तटबंदी पाडिली व काळ्या समुद्रांत लढाऊ आरमार न ठेवण्याची अट मान्य केली. पुढेंही तुर्कस्थानच्या राज्यांतील ख्रिस्ती लोक

असंतुष्टच असत. त्यांचा कैवार घेऊन पुनः १८७६सालीं रशियानें तुर्कस्थानविरुद्ध युद्ध सुरू केलें. परंतु त्या वेळीं इंग्रजांनीं मध्यस्थी केली व त्यामुळें तुर्कस्थानचा बचाव झाला. बर्लिन येथें तह ठरून तुर्कस्थानच्या उत्तर प्रांतांतून रुमानिया, सर्व्हिया व मॉन्टेनिग्रो या स्वतंत्र बाल्कन राष्ट्रांची उभारणी झाली; रशियाच्या महत्त्वाकांक्षेला आळा बसला व तुर्कस्थान हीनबल झालें (१८७८). अठराव्या शतकांत साम्राज्यप्राप्तीसाठीं इंग्लंडला फ्रान्सशीं झगडावें लागलें, व आतां तें साम्राज्य सुरक्षित रहावें म्हणून एकोणिसाव्या शतकांत रशियाशीं झगडे करावे लागले. या रशियाशीं झालेल्या झगड्यांत डोळे दिपवून टाकणारे जय इंग्रजांनीं मिळविले नाहींत; तथापि रशियाला थोपवून धरून त्यांनीं साम्राज्यरक्षण चोख केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## ३७. लोकशाहीचा लाभ.

**१. पामर्स्टनचें प्रधानमंडळ.** रशियाशीं क्रिमियन युद्ध चालू असतां लॉर्ड पामर्स्टन हा मुख्य प्रधान होऊन व्हिग प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें (१८५५). तेव्हांपासून पामर्स्टन मृत्यु पावला (१८६५), तेथपर्यंत मध्यंतरीं एक वर्ष सोडून त्याच्याच हातीं अधिकारसूत्रें होतीं. पामर्स्टन मोठा कर्तबगार असून १८०९पासून १८६५ पर्यंत बहुतेक सर्वकाळ प्रधानमंडळांत कोणत्याना कोणत्या जागेवर त्यानें कामगिरी बजाविली होती. तरुणपणीं तो प्रगतिप्रिय टोरी असून क्यानिंगचा अनुयायी असे. रिफॉर्म बिलच्या काळापासून तो व्हिग पक्षांत सामील झाला व जुन्या व्हिग पक्षाचा तो खरा प्रतिनिधि होता. पार्लमेंटच्या निवडणुकीचा हक्क अधिक लोकांस

देऊन इंग्लंडांत खरी लोकशाही ( Democracy ) सुरू करावी हें मत त्याला मुळींच मान्य नव्हतें. इंग्लंडची इतर राष्ट्रांवर छाप कशी बसेल याची तो नेहमीं काळजी वहात असे. आर्थिक बाबतींत प्रगतिपर धोरण ठेवण्यास पामर्स्टन विरुद्ध नव्हता. प्रसिद्ध ग्लॅडस्टन हा त्याच्या प्रधानमंडळांत फडनविसाच्या जागीं असून त्यानें देशांत आयात होणाऱ्या साखर व चहा यांजसारख्या अवश्यक वस्तूंवरील जकाती पार उठविल्या व खुल्या व्यापाराचें तत्त्व पूर्णपणें अंमलांत आणिलें. तथापि पार्लमेंटच्या निवडणुकींत सुधारणा करण्याची जरूर पामर्स्टनास मुळींच वाटत नसल्यामुळें ग्लॅडस्टन इत्यादि त्याच्या सुधारणावादी अनुयायांस आपलें सुधारणेचें धोरण गुलदस्तांत ठेवावें लागलें. पामर्स्टनच्या या बाबतींतील स्थितिप्रियतेवरून डिझरेली हा कॉन्सर्व्हेटिव्ह पुढारी त्याला 'मूलगामी सुधारणाप्रिय प्रधानमंडळाचा टोरी नेता' ( The Tory Chief of a Radical Cabinet ) म्हणत असे.

२. **डिझरेली व ग्लॅडस्टन.** १८६५त पामर्स्टन वारल्यानंतर अर्ल रसेल हा मुख्य प्रधान झाला. परंतु १८६६त उलटापालट होऊन कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें व अर्ल ऑफ डार्बी हा मुख्य प्रधान झाला. या वेळीं रसेल व डार्बी हे लिबरल व कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांचे नामधारी पुढारी असून ग्लॅडस्टन व डिझरेली हे त्यांचे कॉमन्ससभेंतील दुय्यमच खरेखुरे पुढारी होते. हे दोघेही मोठे हुशार असून आपआपल्या पक्षाचे पूर्ण प्रतिनिधि होते. ग्लॅडस्टन ( १८०९–१८९८ ) पहिल्यानें पीलचा अनुयायी असून नेमस्त टोरी होता. १८४६त पील कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांतून फुटला तेव्हां इतर पिलाइटांबरोबर ग्लॅडस्टन लिबरल पक्षांत सामील झाला. त्याचें आंकडेशास्त्रांतील प्रावीण्य नांवाजण्यासारखें असून तो उत्तम वक्ता होता. डिझरेली ( १८०४–१८८० ) हा

ज्युइश वंशाचा असून तीव्र बुद्धीचा व मोठा धूर्त असे. बहुजनसमूहाचें मत आपल्या कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षास अनुकूल करून घेण्यासाठीं तो फार झटला. कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षानें पार्लमेंटमध्यें सुधारणा करण्यास तयार झालें पाहिजे व तेणेंकरून बहुजनसमूहास संतुष्ट राखून आपल्या बाजूस अनुकूल करून घेतलें पाहिजे असें डिझरेलीचें मत असे व त्यानें आपल्या पक्षास 'शिक्षण देऊन' हें मत त्याच्या पचनीं पाडिलें. पार्लमेंट-सुधारणा लोकांस हवी आहे व ती केली तर लोकहित हटकून साधेल अशी ग्लॅडस्टनची खात्री होती व म्हणून ती करण्यासाठीं ग्लॅडस्टन खटपट करी. परकीय राजकारणांतही या दोघां मुत्सद्यांच्या धोरणांत मोठा फरक होता. ब्रिटिश साम्राज्याचा बडेजाव व्हावा यासाठीं डिझरेली एकसारखे श्रम करी तर मानव जातीच्या स्वातंत्र्यांत व स्वास्थ्यांत ज्यायोगें भर पडेल तें धोरण स्वीकारण्यास ग्लॅडस्टन नेहमीं तयार असे. लोकस्वातंत्र्याची वाढ व साम्राज्याचा उत्कर्ष या दोन्ही गोष्टी इंग्लंडला अवश्य होत्या. लोकस्वातंत्र्याचा कैवारी ग्लॅडस्टन व साम्राज्यवादी डिझरेली हे दोघे मुत्सद्दी इंग्लंडला समकालीं लाभले; व ते पाळीपाळीनें अधिकारारूढ झाल्यामुळें इंग्लिश राष्ट्राचें धोरण एकांगी झालें नाहीं व एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडचें पाऊल जोरानें पुढें पडलें.

**३. पार्लमेंट-सुधारणेचा दुसरा कायदा ( १८६७ ).** १८३२च्या रिफॉर्म बिलानें मध्यमवर्गास निवडणुकीचा हक्क मिळाला होता. बहुजनसमूहास तो देऊन पुढें पाऊल टाकलें पाहिजे याची जाणीव अनेक लिबरल पुढाऱ्यांस अलीकडे झाली होती. परंतु मुख्य प्रधान पामर्स्टन हा '१८३२ची सुधारणा पूर्ण आहे' या जुन्या व्हिग मताचा असल्यामुळें त्याच्या मृत्यूपर्यंत हा प्रश्न पुढें ढकलण्यांत आला. १८६६त 'पार्लमेंट-सुधारणेचें एक बिल' ग्लॅडस्टननें कॉमन्ससभेपुढें मांडिलें. पण जुन्या व्हिग लोकांच्या विरोधामुळें तें

नापास झालें व लिबरल प्रधानमंडळास राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर डार्बी मुख्य प्रधान होऊन कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाला. डिझरेलीनें १८६७त रिफॉर्म बिल पार्लमेंटपुढें आणिलें व तें पास झालें. १८३२त मतदार होण्यास घातलेल्या अटी या वेळीं आणखी शिथिल करण्यांत आल्या. त्यामुळें शहरांतील कामकरीवर्ग व खेड्यांतील गरीब शेतकरी यांस निवडणुकीचा हक्क मिळाला व पार्लमेंट अधिक लोकमतनिदर्शक बनली.

४. **पार्लमेंट-सुधारणेचा तिसरा कायदा** ( १८८४ ). १८६८त ग्लॅडस्टन अधिकारारूढ होऊन त्याचें पहिलें लिबरल प्रधानमंडळ १८६८ ते १८७४पर्यंत टिकलें. त्या काळांत त्यानें अनेक सुधारणा केल्या. १८७१त त्यानें पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं बॅलट ( Ballot )ची पद्धति सुरू करण्याचें बिल पास करून घेतलें. या रीतीनें मतदारास 'गुप्त' रीतीनें मत देतां येऊन त्यानें कोणास मत दिलें हें मागाहून कळण्यास मार्ग रहात नाहीं. ही पद्धति अंमलांत आल्यानें गरीब मतदारांवर बड्या जमनिदारांचा जो जुलूम चालत असे तो बंद झाला. १८८० ते १८८५पर्यंत ग्लॅडस्टनचें दुसरें प्रधानमंडळ अधिकारारूढ होतें. १८८४त त्यानें मताचा कायदा ( Franchise bill ) पास करून पार्लमेंटच्या निवडणुकींत मत देण्याचा हक्क आणखी पुष्कळ लोकांस दिला. या कायद्यानें शेतावर काम करणाऱ्या मजुरांसही मत मिळून इंग्लंडांत लोकशाही ( Democracy ) सुरू झाली. १८८५त सभासदांच्या वांटणींत बदल झाला. या वेळीं मतदारसंघ जवळ जवळ समसमान संख्येचे करण्यांत आले, व त्यामुळें कॉमन्ससभेच्या सभासदांची संख्या ६५८ची ६७० करण्यांत आली. पुढें १९१८सालीं निवडणुकीचा हक्क स्त्रिया व लष्करी शिपायी यांसही मिळाला, त्यामुळें मतदारांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्म्यानें

झाली व लोकशाही पूर्णपणें सुरू झाली.

५. **शिक्षण.** लोकसत्ता यशस्वी होण्यास जनता साक्षर पाहिजे याची जाणीव पुढाऱ्यांस लवकरच झाली व ग्लॅडस्टनच्या पहिल्या लिबरल प्रधानमंडळानें [ १८६८–१८७४ ] हा प्रश्न सोडविला. १८७०सालीं प्राथमिक शिक्षणासंबंधीं पार्लमेंटचा कायदा पास झाला. तोंपर्यंत सर्व शाळा खाजगी असत. कांहीं प्रस्थापित धर्माच्या अनुयायांनीं चालविलेल्या व कांहीं डिसेंटरांनीं चालविलेल्या शाळा असून त्या सर्व धार्मिक स्वरूपाच्या असत. १८३३पासून सरकार या शिक्षणसंस्थांना मदतीदाखल कांहीं पैसे देत असे. १८७०च्या कायद्यानें परगण्यांतून स्कूलबोर्डें स्थापण्यांत आलीं व या बोर्डांना स्थानिक कर बसवून शाळा उघडण्याचा व सक्तीचें शिक्षण सुरू करण्याचा अधिकार मिळाला. पुढें १८९१सालीं प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा कायदा पास झाला. या व्यवस्थेचा सुपरिणाम होऊन सर्व जनता साक्षर झाली. १८७१सालीं विद्यार्थ्यांनीं धार्मिक शपथ घेण्याचा निर्बंध काढून टाकण्यांत आला. त्यामुळें ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विद्यालयांतून विद्यार्जन करण्यास कोणत्याही धर्माच्या माणसास मोकळीक झाली. १९०२ सालीं प्राथमिक शाळांप्रमाणें दुय्यम शिक्षणसंस्थाही सरकारी व निमसरकारी अशा चालावयाच्या असा पार्लमेंटनें शिक्षणाभिवृध्द्यर्थ कायदा पास केला. या कायद्यानें स्कूलबोर्डें रद्द झालीं आणि प्राथमिक व दुय्यम शिक्षण कौंटी-कौन्सिल व बरो-कौन्सिल या स्थानिक संस्थांच्या ताब्यांत गेलें. देशांतील सर्व शिक्षणावर देखरेख करण्याचें काम प्रिव्ही कौन्सिलच्या शिक्षणकमिटीकडे १८९९पर्यंत होतें. त्या सालीं शिक्षणमंडळ ( Board of Education ) स्थापिलें जाऊन त्याच्याकडे सर्व प्राथमिक व दुय्यम शिक्षणावर देखरेख ठेवावयाची व पार्लमेंटनें मंजूर केलेल्या पैशाचा शिक्षणाकडे योग्य खर्च करावयाचा हीं

कामें आलीं. या बोर्डाचा अध्यक्ष ( President ) सर्व शिक्षणाचा नियामक असून बहुतकरून प्रधानमंडळांत त्याचा अन्तर्भाव होतो.

६. **स्थानिक स्वराज्य.** १८८६ ते १८९२पर्यंत कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ असून लॉर्ड सॉल्झबरी हा मुख्य प्रधान होता. १८८८त त्यानें स्थानिक स्वराज्याचा कायदा पास केला. त्यामुळें कौन्टीच्या कारभाराची पद्धति पालटून ती लोकसत्ताक करण्यांत आली. या कायद्यानें इंग्लंडमध्यें बासष्ट कौन्टी ( परगणे ) व साठ कौन्टी–बरो[1] निर्माण करण्यांत येऊन कौन्टी–कौन्सिलें अस्तित्वांत आलीं. आल्डर्मेन व कौन्सिलर ही अधिकार गाजविणारी मंडळी कर देणाऱ्या लोकांतून निवडून यावयाची व तीन वर्षें अधिकारावर रहावयाची असें ठरलें. लंडन शहराची व्यवस्था अतिशय गुंतागुंतीची झाली होती. या वेळीं लंडन ही एक जादा कौन्टी करण्यांत आली व तिची व्यवस्था बरीच समाधानकारक झाली. १८८९त ही पद्धति स्कॉटलंडांत सुरू करण्यांत येऊन १८९८त आयर्लंडांतही तिचा अंमल चालू झाला. सर्व स्थानिक गोष्टींवर या लोकनियुक्त स्थानिक मंडळांची ( कौन्सिल ) सत्ता चालू झाली. आपआपल्या भागांतील आरोग्य, पोलिसबंदोबस्त व शिक्षण यांची तरतूद करण्याचें काम त्यांजकडे आलें. शिवाय रस्ते व पूल बांधणें, तुरुंगव्यवस्था राखणें, पार्लमेंटच्या निवडणुकी करणें वगैरे कामें त्यांच्या हातीं आलीं. अलीकडे म्युनिसिपालिट्यांनीं सार्वजनिक उद्यानें, खुलीं मैदानें, मोफत वाचनालयें व अजबखाने पुरवून नागरिकांच्या आरोग्याचीं व मनोरंजनाचीं साधनें उत्पन्न केलीं आहेत. तसेच दवाखाने स्थापून व आरोग्यरक्षक घरें बांधून गरिबांचें जीवित कमी कष्टप्रद करण्याचा प्रयत्न सर्व स्थानिक संस्था करीत आहेत. या सर्व स्थानिक

---

१. ५०,००० हून अधिक वस्तीच्या शहरास हें नांव मिळालें. १९१० सालीं इंग्लंडांत ७४ कौन्टी–बरो होतीं.

संस्थांवर देखरेख करण्याचें व त्यांना योग्य दिशा दाखवून देण्याचें काम लंडनमधील मध्यवर्ती सरकारच्या प्रधानमंडळांतील आरोग्य-मंत्री ( Minister of Health, मिनिस्टर ऑफ हेल्थ ) करीत असतो. या प्रकरणांत सांगितलेल्या सुधारणांनीं सर्व राष्ट्राची संस्था जी पार्लमेंट तिच्या बाबतींत व स्थानिक बाबतींत लोकसत्तेचें पाऊल अत्यंत झपाटयानें पुढें पडून इंग्लंड देश नांवानें राजसत्ताक (Monarchy) असला तरी वस्तुतः लोकसत्ताक (Democracy ) बनला.

---

## ३८. आयर्लंडच्या दुःखांचें निवारण.

---

१. **आयरिश लोकांच्या तक्रारी.** १८२९सालीं रोमन क्याथॉलिक लोकांस ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होण्याची परवानगी मिळून आयर्लंडचा रोमन क्याथॉलिक पुढारी डॅनिअल ओकॉनेल हा ब्रिटिश पार्लमेंटांत निवडून आला. हा आयर्लंडास मोठाच लाभ झाला. तथापि आयर्लंडची जनता रोमन क्याथॉलिक असून तिचीं तीन तऱ्हेचीं गाऱ्हाणीं होती. एक धर्मविषयक, दुसरें जमीनविषयक व तिसरें राजकीयसंबंधीं. या तिहींपैकीं पहिलीं दोन आतां बहुतेक दूर झाली असून तिसऱ्याचाही निकाल लागण्याचा रंग आहे. तेव्हां त्या तक्रारी कोणत्या व त्यांचा कसकसा निकाल लागला हें पाहूं.

२. **टाइथ कर.** आयर्लंडची जनता क्याथॉलिक पंथाची होती. टयूडर राजे, स्टुअर्ट राजे पहिला जेम्स व पहिला चार्लस, क्रॉम्वेल व शेवटीं तिसरा वुइल्यम यांच्या कारकीर्दींत इंग्लिश प्रॉटेस्टंटांच्या वसाहती करून आयर्लंडच्या क्याथॉलिक प्रजेचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यांत यश न येऊन उत्तरेकडचा अल्स्टर सोडून बाकीची प्रजा क्याथॉलिकच राहिली. असें असतां आयर्लंडांत सर-

कारी प्रॉटेस्टंट धर्मखातें सुरू करण्यांत येऊन त्यांत प्रॉटेस्टंट धर्मगुरूंची नेमणूक होई. हें प्रॉटेस्टंट धर्मखातें चालविण्यासाठीं प्रजेस *टाइथ कर द्यावा लागे व प्रॉटेस्टंट धर्मगुरु तो मक्तेदारांतर्फें वसूल करीत. हा कर आयर्लंडांतील लोकांस अत्यंत अन्यायाचा वाटून त्यांनीं धर्मगुरूंना तो कर वसूल करणेंच अशक्य करून टाकण्याची चळवळ सुरू केली ( १८२९ ). ती चळवळ शिथिल पाडण्यासाठीं अनेक कडक कायदे झाले. परंतु त्यांचा कांहीं उपयोग न होतां टाइथ कर वसूल करणें अशक्य होऊन प्रॉटेस्टंट धर्मगुरूंस उपास पडण्याची पाळी आली. शेवटीं ब्रिटिश पार्लमेंटनें १८३७सालीं टाइथ कर रद्द केला. त्याच्याऐवजीं जमिनीवर आणखी कर बसवून तो सरकारनें जमीनदारांपासून वसूल करावयाचा व धर्मगुरूंचा खर्च सरकारांतून चालावयाचा अशी पद्धति अंमलांत आली. या सुधारणेनें व्यक्तीच्या खिशांतून प्रत्यक्ष धर्मगुरूंच्या खर्चाकरितां पैसे जात ते बंद होऊन रयतेचे पैसे सरकाराच्या मध्यस्थीनें त्यांस मिळूं लागले. तेव्हां या सुधारणेनें आयरिश लोकांचें समाधान झालें नाहीं; परंतु तात्पुरती शांतता झाली. या बाबतींत पूर्ण न्याय १८६८ सालीं मिळाला. त्या सालीं ग्लॅडस्टनच्या लिबरल प्रधानमंडळानें आयर्लंडांतील सरकारी धर्मखातेंच मोडून टाकण्याचा कायदा पार्लमेंटांत पास केला. खाजगी प्रॉटेस्टंट धर्ममंडळ राहिलें; पण त्याला सरकारी तिजोरींतून पैसा देऊं नये असें ठरलें.

३. **शेतकऱ्यांच्या अडचणी**. दुसरी तक्रारीची बाब म्हटली म्हणजे जमिनीची. हा प्रश्न टयूडर राजे, स्टुअर्ट राजे, व क्रॉम्वेल यांच्या वेळीं इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट जमीनदारांस आयर्लंडांतील जमिनी दिल्यानें उत्पन्न झाला. आयरिश क्याथॉलिक केवळ खंडकरी बनले होते. आयर्लंडांतील कारखान्यांविरुद्ध इंग्रज सरकारचे कायदे अस-

* टाइथ ( Tithe ) हा जमिनीच्या उत्पन्नाचा एक दशांश असे.

ल्यानें शेतकी हाच लोकांचा मुख्य धंदा होता. हिंदुस्थानांतल्या-प्रमाणें पाऊस अनिश्चित असल्यामुळें नेहमीं पिकें बुडत. वाईट हंगामाच्या वेळीं जमीनदारांचे गुमास्ते चालू खंडकऱ्याकडून खंड न आल्यास त्याची जमीन काढून घेत व दुसऱ्यास ती लावून देत. १८४६पासून १८५०पर्यंत आयर्लंडांत इतका भयंकर दुष्काळ पडला कीं, लोकसंख्या वीस लक्षांनीं कमी झाली. आयरिश जमीन-दारांपैकीं पुष्कळ कर्जबाजारी होऊन त्यांपैकीं पुष्कळांनीं इंग्रज व व स्कॉटिश जमीनदारांस आपल्या जमिनी विकून टाकल्या. इंग्लिश व स्कॉटिश जमीनदार आपल्या देशांत रहात. त्यामुळें कुळांची निकृष्ट स्थिति त्यांच्या नजरेस येत नसे व गुमास्त्यांच्या अरेरावीमुळें आयरिश शेतकऱ्यांचे अत्यंत हाल होत. अतिशय कडक अटीवर वाहिवाटावयास घेतलेली जमीन केव्हां हातची जाईल याचा नेम न राहून शेतकऱ्यांचें जीवित दुःसह होई.

४ **शेतकऱ्यांच्या तक्रारींचा निरास**. १८७० व १८८० या दोन सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें आयरिश लोकांस जमिनीबाबद न्याय देण्यासाठीं दोन कायदे केले. परंतु त्यांनीं आयरिश लोकांचें समाधान झालें नाहीं. आयर्लंडचा पुढारी पार्नेल याच्या नेतृत्वाखालीं एक लँड–लीग ( Land League, शेतकरी–संघ ) स्थापण्यांत आली होती ( १८७९ ), त्या संघातर्फे खंड न देण्याचा जाहीरनामा निघाला व आयर्लंडांत दंगे होऊं लागले. तेव्हां ब्रिटिश सरकारनें दडप-शाहीचे कायदे केले, पार्नेल आदिकरून पुढाऱ्यांस कैदेंत टाकलें ( १८८१ ), व लँड–लीग बेकायदेशीर ठरविली. आयरिश लोकांचें म्हणणें असें होतें कीं कुळाला जमिनीवर मालकी-हक्क आहे असें उघड ठरवावें व हें ह्मणणें सरकार ऐकेपर्यंत त्यांनीं जमीनदारांस अडविण्याचा उद्योग चालू ठेविला. शेवटीं सरकारनें कुळांना मालकी–हक्क देण्याचें धोरण अमलांत आणिलें. १८९१ व १९०३ या सालीं पास झालेल्या

कायद्यांनीं जमीनदार लोकांकडून जमिनी विकत घेऊन कुळांस देण्याकरितां मोठमोठ्या रकमा सरकारी खजिन्यांतून खर्चीं पडल्या. त्यामुळें आयरिश लोकांस ऱ्याच सवलती मिळून शेतकरीवर्गांत कांहींशीं शांतता झाली.

५. **राजकीय असंतोष**. आयर्लंडचें तिसरें मागणें १८००त पिटनें ज्या दोन्ही पार्लमेंट एक केल्या ती स्थिति बदलून आयर्लंडास स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्यासंबंधानें होय. याला पहिल्यानें रिपीलची (Repeal) चळवळ म्हणत; पण पुढें होमरूलची चळवळ हेंच नांव रूढ झालें. पहिल्यानें ओकॉनेलनें टाइथ कराविरुद्ध चालविलेल्या चळवळीबरोबरच रिपीलची चळवळ सुरू केली. टोलेजंग सभा भरवून स्वतंत्र पार्लमेंटचें ध्येय लोकांपुढें मांडण्यांत येऊं लागलें. परंतु तें अधिकाऱ्यांस न रुचून १८४४सालीं ओकॉनेलवर खटला करून सरकारनें त्याला तुरुंगांत टाकलें. १८४६ व १८४७ या सालीं आयर्लंडांत भयंकर दुष्काळ पडला. १८४८सालीं युरोपखंडांत राजकीय हक्कांसाठीं क्रान्तिकारक चळवळीचा धुमाकूळ माजला. तेव्हां आयर्लंडांतही बंड झालें; पण त्याचा तेव्हांच मोड झाला. पुढें आयर्लंड स्वतंत्र करण्यासाठीं 'फिनिअन सोसायटी' स्थापन झाली व तिनें १८६५त बंड उभारिलें. पण तेंही तात्काळ मोडण्यांत आलें. मात्र या फिनिअनांच्या क्रान्तिकारक प्रयत्नामुळें इंग्लिश मुत्सद्यांचें लक्ष आयर्लंडकडे वेधलें. लवकरच लिबरल मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यानें धर्म व जमीन या दोन्ही बाबतींत आयरिश लोकांवर होत असलेला अन्याय दूर करण्याकरितां कायदे पास केले.

६. **होमरूलची चळवळ**. पुढें १८७०सालीं आयर्लंड देशाचा अन्तर्गत कारभार चालविण्यासाठीं एक स्वतंत्र पार्लमेंट मिळवावी या उद्देशानें होमरूलची सनदशीर चळवळ सुरू झाली. लवकरच या होमरूलच्या चळवळीस पार्नेल हा हुशार, तेजस्वी व कर्तबगार

पुढारी लाभला. त्यानें होमरूलचा प्रश्न जोरानें पुढें ढकलण्याकरितां नॅशनल लीग स्थापिली (१८८०), व ब्रिटिश पार्लमेंटांतील शंभरपैकीं ऐशीं ऐरिश सभासदांचा राष्ट्रीय पक्ष तयार करून पार्लमेंटांत नेहमीं विरोध केला, व ब्रिटिश प्रधानमंडळास भंडावून सोडण्याचें जोमदार धोरण स्वीकारलें. याच सुमारास लँग-लीगच्या प्रोत्साहनानें आयर्लंडांत हजारों गुन्हे होऊं लागले. तेव्हां सरकारनें लँड-लीग बेकायदेशीर ठरवून पार्नेलला कैदेंत घातलें. परंतु लवकरच ग्लॅडस्टननें पार्नेल आदिकरून पुढाऱ्यांस किल्मनहॅम तुरुंगांतून सोडून दिलें व त्यांनीं आयर्लंडची स्थिति सुधारण्यासाठीं प्रधानमंडळास मदत करण्याचें ठरविलें (१८८२). इतक्यांत आयर्लंडचा चीफ सेक्रेटरी लॉर्ड क्याव्हेंडिश व कायमचा अंडरसेक्रेटरी बर्क यांचे डब्लिन येथें फिनिक्स पार्कमध्यें दिवसाढवळ्या खून झाले. त्यामुळें दडपशाहीची मोहीम पुनः सुरू झाली. तेव्हां पार्लमेंटांत अडवणूक करून कोणताच कायदा सरकारास पास करतां येऊं नये असें जोरदार धोरण पार्नेलनें स्वीकारिलें. पार्नेलनें सरकारास सर्रास विरोध आरंभिला; त्यामुळें लिबरल ग्लॅडस्टन व कॉन्सर्व्हेटिव्ह सॉल्झ्बरी यांच्या प्रधानमंडळास लागोपाठ राजीनामा देणें भाग पडलें (१८८५-८६).

७. **होमरूल बिल.** या नंतर आयरिश होमरूल बिल पास करण्याचें कबूल करून ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला. ग्लॅडस्टननें होमरूलचा अंगीकार केला तेव्हां लिबरल पक्षाच्या दोन फळ्या झाल्या. एक फळी ग्लॅडस्टनच्या हाताखालीं कायम राहिली व दुसरीस चेंबर्लेन हा पुढारी मिळून तिनें आयर्लंडचा संबंध कायम राखण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें तिला लिबरल-यूनियनिस्ट असें नांव पडलें. अशा तऱ्हेनें लिबरल पक्षांत फूट पडली तरी ग्लॅडस्टननें न कचरतां 'होमरूल बिल' कॉमन्ससभेपुढें मांडिलें. परंतु लिबरल-यूनि-

यनिस्ट कॉन्सर्व्हेटिव्हांना मिळाल्यानें कॉमन्ससभेंत तें बिल नापास झालें ( १८८६ ). नवीन निवडणूक होऊन तींत कॉन्सर्व्हेटिव्ह व लिबरल-यूनियनिस्ट यांची सरशी झाली; तेव्हां ग्लॅडस्टननें राजीनामा दिला (१८८६). पुढील सालीं फिनिक्स पार्कमधील खुनांचा पार्नेलनें पुरस्कार केला असा आरोप लंडन टाइम्सनें त्याच्यावर केला. परंतु कमिशनपुढील चौकशींत पार्नेल निर्दोषी ठरला व त्याला नुकसानभरपाईबद्दल टाइम्सकडून २५००० पौंड मिळाले ( १८९० ). पुढील सालीं पार्नेल मृत्यु पावला व होमरूल चळवळीचा जोर खूप कमी झाला. १८९२ सालीं ग्लॅडस्टन चौथ्यानें मुख्यप्रधान झाला, व त्यानें आपलें दुसरें 'होमरूल बिल' पार्लमेंटपुढें मांडिलें. कॉमन्ससभेंत तें पास झालें; परंतु लॉर्डांनीं तें मोठ्या बहुमतानें नामंजूर केलें व अशा रीतीनें ग्लॅडस्टननें आठ वर्षें केलेले श्रम व आयरिश पुढाऱ्यांनीं वीस वर्षें केलेली मेहनत जवळ जवळ फुकट गेली.

---


# ३९ ईजिप्त व सुदान साम्राज्यांत कशीं आलीं.

१. **ईजिप्तांत इंग्रजांचा शिरकाव.** व्हास्को डी गामा यानें १४९७ सालीं हिंदुस्थानास येण्याचा जलमार्ग शोधून काढिला. तेव्हां युरोपियन लोकांना आफ्रिका खंडास वळसा घालून हिंदुस्थानास यावें लागे. १८४५ सालीं पी अँड ओ कंपनीनें तांबडासमुद्र व भूमध्यसमुद्र यांतून जहाजें नेण्यास सुरुवात केली. या मार्गानें सुएझ गांवापासून अॅलेक्झांड्रियापर्यंत खुष्कीवरून प्रवास करावा लागे. पूर्वीं हिंदुस्थानांतून इंग्लंडला जाण्यास सहा महिने लागत; त्याऐवजीं या व्यवस्थेनें सहा आठवडे लागूं लागले. पुढें फर्डिनंड

डी लेसेप्स या कल्पक फ्रेंच एंजिनियरानें सुएझचा कालवा खणून तांबडासमुद्र व भूमध्यसमुद्र यांना जोडून टाकिलें (१८५९-६९). तेव्हांपासून इंग्लंड व हिंदुस्थान यांजमधील प्रवासास तीन आठवड्यांपेक्षां कमी वेळ लागूं लागला. सुएझचा कालवा ईजिप्तच्या हद्दींत असल्यामुळें हा जलमार्ग सुरक्षित राहण्यास तो देश इंग्लंडला अनुकूल असणें अवश्य झालें. ईजिप्त हा देश तुर्कस्थानच्या साम्राज्यांत मोडत असून ईजिप्तचा राज्यकर्ता "खेदिव" हा कॉन्स्टॅन्टिनोपलच्या सुलतानाचा मांडलिक होता. या सुमारास इस्माईल हा खेदिव असून तो उधळ्या व चैनी असल्यामुळें कर्जबाजारी झाला होता. इंग्लंडचा धूर्त साम्राज्यवादी मुख्य प्रधान डिझरेली हा १८७४पासून १८८०पर्यंत अधिकारारूढ होता. १८७५त त्यानें खेदिवपासून सुएझ कंपनीचे एक तृतीयांशाहून अधिक ×शेअर चाळीस लक्ष पौंडांस विकत घेतले. फ्रेंचांचेही पुष्कळ शेअर होते. शेवटीं ईजिप्तच्या सरकारचें दिवाळें निघण्याची वेळ आली; तेव्हां इंग्रज-फ्रेंचांनीं इस्माईलला गादीवरून काढून त्याच्या मुलाला खेदिव केलें व सांपत्तिक बाबतींत इंग्लंड देशाची ईजिप्तला घट्ट मगरमिठी बसली (१८७९).

२. **ईजिप्त इंग्रजांच्या अंकित झालें.** इंग्रज व फ्रेंच सरकारांनीं ईजिप्तची सांपत्तिक बाबतींत सुस्थिति राखण्यासाठीं व राज्यांत व्यवस्था राखण्यासाठीं युरोपियन अधिकारी नेमण्यास खेदिवला भाग पाडलें. हें पुष्कळ ईजिप्शियन लोकांस आवडलें नाहीं, व ईजिप्शियन सरकारचा युद्धमंत्री अरबी पाशा यानें मोठें बंड उभारिलें व युरोपियन कामगारांस कामावरून दूर केलें (१८८२). त्यानंतर आपली सत्ता पुनः

× हल्लीं इंग्रज सरकारच्या मालकीच्या शेअरांची किंमत सुमारें तीन कोटि पौंड असून त्यांजपासून इंग्रज सरकारास १० लक्ष पौंडांहून अधिक उत्पन्न दरसाल होतें.




प्रस्थापित करण्यास फ्रान्स तयार होईना; तेव्हां एकट्या इंग्रजांनीं ईजिप्तच्या दरबारांत आपलें वजन बसविण्याचा उद्योग आरंभिला. अरबीपाशानें अॅलेक्झांड्रिया बंदराची चांगली तटबंदी केली होती; इंग्रजी आरमारानें दारूगोळ्याचा भडिमार करून अॅलेक्झांड्रियाची तटबंदी प्रथम जमीनदोस्त केली. पुढें इंग्रज सेनापति वूल्झली यानें तेलेलकेबीर येथें अरबीच्या सैन्यास गांठून लढाई दिली. तींत ईजिप्शियन सैन्याचा पुरा मोड झाला. त्यानंतर इंग्रज सैन्यानें दंग्याचीं पाळेंमुळें

खणून काढून ईजिप्तांत पुनः शांतता प्रस्थापित केली. यापुढें इंग्रज सैन्य कायमचेंच ईजिप्तमध्यें राहिलें. फ्रेंचांना इंग्रजांच्या या कृत्याचें मोठें वैषम्य वाटलें; पण इंग्रजांनीं माघार न घेतां ईजिप्तमध्यें आपलें कायमचें वर्चस्व स्थापण्याचें धोरण स्वीकारिलें. एव्हांपासून लॉर्ड क्रोमर हा ईजिप्तमध्यें ब्रिटिश एजंट म्हणून काम करूं लागला. तो १९०७-पर्यंत ईजिप्तमध्यें होता. अजून ईजिप्त हा औपचारिक दृष्ट्या तुर्कस्थानचा प्रांत मानण्यांत येई. १९१४त महायुद्ध सुरू झालें तेव्हां ईजिप्त हा ब्रिटिश साम्राज्यांतील संरक्षित प्रदेश आहे असें जाहीर करण्यांत आलें. पुढें झगलूल पाशा या ईजिप्शियन देशभक्तानें लोकमतानुवर्ती स्वराज्यासाठीं खूप खटपटी चालविल्या. शेवटीं त्याच्या प्रयत्नास यश येऊन लोकमतानुवर्ती स्वराज्य ईजिप्तमध्यें स्थापण्यांत आलें व लोकसभेंत झगलूलच्या पक्षाचें बहुमत झाल्यामुळें झगलूल पाशा हा मुख्य प्रधान झाला ( १९२४ जानेवारी ).

३. **सुदान प्रांतांत बंड.** ईजिप्तच्या दक्षिणेस सुदान प्रांत आहे. त्यांतून ईजिप्तांत नाइल नदी वहात गेली आहे. त्या प्रांतांत ईजिप्शियन सरकारनें कांहीं लष्करी ठाणीं बसविलीं होतीं. तेथील लोकांस हें पसंत न पडून त्यांच्या पुढाऱ्यानें महदी (देवदूत) हें नांव घेऊन बंडाचें निशाण उभारिलें व कांहीं थोड्या ठाण्यांखेरीज सर्व सुदान प्रांत हस्तगत करून घेतला ( १८८३ ). इंग्लंडचा मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यानें सुदान सोडून देण्याविषयीं ईजिप्शियन सरकारास कळविलें. तेव्हां त्या सरकारनें तसें करण्याचें ठरवून सुदानचा चांगला माहितगार जनरल गॉर्डन याची सुदानमधील ठाण्यांतील लोकांस बचावून आणण्यासाठीं तिकडे रवानगी केली. यानंतर खुद्द गॉर्डनच महदीच्या लोकांकडून खार्टूममध्यें कोंडला गेला; तथापि तो मोठ्या शौर्यानें तेथें आपला बचाव करीत राहिला. पुढें लॉर्ड वूल्झ्ली ईजिप्तमध्यें उतरून क्यानडांतील हुशार बोटवाल्यांच्या

साहाय्यानें नाइल नदींतून मार्ग काढीत गॉर्डनच्या सोडवणुकीस चालला. परंतु तो खार्टूमला पोंचण्यापूर्वीच महदीच्या लोकांनीं खार्टूम काबीज केलें व सर्व शिबंदीची कत्तल केली, तींत गॉर्डनही ठार झाला (१८८५). नंतर इंग्रज फौज ईजिप्तमध्यें परत आली व सुदान प्रांत सोडून दिल्याचें ईजिप्शियन सरकारनें जाहीर केलें.

४. **खार्टूमचा लॉर्ड किचनेर.** पुढें १८९६मध्यें ईजिप्शियन व इंग्रज सैन्य बरोबर घेऊन जनरल किचनेर सुदान प्रांत पुनः जिंकण्यासाठीं निघाला. त्या वेळीं 'महदी' वारला होता व त्याच्या जागीं खलिफा हा पुढारी झाला होता. खलिफाच्या सैन्याची व किचनेरची खार्टूमच्या समोर ऑम्डुर्मान येथें गांठ पडली (१८९८). लढाई मोठया निकराची झाली. तींत खलिफाचा पुरा मोड झाला. नंतर इंग्रज सैन्यानें खार्टूममध्यें प्रवेश केला व ज्या जागीं गॉर्डनला ठार मारण्यांत आलें होतें तेथें सर्व इंग्रज सैन्यासमक्ष त्याच्या दफनाची प्रार्थना झाली. या विजयाबद्दल जनरल किचनेर यास लॉर्ड किचनेर ऑफ खार्टूम असा किताब मिळाला.

५. **फ्रेंचांशीं सुदानसंबंधीं तंटा.** याच सुमारास फ्रेंच सरकारनें कांगो संस्थानामधून वर सुदानमध्यें प्रवेश करण्यासाठीं मेजर मार्चंड याची सैन्यासह रवानगी केली. ईजिप्शियन सरकारनें सुदान सोडिलें, तेव्हां आतां त्यांत वसाहत करण्यास हरकत नाहीं ही समजूत यास कारण होती. शेवटीं असा योगायोग झाला कीं, किचनेर जय मिळवून खार्टूममध्यें शिरला त्यापूर्वीच दक्षिणेकडे चारशें मैलांवर नाइलच्या तीरच्या फाशोडा ठाण्यांत मार्चंडनें प्रवेश केला. तेव्हां इंग्रज व फ्रेंच या दोघांत मोठी तेढ उत्पन्न झाली. तथापि इंग्रज व फ्रेंच दोघेही मोठे स्वार्थदक्ष असल्यामुळें त्यांनीं आपआपली 'लूट' ठरवून टाकिली. नाइल नदीच्या उगमाच्या

पश्चिमेकडील भाग फ्रेंचांच्या छायेखालीं राखण्याचें ठरून नाइल नदीच्या खोऱ्यावरील सर्व हक्क फ्रेंचांनीं सोडावा असें ठरलें (१८९९).

६. **इंग्रजांच्या ताब्यांतील आफ्रिकेंतील इतर प्रदेश.** एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत आफ्रिका खंडाचा अन्तर्भाग अज्ञात होता. १८४१नंतर डेव्हिड लिव्हिंग्स्टन व त्याचा मित्र स्टॅन्ले या दोन मिशनऱ्यांनीं आफ्रिकेंत प्रवास करून मध्य आफ्रिकेंतील नियासा व टांगानिका हीं दोन सरोवरें शोधून काढिलीं. पुढें स्टॅन्लेनें आणखी उत्तरेकडे जाऊन व्हिक्टोरिया नियांझा व ऑल्बर्ट नियांझा हीं नाइल नदीवरील सरोवरें शोधिलीं. १८८४ सालापासून सर्व युरोपियन राष्ट्रांचें आफ्रिकेकडे लक्ष लागलें व आफ्रिकेंत मुलूख मिळविण्यासाठीं सर्व युरोपियनांची धडपड सुरू झाली. पुढील अवघ्या दहा वर्षांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि राष्ट्रांनीं बहुतेक आफ्रिकेचे तुकडे पाडून ते आपआपसांत वांटून घेतले. या अल्प अवधींत एकट्या इंग्लंडनें एक तृतीयांश युरोपयेवढा भाग कमाविला. पूर्वआफ्रिकेशीं व्यापार करण्यासाठीं "ब्रिटिश ईस्ट आफ्रिका कंपनी" स्थापिली गेली होती. तिचा नोकर क्याप्टन लुगार्ड यानें नेटिव्ह राजांशीं खलबतें करून 'युगांडा' व 'ब्रिटिश ईस्ट आफ्रिका' हे दोन प्रदेश ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षित प्रदेश बनविले (१८९१). पश्चिम आफ्रिकेंतही इंग्रजांचे उद्योग सुरू होते. लवकरच ग्याम्बिया, सिएरा लिओने, गोल्ड कोस्ट, व नायजीरिआ इत्यादि प्रदेश ब्रिटिश साम्राज्यांत अन्तर्भूत झाले. 'गोल्ड कोस्ट' च्या संरक्षणासाठीं अशांटी लोकांशीं इंग्रजांनीं लढाई दिली व त्यांचा मुलूख गोल्ड कोस्टमध्यें सामील करून घेतला.


---

# ४०. दक्षिण आफ्रिकेंतील वसाहती.

( बोअर-युद्ध १८९९–१९०२ ).

१. **बोअरांचें स्थलांतर.** आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास केप ऑफ गुड होप आहे. त्या प्रांतांत डचांची केप कॉलनी ही वसाहत होती. नेपोलियनशीं युद्ध चालू असतां १८०६ सालीं इंग्रजांनीं ती आपल्या ताब्यांत घेतली. त्या वेळीं तींत डच लोक रहात असून ते आपल्याला बोअर ( Boer, शेतकरी ) म्हणवीत. त्यांचा धंदा शेतकीचा असल्यानें त्यांची वस्ती विस्कळीत होती व ते अडाणी होते. आफ्रिकेंतील रानटी लोक व हिंस्र पशू यांच्याशीं नेहमीं प्रसंग पडल्यामुळें ते युद्धांत तरबेज असत. शेतावर गुलाम ठेवून धंदा करण्याची त्यांची वहिवाट असे. १८३३त ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरी जेव्हां बंद झाली तेव्हां बोअरांचे गुलाम स्वतंत्र झाले. त्याच्या मोबदला बोअरांस भरपूर रक्कम मिळाली नाहीं. त्यामुळें इंग्रजांविरुद्ध त्यांचीं मनें कलुषित झालीं व त्यांनीं इंग्लिशांच्या ताब्यांतून मोकळें होण्यासाठीं स्थलांतर करण्याचें ठरविलें. १८३६त बोअर लोकांनीं उत्तरेकडे प्रयाण केलें. कांहींनीं ऑरेंज नदी व व्हाल नदी यांच्यामधील प्रदेशांत वसाहत केली, व कांहीं जणांनीं त्याच्याही पुढें जाऊन व्हाल नदीच्या उत्तरेस लिंपो नदीपर्यंत वसाहती केल्या. त्यांपैकीं ऑरेंज व व्हाल यांच्यामधील वसाहतीस ऑरेंज फ्री स्टेट नांव पडलें व व्हालच्या उत्तरेकडील वसाहतीस ट्रान्सवाल नांव पडलें. पुढें ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या दोन्ही वसाहतींचें स्वातंत्र्य इंग्रज सरकारनें मान्य केलें.

२. **ट्रान्सवाल पुनः स्वतंत्र झालें.** ट्रान्सवाल सरकार निर्धन होतें व त्याच्या लगतच्या प्रदेशांतील झुलु राजा केटेवायो हा ट्रान्स-




वालवर हल्ला करण्यास टपला होता; तेव्हां ट्रान्सवालांतील लोकांच्या विनंतीवरून कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळानें १८७७मध्यें ट्रान्सवाल देश ब्रिटिश साम्राज्यास जोडिला. नंतर झुलु लोकांशीं युद्ध करून इंग्रजांनीं त्यांचा मोड केला. झुलूंचें संकट दूर होतांच ट्रान्सवालमधील बोअरांनीं पुनः आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें ( १८८० ). त्यानंतर इंग्रज व बोअर यांजमध्यें युद्ध झालें. नाताळांतील माजुबा टेंकडी-वर इंग्रज सैन्याचा बोअरांनीं पराभव केला ( १८८१ ). या वेळीं उदार मतवादी ग्लॅडस्टन मुख्य प्रधान होता. त्यानें बोअर लोकांचा

कल लक्षांत घेऊन ट्रान्सवालचें स्वातंत्र्य मान्य केलें. ट्रान्सवालची राजधानी प्रिटोरिया ही असून तेथें बोअरांचें लोकसत्ताक स्थापिलें गेलें व पॉल क्रूगर हा त्याचा अध्यक्ष बनला.

३. **नूतनागत**. पुढें ट्रान्सवालांत १८८५त सोन्याच्या खाणी सांपडल्या. या सोन्याच्या खाणी प्रिटोरिया राजधानीनजीक दक्षिणेस असून त्यांत काम करणाऱ्या लोकांचें जोहान्सबर्ग हें शहर लवकरच भरभराटलें. तेथें ब्रिटिश लोक वस्ती करण्यास आले व त्यांची लोकसंख्या झपाझप वाढली. परंतु बोअर लोकांनीं नवीन वसाहत करणाऱ्या नूतनागतांस ( Outlanders ) नागरिकत्वाचे हक्क देण्याचें साफ नाकारिलें. ट्रान्सवाल सरकार ऐकत नाहीं असें पाहून जोहान्सबर्गमधील ब्रिटिश नूतनागतांनीं आपले हक्क सरकारास मान्य करण्यास भाग पाडण्यासाठीं झगडा सुरू केला ( १८९५ ).

४. **जेम्सनचा हल्ला**. या वेळीं सेसिल ऱ्होड्स हा केप कॉलनीचा मुख्य प्रधान असून मोठा कर्तबगार व हुशार होता. त्यानें 'साउथ आफ्रिका कंपनी' या नांवाची एक व्यापारी कंपनी स्थापिली होती व तिच्यातर्फे ट्रान्सवालच्या उत्तरेकडील प्रदेश ब्रिटिश वसाहतीस मिळविला. पुढें त्या प्रदेशास ऱ्होडेशिया असें नांव पडलें. या ऱ्होड्सच्या कारवाईमुळें ट्रान्सवालची वाढ खुंटली. पुढें जोहान्सबर्गमधील नूतनागतांस मदत करण्याचें ऱ्होड्सनें ठरविलें. दक्षिण-आफ्रिकेंतील सर्व वसाहती एक करून सर्व दक्षिण आफ्रिकेचें एकच राज्य करून टाकावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. शेवटीं साउथ आफ्रिका कंपनीचा एक कामगार क्याप्टन जेम्सन यानें कांहीं स्वारांनिशीं ट्रान्सवालवर चाल केली. परंतु तो जोहान्सबर्गला पोंचण्यापूर्वींच ट्रान्सवाल-सरकारनें सर्व लोकांसह त्याला पकडिलें. अध्यक्ष क्रूगर यानें जेम्सनला शिक्षा करण्यासाठीं ब्रिटिश सरकारच्या हवालीं केलें व या स्वारीला ऱ्होड्सची असलेली मदत उघडकीस

आणिली. साम्राज्यसरकारनें चाल करून गेलेल्या लोकांस शिक्षा ठोठावल्या व ऱ्होड्सला केप कॉलनीच्या प्रधानगिरीचा राजीनामा देणें भाग पडलें (१८९६). या जेम्सनच्या हल्ल्यानें जोहान्सबर्गमधील नूतनागतांची स्थिति अधिकच बिकट झाली.

५. **युद्धाची तयारी.** १८९९च्या मार्च महिन्यांत नूतनागतांनीं ब्रिटिश सरकारकडे आपलीं दुःखें दूर करण्याविषयीं अर्ज केला. नंतर त्या वेळचा वसाहतींचा प्रधान जोसेफ चेंबर्लेन याचा अध्यक्ष क्रूगर याशीं, त्या प्रश्नासंबंधीं पत्रव्यवहार सुरू झाला. पुष्कळ वेळ बोलणीं सुरू होतीं. पण तंटा मिटण्याचें चिन्ह दिसेना. मात्र दोन्ही पक्षांनीं युद्धाची तयारी चालविली. बोअरांनीं युरोपांतून बंदुका व तोफा आणविण्याचा सपाटा चालविला; तसेंच आपल्या बाजूनें लढण्याविषयीं त्यांनीं ऑरेंज फ्री स्टेटशीं तह करून केपकॉलनी व नाताळ या दोन्ही ब्रिटिश वसाहतींतील आपल्या डच जातभाईंस चेतविण्याची खटपट चालविली. साम्राज्यसरकारनेंही केप कॉलनी व नाताळ या दोन्ही ठिकाणच्या फौजेस मदत म्हणून आणखी सैन्य उतरविलें. लवकरच तंटा विकोपास जाऊन ट्रान्सवाल व साम्राज्यसरकार यांजमध्यें युद्ध सुरू झालें. ऑरेंज फ्री स्टेट ट्रान्सवालला मिळाली व तिनेंही युद्ध जाहीर केलें.

६. **युद्धाची हकीकत व तह.** बोअरांनीं युद्ध इंग्रजांच्या मुलुखांत व्हावें अशी योजना केली. लवकरच त्यांनीं किंबर्ले, मॅफेकिंग व लेडीस्मिथ या ब्रिटिश ठाण्यांस वेढा दिला. इंग्रजांनीं हे वेढे उठविण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ होऊन इंग्रजांस अपयश आलें. शेवटीं या पराभवाच्या बातम्यांनीं इंग्लंडांत स्वाभिमान जागृत होऊन इंग्लिश राष्ट्र वाटेल ती मदत करण्यास तयार झालें. लवकरच लॉर्ड रॉबर्ट्स या नामांकित सेनापतीची दक्षिण आफ्रिकेंत रवानगी झाली व त्याचा दुय्यम म्हणून लॉर्ड किचनेर यासही पाठवि-

ण्यांत आलें ( १९०० ). ऑस्ट्रेलिया, क्यानडा, न्यू झीलंड या वसाहतींनीं साम्राज्यसरकारास मदत करण्यासाठीं सैन्यें पाठविलीं. नंतर मात्र इंग्रजांस जय मिळून लेडीस्मिथ, किंबर्ले, व मॅफेकिंग, येथील वेढे उठले. थोड्याच अवकाशांत ऑरेंज फ्री स्टेटची राजधानी ब्लूमफॉन्टाइन व ट्रान्सवालची प्रिटोरिया या दोन्ही ठिकाणीं इंग्लिश सैन्यानें प्रवेश केला, व ते दोन्ही देश ब्रिटिश साम्राज्यांत सामील केल्याचें जाहीर झालें. अध्यक्ष क्रूगर युरोपला निघून गेला. तथापि यापुढें बोअर लोकांनीं लहान लहान टोळ्या करून गनिमी युद्धपद्धतीचा अंगीकार केला व दोन वर्षेंपर्यंत इंग्रज सेनापति किचनेर यास खूप त्रास दिला. या गनिमी युद्धांत बोअरांचे तीन सेनापति प्रसिद्धीस आले. बोथा, डेलारे, व डी वेट हे ते होत. देश डोंगराळ असल्यामुळें गनिमी काव्याचें धोरण बरेंच यशस्वी झालें. शेवटीं बोअरांचा नाइलाज होऊन त्यांस शस्त्र खालीं ठेवणें भाग झालें व युद्ध संपलें. कांहीं काळ वाटाघाटी व समेटाचीं बोलणीं होऊन तह ठरला. त्याअन्वयें ट्रान्सवाल व ऑरेंज फ्री स्टेट ब्रिटिश साम्राज्यांत सामील झाल्या; आणि प्रत्येकीस योग्य संधि येतांच पार्लमेंट देण्याचें ठरलें ( जून १९०२ ).

७. **स्वराज्यदान व दक्षिण आफ्रिकेचा संघ.** ट्रान्सवालला स्वराज्याची देणगी १९०६त मिळाली व ऑरेंज फ्री स्टेटला १९०७त मिळाली. यानंतर १९१०सालीं केप कॉलनी, ऑरेंज फ्री स्टेट, ट्रान्सवाल व नाताळ या चारी देशांचा मिळून 'दक्षिण आफ्रिका' हा संघ निर्माण झाला. साउथ आफ्रिकेची संयुक्त पार्लमेंट उघडण्याचा समारंभ पांचवे जॉर्ज यांचा चुलता डयूक ऑफ कनॉट याच्या हस्तें करण्यांत आला. पहिल्या पार्लमेंटांत बोअरांचें मताधिक्य झाल्यामुळें जबाबदार राज्यपद्धतीच्या नियमानुसार जनरल बोथा यास साउथ आफ्रिकेचा मुख्य मंत्री नेमण्यांत

आलें. अशा रीतीनें बोअर व इंग्रज यांजमधील भांडण तुटलें. यापुढें काळ्या लोकांना वसाहतींतून वस्ती करूं द्यावयाची कीं नाहीं हा प्रश्न निघाला व हिंदी लोकांसारखे काळे वसाहतवाले व गोरे वसाहतवाले यांच्यामध्यें मोठी तेढ उत्पन्न झाली.

---

## ४१. लोकशाहीची प्रगति.

### ( लिबरल पक्षाची कामगिरी. )

१. **कॉन्सर्व्हेटिव्हांत फूट.** १८९३ सालीं ग्लॅडस्टननें पुढें आणिलेलें आयरिश होमरूल बिल नापास झाल्यावर लवकरच लिबरल पक्ष अधिकारभ्रष्ट झाला, व कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळाच्या हातीं सत्ता गेली. तो पक्ष १८९४पासून १९०५पर्यंत अधिकारारूढ होता. या अवधींत बोअर लोकांशीं युद्ध झालें. तें चालू असतां व्हिक्टोरिया राणी दीर्घकाल राज्य करून मृत्यु पावली ( १९०१ ). तिच्यामागून तिचा वडील मुलगा सातवा *एडवर्ड ही पदवी घेऊन गादीवर बसला. बोअर युद्धानंतर कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळांतील वसाहतींचा प्रधान जोसेफ चेंबर्लेन हा स्वतः दक्षिण आफ्रिकेंत जाऊन आला. बोअर युद्धामुळें कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळास ब्रिटिश साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांचा ऐक्यभाव वृद्धिंगत करण्याची जरूरी भासूं लागली होती. तो ऐक्यभाव वृद्धिंगत करण्याची एक युक्ति चेंबर्लेननें काढिली. त्याच्या योजनेस

---

*विंडसर घराणें, १९०१—
सातवा एडवर्ड, १९०१-१९१०.
|
पांचवा जॉर्ज, १९१०—

'जकातपद्धतींत सुधारणा' ( Tariff Reform ) हें नांव आहे. पीलनें धान्याचा कायदा रद्द केल्यापासून इंग्लंडांत खुला व्यापार सुरू झाला होता. हा खुला व्यापार बंद करून परदेशच्या मालावर जकाती बसविल्या पाहिजेत व इंग्लंडच्या कारखानदारांचें संरक्षण केलें पाहिजे असें चेंबर्लेन म्हणूं लागला. त्याबरोबरच वसाहतींच्या मालावर परकीय मालापेक्षां कमी जकात ठेवावी म्हणजे वसाहतींना प्रत्यक्ष व्यापारांत सवलत मिळून ब्रिटिश साम्राज्याची एकी दृढ होईल असेंही त्यानें प्रतिपादन केलें. हें मत लिबरल पक्षास मुळींच रुचलें नाहीं व कॉन्सर्व्हेटिव्ह पुढाऱ्यांतही या प्रश्नावर द्विधामत झालें. अर्थातच कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळ डळमळलें (१९०५).

२. **लिबरलपक्ष अधिकारारूढ झाला.** नंतर लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला. क्याम्प्बेल बॅनरमन हा मुख्य प्रधान होऊन हुशार वकील आस्क्विथ व वेल्समधील उत्तम वक्ता म्हणून नांवाजलेला लॉइड जॉर्ज हे अनुक्रमें फडनवीस व गृहमंत्री या जागीं आले. प्रसिद्ध आङ्ग्ल पंडित जॉन मोर्ले हा भारतमंत्री झाला. लवकरच पार्लमेंट बरखास्त होऊन नवी निवडणूक झाली (जानेवारी १९०६). तींत लिबरल पक्षास अपूर्व विजय मिळाला. कॉमन्समधील लिबरल सोडून बाकीचे सर्व सभासद एक केले तरी त्यांजपेक्षां लिबरल सभासदांची संख्या अधिक होती. नवीनच बनलेल्या मजूरपक्षानें या निवडणुकींत आपले सभासद उभे केले होते; त्यांजपैकीं चाळीस सभासद निवडून आले. हे मजूरपक्षाचे सभासद व आयरिश 'होमरूल' करितां झगडणाऱ्या आयरिश राष्ट्रीय पक्षाचे सभासद लिबरलांस अनुकूल होणार हें निश्चित होतें. तेव्हां नवीन पार्लमेंटांत प्रचंड बहुमताचा पाठिंबा मिळाल्यामुळें लिबरल प्रधानमंडळानें आपलें कार्य मोठ्या उत्साहानें आरंभिलें. पुढें १९०८त बॅनरमन मृत्यु

पावला. तेव्हां आस्किथ मुख्य प्रधान होऊन फडणिशी लॉईड जॉर्जकडे गेली.

३. **सामाजिक सुधारणा**. औद्योगिक क्रान्तीमुळें व यान्त्रिक शोधांमुळें इंग्लंडांत अनेक अजस्र कारखाने उत्पन्न झाले होते; अनेक नवीन शहरें अस्तित्वांत येऊन श्रीमंत भांडवलवाले उदय पावले होते; तसेंच कारखान्यांतून काम करण्यास मजुरांची जरूर असल्यामुळें दर उद्योगधंद्यांच्या ठिकाणीं मजुराचा जमाव जमला होता. भांडवलवाले अधिक श्रीमंत बनत होते व मजूरवर्ग (जनता)मात्र दारिद्र्य, अज्ञान व दुःस्थिति यांत होरपळून निघत होता. मजूरवर्गाची स्थिति सुधारण्यासाठीं एकोणिसाव्या शतकांत पार्लमेंटनें कांहीं कायदे केले होते व मजूर-संघही स्थापन झाले होते. परंतु मजूरवर्गाची स्थिति अजून कष्टप्रदच होती. १८६७ सालीं शहरांतील मजुरांस व १८८४सालीं शेतींवर खपणाऱ्या मजुरांस मतदारीचा हक्क मिळाला होता. त्यामुळें मजुरांचीं मतें अनुकूल करून घेणें पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं उपयोगाचें होतें. तेव्हां लिबरल प्रधानमंडळानें मजूरवर्गाचें म्हणजे इंग्लंडांतील सामान्य जनतेचें दारिद्र्य दूर करण्याचें काम जोरानें सुरू केलें. कामावर असतां मजुराला दुखापत झाल्यास कारखानदारानें त्याची भरपाई केली पाहिजे असा कायदा १८९७मध्यें झाला होता, तो कायदा आतां शेतावरील व घरगुती मजुरास लागू करण्यांत आला. अनेक मजूर म्हातारपणीं असहाय होत व उपासमारीनें मरत. ही स्थिति 'सुधारलेला' म्हणविणाऱ्या समाजास काळोखी आणणारी आहे हें लक्षांत घेऊन सरकारनें १९०८मध्यें सत्तर वर्षांवरील गरीब म्हाताऱ्यांस पेन्शन द्यावयाचें हा कायदा पास केला. त्याचप्रमाणें खाणींतील कामकऱ्यास दररोज आठ तासांपेक्षां अधिक वेळ भूगर्भांत रहावें लागूं नये असें ठरलें. पुढें १९११ सालीं मजूरवर्गास निश्चित करण्यासाठीं प्रधानमंडळानें 'राष्ट्रीय विम्याचा कायदा'

( National Insurance Act ) पास केला. या कामासाठीं जरूर असलेल्या मोठ्या फंडांत मजुरानें, कारखानदारानें व सरकारनें पैसे भरावयाचे व त्यांतून मजुरास आजारीपणांत व बेकारी स्थितींत मदत करावयाची अशी व्यवस्था झाली. मजूरवर्गाची स्थिति सुधारण्यासाठीं पार्लमेंटची अशी खटपट चालू असतां कित्येक मजूरसंघांनीं संप करून कारखानदारास वठणीवर आणण्याच्या मार्गाचा अवलंब केला. १९११ व १९१२ या दोन सालीं इंग्लंडांत अनेक संप झाले. त्यांतील तीन जंगी होते; पहिला रेल्वेवरील मजुरांचा, दुसरा कोळशाच्या खाणींतील कामकऱ्यांचा, व तिसरा बंदरावरील गोदामांतील उद्योगवाल्यांचा.

४. १९०९चें **बजेट**. जनतेची स्थिति सुधारण्यासाठीं सरकारनें जे कायदे केले त्यांचा अंमल करणें मोठ्या खर्चाचें काम होतें. तसेंच या वेळीं जर्मनी आपली आरमारी शक्ति वाढवीत होता, त्यामुळें आपलें समुद्रावरील वर्चस्व कायम ठेवण्यासाठीं नवीन तऱ्हेचीं ड्रेड्नॉट ( Dreadnaught) जहाजें बांधणें इंग्लंडला जरूर झालें. तेव्हां समाजसुधारणा व आरमाराची वाढ या दोन गोष्टी साधण्यासाठीं फडनवीस लॉइड जॉर्ज यानें ऐदी श्रीमंतांवर जबर कर बसविण्याचें धोरण स्वीकारिलें. त्यानें शहरांतील श्रीमंतांच्या मालमत्तेवर, खाणीवाल्यांच्या जमिनीवर व गर्भश्रीमंत जमीनदारांच्या मिळकतीवर नवीन कर बसविण्याचें मनांत आणून आपलें अंदाजपत्रक पार्लमेंटपुढें मांडिलें ( १९०९ ). कॉमन्ससभेंत तें पास झालें, पण बड्या श्रीमंतांचें आगर जी लॉर्डांची सभा ती तें पास करीना. या बजेटानें श्रीमंतीचें उच्चाटन करून सर्व लोक सारखेच कंगाल करूं पाहणाऱ्या समाजसत्तावादी ( Socialist, सोशियालिस्ट ) पक्षाचें चांगलें फावणार असें म्हणून लॉर्डांनीं बजेट फेंटाळून लाविलें.

५. **पार्लमेंट ॲक्ट** ( १९११ ). लॉर्डांनीं बजेट फेंटाळून लाविलें,

तेव्हां नवी निवडणूक करणें जरूर झालें. निवडणुकींत लिबरल पक्षाचें मताधिक्य कायम राहिलें. मात्र १९०६सालीं दोन पक्षांच्या मतसंख्येंत जें अतिशय अंतर पडलें होतें तें आतां बरेंच कमी झालें. तथापि मजूरपक्ष व आयरिश राष्ट्रीय पक्ष यांचें लिबरल प्रधानमंडळास पूर्ण पाठबळ असल्यामुळें सरकारची बाजू अजूनही भक्कम होती. तेव्हां लॉर्डांनीं बजेट पास केलें (१९१०). याच सुमारास १९१० च्या मे महिन्यांत सातवा एडवर्ड मृत्यु पावला व त्याचा मुलगा जॉर्ज हा 'पांचवा जॉर्ज' हा किताब घेऊन इंग्लंडच्या गादीवर आला. बजेट पास केल्यावर लॉर्ड्ससभेचे अधिकार कमी करण्याच्या खटपटीस आस्क्विथ लागला व या प्रश्नावर लोकमत कळवून घेण्यासाठीं त्यानें पार्लमेंट बरखास्त केली (१९१० नोव्हेंबर). नवीन निवडणुकींत पूर्वीची स्थिति कायम राहिली. मग कॉमन्ससभेनें लॉर्डांचे अधिकार कमी करणारा कायदा पास केला. नंतर, १८३२ सालीं सुधारणेचें बिल पास करून घेतांना अर्ल ग्रेनें नवीन लॉर्ड करण्याच्या दिलेल्या धमकीचा उपयोग करून आस्क्विथनें त्या बिलास लॉर्डांच्या सभेची संमति मिळविली व १९११चा पार्लमेंट ॲक्ट पास झाला. पैशाची मंजुरी करण्याच्या बिलांत फेरफार करण्याचा अधिकार लॉर्डांस नव्हताच. या कायद्यानें तसलें बिल नापास करण्याचाही त्यांचा अधिकार काढून घेण्यांत आला. शिवाय दोन वर्षांपेक्षां जास्त मुदतींत कॉमन्सनीं एखादें बिल लागोपाठच्या तीन बैठकींत पास केलें तर लॉर्डांच्या संमतीशिवाय तें कायदा म्हणून समजण्यास हरकत नाहीं असें ठरलें. तसेंच पार्लमेंटची कमाल मुदत १७१५पासून सात वर्षें होती, ती बदलून यापुढें पांच वर्षें करण्यांत आली. पुढें लवकरच कॉमन्ससभेच्या सभासदास दरसाल चारशें पौंड वेतन द्यावयाचा ठराव पास झाला.

६. **तिसरें आयरिश होमरूल बिल.** लॉर्डांचा अधिकार

कमी केल्यानंतर लिबरल पक्षाचें फार दिवसांचें जें काम-आयर्लंडास होमरूल देणें—तें काम आस्क्विथनें हातीं घेतलें. १९१२त होमरूल बिल कॉमन्समध्यें पास झालें; पण लॉर्डांनीं तें फेटाळून लाविलें. पुढें १९११च्या 'पार्लमेंट ॲक्ट' प्रमाणें दोन वर्षांनीं कॉमन्सनीं होमरूल बिल तिसऱ्यानें पास केलें व तें कायदा बनलें (सप्टेंबर १९१४). या वेळीं अतिशय प्रयासानें मिळालेलें होमरूल आयर्लंडांतील घर-भेद्या अल्स्टर प्रांतास कबूल न होऊन प्रसंग पडल्यास लढाई करून होमरूलचा प्रतिकार करण्याची त्यानें तयारी केली होती. इतक्यांत 'जर्मन महायुद्ध' सुरू झाल्यामुळें इंग्लिश सरकारनें होमरूलचा अंमल महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत तहकूब केला. या महायुद्धांत आयरिश राष्ट्रीय पक्षाचा पुढारी रेडमंड यानें इंग्रजांस मदत करण्याचें ठरविलें. परंतु पुढें आयर्लंडांत स्वातंत्र्यवादी सिनफेन पक्ष जोरदार होऊन डब्लिनमध्यें इंग्लिश सत्तेविरुद्ध त्यानें बंड केलें (१९१६). तथापि या बंडाचा तेव्हांच मोड झाला. यापुढें सिनफेन पक्षाचा जोर मात्र कमी न होतां त्यानें सरकारास सळो कीं पळो केलें. शेवटीं १९१५त लॉइड जॉर्ज मुख्य प्रधान झाला होता, त्यानें आयर्लंडास होमरूल दिलें; अल्स्टरला निराळी पार्लमेंट दिली आणि उत्तर आयर्लंड (अल्स्टर) व दक्षिण आयर्लंड यांनीं पुढें सामोपचारानें एक व्हावें अशी योजना केली (१९२०). हल्लीं दक्षिण आयर्लंडास 'फ्री स्टेट' असें नांव आहे. मात्र या व्यवस्थेनें आयर्लंडांत शांतता झाली नसून 'डी व्हालेरा'च्या नेतृत्वाखालीं 'स्वतंत्र लोकसत्ताक' वादी पक्ष या नव्या सरकारविरुद्ध एकसारखा क्षोभ उत्पन्न करीत आहे.

७. **चौथा पार्लमेंट–सुधारणेचा कायदा** (१९१८). पार्लमेंटच्या निवडणुकींत सुधारणा करण्याचा तिसरा कायदा १८८४त झाला. त्यानंतर निवडणुकींत आणखी सुधारणा व्हावी व स्त्रियांना मत-

दारीचा हक्क मिळावा यासाठीं चळवळ सुरू झाली. मतदारीच्या हक्कासाठीं खटपट करणाऱ्या स्त्रियांस मतवादी स्त्रिया (Suffragettes, सफ्राजेट्स) हें नांव आहे. या मतवादी बायांपैकीं पुष्कळांनीं जलाल चळवळींचे मार्ग स्वीकारण्यास आरंभ केला. सार्वजनिक सभा मोडाव्या, खिडक्या तोडाव्या, व व्यक्तिशः प्रधानांवर हल्ले करावे, निवडणुकीच्या वेळीं मतें गोळा करण्याच्या पेटया पळवून न्याव्या, असा हा मार्ग होता. पुढें १९१८ सालीं 'महायुद्ध' सुरू असतांनाच पार्लमेंट सुधारणेचा कायदा पास झाला. त्यांत मतदारीचा हक्क स्त्रिया, लष्करी शिपायी व आरमारांतील खलाशी यांस देण्यांत आला. या कायद्यानें मतदारांच्या संख्येंत खूप भर पडून एकंदर लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्मे लोक पार्लमेंटच्या निवडणुकींत मतदार बनले. अशा रीतीनें वयांत आलेल्या बहुतेक नागरिकांस प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क प्राप्त झाला व इंग्लंडांत खरीखुरी लोकशाही स्थापिली गेली. याच वेळीं मतदारसंघांची रचना बदलण्यांत आली व लोकसंख्येच्या ठरीव गटास समान प्रतिनिधि मिळतील अशी व्यवस्था अंमलांत आली. या नवीन व्यवस्थेनें आयर्लंड धरून हाउस ऑफ कॉमन्सच्या सभासदांची संख्या ७०३ झाली. या कायद्यास धरून १९१८च्या डिसेंबरांत पहिली निवडणूक झाली. पुढील सालीं एका पोट निवडणुकींत एक स्त्री हाउस ऑफ कॉमन्सची पहिली स्त्री-सभासद म्हणून निवडून आली. ती लेडी ॲस्टर ही होय. पुढें १९२१त आयर्लंडला स्वराज्य दिल्यामुळें कॉमन्सची संख्या ६१५ झाली.

## ४२. महायुद्ध (१९१४–१९१८).


१. **विसाव्या शतकाच्या आरंभीं परराष्ट्रीय संबंध.** सन

१९१४पासून १९१८पर्यंत जगांत एक जंगी युद्ध माजून राहिलें. त्यांत जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रें गुंतलीं होतीं. त्यांत इंग्लंड, फ्रान्स, रशिया व इटली हीं दोस्त राष्ट्रें ( Allies ) म्हणून प्रसिद्ध होतीं. त्या महायुद्धाची माहिती आपण या प्रकरणांत करून घेऊं. १८७० सालीं जर्मनीनें फ्रान्सवर जय मिळविला. तेव्हांपासून या दोन्ही राष्ट्रांत मोठें वैर माजलें. यापुढें जर्मनी अतिशय प्रबळ झाला व युरोपियन राष्ट्रांत दोन मोठे तट झाले. ऑस्ट्रिया व इटली हीं दोन राष्ट्रें मित्रत्वाच्या तहानें जर्मनीस मिळालीं. व मध्ययुरोपांत या तिघांचें एक बलिष्ठ त्रिकूट तयार झालें (१८८२). तेव्हां फ्रान्सला आपण एकटें राहिल्यास जर्मनी आपल्याला गिळून टाकील असें वाटूं लागलें. तेव्हां लवकरच फ्रान्स व रशिया या दोघांनीं ऐक्य केलें ( १८९७ ). पुढें आपल्या आरमारी शक्तीच्या जोरावर जर्मनीची आपलें साम्राज्य व व्यापार वाढविण्याची महत्त्वाकांक्षा पाहून इंग्लंडही जर्मनीबद्दल साशंक झालें. विसाव्या शतकाच्या आरंभीं रुसो–जपानी युद्ध होऊन रशियाला खूप मोठी थप्पड बसली व रशिया हिंदुस्थानवर चालून येणार ही भीति नाहींशी झाली. तेव्हां जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेस तोंड देण्याकरितां फ्रान्स व रशिया यांशीं इंग्लंडनें अनुक्रमें १९०४ व १९०७ या सालीं मित्रत्वाचे तह केले. अशा रीतीनें युरोपांतील राष्ट्रांचीं दोन त्रिकुटें होऊन त्यांच्यांत केव्हां हातघाईचा प्रसंग येईल याचा नियम राहिला नाहीं. १८९९-त युरोपियन राष्ट्रांनीं परस्पर भांडण निघाल्यास तें सामोपचारानें मिटविण्याकरितां हेग येथें एक शांततापरिषद उभारिली होती. परंतु हा शांतता राखण्याचा व युद्ध न करितां भांडणाचा निकाल लावून घेण्याचा उपाय महत्त्वाच्या प्रसंगीं निरुपयोगी होता असेंच शेवटीं ठरलें. इंग्लंड व जर्मनी हीं दोन्ही राष्ट्रें बलाढ्य होतीं, व त्यांची आपली आरमारी शक्ति वाढविण्याची खटपट चालली होती. अर्थात या

दोघांत भांडणाचा मुद्दा निघाल्यास त्याचा शांततेनें निकाल लागणें असंभवनीय होतें व युरोपच्या शांततेचा बिघाड होणें अगदीं स्वाभाविक होतें.

२. **महायुद्धाचें तात्कालिक कारण.** युरोपियन राष्ट्रांस भांडणास तात्कालिक कारण पुरविण्यास युरोपच्या आग्नेय कोपऱ्यांतील बाल्कन संस्थानें ही उत्तम भूमि होती. बल्गेरिया, रुमानिया, सर्व्हिया इत्यादि लहान संस्थानें तुर्कस्थानपासून स्वतंत्र झालीं होतीं व तीं आपला मुलूख वाढविण्यासाठीं तुर्कस्थानशीं व परस्पराशीं खूप भांडत. तेव्हां बाल्कन संस्थानांतील तंटयांचें युरोपच्या स्वास्थ्याचा बिघाड करण्यांत केव्हां तरी पर्यवसान होणार हें निश्चित होतें. असा प्रसंग सन १९१४ सालीं आला. बॉस्नियांतील सेराजेव्हो येथें एका सर्व्हियन तरुण माथेफिरूनें ऑस्ट्रियाच्या युवराजाचा खून केला ( २८ जून १९१४ ). या कृत्यास सर्व्हियन सरकारची फूस आहे असें ऑस्ट्रियास कळलें. त्यामुळें सर्व्हियास कडक शासन करण्याचा ऑस्ट्रियानें निश्चय केला व सर्व्हियास एक खलिता पाठविला. सर्व्हियास तो न पटून सर्व्हिया व ऑस्ट्रिया या दोन देशांत युद्ध सुरू झालें. लागलीच सर्व्हियांतील लोक स्लाव्ह वंशाचे असल्यामुळें ज्ञातिप्रेमामुळें सर्व्हियाचें रक्षण करण्यासाठीं रशिया पुढें सरसावला. रशिया सर्व्हियास मिळाल्याबरोबर जर्मनी ऑस्ट्रियास मिळाला. फ्रान्स रशियास मिळणार हें निश्चित असल्यामुळें फ्रान्सचा तडकाफडकी पराभव करून टाकावा या बुद्धीनें जर्मनीनें फ्रान्सवर स्वारी केली व रशियास थोपवून धरण्याचीही व्यवस्था चालविली. बेल्जियम हें राष्ट्र तटस्थ राखावयाचें असा सर्व राष्ट्रांचा तह झाला असल्यामुळें जर्मनीनें फ्रान्सवर स्वारी करतांना बेल्जियममधून सैन्य नेणें अन्तर्राष्ट्रीय तहास धरून नव्हतें. तथापि फ्रान्सला झटपट चीत करण्यास दुसरा मार्ग नाहीं या सबबीवर जर्मनीनें

[illegible]




युरोपचा नकाशा.

BHARAT P.W. POONA

आपलें सैन्य बेल्जियममध्यें घुसविलें. त्याबरोबर बेल्जियमचे हक्क राखण्याकरितां आणि फ्रान्स व रशिया यांस मदत करण्याकरितां इंग्लंडही युद्धांत पडलें ( ४ ऑगस्ट १९१४ ).

३. **महायुद्धास सुरुवात.** फ्रान्सला प्रथम झटकन चीत करून मग रशियाचा चांगला समाचार घ्यावयाचा असा जर्मन बादशहा कैसर वुइल्यम याचा डाव होता. म्हणून त्यानें बेल्जियमवर प्रचंड सैन्य पाठविलें. पंधरा दिवसांच्या आंत बेल्जियम पादाक्रान्त करून जर्मन सैन्य फ्रान्सांत घुसलें. इंग्लंडनें लढाई पुकारल्याबरोबर आपलें सैन्य फ्रेंचांच्या मदतीस पाठविलें होतें. परंतु फ्रेंच व ब्रिटिश यांस प्रचंड जर्मन सैन्यास तोंड देणें अशक्य झालें. जर्मनांनीं मॉन्स येथें फ्रेंच व ब्रिटिश यांची फळी फोडून फ्रान्सांत प्रवेश केला व लवकरच जर्मन सैन्य पॅरिसपासून पन्नास मैलांवर येऊन दाखल झालें. फ्रान्सच्या जिवावरचा तो प्रसंग होता. परंतु इतक्यांत फ्रेंच सैन्य व ब्रिटिश सैन्य यांच्यांत बरीच भर पडली होती, त्यांनीं एक होऊन मार्ने नदीवर जर्मनांशीं लढाई दिली ( ६ ते १० सप्टेंबर ). तींत जर्मनांचें मोठें नुकसान होऊन त्यांना मागें हटावें लागलें. या लढाईंत अनेक हिंदी वीरांनीं पराक्रम गाजविला व इंग्लंडला ऐन वेळीं उत्कृष्ट साहाय्य केलें. यानंतर ब्रिटिश व फ्रेंच हेही पुढें सरकले. पुढें उत्तर समुद्रापासून तों स्वित्झर्लंडच्या सरहद्दीपर्यंत खंदक खणून दोन्ही सैन्यें एकमेकांसमोर तळ देऊन बसलीं. चार वर्षेंपर्यंत ही स्थिति कायम होती. दोन्ही बाजूंचें लाखों सैन्य आपल्या शत्रूचा तळ उठवून लावून त्यास चीत करण्याचा यत्न करीत होतें. हजारों शिपायी मृत्युमुखीं पडले पण निर्णायक जय कोणाचाच झाला नाहीं व दोघेही एकमेकांसमोर डांबून पडले.

४. **रशियाचा मोड.** रशियानें प्रथम मोठी धडाडी दाखविली.

परंतु जर्मन सरहद्दीवर रशियन सैन्य थोपवून धरण्यांत आलें. तथापि दुसरें रशियन सैन्य ऑस्ट्रियांत घुसलें व त्यानें ऑस्ट्रियांतील सबंध ग्यालिशिया प्रांत व्यापला. इतक्यांत जर्मन सैन्य ऑस्ट्रियाच्या मदतीस आलें. मग त्यांनीं दोघांनीं मिळून रशियन सैन्यास परत धुडकावून दिलें. १९१५ सालीं ऑस्ट्रो–जर्मन सैन्यानें पोलंड काबीज करून रशियांत प्रवेश करून घेतला व रशियन सैन्याचा चोहों बाजूंस पराभव केला. लवकरच रशियांत गोंधळ उडून गेला. शेवटीं झारला ( रशियाचा बादशहा ) रशियन लोकांनीं पदच्युत केलें व रशियांत लोकसत्ताक राज्य स्थापिलें (१९१७). नंतर क्रान्तिकारक कामकरीवर्गाच्या (Bolshevik, बोल्शेव्हिक) हातीं सत्ता गेली. या वेळीं रशियांत नवीन व्यवस्था नीट करण्याकडे रशियन लोकांचें लक्ष लागलें व युद्ध चालविणें त्यांना अशक्य झालें. शेवटीं नव्या रशियन सरकारनें जर्मनीशीं ब्रेस्ट–लिटॉव्ह्स्क येथें तह केला व आपलें अंग युद्धांतून काढून घेतलें ( ३ मार्च १९१८ ). इटली, रुमानिया व ग्रीस यांनीं दोस्तांतर्फें युद्ध पुकारिलें होतें. रशिया चीत झाल्यामुळें दोस्तांचें मोठें नुकसान झालें. लागलीच जर्मन सेनापति मॅकेन्सन यानें आपला मोर्चा रुमानियाकडे वळविला व १९१७-च्या आरंभींच त्याला शरण यावयास लाविलें. अशा रीतीनें १९१७त दोस्तांवर चोहों बाजूंनीं संकटें कोसळलीं. इकडे बल्गेरियानें जर्मनीच्या बाजूनें लढाई सुरू केली होती, त्यानें जर्मनीच्या मदतीनें लवकरच सर्व सर्व्हिया प्रांत जिंकून टाकिला ( १९१५ डिसेंबर ).

५. **तुर्कस्थानशीं युद्धप्रसंग.** विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून जर्मनीनें पूर्वेकडे आपलें साम्राज्य वाढविण्यासाठीं तुर्कस्थानचा पाठपुरावा करण्याचें धोरण स्वीकारिलें होतें. तुर्कस्थानच्या सैन्यास जर्मन अधिकारी शिक्षण देत होते, जर्मन भांडवल तुर्कस्थानांत खेळूं लागलें होतें, व बर्लिन ते बगदाद रेल्वे बांधून पूर्वे-

कडील दळणवळणाचें साधन आपल्या हातीं आणण्याचा जर्मनीचा विचार होता. महायुद्ध सुरू झाल्यावर लवकरच तुर्कस्थाननें जर्मनीच्या वतीनें युद्ध पुकारिलें. तुर्कस्थानच्या शत्रुत्वामुळें ईजिप्त व हिंदुस्थान येथील ब्रिटिश सत्तेवर संकट येण्याचा संभव होता, व म्हणून इंग्रजांना तुर्कस्थानचा पराभव करणें अत्यंत जरूर होतें. प्रथम डार्डानेल्झ सामुद्रधुनी बळकावून खुद्द कॉन्स्टॅन्टिनोपलवर चालून जाण्याचा इंग्रजांनीं प्रयत्न केला. परंतु त्यांत यश आलें नाहीं. तसेंच इंग्रजांनीं हिंदी लष्कर इराणी आखातांत उतरवून मेसापोटेमियांतून तुर्कस्थानास शह देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश सैन्य कसेंबसें कुत्-एल–आमारा येथवर गेलें; पण तेथें तुर्कांनीं सर्व सैन्यासह ब्रिटिश सेनापति टाउन्शेंड यास कैद केलें ( १९१६ फेब्रुवारी ). अशा रीतीनें दोन्ही ठिकाणीं तुर्कांचा पराभव करण्याचा बेत फसला. परंतु इंग्रज डगमगले नाहींत. जनरल मॉड याच्या हाताखालीं नवें सैन्य मेसापोटेमियावर चालून गेलें व त्यानें शेवटीं बगदाद घेतलें. त्याचप्रमाणें ईजिप्तमधून जनरल ॲलेन्बी हा पॅलेस्टाइन प्रांतावर चालून गेला व त्यानें त्या प्रांतीं जरुसलेम आदिकरून ठिकाणें घेतलीं व तुर्कांवर अनेक जय मिळविले. तेव्हां पूर्वेकडील लढाईचा रंग पालटला.

६. **समुद्रावरील कटकटी, अमेरिका युद्धांत पडली.** इंग्लंड व जर्मनी या दोघांचेंही आरमार प्रबल असल्यामुळें दोघांमध्यें समुद्रावर लढाई होणें अपरिहार्य होतें. परंतु कील काल्व्यामध्यें जर्मन आरमारानें आपल्याला कोंडून घेतल्यामुळें फारसे युद्धप्रसंग झाले नाहींत. एकदां १९१६त जटलंडजवळ दोन्ही आरमारांचें मोठें युद्ध झालें. त्यांत उघड जलयुद्धांत आपलें इंग्रजांपुढें कांहीं चालणार नाहीं असें जर्मनीस कळून चुकलें, व त्यानें आपलें आरमार जें पुनः कीलमध्यें नेलें तें सबंध युद्धभर केव्हांही बाहेर काढिलें नाहीं. परंतु उघड नाहीं तर गुप्त रीतीनें समुद्रावर इंग्रजांस त्रास देण्याची जर्मनीनें

शिकस्त केली. त्यानें पाणबुड्या बोटी पाठवून इंग्रजांचीं किंवा इंग्लंडशीं व्यापार करणाऱ्या कोणत्याही राष्ट्राचीं जहाजें सरसहा नष्ट करण्याचें धोरण अंगीकारिलें; त्याचप्रमाणें इंग्लंडच्या किनाऱ्यावर विमानें पाठवून त्यांतून इंग्लिश शहरांवर बाँबगोळे टाकिले. या रीतीनें आपण इंग्लंडला उपाशी मारूं व घाबरवून सोडूं अशी जर्मनीची अटकळ होती. परंतु जर्मन पाणबुड्या बोटींच्या घातुक कृत्यांनीं एक नवीनच भानगड उत्पन्न झाली व त्यांतच जर्मनीच्या पराभवाचीं बीजें पेरलीं गेलीं. जर्मनीच्या जहाजें बुडविण्याच्या उद्योगामुळें अमेरिकन संयुक्त संस्थानांचे कित्येक नागरिक मारिले गेले. तेव्हां अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सन यानें तटस्थ राष्ट्रांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठीं जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारिलें (१९१७ मे). हा दोस्तांस मोठाच फायदा झाला. आतां दोन्ही बाजू युद्धास कंटाळून गेल्या होत्या, व रशिया अगदीं निःशक्त बनला होता; अशा वेळीं दोस्तांच्या बाजूस ताज्यातवान्या अमेरिकेची जोड झाली.

७. **लॉइड जॉर्जची कामगिरी, दोस्तांचा जय.** महायुद्ध सुरू झालें तेव्हां इंग्लंडमध्यें लिबरल पक्ष अधिकारारूढ असून आस्क्किथ हा मुख्य प्रधान होता. पुढें लवकरच लढाईच्या वेळीं सर्व पक्षांचें एकमत असावें म्हणून कॉन्सर्व्हेटिव्ह लोकही प्रधानमंडळांत घेण्यांत आले, व दोन्ही पक्षांचें मिळून संयुक्त प्रधानमंडळ इंग्लंडचा कारभार पाहूं लागलें (१९१५). लष्करास लागणारा दारूगोळा व इतर युद्धसामग्री झटपट तयार व्हावी म्हणून युद्धसामग्री—मंडळ (Board of Munitions, बोर्ड ऑफ म्युनिशन्स) नेमण्यांत आलें व लॉइड जॉर्ज या कर्तबगार व उत्साही पुरुषाची त्याच्या अध्यक्षपदावर योजना झाली. तसेंच युद्धभूमीवर लढाऊ लोकांचा तोटा पडूं नये म्हणून सर्व वयांत आलेल्या लोकांस लष्करी नोकरी सक्तीनें करण्यास भाग पाडणारा कायदा पार्लमेंटनें पास केला (१९१६

फेब्रुवारी ). १९१६त कुत्-एल-आमारा येथें ब्रिटिश सैन्य तुर्कांनीं कैद केलें, लॉर्ड किचनेर रशियास जात असतां वाटेंत मृत्यु पावला, व रशियांत गोंधळ माजला. तेव्हां दोस्तांवर मोठा कठिण प्रसंग गुदरला होता. अशा आणीबाणीच्या वेळीं राष्ट्रास जोरानें झटण्यास लावण्यासाठीं अवश्य असणारी तडफ व धडाडी आस्क्विथच्या अंगीं नाहीं असें आढळून आलें. तेव्हां प्रधानमंडळांत बदल होऊन युद्ध-सामग्री-मंडळांत उत्कृष्ट कामगिरी करून दाखविलेला लॉइड जॉर्ज हा मुख्य प्रधान झाला ( १९१६ डिसेंबर ). नंतर लॉइड जॉर्जनें राष्ट्रांत जागृति केली व जय मिळविण्याचे जोरानें प्रयत्न चालविले. जर्मनी पाणबुड्या बोटींनीं इंग्लंडचीं जहाजें बुडवीत होता तर लॉइड जॉर्ज नवीन जहाजें तयार करून व्यापार पूर्वींप्रमाणें चालेल अशी व्यवस्था करीत होता. पुढें उत्तर समुद्रांत सुरुंग पेरून जर्मन पाणबुड्यांचें घातुक काम करणें इंग्लंडनें बंद पाडिलें. इतक्या अवकाशांत ताज्या दमाचें अमेरिकन सैन्य फ्रान्सांत उतरूं लागलें ( १९१८ ). लवकरच अमेरिकन सैन्याची संख्या वीस लाख झाली. हें सर्व सैन्य ब्रिटिश जहाजांनीं अमेरिकेंतून फ्रान्सांत आणून उतरविलें, व हें कृत्य इंग्लंडला आपल्या समुद्रावरील वर्चस्वामुळें अगदीं सुलभ-पडलें. या वेळीं लढाईंतील श्रमांनीं युरोपियन राष्ट्रें अगदीं टेंकीस आलीं होतीं; तेव्हां अमेरिकन मदत दोस्तांस मिळूं लागतांच जर्मनीनें आपलें आतां कांहीं चालावयाचें नाहीं असें ओळखिलें. लागलीच कैसर वुइल्यम आपली बादशाही गादी सोडून हॉलंडांत निघून गेला आणि जर्मनींत लोकसत्ताक राज्य स्थापण्यांत येऊन हें नवें सरकार दोस्तांस शरण गेलें ( ११ नोव्हेंबर १९१८ ). अगोदरच तुर्कस्थान, बल्गेरिया व ऑस्ट्रिया हे जर्मनीचे सहकारी दोस्तांस शरण गेले होते. तेव्हां जर्मनी शरण येण्याबरोबर महायुद्ध पूर्णपणें थांबलें.

८. **महायुद्धाची समाप्ति.** पुढें सर्व मुख्य राष्ट्रांचे प्रतिनिधि पॅरिस येथें जमले व पांच सहा महिने तहाची चर्चा चालली. जमलेल्या मंडळींत अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सन, इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज, व फ्रान्सचा मुख्य प्रधान क्लेमेन्सो हे प्रमुख होते. शेवटीं १९१९च्या जूनमध्यें व्हर्सेल्झमधील आरसे-महालांत तह कायम झाला. तहामध्यें जर्मनीची सत्ता अगदीं खिळखिळी करून टाकणारीं कांहीं कलमें होतीं व इतर कलमांत जगाच्या शांततेंत यापुढें बिघाड होऊं नये म्हणून व्यवस्था केली होती. आल्सेस व लोरेन हे १८७०त फ्रान्सकडून घेतलेले प्रांत त्याला परत द्यावे; सैन्य व आरमार देशांत शांतता ठेवण्यास लागतील त्याहून अधिक ठेवूं नयेत; द्रव्य, कोळसा, व जहाजें इत्यादि सामग्री दोस्तांस देऊन लढाईच्या वेळीं त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करावी, अशीं कलमें जर्मनीस कबूल करावीं लागलीं. किती भरपाई देण्यास जर्मनी समर्थ आहे हें ठरविण्यास एक भरपाई–कमिशन ( Reparation Commission ) नेमण्यांत आलें. यापुढें राष्ट्रांराष्ट्रांत तंटा उत्पन्न झाल्यास त्याचें पर्यवसान लढाईंत होऊं नये यासाठीं "राष्ट्रसंघ" नांवाची संस्था स्थापन झाली, व या राष्ट्रसंघाच्या निर्णयाप्रमाणें सर्व राष्ट्रांनीं चालावें असें ठरलें. तथापि राष्ट्रसंघाची रचना सदोष होती. कारण त्यांत जर्मनी व त्याचे सहकारी यांचा समावेश नव्हता. शिवाय कोण्या एखाद्या राष्ट्रानें त्याचें म्हणणें न ऐकल्यास त्या राष्ट्रास तें म्हणणें ऐकण्यास भाग पाडण्याचें राष्ट्रसंघापाशीं सैन्य अथवा आरमार यांजसारखें कांहीं साधन नव्हतें. आणखी असें कीं, ही कल्पना पुढें मांडणारा वुड्रो विल्सन याचें धोरण अमेरिकेस मुळींच पटलें नाहीं व तिनें या सर्व व्यवस्थेंतून आपलें अंग काढून घेतलें. एकंदरींत महायुद्धांत झालेल्या भयंकर द्रव्यनाशामुळें युरोपांत बेकारी

माजली आहे व तहाच्या वेळच्या असमाधानकारक व्यवस्थेमुळें सर्व देशांत अस्वस्थता पसरली आहे.

---

## ४३. सामाजिक प्रगति.

१. **काळाचा ओघ.** इंग्लंडच्या इतिहासाचे एकंदर तीन ठळक भाग पडतात; पहिला स्वाऱ्यांचा काळ, दुसरा सरदारांच्या प्राबल्याचा काळ, व तिसरा आधुनिक काळ. इ. स. १०६६ पर्यंतच्या काळांत इंग्लिश राष्ट्र ज्या ब्रिटन, सॅक्सन, डेन, व नॉर्मन या चार वंशांतील रक्ताच्या मिश्रणानें बनलें आहे त्या लोकांच्या स्वाऱ्या इंग्लंडवर होऊन त्यांच्या वसाहती इंग्लंडांत झाल्या. इ. स. १०६६त गादीवर आलेला नॉर्मन राजा वुइल्यम हा कर्तबगार निघाला व सबंध इंग्लंड या काळीं एका राजाच्या अंमलाखालीं येऊन त्याचे फिरून निरनिराळे तुकडे पडले नाहींत. हा दुसरा काळ इंग्लंडला फारसा सुखावह गेला असें म्हणवत नाहीं. राजे व सरदार या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं स्कॉटलंड व फ्रान्स हे दोन देश जिंकण्याचें अशक्य ध्येय पुढें ठेवून इंग्लिश राष्ट्राची लष्करी शक्ति व पैसा अतोनात खर्चीं घातला. या वेळीं सामान्य जनसमूह कंगाल व परावलंबी असून अज्ञानांधकारांत खितपत पडला होता. ही स्थिति आधुनिक युगांत पालटली आणि हिंदुस्थान व अमेरिका यांचा संबंध व शास्त्रीय ज्ञान या जोडशक्तीनें इंग्लिश राष्ट्र वैभवास चढलें आहे. या काळांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीची जोरानें अभिवृद्धि झाली व ब्रिटिश साम्राज्य अस्तित्वांत आलें.

२. **धर्मस्थिति.** अँग्लो-सॅक्सन लोकांची इंग्लंडांत वसाहत झाल्यावर इंग्लंडांत ख्रिस्ती धर्म पसरला. आधुनिक युगाच्या आरंभीं

धर्मसुधारणा झाली तेथपर्यंत युरोपांतल्याप्रमाणें इंग्लंडच्या धर्मखात्याचा मुख्य रोम येथील पोप होता. पण धर्मसुधारणेच्या काळीं इंग्लंडनें प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारल्यामुळें इंग्लंडचें धर्मखातें इंग्लंडच्या राजाच्या नेतृत्वाखालीं चालतें. पहिला जेम्स व पहिला चार्लस या स्टुअर्ट राजांशीं पार्लमेंटचा जो झगडा झाला त्या वेळीं पार्लमेंटपक्षांतील लोक प्यूरिटन व इन्डिपेन्डन्ट या पंथांचे असून त्यांचा धर्माभिमान उत्कट स्वरूपांचा होता व त्यांची नीतिमत्ता उच्च दर्जाची होती. पुढें १६६०त पुनरागमन झालें तेथपासून वॉल्पोलचा कारभार संपला ( १७४२ ), तोंपर्यंत इंग्लिश राष्ट्रांत धार्मिक औदासीन्य कळसाला पोंचलें व नीति जाऊन भ्रष्टाकार बळावला. पशुवृत्ति स्वीकारून व धर्महीन बनून स्वार्थसाधुपणाचा लोक टेंभा मिरवूं लागले. दारूबाजीस तर सुमारच राहिला नाहीं. अशा काळीं जॉन वेस्ली व त्याचा भाऊ चार्लस वेस्ली यांनीं देशांत धर्मजागृति करण्याचा उद्योग मोठ्या उत्साहानें आरंभिला. जॉन वेस्ली ऑक्सफर्डमध्यें शिकविण्याचें काम करीत असे, त्या वेळेपासून ईश्वराच्या प्रार्थनेसंबंधीं सभा भरविण्याचा त्याचा परिपाठ होता. या सभा इतक्या नियमित होत व वेस्लीचें एकंदर वर्तन इतकें पद्धतशीर असे कीं, आपली इच्छा नसतांही त्याला जो प्रस्थापित पंथाहून निराळा पंथ काढावा लागला त्याला पद्धतशीर पंथ (Methodist, मेथॉडिस्ट ) हें नांव प्राप्त झालें. जेथें हजारों लोक उद्योगधंद्यांत गुंतले असतील तेथें जावयाचें व टोलेजंग सभा भरवून धर्मजागृति करावयाची हा क्रम वेस्लीबंधूंनीं चालविला. लवकरच त्यांना व्हिटफील्ड हा उत्कृष्ट वक्ता येऊन मिळाला. या नवीन पंथानें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडांत मोठी धार्मिक व नैतिक जागृति घडवून आणिली. एकोणिसाव्या शतकांत धर्मजागृतीचें काम ऑक्सफर्ड चळवळीनें केलें. १८३४त न्यूमन, केबल इत्यादि लोकांनीं

ही चळवळ आरंभिली, आणि त्यांच्या उद्योगाचा, उत्साहाचा, व एकीनें काम करण्याच्या पद्धतीचा धर्मगुरूंवर व सामान्य जनतेवर परिणाम होऊन धर्मप्रवृत्तीला बरीच चेतना मिळाली. हल्लीं इंग्लंडचा मुख्य धर्म प्रॉटेस्टंट असून सरकारी धर्मखात्याशीं संबंध न ठेवणारे मेथॉडिस्टांसारखे अनेक उपपंथ इंग्लंडांत आहेत. १६८८च्या क्रान्तीच्या वेळीं धार्मिक सवलतीचें धोरण जाहीर झालें व १८२९त क्याथॉलिकांविरुद्ध असलेले कायदे रद्द झाले; तेव्हांपासून धर्मस्वातंत्र्य इंग्लंडांत पूर्णपणें अंमलांत आलें.

३. **शिक्षण.** मध्ययुगांत शिक्षणाचा फारसा प्रसार नव्हता. एक तर छापण्याची कला माहीत नव्हती व पुस्तकें हातानें लिहून घेणें भाग पडे. शिवाय ज्ञानाचा विषय म्हटला म्हणजे बायबल ग्रंथ, व तो ग्रीक व लॅटिन या भाषांत लिहिलेला होता. धर्मगुरु या भाषांत निष्णात असत व विद्वत्ता अशी त्यांच्याच ठिकाणीं असे. सरदार व सुखवस्तु लोक विद्येची फारशी फिकीर करीत नसत. आधुनिक युगाच्या आरंभीं लॅटिन व ग्रीक भाषा शिकण्याची लाट सर्व युरोपखंडभर पसरली होती; तिचा इंग्लंडांतही फैलाव झाला. सोळाव्या शतकाच्या आरंभीं जॉन कॉलेट नांवाच्या धर्मगुरूनें शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला. स्वतःला बायबलचा खरा अर्थ कळावा या हेतूनें तो ग्रीक भाषा शिकला व आपल्याला झालेलें ज्ञान आपल्या देशबांधवांना करून देण्याच्या खटपटीस लागला.त्यानें इ स.१५०८त 'सेंट पॉल्स स्कूल' नांवाची शाळा लंडनमध्यें काढिली. हींत कोणत्याही वर्गाचीं व देशाचीं मुलें घेतलीं जातील असें त्यानें जाहीर केलें. पुढें आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात आणि सहावा एडवर्ड व एलिझबेथ यांच्या कारकीर्दींत इंग्लंडांत निरनिराळ्या गांवीं शाळा उघडण्यांत आल्या. त्याचप्रमाणें ऑक्सफर्ड व केंब्रिज या दोन शहरीं पुष्कळ नवीन कॉलेजें निघालीं. अलीकडे तर प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत

करण्यांत आलें असून उच्च शिक्षणांत शब्दपांडित्याबरोबर उद्योग-धंद्यांच्या अभिवृद्धीस अत्यंत अवश्यक म्हणून भौतिक शास्त्रांचें शिक्षण मोठ्या उत्साहानें देण्यांत येत आहे. एकंदर शिक्षणाची व्यवस्था शिक्षणमंडळाकडे ( Board of Education ) असून शिक्षणाचें धोरण, प्रसार, व खर्च यांची व्यवस्था हें मंडळ पाहतें. या मंडळाचा अध्यक्ष प्रधान—मंडळातील शिक्षणमंत्री होय.

४. **वाङ्मय.** इंग्लिश वाङ्मयांत अगदीं आरंभींच्या पुस्तकांपैकीं अगदीं महत्त्वाचें पुस्तक म्हणजे 'अँग्लो-सॅक्सन क्रॉनिकल' हें होय. यांत खिस्ती शकाच्या आरंभापासून इ. स. ११५४पर्यंतचा इंग्लंडचा इतिहास वर्णिला आहे. या पुस्तकाची रचना क्यांटर्बरी येथें व इतर ठिकाणीं राहणाऱ्या मठवाशांनीं केली. इंग्लिश भाषेंतील मोठा आद्य ग्रंथकार चौदाव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला. त्याचें नांव चॉसर हें असून त्यानें लंडनमधून क्यांटर्बरीमधील बेकेटच्या समाधीचें दर्शन घेण्यास जाणाऱ्या यात्रेकरूंचें संभाषण कल्पून 'क्यांटर्बरी टेल्स' नांवाचा आपला काव्यग्रंथ निर्माण केला ( सुमारें १३९० ). एलिझबेथच्या काळांत शेक्सपियर ( १५६४–१६१६ ) हा प्रसिद्ध नाटककार होऊन गेला. याच काळांत शब्दपांडित्य सोडून भौतिक शास्त्रांचा अभ्यास करण्याची स्फूर्ति उत्पन्न करणारा 'नोव्हम ऑर्ग्यानम्' हा ग्रंथ बेकननें लिहिला. तदनंतर राजा व पार्लमेंट यांचा झगडा चालला असतांना 'पॅरॅडाइझ लॉस्ट' हें इंग्लिश भाषेंतील महाकाव्य लिहिणारा मिल्टन होऊन गेला. ॲन राणीच्या वेळीं बरेच ग्रंथकार उदय पावले. ड्रायडन व पोप हे कवि या वेळीं गाजत असून ॲडिसन व स्विफ्ट हे गद्य लेखकही याच काळचे होत. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत डॉक्टर जॉन्सन हा बडा ग्रंथकार प्रसिद्धीस आला. हा वेळपर्यंत एखाद्या श्रीमंत मनुष्याच्या आश्रयानें ग्रंथकाराची उपजीविका चालत असे. पण डॉक्टर जॉन्सनच्या वेळे-

पासून ही स्थिति पालटली. केवळ लोकाश्रयावर अवलंबून ग्रंथरचना करणें आतां शक्य झालें. 'रोमन साम्राज्याची अवनति व नाश' हा प्रसिद्ध इतिहास–ग्रंथ लिहिणारा गिबन याच काळांत झाला. एकोणिसाव्या शतकांत तर काय ग्रंथकारांची फारच गर्दी दिसून येते. स्कॉट, थॅकरे व डिकन्स हे कादंबरीकार, मेकॉले व कार्लाइल हे इतिहासकार, रस्किन हा नीतिशिक्षक, आणि वर्डस्वर्थ व टेनिसन हे कवि या काळांतील प्रमुख ग्रंथकार होत. हल्लींच्या काळीं सामान्य जनांतही ज्ञानप्रसार झाल्यानें ज्या त्या विषयाचें शास्त्र बनत आहे व निरनिराळ्या विषयांवर मुद्देसूद व तेजस्वी ग्रंथ निर्माण होत आहेत. दैनिक वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व त्रैमासिक पुस्तकें अनेक निघत असून लोकांना ज्ञान देण्याचा उद्योग जोरानें चालवीत आहेत.

५. **व्यापार व उद्योगधंदे**. इंग्लंडांत अँग्लो–सॅक्सन लोकांच्या वसाहती झाल्या त्या वेळीं शेती हा जनतेचा मुख्य धंदा होता. नॉर्मन राजे राज्य करूं लागल्यावर शेतकीची स्थिति फारशी सुधारली नाहीं, पण व्यापाराची वाढ पुष्कळ झाली. मध्ययुगांत इंग्लंड व फ्लँडर्स या दोन देशांमध्यें लोंकरीचा पुष्कळ व्यापार सुरू होता. लोंकर इंग्लंडमधून फ्लँडर्समध्यें जावयाची व तेथें तिचे कपडे बनावयाचे अशी स्थिति होती. एलिझबेथच्या कारकीर्दींत लोंकरीच्या व्यापारास निराळेंच वळण लागलें. नेदर्लँड्स (बेल्जियम) हा देश स्पेनच्या अंमलाखालीं होता. स्पेनचा राजा दुसरा फिलिप क्याथॉलिक असल्यामुळें तो प्रॉटेस्टंटांवर जुलूम करी. त्याच्या जुलुमास कंटाळून हजारों विणकरी इंग्लंडांत वसाहत करण्यास आले. एलिझबेथनें त्यांना इंग्लंडांत राहण्याची परवानगी दिली आणि सँडविच, नॉर्विच इत्यादि पूर्वेकडील शहरांतून त्यांची वस्ती करविली. इ. स. १६००-त हिंदुस्थानशीं व्यापार करण्यास ईस्ट इंडिया कंपनी स्थापिली गेली.

पुढें अमेरिकेंत इंग्लिश वसाहती झाल्या. अमेरिकेंत वसाहती करण्याचें धोरण प्रथम सर वॉल्टर रॅले यानें सुचविलें. सतराव्या शतकांत आफ्रिका, अमेरिका व हिंदुस्थान या देशांशीं व्यापार सुरू झाला. सतराव्या शतकांत रेशमाचा धंदाही इंग्लंडांत रुजला. १६६१त रेशीम तयार करणाऱ्यांची एक कंपनी निघाली. पुढें दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दींत फ्रेंच राजा चौदावा लुई यानें आपल्या राज्यांतील प्रॉटेस्टंटांस दिलेल्या सवलती काढून घेतल्या. त्यावरून हजारों प्रॉटेस्टंटांनीं फ्रान्स देशाचा त्याग केला. त्यांतील बरेच लोक इंग्लंडांत येऊन राहिले. ते रेशमाच्या धंद्यांत वाकबगार असल्यामुळें या धंद्याचा चांगलाच उत्कर्ष झाला. पुढें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील औद्योगिक क्रान्तीनंतर उद्योगधंद्यांची अतिशय प्रगति झाली. वाफेवर चालणारे माग निघून लँक्याशायरमधील कापसापासून सूत काढण्याचे व कापड बनविण्याचे टोलेजंग कारखाने उभारले गेले. नव्या यांत्रिक युगांत नाना प्रकारचीं लोखंडाचीं यंत्रें लागत असल्यामुळें तीं बनविण्यासाठीं बर्मिंगहॅम, शेफील्ड इत्यादि ठिकाणीं लोखंडी सामानाचे जंगी खाने निघाले. तसेंच आगगाडी, आगबोट, व तारायंत्र यांच्या शोधांमुळें राष्ट्रांराष्ट्रांमधील दळणवळण अत्यंत सुलभ झालें व इंग्लंडचा इतर देशांशीं व्यापार अतोनात वाढला. शिवाय समुद्रावरील स्वामित्व इंग्लंडकडे असल्यामुळें व्यापाराच्या बाबतींत इंग्लंडची बरोबरी करणें दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास शक्य राहिलें नाहीं.

६. **लोकसंख्या.** नॉर्मन वुइल्यमनें डूम्सडे बुक म्हणून एक राष्ट्रांतील माहितीचें रजिस्टर केलें होतें. त्यावरून त्या काळीं (१०८६) एकंदर इंग्लंडची लोकसंख्या जास्तींत जास्ती म्हणजे वीस लाख असावी असें अनुमान निघतें. तीच लोकसंख्या उद्योगाच्या प्रगतीमुळें इ. स. १७००त ५५ लाख असावी असा अंदाज आहे. पुढें १८०१ सालीं म्हणजे शंभर वर्षांनीं इंग्लंड व वेल्स यांची लोक-

संख्या ८८ लाख झाली. एकोणिसाव्या शतकांत उद्योगधंद्यांची वाढ इतक्या झपाट्यानें झाली कीं, १८७१ सालीं म्हणजे अवघ्या पाऊण शतकांत ८८ लाखांवरून लोकसंख्येचा आंकडा सव्वादोन कोटींवर आला. १९२१त इंग्लंड व वेल्स यांची लोकसंख्या ३ कोटि ७८ लक्ष भरली.

७. **दळणवळणाचीं साधनें.** ट्यूडर राजांच्या वेळीं एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जाण्याचे रस्ते अगदीं गचाळ असत. त्यामुळें घोड्यांच्या गाड्या प्रवासास वापरणें शक्य नव्हतें व प्रवास घोड्यावर स्वार होऊन करावा लागे. मालाची नेआण करावयाची तीसुद्धां घोड्याच्या पाठीवर गोण्या लादून करण्यांत येई. स्टुअर्टांच्या काळींही इंग्लंडमधील रस्ते नीट नसत व माल अजूनही घोड्यांवर गोण्या लादून नेण्यांत येई; किंवा एखाद्या वेळीं अवजड खटाऱ्यांतून नेत. उतारूंस नेण्यास गाड्या वापरण्यांत येऊं लागल्या होत्या. परंतु भाडें फार जबर असून आज पाऊण तासांत जो प्रवास करतां येतो तेवढा करण्यास त्यांस एक सबंध दिवस लागे. एकोणिसाव्या शतकांत आगगाड्या व आगबोटी निघाल्यामुळें जमिनीवरून व समुद्रावरून प्रवास सुखानें व जलद करतां येऊं लागला. तसेंच तारायंत्र व बिनतारी संदेश यांच्या शोधामुळें बातम्या फारच जलद पाठविण्याची सोय झाली. लवकरच प्रवासासाठीं विमानांचा उपयोग होऊं लागेल असें वाटतें.

८. **करमणुकीचीं साधनें व सुखसोयी.** मध्ययुगांत व ट्यूडर राजांच्या वेळीं लोकांचीं करमणुकीचीं साधनें म्हटलीं म्हणजे शिकार, तिरंदाजी, कोंबड्यांची झुंज, बैल अगर अस्वल यांजवर कुत्रे सोडून त्यांचें युद्ध किंवा लोकांनीं सोंगें घेऊन नाचणें हीं होतीं. सतराव्या शतकांच्या मध्यापर्यंत एल व ब्रिअर या दोन प्रकारची दारू सर्व जनतेचें पेय होती. परंतु त्या सुमारास कॉफी—हाउसेस स्थापण्यांत

येऊन बातम्या ऐकण्यास अथवा गमतींत काळ घालविण्यास कॉफी-हाउसेसमध्यें जाण्याचा प्रचार पडला. अलीकडे शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें लोकांच्या सुखसोयी वाढविण्याचे चहूं बाजूंनीं प्रयत्न होत आहेत. नाटकें, सिनेमा इत्यादि करमणुकीचीं साधनें सिद्ध आहेत. तथापि मागील काळांत श्रीमंत जमीनदार व कंगाल शेतकरी अशी ज्याप्रमाणें दुफळी होती त्याचप्रमाणें श्रीमंत कारखानदार व जमीनदार एका बाजूला व गरीब कामकरीवर्ग दुसऱ्या बाजूला असे समाजाचे दोन तुकडे पडले आहेत. गेल्या शंभर वर्षांत कामकरीवर्गाची स्थिति सुधारण्यासाठीं मजूरसंघ स्थापिले गेले व पार्लमेंटनें पुष्कळ कायदे केले. परंतु मजूरवर्गाची स्थिति अजून समाधानकारक नाहीं. १८९३त इंग्लंडांत मजूर–पक्ष ( Labour Party, लेबर पार्टी ) स्थापिला गेला व पुढें त्याचे प्रतिनिधि पार्लमेंटांत शिरले. अलीकडे तो पक्ष अधिक प्रबल झाला आहे, व अधिकारारूढ होऊन सनदशीर मार्गांनीं मजुरांची स्थिति सुधारण्याची त्याची खटपट आहे.

---

## ४४. इंग्लंडची राज्यव्यवस्था.

१ **सरकारचीं तीन कामें.** देशाची सुस्थिति राखण्यासाठीं कायदे करणें, प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचा अर्थ करून उपयोग करणें व त्यांचा अंमल करणें हीं तीन कामें कोणत्याही सरकारास करावीं लागतात. इंग्लंडांत कायदे करण्याचें काम पार्लमेंटकडे असून त्यांचा अर्थ करण्यास न्यायमंदिरें आहेत व त्यांचा अंमल प्रधानमंडळाच्या हुकमतीनें होतो. हीं कामें इंग्लंडांत कशीं होतात, याचा खुलासा या प्रकरणांत करावयाचा.

२. **लॉर्डांची सभा.** इंग्लंडांत कायदे करण्याचें काम पार्लमेंट-सभेकडे आहे. या सभेचे दोन भाग आहेत; (१) लॉर्डांची सभा व (२) कॉमन्सची सभा. लॉर्डांच्या सभेंत एकंदर सुमारें सातशें सभासद आहेत. इंग्लंडमधील सर्व उमराव या सभेंत बसतात. परंतु इंग्लंडप्रमाणें स्कॉटलंडांतील सर्व उमरावांस या सभेंत बसण्याचा अधिकार नाहीं. पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं स्कॉटलंडमधील उमराव आपल्यापैकीं सोळा जणांस प्रतिनिधि म्हणून निवडून देतात. या सभेंत पिढीजाद श्रीमंत आहेतच; पण त्यांच्याबरोबर नांवलौकिक मिळवून आपल्या कर्तबगारीवर श्रीमंत झालेल्या लोकांसही राजाकडून उमराव करण्यांत येतें व ते लॉर्डांच्या सभेचे सभासद होतात. उमरावांचे एकंदर पांच दर्जे आहेत. डयूक हे सर्वांत श्रेष्ठ असून त्यांच्याखालीं मार्किस, अर्ल, व्हायकाउंट व बॅरन असा अनुक्रम आहे. लॉर्ड चॅन्सेलर हा लॉर्डांच्या सभेचा अध्यक्ष असून प्रधानमंडळांतील एक प्रधान म्हणूनही त्याची गणना होते. या सभेचे कायदे करण्याचे हक्क बरेच मर्यादित केले आहेत.लॉर्डांना पैशासंबंधीं बिल(Money Bill)नामंजूर करण्याचा किंवा त्यांत बदल करण्याचा अधिकार नाहीं. १९११ सालीं पार्लमेंट ॲक्ट पास झाला. त्याअन्वयें तिन्ही मिळून दोन वर्षांपेक्षां अधिक काळ व्यापणाऱ्या लागोपाठच्या तीन बैठकींत जर कॉमन्ससभेनें एखादें बिल पास केलें,तर लॉर्डांनीं त्याला संमति न दिली तरी त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. यावरून जिव्हाळ्याच्या प्रश्नावर वाद निघाल्यास कॉमन्सचें म्हणणें मान्य करणें लॉर्डांना कसें भाग झालें आहे हें दिसून येतें. तथापि कॉमन्सची गति फाजील होऊं नये म्हणून लॉर्डांची सभा ब्रेकप्रमाणें वेळोवेळीं उपयोगीं पडेल यांत शंका नाहीं. तेव्हां कायदे करण्याच्या कामीं कॉमन्स व राजा यांशीं सहकार करावयाचा व सार्वजनिक प्रश्नाचा खल करावयाचा हीं लॉर्ड्ससभेचीं दोन कार्यें आहेत. शिवाय लॉर्ड्स-

सभा ही सर्व कोर्टांमधील वरिष्ठ कोर्ट असून इंग्लंडमधील खालच्या कोर्टांच्या निकालावर लॉर्डांकडे दाद मागतां येते.

३. **कॉमन्ससभा.** कॉमन्ससभेंत एकंदर ६१५ सभासद आहेत. हे सभासद ग्रेटब्रिटनमधील परगणें, शहरें व ऑक्सफर्ड, केंब्रिज इत्यादि विश्वविद्यालयें यांतून निवडून आलेले प्रतिनिधि होत. कॉमन्ससभेच्या अध्यक्षस्थानीं स्पीकर असून निरानिराळ्या पक्षांच्या संगनमतानें एखाद्या विश्वासार्ह व वजनदार माणसाची या जागीं नेमणूक करण्यांत येते, व निरनिराळे पक्ष अधिकारारूढ झाले तरी त्याच त्या माणसची स्पीकरच्या जागीं नेमणूक होते. कॉमन्स-सभेनें रकमा मंजूर केल्याशिवाय सरकारास खर्च करतां यावयाच्या नाहींत अशी व्यवस्था असल्यामुळें कॉमन्सचा सरकारवर चांगलाच दाब राहतो. राष्ट्रीय जमाखर्चास मंजुरी देणें, राजा व लॉर्ड यांच्या अनुमतीनें कायदे करणें, कोणत्याही सार्वजनिक प्रश्नांचा खल करणें व सरकारी अंमलदारांवर हुकमत चालविणें हीं महत्त्वाचीं चार कार्यें कॉमन्ससभेकडे आहेत. कॉमन्ससभेचे सभासद सामान्य × जनते-मधून येत असल्यामुळें उदरनिर्वाहाचा कांच मागें न राहतां त्यांस उत्साहानें राजकारणांत पडतां यावें यासाठीं मुख्य प्रधान आस्क्किथ यानें १९११त पगाराचें बिल पास करून घेतलें व हल्लीं कॉमन्स-सभेच्या सभासदांस सरकारांतून सालीना ४०० पौंडांचें वेतन मिळ-ण्याची व्यवस्था झालेली आहे.

४. **पार्लमेंटची निवडणूक.** कॉमन्ससभेच्या सभासदांची

× १९१८पूर्वी मतदाराची संख्या ८३,५०,००० होती. त्या सालीं स्त्रियां, लष्करातील शिपायी व खलाशी वगैरेंस निवडणुकीचा हक्क मिळाला व मतदरांची संख्या २,१३,७०,००० झाली. ही संख्या एकंदर लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्मी असून तीपैकीं ८० लक्ष स्त्रिया आहेत.

निवडणूक पुढीलप्रमाणें होते. नवीन पार्लमेंट भरावयाची असली म्हणजे पहिल्यानें निवडणूक ज्याच्या देखरेखीखालीं व्हावयाची त्या मतदारसंघांतील कामगाराकडे राजाकडून सूचना ( Writ ) पाठविण्यांत येते. मग तो कामगार पार्लमेंटच्या सभासदाच्या जागेकरितां मतदार होऊं इच्छिणारांनीं अमक्या दिवशीं आपलीं नांवें कळवावीं म्हणून ठरवितो. त्या दिवशीं जर एकाच उमेदवारानें आपलें नांव दाखल केलें तर तो उमेदवार एकदम पार्लमेंटचा सभासद निवडला जातो. जर दोन किंवा अधिक उमेदवार आले तर निवडणुकीचा दिवस ठरविण्यांत येतो. मतदारांचीं मतें गुप्त पद्धतीनें ( Ballot ) घेण्यांत येतात. शेवटीं मतें मोजण्यांत येऊन ज्याला सर्वांत जास्त मतें मिळालीं असतील तो निवडून आला असें समजतात. इ. स. १७१६त पार्लमेंटच्या सभासदांच्या निवडणुकीची जास्तींत जास्त मुदत म्हणजे सात वर्षें ठरविण्यांत आली होती; म्हणजे एकदां निवडून आलेले सभासद जास्तींत जास्त सात वर्षें सत्ताधारी असत. परंतु ही मुदत १९११च्या पार्लमेंट ॲक्टानें पांच वर्षें करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें नवा राजा गादीवर बसल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत नवी पार्लमेंट बोलावलीच पाहिजे असा प्रघात आहे.

५. **प्रधानमंडळ**. कायद्यांचा अंमल करण्याचें काम राजा व त्याचें प्रिव्ही कौन्सिल यांजकडे असतें. परंतु वस्तुतः पाहतां हा अधिकार प्रिव्ही कौन्सिलची कमिटी असें जें प्रधानमंडळ त्याच्या हातीं असतो. इंग्लंडांत राजकीय दृष्ट्या दोन*प्रमुख पक्ष आहेत. एक लिबरल व दुसरा कॉन्सर्व्हेटिव्ह. यांपैकीं कॉमन्ससभेंत ज्या पक्षाचें मताधिक्य असेल त्या पक्षाच्या पुढाऱ्यास राजा मुख्य प्रधान नेमतो. मग तो मुख्य प्रधान आपल्या पक्षांतील लोक निवडून प्रधानमंडळ तयार करतो कॉमन्ससभेंत

* अलीकडे मजूरपक्ष हा तिसरा पक्ष जोरदार होत आहे.

लिबरल पक्षाची सरशी असली म्हणजे लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ होतें व कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष विरोधी पक्ष ( Opposition ) या नात्यानें पार्लमेंटांत वागतो. जेव्हां कामन्ससभेंत प्रधानमंडळाची बाजू खालावते व विरुद्ध पक्षाचा जोर होऊन सरकारी बिलें नापास होऊं लागतात तेव्हां प्रधानमंडळ राजीनामा देतें; अथवा एकंदर देशांतील लोकमत आपल्याला अनुकूल आहे असें त्याला वाटत असल्यास पार्लमेंट बरखास्त करून राजास नवी निवडणूक करण्यास विनंति करतें. जर नव्या पार्लमेंटांत प्रधानमंडळास अनुकूल मंडळींचें मताधिक्य झालें तर तेंच प्रधानमंडळ कायम राहतें. नाहींतर विरुद्ध पक्षाच्या प्रधानमंडळाचे हातीं राज्यकारभार जातो. प्रधानमंडळास ' क्याबिनेट ' असें एक नांव आहे. क्याबिनेटचा मूळ अर्थ खासगी खोली. हें नांव पडण्याचें कारण असें कीं, प्रिव्ही कौन्सिलच्या कांहीं निवडक सभासदांचे हातीं राज्यकारभार देऊन त्यांची भेट राजे खासगी खोलींत घेत व तेथें वाटाघाट करण्याची वहिवाट असे. पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज हे हॅनोव्हर घराण्यांतील राजे इंग्लिश राज्यकारभारांत मुळींच लक्ष घालीत नसत, व राजानें प्रधानमंडळाच्या बैठकीस हजर राहून वाटाघाट करण्याची वहिवाट त्यांनीं बंद पाडिली. तेव्हांपासून मुख्य मुख्य प्रश्नांचा खल करण्यास प्रधानमंडळाच्या ज्या सभा भरतात त्यांस हजर राहण्याचें राजांनीं सोडून दिलें आहे व त्यामुळें सर्व खल मुख्य प्रधानाच्या नेतृत्वाखालीं चालतो.

६. **प्रधानमंडळाची रचना व कार्य.** प्रधानमंडळांतील प्रधानांची संख्या अनियमित असते. तथापि त्यांतील महत्त्वाचे अधिकारी खालीलप्रमाणें असतात. १ मुख्य प्रधान (खजिन्याकडील पहिला लॉर्ड ). २ लॉर्ड चॅन्सेलर ( लॉर्ड्ससभेचा अध्यक्ष ). ३ चॅन्सेलर ऑफ दी एक्सचेकर ( फडनवीस ). ३ लॉर्ड प्रेसिडेंट

ऑफ दी कौन्सिल ( प्रिव्ही कौन्सिलचा अध्यक्ष ). ४ होम सेक्रेटरी ( गृहमंत्री ). ६ परराष्ट्रीय मंत्री. ७ भारतमंत्री. ८ वसाहत-मंत्री. ९ युद्धमंत्री. १० लॉर्ड प्रिव्ही सील ( शिक्कामोर्तब बाळगणारा प्रधान. ११ फर्स्ट लॉर्ड ऑफ दी अॅड्मिरॅल्टी ( आरमाराचा प्रधान ). १२-१३ व्यापार व शिक्षण यांच्या मंडळांचें अध्यक्ष. १४ कृषि-मंत्री. १५ स्थानिक स्वराज्यादि व्यवस्था पाहणारा आरोग्य-मंत्री. १६ मजूरखात्याचा मंत्री. आणखीही कित्येक अधिकारी प्रधान-मंडळांत असतात व एकंदर प्रधानांची संख्या सुमारें वीसपर्यंत असते. सर्वच प्रधान एकाच पक्षाचे असावयाचे, सर्वच प्रधानांचें काम मुख्य प्रधानाच्या अनुमतानें चालावयाचें, कॉमन्ससभेंतील आपल्या पक्षाच्या सभासदांचें आनुकूल्य कायम राहील याची जबाबदारी ओळखून एकंदर प्रधानमंडळाचें काम चालावयाचें, व कोणाही प्रधानाच्या कृत्याबद्दल सर्व प्रधानमंडळ जबाबदार असावयाचें हे हल्लींच्या प्रधानमंडळाच्या पद्धतीचे चार विशेष आहेत.

७. **राजपद**. इंग्लंडचा राजा प्रॉटेस्टंटच असला पाहिजे असा कायदा १७०१त झाला. राजाचे अधिकार १६८९च्या राज्य-क्रान्तीच्या वेळीं ' हक्कांची मंजुरी ' (Bill of Rights ) नांवाचा जो कायदा झाला त्यानें बरेच मर्यादित करण्यांत आले. तथापि तत्त्वतः कांहीं अधिकार अजूनही राजाचे म्हणून समजले जातात. परंतु या सर्व अधिकारांची वहिवाट प्रधानमंडळाच्या सल्ल्यानेंच करण्यांत येते. तेव्हां दिसावयाला राज्यकारभाराचा मुख्य राजा दिसला तरी वस्तुतः प्रधानमंडळाच्या तंत्रानें सर्व राज्यकारभार चालतो आणि प्रधानमंडळाचें अस्तित्व तर कॉमन्ससभेंतील बहुमतावर अवलंबून असतें. अर्थात् राज्याधिकारी लोकसभेला जबाबदार राहतात व त्यामुळें त्यांचें वर्तन लोकमतास अनुसरून घडतें. राजाचा कांहीं उपयोग नाहीं व तो केवळ सरकारला भारभूत आहे अशी एकोणि-

साव्या शतकांत सामान्य समजूत होती. परंतु परराष्ट्रसंबंधीं व्यवहारांत राजपदाचा किती उपयोग आहे हें अलीकडे लोकांस पटूं लागलें आहे. शिवाय सर्व साम्राज्यभर साम्राज्यनिष्ठा दृढ राहण्यास वंशपरंपरा राजपदासारखी दुसरी तोड नाहीं असें मुत्सद्दी लोक म्हणूं लागले आहेत. एकंदरीनें, कॉमन्ससभेंतील बहुमतवाल्या पक्षाच्या योग्य पुढाऱ्यास मुख्य प्रधान नेमणें, वेळोवेळीं त्याला सल्ला देणें, निरनिराळ्या पक्षांमधील तंटा विकोपास जाऊं न देणें, प्रधानमंडळ बदललें तरी राज्यकारभारांतील, विशेषतः परराष्ट्रीय राजकारणांतील सुसंगति कायम राखणें, व राजनिष्ठेच्या बंधनानें साम्राज्यांतील सर्व घटकांचा एकजीव करणें,हे इंग्लंडच्या राजपदाचे मुख्य उपयोग आहेत.

८. **स्थानिक स्वराज्य.** इंग्लंडमधील खेडीं (Parishes),शहरें व परगणे यांजमध्यें पॅरिश–कौन्सिलें, बरो–कौन्सिलें, व कौन्टी–कौन्सिलें असतात. या संस्थांकडे आपआपल्या भागांतील आरोग्य, शिक्षण, व व्यवस्था म्हणजे पोलीस-बंदोबस्त राखण्याचें काम असतें. रस्ते नीट राखणें व पाणीपुरवठा करणें या गोष्टीही या स्थानिक मंडळांस कराव्या लागतात.कित्येक नगर-संस्था(बरो-कौन्सिलें) आपल्या शहरास सार्वजनिक उद्यानें व खुलीं मैदानें पुरवून रहिवाशांच्या आरोग्यवर्धनास मदत करितात, पदार्थसंग्रहालयें व मोफत वाचनलयें उघडून त्यांच्या सामान्य शिक्षणाची तरतूद करतात, त्याचप्रमाणें उजेडासाठीं ग्यास, ट्राम्वे, स्नानगृहें, गरिबांस रहातीं घरें, इत्यादि गोष्टी पुरवून नागरिकांचा जीवितक्रम सुखमय करण्याचें श्रेय घेतात. या सर्व कार्यासाठीं येणारा खर्च 'स्थानिक कर'(Local rate) बसवून त्यांतून स्थानिक संस्था करतात. महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे हीं सर्व मंडळें लोकनियुक्त असून त्यांच्यापासून स्थानिक व्यवस्था लावतांना इंग्लंडच्या रहिवाशांस सार्वजनिक कार्याचें उत्तम शिक्षण मिळतें व पुढें पार्लमेंटांत जाऊन सर्व देशाच्या हितासाठीं

झटण्यास ते तयार होतात.

९. **न्यायपद्धति**. कायदेमंडळानें उत्कृष्ट कायदे केले व अंमलबजावणी करणारे अधिकारी कुशल असले तरी तेवढ्यानें राज्यव्यवस्था पूर्ण होत नाहीं. कायदे-पुस्तकांत नमूद झालेले कायदे व मागील वहिवाटी यांस धरून एखाद्या विशिष्ट व्यवहारांत न्याय देण्यास न्यायाधीश लागतात. इंग्लंडांत न्याय देण्यास निरनिराळीं कोर्टें असून सर्व कोर्टांच्यावर हाउस ऑफ लॉर्ड्‌सची सत्ता चालते. खालपासून वरपर्यंत सर्व कोर्टांत न्यायाधिशाबरोबर सामान्य लोक 'पंच' (Jury, ज्यूरी) म्हणून बसतात व सर्व व्यवहार समजावून घेऊन आपलें मत प्रकट करतात. मग त्या पंचांच्या मताप्रमाणें न्यायाधीश निकाल सांगतो. अशा रीतीनें इंग्लंडमध्यें न्यायव्यवस्थेंत सामान्य लोकांचा हात असल्यानें न्यायदानास कृत्रिमपणा येत नाहीं व लोकांत सार्वजनिक काम करण्याची जागृति कायम राहते. तसेंच न्यायाधीश अधिकारीवर्गाचे मुळींच मिंधे राहणार नाहींत, अशी व्यवस्था असणें हें सर्व व्यवहारांत योग्य न्याय मिळण्यासाठीं अत्यंत अवश्य होय. ही गोष्ट १७०१त जो ॲक्ट ऑफ सेट्‌लमेंट पास झाला त्यानें साधली. या कायद्यांतील एका कलमानें न्यायाधीश आपलें काम चोखपणें करीत असेल तर त्याची नोकरी व पगार बिनधोक चालू राहतील असें ठरविण्यांत आलें. त्यामुळें यापुढें न्यायाधिशास तंबी देऊन न्यायदानांत ढवळाढवळ करण्याची अधिकारीवर्गाची प्रवृत्ति बंद पडली व सरकारी अधिकारी व खाजगी व्यक्ति यांच्यामधील तंटयांत शुद्ध न्याय मिळणें शक्य झालें. पूर्वकालीं आपल्याविरुद्ध जाणाऱ्या इसमास पकडून उघड चौकशी न करतां अधिकारी पुरुष दीर्घकाल तुरुंगांत ठेवीत. व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्याची ही जुलुमी पद्धति १६७९च्या 'हेबिअस कॉर्पस' ॲक्टनें बंद झाली. तेव्हांपासून कोणाही व्यक्तीवर

गुन्ह्याचा आरोप आला असतां न्यायकोर्टांत उघड चौकशी मागण्याचा त्याचा हक्क प्रस्थापित झाला. आणखी इंग्लंडच्या न्यायपद्धतीसंबंधीं एक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे एखाद्या बड्या सरकारी अधिकाऱ्यानें बेकायदेशीर कृत्य केलें तर त्याची चौकशी सामान्य कायद्याबरहुकूम सामान्य कोर्टांत सामान्य व्यक्तीप्रमाणें करितां येते. सरकारी अधिकाऱ्यांस एक कायदा व सामान्य जनांस दुसरा कायदा असा भेदभाव तेथें नाहीं. अर्थात् अधिकारीवर्गासही सामान्य कायद्याचेंच तेवढें संरक्षण मिळतें व खाजगी व्यक्तीवर जुलूम होण्याचा संभव फार कमी असतो.

१०. **वसाहती**. इंग्लंडच्या वसाहती जगभर पसरल्या असून व्यापार व फाजील प्रजेला वस्ती या दोन तऱ्हांनीं वसाहतींचा इंग्लंडास उपयोग आहे. एकंदर वसाहतींचे तीन प्रकार आहेत. क्यानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड व दक्षिण आफ्रिका या चार वसाहती पूर्ण स्वराज्याचा उपभोग घेत आहेत. फक्त त्यांचें परराष्ट्रीय राजकारण, सैन्य व आरमार येवढ्यांवर इंग्लंडचा ताबा आहे. दुसरा वर्ग सीलोन, जमेका वगैरे लहान लहान वसाहतींचा होय. या वर्गांतील वसाहतींचा कारभार पुष्कळ अंशांनीं इंग्लंडांतून नेमलेल्या गव्हर्नरच्या हातीं असतो. यांना 'क्राऊन कॉलनीज' (राजाच्या वसाहती) असें म्हणतात. तिसरा वर्ग म्हटला म्हणजे नवीन सामील केलेल्या नायजीरिया, ब्रिटिश ईस्ट आफ्रिका (पूर्व आफ्रिका) यांचा होय. या देशांत अजून पुरतीशी वस्ती नाहीं व मूळ रहिवाशांपासून गोऱ्या वसाहतवाल्यांचें रक्षण करावयाचें हाच या वसाहतींचा मुख्य उद्देश असल्यामुळें त्यांना संरक्षित प्रदेश (Protectorates, प्रोटेक्टरेट्स) मानतात. यांतील कारभार कमिशनर अथवा रेसिडेंट याच्या हातीं असून वसाहतमंत्र्याच्या हुकुमानुसार तो आपला कारभार चालवितो.

११. **हिंदुस्थान**. हिंदुस्थानांत मूळची तीस कोटि वस्ती अस-

ल्यानें व हवा उष्ण असल्यानें वसाहत करणें शक्य नाहीं. व्यापार व येवढ्या विस्तीर्ण देशावर राज्य करण्यास मिळाल्यामुळें कर्तृत्व-शक्ति प्रकट करण्यास मिळालेली उत्तम संधि हे हिंदुस्थान ताब्यांत आल्यापासून इंग्लंडला मोठे फायदे आहेत. व्हाइसरॉय हा मुख्य अधिकारी असून भारतमंत्र्याच्या सल्ल्यानें तो हिंदुस्थानचा कारभार पाहतो. वसाहतींच्या प्रधानाप्रमाणें भारतमंत्री व त्याचें कौन्सिल यांचा खर्च ब्रिटिश तिजोरींतून व्हावयाचा अशी व्यवस्था अलीकडे झाली आहे ( १९१९ ). जर्मनीशीं झालेल्या महायुद्धांत हिंदुस्थाननें इंग्लंडला उत्कृष्ट साहाय्य केलें; त्याबद्दल ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदु-स्थानला जबाबदार स्वराज्य देणें हें आमचें ध्येय आहे असें वचन दिलें ( १९१७ ), व स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून सुधारणांचा कायदा पास केला ( १९१९ ).

१२. **आरमार**. इंग्लंडचें सामर्थ्य व वैभव हीं इंग्लिश आरमाराच्या बळकटीवर अवलंबून आहेत ही गोष्ट एलिझबेथ राणीच्या वेळेपासून इंग्लिशांचे मनावर पक्की बिंबली आहे. आरमाराच्या जोरावरच स्पेन, हॉलंड, फ्रान्स व जर्मनी या प्रतिस्पर्ध्यांशीं टक्कर देऊन इंग्रजांनीं त्यांपैकीं प्रत्येकास शरण यावयास लाविलें. आरमाराचा मुख्य अधिकारी पूर्वीं 'लॉर्ड हाय ॲड्मिरल' हा असून त्या जागीं बहुशः राजघराण्यां-तील पुरुषाची योजना होत असे. परंतु १७०८पासून मुख्य अधिकार एका बोर्डाकडे आला. हल्लीं आरमार-मंडळांत ( Board of Admiralty ) सहा सभासद असून त्यांच्यापैकीं पहिला लॉर्ड प्रधानमंडळांत असतो व तो आरमार–खात्याच्या सर्व कृत्यांबद्दल पार्लमेंटला जबाबदार असतो. जिब्रॉल्टर, माल्टा, एडन, इत्यादि ठाण्यांची व्यवस्था राखून इंग्रजांचा समुद्रावरील व्यापार व संचार निर्बाध चालेल अशी व्यवस्था राखणें हें आरमार–खात्याचें महत्त्वाचें काम आहे. युद्धाच्या वेळीं तर आपला व्यापार व संचार सुरक्षित ठेवून

शत्रूचा कोंडमारा करण्याचें काम त्यास करावें लागतें. ब्रिटिश आरमारास ब्रिटनचा किनारा तेवढा सुखरूप राखावयाचा नसून सर्व वसाहती, हिंदुस्थान व साम्राज्यांतील इतर प्रदेश यांचें संरक्षण करण्याची जोखीम त्याजवर आहे. अलीकडे क्यानडा, ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंड यांनीं स्वतःच्या मालकीचीं लढाऊ जहाजें बांधून व त्यांजवर काम करणाऱ्या लोकांचा खर्च चालवून साम्राज्यसरकारास साहाय्य करण्याचें धोरण अंगीकारिलें आहे.

१३. **सैन्यव्यवस्था**. महत्त्वाकांक्षी युरोपियन राष्ट्रांशीं गांठ असल्यामुळें खुद्द ब्रिटन व ब्रिटिश साम्राज्य यांच्या संरक्षणासाठीं जंगी लष्कर सज्ज ठेवणें इंग्रजांस अवश्यक आहे. ब्रिटिश लष्कराचे दोन भाग आहेत; एक खास सैन्य (Regular Army) व दुसरा स्वयंसैनिक (Territorial Army). निदान बारा वर्षें नोकरी करण्याच्या अटीवर खास सैन्यांत लोकांची भरती करण्यांत येते. त्या बारा वर्षांपैकीं सात वर्षें प्रत्यक्ष नोकरी व पांच वर्षें शिल्लकी फौजेंत नोकरी करावयाची असते. स्वयंसैनिकांस निदान चार वर्षें नोकरी करण्याचा करार लिहून द्यावा लागतो. शांततेच्या वेळीं खास सैन्यांतील बहुतेक सर्व लोक ब्रिटनबाहेर साम्राज्यांतील इतर भागांत नोकरी करण्यांत गुंतलेले असतात, व स्वयंसैनिकांस मात्र ब्रिटनबाहेर जावें लागत नाहीं. युद्ध सुरू झालें म्हणजे खास सैन्यास ‘मोहिमेवरील फौज’ (Expeditionary Force) असें नामाभिधान प्राप्त होऊन युद्धभूमीकडे जावें लागतें व देश–संरक्षणाचें काम स्वयंसैनिकांवर येतें. तोफखान्याकडील ऑफिसर होण्यास वुलिच येथील ‘रॉयल मिलिटरी ॲक्याडेमी’मध्यें शिक्षणाची सोय आहे, व सॅन्डहर्स्ट येथील ‘रॉयल मिलिटरी कॉलेजांत’ घोडदळ व पायदळ यांतील ऑफिसर तयार होतात. सर्व सैन्याची मुख्य व्यवस्था सेनामंडळाकडे (Army Council) असून त्यांत युद्धमंत्री

( Secretary of State for War) व सैन्यांतील मुख्य अधिकारी असतात. वयांत आलेल्या सर्व तरुणांस सक्तीनें कांहीं काळ लष्करांत सामील करण्याची पद्धति फ्रान्स, जर्मनी इत्यादि देशांत विसाव्या शतकांत अंमलांत आली आहे. महायुद्धाच्या वेळीं इंग्लंडांतही सक्तीची लष्करी नोकरी अंमलांत आणण्यांत आली होती. पण १९२०त सक्तीचा कायदा रद्द झाला व खुषीनें लष्करांत सामील होण्याची पद्धति पुनः अंमलांत आली. महायुद्धांत विमानांचा उपयोग युद्धाच्या कामीं करण्यांत आला. त्यामुळें इंग्लंडनें आतां विमान-दल ( Air Force ) उभारिलें असून त्याची व्यवस्था विमान-मंडल ( Air Council ) पाहतें. १९२३ च्या शेवटीं एका गटांत बारा विमानें ( Aeroplanes, एअरोप्लेन्स ) असे सदतीस गट इंग्लंडच्या मालकीचे होते. क्रान्वेल येथील 'क्याडेट कॉलेज' व ॲन्डोव्हर येथील 'स्टाफ कॉलेज' या संस्था विमान-दलांत काम करण्यास लोक तयार करितात.

१४. **साम्राज्यपरिषद**. साम्राज्यांत एकोपा उत्पन्न करण्यासाठीं साम्राज्यांतील सर्व मुख्य घटकांची परिषद भरविण्याची कल्पना ब्रिटिश मुत्सद्यांनीं काढिली व तीप्रमाणें पहिली साम्राज्यपरिषद १९०७त लंडनमध्यें भरली. अलीकडे इंग्लंडनें सर्व साम्राज्यघटकांचा समान दर्जा कबूल केला असून एक दोन वर्षांनीं लंडनमध्यें साम्राज्य-परिषद भरते व ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या घटकांची एकी कशी राखतां येईल, यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांचा खल करते. या परिषदेंत हिंदी प्रतिनिधींचा अन्तर्भाव केला आहे. प्रथम लॉर्ड सिंह व बिकानेरचे महाराज हे हिंदी प्रतिनिधि साम्राज्यपरिषदेस हजर राहिले ( १९१७ ).

# परिशिष्ट १:—संक्षिप्त चरित्रमाला.

१. वुल्झी, थॉमस ( १४७१–१५३० ). वुल्झीचा जन्म इप्सिच या गांवीं झाला. तो अतिशय हुशार असून अवघा चौदा वर्षांचा असतां ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचा पदवीधर झाला. आरंभीं त्यानें धर्मखात्यांत नोकरी धरिली. त्याची योग्यता आठव्या हेन्रीच्या लक्षांत येऊन त्यानें वुल्झीस आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें व पुढें आपला मुख्य मंत्री नेमिलें ( १५१४ ). रोमच्या पोपनें त्याला कार्डिनल केलें व नंतर कांहीं वर्षांनीं आपला इंग्लंडांतील प्रतिनिधि नेमिलें ( १५१८ ). अशा रीतीनें इंग्लंडमधील राजकीय व धार्मिक अशा दोन्ही बाबतींत मुख्य अधिकार वुल्झीच्या हातीं आला. पुढें आपण खुद्द पोप व्हावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती; पण ती सफळ झाली नाहीं. आठव्या हेन्रीच्या मंत्रिमंडळांत नेमणूक झाल्यापासून इंग्लंडचें परराष्ट्रीय खातें वुल्झीनें आपल्याकडे घेतलें, व परदरबारीं इंग्लंडचें वर्चस्व स्थापण्यासाठीं एकसारखी खटपट चालविली. लवकरच स्पेन व फ्रान्स यांजमधील चुरशीचा फायदा घेऊन त्या दोघांपैकीं कोणासही त्यानें डोईजड होऊं दिलें नाहीं. एव्हांपासून युरोपियन राजकारणांत ‘ सत्तेचा समतोलपणा ’ हें धोरण रूढ झालें आणि इंग्लंडच्या शब्दास फ्रान्स व स्पेन हीं दोन्ही राष्ट्रें मान देऊं लागलीं. फ्रान्स व स्पेन येथील राजे वुल्झीस नजराणे भरूं लागले व त्याला पोपची गादी मिळवून देण्याचीं आश्वासनें देऊन आपल्या बाजूला इंग्लंडला वळविण्यासाठीं शिकस्त करूं लागले. पुढें इंग्लंडनें स्पेनची बाजू धरिली व फ्रान्सशीं लढाया केल्या; पण इंग्लंडला फायदा कांहींच झाला नाहीं, तेव्हां वुल्झी इंग्लंडांत अप्रिय झाला. त्याचा पुढील काळ दुःखांत गेला. आठव्या हेन्रीचें मन ॲन बुलीन या सुंदर स्त्रीवर बसलें होतें व त्याला क्याथराइनशीं झालेला विवाह रद्द ठरवून घ्यावयाचा होता. पण ही गोष्ट करण्यास पोप तयार होईना. क्याथराइन ही स्पेनच्या राजाची मावशी होती, व स्पेनच्या राजाचें मन दुखविणें पोपला सोईचें नव्हतें.

अर्थात् तो या बाबतींत कालहरण करूं लागला. तेव्हां आठवा हेन्री खूप रागावला व त्यानें आपला राग वुल्झीवर काढिला. त्यानें वुल्झीला अधिकारभ्रष्ट केलें व आणखीही कडक शासन करण्याचा त्याचा विचार होता. इतक्यांत वुल्झी लीस्टर येथें मरण पावला ( १५३० ). अशा रीतीनें इंग्लंडचें परदरबारीं वजन वाढविणारा हा कर्तबगार मुत्सद्दी व धर्मज्ञानी आठव्या हेन्रीच्या राक्षसी स्वार्थास बळी पडला.

२. **ड्रेक, सर फ्रान्सिस.** ( १५४५–१५९६ ). एलिझबेथच्या काळचा अतिशय धाडसी व यशस्वी नाविक. अमेरिकेच्या शोधानंतर तिकडे सोन्यारुप्याच्या खाणी सांपडल्या. अमेरिका स्पेननें आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें सोन्यारुप्यानें लादलेलीं गलबतें स्पेनला हमेश येऊं लागलीं. इंग्लिश आरमाराची आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत स्थापना होऊन इंग्लिश लोक समुद्रावर संचार करूं लागले होते. त्यांना अमेरिकेशीं व्यापार करण्याची इच्छा झाली; पण स्पेन त्यांना तसें करूं देईना. तेव्हां इंग्लिश खलाशांनीं सोन्यारुप्यानें लादलेल्या स्पॅनिश गलबतांवर हल्ला करावा व स्पॅनिश अमेरिकेंतील बंदरें लुटावीं हा चांचेगिरीचा मार्ग अवलंबिला. ड्रेकनें अशा लुटालुटी व हल्ले अनेक केले. एकदां १५७७त इंग्लंडहून तो निघाला तो अमेरिकेच्या दक्षिण टोंकाला वळसा घालून पश्चिमेकडे पॅसिफिक महासागरांत शिरला. तिकडे स्पॅनिश बंदरें लुटून आल्या मार्गानें परत न येतां त्यानें सर्व पॅसिफिक महासागर ओलांडिला व पृथ्वीप्रदक्षिणा करून निघाल्यापासून तीन वर्षांनीं तो आपल्या जन्मभूमीला येऊन दाखल झाला ( १५८० ). तेव्हां खुद्द एलिझबेथ राणी त्याच्या सुवर्णमृग ( Golden Hind ) या जहाजावर गेली व तेथें तिनें त्याला नाइट ही पदवी देऊन गौरविलें. १५८७ सालीं स्पेनचा क्याथॉलिक राजा दुसरा फिलिप यानें इंग्लंडवर स्वारी करून तेथील प्रॉटेस्टंट धर्माचा निःपात करण्यासाठीं जंगी आरमार तयार केलें. तेव्हां ड्रेक केडिझ बंदरांत अचानक उतरला व त्यानें स्पॅनिश गलबतांचा फन्ना उडविला. त्यामुळें फिलिपला इंग्लंडवरील स्वारी पुढें ढकलणें भाग झालें. पुढील सालीं स्पेनच्या प्रसिद्ध ‘ अजिंक्य आरमाराचा ’ इंग्रज नाविकांनीं नाश केला; त्या वेळीं झालेल्या लढाईत ड्रेकनें अतिशय परा-

क्रम गाजविला. पुढें १५९६त ' वेस्ट इंडीज ' बेटावर ड्रेकनें एक स्वारी केली, ती चालू असतां तो मृत्यु पावला. ड्रेक अत्यंत धाडसी असून त्याच्या साहसी स्वाऱ्यांनीं स्पॅनिश खलाशांच्या मनावर इंग्लिश नाविकांचा चांगलाच दरारा बसला, व ब्रिटिश नाविक सत्तेचा उदय होण्यास मदत झाली.

३. रॅले, सर वॉल्टर (१५५२–१६१८). इंग्लंडचा मोठा नाविक व ग्रंथकार. एलिझबेथच्या कारकीर्दींत इंग्लंडच्या नैर्ऋत्येकडील डेव्हनशायरमधील अनेक नाविक प्रसिद्धीस आले. त्यांपैकीं रॅले हा एक प्रमुख नाविक होय. त्यानें आपला एक सावत्रभाऊ गिल्बर्ट याजबरोबर समुद्रावरून अनेक सफरी केल्या. पुढें त्यानें उत्तर अमेरिकेमध्यें इंग्लिश लोकांची एक कायमची वसाहत स्थापन केली व तिला एलिझबेथच्या स्मरणार्थ व्हर्जिनिया हें नांव दिलें (१५८७). पण रॅलेचा वसाहत स्थापण्याचा हा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. अमेरिकेंतून त्यानें बटाटे व तंबाखू हे दोन्ही पदार्थ आणिले. एलिझबेथ राणीची त्याच्यावर मर्जी असून त्याला आयर्लंडांत मन्स्टर परगण्यांत मोठी जमीन मिळाली होती. तेथें त्यानें बटाटे लाविले व तेव्हांपासून आयर्लंडांत बटाट्यांची लागवड सुरू झाली. अजिंक्य आरमारावर इंग्रजांनीं जय मिळविला, त्या वेळीं जे मोठे इंग्रज नाविक लढले त्यांत रॅले हा एक होता. एलिझबेथच्या मृत्यूनंतर पहिला जेम्स गादीवर येतांच त्याच्याविरुद्ध एक कट झाला (१६०३). त्यांत सामील असल्याच्या आरोपावरून रॅलेस फांशीची शिक्षा झाली. परंतु ती शिक्षा अंमलांत न येतां तेरा वर्षें त्याला तुरुंगांत काढावीं लागलीं. या काळांत त्यानें ' जगाचा इतिहास ' इत्यादि ग्रंथ लिहिले. १६१६त अमेरिकेंतील गियाना प्रांतांत एक सोन्याची खाण आपल्याला माहीत आहे, आपली सुटका केल्यास आपण तिच्यांतील सोनें आणून देऊं असें रॅलेनें जेम्सला वचन दिलें व आपली तुरुंगांतून सुटका करून घेतली. जेम्सनें सुटका करितांना असें सांगितलें होतें कीं, मोहीम चालवितांना स्पेनला मुळींच उपसर्ग पोंचूं नये. तथापि अमेरिकेंत गेल्यावर रॅलेचें स्पॅनिश लोकांशीं भांडण झालें. शिवाय अपेक्षित सोन्याची खाण त्याला सांपडली नाहीं. नंतर रॅले इंग्लंडला आला, तेव्हां स्पॅनिश लोक त्याच्याविरुध्द अगदीं चिडून गेले होते. या वेळीं जेम्स आपला मुलगा चार्लस

याचा विवाह स्पॅनिश राजकन्येशीं करण्याच्या विचारांत होता. लागलीच स्पॅनिश लोकांस खूष करण्यासाठीं जेम्सनें पूर्वीच्या अपराधाबद्दल रॅलेस झालेली देहांत शिक्षा अमलांत आणिली ( १६१८ ). तेव्हां आपला उत्तम नाविक स्पेनच्या क्षोभास भिऊन बळी दिला याबद्दल जेम्स इंग्लंडांत अगदीं अप्रिय झाला. अमेरिकेंत ब्रिटिश वसाहत स्थापण्याचा प्रयत्न करून रॅले महत्तर ब्रिटनचा मार्गदर्शक( Pioneer of the British Empire ) झाला.

**४. पिम, जॉन** ( १५८४—१६४३ ), पहिल्या चार्लसच्या जुलमाविरुध्द झगडणाऱ्या देशभक्तांपैकीं एक प्रमुख देशभक्त. तो १६२१च्या पार्लमेंटांत निवडून आला, व त्यानें पहिल्या जेम्स राजाची मक्तेपध्दति व अनियंत्रित कारभार यांजवर अशा जोरानें हल्ला केला कीं, त्याला तीन महिने तुरुंगवास पत्करावा लागला. पहिल्या चार्लच्या पहिल्या तिन्ही पार्लमेंटांत तो असून बकिंगहॅमवर त्यानें एकसारखा हल्ला चालविला. १६२८त त्यानें प्रसिध्द 'पिटिशन ऑफ राइट' पास करून घेतांना एलियट या पुढाऱ्यास मनापासून पाठिंबा दिला. पुढें सुलतानी अंमलाची समाप्ति झाल्यावर लॉंग पार्लमेंट भरली; तेव्हां तर पार्लमेंटचें पुढारीपण पिमकडेच आलें. त्यानें सर्व इंग्लंडभर प्रवास करून राजाच्या जुलमास प्रतिकार करितील असे स्वाभिमानी सभासद निवडून येतील अशी व्यवस्था केली. पार्लमेंट भरल्यावर त्यानें राजाचे जुलमी कायदे रद्द करविले, सुलतानी अंमलाच्या वेळच्या राजाच्या साथीदारांस शिक्षा ठोठावल्या व पुढें इंग्लंडच्या जुन्या परंपरेस धरून लोकप्रतिनिधींच्या संमतीनें राज्य चालविण्यांत येईल असे राजसत्तेवर निर्बंध घातले. शेवटीं त्यानें ग्रँड रिमॉन्स्ट्रन्स पास करून घेतला, तेव्हां लोकपक्षांत फूट पडली. लागलीच राजानें पिम आदिकरून पार्लमेंटच्या पांच पुढारी प्यूरिटन सभासदांस पकडून लोकपक्षाची सत्ता मुळांतच नाहींशी करण्याचा प्रयत्न केला. या कामीं राजाची फजिती झाली. नंतर दोन्ही पक्षांत युध्द सुरू झालें. तेव्हां पिमनें पार्लमेंटच्या पक्षास बळकटी आणण्यासाठीं स्कॉटिश लोकांशीं तहनामा केला ( १६४३ ), व त्यांचें साहाय्य मिळविलें. पुढें पिम मरण पावला ( १६४३ डिसेंबर ). त्याची जनतेवर इतकी

छाप होती कीं, त्याला ' किंग पिम ' असें म्हणत.

५. हॅम्पडन, जॉन ( १५९४-१६४३ ). नौकाकर देण्याचें साफ नाकारणारा धैर्यशाली देशभक्त. हा बकिंगहॅमशायरमधील एक श्रीमंत जमीनदार असून १६२१त प्रथम पार्लमेंटांत निवडून आला. पहिल्या चार्लसच्या पहिल्या तिन्ही पार्लमेंटांत तो असून लोकपक्षातर्फे सामील असे. पुढें अकरा वर्षांच्या सुलतानी अंमलांत चार्लसनें अनेक जुलुमी कर बसविले. त्यांपैकीं अतिशय प्रसिद्ध म्हणजे नौकाकर ( Ship--Money ) हा होय. हॅम्पडनवर या कराची वीस शिलिंग आकारणी झाली. हॅम्पडन श्रीमंत असून तेवढी रक्कम देणें त्याला मुळींच जड नव्हतें. परंतु या वेळीं राजानें बसविलेला अन्याय्य कर न देऊन देशसेवा करणें जरूर आहे असें जाणून त्यानें तो कर देण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां त्याच्यावर खटला झाला. बारा न्यायाधिशांपैकीं सात जणांनीं राजानें कर बसविला तो कायदेशीर आहे असें म्हणून राजाच्या बाजूचा निकाल दिला व हॅम्पडनला जबर दंड ठोठाविला ( १६३८ ). या खटल्यानें हॅम्पडन सर्व देशभर प्रसिद्ध झाला, राजाविरुद्ध लोकमत क्षुब्ध झालें, व राजाच्या जुलुमाविरुद्ध जोराची प्रतिक्रिया सुरू झाली. लवकरच चार्लसला लाँग पार्लमेंट बोलावणें भाग पडलें. तींत पिमबरोबर हॅम्पडननें पुढाकार घेतला. नंतर चिडून जाऊन चार्लसनें कॉमन्सच्या पांच पुढाऱ्यांस पकडण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. त्या पांचांत हॅम्पडन हा एक होता. नंतर राजा व पार्लमेंट यांजमध्यें युद्ध सुरू झालें. तेव्हां हॅम्पडननें आपल्या परगण्यांत एक पायदळ पलटण उभारिली व स्वतः सैन्यांत अधिकाराचें पद स्वीकारिलें. परंतु दुर्दैवानें युद्धारंभींच शाल्ग्रूव्ह येथील चकमकींत तो ठार झाला ( १६४३ ). १६३७ सालीं त्यानें जुलुमी नौकाकर देण्याचें साफ नाकारून देशांत प्रतिकारबुद्धि जागृत केली व पुढें आमरण तो लोकपक्षातर्फे झगडत राहिला. त्यावरून इंग्लिश लोकांस जॉन हॅम्पडन अत्यंत प्रिय झाला व अद्याप तो ' राष्ट्रीय वीर ' म्हणून प्रसिद्ध आहे.

६. मार्लबरो, जॉन चर्चिल, ड्यूक ऑफ मार्लबरो ( १६५०-१७२२ ). दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दींत हा सैन्यांत मोठ्या हुद्यावर होता; परंतु

तिसरा वुइल्यम जेव्हां इंग्लंडवर चालून आला तेव्हां मार्लबरो त्यास मिळाला. पुढें वुइल्यमविरुद्धही कट करण्यास त्यानें कमी केलें नाहीं. पुढें तिसऱ्या वुइल्यमच्या मृत्यूनंतर ॲन राणी गादीवर आली. तिच्या सर्व कारकीर्दीभर स्पॅनिश वारशाचें युद्ध चाललें होतें ( १७०२–१७१३ ). या युद्धांत इंग्लिशांचें सेनाधिपत्य मार्लबरोकडे होतें. युद्धारंभींच त्याचें युद्धकौशल्य पाहून ॲन राणीनें त्यास ड्यूक ऑफ मार्लबरो बनविलें. या युद्धांत त्यानें अनेक मोठे विजय मिळाविले. त्यांपैकीं नेदर्लॅंड्समधून झटपट बव्हेरियांत जाऊन ब्लेन्हीम येथें त्यानें फ्रेंच सेनेचा पूर्ण पराभव केला व ऑस्ट्रियाचा बचाव केला ( १७०४ ), त्या वेळीं त्यानें दाखविलेल्या लष्करी कौशल्याची फारच वाहवा झाली. त्याची कामगिरी इंग्लिश राष्ट्रास इतकी पसंत पडली कीं, पार्लमेंटनें वुडस्टॉक येथें 'ब्लेन्हीम ' नांवाचा टोलेजंग वाडा सार्वजनिक खर्चानें त्यास बांधून दिला. पुढेंही मार्लबरोनें अनेक विजय मिळविले. मार्लबरोस इंग्लिश, डच, व जर्मन अशा मिश्र फौजांवर आधिपत्य करावयाचें असल्यामुळें अतिशय त्रास पडे; शिवाय इंग्लंडांतील सरकार युद्धास अनुकूल राहील याचीही खबरदारी त्याला घ्यावी लागे. तेव्हां त्याला केवळ सेनाध्यक्षत्व करावें लागलें नाहीं तर मुत्सद्दीगिरीही लढवावी लागली. मार्लबरोची बायको सेरा जेनिंग्ज ही ॲन राणीची मोठी मैत्रीण होती; त्यामुळें राणी एकसारखी मार्लबरोस अनुकूल राहिली. परंतु पुढें सेरा जेनिंग्जची राणीशीं मैत्री तुटली; तसेंच इंग्लिश राष्ट्र युद्धास कंटाळलें व युद्धास विरुद्ध असलेला टोरी पक्ष अधिकारारूढ झाला. लागलीच मार्लबरो सेनापतीच्या जागेवरून बडतर्फ झाला व पुढें युद्ध थांबलें ( १७१३ ). मार्लबरो उत्कृष्ट सेनापति असून त्याची चित्ताची स्थिरता विलक्षण होती. प्रत्यक्ष समरांगणावर युद्धाची धुमश्चक्री चालली असतांना त्याचें डोकें इतकें शांत राही कीं, तो आपल्या सरकारास पाठवावयाचे अहवाल किंवा पत्नीस पाठवावयाचीं पत्रें लिही. मुख्य मुख्य इंग्लिश सेनापतींमध्यें मार्लबरोची गणना आहे. स्पॅनिश वारशाच्या युद्धांत अनेक विजय मिळवून त्यानें इंग्लिश क्षात्रतेज खंडस्थ युरोपियनांच्या प्रत्ययास आणिलें.

**७. वॉलपोल, सर रॉबर्ट** ( १६७६—१७४५ ). हा नॉर्फोक

कौन्टींतील एका जमीनदाराचा ( Country Gentleman ) मुलगा असून मध्यम स्थितींतील इंग्रज गृहस्थास जें शिक्षण लागतें, तितकें मिळविल्यावर वयाच्या चोविसाव्या वर्षीं पार्लमेंटांत शिरला. विद्वत्ता किंवा संस्कृत अभिरुची वॉल्पोलच्या ठिकाणीं फारशी नव्हती. तथापि तो मोठा व्यवहारपटु होता. १७२०त साऊथ सी कंपनीचें दिवाळें वाजलें तेव्हां पुष्कळ लोकांचें नुकसान झालें व चोहोंकडे हाहाकार झाला. या संकटकाळीं वॉल्पोल पुढें झाला व त्यानें इंग्लंडला बचावलें. तेव्हांपासून इंग्लिश लोकांचा वॉल्पोलवर विश्वास बसला. लवकरच वॉल्पोल मुख्य प्रधान झाला व एव्हांपासून दीर्घकालपर्यंत त्याच्या हातीं राजसूत्रें होतीं ( १७२१—१७४२ ). या काळांत पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज हे हॅनोव्हर घराण्याचे जर्मन राजे इंग्लंडच्या गादीवर होते. त्यांना व्हिग पक्षानें गादीवर आणिलें होतें. तेव्हां प्रधानांच्या हातीं सत्ता देऊन ते राज्यकारभाराविषयीं उदासीन रहात. वॉल्पोलनें या परिस्थितीचा पूर्ण उपयोग केला, व मुख्य प्रधानाची सत्ता दृढ करून 'एकमुखी प्रधानमंडळाची पद्धति' वाढीस लाविली. दीर्घकाळपर्यंत इंग्लंडला कोणत्याही युद्धांत पडूं न देऊन त्यानें शांतता राखिली. त्यामुळें व्यापार व उद्योगधंदे वाढून देश समृद्ध झाला; हॅनोव्हर घराण्याचें गादीवरून उच्चाटन करण्याच्या जॅकोबाइटांच्या प्रयत्नांस यश आलें नाहीं; इंग्लंडची संपत्ति वाढली; व पुढें साम्राज्यार्थ फ्रान्सशीं झगडा करण्याची त्याच्या ठायीं ताकद आली. आपली सत्ता स्थिर राखण्यासाठीं अनेक कर्तबगार लोकांना वॉल्पोलनें अधिकाराच्या जागांवरून हुसकून दिलें होतें. पुढें पुढें त्या लोकांनीं वॉल्पोलला कॉमन्समध्यें विरोध आरंभिला. वॉल्पोल सभासदांस लांच भरून कॉमन्समध्यें आपलें वजन राखीत असे, या पद्धतीवर 'पेट्रियट' पक्षानें खूप टीका केली. शेवटीं विरोधी पक्षानें वॉल्पोलला स्पेनविरुद्ध युद्ध करण्यास भाग पाडिलें. तयारी नसल्यामुळें प्रथम इंग्लंडला अपयश आलें; नंतर पार्लमेंटची निवडणूक झाली तींत वॉल्पोलच्या विरोधी लोकांचें बहुमत झाल्यामुळें वॉल्पोलला राजीनामा देणें भाग पडलें ( १७४२ ). त्याच्या दीर्घकालीन प्रधानगिरीच्या काळीं 'एकमुखी प्रधानमंडळाची पद्धति' (Cabinet System) कायम झाली व तो "पहिला मुख्य प्रधान" म्हणून प्रसिद्ध आहे.

८. **चॅथॅम**, वुइल्यम पिट, अर्ल ऑफ चॅथॅम ( १७०८-१७७८ ). वुइल्यम पिट १७३५ सालीं हाउस ऑफ कॉमन्समध्यें निवडून आला. प्रथम त्यानें पेट्रियट पक्षांत सामील होऊन वॉल्पोलच्या लांचलुचपतीवर व अधिकारलोभावर टीका केली. पुढें त्याची सबनिसाच्या जागीं ( Paymaster of the Forces ) नेमणूक झाली, तेव्हां त्याचा निःस्वार्थीपणा दिसून आला. पुढें युरोपांत सप्तवार्षिक युद्ध सुरू झालें त्यांत पहिल्यानें इंग्लंडला जिकडे तिकडे अपयश आलें. अशा बिकट प्रसंगीं पिटनें प्रधानगिरीचा स्वीकार केला व युद्धाची सर्व व्यवस्था आपल्या अंगावर घेतली. पिटला मनुष्याची पारख उत्कृष्ट होती. त्यानें वूल्फ, फर्डिनंड ऑफ ब्रन्स्विक, यांजसारख्या कर्तबगार सेनापतींची नेमणूक केली. लागलीच युद्धास निराळा रंग चढला व चोहोंकडे इंग्लंडची फत्ते झाली. शेवटीं फ्रान्सचा मोड होऊन इंग्लंडची साम्राज्यसत्ता स्थापित झाली ( १७६३ ). पुढें अमेरिकेशीं भांडण उपस्थित झालें; तेव्हां ना प्रतिनिधि, ना कर ( No Taxation without Representation ) या तत्त्वाचा पुरस्कार करून त्यानें अमेरिकनांवर कर न लादण्याची खूप खटपट केली. नंतर इंग्लंडचे पराजय होऊं लागले, तेव्हां अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य करावें अशी सूचना लॉर्ड्सपुढें आली. या वेळीं पिट हा अर्ल ऑफ चॅथॅम ही पदवी घेऊन लॉर्ड बनला होता. त्यानें या सूचनेचा निषेध करून अमेरिका व इंग्लंड यांची ताटातूट केव्हांही होतां उपयोगीं नाहीं हें मत प्रतिपादन केलें. भाषण करीत असतां त्याला मूर्च्छा आली व पुढें तो लवकरच वारला ( १७७८ ). चॅथॅम मोठा वक्ता होता व कॉमन्सवर त्याचें मोठें वजन असे. त्याचा आत्मविश्वास दांडगा होता व इंग्लंडला वैभव प्राप्त करून देण्यांत त्याच्या उद्योगाचा मोठा उपयोग झाला होता. त्यावरून सामान्यजनसमूहास तो अत्यंत प्रिय झाला होता व ‘ दि ग्रेट कॉमनर ’ या नांवानें तो प्रसिद्ध आहे.

९. **बर्क**, एडमंड ( १७२९-१७९७ ). अठराव्या शतकांतील मोठा व्हिग वक्ता व पुढारी. हा एका आयरिश वकिलाचा मुलगा असून त्याचें शिक्षण आयर्लंडांत झालें. पुढें १७५०त तो कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं लंडनला आला. परंतु कायदेपंडिताची पदवी

त्याला कधींच मिळाली नाहीं. या सुमारास त्याचें लक्ष ग्रंथरचनेकडे लागलें. लवकरच त्यानें ‘ उदात्त व सुंदर यांजसंबंधीं निबंध ’ (Essay on the Sublime and Beautiful ) लिहिला व होतकरू ग्रंथकार म्हणून प्रसिद्धि मिळविली ( १७५७ ). १७६५त लॉर्ड रॉकिंगहॅम या व्हिग पुढाऱ्याचा तो खासगी कारभारी ( Private Secretary ) झाला; त्याच सालीं लॉर्ड रॉकिंगहॅम मुख्य प्रधान झाला. तेव्हां बर्क पार्लमेंटांत निवडून आला, व तेव्हांपासून त्याचें सर्व आयुष्य राजकारणासंबंधीं भाषणें करणें व लेख लिहिणें यांत गेलें. लवकरच स्टॅम्प ॲक्ट रद्द करण्याच्या बिलावर त्यानें एक भाषण केलें; तेव्हां उत्तम वक्ता म्हणून त्याची प्रसिद्धि झाली. पुढें राजाच्या मर्जींतिल डयूक ऑफ ग्रॅफ्टन हा मुख्य प्रधान झाला. तो अधिकारावर असतां नृपानुयायांचा सुळसुळाट वाढला. तेव्हां बर्कनें ‘ आधुनिक असंतोषाची मीमांसा ’ हा ग्रंथ लिहून, स्वातंत्र्यावर घाला, मतदारसंघांचे हक्क इत्यादिकांविषयीं आपलीं व्हिगपक्षीय मतें लोकांपुढें मांडिलीं व गेल्या अर्धशतकभर चालू असलेल्या एकपक्षीय प्रधानमंडळाच्या पद्धतीचें ( Party Government ) समर्थन केलें. अमेरिकन वसाहतवाले स्वातंत्र्यप्रिय प्यूरिटनांचे वंशज असल्यामुळें त्यांच्याशीं तंटा करून त्यांना असंमत असे कर त्यांजवर बसविणें चुकीचें आहे हें मत तो एकसारखा प्रतिपादीत राहिला. परंतु त्याचें म्हणणें कोणींच ऐकिलें नाहीं. शेवटीं अमेरिकेशीं युद्ध झालें व त्यांत अमेरिका स्वतंत्र झाली. १७८५त वॉरन हेस्टिंग्ज हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल इंग्लंडांत परत गेला. त्यानें हिंदी लोकांवर जुलूम केला अशी बर्कची खात्री झाली होती. तेव्हां बर्कच्या पुढारीपणाखालीं कॉमन्ससभेनें लॉर्डांपुढें हेस्टिंग्जवर खटला चालविला. तो सात वर्षें चालून हेस्टिंग्ज सुटला; पण त्यामुळें कंपनीच्या अधिकाऱ्यांवर वचक बसला ( १७८८–९५ ). १७८९सालीं प्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रान्ति झाली. बर्कला समाजांतील प्रचलित संस्थांबद्दल फार आदर वाटत असे. फ्रेंचांनीं चालू संस्था जांचक म्हणून नष्ट केल्या हें पाहून त्याच्या मनाला जबर धक्का बसला. लागलीच त्यानें “ फ्रेंच राज्यक्रान्तीवरील विचार ” ( Reflections on the French Revolution ) हा आपला

प्रसिद्ध ग्रंथ लिहिला ( १७९० ऑक्टोबर ). फ्रेंच क्रान्तिकारक समाजाचा नाश करण्यास प्रवृत्त झाले आहेत, तेव्हां त्यांचा निःपात केला पाहिजे, हें मत बर्कनें त्यांत प्रतिपादिलें. हें पुस्तक इंग्लंडांत फार लोकप्रिय झालें व वर्ष दीड वर्षांत त्याच्या अकरा आवृत्ति खपल्या. 'प्रसिद्ध व्हिग पुढारी फॉक्स हा बर्कचा मोठा स्नेही होता. फ्रेंच राज्यक्रान्तीसंबंधीं त्या दोघां मित्रांचा मतभेद होऊन त्यांची मैत्री तुटली (१७९१). पुढें फ्रेंच क्रान्तिकारकांनीं अनेक अत्याचार केले आणि इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें युद्ध चालू झालें. तेव्हां बर्कला आनंद झाला व त्यानें फ्रान्सशीं युद्ध जोरानें चालवावें असें प्रतिपादन करण्यांत आपलें राहिलेलें आयुष्य घालविलें ( १७९३–१७९७ ).

१०. वॉशिंग्टन, जॉर्ज ( १७९३–१७९९ ). सतराव्या शतकांत अनेक स्वातंत्र्यप्रिय इंग्रजांनीं उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर वसाहती केल्या होत्या. अठराव्या शतकांत इंग्रजांच्या तेरा वसाहती उदयास आल्या. त्यांजमधील व्हर्जिनियामध्यें वॉशिंग्टनचा जन्म झाला. अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास क्यानडांतील फ्रेंच वसाहतींशीं इंग्लिश वसाहतींचें युद्ध जुंपलें. त्या वेळीं इंग्लिश वसाहतींच्या बाजूनें वॉशिंग्टननें पुढाकार घेतला होता. या युद्धांत शेवटीं इंग्लिशांचा जय होऊन फ्रेंचांची क्यानडांतून हकालपट्टी झाली ( १७६३ ). नंतर या युद्धांत झालेल्या खर्चाचा कांहीं भाग कराच्या रूपानें वसूल करण्याचा इंग्लंडनें हट्ट धरिला. तेव्हां तेरा इंग्लिश वसाहती व इंग्लंड यांजमध्यें युद्ध सुरू झालें ( १७७५ ). लवकरच अमेरिकनांनीं ' स्वातंत्र्याचा जाहीरनामा ' काढिला ( १७७६, जुलै ४). पूर्वीच्या युद्धांत वॉशिंग्टननें केलेली कामगिरी लक्षांत घेऊन अमेरिकनांनीं त्याला आपला सेनापति नेमिलें. हें स्वातंत्र्ययुद्ध १७७५पासून १७८३पर्यंत टिकलें. इंग्लंडच्या बाजूस कवायती फौज, पैसा व युद्धसामग्री यांचा भरपूर पुरवठा होता. अमेरिकन मात्र नवशिक्ये होते व सर्व वसाहतींची पुरी एकी नव्हती. त्यामुळें प्रथम इंग्लंडची सरशी झाली. अशा स्थितींत वॉशिंग्टनचें धाडस, धिमेपणा व धैर्य यांचा अमेरिकनांस मोठा उपयोग झाला. पुढें फ्रान्स, स्पेन इत्यादि राष्ट्रेंही इंग्लंडविरुद्ध लढूं लागलीं. त्यामुळें शेवटीं अमेरिकनांचा जय झाला. तह झाला,

त्यांत इंग्लंडनें अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य केलें ( १७८३ ); व युनायटेड स्टेट्स ( संयुक्त संस्थानें) या प्रसिद्ध राष्ट्राची उत्पत्ति झाली. पुढें १७८९त अमेरिकनांनीं लोकसत्ताकाची रीतसर घटना केली व वॉशिंग्टन यास त्याचा पहिला अध्यक्ष निवडिलें. नंतर चार वर्षांनीं पुनः त्याचीच अध्यक्षपदावर निवडणूक झाली. एकंदर आठ वर्षेंपर्यंत वॉशिंग्टननें अध्यक्षाचें काम उत्कृष्टपणें पार पाडिलें. पुनःतिसऱ्यानें लोकांनीं जेव्हां त्याची निवड केली, तेव्हां त्यानें मोठ्या निःस्वार्थीपणानें तें पद स्वीकारण्याचें नाकारिलें व साध्या माणसाप्रमाणें आपलें राहिलेलें आयुष्य घालविलें. वॉशिंग्टनच्या अनेक सद्गुणांवर लुब्ध होऊन व त्यानें बजाविलेली देशसेवा लक्षांत घेऊन युनायटेड स्टेट्सच्या राजधानीचें नांव वॉशिंग्टन ठेवण्यांत आलें. इतिहासांत वॉशिंग्टनसारखे शूर व शहाणे पुरुष अनेक होऊन गेले पण त्याच्यासारखे निःस्वार्थी व एकनिष्ठ देशभक्त सांपडणें कठिण.

**११. नेल्सन, होरेशिओ** (१७५८–१८०५). इंग्लंडचा राष्ट्रीय नाविक वीर. हा नॉर्फोक परगण्यांतील एका धर्मगुरूचा मुलगा होता. लहानपणापासूनच त्याला समुद्रावरील सफरींची आवड होती. लवकरच तो एका जहाजाचा कप्तान झाला. फ्रेंच राजक्रान्तीनंतर इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें जें जंगी युद्ध सुरू झालें त्यांत इंग्लिश नाविकांनीं मोठी मेहनत करून इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व कायम राखिलें. त्या सर्व नाविकांत नेल्सन हा प्रमुख होय. १७९५ सालीं जर्व्हिस व नेल्सन या दोघांनीं मिळून पोर्तुगालच्या पश्चिम किनाऱ्यावर सेंट व्हिन्सेंटजवळ फ्रान्स व स्पेन यांच्या संयुक्त आरमाराचा पूर्ण पराभव केला. पुढें १७९८सालीं प्रसिद्ध नेपोलियन बोनापार्टनें ईजिप्तमध्यें प्रवेश करून घेऊन आपलें आरमार नाइल नदीच्या मुखाशीं अबुकीरखाडींत ठेविलें होतें. नेल्सननें त्या आरमारावर हल्ला केला व त्याचा फन्ना उडविला. या कृत्यानें नेपोलियनचें फार मोठें नुकसान झालें. त्याचें फ्रान्सशीं दळणवळण तुटलें. त्यामुळें ईजिप्तमध्यें व पूर्वेकडे मुलूख जिंकण्याचा बेत त्यास सोडून द्यावा लागला. १८०१मध्यें डच आरमाराचा कोपेनहेगेन येथें नाश करून नेल्सननें इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व कायम राखिलें; आणि रशिया, स्वीडन व हॉलंड यांचा इंग्लंडविरुद्ध संघ हाणून पाडिला. पुढें १८०५

सालीं नेपोलियन बादशहानें इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं फ्रान्सच्या बंदरांत जंगी फौज तयार केली, व तिला इंग्लंडमध्यें उतरविण्यासाठीं फ्रेंच व स्पॅनिश आरमार सज्ज केलें. हा नेपोलियनचा बेत जर यशस्वी झाला असता तर इंग्लंड हा नेपोलियनच्या साम्राज्याचा सुभा होऊन सर्व युरोप खंड नेपोलियनचा दास बनलें असतें. या वेळीं नेल्सननें मोठ्या शिताफीनें फ्रेंच व स्पॅनिश यांच्या संयुक्त आरमारास ट्राफल्गार येथें गांठिलें व त्याचा पूर्ण नाश केला. या नेल्सनच्या विजयामुळें नेपोलियनची इंग्लंडवरील स्वारीची कल्पना निर्मूल झाली, व इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व कायम होऊन इंग्लिश आरमाराचा इतर राष्ट्रांच्या मनावर दरारा बसला. असा हा महत्त्वाचा जय इंग्लंडला सहज मिळाला नाहीं. लढाई चालू असतां नेल्सनला गोळी लागून जिव्हारी जखम झाली. तरी पण आपल्या बाजूस जय आला ही बातमी कळेपर्यंत तो जिवंत होता. जयाची बातमी कळतांच तो म्हणाला, "ईश्वरी कृपेनें मीं आपलें कर्तव्यकर्म केलें." नंतर त्याचें प्राणोत्क्रमण झालें. समुद्रावरील आपला साहसी आयुष्यक्रम चालवीत असतां त्याचा एक डोळा गेला होता व एक हात जाया झाला होता. ट्राफल्गारच्या विजयानें इंग्लंडच्या जिवावरील संकट टळलें; त्यामुळें नेल्सन इंग्रजांस अतिशय प्रिय होऊन राहिला आहे.

१२. **पिट, वुइल्यम,** धाकटा पिट ( १७५९–१८०६ ). अर्ल ऑफ चॅथमचा मुलगा. हा अवघा चोवीस वर्षांचा असतां मुख्य प्रधान झाला ( १७८३ ), व पुढें त्यानें एकसारखीं अठरा वर्षे इंग्लंडची राज्यनौका हांकली. पुनः १८०४ ते १८०६पर्यंत दुसऱ्यानें त्यानें मुख्य प्रधानाचें काम केलें. पहिलीं दहा वर्षें इंग्लंडची परराष्ट्रांशीं शांतता असून पिटला इंग्लंडांत निरनिराळ्या सुधारणा करण्यास अवकाश मिळाला. त्यानें औद्योगिक, सामाजिक व राजकीय अशा अनेक सुधारणा केल्या. तो प्रधानगिरीवर आला, तेव्हां राष्ट्रीय कर्ज खूप फुगलें असून दरसाल सरकारास तूट येत असे. अॅडॅम स्मिथनें ' राष्ट्रांची संपत्ति '(Wealth of Nations )हा ग्रंथ लिहिला होता; त्यांत खुल्या व्यापाराचें तत्त्व प्रतिपादिलें होतें. पिटला तें तत्त्व पटलें असल्यामुळें त्यानें भराभर जकातीचे

दर कमी केले. तथापि जकातीचें उत्पन्न कमी होण्याऐवजीं खूप वाढलें. तसेंच त्यानें फ्रान्सशीं व्यापारी तह केला; त्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांजमधील व्यापार खूप वाढला, व दोन्ही देशांचा फायदा झाला. पिट प्रधान झाला तत्पूर्वी राजाचें वजन फारच वाढलें होतें. पिटनें तिसऱ्या जॉर्जचें मन वळवून घेऊन पार्लमेंट व राजा यांजमध्यें सत्तेचा योग्य समतोल राखिला. पार्लमेंट अधिक लोकमतनिदर्शक व्हावी म्हणून त्यानें खटपट केली; पण श्रीमंत लोकांनीं या कामीं त्याला विरोध केला व त्याचा प्रयत्न फसला. १७८९ सालीं फ्रान्समधील राज्यक्रांति झाली व पुढें १७९३ सालीं इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें युद्ध जुंपलें; त्यामुळें पार्लमेंट—सुधारणेच्या कार्याची सिद्धि एक पिढी पुढें ढकलली गेली. युद्धकालीं देशाच्या शांततेचा बिघाड न व्हावा म्हणून पिटला अनेक दडपशाहीचे कायदे करावे लागले; इंग्लंड शांततेंत असतां त्याची उन्नति व्हावी यासाठीं पिटनें खूप खटपट केली; इतक्यांत युद्धाच्या दंगलीनें त्याच्या योजनेची घडी विसकटली. तथापि युद्धांतही त्यानें इंग्लंड यशस्वी व्हावें म्हणून मोठ्या चिकाटीची खटपट केली. त्यानें जमिनीवरून फ्रान्सशीं लढण्यास प्रशिया, रशिया, ऑस्ट्रिया, या राष्ट्रांस उत्तेजन दिलें व समुद्रावर फ्रेंच आरमाराचा पराभव करण्याचें काम त्यानें स्वतः पत्करिलें. शेवटीं दोन्ही पक्ष तुल्यबल ठरून तह झाला ( १८०२ ). युद्ध चालू असतां पिटनें १८००त आयरिश पार्लमेंट मोडून ती इंग्लिश पार्लमेंटास जोडून टाकिली. त्या वेळीं त्यानें क्याथॉलिकांस सवलती देण्याचें कबूल केलें होतें. परंतु तिसऱ्या जॉर्जच्या हट्टामुळें त्यास तसें करितां येईना. तेव्हां निरुपाय म्हणून त्यानें प्रधानगिरीचा राजीनामा दिला ( १८०१ ). फ्रान्स व इंग्लंड यांजमधील वरील तह फार काळ टिकला नाहीं. नेपोलियन या प्रसिद्ध सेनापतीचा फ्रेंचांच्या बाजूस उदय झाला होता. त्यानें इंग्लंडशीं पुनः युद्ध पुकारिलें. तें १८०३ते १८१५पर्यंत टिकलें. नेपोलियननें इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी चालविली. तेव्हां पिट मुख्य प्रधान झाला व त्यानें इंग्लिश आरमार सज्ज राखिलें. लवकरच नेल्सन या प्रसिध्द इंग्लिश नाविक वीरानें ट्राफलगार येथें फ्रेंच आरमाराचा पुरा मोड केला, व इंग्लंडवरील फ्रेंचांची स्वारी अशक्य

करून टाकिली. नंतर नेपोलियननें इंग्लंडवरील स्वारीसाठीं तयार केलेलें सैन्य ऑस्ट्रियावर नेलें व ऑस्टर्लिट्झ येथें ऑस्ट्रियाचा पराभव केला ( १८०५ ). ही बातमी पिटला समजली तेव्हां त्याला धक्का बसला व थोड्याच दिवसांत तो मृत्यु पावला ( १८०६ ). पिट हा चॅथॅम प्रमाणेंच मोठा वक्ता असून आंकडेशास्त्रावरील प्रभुत्वाच्या बाबतींत त्याचें वॉल्पोलशीं साम्य दिसून येतें. मात्र चॅथॅम हा यशस्वी युध्दमंत्री म्हणून नांवाजला, तर पिट हा शांतताकालांतील यशस्वी प्रधान म्हणून कीर्तिमान् झाला.

१३. विल्बरफोर्स, वुइल्यम ( १७५९—१८३३ ). गुलामगिरी घालवून टाकण्यासाठीं खटपट करणारा उदार गृहस्थ. अवघा चौदा वर्षांचा शाळेंत जाणारा विद्यार्थी असतां त्यानें यॉर्कमधील एका वर्तमानपत्रांत एक पत्र लिहून मानवी मांसाच्या व्यापाराविरुध्द कडक टीका केली. पुढें वारशाच्या हक्कानें त्याला मोठी मिळकत मिळाली. लवकरच त्यानें निग्रोंची गुलामगिरी नाहींशी करण्यासाठीं जोराचे प्रयत्न करण्याचा निश्चय केला. तो पार्लमेंटचा सभासद असून टोरी पक्षाचा अनुयायी होता व मुख्य प्रधान धाकटा पिट याचा परमस्नेही होता. लवकरच त्यानें या प्रश्नासंबंधीं पिटला अनुकूल करून घेतलें. आफ्रिकेंत निग्रो पकडून जहाजांवर भरावयाचे व मग अमेरिकेंत नेऊन उसांच्या मळ्यावर गुलाम म्हणून त्यांजकडून जनावरांप्रमाणें कामें करवून घ्यावयाचीं असा परिपाठ पडला होता. आफ्रिकेंतून अमेरिकेंत आणतांना गुलामांचे इतके हाल होत कीं, निम्मेअधिक ॲटलँटिक महासागर ओलांडीत असतांच मृत्युमुखीं पडत. तेव्हां प्रथम गुलामांचा अमानुष व्यापार बंद करण्याची चळवळ विल्बरफोर्सनें आरंभिली. १७८७त गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं एक सोसायटी स्थापिली गेली. विल्बरफोर्स त्या सोसायटींत मोठ्या उत्साहानें काम करीत असे. लवकरच पिटनें गुलामांचा व्यापार बंद करण्यासंबंधीं बिल पार्लमेंटपुढें मांडलें व तें पास होण्याचा रंग होता, इतक्यांत फ्रेंच राज्यक्रांति झाली; तेव्हां श्रीमंतांनीं या चळवळीस कसून विरोध केला व हा प्रश्न मागें पडला. तथापि विल्बरफोर्सनें पार्लमेंटांत एकसारखी खटपट चालविली. शेवटीं त्याच्या प्रय-

दर कमी केले. तथापि जकातीचें उत्पन्न कमी होण्याऐवजीं खूप वाढलें. तसेंच त्यानें फ्रान्सशीं व्यापारी तह केला; त्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांजमधील व्यापार खूप वाढला, व दोन्ही देशांचा फायदा झाला. पिट प्रधान झाला तत्पूर्वी राजाचें वजन फारच वाढलें होतें. पिटनें तिसऱ्या जॉर्जचें मन वळवून घेऊन पार्लमेंट व राजा यांजमध्यें सत्तेचा योग्य समतोल राखिला. पार्लमेंट अधिक लोकमतनिदर्शक व्हावी म्हणून त्यानें खटपट केली; पण श्रीमंत लोकांनीं या कामीं त्याला विरोध केला व त्याचा प्रयत्न फसला. १७८९ सालीं फ्रान्समधील राज्यक्रांति झाली व पुढें १७९३ सालीं इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें युद्ध जुंपलें; त्यामुळें पार्लमेंट—सुधारणेच्या कार्याची सिद्धि एक पिढी पुढें ढकलली गेली. युद्धकालीं देशाच्या शांततेचा बिघाड न व्हावा म्हणून पिटला अनेक दडपशाहीचे कायदे करावे लागले; इंग्लंड शांततेंत असतां त्याची उन्नति व्हावी यासाठीं पिटनें खूप खटपट केली; इतक्यांत युद्धाच्या दंगलीनें त्याच्या योजनेची घडी विसकटली. तथापि युद्धांतही त्यानें इंग्लंड यशस्वी व्हावें म्हणून मोठ्या चिकाटीची खटपट केली. त्यानें जमिनीवरून फ्रान्सशीं लढण्यास प्रशिया, रशिया, ऑस्ट्रिया, या राष्ट्रांस उत्तेजन दिलें व समुद्रावर फ्रेंच आरमाराचा पराभव करण्याचें काम त्यानें स्वतः पत्करिलें. शेवटीं दोन्ही पक्ष तुल्यबल ठरून तह झाला ( १८०२ ). युद्ध चालू असतां पिटनें १८००त आयरिश पार्लमेंट मोडून ती इंग्लिश पार्लमेंटास जोडून टाकिली. त्या वेळीं त्यानें क्याथॉलिकांस सवलती देण्याचें कबूल केलें होतें. परंतु तिसऱ्या जॉर्जच्या हट्टामुळें त्यास तसें करितां येईना. तेव्हां निरुपाय म्हणून त्यानें प्रधानगिरीचा राजीनामा दिला ( १८०१ ). फ्रान्स व इंग्लंड यांजमधील वरील तह फार काळ टिकला नाहीं. नेपोलियन या प्रसिद्ध सेनापतीचा फ्रेंचांच्या बाजूस उदय झाला होता. त्यानें इंग्लंडशीं पुनः युद्ध पुकारिलें. तें १८०३ते १८१५पर्यंत टिकलें. नेपोलियननें इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी चालविली. तेव्हां पिट मुख्य प्रधान झाला व त्यानें इंग्लिश आरमार सज्ज राखिलें. लवकरच नेल्सन या प्रसिध्द इंग्लिश नाविक वीरानें ट्राफलगार येथें फ्रेंच आरमाराचा पुरा मोड केला, व इंग्लंडवरील फ्रेंचांची स्वारी अशक्य

करून टाकिली. नंतर नेपोलियननें इंग्लंडवरील स्वारीसाठीं तयार केलेलें सैन्य ऑस्ट्रियावर नेलें व ऑस्टर्लिट्झ येथें ऑस्ट्रियाचा पराभव केला ( १८०५ ). ही बातमी पिटला समजली तेव्हां त्याला धक्का बसला व थोड्याच दिवसांत तो मृत्यु पावला ( १८०६ ). पिट हा चॅथॅम प्रमाणेंच मोठा वक्ता असून आंकडेशास्त्रावरील प्रभुत्वाच्या बाबतींत त्याचें वॉल्पोलशीं साम्य दिसून येतें. मात्र चॅथॅम हा यशस्वी युध्दमंत्री म्हणून नांवाजला, तर पिट हा शांतताकालांतील यशस्वी प्रधान म्हणून कीर्तिमान् झाला.

१३. विल्बरफोर्स, वुइल्यम ( १७५९—१८३३ ). गुलामगिरी घालवून टाकण्यासाठीं खटपट करणारा उदार गृहस्थ. अवघा चौदा वर्षांचा शाळेंत जाणारा विद्यार्थी असतां त्यानें यॉर्कमधील एका वर्तमानपत्रांत एक पत्र लिहून मानवी मांसाच्या व्यापाराविरुध्द कडक टीका केली. पुढें वारशाच्या हक्कानें त्याला मोठी मिळकत मिळाली. लवकरच त्यानें निग्रोंची गुलामगिरी नाहींशी करण्यासाठीं जोराचे प्रयत्न करण्याचा निश्चय केला. तो पार्लमेंटचा सभासद असून टोरी पक्षाचा अनुयायी होता व मुख्य प्रधान धाकटा पिट याचा परमस्नेही होता. लवकरच त्यानें या प्रश्नासंबंधीं पिटला अनुकूल करून घेतलें. आफ्रिकेंत निग्रो पकडून जहाजांवर भरावयाचे व मग अमेरिकेंत नेऊन उसाच्या मळयावर गुलाम म्हणून त्यांजकडून जनावरांप्रमाणें कामें करवून घ्यावयाचीं असा परिपाठ पडला होता. आफ्रिकेंतून अमेरिकेंत आणतांना गुलामांचे इतके हाल होत कीं, निम्मेअधिक अॅटलँटिक महासागर ओलांडीत असतांच मृत्युमुखीं पडत. तेव्हां प्रथम गुलामांचा अमानुष व्यापार बंद करण्याची चळवळ विल्बरफोर्सनें आरंभिली. १७८७त गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं एक सोसायटी स्थापिली गेली. विल्बरफोर्स त्या सोसायटींत मोठ्या उत्साहानें काम करीत असे. लवकरच पिटनें गुलामांचा व्यापार बंद करण्यासंबंधीं बिल पार्लमेंटपुढें मांडलें व तें पास होण्याचा रंग होता, इतक्यांत फ्रेंच राज्यक्रांति झाली; तेव्हां श्रीमंतांनीं या चळवळीस कसून विरोध केला व हा प्रश्न मागें पडला. तथापि विल्बरफोर्सनें पार्लमेंटांत एकसारखी खटपट चालविली. शेवटीं त्याच्या प्रय-

त्यांस यश येऊन १८०७मध्यें गुलामांचा व्यापार बंद झाला. तथापि अगोदरपासून असलेले गुलाम अजून कायम होतेच. यापुढें ब्रिटिश साम्राज्यांतून गुलामगिरी अजीबात नाहींशी करण्याची खटपट सुरू झाली. गुलामगिरी नाहींशी केली असतां 'वेस्ट इंडीजमधील' साखरेचा धंदा अगदीं बुडणार हें निश्चित होतें. तथापि कितीही नुकसान झालें तरी हा गुलामगिरीचा अमानुष प्रकार अगदीं बंद झालाच पाहिजे अशी विल्बरफोर्स आदिकरून उदारधी इंग्लिशांची पक्की समजूत झाली होती. तेव्हां त्यांनीं या पद्धतीचा जोरानें निषेध चालविला. शेवटीं ब्रिटिश पार्लमेंटनें भूतदयेनें प्रेरित होऊन अखिल ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरी नाहींशी करण्याचा कायदा पास केला, व वेस्ट इंडीजमधील मळेवाल्यांस नुकसानभरपाई म्हणून दोन कोटि पौंड मंजूर केले. अशा रीतीनें १८३३पासून ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व निग्रो गुलाम मुक्त झाले, व मानवी चरित्रक्रमावरील एक डाग धुवून निघाला. हा दास्य-विमोचनाचा कायदा पास होण्यापूर्वीं एक महिना विल्बरफोर्स मृत्यु पावला ( जुलै १८३३ ). यानंतर गुलामगिरी बंद करण्याची चळवळ इतर देशांतही सुरू झाली व ही अमानुष पद्धति चोहोंकडे बंद झाली.

१४. **स्टिफेन्सन जॉर्ज** ( १७८१—१८४८ ). आगगाडीचें पहिलें जें प्रसिद्ध एंजिन रॉकेट त्याचा शोधक. याचा बाप न्यूक्यासल ऑन टाइनजवळच्या एका गांवीं बाष्पयंत्रावर आगवाल्याचें काम करी. वयाच्या चौदाव्या वर्षीं आपल्या बापाचा मदतनीस म्हणून एक शिलिंग रोजावर जॉर्ज काम करूं लागला. तें काम करीत असतां, वाफेचा उपयोग जसा पाणी व कोळसा वर काढण्यास करितां येतो तसाच तो कोळशाच्या गाड्या लोखंडी रुळावरून ओढण्यास करितां येईल काय, हा प्रश्न त्याच्या मनांत घोळूं लागला. लहानपणीं गरिबीमुळें त्याचें शिक्षण मुळींच झालें नव्हतें. तेव्हां रात्रीं शाळेंत जाऊन तो लिहिण्या-वाचण्यास शिकला. पुढें एंजिन उकलून त्याच्या सर्व भागांचें ज्ञान त्यानें करून घेतलें. शेवटीं तो एंजिनिअर बनला. १८१४सालीं त्यानें 'माय लॉर्ड' नांवाचें नेआण करणारें एंजिन ( Locomotive ) तयार केलें. तें इतकें यशस्वी झालें कीं त्यानें यापुढें नेआण करणारीं एंजिनें तयार

करण्याचा एक कारखाना काढिला. लवकरच खाणींमधून कोळशाची नेआण करण्यास लोखंडी रस्त्यावरून घोड्यांऐवजीं स्टिफेन्सनचीं एंजिनें वापरण्यांत येऊं लागलीं. १८२५त स्टॉक्टन ते डार्लिंग्टनपर्यंत कायमचा लोखंडी रस्ता बांधण्यांत येऊन त्याच्या एंजिनचा वापर व्यवस्थितपणें होऊं लागला. पुढें मँचेस्टर व लिव्हरपूल यांजमध्यें एक पक्का लोखंडी रस्ता बांधण्यांत येऊन तेथील कंपनीच्या डायरेक्टरांनीं एक जलद चालणारें एंजिन तयार करणारास पांचशें पौंडांचें बक्षिस लाविलें. याच वेळीं स्टिफेन्सननें आपलें रॉकेट नांवाचें एंजिन तयार केलें होतें. त्या एंजिनानें एक उतारूंची गाडी ताशीं तीस मैल या वेगानें लिव्हरपूल ते मँचेस्टर या रस्त्यावरून नेली. अर्थातच पांचशें पौंड स्टिफेन्सनला मिळाले. एव्हांपासून आगगाडीचा प्रचार सरसहा सुरू झाला. यापुढें एंजिनें तयार करण्यांत, त्यांच्यांत सुधारणा करण्यांत, व नवीन रेल्वेरस्ता बांधण्यांत स्टिफेन्सनचा काळ गेला. लवकरच इंग्लंडांत व इतर देशांतून रेल्वेचें जाळें पसरण्यांत येऊन प्रवास झटपट, स्वस्त व सुखानें करण्याची सोय झाली; तसेंच पत्रेंही रेल्वेनें नेण्यांत येऊं लागलीं. अशा रीतीनें आगगाडीच्या शोधानें दळणवळणाच्या व प्रवासाच्या साधनांत क्रांति घडून आली. हल्लीं तर आगगाडी रोजच्या व्यवहारांतील गोष्ट होऊन बसली आहे. स्टिफेन्सननें रॉकेटचा शोध लाविला व आगगाडींतून प्रथम उतारू नेण्यास सुरुवात केली, यावरून त्याला आगगाडीचा जनक ( Father of the Railway ) म्हणतात.

१५. **पील, सर रॉबर्ट** ( १७८८–१८५० ). हा एकोणिसाव्या शतकांतील कर्तबगार प्रधान असून त्यानें धान्याचा कायदा रद्द करून इंग्लिश मजूरवर्गास स्वस्त धान्य मिळण्याची सोय करून दिली. त्याचें शिक्षण हॅरो व ऑक्सफर्ड येथें होऊन भाषा व गणित या दोन्ही विषयांत त्यानें उत्तम प्रभुत्व संपादिलें. १८०९त तो प्रथम पार्लमेंटांत निवडून आला. हा टोरी पक्षाचा अनुयायी असून १८२२त गृहमंत्री झाला. तेव्हां त्यानें गुन्ह्यांची संख्या व शिक्षा खूप कमी करून फौजदारी कायद्यांत भूतदयेस अनुसरून सुधारणा घडवून आणिली. पुढें १८२८त वेलिंग्टन मुख्य प्रधान असतां पील पुनः गृहमंत्री झाला. तेव्हां त्यानें

त्यांस यश येऊन १८०७मध्यें गुलामांचा व्यापार बंद झाला. तथापि अगोदरपासून असलेले गुलाम अजून कायम होतेच. यापुढें ब्रिटिश साम्राज्यांतून गुलामगिरी अजीबात नाहींशी करण्याची खटपट सुरू झाली. गुलामगिरी नाहींशी केली असतां 'वेस्ट इंडीजमधील' साखरेचा धंदा अगदीं बुडणार हें निश्चित होतें. तथापि कितीही नुकसान झालें तरी हा गुलामगिरीचा अमानुष प्रकार अगदीं बंद झालाच पाहिजे अशी विल्बरफोर्स आदिकरून उदारधी इंग्लिशांची पक्की समजूत झाली होती. तेव्हां त्यांनीं या पद्धतीचा जोरानें निषेध चालविला. शेवटीं ब्रिटिश पार्लमेंटनें भूतदयेनें प्रेरित होऊन अखिल ब्रिटिश साम्राज्यांतील गुलामगिरी नाहींशी करण्याचा कायदा पास केला, व वेस्ट इंडीजमधील मळेवाल्यांस नुकसानभरपाई म्हणून दोन कोटि पौंड मंजूर केले. अशा रीतीनें १८३३पासून ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व निग्रो गुलाम मुक्त झाले, व मानवी चरित्रक्रमावरील एक डाग धुवून निघाला. हा दास्य-विमोचनाचा कायदा पास होण्यापूर्वीं एक महिना विल्बरफोर्स मृत्यु पावला ( जुलै १८३३ ). यानंतर गुलामगिरी बंद करण्याची चळवळ इतर देशांतही सुरू झाली व ही अमानुष पद्धति चोहोंकडे बंद झाली.

१४. **स्टिफेन्सन जॉर्ज** ( १७८१—१८४८ ). आगगाडीचें पहिलें जें प्रसिद्ध एंजिन रॉकेट त्याचा शोधक. याचा बाप न्यूक्यासल ऑन टाइनजवळच्या एका गांवीं बाष्पयंत्रावर आगवाल्याचें काम करी. वयाच्या चौदाव्या वर्षीं आपल्या बापाचा मदतनीस म्हणून एक शिलिंग रोजावर जॉर्ज काम करूं लागला. तें काम करीत असतां, वाफेचा उपयोग जसा पाणी व कोळसा वर काढण्यास करितां येतो तसाच तो कोळशाच्या गाड्या लोखंडी रुळावरून ओढण्यास करितां येईल काय, हा प्रश्न त्याच्या मनांत घोळूं लागला. लहानपणीं गरिबीमुळें त्याचें शिक्षण मुळींच झालें नव्हतें. तेव्हां रात्रीं शाळेंत जाऊन तो लिहिण्या-वाचण्यास शिकला. पुढें एंजिन उकलून त्याच्या सर्व भागांचें ज्ञान त्यानें करून घेतलें. शेवटीं तो एंजिनिअर बनला. १८१४साली त्यानें 'माय लॉर्ड' नांवाचे नेआण करणारें एंजिन ( Locomotive ) तयार केलें. तें इतकें यशस्वी झालें कीं त्यानें यापुढें नेआण करणारीं एंजिनें तयार

करण्याचा एक कारखाना काढिला. लवकरच खाणींमधून कोळशाची नेआण करण्यास लोखंडी रस्त्यावरून घोड्यांऐवजीं स्टिफेन्सनचीं एंजिनें वापरण्यांत येऊं लागलीं. १८२५त स्टॉक्टन ते डार्लिंग्टनपर्यंत कायमचा लोखंडी रस्ता बांधण्यांत येऊन त्याच्या एंजिनचा वापर व्यवस्थितपणें होऊं लागला. पुढें मँचेस्टर व लिव्हरपूल यांजमध्यें एक पंक्का लोखंडी रस्ता बांधण्यांत येऊन तेथील कंपनीच्या डायरेक्टरांनीं एक जलद चालणारें एंजिन तयार करणारास पांचशें पौंडांचें बक्षिस लाविलें. याच वेळीं स्टिफेन्सननें आपलें रॉकेट नांवाचें एंजिन तयार केलें होतें. त्या एंजिनानें एक उतारूंची गाडी ताशीं तीस मैल या वेगानें लिव्हरपूल ते मँचेस्टर या रस्त्यावरून नेली. अर्थातच पांचशें पौंड स्टिफेन्सनला मिळाले. एव्हांपासून आगगाडीचा प्रचार सरसहा सुरू झाला. यापुढें एंजिनें तयार करण्यांत, त्यांच्यांत सुधारणा करण्यांत, व नवीन रेल्वेरस्ता बांधण्यांत स्टिफेन्सनचा काळ गेला. लवकरच इंग्लंडांत व इतर देशांतून रेल्वेचें जाळें पसरण्यांत येऊन प्रवास झटपट, स्वस्त व सुखानें करण्याची सोय झाली; तसेंच पत्रेंही रेल्वेनें नेण्यांत येऊं लागलीं. अशा रीतीनें आगगाडीच्या शोधानें दळणवळणाच्या व प्रवासाच्या साधनांत क्रांति घडून आली. हल्लीं तर आगगाडी रोजच्या व्यवहारांतील गोष्ट होऊन बसली आहे. स्टिफेन्सननें रॉकेटचा शोध लाविला व आगगाडींतून प्रथम उतारू नेण्यास सुरुवात केली, यावरून त्याला आगगाडीचा जनक ( Father of the Railway ) म्हणतात.

१५. **पील, सर रॉबर्ट** ( १७८८–१८५० ). हा एकोणिसाव्या शतकांतील कर्तबगार प्रधान असून त्यानें धान्याचा कायदा रद्द करून इंग्लिश मजूरवर्गास स्वस्त धान्य मिळण्याची सोय करून दिली. त्याचें शिक्षण हॅरो व ऑक्सफर्ड येथें होऊन भाषा व गणित या दोन्ही विषयांत त्यानें उत्तम प्रभुत्व संपादिलें. १८०९त तो प्रथम पार्लमेंटांत निवडून आला. हा टोरी पक्षाचा अनुयायी असून १८२२त गृहमंत्री झाला. तेव्हां त्यानें गुन्ह्यांची संख्या व शिक्षा खूप कमी करून फौजदारी कायद्यांत भूतदयेस अनुसरून सुधारणा घडवून आणिली. पुढें १८२८त वेलिंग्टन मुख्य प्रधान असतां पील पुनः गृहमंत्री झाला. तेव्हां त्यानें

क्याथॉलिकांस पार्लमेंटचे सभासद होण्याची परवानगी देणारा कायदा पास करून घेतला. १८३२चें रिफॉर्म बिल पास झाल्यावर पक्के टोरी नाहींतसे झाले, प्रगतिप्रिय टोरींनीं लिबरलांस विरोधी असा कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष काढिला, व पील त्या पक्षाचा पुढारी बनला. १८४१तील निवडणुकीनंतर जमीनदारवर्गाच्या अनुकूलतेमुळें कॉन्सर्व्हेटिव्हांचें पार्लमेंटांत बहुमत झालें व पील मुख्य प्रधान झाला. त्याची सत्ता १८४१पासून १८४६पर्यंत टिकली. एवढ्या वेळांत त्यानें आयात होणाऱ्या कच्च्या मालावरील व जरूरीच्या पुष्कळ पदार्थांवरील जकाती उठविल्या व उत्पन्नांत येणारी तूट प्राप्तीवरील कर(Income tax) बसवून भरून काढिली. धान्याचा कायदा रद्द करावा म्हणून १८३८पासून उद्योगधंद्यांच्या भागांत जोराची चळवळ चालू झाली होती. १८४५त आयर्लंडांतील बटाट्याचें पीक बुडालें. तेव्हां धान्याचा कायदा रद्द करून परदेशांतील स्वस्त धान्य देशांत आयात होऊं दिलेंच पाहिजे असें पीलचें मत बनलें. लागलीच त्यानें धान्याचा कायदा रद्द करण्याचें बिल पास केलें(१८४६). तेव्हां जमीनदारवर्ग त्याच्याविरुद्ध अगदीं चिडून गेला व कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांत फूट पडली. कित्येक तरुण कॉन्सर्व्हेटिव्हांनीं पीलनें आपल्या पक्षाच्या तत्त्वांशीं द्रोह केला असें म्हणून त्याला फार दोष दिला. या मंडळींत पुढें प्रसिद्धीस आलेला कॉन्सर्व्हेटिव्ह पुढारी डिझरेली हा प्रमुख होता. लवकरच या मंडळींनीं एका आयरिश बिलांवर लिबरलांच्या बाजूनें मतें देऊन सरकारचा पराभव केला. तेव्हां पीलनें राजीनामा दिला. पुढें १८५० सालीं घोड्यावरून पडून पील वारला. सामान्यजनतेची गरज ओळखून त्यानें धान्याचा कायदा रद्द केला ही मोठीच कामगिरी केली. धान्याचा कायदा रद्द झाला तेव्हांपासून इंग्लंडांत खुल्या व्यापाराचें तत्त्व जोरानें अंमलांत आलें व आजपर्यंत तेथें याच तत्त्वाचें वर्चस्व आहे.

१६. **पामर्स्टन**, हेन्री जॉन टेंपल, व्हायकाउंट पामर्स्टन ( १७८४–१८६५). एकोणिसाव्या शतकांतील इंग्लंडचा एक प्रसिद्ध परराष्ट्रीय मंत्री. हॅरो येथील शाळेंत व केंब्रिज येथील सेंट जॉन कॉलेजांत त्याचें शिक्षण झालें. १८०२ सालीं त्याचा बाप वारला; तेव्हां तरुण टेंपलला कुटुंबांतील खूप संपत्ति व आयर्लंडांतील जमीन मिळाली व तो आयरिश

उमराव बनून व्हायकाउंट पामर्स्टन झाला. १८०७त तो ' आइल ऑफ वाइट ' मधील बरोतर्फे पार्लमेंटांत निवडून आला. एव्हांपासून जवळ जवळ साठ वर्षांनीं मृत्यु पावला तोंपर्यंत तो हाउस ऑफ कॉमन्सचा सभासद म्हणून कायम राहिला. तो १८०९पासून १८२८-पर्यंत टोरी प्रधानमंडळांत युद्धमंत्री (Secretary at War) होता. या वेळीं तो नेमस्त टोरी असून क्यानिंगचीं मतें त्याला मान्य असत. पुढें १८३०त व्हिग म्हणजे लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला. तेव्हां पामर्स्टन त्या पक्षास जाऊन मिळाला. १८३०पासून त्याच्या आयुष्यांतील बहुतेक सर्व काळ तो प्रधानमंडळांत असून इंग्लंडचा परराष्ट्रीय मंत्री म्हणून काम करी. १८३०त व्हिग पक्षाच्या हातीं अधिकारसूत्रें आलीं तीं पांच सात वर्षें वगळून १८७४पर्यंत त्याच्या हातीं टिकलीं. इंग्लंडचें परराष्ट्रीय खातें दीर्घकालपर्यंत पामर्स्टनच्या हातीं राहिल्यामुळें त्या कामांत तो फार निष्णात व अनुभवी झाला होता. इंग्लंडांत १८३२-च्या सुधारणा-कायद्यानें सनदशीर राज्यपद्धति बरीच विकास पावली होती. युरोपांतील इतर देशांतून सनदशीर राज्यपद्धति स्थापिली जावी यासाठीं खटपटी चालल्या होत्या व कित्येक राष्ट्रें परतंत्र होतीं तीं स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं प्रयत्न करीत होतीं. पामर्स्टननें या प्रयत्नांविषयीं सहानुभूतीचें धोरण स्वीकारिलें. याच तत्त्वास अनुसरून त्यानें बेलजियमचें हॉलंडपासून स्वातंत्र्य मान्य केलें ( १८३० ). युरोपांतील राष्ट्रांत इंग्लंडचें वजन चांगलें रहावें हें पामर्स्टनच्या परराष्ट्रीय धोरणाचें मुख्य सूत्र असे. पामर्स्टनचा आत्मविश्वास दांडगा असल्यानें तो केव्हां केव्हां आपल्या सहकारी मंत्र्यांस किंवा राणीस न विचारतां महत्त्वाच्या गोष्टी करी. १८५१त त्यानें लुई नेपोलियन फ्रान्सचा कायमचा अध्यक्ष बनला त्या कृत्यास संमति दिली. तेव्हां राणीस राग येऊन पामर्स्टनला आपलें मंत्रीपद सोडावें लागलें. पुढें तुर्कस्थानला आपल्या संरक्षणाखालीं आणण्याची रशिया खटपट करूं लागला. हिंदुस्थानच्या मार्गावर शत्रुराष्ट्राचा ताबा रहावा हें ब्रिटिश साम्राज्यास धोक्याचें होतें. लागलीच क्रिमियन युद्ध सुरू होऊन इंग्लंडनें तुर्कस्थानची बाजू उचलली. या युद्धांत प्रथम इंग्लंडला पराजय आला, तेव्हां पामर्स्टन मुख्य प्रधान

झाला व मग युद्धाचा रंग पालटला. शेवटीं पामर्स्टनच्या कर्तबगारीनें क्रिमियन युद्धांत इंग्लंडला जय आला व रशियाच्या सत्तेस आळा बसला. १८५५पासून १८६५त पामर्स्टन मृत्यु पावला तेथवर एक वर्ष वगळून तो मुख्य प्रधानाच्या जागीं राहिला. या काळीं त्याच्या पूर्वीच्या कामगिरीमुळें तो लोकप्रिय झाला होता. पार्लमेंटचे सभासद निवडण्याचा हक्क अधिक लोकांस देऊन इंग्लंडांत लोकशाही सुरू करण्यास पामर्स्टन विरुद्ध असल्यामुळें लोकशाही पुढें ढकलली गेली. त्याच्या प्रधानगिरीच्या वेळीं इटलींतील निरनिराळीं स्वतंत्र राज्यें काढून टाकून इटली या संयुक्त राष्ट्राची इटालियन देशभक्तांनीं स्थापना केली. त्या वेळीं इटालियनांच्या प्रयत्नास पामर्स्टननें पाठिंबा दिला व त्यामुळें त्यांचें काम हलकें झालें. मात्र याच वेळीं डेन्मार्क व पोलंड यांना इतर राष्ट्रें दुखवीत असतां इंग्लंडनें शब्दाप्रमाणें कृति केली नाहीं व त्या दोन्ही राष्ट्रांचें नुकसान झालें. एकंदरीनें गृहसुधारणेकडे पामर्स्टनचें केव्हांच लक्ष नव्हतें. परराष्ट्रांत इंग्लंडचें वजन वाढावें व ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित रहावें यासाठीं तो एकसारखे प्रयत्न करीत होता, व ही कामगिरी त्यानें चांगली बजाविली.

**१७. डिझरेली, बेंजामिन,** अर्ल ऑफ बीकन्सफील्ड (१८०४-१८८१). एकोणिसाव्या शतकांतील मोठा साम्राज्यवादी कॉन्सर्व्हेटिव्ह मुत्सद्दी. प्रथम 'व्हिव्हियन ग्रे' ह्या कादंबरीचा कर्ता म्हणून तो प्रसिद्धीस आला. तो १८३७त हाउस ऑफ कॉमन्समध्यें निवडून आला. चमत्कारिक पोषाक व वागण्याची तऱ्हेवाईक पद्धति यामुळें प्रथम पार्लमेंटांत त्याचें हसें झालें. पण लवकरच त्याच्या तीव्र बुद्धीचा प्रभाव दिसूं लागला. १८४६त पीलनें धान्याचा कायदा रद्द केला तेव्हां आपल्या पक्षाशीं द्रोह केल्याबद्दल डिझरेलीनें त्याच्यावर टीकेची झोड उठविली; व पुढें व्हिग पक्षाच्या बाजूनें मतें देऊन पीलला प्रधानगिरीवरून हुसकून लाविलें. यानंतर कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षांतील प्रमुख पुढाऱ्यांत डिझरेलीची गणना होऊं लागली. १८५८ व १८६७ या सालीं तो प्रधानमंडळांत फडणविशीच्या जागेवर होता. १८६७ सालीं त्यानें पार्लमेंटांत सुधारणा करण्याचें बिल पास करून घेतलें व कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षही पार्लमेंटसुधारणेस

अनुकूल आहे असें दाखवून ब्रिटिश जनतेचीं मनें आपल्या बाजूकडे वळविलीं. १८७४त हाउस ऑफ कॉमन्समध्यें कॉन्सर्व्हेटिव्हांचें बहुमत झालें, तेव्हां डिझरेली मुख्य प्रधान झाला. त्याचें प्रधानमंडळ १८७४पासून १८८०पर्यंत टिकलें. या काळांत त्यानें मजूरवर्गाच्या हितार्थ अनेक कायदे करून त्या वर्गाची सहानुभूति संपादन केली व नाना युक्त्या करून ब्रिटिश साम्राज्याचा बोज वाढविला. १८५५त त्यानें सुएझ कनॅल कंपनीचे निम्मे शेअर विकत घेऊन इंग्लंडचा ईजिप्तमध्यें शिरकाव करून दिला, व सुएझच्या कालव्यावर मालकीहक्क मिळाल्यामुळें हिंदुस्थानचा मार्ग सुरक्षित केला. १८७६च्या शेवटीं डिझरेली 'अर्ल ऑफ बीकन्सफील्ड' झाला. रशियानें तुर्कस्थानवर स्वारी केली तेव्हां तुर्कस्थानची बाजू घेऊन बीकन्सफील्डनें हिंदुस्थानांतील फौज माल्टा येथें आणून ठेविली, ब्रिटिश आरमार डार्डानेल्झ सामुद्रधुनीवर नेलें आणि रशियास युद्धाचा धाक दाखविला. तेव्हां रशिया सामाचें बोलणें बोलण्यास तयार झाला. नंतर बर्लिन येथें सर्व मुख्य राष्ट्रांची परिषद भरली; तींत बीकन्सफील्डनें तुर्कस्थानला बऱ्याच सवलती मिळवून दिल्या, व त्याचा मोबदला म्हणून सायप्रस बेट ब्रिटनसाठीं मिळविलें (१८७८). १८७७त त्यानें व्हिक्टोरियाकडून 'हिंदुस्थानची बादशाहीण' असा किताब घेवविला, दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांस झुलू लोकांशीं लढण्यास मदत केली, व बोअर लोकांचा ट्रान्सवाल देश ब्रिटिश साम्राज्यास जोडून घेतला. त्याच्या जोरदार परराष्ट्रीय धोरणामुळें खर्च फार होई, व घरगुती प्रश्नांकडे तो फारच कमी लक्ष देत असे. १८८०च्या निवडणुकींत लिबरलांची सरशी झाली व बीकन्सफील्डच्या प्रधानमंडळास राजीनामा द्यावा लागला. पुढें १८८१ सालीं तो मरण पावला. बीकन्सफील्ड वादविवाद करण्यांत कुशल असून आपल्या चमत्कृतिजनक शब्दयोजनेनें श्रोत्यांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घेई. तो पक्का साम्राज्यवादी होता व आपल्या पक्षाचें बहुमत सिद्ध करण्यासाठीं पार्लमेंटची सुधारणा करण्यासही तो तयार असे.

१८. पार्नेल, चार्लस स्टुअर्ट (१८४६–१८९१). आयरिश होमरूल चळवळीचा प्रसिद्ध पुढारी. तो एका सुखवस्तु आयरिश

जमीनदाराच्या घराण्यांत जन्मला. त्याची आई अमेरिकेंत जाऊन राहिलेल्या एका आयरिश घराण्यापैकीं असून तिच्यापासून इंग्लंडच्या द्वेषाचें बाळकडू पार्नेलला मिळालें. लहानपणापासून तो गंभीर व मितभाषी असून विद्यार्थिदशेंत राजकारणाची त्याला मुळींच आवड नव्हती. १८७० सालीं आयर्लंडला कायदेशीर मार्गानें होमरूल म्हणजे स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्यासाठीं डब्लिन येथें ब्रिटिश पार्लमेंटमधील आयरिश सभासदांचा एक संघ स्थापिला गेला होता. या संघाच्या म्हणण्याकडे ब्रिटिश प्रधानमंडळ पूर्ण दुर्लक्ष करी. १८७५त पार्नेल हाउस ऑफ कॉमन्सचा सभासद झाला होता; त्याला ब्रिटिश प्रधानमंडळाच्या या कृतीची चीड आली व त्यानें लवकरच ब्रिटिश प्रधानमंडळाचें आयरिश प्रश्नाकडे लक्ष वेधण्याची एक खाशी युक्ति काढिली. शिष्टाचार बाजूस ठेवून होमरूलवादी आयरिश सभासदांनीं पार्लमेंटांत भाषणें करावीं, वेळ दवडावा व पार्लमेंटांत सरकारचें कांहींच कामकाज होऊं देऊं नये असा हा मार्ग होता. तसेंच पार्नेलनें १८७९त आयरिश शेतकऱ्यांच्या जमीनीचे खंड हलके व्हावे व कालांतरानें ते आपल्या जमिनीचे मालक व्हावे या उद्देशानें शेतकरी-संघ ( Land League , लँड लीग ) स्थापिला; नंतर पार्नेल अमेरिकेस गेला व तेथें रहाण्यास गेलेल्या आयरिश लोकांची सहानुभूति मिळवून आपल्या कार्यास चार लक्ष पौंडांची मदत त्यानें आणिली. पार्नेलच्या या युक्त्यांनीं ब्रिटिश सरकारचें आयरिश प्रश्नांकडे लक्ष वेधलें व आयरिश जनतेंत मोठी जागृति झाली. जुलुमी जमीनदार व त्यांचे मुखत्यार यांजवर सामाजिक बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू झाली व आयर्लंडांत दंगेधोपे होऊं लागले. तेव्हां लिबरल मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यानें पार्नेल आदिकरून पुढाऱ्यांस कैदेंत टाकिलें. तरी शांतता होईना. शेवटीं ग्लॅडस्टननें सामोपचाराचें धोरण स्वीकारलें व किल्मनहॅम तुरुंगांतून पार्नेलची सुटका केली. यापुढें आयरिश तक्रारींचा निकाल शांततेनें होईल अशी आशा वाटूं लागली. परंतु लवकरच क्याव्हेंडिश व बर्क या अधिकाऱ्यांचे डब्लिनमध्यें खून झाले ( १८८२ ). तेव्हां ब्रिटिश सरकारनें पुनः दडपशाही सुरू केली व कोणाही इसमास गुन्ह्याच्या संशयावरून

पकडून कैदेंत ठेवण्याचा अधिकार आयलॅंडच्या लॉर्ड लेफ्टनंटला दिला. इकडे पार्नेलनें पुनः पार्लमेंटांत अडवणूक चालू केली व १८८५त कॉन्सर्व्हेटिव्हांस मिळून लिबरलांस राजीनामा देणें भाग पाडिलें. पुढें १८८६त झालेल्या निवडणुकींत लिबरलांची सरशी झाली. परंतु अधिकारसूत्रें आपल्या हातीं ठेवावयाचीं तर आयरिश राष्ट्रीय पक्ष आपल्या बाजूस ओढणें जरूर असें ग्लॅडस्टनला आढळून आलें. लागलीच त्यानें होमरूलचा अंगीकार केला, तेव्हां पार्नेलनें ग्लॅडस्टनला पाठिंबा देण्याचें ठरविलें. परंतु यापुढें लिबरल पक्षांत फूट झाल्यामुळें ग्लॅडस्टनचें आयरिश होमरूल बिल कॉमन्समध्यें नापास झालें. पुनः निवडणूक झाली तींत दोन्ही पार्लमेंटांचें ऐक्य कायम ठेवूं इच्छिणारे यूनियनिस्ट बहुमतानें निवडून आले. १८८७ सालीं लंडन टाइम्सनें अत्याचारी चळवळीस पार्नेलची सहानुभूति आहे आणि क्याव्हेंडिश व बर्क यांच्या खुनास त्याची संमति होती असा आरोप पार्नेलवर आणिला. पुढें पार्लमेंटनें नेमिलेल्या कमिशनपुढें या आरोपाची चौकशी झाली. तेव्हां ज्या पत्राच्या आधारावर खुनास संमति असल्याचा आरोप केला होता तें पत्र बनावट असल्याचें सिद्ध झालें ( १८९० ). या प्रकरणीं पार्नेलची बाजू यशस्वी झाल्यामुळें त्याचा सर्व देशांत मोठा गौरव झाला. पण यापुढें लवकरच मिसेस ओशी बाईशीं त्याचा प्रेमसंबंध उघडकीस आला. तेव्हां पार्नेलचे कांहीं अनुयायी त्यानें आयरिश राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा असें म्हणूं लागले व कांहीं पूर्वस्थितिच कायम रहावी असा हेका धरून बसले. आपलें अध्यक्षपद कायम रहावें म्हणून पार्नेलनें खूप खटपट केली. या प्रकरणीं त्याला फार दगदग पडली व चिंता लागून राहिली. शेवटीं या दोहोंचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊन तो आपल्या वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षीं वारला. पार्नेल मोठा बाणेदार असून त्यानें आयरिश प्रश्नास ब्रिटिश पार्लमेंटांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलें व आपल्या कर्तबगारीनें आयरिश सभासदांची एकजूट करून इंग्लिश लोकांच्या दोन मुख्य पक्षांपैकीं एका लिबरल पक्षाकडून आयरिश होमरूलचा अंगीकार करविला.

१९ ग्लॅडस्टन, वुइल्यम एवर्ट ( १८०९–१८९८ ). एकोणि-

साऱ्या शतकांतील अतिशय प्रसिद्ध लिबरल मुत्सद्दी. तो एका व्यापाऱ्याचा मुलगा असून त्याचें शिक्षण ईटन व ऑक्सफर्ड येथें झालें. विद्यार्थिदशेंत तो मोठा हुशार म्हणून नांवाजला होता. १८३३त तो पार्लमेंटमध्यें निवडून आला. तो पीलचा अनुयायी होता. लवकरच भव्य आकृति, गोड आवाज, व भाषाप्रभुत्व या गुणांनीं त्याची हाउस ऑफ कॉमन्समध्यें छाप पडली. पीलच्या मृत्यूनंतर त्याचे कित्येक अनुयायी लिबरल पक्षांत सामील झाले त्यांत ग्लॅडस्टन प्रमुख होय. पामर्स्टन मुख्य प्रधान असतां ग्लॅडस्टन फडनविसाच्या जागेवर होता. खुल्या व्यापाराच्या तत्त्वावर त्याचा पूर्ण विश्वास बसला असल्यामुळें त्यानें दर अंदाजपत्रकांत अनेक पदार्थांवरील जकाती उठविल्या. तथापि देशाच्या भरभराटीमुळें व वाढत्या व्यापारामुळें सरकारी उत्पन्नाची वाढच झाली. ग्लॅडस्टनचीं मतें फार प्रगमनशील झालीं होतीं व मतदारीचा हक्क अधिक लोकांस देऊन पार्लमेंट अधिक लोकमतनिदर्शक करावी असें त्याचें म्हणणें होतें. पामर्स्टनच्या मृत्यूनंतर पार्लमेंटमध्यें तशी सुधारणा घडून आली ( १८६७ ). नंतर झालेल्या निवडणुकींत लिबरल पक्ष मोठ्या बहुमतानें निवडून आला व ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला. १८६८ ते १८७४पर्यंत ग्लॅडस्टनचें प्रथम प्रधानमंडळ टिकलें. या काळांत त्यानें अनेक सुधारणा केल्या. आयर्लंडमधील सरकारी प्रॉटेस्टंट धर्मखातें रद्द केलें व जमीनबाबत कायदे करून आयरिश शेतकऱ्यांचें दुःख हलकें केलें; तसेंच गुप्तमतदानपद्धति सुरू करून गरीब मतदारांवरील श्रीमंतांचा जुलूम नाहींसा केला. सैन्याच्या व्यवस्थेंतही त्यानें सुधारणा केली. त्यानें केलेल्या सुधारणांपैकीं अतिशय महत्त्वाची म्हणजे १८७० सालीं त्यानें पास करून घेतलेल्या सक्तीच्या शिक्षणाचा कायदा होय. या कायद्यानें प्राथमिक शिक्षण सरकारनें आपल्या हातीं घेतलें व त्यामुळें शिक्षणप्रसार झपाट्यानें झाला. लोकशाही सुरू झाल्यामुळें जनता साक्षर होणें जरूर होतें व त्या दृष्टीनें ही शिक्षणव्यवस्था ठीक झाली. पुनः ग्लॅडस्टननें १८८४ सालीं अधिकारारूढ असतां पार्लमेंट--सुधारणेचा तिसरा कायदा पास करून घेतला व त्यायोगानें खेडेगांवांतील मजुरांनाही मतदारीचा हक्क मिळाला. आपल्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचीं शेवटचीं

वर्षें ग्लॅडस्टननें आयर्लंडला होमरूल देण्याची खटपट करण्यांत घालविली; पण या कामीं त्याला यश आलें नाहीं. १८८६त व १८९३त त्यानें मुख्य प्रधान असतां, आयरिश होमरूल-बिल कॉमन्ससभेपुढें आणिलें व दुसऱ्या वेळीं तें त्या सभेंत पासही झालें. पण लॉर्डांनीं तें फेटाळून लाविलें. शिवाय या ग्लॅडस्टनच्या होमरूलच्या अंगीकारामुळें लिबरल पक्षांत फूट पडली. जोसेफ चेंबर्लेन आदिकरून अनुयायांनीं ग्लॅडस्टनला सोडून लिबरल यूनियनिस्ट असा नवा पक्ष काढिला व ते कॉन्सर्व्हेटिव्हांस जाऊन मिळाले. पुढें ग्लॅडस्टन १८९८त मृत्यु पावला. ब्रिटिश साम्राज्यांत शांतता रहावी व सर्वांस पूर्ण न्याय मिळावा यासाठीं त्याची खटपट असे. अर्थातच त्याचें परराष्ट्रीय धोरण केव्हांच जोरदार झालें नाहीं. त्याच्या खटपटीनें लोकशाहीची प्रगति झाली. त्याच्या आंकडेशास्त्रांतील प्राविण्यामुळें व उत्कृष्ट वक्तृत्वामुळें पार्लमेंटवर व इंग्लिश जनतेवर त्याचें अप्रतिम वजन बसून गेलें होतें.

२०. लॉइड जॉर्ज, डेव्हिड, ( १८६३— ) १९१४ ते १९१८च्या महायुद्धांतील यशस्वी ब्रिटिश मुत्सद्दी. लॉइड जॉर्जचा जन्म गरीब वेल्श कुलांत झाला. त्याच्या लहानपणींच त्याचा बाप वारल्यामुळें त्याचें शिक्षण त्याच्या मामाकडून झालें. १८८४त तो सॉलिसिटर झाला व १८९०त वेल्समधील कारनॅर्व्हनतर्फे हाउस ऑफ कॉमन्समध्यें निवडून आला. प्रथमपासूनच तो लिबरल पक्षांत सामील झाला व वक्तृत्वपूर्ण भाषणें करून लवकरच त्यानें कॉमन्ससभेंत आपली छाप पाडली. १९०६च्या आरंभीं पार्लमेंटांत जंगी बहुमतानें लिबरल पक्ष निवडून आला व क्याम्प्बेल बॅनरमन याच्या नेतृत्वाखालीं लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें; तेव्हां लॉइड जॉर्जला व्यापारमंडळाचा अध्यक्ष नेमण्यांत येऊन त्याचा लिबरल प्रधानमंडळांत समावेश झाला. १९०८त आस्क्विथ मुख्य प्रधान झाला. त्यावेळीं लॉइड जॉर्जला फडणविसाची जागा मिळाली. जनतेची स्थिति सुधारावयाची हें लिबरल पक्षाचें धोरण बनून गेलें होतें, व त्या दृष्टीनेंच १९०८त सत्तर वर्षांवरील म्हाताऱ्यांस बैठें वेतन ( पेन्शन) देण्याचा कायदा पास करण्यांत आला. हें धोरण यशस्वी-

रीतीनें अंमलांत आणावयाचें म्हणजे सरकारास प्रचंड द्रव्यनिधि पाहिजे होता. त्यासाठीं १९०९साली लॉइड जॉर्जनें आपलें क्रान्तिकारक अंदाजपत्रक कॉमन्सपुढें मांडिलें. त्यांत प्राप्तीवर चढता कर बसविला असून जमिनीवरील कराचीही प्रचंड वाढ केली होती. तेव्हां श्रीमंतांची पक्षपाती जी लॉर्ड्ससभा तिनें तें अंदाजपत्रक फेटाळलें. मग या प्रश्नावर लोकमत मागविण्याकरितां पार्लमेंटची निवडणूक झाली. तींत लिबरल पक्षाचे सभासद कांहीं कमी झाले; परंतु सरकारचें बहुमत कायम राहिलें. तेव्हां लॉर्डांस अंदाजपत्रक मंजूर करणें भाग झालें. पुढील सालीं (१९११), लॉइड जॉर्जनें राष्ट्रीय विम्याचा कायदा पास करून घेतला. त्यायोगें मजुरांस अजारीपणांत व बेकारीच्या वेळीं पोसण्याची व्यवस्था झाली. १९१४ सालीं महायुध्द सुरू झाल्यावर १९१५त सर्व पक्षांचें संयुक्त प्रधानमंडळ बनविण्यांत आलें. या वेळीं आस्क्विथच मुख्य प्रधान राहून लॉइड जॉर्जला'दारूगोळ्याचा प्रधान' नेमण्यांत आलें. लवकरच देशांतील दारूगोळा तयार करण्याचे कारखाने इतक्या जोरानें काम करूं लागले कीं, रणांगणावर दारूगोळ्याचा तुटवडा मुळींच येईनासा झाला. लॉइड जॉर्जनें निरनिराळ्या ठिकाणीं व्याख्यानें देऊन जनतेंत विलक्षण जागृति केली तेव्हां मजुरांचे संप मोडिले, कारखाने जोरानें चालूं लागले व रणांगणावर लढण्यासही लोक एकसारखे पुढें आले. १९१६च्या जूनमध्यें किचनेर मृत्यु पावला, तेव्हां लॉइड जॉर्ज युध्दमंत्री झाला. पुढें युद्धाचें काम जोरानें करावयाचें तर प्रधानमंडळांतील चार लोकांचें एक आटोपशीर युद्धमंडळ (War Cabinet) नेमावें अशी लॉइड जॉर्जनें सूचना केली. या मंडळांत आपणा स्वतःचा समावेश करून आस्क्विथचें नांव त्यानें गाळलें. तेव्हां आस्क्विथ रागावला व त्यानें राजीनामा दिला. मग लॉइड जॉर्ज मुख्य प्रधान झाला (१९१६ डिसेंबर). लागलीच त्यानें पांच जणांचें युद्धमंडळ स्थापून युद्धाचें काम जोरानें चालाविलें. नंतर साम्राज्याचें युद्धमंडळ ( Imperial War Cabinet ) भरवून त्यानें साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांची युध्दास सक्रिय सहानुभूति मिळविली. १९१७ सालीं अमेरिका दोस्तांतर्फें युद्धांत सामील झाली. जर्मनीनें इंग्लंडची उपासमार करण्यासाठीं पाणबुड्या बोटींच्या जोरावर इंग्लंडचीं व्यापारी जहाजें बुड-

विण्याचा सपाटा चालविला होता. परंतु या भयंकर वेळीं नवीं जहाजें तयार करून व देश बराचसा स्वावलंबी करून लॉइड जॉर्जनें या संकटापासून इंग्लंडचा बचाव केला. शेवटीं जर्मनीची साधनसामग्री संपुष्टांत आली व तो दोस्तांस शरण आला. महायुध्द संपतांच जी निवडणूक झाली तींत लॉइड जॉर्जचा संयुक्त पक्षच फार मोठ्या बहुमतानें निवडून आला. मग व्हर्सेल्झ येथें तहपरिषद भरून जर्मनीशीं तह झाला. या परिषदेंत जे तीन पुरुष प्रमुख होते त्यांत लॉइड जॉर्ज हा एक होता. मग महायुद्धानंतर अमेरिकेच्या भिडेस्तव लॉइड जॉर्जनें अयर्लंडमधील सिन फेन पक्षाशीं सलोख्याचें बोलणें करून 'आयरिश फ्री स्टेट' उभारिलें. परराष्ट्रसंबंधांत त्यानें ग्रीसची बाजू घेऊन तुर्कांबद्दल औदासीन्य धारण केलें. शेवटीं अंगोरा येथील तुर्क सरकारचा पुढारी केमाल पाशा यानें ग्रीकांचा पराभव केला ( १९२२ ). अगोदरच इंग्लंडांत संयुक्त प्रधानमंडळाची आतां कांहीं जरूर नाहीं अशी ओरड सुरू झाली होती. देशांतील बेकारी, मजूरवर्गाचा असंतोष, व्यापारमंदी, व युरोपची अस्वस्थता, इत्यादि अवघड प्रश्न उत्पन्न झाले होते. लॉइड जॉर्जच्या हातून आयरिश प्रश्नाखेरीज कोणताच प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटला नाहीं. शेवटीं कॉन्सर्व्हेटिव्हांनीं त्याच्याविरुद्ध गिल्ला केला व त्याला मुख्य प्रधानगिरीचा राजीनामा द्यावा लागला ( १९२२ ऑक्टोबर ). यापुढें त्याच्या हाताखालीं मूठभर 'राष्ट्रीय लिबरल' लोक तेवढे राहिले. पुढें लवकरच त्यानें ॲस्क्विथशीं संगनमत केलें व जुना लिबरल पक्ष पुनः एक झाला. तथापि यापुढें मजूरपक्षाचें प्राबल्य झपाट्यानें वाढलें व लिबरल पक्ष मागें पडला. महायुद्धापूर्वी सामाजिक सुधारणेचे कायदे करून लॉइड जॉर्जनें मजूरवर्गांत लोकप्रियता संपादन केली. पुढें महायुध्दाच्या वेळीं तो राष्ट्राचा पुढारी बनला व आपल्या अंगच्या धैर्य, धडाडी, धिमेपणा, व दूरदृष्टि या गुणांच्या जोरावर त्यानें युद्धांत इंग्लंडच्या बाजूस यशस्वी केलें. अर्थातच युद्धसमाप्तीच्या वेळीं तो फार लोकप्रिय झाला. मात्र १९२०नंतर त्याची लोकप्रियता पार ओसरली व पुनः ब्रिटिश राष्ट्राचें नेतृत्व त्याच्याकडे येईल असें वाटत नाहीं.

# परिशिष्ट २:--सनावली.

| | |
|---|---|
| खि. पू. ५५ | ज्यूलियस सीझरची स्वारी. |
| ४३-४१० | रोमन अंमल. |
| ४४९ | अँग्लो--सॅक्सन स्वाऱ्यांना सुरुवात. |
| ६६७ | धर्मदृष्ट्या इंग्लंडचें एकीकरण. |
| ८२७ | वेसेक्सचा एग्बर्ट सबंध इंग्लंडचा राजा झाला. |
| ८७१- ९०१ | थोर आल्फ्रेडची कारकीर्द. |
| १०१३--१०४२ | डेन राजांचा अंमल. |
| १०६६ | हेस्टिंग्जची लढाई, नॉर्मन विजय. |
| १२१५ | मोठी सनद. |
| १२६५ | मॉंटफर्टची पार्लमेंट. |
| १२९५ | नमुनेदार पार्लमेंट. |
| १२९६-१३२८ | स्कॉटलंड जिंकण्याचा प्रयत्न. |
| १३३८-१४५३ | फ्रान्सशीं शतसांवत्सरिक युद्ध. |
| १४५३ | तुर्कांनीं कॉन्स्टॅन्टिनोपल घेतलें. |
| १४५५-१४८५ | गुलाबी झेंड्यांचें झुंज. |
| १४८५ | बॉस्वर्थफील्डची लढाई. |
| १४९२ | अमेरिकेचा शोध. |
| १४९७ | व्हास्को ड गामा केपला वळसा घालून हिंदुस्थानला गेला. |
| १४८५--१६०३ | ट्यूडर घराण्याचा अंमल. |
| १५१७ | ल्यूथरनें जर्मनींत धर्मसुधारणेस सुरुवात केली. |
| १५३४ | पोपची सत्ता इंग्लंडांत अमान्य झाली. |
| १५३६ | इंग्लंड व वेल्स यांचा संयोग. |
| १५४९ | इंग्लंडांत प्रॉटेस्टंट पंथास धरून प्रार्थनापुस्तक रचलें. |
| १५५८ | फ्रान्सशीं युद्ध होऊन क्याले हातचें गेलें. |
| १५८८ | अजिंक्य-आरमाराचा नाश. |

| | |
|---|---|
| १६०० | ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना. |
| १६०३-१७१४ | स्टुअर्ट घराणें. |
| १६०३ | इंग्लंड व स्कॉटलंड एका राजाच्या अंमलाखालीं आलीं |
| १६०७ | व्हर्जिनिया--वसाहतीची स्थापना. |
| १६१८-१६४८ | त्रिंशद्वार्षिक युद्ध. |
| १६२८ | हक्क--संरक्षणाचा अर्ज. |
| १६४२-१६४९ | राजा व प्रजा यांजमध्यें युद्ध. |
| १६४५ | नेस्बीची लढाई. |
| १६४९ | पहिल्या चार्लसची फांशी. |
| १६४९--१६६० | लोकसत्ताक राज्य. |
| १६५२-१६५४ | पाहिलें डच युद्ध. |
| १६५५ | स्पेनपासून जमेका बेट घेतलें. |
| १६५३--१६५८ | क्रॉम्वेल 'संरक्षक' म्हणून कारभार करतो. |
| १६६० | पुनरागमन. |
| १६६१ | पोर्तुगालच्या राजानें मुंबई आंदण दिली. |
| १६८९ | वुइल्यम व मेरी हीं दोघें गादीवर आलीं; क्रान्ति; बिल ऑफ राइट्स. |
| १६९४ | बँक ऑफ इंग्लंडची स्थापना. |
| १७०१-१७१३ | स्पॅनिश वारशाचें युद्ध. |
| १७०४ | ब्लेन्हीमची लढाई, जिब्रॉल्टर काबीज केलें. |
| १७०७ | इंग्लंड व स्कॉटलंड येथील पार्लमेंट एक झाल्या. |
| १७१३ | युट्रेक्टचा तह. |
| १७१४-१९०१ | हॅनोव्हेरियन घराणें. |
| १७२१-१७४२ | वॉल्पोलचा राज्यकारभार. |
| १७१५व१७४५ | जॅकोबाइट बंडें. |
| १७५६-१७६३ | सप्तवार्षिक युद्ध. |
| १७५७ | प्लासीची लढाई. |
| १७५९ | क्वीबेकची लढाई, क्यानडा हातीं आला. |
| १७६० | वांदिवाशची लढाई. |

| | |
|---|---|
| १७६०–१८२० | तिसरा जॉर्ज. |
| १७७५–१७८३ | अमेरिकन स्वातंत्र्याचें युद्ध. |
| १७७६ | अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा. |
| १७७७ | सॅरॅटोगाची लढाई. |
| १७८३–१८०१ | धाकट्या पिटची पहिली प्रधानगिरी. |
| १७८८ | ऑस्ट्रेलिया साम्राज्यांत आलें; तेथें हद्दपार लोकांची वसाहत. |
| १७८९ | फ्रेंच राज्यक्रांति. |
| १७९१ | क्यानडाचे दोन प्रांत होऊन त्यांत प्रातिनिधिक राज्यपध्दति सुरू झाली. |
| १७९४–१८०२ | फ्रेंच राज्यक्रांतिकारकांशीं युद्ध. |
| १७९८ | नाइलची लढाई. |
| १८०० | ग्रेट ब्रिटन व आयर्लंड येथील पार्लमेंटांचें ऐक्य. |
| १८०३–१८१५ | नेपोलियनशीं युद्ध. |
| १८०४–१८०६ | पिटची दुसरी प्रधानगिरी. |
| १८०४ | नेपोलियन फ्रान्सचा बादशहा झाला. |
| १८०५ | ट्राफल्गारची लढाई, ऑस्टर्लिट्झची लढाई. |
| १८०८–१८१४ | द्वीपकल्पांतील युद्ध. |
| १८१५ | वॉटर्लूची लढाई. |
| १८२९ | क्यार्थॉलिकांस धर्मस्वातंत्र्य. |
| १८३२ | रिफॉर्म बिल ( पहिला रिफॉर्म ॲक्ट). |
| १८३३ | ब्रिटिश साम्राज्यांतून गुलामगिरी नष्ट झाली. |
| १८४० | ग्रेट ब्रिटनमध्यें पेनी-पोस्टास सुरुवात. |
| १८४६ | धान्याचा कायदा रद्द झाला. |
| १८४७ | क्यानडांत जबाबदार राज्यपद्धतीस सुरुवात. |
| १८५४–१८५६ | क्रिमियन युद्ध. |
| १८५७ | हिंदुस्थानांतील शिपायांचें बंड. |
| १८५८ | राणीचा जाहीरनामा. |
| १८६७ | दुसरा रिफार्म ॲक्ट, क्यानडांतील संस्थानांचें |

एकीकरण ( Federation ).

| | |
|---|---|
| १८६९ | सुएझचा कालवा उघडला. |
| १८७० | सक्तीच्या शिक्षणाचा कायदा; फ्रँको--जर्मन युद्ध. |
| १८७१ | जर्मन साम्राज्याची स्थापना. प्रशियाचा राजा पहिला वुइल्यम त्या साम्राज्याचा पहिला बादशहा झाला. |
| १८७९ | ऑस्ट्रिया व जर्मनी यांचा सख्याचा तह. |
| १८८३ | ईजिप्तांत इंग्रजी अंमल. |
| १८८४ | तिसरा रिफॉर्म ॲक्ट. |
| १८८७ | ऑस्ट्रिया व जर्मनी यांना इटली मिळून मध्य युरोपांतील त्रिकुटाची उत्पत्ति. |
| १८८९ | ब्रिटिश साम्राज्यांत पेनी-पोस्टास सुरुवात. |
| १८९० | मोफत शिक्षणाचा कायदा. |
| १८९९–१९०२ | बोअर-युद्ध. |
| १८९९ | हेग येथील पहिली शांततापरिषद. |
| १९०१ | ऑस्ट्रेलियन संस्थानांचें एकीकरण. |
| १९०१— | विंडसर घराणें. |
| १९०४ | अँग्लो-फ्रेंच सख्य. |
| १९०४–१९०५ | रुसो-जपानी युध्द. |
| १९०७ | अँग्लो-रशियन सख्य. |
| १९०७ | पहिली साम्राज्य--परिषद. |
| १९०९ | दक्षिण आफ्रिकेंतील संस्थानांचें एकीकरण. |
| १९११ | पार्लमेंट ॲक्ट. |
| १९१४–१९१८ | महायुध्द. |
| १९१७ | अमेरिका दोस्तांच्या बाजूनें महायुद्धांत पडली. |
| १९१८ | चौथा रिफार्म ॲक्ट. |
| १९१९ | व्हर्सेल्सचा तह, राष्ट्रसंघाची स्थापना. |
| १९२२ | आयरिश फ्री स्टेटचा उदय. |
| १९२४ | मजूरपक्षाचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें. |

# परिशिष्ट—३.

# वाचनीय पुस्तकें व उतारे.

### ब्रिटनवर स्वाऱ्या खि. पू. ५५. इ. स. १०६६.

Berick the Briton by Henty.
Dragon and Raven by Henty.
King Olaf's Kinsman by Whistler.
Harold by Lord Lytton.
Hereward the Wake by Kingsley.

poems.

Boadicea by William Cowper.
Caractacus by Barton.
Alfred the Harper by J. Stirling.

---

### सरदारांचें प्राबल्य १०६६–१४८५.

The Talisman by sir Walter Scott.
The Ivanhoe by sir W.Scott (Retold for Boys & Girls .
The Tales of a Grandfather by Scott.
The Days of Bruce by Grace Aguilar ( ,, ,, ).
Crecy and Poictiers by Edgar ( ,, ,, ).
The Last of the Barons by Lytton ( ,, ,, ).
Runneymede and Lincoln Fair by Edgar.
A Clerk of Oxford by Green.
The White Company by Conan Doyle.
Sir Nigel by ,, ,,
At Agincourt by Henty.
Agincourt by Charles.
The Black Arrow by R. L. Stevenson.
For the Red Rose by Henty.
The Chantry Priest of Barnet by Church.
Quentin Durward by Scott.
A March on London ( A story of Wat Tyler ) by Henty.

In Freedom's Cause ( A story of Wallace and Bruce ) by Henty.
With The Black Prince by Strang and Stead.
In the New Forest by Strang and Stead.
Lion Heart ( The Reign of Richard I ) by Strang & Stead.
Claud the Archer ( The Reign of Henry V ) by Strang & Aston.
Poem:—Evesham by Palgrave.

---

## अनियंत्रित राजसत्ता १४८५-१६०३.

Windsor Castle by Harrison Ainsworth.
Kenilworth by Scott ( Retold for boys & girls ).
The Tower of London ( A Story of Lady Jane Grey ) by Ainsworth ( Retold for boys & girls ).
The Abbot by Scott.
The Monastery by ,,
Westward Ho by Kingsley.
Arcadia by Philip Sidney.
Drake and Cavendish ( Blackie's Library of Famous Books ).
By England's Aid ( The Freeing of the Netherlands ) by Henty.
Famous Discoveries by Sea & Land ( Blackie's Library of Famous Books. )
Macaulay's Essay on Lord Burleigh.
Poem:—The Spanish Armada by Macaulay.
,, The Revenge by Tennyson
,, Sir Humphrey Gilbert by Longfellow.

---

## राजा आणि पार्लमेंट १६०३-१६६०.

Guy Fawkes by Harrison Ainsworth.

# परिशिष्ट—३.

# वाचनीय पुस्तकें व उतारे.

**ब्रिटनवर स्वाऱ्या खि. पू. ५५. इ. स. १०६६.**

Berick the Briton by Henty.
Dragon and Raven by Henty.
King Olaf's Kinsman by Whistler.
Harold by Lord Lytton.
Hereward the Wake by Kingsley.

poems.

Boadicea by William Cowper.
Caractacus by Barton.
Alfred the Harper by J. Stirling.

---

**सरदारांचें प्राबल्य १०६६–१४८५.**

The Talisman by sir Walter Scott.
The Ivanhoe by sir W. Scott (Retold for Boys & Girls).
The Tales of a Grandfather by Scott.
The Days of Bruce by Grace Aguilar ( ,, ,, ).
Crecy and Poictiers by Edgar ( ,, ,, ).
The Last of the Barons by Lytton ( ,, ,, ).
Runneymede and Lincoln Fair by Edgar.
A Clerk of Oxford by Green.
The White Company by Conan Doyle.
Sir Nigel by ,, ,,
At Agincourt by Henty.
Agincourt by Charles.
The Black Arrow by R. L. Stevenson.
For the Red Rose by Henty.
The Chantry Priest of Barnet by Church.
Quentin Durward by Scott.
A March on London ( A story of Wat Tyler ) by Henty.

In Freedom's Cause ( A story of Wallace and Bruce ) by Henty.
With The Black Prince by Strang and Stead.
In the New Forest by Strang and Stead.
Lion Heart ( The Reign of Richard I ) by Strang & Stead.
Claud the Archer ( The Reign of Henry V ) by Strang & Aston.
Poem:—Evesham by Palgrave.

---

## अनियंत्रित राजसत्ता १४८५-१६०३.

Windsor Castle by Harrison Ainsworth.
Kenilworth by Scott ( Retold for boys & girls ).
The Tower of London ( A Story of Lady Jane Grey ) by Ainsworth ( Retold for boys & girls ).
The Abbot by Scott.
The Monastery by ,,
Westward Ho by Kingsley.
Arcadia by Philip Sidney.
Drake and Cavendish ( Blackie's Library of Famous Books ).
By England's Aid ( The Freeing of the Netherlands ) by Henty.
Famous Discoveries by Sea & Land ( Blackie's Library of Famous Books. )
Macaulay's Essay on Lord Burleigh.
Poem:—The Spanish Armada by Macaulay.
,, The Revenge by Tennyson
,, Sir Humphrey Gilbert by Longfellow.

---

## राजा की पार्लमेंट १६०३-१६६०.

Guy Fawkes by Harrison Ainsworth.

The Fortunes of Nigel by Scott ( Retold for Boys & girls ).
With the King at Oxford by Church.
A Legend of montrose by Scott.
Woodstock by Scott.
One of Rupert's Horse (Reign of Charles I ) by Strang.
When London burned by Henty.
London Pride by F. H. Burnett.
Old St. Paul's by H. Ainsworth.
Micah Clarke by Conan Doyle.
Lorna Doone by Blackmore.
For Faith and Freedom by Walter Basent.
Shrewsbury by Stanley Wayman.
With Marlborough to Malplaquet by Srang.
Henry Esmond ( Anne ) by Thackeray.
Macaulay's Essays ( Milton, Hampden, War of Spanish Succession, The Comic Dramatists of the Restoration).

Poem.

The Landing of the Pilgrim Fathers by Mrs. Hemans.

---

## साम्राज्याकरितां झगडा १७१४—१८१५.

Bonnie Prince Charlie by Henty.
Anson's voyage ( 1740-1744 ) by Richard Walter (Blackie's Library of Famous Books ).
For James or George by Adams.
Kidnapped by R. L. Stevenson.
Catriona by R. L. Stevenson.
Roger the Scout ( Reign of George II ) by Strang and Lawrence.
With Wolfe in Canada by Henty.
Cook's Voyages ( Blackie's Library of Famous Books ).
Waverley by Scott ( Retold for Boys and Girls ).

With Frederick The Great ( Seven Year's War ) by Henty.

The Romance of War by James Grant.

With Moore at Corunna by Henty.

Under Wellington's Command by Henty.

True to The Old Flag (American War of Independence) by Henty

The Tale of two Cities by Dickens ( Retold for Boys and Girls ).

In the Reign of Terror (French Revolution ) by Henty.

Napier's Battles of the Peninsular War ( Blackie's Library of Famous Books ).

Life of Nelson by Southey.

Life of Napoleon 1 ( 2 Volumes ) by J. H. Rose.

Napoleon by Herbert Fisher.

Macaulay's Essays (Clive, Pitt, Chatham, Walpole, Johnson, Madam D' Arblay ).

Poems:
- The Battle of the Baltick by Campbell.
- The Burial of Sir John Moore by Wolfe.
- The Eve of Waterloo by Byron.

---

## साम्राज्याची वाढ व अन्तर्व्यवस्था १८१५-१९१४.

The Growth of the British Empire by P. H. and A. C. [Kerr.

The Victorian Era by P. A. Graham.

Life and Times of Queen Victoria by Henty.

Out with Garibaldi ( The Story of The Liberation of Italy ) by Henty.

Australia's Story 'Romance of the World' series by Srtang ( 4 Vol. ).

Settlers in Canada by Captain Marryat ( Blackie's Li-

( brary of Famous Books ).
Sybil ( Chartists ) by Beaconsfield.
Heroes of Industry by Francis Cooke.
With Buller In Natal by Henty.
With Roberts to Pretoria by Henty.

Poems.

The Charge of the Light Brigade by Tennyson.
The Battle of Trafalgar by Elizabeth Mitchell.

---

## संकीर्ण संग्रह.

English poetry for the Young (Blackie's Library of Famous Books ).
The Storied Past ( A Book of selections from English Literature illustrative of English History).
'Arnold's Literary Reading Books'.
England ' Peeps at Many-Lands' by John Finnemore.
Makers of Nations ' Noble Lives ' series.
Britain's Sea Story (B. C. 55-A. D. 1805 ) by Spright.
High Roads of History, Volumes 1 to 6.
Brief Survey of British History by Townshend and Warner.
English History From Original Sources ( 4 Volumes ) by Morgan.
Decisive Battles of The World by Creasy (Blackie's Library of Famous Books ).
Oxford History Readers 1 to11.I Children In History, 2 Heroes In History,3 Stories From English History, 4 Outlines of English History, 5 The Tudor Period, 6 The Stuart Period, 7 The Georgian Period, 8 The Reign of Victoria, 9The Story of The Empire,10 The

Reign of Edward VII, 11 Citizens of The Empire.
Oxford Supplementary Histories 1 to 6, 5 Scenes of Stuart Times, 6 Scenes of The Hanoverian Period.
Cambridge Historical Readers I to 5; II Primary, III Junior, IV Intermediate, V Senior.
Gateways to History, Books I to VIII; Book I Heroes of the Homeland, Book III men of England, Book III A Men of Britain, Book IV Wardens of the Empire.
The People of England by Stanley Leathes, Vol I to III. I the People In the Making, II the People In Adventure, III The People on Its Trial.

# मराठी पुस्तकें.

## चरित्रें.

आल्फ्रेड दी ग्रेट—ओक.
मार्टिन ल्यूथर—देशमुख.
लॉर्ड बेकन—काणे.
जॉर्ज वॉशिंग्टन—पंडित.
,, ,, —वाळवेकर.
वुइल्यम पिट—निगुडकर.
बेंजामिन फ्रँकलिन—टिपणीस.
वॉरन हेस्टिंग्ज—ओक.
नेपोलियन—बापट.
,, —भावे.
,, —मुंडले.
डयूक ऑफ वेलिंग्टन—ओक.
जॉन ब्राइट—जोशी.
रिचर्ड कॉब्डेन—भानू.
ग्लॅडस्टन—ओक.
व्हिक्टोरिया महाराणी—गुंजीकर.

## प्रवास.

विलायतचा प्रवास भाग १—२ पावगी.
माझा युरोपांतील प्रवास—गुणे.
युनायडेट स्टेट्सची लोकस्थिति. (प्रवासवृत्त)—पंडिता रमाबाई.
इंग्लंडचा प्रवास विंचूरकर.

## इतिहास.

इंग्लंडचा इतिहास १७१४—१८३७—फडके.
इंग्लंड देशाचा विस्तार—सरदेसाई.
नेदर्लंडांतील बंडाचा इति.—द्रवीड.
नौकानयनाचा इतिहास—बापट.
फ्रान्स देशांतील राज्यक्रान्तीचा इतिहास--ओक.

## सामान्य विषय.

इंग्लंडांतील प्रधानमंडळ—आगाशे.

# परिशिष्ट ४:—पारिभाषिक शब्दांचा कोश.

| | |
|---|---|
| Adjournment | ( ॲडजर्नमेंट ) तहकुबी, पार्लमेंटची बैठक बंद करून पुनः बैठक सुरू व्हावयाच्या वेळीं बंद होत असतांना जेथवर काम झालें असेल त्याच्यापुढें तें नंतर सुरू करावयाचें अशा प्रकारची ही तहकुबी असते.(Prorogue, प्रोरोग ); तहकूब करणें--यांत मात्र नवीन काम पहिल्यापासून सुरू करण्यांत येतें.( Dissolve, डिझॉल्व्ह ); बरखास्त करणें, बरखास्तीनंतर नवीन निवडणूक झाल्यावरच सभा भरवितां येते. |
| Act of Settlement | ( ॲक्ट ऑफ सेटल्मेंट ); वारशाचा कायदा १७०१. |
| Addled Parliament | ( ॲडल्ड पार्लमेंट ); वंध्या पार्लमेंट, वांझ किंवा मुकी सभा (१६१४). |
| Anti-Corn-Law-League | (ॲन्टी-कॉर्न-लॉ-लीग ); धान्याच्या कायद्याचा निषेध करणारा संघ. |
| Armed Neutrality, The | (आर्म्ड न्यूट्रॅलिटी ); सशस्त्र तटस्थांचा संघ, पहिला १७८०, दुसरा १८०१. |
| Assize of arms | ( असाइझ ऑफ आर्म्स ); परगण्यांतील सर्व स्वतंत्र नागरिकांनीं जरूर तीं शस्त्रें बाळगण्याचा दुसऱ्या हेन्रीच्या वेळीं झालेला कायदा. |
| Balance of Power | (बॅलन्स ऑफ पॉवर ); निरनिराळ्या राष्ट्रांची सत्ता मर्यादित राहून कोणीही डोईजड होऊं नये हें तत्व, सत्तेचा समतोलपणा. |
| Ballot, Vote by | (बॅलेट, व्होट बाय) गुप्तमतदानपद्धति, मतगोपन-[पद्धति. |
| Benevolence | (बेनिव्होलन्स); राजानें मिळविलेलें सक्तीचें कर्ज अथवा देणगी, उकळलेला पैका. |
| Bill | ( बिल ); पार्लमेंटपुढें आलेला कायद्याचा कच्चा |

| | |
|---|---|
| | इतर बडे लोक बसत. पार्लमेंट, न्यायकोर्टें व प्रिव्ही कौन्सिल यांचें हेंच मूळ होय. |
| Curia Regis | ( क्यूरिया रेजिस );ग्रेट कौन्सिलची कमिटी. |
| Crusades | ( क्रूसेड्स );खिस्ती व मुसलमान यांजमधील धर्मयुद्धें. |
| Danegeld | ( डेनगेल्ड ); डेनलोकांपासून देशाचें रक्षण करण्यासाठीं अँग्लो-सॅक्सन राजांनीं बसविलेला कर. |
| Declaration of Right | ( डिक्लेरेशन ऑफ राइट ); हक्कांचा खुलासा, अधिकार-मागणी ( १६८९ फेब्रुवारी ). |
| Dispensing Power | ( डिस्पेन्सिग पॉवर ); एखाद्या कायद्याच्या अंमलापासून व्यक्तीस मोकळीक देण्याची सत्ता. |
| Divine Right | ( डिव्हाइन राइट ); राजा ईश्वरी अंश आहे असें मत, ' ना विष्णु पृथिवीपतिः ' |
| Dominion | ( डोमिनियन ); स्वायत्त वसाहत, उदाहरणार्थ क्यानडा, आस्ट्रेलिया. |
| Excise | ( एक्साइझ ); अन्तर्गत जकात. देशांत तयार होणाऱ्या मालावर ठेवलेला कर. |
| Father of Parliament | ( फादर ऑफ पार्लमेंट ); पार्लमेंटचा जनक, सायमन डी मॉन्टफर्टची पदवी. |
| Fifteen | ( फिफ्टीन ); पहिलें जॅकोबाइट बंड. जंगी पंधरा ( १७१५ ); |
| Feudal System | ( फ्यूडल सिस्टिम ); सरंजामपद्धति. |
| Forty-Five | ( फॉर्टीफाइव्ह ); दुसरें जॅकोबाइट बंड, जंगी पंचेचाळीस ( १७४५ ). |
| Freeholder | ( फ्रीहोल्डर ); स्वतंत्र शेतकरी. |
| Free Trade | ( फ्री ट्रेड ); खुल्या व्यापाराची पद्धति. |
| Grand Remonstrance | ( ग्रॅण्ड रिमॉन्स्ट्रन्स ); गाऱ्हाण्यांची यादी. |
| Great Commoner | ( ग्रेट कॉमनर ); थोरल्या पिटची पदवी. |
| Habeas Corpus Act | ( हेबिअस कॉपर्स ॲक्ट ); व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा ( १६७९ ). |

मसुदा.

Bill of Attainder — ( बिल ऑफ अटेन्डर ); एखाद्या वजनदार पुरुषास राजद्रोही ठरवून फांशीची अथवा जिंदगीजप्तीची शिक्षा फर्माविणारा पार्लमेंटचा हुकूम.

Bill of Rights — (बिल ऑफ राइट्स);हक्काची मंजुरी, हक्कपत्रक.

Billeting of Soldiers — ( बिलेटिंग ऑफ सोल्जर्स ); लष्करी शिपायांस घरीं राहूं देण्यास घरधन्यास भाग पाडण्याची पद्धति.

Cabal — ( कबॅल );दुसऱ्या चार्लसचें एक प्रधानमंडळ.

Cabinet — ( क्याबिनेट ); मंत्रिमंडळ.

Cavalier — (क्याव्हेलिअर);पहिला चार्लस व पार्लमेंट यांच्या मधील युद्धांत राजाच्या बाजूनें लढणारा गृहस्थ.

Chancellor, Lord — ( चॅन्सेलर, लॉर्ड ); लॉर्ड्सभेचा अध्यक्ष.

Chivalry — ( शिव्हल्री ); शिलेदारी बाणा, आर्तत्राणधर्म. मध्ययुगीन इंग्लंडांत ' नाइट ' लोक आर्तत्राणव्रत अंगीकारीत,आणि दीनांचें व स्त्रियांच्या पातिव्रत्याचें रक्षण करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें मानीत.

Civil List — ( सिव्हिल लिस्ट ); राजाच्या खाजगी खर्चाकरितां दिलेली नेमणूक.

Commonwealth — ( कॉमनवेल्थ ); पहिल्या चार्लसच्या फांशनंतर स्थापिलें गेलेलें लोकसत्ताक राज्य.

Conservative — ( कॉन्सर्व्हेटिव्ह ); पुराणमतवादी.

Constitutions of Clarendon — ( कॉन्स्टिटयशन्स ऑफ क्लॅरेन्डन ); क्लॅरेन्डन येथील कानू ( ११६४ ).

Copyholder — ( कॉपीहोल्डर ,; करार-पत्रवाला शेतकरी.

Council, The Great — ( कौन्सिल, दी ग्रेट ); बड्या लोकांची सभा. नॉर्मन विजयानंतर विटनची जागा दी ग्रेट कौन्सिलनें पटकावली. यांत धर्मखात्यांतील व

House of Commons ( हाउस ऑफ कॉमन्स ); लोकसभा.
House of Lords ( हाउस ऑफ लॉर्ड्स ); उमरावांची सभा.
Impeachment ( इम्पीचमेंट ); कॉमन्सनीं लॉर्डांपुढें एखाद्या अधिकाऱ्याची चालविलेली चौकशी, गुन्हा-चौकशी.
Imperialism ( इम्पीरिॲलिझम ) साम्राज्यवाद.
Indulgences ( इंन्डल्जन्सेस ); पापमुक्ततेचे पास. हे विकत घेऊन एखाद्यानें पापापासून आपली मुक्तता करून घ्यावी असा धर्मगुरूंचा उपदेश असे.
Instrument of Government ( इन्स्ट्रुमेंट ऑफ गव्हमेंट ); १६५४त सैन्यानें बनविलेलें राज्यघटनापत्रक.
Invincible Armada ( इन्व्हिन्सिबल आर्मडा );अजिंक्य आरमार.
Ironsides (आयर्नसाइड्स); क्राम्वेलचें स्वारांचें पोलादी पलटण.
Knight of the Shire ( नाइट ऑफ दि शायर ); परगण्यांतील छोटा जमीनदार.
Protection (प्रोटेक्शन); संरक्षक जकातीची पद्धति.
National Couvenant ( नॅशनल कव्हेनंट ); स्कॉटिश लोकांनीं केलेला राष्ट्रीय करारनामा.
Laissez--Faire (लेसे--फेअर);प्रजेचा यथेष्ट व्यवहारन्याय. सरकारनें प्रजेच्या व्यवहारांत ढवळाढवळ करूं नये असें तत्त्व.
Liberal ( लिबरल );उदारमतवादी.
Livery ( लिव्हरी). मध्ययुगांत सरदारांनीं बाळगिलेले भपकेदार पोशाख केलेले गुंड.
Magna Charta ( मॅग्ना चार्टा );मोठी सनद, महाशासन.
Maintenance (मेन्टेनन्स); एखाद्या गरिबास वजनदार सरदार खटल्यात मदत करीत, व त्यानें खटला जिंकला कीं जिंकलेल्या मिळकतीचा बराच भाग उपटीत. या मदतीस मन्टेनन्स हें नांव आहे. सातव्या हेन्रीनें लिव्हरी व मेन्टेनन्स हीं दोन्ही बेकायदेशीर ठरविलीं.

Middle Ages (मिडल एजेस); मध्ययुग, Dark Ages डार्क एजेस--अज्ञानयुग.

Militia Bill (मिलिशिया बिल); सैन्यावर आपला ताबा चालावा म्हणून कॉमन्सनीं पास केलेली यादी (१६४२).

Model Parliament (मॉडेल पार्लमेंट); नमुनेदार पार्लमेंट (१२९५).

Ordinance (ऑर्डिनन्स); पार्लमेंटच्या संमतीशिवाय कौन्सिलच्या विचारें राजानें काढलेला हुकूम, राजाचा वटहुकूम.

Parliament ( पार्लमेंट ); कायदेकारी सभा.

Petition of Right ( पिटिशन ऑफ राइट ); हक्कसंरक्षणाचा अर्ज.

Pilgrimage of Grace (पिल्ग्रिमेज ऑफ ग्रेस); धार्मिक यात्रा १५३६.

Passive obedience (पॅसिव्ह ओबीडिअन्स); बिनतक्रार आज्ञापालन; देशांतील राजसत्तेचे हुकूम मुकाट्यानें पाळणें.

Pride's Purge ( प्राइड्स पर्ज ); प्राइडनें केलेली हकालपट्टी; प्राइडचा 'हकालो.'

Proclamation ( प्रॉक्लमेशन ); राजानें काढलेला हुकूम, जाहिरनामा.

Protectorate (प्रॉटेक्टरेट); संरक्षक शासनपद्धति १६५३-५८.

Provisions of Oxford ( प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड ); ऑक्सफर्डचे नियम १२५८.

Radical (रॅडिकल); मूलस्पर्शी, मूलगामी.

Reformation (रेफर्मेशन); धर्मसुधारणा.

Reform Bill (रिफॉर्म बिल); सुधारणेचा कायदा १८३२.

Renaissance (रिनेसन्स); विद्येचें पुनरुज्जीवन.

Revolution, the Glorious (रेव्होल्यूशन, दि ग्लोरिअस); यशस्वी-क्रान्ति.

Royal Prerogative (रॉयल प्रेरॉगेटिव्ह); राजाचे खास हक्क.

Rump Parliament (रम्प पार्लमेंट); प्राइडनें केलेल्या हकालपट्टीनंतरच्या पार्लमेंटचें नांव. ही लांडी पार्लमेंट क्रॉम्वेलनें १६५३त बरखास्त केली.

Self-denying ( सेल्फ-डिनाइंग ऑर्डिनन्स ); पार्लमेंटच्या

| | |
|---|---|
| Ordinance | सभासदांस लष्करी जागा सोडून द्यावयास लावणारा १६४५चा पार्लमेंटचा कायदा. |
| Sheriff | ( शेरिफ ); परगण्यावरील राजाचा अधिकारी. |
| Ship-money | (शिप-मनी); नौका-कर. |
| Socialism | (सोशिअॅलिझम ); समाजसत्तावाद; जमीन, खाणी, गिरण्या इत्यादि संपत्तीच्या उत्पत्तीचीं साधनें,व आगगाडीसारखीं वाहतुकीचीं साधनें राष्ट्रीय मालकीचीं करावीं हें मत. |
| Solemn-League and Covenant | ( सॉलेम लीग अॅण्ड कव्हेनन्ट ); इंग्लंडांत प्रेस्बिटेरियन पंथाचा स्वीकार करण्याच्या अटीवर इंग्लिश पार्लमेंटनें स्कॉटिश लोकांशीं केलेलें सख्य १६४३. |
| Speaker | ( स्पीकर ); कॉमन्ससभेचा अध्यक्ष. |
| Suspending Power | (सस्पेंडिंग पॉवर); एखादा कायदा अंमलांत न आणितां तो तहकूब ठेवण्याचा अधिकार, अंमल-तहकुबीचा अधिकार. |
| Tariff Reform | ( टॅरिफ रिफॉर्म ); जकातपद्धतींत सुधारणा. |
| Tory | (टोरी); राजपक्षीय, शॅफ्टस्बरी व त्याचे अनुयायी दुसऱ्या जेम्सची वारसा-रद्दी घडवून आणण्याची खटपट करीत असतां राजाच्या हक्कांचें स्तोम माजविणारा पक्ष; पुढेंही राजाचे खास हक्क व प्रस्थापित धर्म या दोन्ही बाबींबद्दल आदर बाळगणारा पक्ष. |
| Wars of the Roses | (वॉर्स ऑफ दि रोझेस); गुलाबी झुंज. |
| Whig | (व्हिग); क्रान्तिपक्षीय, मुख्यतः १६८८ची क्रान्ति घडवून आणणारा पक्ष. |
| Witan | (विटन ), अँग्लो-सॅक्सनांच्या काळीं राजास मदतगार शहाण्या लोकांची सभा. |

परिशिष्ट—५.

# स्मरणीय वचनें.

१. Had I but served my God as diligently as I have served my king he would not have given me over in my grey hairs. मीं आपल्या राजाची जितक्या तत्परतेनें चाकरी केली तितक्या तत्परतेनें जर मीं देवाची चाकरी केली असती तर त्यानें मला म्हातारपणीं अंतर दिलें नसतें—वुल्झीचे शेवटचे शब्द.

२. Play the man, Master Ridley, We shall this day light such a candle, by God's grace, in England, as I trust shall never be put out. मित्रा रिड्ले, पौरुष धर, आज आपण देवाच्या दयेनें इंग्लंडांत अशी ज्योत पेटवूं कीं ती केव्हांही विझविली जाणार नाहीं असा मला भरंवसा आहे—वृद्ध लॅटिमर चितारोहणाच्या वेळीं बोलला १५५५.

३. Let Judges be lions, but lions under the throne. न्यायाधीश सिंहासारखे निर्भय असावेत, परंतु या सिंहांनीं सिंहासनास आधारभूत व्हावें—बेकन.

४. It is atheism and blasphemy to dispute what God can do;...so it is presumption and high contempt in a subject to dispute what a king can do, or to say that a king cannot do this or that. ईश्वराच्या कृतिसामर्थ्याबद्दल संशय धरणें नास्तिकपणा व ईश्वराची अवहेलना होय. त्याचप्रमाणें राजाच्या अधिकाराबद्दल तंटा माजविणें किंवा राजाला हें किंवा तें करितां येणार नाहीं असें म्हणणें म्हणजे प्रजाजनानें राजाच्या ठिकाणीं अमर्याद वर्तनाचा व तुच्छताबुद्धीचा अपराध करणें होय—पहिल्या जेम्सचा उद्गार(१६११).

५. May it please, Your Majesty, I have neither eyes to see nor tongue to speak in this place except as this House is pleased to direct me. महाराज, ही सभा सांगेल त्याहून इतर गोष्टी पाहण्यास माझे डोळे समर्थ नाहींत व त्या बोलण्यास माझ्या

जिभेंत शक्ति नाहीं—स्पीकार लेन्थॉल मोठ्या धैर्यानें पहिल्या चार्लसला म्हणाला ( १६४१ ).

६. Put not your trust in Princes. राजांवर विश्वास ठेवूं नका —स्ट्रॅफर्ड फांशीं जातांना म्हणाला.

७. Magna Charta, the Petition of Right, and the Bill of Rights constitute the Bible of the English Constituton. मोठी सनद, हक्कसंरक्षणाचा अर्ज व हक्कांची मंजुरी हे तीन कायदे म्हणजे इंग्लिश शासनसंस्थेचे श्रुतिग्रंथ होत—अर्ल ऑफ चॅथम.

८. Marlborough never besieged a fortress which he did not take, nor fought a battle which he did not win. मार्लबरोनें किल्ल्याला वेढा घातला आणि तो पडला नाहीं किंवा लढाई केली आणि तींत जय मिळाला नाहीं असें कधीं झालें नाहीं —फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेअर.

९. Ring your bells now, but soon you will be wringing your hands. आतां घंटा वाजवा, पण लवकरच हात चोळीत बसण्याची पाळी येईल—स्पॅनिश युद्धाच्या आरंभीं वॉल्पोल म्हणाला ( १७३९ ).

१०. Every man has his Price. पैसा दिला कीं कोणताही मनुष्य वश होतो—वॉल्पोलचें आवडतें वाक्य.

११. " Evidently, " said the French Commander, " the winds are not Jacobites. " फ्रेंच सेनापति म्हणाला 'खरोखर' वारे कांहीं जॅकोबाइट नाहींत ' ( १७४५ ).

१२. I am sure that I can save my contry and that no one else can. माझ्या देशाचा बचाव मला करितां येईल, इतर कोणालाही करितां येणार नाहीं असें मला खात्रीपूर्वक वाटतें—वुइल्यम पिट ( १७५७ ).

१३. We shall win Canada on the banks of the Elbe. एल्बच्या तीरावर आम्ही क्यानडा जिंकूं—युरोपांत फ्रेंचांमागें ससेमिरा लावण्याच्या आपल्या धोरणाचें समर्थन करतांना पिट म्हणाला.

१४. There should be no taxation without representation. ना प्रतिनिधि, ना कर—अमेरिकन तंट्याच्या वेळीं पिटच्या तोंडचें आवडतें वाक्य.

१५. No one shall persuade me when a whole people are concerned that acts of lenity are not means of conciliation. सार्वजनिक कार्यांत दयालुत्वाचीं कृत्यें समेटाचीं साधनें नाहींत असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं—अमेरिकेशीं तंट्याच्या वेळचा बर्कचा उद्गार.

१६. We the representatives of the United States of America in Congress assembled, appealing to the Supreme Judge for the rectitude of our intentions, solemnly publish and declare that these United Colonies are, and of right ought to be, Free and Independent States. काँग्रेसमध्यें जमलेले आम्हो अमेरिकेंतील संस्थानांचे प्रतिनिधि आमच्या सद्हेतूंबद्दल न्यायी परमेश्वरास साक्षी ठेवून गंभीरपणें असें जाहीर करितों कीं, या संयुक्त वसाहती हक्कानें मुक्त व स्वतंत्र संस्थानें असावयास पाहिजेत व आहेत—स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांतील एक महत्त्वाचें वाक्य १७७६.

१७. Washington was the man first in war, first in peace, and first in the hearts of his fellow countrymen. वॉशिंग्टनसंबंधीं असें म्हणतां येईल कीं, तो युद्धकाळीं पहिला, शांततासमयीं पहिला, व आपल्या देशबंधूंच्या अंतःकरणांतही पहिला असे.

१८. "How much is this the greatest event that ever happened in the world," Fox cried with a burst of enthusiasm, "and how much the best!" "जगाच्या इतिहासांतील किती मोठें वृत्त हें व किती उत्तम!" बॅस्टिल तुरुंगाच्या नाशाची बातमी ऐकून हर्षभरांत फॉक्स बोलला १७८९.

१९. I am convinced that the only Method of retaining distant colonies with advantage is to enable them to govern themselves. दूरच्या वसाहतींचा संबंध कायम ठेवण्याचा एकच मार्ग म्हटला म्हणजे त्यांना स्वतः राज्य चालविण्यास समर्थ करणें हा होय असें मला खात्रिपूर्वक वाटतें—फॉक्स १७९१.

२०. Let us be masters of the Channel for six hours, and we are masters of the world. सहा तास (इंग्लिश)खाडी आमच्या ताब्यांत येऊं द्या कीं आम्ही जगाचे धनी झालोंच—नेपोलियन १८०५.

२१. England expects every man to do his duty प्रत्येक माणसानें आपलें कर्तव्य करावें अशी इंग्लंडची अपेक्षा आहे—हे शब्द वर लिहिलेलें निशाण ट्राफलगारच्या लढाईत नेल्सनच्या जहाजावर फडकत होतें.

२२. " Roll up that map, " Pitt said pointing to a map of Europe which hung upon the wall, " it will not be wanted these ten years." भिंतिवर टांगलेल्या नकाशाकडे बोट दाखवून पिट म्हणाला, ' गुंडाळा, तो नकाशा गुंडाळा, आतां दहा वर्षें त्याची कांहीं जरूर नाहीं. '

२३. When soldiers brave Death, they drive Him into the enemy's ranks. जेव्हां वीर मृत्यूला तोंड देतात तेव्हां त्याची शत्रुसैन्यांत हकालपट्टी होते—जेनाच्या लढाईपूर्वीं दोन दिवस नेपोलियन म्हणाला १८०६.

२४. I will never consent to divide the people of Ireland into a loyal minority, and a disloyal majority. राजनिष्ठ अल्पसंख्याक व अराजनिष्ठ बहुसंख्याक अशी आयर्लंडांत दुफळी व्हावी याला मी केव्हांही संमति देणार नाहीं (ग्लॅडस्टन १८८४ ).

२५. We must always remember that we are not part of the Continent, but we must never forget that we are neighbours to it. इंग्लंड युरोपखंडाचा भाग नाहीं हें आपण नेहमीं

लक्षांत ठेविलें पाहिजे, पण तें खंडाच्या शेजारीं आहे हेंही विसरतां कामा नये—ग्लॅडस्टन.

२६. I myself believe in a foreign policy which believes that the peace of the world is the interest of England. जगांत शांतता राखण्यांत इंग्लंडचे हितसंबंध गुंतले आहेत असें मानणाऱ्या परराष्ट्रीय धोरणावर माझी श्रद्धा आहे--डिझरेली १५ जुलै १८६५.

२७. There are two things that you can neither end nor mend; the House of Lords is one the other is the Pope of Rome. ज्यांचा अंत करतां येत नाहीं किंवा ज्यांत सुधारणा करणें शक्य नाहीं अशा दोन संस्था आहेत; एक लॉर्डांची सभा व दुसरी रोमचे पोप —ग्लॅडस्टन.

२८. Good Government could never be a substitute for Government by the people themselves. स्वराज्याची तहान सुराज्यानें केव्हांही भागणार नाहीं—सर हेन्री क्याम्प्बेल बॅनरमन ( १९०५. )

२९. The Prime Minister is the keystone of the Cabinet arch. मुख्य प्रधान मंत्रिमंडळाच्या कमानीची मध्यशिला होय----मोर्ले.

३०. Town meetings are to liberty what primary schools are to science; they bring it within the people's reach, they teach how to use and enjoy it. प्राथमिक शाळा जशा शास्त्रज्ञानाला तशा नगरसभा स्वातंत्र्याला होत;ती गोष्ट त्या लोकांच्या आटोक्यांत आणितात, तिचा कसा उपयोग करावा व उपभोग घ्यावा हें त्या लोकांस शिकवितात----टॉक्व्हील.

# सूचि.

( आंकडे पृष्ठांक होत. कायद्यांचीं नांवें कायदे या सदराखालीं दिलीं आहेत. तह, युद्धें, लढाया, व वेढे ज्या ठिकाणीं झाले अगर ज्या पक्षांमध्यें झाले त्यांचीं नांवें तह, लढाया, व वेढे या सदराखालीं पहावीं. )


अ

अजिंक्य आरमार, ६८.
अंतर्गत कर, १००.
अफगाणिस्थान, १९०.
अबुकीरची खाडी, १६२.
अमेरिका, ३८, ४५, ६५-६७, ७४, ८२, १०२, १२४, १२८, १३२, १३५--१३९, १४१, १४३, १५०--१५२, १५७, १५९, १७९, १८५, १८७, २२७--२२८, २३०, २३६.
अरबी पाशा, २०६, २०७.
अर्ल, ८.
अलेक्झँडर, सहावा ( पोप ), ६६.
अल्स्टर, ७०, १२०, २००, २२१.
अशांटी लोक, २१०.
अँगल, ६.
अॅटलँटिक महासागर, १२६, १५२, १७०, १७९, १८७.
ॲडिसन, २३३.
ॲडिंग्टन, १६५--६६.
ॲन, ( दुसऱ्या जेम्सची मुलगी ) ७२, ११८, १२५, १२७ १२९ १३३, १४४, १८४, २३४; ( हाइडची मुलगी ) १००.
ॲन ऑफ क्लीव्ह्ज, ५३.
ॲन बुलीन, ४८, ५३, ५९, ६१.
ॲन्जु, १८.
ॲन्जेव्हिन, १८, १९.
ॲन्डोव्हर, २४९.
ॲबरडीन, लॉर्ड, १९२, १९३.
ॲब्राहाम, १४१.
ॲलेक्झँड्रिया, २०५, २०७.
ॲलेगेनी, १३८, १४८.
ॲलेन्बी, जनरल, २२६.
ॲश्ले, १०३, १०५.
ॲस्टर, लेडी, २२२.

आ

आफ्रिका, ३, ६६, २०५, २१०, २११, २३६, २४६.
आयर्टन, ९३, ९९.
आयर्लंड २, ५, ३२, ४१, ४४,

५४, ७०, ७२, ८१, ८४, ८६, ८७, ९३–९४, ९९, १११, ११९–१२०, १५२, १६४, १९९–२०४, २२१-२२२.
आर्कराइट, १५५.
आर्थर, ( किंग ) ५.
आर्थर, ( जिऑफ्रेचा मुलगा ) २३–२४.
आर्थर, ( सातव्या हेन्रीचा मुलगा ) ४४.
आर्लिंग्टन, १०३.
आल्डरमेन, ८.
आल्प्स, १६३.
आल्फ्रेड, १०–११.
आल्बर्टा, १८६.
आल्सेस, २२८.
आशिया, ३.
आस्क्विथ, २१६, २२०-२२१, २२९.
ऑक्सफर्ड, ( अर्ल ऑफ ) ४२; (गांव) ५२, २३३; (चळवळ) २३२; ( विश्वविद्यालय ) ४६, १११, १९८, २३२, २४०.
ऑगस्टाइन, सेंट ६.
ऑगास्टिन पंथ, ५०.
ऑन्टेरिओ, १८५–१८६.
ऑरेंज ( नदी ), २११.
ऑरेंज फ्री स्टेट, २११--२१४.
ऑल्बर्ट नियांझा, २१०.
ऑस्ट्रिया, १२६, १३६, १३९, १६१--१६३, १६६--१६७, १६९, १९०, २२३--२२६, २२९.
ऑस्ट्रेलिया, १८५, १८७--१८९, २१५, २४६, २४८.

इ.

इंग्लंड ( उत्पत्ति ), ६.
इटली, ३८, ४६, ४८, ६५, १२८, १३६, १६३, १६९, १७१, २२३, २२६.
इन्डिपेन्डन्ट पक्ष ( उत्पत्ति ), ८९.
इम्पीचमेंट, ७७, ८५.
इलाय, १४.
इलेक्ट्रिक्ट टेलिग्रॅफिक कंपनी, १७९.
इसेक्स, ६.
इस्माइल ( खेदिव ), २०६.

ई.

ईजिप्त, १६२, २०५-२०९, २२७.
ईस्ट अँग्लिया, ६.
ईस्ट इंडिया कंपनी, ७०, १०८, २३५.

उ.

उत्तरध्रुव, १८७.
उत्तर समुद्र, २२५, २२९.

ए.

एक्सक्यालिबर, ५.
एग्बर्ट, ७, ९-१०, १२.

एडन, २४५.
एडवर्ड, पहिला १२-१३, १९, २८-३०, ३२; दुसरा १९; तिसरा १९, ३०; चौथा ३३, ४०; पांचवा ३३; सहावा ४०, ५३-५७,६०-६१,६३,२३३; सातवा २१६, २२०; अर्ल ऑफ वॉरिक ३३, ४०-४१; डयूक ऑफ केंट १३०; ब्लॅक प्रिन्स १९.
एडिन्बरो, ६४, ७२.
एथल्रेड, १२.
एथेलिंग, ८.
एथेल्बर्ट, ६.
एपिस्कोपसी पंथ ( उत्पत्ति ), ६२.
एम्पसन, ४३.
एलिझबेथ, ( चौथ्या एडवर्डची मुलगी ) ४०; ( राणी ) ४०, ५३, ५५, ५९-६७, ७०-७४, ७६, ८२, ९७, १५४, १७७ २३३-२३५, २४७.
एलियट, ८०-८१, ८४; (जनरल) १५१.
एलेनॉर, २८.
एल्बा, १६९-१७०.

ओ

ओकॉनेल, डॅनियल १७२, २००, २०३.
ऑटावा, १८७.
ओनील, ह्यू ७०.
ओहिओ ( खोरें ), १४१.

औ

औद्योगिक क्रांति, १५४, २१८, २३६.

क

कनॉट, डयूक ऑफ २१५.
कबॅल मंत्रिमंडळ, १०३, १०५.
कबर्लंड, डयूक ऑफ, १३०, १३६ १३७, १३९-१४०.
कलकत्ता, १३८.
कांगो २०८.
कायदे:—आयरिश होमरूल बिल २०४-०५, २२१; ऑक्सफर्ड येथील नियम २८; एकीचा कायदा १६५; कॉन्व्हेन्टिकल ॲक्ट १०१; कॉर्पोरेशन ॲक्ट १००, १७२; क्याथॉलिक रिलीफ बिल १७२; क्लॅरेंडन कोड १०१-१०२, ११७; गरिबांचा कायदा ७१, १७७; गरिबांचा नवीन कायदा १७७; त्रैवार्षिक कायदा ११७; धर्मकसोटीचा कायदा १०५, ११०-१११, ११७, १७२; धान्याचा कायदा १८२—१८४, २१७; धार्मिक सवलतीचा कायदा ११६; नॉर्थ अमेरिका ॲक्ट १८९; नौका—निर्बंधाचा

कायदा ९५; पार्लमेंटचा कायदा (१९११) २१९-२२०, २३९, २४१; पार्लमेंट—सुधारणेचा कायद्दा, पहिला १७५, १७८, १८१, १३४, १९६; दुसरा १९६–१९७; तिसरा १९७; चौथा २२१-२२; प्रार्थनेचा कायदा ६२; प्रेम्युनायरचा कायदा ४९; फाइव्ह माइल अॅक्ट १०१; बंडाचा कायदा ११६-११७; मताचा कायदा १९७; मोठी सनद २३, २६-२७, ८०, १०६, ११५; म्युनिसिपल रिफॉर्म अॅक्ट १७६; राष्ट्रीय विम्याचा कायदा २१८; वारशाचा कायद्दा ११८, १२९; शरीर-संरक्षणाचा कायदा १०६; सक्तीच्या लष्करी नोकरीचा कायदा २२८; सप्तवार्षिक कायदा १३१; सुधारणांचा कायदा (१९१९) २४७; स्टॅम्प अॅक्ट ८०-८१; हक्कसंरक्षणाचा अर्ज १०६, ११५; हक्कांचें बिल ११४-११५, २४३.
कार्टराइट ११५.
कार्डिनल ४६.
कार्लाइल २३५.
कालिकत ३८.
कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष (उत्पात्ति) १७५.
कॉन्स्टॅन्टिनोपल ३६–३७, १९१-१९२, २०६, २२७.
कॉब्डेन १८२.
कॉमन्स, हाउस ऑफ (उत्पत्ति) ३०-३१, २४०.
कॉर्नवॉलिस १५१.
कॉर्सिका बेट १६१.
कॉलेट, जॉन ३६, ५०, २३३.
किचनेर, लॉर्ड २०८, २०९, २१४, २२९.
किंबर्ले, २१४, २१५.
किंबोल्टन, ८७.
किल्मनहॅम (तुरुंग), २०४.
कील (कालवा), २२७.
कुक, कॅप्टन १८७.
कुटुंबसंघ, १३५, १४२.
कुत्-एल- आमारा, २२७, २२९.
केटेवायो, २११.
केडिझ, ६८, १६६.
केंट, ६.
केंट, ड्यूक ऑफ, (तिसऱ्या जॉर्जचा मुलगा 'एडवर्ड' पहा).
केप ऑफ गुड होप, ३८, ६७, १७०, २११.
केप कॉलनी, २११-२१५.
केबल, २३२.
केंब्रिज, गांव २३२; विश्वविद्यालय १११, १९८, २४०.
केल्टिक, ३, ४, ७०.

कैसर, वुइल्यम २२५, २२९.
कोपेनहेगेन, १६३.
कोलंबस, ३८, ६६.
क्याक्स्टन, वुइल्यम ३७.
क्याथराइन, ( आठव्या हेन्रीची बायको ) ४४-४५, ४७-४८, ५१-५२; ( दुसऱ्या चार्लसची बायको ) १०८.
क्यानडा, १३८, १४२, १४८, १५०, १५२, १५४, १८५, १८७,२०८,२१५,२४६,२४८.
क्यानिंग, १५४, १९४.
क्यान्टर्बरी, ६-७, २१-२२, २४-२५, ५१, ८१ ११२,२३४; क्यांटर्बरी टेल्स (पुस्तक)२३४.
क्याब्रट, जॉन ३८, ४५; सेबॅशिअन ३८.
क्याबिनेट, १६१, २४२.
क्यारोलिना, १०२.
क्याले, ६५.
क्याल्व्हिन, जॉन ६२-६३.
क्याव्हेंडिश, लॉर्ड २०४.
क्याव्हेलिअर ( उत्पत्ति ), ८९.
क्यास्ट्रा, ४.
क्यूबा, १४२.
क्रॅन्मर, ५२, ५५, ५७-५८.
क्रान्वेल, २४९.
क्रॉम्प्टन, १५५.
क्रॉम्वेल, ऑलिव्हर ८९,९०,९३-९६;थॉमस५३;रिचर्ड९६-९८.
क्रिमिया, १९२.
क्रिस्टल पॅलेस, १८४.
क्रूगर, पॉल २१३-२१५.
क्रोमर, लॉर्ड २०८.
क्लॅरेंडन,अर्ल ऑफ ८७-८८,१००, १०२-१०३,१०५;(गांव)२१.
क्लॅरेन्स, ड्यूक ऑफ ३३.
क्लाइव्ह, १४२.
क्लॉस्टर-सेव्हनचा करारनामा,१३९.
क्लिफर्ड, १०३, १०५.
क्लेमंट, सातवा (पोप) ४८.
क्लेमेन्सो (फ्रान्सचा प्रधान), २३०.
क्लिबेरॉनची खाडी, १४१.
क्वीन्सलँड, १८८.
क्वीबेक, १८५-१८६.


**ख.**


खार्टूम, २०८-२०९.
ख्रिस्त, येशू ५०, १९१.


**ग.**


गटेनबर्ग, जॉन, ३७.
गथ्रम, १०.
गार्डिनर, ५७.
गॉर्डन, जनरल २०८-२०९.
गिबन, २३५.
गिल्बर्ट, ७०.
गुलामवर्ग (Villeinage), १५.
गेल, ३.
गोल्ड कोस्ट, २१०.

ग्याम्बिया, २१०.
ग्रॅटन, हेन्री, १५२.
ग्रीस, ३६, २२६.
ग्रे, लॉर्ड १७४-१७५,२२०.
ग्रेगरी, पहिला ( पोप ) ६.
ग्रेट कॉमनर,( वुइल्यम पिट पहा).
ग्रेट कौन्सिल, २६, २८, ३१.
ग्रेन्व्हिल्, १४८, १६७.
ग्लॅडस्टन, १९५-१९८, २०१, २०३-२०५, २०८, २१२, २१६.
ग्लासगो, १२९.

**च.**

चॅथॅम, लॉर्ड ११५, १३५, १४०-१४२, १४४, १४६, १४८-१४९, १५१, १५३, १७३; ( गांव ) १०१.
चार्टिस्ट ( उत्पत्ति ), १८१.
चार्ज ऑफ दी लाइट ब्रिगेड ( कविता ), १९३.
चार्लस, पहिला ७२, ७५-७९, ८१, ८३-८५, ८७-८८, ९१-९४, ९७-९९, १०३, २००, २३२; दुसरा ७२, ९४, ९७-१०९, ११५-११६, ११९, १२१; दुसरा ( स्पेनचा ) १२४; पांचवा ( जर्मनीचा बादशहा ) ४७-४८, ५७; सहावा ( ऑस्ट्रियाचा बादशहा ) १३६; आर्च ड्यूक ( जर्मनीचा ) १२५; एडवर्ड ( दुसऱ्या जेम्सचा नातू ) १३७.
चॉसर २३४.
चीन, १८९.
चेंबर्लेन, जोसेफ २०४, २१४, २१६.

**ज.**

जकातपद्धतींत सुधारणा, २१७.
जटलंड, २२७.
जपान, १८९.
जमेका, ९७,२४६.
जरूसलेम,३८, ५०, १९१, २२७.
जर्मनी, ५, ४९-५०, १२१, १२५, १४१, १७१, १८९, २१०, २१९, २२३-२३०, २४७, २४९.
जार्व्हिस, अॅड्मिरल १६१.
जॅकोबाइट ( उत्पत्ति ), १२३; बंड १ लें १३१; बंड २ रें १३६-१३७.
जाफा, १६२.
जॉन, १९, २२-२७.
जॉन ऑफ गॉंट, १९.
जॉन, सेंट (बोलिंग्ब्रोक,लॉर्ड पहा).
जॉन्सन, डॉक्टर २३४.
जॉर्ज, पहिला १२९-१३१, १३३-१३४; दुसरा १३०, १३६,

१४२; तिसरा १३०, १४२-१४४, १४६-१४७, १४९, १५२-१५३, १६५, १६७, १७१; चौथा १३०, १७१, १७५; पांचवा ११५, २१५-२१६, २२०.
जॉर्जिया, १३८.
जिनोआ, ३८.
जिब्राल्टर, १२६, १२८, १५१, २४५.
जेन ग्रे, लेडी ५६-५७.
जेम्स, चौथा (स्कॉटलंडचा) ४३, ४७; पांचवा (स्कॉटलंडचा) ५४, ७२; सहावा (स्कॉटलंडचा) व पहिला (इंग्लंडचा) ४४, ६४, ७२-७८, ८२, ११८, १२८, २००, २३२; दुसरा (इंग्लंडचा) ७२, ७५, १००, १०२, १०५-१०८, ११०-११२, ११५-११६, ११८-१२३, १२५, १२९, १३१, १३७, १५४, २३६; तिसरा (इंग्लंडचा तोतया) ७२, १२५, १२९, १३१.
जेम्सची आवृत्ति (बायबल), ७३.
जेम्सटाऊन, ७०, ८२,
जेम्सन, क्याप्टन २१३.
जेझुइट पंथ (उत्पात्ति), ६२-६३.
जोहान्सबर्ग, २१३.
ज्यू, १६.
ज्यूट, ५-६.

झ.

झगलूल पाशा, २०८.
झार (रशियाचा), १६७, १९१, २२६.

ट.

टनेज व पौंडेज, ७५, ८०, ८६.
टॅलॅव्हेरा, १६८.
टाइथ कर, २००-२०१, २०३.
टाइन नदी, ३.
टाइम्स (लंडनचा) १४७, २०५.
टाउन्शेंड, फडनवीस १४९; सेनापति २२७.
टायटस ओट्स, १०६.
टास्मेनिया, १८८.
टिर्कॉनेल, अर्ल ऑफ १११.
टूलन, १६२, १६६.
टेनिसन, १९३, २३५.
टेम्स नदी, २, २५.
टेलफर्ड, १७९.
टोरी पक्ष (उत्पत्ति) १०७.
टोर्बे, ११३.
टयुटॉनिक, ३, ९, १७.
ट्रान्सवाल, २११-२१४.

ड.

डंकन, ॲड्मिरल १६१.
डड्ले, एडमंड ४३; जॉन ५६, ५७.
डंडी, व्हायकाउंट १२०.

डन्कर्क, ९७, १०३.
डब्लिन, ४४, १२०, २०४, २२१.
डरहॅम, लॉर्ड १८६.
डॅन्बी, १०५-१०६.
डायोसीज, ६.
डार्डानेल्झ, १९१, २२७.
डार्न्ले, ६४.
डार्बी, अर्ल ऑफ १९५, १९७.
डॉफिन, १२४.
डॉर्चेस्टर, ४.
डॉर्सेटशायर, ११०.
डिकन्स, २३५.
डिझरेली, १८४, १९५--१९७, २०६.
डी वेट, २१५.
डूम्सडे बुक, १६, २३६.
डेट्टिंगेन, १३६.
डेन, ९--१२, ३२.
डेनगेल्ड, ११.
डेन्मार्क, ५, ९, १२, १५०, १६३--१६४.
डेलारे, २१५.
डेव्हनशायर, ११३.
ड्यूकेन, १४१.
ड्रायडन, २३४.
ड्रॉघेडा, ९३, १२०.
ड्रुइड, ३.
ड्रेक, सर फ्रॅन्सिस ६६-६९.

त.

तक्रारींची यादी, ८७.
तह, अमीन्सचा १६१, १६३—१६५; एलाशापेलचा १३६, १३८; गुप्त तह १०३--१०५; टिल्सिटचा १६७; धार्मिक जूट व करारनामा ९०; पॅरिसचा (पहिला) १४४, १४८; (दुसरा) १९३; ब्रेडा येथील १०२; युट्रेक्टचा १२८-१२९, १३१, १३४--१३५, १५४; रिस्विकचा १२२; लिमरिकचा १२०; व्हर्सेल्झचा (१७८३) १५२; व्हर्सेल्झचा (१९१९) २३०.
तांबडा समुद्र, २०५--२०६.
तिजोरीवरील सत्ता, ११६--११७.
तुर्कस्थान, १७१, १९०--१९४, २०६, २२३, २२६, २२९.

थ

थॅकरे २३५.
थॉर, ९.

द.

दानधर्म कर, ७१, १७८.
दारूगोळ्याचा कट, ७३.

ध.

धर्मयुद्धें, ३८.
धर्मसुधारणेची चळवळ, ५१.
धर्माचा पाया, ५५.

धार्मिक यात्रा, ५३.

न.

नजराणे ( Benevolences ), ४३.
नवयुग, ३२--३९.
नवीन नमुनेदार सैन्य, ९१.
नवीन भूमि, ६६.
नॅशनल लीग, २०४.
नाइल, २०७--२०९.
नाइटिंगेल, मिस फ्लॉरेन्स १९३.
नाताळ, २१२--२१५.
नॉक्स, जॉन ६३.
नॉटिंगहॅम, ८८.
नॉर्थ ब्रिटन, १४४--१४५.
नॉर्थ, लॉर्ड १४४, १४७, १४९, १५२, १५४.
नॉर्दबर्लंड, डयूक ऑफ ५६--५७.
नॉर्दम्ब्रिया, ६--७.
नॉर्फोक, ५६.
नॉर्मंडी १२,१५,२४.
नॉर्विच, २३५.
नेदर्लंड्स, ६५, ६७--६८, ९७, १०४, १२२, १२६--१२८, १३६, १६०, १७०, २२५, २३५.
नेपोलियन, बोनापार्ट १५४,१६१, १६३, १६५--१७१, १९०, १९२, २११; लुई १९२.
नेल्सन, अॅड्मिरल १६३– १६४, १६६--१६७, १७१.
नोव्हम ऑर्ग्यानम, १०८, २३४.
नोव्हा स्कोशिया, १२६, १२८. १८६.
नौकाकर, ८३,८६.
न्यू इंग्लंड, १०२, १४९.
न्यूक्यासल ऑन टाइन १७९.
न्यूक्यासल, डयूक ऑफ १३९--१४०.
न्यू झीलंड, १८५,१८७, १८९, २१३, २४८.
न्यूटन, सर ऐझॅक १०९.
न्यू प्लिमथ, ८२.
न्यू फौंडलंड, ३८, १२८.
न्यू ब्रन्स्विक, १८६.
न्यूमन, २३२.
न्यू यॉर्क, १०२,१५१.
न्यू साउथवेल्स. १८८.

प.

पवित्र संघ, ४६.
पॅरॅडाइझ लॉस्ट (कविता), २३४.
पॅरिस, १६३,१६९-१७०,१९३, २३०.
पॅलॅटिनेट, ७६.
पॅलेस्टाइन, १६२,२२७.
पॅसिफिक, ६७, १५२, १८७.
पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न,

८७-८८.
पापमुक्ततेचें पास, ५०.
पामर्स्टन, १९०, १९२-१९६.
पार्नेल, २०२-२०५.
पार्लमेंट, उदय २७-३२; कन्व्हेन्शन पार्लमेंट ९८; नमुनेदार पार्लमेंट ३०; बेअरबोन्स पार्लमेंट ९५-९६; मॉडेल पार्लमेंट ३०, ३२, लांडी पार्लमेंट ९२-९३, ९५, लाँग पार्लमेंट ८४-८६, ९८, ११०-१११.
पाव्हिआ, ४८.
पाँडेचरी, १४२.
पॉयनिंग्ज, सर एडवर्ड ४४.
पिक्ट, ४-५.
पिट, वुइल्यम मोठा ( चॅथॅम, लॉर्ड पहा ); धाकटा १५३-१५४, १५६-१५७, १६०-१६१, १६४-१६७, १७१, १७३, २०३.
पिम, ८०, ८४-८५, ८७, ९०.
पिल्ग्रिम फादर्स, ८२.
पी अँन्ड ओ कंपनी, २०५.
पीटर, सेंट ५०.
पीटर्लूची कत्तल, १७४.
पूर्णतेचें धोरण, ८१.
पील, सर रॉबर्ट १८२-१८४, १९२, १९५, २१७.
पेपल लेगेट, ४६, ४९.
पेल, ४४.
पेल्हॅम, हेन्री १३४, १३९.
पोप ( कवि ), २३४.
पोर्ट्स्मथ, ८०, १३९.
पोर्तुगाल, ३९, ६६, १०८, १६८.
पोलादी पलटण, ९०.
प्यूरिटन पंथ ( उत्पत्ति ), ६३.
प्रशिया, १३४, १३६, १३८, १४१, १५८, १६१, १६३, १६९-१७०, १९०.
प्रधानमंडळ १३३, २४१-४३.
प्राइड, कर्नल ९२.
प्राइडनें केलेली हकालपट्टी, ९२.
प्रार्थनापुस्तक, पहिलें ५५; एलिझबेथचें ६१, चार्लसचें (स्कॉटलंडकरितां ) ८४.
प्रॉटेस्टंट पंथ ( उत्पत्ति ), ५१.
प्रिटोरिया, २१३, २१५.
प्रिव्ही कौन्सिल, १७७, २४१.
प्रेस्टन, ९२.
प्रेस्बिटीरियन पंथ ( उत्पत्ति ), ९१.
प्लिमथ, ६७.
प्लेगची सांथ, १०२.

फ.

फर्डिनंड, ४४, ४६.
फाशोडा, २०९.
फॉकलंड, ८७-८८.
फॉक्स, १६०, १६७.
फॉक्स, गाय, ७३.

फॉन्टेनॉय, १३६.
फिनिअन सोसायटी, २०३.
फिनिक्स पार्क, २०४-२०५.
फिलॅडेल्फिया, १५०.
फिलिप, फ्रान्सचा २४-२५, ३०; स्पेनचा ५७, ६५, ६७-६८; डॉफिनचा मुलगा १२४,१२८.
फिलिपाइन, १४२.
फेल्टन, ८०.
फ्रान्स, ३, १२, १५, १७-१८, २२-२५, २७-२८,३०, ३२, ३८-३९, ४१,४६-४८, ५५, ५९, ६३, ७८-७९, ८३, ९४, ९७, १०१,१०३-१०५, १०८, ११८-१२१, १२४-१२५, १२८, १३१, १३४-१३७, १३९-१४०, १४२, १४५, १५०-१५१, १५४, १५८-१५९, १६१-१६५, १६८-१७०, १८१, १८९, १९२, १९४, २०७, २१०, २२३-२२५, २३०, २३१, २३६, २४७, २४९.
फ्रान्सिस, ४७-४८.
फ्रेंच राज्यक्रांति, १५८.
फ्रेडरिक, पॅलॅटिनेटचा संस्थानिक ७६; प्रशियाचा १३६, १३९, १४१; दुसऱ्या जॉर्जचा मुलगा १३०.
फ्लँडर्स, १६, ४३, ४७, ७१ १५४, २३५.

ब

बकिंगहॅम, डयूक ऑफ ७६, ७८-८१; कबॅलपैकीं १०३; परगणा ८३.
बगदाद, २२७.
बंगाल, १३८, १४२, १५४.
बर्डी सरोवरें, १८७.
बंडाचा इतिहास ( पुस्तक ) १०३.
बनियन, जॉन १०१.
बर्क, एडमंड १४६, १४९,१६०. रॉबर्ट १९८;आयर्लंडचा अंडर-सेक्रेटरी २०४.
बॅर्गाइन, १५०.
बर्मिंगहॅम, १७३, १७५, २३६.
बर्लिन १९४.
बल्गेरिया, १७१, २२४, २२६, २२९.
बव्हेरिया १२६, १३६, १६३.
बहामा बेटें, ३८.
बहिष्कारपत्र, पोपचें ५१.
बँक ऑफ इंग्लंड, १२२, १३२.
बॅनरमन, क्याम्प्बेल २१७.
बॅस्टिल ( तुरुंग ), १५९-१६०.
बायबल, इंग्लिश भाषांतर ४९-५०, ७३;लॅटिन भाषांतर ६, २३३.
बाष्पवाहनांचे शोध, १७८.
बॉथ्वेल, ७४.

८७-८८.
पापमुक्ततेचें पास, ५०.
पामर्स्टन, १९०, १९२-१९६.
पार्नेल, २०२-२०५.
पार्लमेंट, उदय २७-३२; कन्व्हेन्शन पार्लमेंट ९८; नमुनेदार पार्लमेंट ३०; बेअरबोन्स पार्लमेंट ९५-९६; मॉडेल पार्लमेंट ३०, ३२, लांडी पार्लमेंट ९२-९३, ९५, लॉंग पार्लमेंट ८४-८६, ९८, ११०-१११.
पाव्हिआ, ४८.
पॉंडेचरी, १४२.
पॉयनिंग्ज, सर एडवर्ड ४४.
पिक्ट, ४-५.
पिट, वुइल्यम मोठा ( चॅथॅम, लॉर्ड पहा ); धाकटा १५३-१५४, १५६-१५७, १६०-१६१, १६४-१६७, १७१, १७३, २०३.
पिम, ८०, ८४-८५, ८७, ९०.
पिल्ग्रिम फादर्स, ८२.
पी ॲन्ड ओ कंपनी, २०५.
पीटर, सेंट ५०.
पीटर्ल्यूची कत्तल, १७४.
पूर्णतेचें धोरण, ८१.
पील, सर रॉबर्ट १८२-१८४, १९२, १९५, २१७.
पेपल लेगेट, ४६, ४९.
पेल, ४४.
पेल्हॅम, हेन्री १३४, १३९.
पोप ( कवि ), २३४.
पोर्टस्मथ, ८०, १३९.
पोर्तुगाल, ३९, ६६, १०८, १६८.
पोलादी पलटण, ९०.
प्यूरिटन पंथ ( उत्पत्ति ), ६३.
प्रशिया, १३४, १३६, १३८, १४१, १५८, १६१, १६३, १६९-१७०, १९०.
प्रधानमंडळ १३३, २४१-४३.
प्राइड, कर्नल ९२.
प्राइडनें केलेली हकालपट्टी, ९२.
प्रार्थनापुस्तक, पहिलें ५५; एलिझबेथचें ६१, चार्लसचें (स्कॉटलंडकरितां ) ८४.
प्रॉटेस्टंट पंथ ( उत्पत्ति ), ५१.
प्रिटोरिया, २१३, २१५.
प्रिव्ही कौन्सिल, १७७, २४१.
प्रेस्टन, ९२.
प्रेस्बिटीरियन पंथ ( उत्पत्ति ), ९१.
प्लिमथ, ६७.
प्लेगची सांथ, १०२.

फ.

फर्डिनंड, ४४, ४६.
फाशोडा, २०९.
फॉकलंड, ८७-८८.
फॉक्स, १६०, १६७.
फॉक्स, गाय, ७३.

फॉन्टेनॉय, १३६.
फिनिअन सोसायटी, २०३.
फिनिक्स पार्क, २०४-२०५.
फिलॅडेल्फिया, १५०.
फिलिप, फ्रान्सचा २४-२५, ३०; स्पेनचा ५७, ६५, ६७-६८; डॉफिनचा मुलगा १२४,१२८.
फिलिपाइन, १४२.
फेल्टन, ८०.
फ्रान्स, ३, १२, १५, १७-१८, २२-२५, २७-२८,३०, ३२, ३८-३९, ४१,४६-४८, ५५, ५९, ६३, ७८-७९, ८३, ९४, ९७,१०१,१०३-१०५, १०८, ११८-१२१, १२४-१२५, १२८, १३१, १३४-१३७, १३९-१४०, १४२, १४५, १५०-१५१, १५४, १५८-१५९, १६१-१६५, १६८-१७०, १८१, १८९, १९२, १९४, २०७, २१०, २२३-२२५, २३०, २३१, २३६, २४७, २४९.
फ्रान्सिस, ४७-४८.
फ्रेंच राज्यक्रांति, १५८.
फ्रेडरिक, पॅलॅटिनेटचा संस्थानिक ७६; प्रशियाचा १३६, १३९, १४१; दुसऱ्या जॉर्जचा मुलगा १३०.
फ्लँडर्स, १६, ४३, ४७, ७१ १५४, २३५.

ब

बकिंगहॅम, डयूक ऑफ ७६, ७८-८१; कबॅलपैकीं १०३; परगणा ८३.
बगदाद, २२७.
बंगाल, १३८, १४२, १५४.
बर्डी सरोवरें, १८७.
बंडाचा इतिहास ( पुस्तक ) १०३.
बनियन, जॉन १०१.
बर्क, एडमंड १४६, १४९,१६०. रॉबर्ट १६८;आयर्लंडचा अंडर-सेक्रेटरी २०४.
बॅर्गाइन, १५०.
बर्मिंगहॅम, १७३, १७५, २३६.
बर्लिन १९४.
बल्गेरिया, १७१, २२४, २२६, २२९.
बव्हेरिया १२६, १३६, १६३.
बहामा बेटें, ३८.
बहिष्कारपत्र, पोपचें ५१.
बँक ऑफ इंग्लंड, १२२, १३२.
बॅनरमन, क्याम्प्बेल २१७.
बॅस्टिल ( तुरुंग ), १५९-१६०.
बायबल, इंग्लिश भाषांतर ४९-५०, ७३; लॅटिन भाषांतर ६, २३३.
बाष्पवाहनांचे शोध, १७८.
बॉथ्वेल, ७४.

बॉनर ५७.
बॉस्टन, १४९--१५७.
बॉस्निया, २२४.
बॉस्पारेस, १९१.
बिकानेरचे महाराज, २४९.
बिंग, ॲड्‌मिरल १३९.
बुलोन, १६६--१६७.
बेअरबोन्स, ९६.
बेकन, फ्रान्सिस, ७१, ७६-७७, १०८, २३४.
बेकेट, थॉमस २०-२२,२३४.
बेडफर्ड ( तुरुंग ), १०१.
बेंटिंक, १८४.
बेलफास्ट, १२०.
बेल्जिक केल्ट, ३.
बेल्जियम, ( नेदर्लंड्स पहा ).
बोथा, जनरल २१५.
बोनापार्ट, जोसेफ १६८-१६९.
बोलिंग्ब्रोक, लॉर्ड १२७, १२९. १४३.
ब्यूट, लॉर्ड १४२, १४४.
ब्रन्स्विक, १४०.
ब्रॅडशॉ ९२-९३, ९९.
ब्रॅडॉक, १३८.
ब्राइट, १८२.
ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, २१०, २४६.
ब्रिटिश ईस्ट आफ्रिका कंपनी, २१०.
ब्रिटिश कोलंबिया, १८६.
ब्रिस्टल, ३८, ८९.
ब्रेडा, १०२.
ब्रेस्ट, १६६.
ब्रेस्ट-लिटॉव्ह्स्क, २२६.
ब्लूचर, १७०.
ब्लूमफॉन्टाइन, २१५.
ब्लेक, ९५.

भ.

भयंकर दुष्काळ ( आयर्लंड ),२०२.
भूमध्यसमुद्र, १२६, १२८,१९१, २०५--२०६.

म.

मक्तेपद्धति, ७१.
मंक, जनरल ९४, ९८.
मजूरपक्ष, २१७, २२०, २३८ २४२.
मजूरसंघ, १८०.
मध्ययुग, ३२, ३४, ३६--३८, ४२,९९,१५८,२३३, २३७.
मन्मथ, दुसऱ्या चार्लसचा दासीपुत्र ११०,चें बंड १०९-११०.
मराठी साम्राज्य, १.
मराठे, १५२.
मराया थेरिसा, १३६.
मर्शिया, ६--७.
महदी, २०८-२०९.
महाद्वीपस्थ संघ, १६९.
मॅकेन्सन, २२६.
मॅक्याडम, १७९.

मॅटिल्डा, १३.
मॅनिटोबा, १८६.
मॅनिला, १४२.
मँचेस्टर, ४, १७३-१७५. १७९.
मॅफेकिंग, २१४-२१५.
मॅशमबाई, १२७.
मॅसॅच्युसेट्स, ८२, १४९.
माउंटजॉय, ७०.
मार्गरेट, सातव्या हेन्रीची मुलगी, ४३--४४, ७२.
मार्चंड, मेजर २०९.
मार्ने, नदी, २२५.
मार्लबरो, डचेस ऑफ १२५, १२७; ड्यूक ऑफ १२५—१२७, १६८.
माल्टा, २४५.
मॉड, जनरल, २२७.
मॉटकाम, १४१--१४२.
मॉटफर्ट, सायमन डी २७, २९--३०, ३२.
मॉटेनिग्रो, १९४.
मॉट्रूझ, ९१.
मॉन्ट्रिआल, १४२.
मॉर्टन, ४३.
मॉर्टनचा कांटा, ४३.
मॉर्निंग क्रॉनिकल, १४७.
मॉर्निंग पोस्ट, १४७.
मॉस्को, १६९.
मिड्लसेक्स, १४५.
मित्रसंघ, पहिला १६१--१६२; दुसरा १६३; तिसरा १६६--१६७.
मिनोर्का, १२६, १२८.
मिंडेन, १४१.
मिलिशिया, १९.
मिल्टन, ९३, २३४.
मिसिसिपी नदी, १३८.
मुंबई बेट, १०८.
मूर, थॉमस ३६, ५०, ५२.
मेकॉले, २३५.
मेडिना सायडोनिया, ६८.
मेड्वे नदी, १०१, १०३.
मेन, १३८.
मेफ्लॉवर, ८२.
मेरी, आठव्या हेन्रीची मुलगी ४०, ४८, ५४, ५६--६२; आठव्या हेन्रीची बहीण ५६; पहिल्या चार्लसची मुलगी ७२; दुसऱ्या जेम्सची मुलगी ७२, १०५, ११२--११४, ११८, १२२; स्कॉटलंडची राणी ५४--५५, ६३--६५, ६७, ७२-७३, १०६; अॅन्टॉयनेट ( सोळाव्या लुईची बायको ) १६०.
मेसापोटेमिया २२७.
मोरो, सेनापति, १६३.
मोर्ले, जॉन २१७.

य.

यात्रेकरूचा प्रवास (पुस्तक), १०१.

यॉर्क शहर, ७, ४९; परगणा ५३.

यॉर्क टाऊन, १५१.

युगांडा, २०९.

युटोपिया (पुस्तक), ३६, ५२.

युद्धें, आपसांतील ८९-९३; ऑस्ट्रियन वारशाचें १३६-१३७; क्रिमियन १९०-१९३; गुलाबी झेंड्यांचें झुंज ३३-३४; डच युद्ध पहिलें १०१, दुसरें १०४; त्रिंशद्वार्षिक ८३; द्वीपकल्पांतील १६८; नेपोलियनशीं १६५-१७०; फ्रान्सशीं ४६, १२१, १५८-१६४; बोअर २११-२१५; महायुद्ध, १८३, २२२-२३१, २४७; रुसो-जपानी २२३; शतसांवत्सरिक ३३-३४; सप्तवार्षिक १३८-१४०; स्पॅनिश वारशाचें १२४-१२७; हॉलंडशीं ९४-९५.

युरोप, २-३, ७१, १०४, १३८-१३९, १४१, २०३, २१४, २२४.

यूजीन, १२६.

र.

रक्तमय दौरे, ११०.

रक्तशून्य राज्यक्रान्ति, ११३.

रंगेल राजा, ९९,

रनीमीड, २५.

रम्पची हकालपट्टी, ९५.

रशिया, १३९, १६३, १६६-१६७, १६९, १९०, १९२-१९४, २२३-२२९.

रसेल, लॉर्ड जॉन १८३, १९५.

रास्किन, २३५.

रॅले, सर वॉल्टर ७०, ८४, १०६, २३६.

राउंडहेड (उत्पत्ति), ८९.

राष्ट्रसंघ, २३०.

राष्ट्रांची संपत्ति (पुस्तक), १५६.

राष्ट्रीय करारनामा, ८४.

राष्ट्रीय धर्म, ६१.

रॉकिंगहॅम, १४८, १५२.

रॉड्नी, अॅड्मिरल १५१.

रॉबर्ट्स, लॉर्ड २१४.

रॉयल मिलिटरी अॅक्याडमी, २४८.

रॉयल मिलिटरी कॉलेज, २४८.

रॉयल सोसायटी, १०९.

रिचर्ड, पहिला १९, २३; दुसरा १९; तिसरा ३३, ४१; चौथा (तोतया वॉर्बेक) ४१; ड्यूक ऑफ यॉर्क ३३; पांचव्या एडवर्डचा भाऊ ४१.

रिड्ले, ५७-५८.

रिझिओ, ६४.

रिपीलची चळवळ, २०३.

रिस्विक, १२२.

रुमानिया, १७१, १९४, २२४,

२२६.
रूसो, १५९.
रेडमंड, २२१.
रेन, खिस्टोफर १०२.
रोम; ३-४, ३६,४९-५०
रोमन साम्राज्य, ४,१७,३२.
रोमन साम्राज्याची अवनति व नाश (पुस्तक) २३५.
रोशेल, ८०.
ऱ्हाइन नदी, १२६.
ऱ्होड्स, सोसिल २१३, २१४.
ऱ्होडेशिया २१३.

ल.

लट्रेल, १४५.
लढाया, आल्मा नदी १९२; ऑमडुर्मान २०८; ऑस्टार्लिट्झ १६७; इन्करमन १९३; इव्हझॅम ३०; कलोडनमूर १३७; किलिक्रँकी ११९--२०; क्याम्पर्डाऊन १६१; क्वीबेक १४१; गिनिगेट ४६-४७; ट्राफल्गार १६६; डन्बार ९४; तेलेलकेबीर २०७; नाइल १६२; नेस्बी ९१; पिंकी ५४--५५; प्लासी १४२; फ्लॉडनफील्ड ४६-४७; बंकर हिल १५०; बॅलॅक्लाव्हा १९२; बॉइन १२०; बॉस्सर्थफील्ड ३४,४०; ब्लेनहीम १२६; मनोऱ्यांची १६२; मॅरेंगो १६३; मार्ने २२४; मॉर्स्टनमूर ९०; मॉन्स २२५; लॅंगसाइड ६४; ला होग १२२; लीप्झिग १६९; लुएज्र २९; लेक्झिंग्टन १५०; वॉटर्लू १६९, १७०; वूर्स्टर ९४; व्हिक्टोरिया १६९; व्हिन्सेंट, सेंट १६१; सॅरॅटोगा १५०; सेजमूर ११०; स्टोक ४१; हेस्टिंग्ज १३; होहेनलिंडेन १६३.
लंडन, २, २५, २९, ३५-३६, ४०, ४४, ४९, ७०, ८८, ९२, ९८, १०२, १११, ११३, १२९, १४०--१४६, १८४, १९९-२००, २३४, २४९.
लंडनचा टॉवर १६, ४१.
लॅंक्याशायर, २३४.
लॅंक्यास्टर, ३३-३४, ४०.
लॅंग्टन, स्टीफन २४-२५.
लॅटिमर, ५७-५८.
लॅंड-लीग, २०२-२०४.
लॅब्रडोर, ३८.
लॉइड जॉर्ज, २१७, २१९, २२१ २२८-२३०.
लॉडरडेल, १०३.
लॉड, वुइल्यम ८१-८२, ८४-८५ १०६-१०७.
लॉरेन्स, सेंट १४१.

बॉनर ५७.
बॉस्टन, १४९--१५७.
बॉस्निया, २२४.
बॉस्पारेस, १९१.
बिकानेरचे महाराज, २४९.
बिंग, अॅड्मिरल १३९.
बुलोन, १६६--१६७.
बेअरबोन्स, ९६.
बेकन, फ्रान्सिस, ७१, ७६-७७, १०८, २३४.
बेकेट, थॉमस २०-२२,२३४.
बेडफर्ड ( तुरुंग ), १०१.
बेंटिंक, १८४.
बेलफास्ट, १२०.
बेल्जिक केल्ट, ३.
बेल्जियम, ( नेदर्लंड्स पहा ).
बोथा, जनरल २१५.
बोनापार्ट, जोसेफ १६८-१६९.
बोलिंग्ब्रोक, लॉर्ड १२७, १२९. १४३.
ब्यूट, लॉर्ड १४२, १४४.
ब्रन्स्विक, १४०.
ब्रॅडशॉ ९२-९३, ९९.
ब्रॅडॉक, १३८.
ब्राइट, १८२.
ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, २१०, २४६.
ब्रिटिश ईस्ट आफ्रिका कंपनी, २१०.
ब्रिटिश कोलंबिया, १८६.
ब्रिस्टल, ३८, ८९.
ब्रेडा, १०२.
ब्रेस्ट, १६६.
ब्रेस्ट-लिटॉव्ह्स्क, २२६.
ब्लूचर, १७०.
ब्लूमफॉन्टाइन, २१५.
ब्लेक, ९५.

**भ.**

भयंकर दुष्काळ ( आयर्लंड ), २०२.
भूमध्यसमुद्र, १२६, १२८, १९१, २०५--२०६.

**म.**

मक्तेपद्धति, ७१.
मंक, जनरल ९४, ९८.
मजूरपक्ष, २१७, २२०, २३८ २४२.
मजूरसंघ, १८०.
मध्ययुग, ३२, ३४, ३६--३८, ४२,९९,१५८,२३३, २३७.
मन्मथ, दुसऱ्या चार्लसचा दासीपुत्र ११०, चें बंड १०९-११०.
मराठी साम्राज्य, १.
मराठे, १५२.
मराया थेरिसा, १३६.
मर्शिया, ६--७.
महदी, २०८-२०९.
महाद्वीपस्थ संघ, १६९.
मॅकेन्सन, २२६.
मॅक्याडम, १७९.

मॅटिल्डा, १३.
मॅनिटोबा, १८६.
मॅनिला, १४२.
मँचेस्टर, ४, १७३-१७५. १७९.
मॅफेकिंग, २१४-२१५.
मॅशमबाई, १२७.
मॅसॅच्युसेट्स, ८२, १४९.
माउंटजॉय, ७०.
मार्गरेट, सातव्या हेन्रीची मुलगी, ४३--४४, ७२.
मार्चंड, मेजर २०९.
मार्ने, नदी, २२५.
मार्लबरो, डचेस ऑफ १२५, १२७; ड्यूक ऑफ १२५—१२७, १६८.
माल्टा, २४५.
मॉड, जनरल, २२७.
मॅाँटकाम, १४१--१४२.
मॉँटफर्ट, सायमन डी २७, २९--३०, ३२.
माँटेनिग्रो, १९४.
माँट्रूझ, ९१.
मॉन्ट्रिआल, १४२.
मॉर्टन, ४३.
मॉर्टनचा कांटा, ४३.
मॉर्निंग क्रॉनिकल, १४७.
मॉर्निंग पोस्ट, १४७.
मॉस्को, १६९.
मिड्लसेक्स, १४५.
मित्रसंघ, पहिला १६१--१६२; दुसरा १६३; तिसरा १६६--१६७.
मिनोर्का, १२६, १२८.
मिंडेन, १४१.
मिलिशिया, १९.
मिल्टन, ९३, २३४.
मिसिसिपी नदी, १३८.
मुंबई बेट, १०८.
मूर, थॉमस ३६, ५०, ५२.
मेकॉले, २३५.
मेडिना सायडोनिया, ६८.
मेड्वे नदी, १०१, १०३.
मेन, १३८.
मेफ्लॉवर, ८२.
मेरी, आठव्या हेन्रीची मुलगी ४०, ४८, ५४, ५६--६२; आठव्या हेन्रीची बहीण ५६; पहिल्या चार्लसची मुलगी ७२; दुसऱ्या जेम्सची मुलगी ७२, १०५, ११२--११४, ११८, १२२; स्कॉटलंडची राणी ५४--५५, ६३--६५, ६७, ७२-७३, १०६; अॅन्टॉयनेट ( सोळाव्या लुईची बायको ) १६०.
मेसापोटेमिया २२७.
मोरो, सेनापति, १६३.
मोर्ले, जॉन २१७.

य.

यात्रेकरूचा प्रवास (पुस्तक), १०१.
यॉर्क शहर, ७, ४९; परगणा ५३.
यॉर्क टाऊन, १५१.
युगांडा, २०९.
युटोपिया (पुस्तक), ३६, ५२.
युद्धें, आपसांतील ८९-९३; ऑस्ट्रियन वारशाचें १३६-१३७; क्रिमियन १९०-१९३; गुलाबी झेंड्यांचें झुंज ३३-३४; डच युद्ध पहिलें १०१, दुसरें १०४; त्रिंशद्वार्षिक ८३; द्वीपकल्पांतील १६८; नेपोलियनशीं १६५-१७०; फ्रान्सशीं ४६, १२१, १५८-१६४; बोअर २११-२१५; महायुद्ध, १८३, २२२-२३१, २४७; रुसो-जपानी २२३; शतसांवत्सरिक ३३-३४; सप्तवार्षिक १३८-१४०; स्पॅनिश वारशाचें १२४-१२७; हॉलंडशीं ९४-९५.
युरोप, २-३, ७१, १०४, १३८-१३९, १४१, २०३, २१४, २२४.
यूजीन, १२६.

र.

रक्तमय दौरे, ११०.
रक्तशून्य राज्यक्रान्ति, ११३.
रंगेल राजा, ९९,
रनीमीड, २५.
रम्पची हकालपट्टी, ९५.
रशिया, १३९, १६३, १६६-१६७, १६९, १९०, १९२-१९४, २२३-२२९.
रसेल, लॉर्ड जॉन १८३, १९५.
रस्किन, २३५.
रॅले, सर वॉल्टर ७०, ८४, १०६, २३६.
राउंडहेड (उत्पत्ति), ८९.
राष्ट्रसंघ, २३०.
राष्ट्रांची संपत्ति (पुस्तक), १५६.
राष्ट्रीय करारनामा, ८४.
राष्ट्रीय धर्म, ६१.
रॉकिंगहॅम, १४८, १५२.
रॉड्नी, अॅड्मिरल १५१.
रॉबर्ट्स, लॉर्ड २१४.
रॉयल मिलिटरी अॅक्याडमी, २४८.
रॉयल मिलिटरी कॉलेज, २४८.
रॉयल सोसायटी, १०९.
रिचर्ड, पहिला १९, २३; दुसरा १९; तिसरा ३३, ४१; चौथा (तोतया वॉर्बेक) ४१; ड्यूक ऑफ यॉर्क ३३; पांचव्या एडवर्डचा भाऊ ४१.
रिड्ले, ५७-५८.
रिझिओ, ६४.
रिपीलची चळवळ, २०३.
रिस्विक, १२२.
रुमानिया, १७१, १९४, २२४,

२२६.
रूसो, १५९.
रेडमंड, २२१.
रेन, ख्रिस्टोफर १०२.
रोम; ३-४, ३६,४९-५०
रोमन साम्राज्य, ४,१७,३२.
रोमन साम्राज्याची अवनति व नाश (पुस्तक) २३५.
रोशेल, ८०.
ऱ्हाइन नदी, १२६.
ऱ्होड्स, सोसिल २१३, २१४.
ऱ्होडेशिया २१३.

ल.

लट्रेल, १४५.
लढाया, आल्मा नदी १९२; ऑमडुर्मान २०८; ऑस्टार्लिट्झ १६७; इन्करमन १९३; इव्हशॅम ३०; कलोडनमूर १३७; किलिक्रँकी ११९--२०; क्याम्पडाऊन १६१; क्वीबेक १४१; गिनिगेट ४६-४७; ट्राफल्गार १६६; डन्बार ९४; तेलेलकेबीर २०७; नाइल १६२; नेस्बी ९१; पिंकी ५४--५५; प्लासी १४२; फ्लॉडनफील्ड ४६-४७; बंकर हिल १५०; बॅलॅक्लाव्हा १९२; बॉइन १२०; बॉस्वर्थफील्ड ३४,४०; ब्लेनहीम १२६; मनोऱ्यांची १६२; मॅरेंगो १६३; मार्ने २२४; मॉर्स्टनमूर ९०; मॉन्स २२५; लॅंगसाइड ६४; ला होग १२२; लीप्झिग १६९; लुएज २९; लेक्झिंग्टन १५०; वॉटर्लू १६९, १७०; वूर्स्टर ९४; व्हिक्टोरिया १६९; व्हिन्सेंट, सेंट १६१; सॅरॅटोगा १५०; सेजमूर ११०; स्टोक ४१; हेस्टिंग्ज १३; होहेनलिंडन १६३.
लंडन, २, २५, २९, ३५-३६, ४०, ४४, ४९, ७०, ८८, ९२, ९८, १०२, १११, ११३, १२९, १४०--१४६, १८४, १९९-२००, २३४, २४९.
लंडनचा टॉवर १६, ४१.
लॅंक्याशायर, २३४.
लॅंक्यास्टर, ३३-३४, ४०.
लॅंग्टन, स्टीफन २४-२५.
लॅटिमर, ५७-५८.
लॅंड-लीग, २०२-२०४.
लॅब्रॅडोर, ३८.
लॉइड जॉर्ज, २१७, २१९, २२१ २२८-२३०.
लॉडरडेल, १०३.
लॉड, वुइल्यम ८१-८२, ८४-८५ १०६-१०७.
लॉरेन्स, सेंट १४१.

लॉर्ड्स, हाउस ऑफ, (उत्पत्ति) ३०-३१, २३९-२४०.
लिमरिक, १२०-१२१.
लिंपोपो नदी, २११.
लिबरल पक्ष (उत्पत्ति), १७५.
लिव्हरपूल, १७९.
लिव्हिंग्स्टन, डेव्हिड २१०.
लीड्स, १७३, १७५.
लीस्टर, ४, ४९.
लुइझबर्ग, १४१.
लुइझिआना १३८.
लुई, फ्रान्सचा युवराज २७; तेरावा ७८; चौदावा १०४-१०५, ११३, ११९-१२२, १२४-१२६, १२८, २३६; सोळावा १५९-१६०, १६९; अठरावा १६९.
लुगार्ड, क्याप्टन २१०.
लेडीस्मिथ, २१४, २१५.
लेन्थॉल ८८.
लोरेन, २२८.

व.

वर्डस्वर्थ, २३५.
वॅट, जेम्स १५५.
वारशाचा हक्क, ७४.
वारशाचीं हक्कपत्रें, ४३.
वारसारहीचें बिल, १०६, १०७, ११०.
वाहतुकीचा व्यापार, ९४.
वॉन्दिवॉश, १४२.
वॉर्बेक, पर्किन ४१, ४४.
वॉल्पोल, सर रॉबर्ट १३०, १३२-१३५, १३९, १५३, २३२.
वॉशिंग्टन, जॉर्ज १३८, १५०-१५२.
विटन, ८, १२-१३.
विटेनबर्ग ५०.
विद्येचें पुनरुज्जीवन, ३६.
विमान-दल, २४९.
विल्बरफोर्स, १५७.
विल्क्स, जॉन १४४-१४६.
विल्स, वुइल्यम १८८.
विल्सन, वुड्रो २२८, २३०.
वुइल्यम, विजयी, १२-१८, २८, ३१, २२९, २३५; दुसरा १३, १६; दी सायलेंट ६७; पहिल्या चार्लसचा जांवई ९४; तिसरा ७२, १०५, ११२-११४, ११९-१२४, १२८, १३३, २००; चौथा १३०, १७५, १७८; दुसऱ्या जॉर्जचा मुलगा (कंबर्लंड, ड्यूक ऑफ, पहा).
वुडस्टॉक, १२६.
वुलिच, २४८.
वुल्झी, थॉमस ४५-४९, ५१-५३.
वुल्फटोन, १६४.
वूर्स्टर, ९७.

वूल्फ, १४१-१४२.
वूल्झली, लॉर्ड २०७-२०८.
वेंटवर्थ, थॉमस ( स्ट्रॅफर्ड, अर्ल ऑफ पहा ).
वेढे, एकर १६२; क्याले ५९; डयूकेन १३८; मिनोर्का १३९; रोशेल ७९; लंडनडेरी १२०; सिबॅस्टॉपल १९२.
वेलिंग्टन, डयूक ऑफ (वेल्स्ली पहा).
वेल्स, २, २२, ३०, ३२, ५४.
वेल्स्ली, सर आर्थर १५४, १६८, १७२, १७४, १७५.
वेस्ली, जॉन २३२; चार्लस २३२.
वेसेक्स, ६, ७, ९-१२.
वेस्ट इंडीज, ३८, ६५, ९७, १५१, १६६.
वेस्टमिन्स्टर १३.
वोडेन, ९.
व्यापारी संघ, ३५.
व्हार्जिनिया, ७०, १०२, १३८.
व्हाल नदी, २११.
व्हालेरा, डी २२१.
व्हास्को ड गामा, ३८, ६६, २०५.
व्हॉल्टेअर, १२५, १५९.
व्हिएन्ना, १२६.
व्हिक्टोरिया राणी, १३०, १७८; २१६; देश १८८.
व्हिक्टोरिया नियांझा, २१०.
व्हिग पक्ष, (उत्पत्ति), १०७.
व्हिटफील्ड, २३२.
व्हील्नव्ह, अॅड्मिरल १६६.
व्हेनिस, ३८.

**श.**

शॅफट्स्बरी, अर्ल ऑफ १०५, १०७-१०८, ११०.
शॅफट्स्बरी, लॉर्ड १८०.
शाल्ग्रूव्ह, ८९.
शिपायांचें बंड, ( हिंदुस्थानांतील ) १९०.
शिलेदारी बाणा, ३५.
शेक्स्पिअर, ७१; २३४.
शेतवाडी, ३४.
शेफील्ड, २३६.
शेरिफ, ३०-३१.

**स.**

सत्तेचा समतोलपणा, ६७.
समाजसत्तावादी पक्ष, २१९.
सरंजामपद्धति १४, १९, ९९.
सर्ल, ८.
सर्व्हिया, १७१, १९४, २२४, २२६.
सवलतीचा जाहीरनामा, १०४–१०५, १११, ११२, ११६.
सशस्त्र तटस्थांचा संघ, १६३.
ससेक्स, ६.
सॅक्सन, ५ ६, ९, १४.
सॅक्सनी, ५०.
सॅन्क्रॉफ्ट, आर्चबिशप ११२.
सॅंडविच, २३५.

सॅन्डहर्स्ट, २४८.
सॅस्कचिव्हान, १८६.
साउथ आफ्रिका कंपनी, २१३.
साउथ सी कंपनी, १३१-१३२.
सात बिशपवरील खटला, १११-११२.
साम्राज्यपरिषद, २४९.
सार्सफील्ड, १२१.
साल्वे, ३.
सॉमर्सेट, ड्यूक ऑफ ५५-५६.
सॉल्झबरी, लॉर्ड १९९, २०४;
सॉल्झबरीची सभा, १६.
सिएरा, लिओने २१०.
सिंह, लॉर्ड २४९.
सिड्नी, १८८.
सिनोपी, १९१.
सिबॅस्टॉपल, १९३.
सिलिशिया, १३६, १३९.
सिम्नेल, लॅंबर्ट ४१, ४४.
सीझर, ३.
सीमूर, जेन ५३-५४.
सीलोन, १७० २४६.
सुएझ, २०५.
सुएझचा कालवा, २०६.
सुदान, २०५, २०८-२०९.
सुराजुद्दौला, १३८.
सुवर्णमृग ६७.
सुवर्णवस्त्रभूमि, ४७.
सेंट पॉलसची शाळा, ३६, २३३.
सेराजेव्हो, २२४.
सेसिल, वुइल्यम ६०;रॉबर्ट ६०.
सैतानी अंमल, १६०.
सोफाया, (पहिल्या जेम्सची नात) ११८ १२९.
स्कॉट, २३५.
स्कॉटलंड, २, ५, २२-३०, ३२-३३, ४१, ४३-४४, ४७, ५४-५५, ६३-६४, ६७,६९, ७२-७३, ८४,९१, ९३-९४, ९६, ९८-९९, ११९-१२०, १२८-१२९, ११३, १३७, १८४, १९९, २३१, २३९.
स्टॅन्ले, २०९.
स्टार चेंबर कोर्ट, ४२, ८२, ८६.
स्टिफेन्सन, जॉर्ज १७९.
स्टीफन, १३, १७-१८.
स्ट्रॅफर्ड, अर्ल ऑफ ७७, ८१, ८५-८६.
स्पीकर, ८०, ८७.
स्पेन, ३८--४०, ४४, ४६--४७, ५७, ५९, ६२, ६५--७१, ७४, ७७, ७९, ८३, ९७, १२४--१२६, १२८, १३४-१३६, १४२, १५०, १६१, १६८-१६९, २२५, २४७.
स्पेन्सर, एडमंड ७१.
स्मिथ, ॲडम १५६; सिड्नी १६२.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा, १५०.
स्वित्झर्लंड, ६२, २२५.
स्विफ्ट, २३४.
स्वीडन, १६३.
स्वेन, १२.

ह.

हक्कांचा जाहीरनामा, ११४.
हॅम्पटन कोर्ट, ७३.
हॅम्पडन, ८०, ८३-८४, ८७, ८९.
हॅरोल्ड, १२-१३.
हॅवाना, १४२.
हाइड, एडवर्ड (क्लॅरेंडन पहा).
हाउन्स्लो हीथ, १११.
हाय कामिशन कोर्ट, ६३, ८२, ८६, १११.
हार्ग्रीव्हज, जेम्स १५५.
हार्ले, १२७, १२९.
हॉक, ॲड्मिरल १४१.
हॉकिन्स, सर जॉन ६६, ६८.
हॉलंड, ६२, ६७, ७०, ९४-९५, १०१, १०४-१०५, १०७, ११२--११३, १२१--१२२, १२५--१२६, १३४, १३६, १५०, १५८, १६०--१६१, २२९, २४७.
हॉवर्ड, लॉर्ड ६८.
हिंदुस्थान, १--२, ३७--३८, ६६, ७०, १२४, १३६--१३९, १४१--१४३, १५२, १५४, १५९, १६८, १९१, २०२, २०५--२०६, २२३, २३५, २४७, २४९.
हिल, रोलंड १८४.
हिअरवर्ड दी सॅक्सन, १४.
हेग, २२३; हेगची शांततापरिषद, २२३.
हेड्रियन, ३–४.
हेन्री, पहिला १३, १६-१७ २०; दुसरा १३, १७-२३, ३२, ४४; तिसरा १९, २७-२९; चौथा १९, ३३; पांचवा ३३; सहावा ३३; सातवा (ट्यूडर) ३४, ३८-४५, ७२; आठवा ४०, ४४-४९, ५१-५६, ५९, ६१, ६६, २३३.
हेन्रीएटा मराया, ७८.
हेलेना, सेंट (बेट) १७०.
हेस्टिंग्ज, वॉरन ७७ १५२.
हैदरअली, १५२.
होमरूलची चळवळ, २०३, २०५.
ह्यूज, ॲड्मिरल १५२.

## रा. रा. गो. अ. मोडक यांचीं इतर पुस्तकें,

**१. मुलांचा महाराष्ट्र** ( आ. चौथी. ):--किं. २ रुपये. पृष्ठें ६२४.

शिवशाहीपासून पेशवाईअखेर मराठ्यांचा इतिहास. लेखनाची राष्ट्रीय दृष्टि. मुंबई इलाख्यांत लायब्ररया व बक्षिसें यांजकरितां मंजूर. सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ( वऱ्हाड व नागपूर ) हायस्कूल बोर्डानें १९२६च्या 'स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट' परीक्षेकरितां रॅपिड रीडर ( जलद वाचावयाचें पुस्तक ) नेमिलें आहे.

**२. लहान मुलांचा महाराष्ट्र** ( आ. ३ री. ):--किं. ४ आणे पृष्ठें १२८.

नऊ दहा वर्षांच्या लहान मुलांसाठीं मराठ्यांच्या इतिहासाचें पुस्तक. महाराष्ट्राच्या इतिहासांतील थोर व्यक्ति व महत्त्वाचे प्रसंग यांची सोप्या भाषेंत माहिती. चित्रांचा समावेश. मुंबई इलाख्यांत आणि 'मध्यप्रांत व वऱ्हाड' मध्यें मराठी शाळांसाठीं क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर.

**३. लहान मुलांचा हिंदुस्थान**:--किं. सहा आणे. पृष्ठें १५६.

श्रीरामचंद्रापासून रणजितसिंगापर्यंत हिंदुस्थानच्या इतिहासांतील तीस विभूतींचीं चरित्रें. भाषा सोपी व ऐतिहासिक संगतीस धरून रचना. भरपूर चित्रें. विभूतींच्या आयुष्यांतील लक्षांत ठेवण्यासारख्या आख्यायिकांचा समावेश. मुंबई इलाख्यांत इंग्रजी पहिल्या इयत्तेस क्रमिक पुस्तक म्हणून उपयोगी व मंजूर.

**४. इंग्लंडचा इतिहास, भाग पहिला व दुसरा** (नवीन आवृत्ति) किंमत सव्वादोन रुपये. पृष्ठसंख्या ७२०.

कापडी बांधणी. खि. पू. ५५पासून १४८५पर्यंतची संक्षिप्त माहिती. १४८५पासून १९२४पर्यंतचा सविस्तर वृत्तांत. बहात्तर प्रकरणें. सात नकाशे. मुंबई इलाख्यांत दुय्यमशाळा व ट्रेनिंग कॉलेजें यांजमध्यें **क्रमिक पुस्तक** म्हणून मंजूर. 'मध्यप्रांत व वऱ्हाड' विद्याखात्यानें १९२७च्या 'हायस्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन'करितां नेमिलेलें वाचनपुस्तक.

---

प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर व रा. गो. अ. मोडक यांनीं लिहिलेला

**भूमितप्रवेश**:--किं. एक रुपया. मुंबई इलाख्यांत आणि 'वऱ्हाड व नागपूर' मध्यें दुय्यम शाळांतून टेक्स्ट बुक म्हणून मंजूर.

2602

REFBK-0002802
REFBK-0002802